# मराठ्यांचा इतिहास.

## भाग दुसरा.

### प्रास्ताविक माहिती.

( हिंदुस्थानांतील प्राचीन मुसलमानी राज्यें )
मोंगल बादशाहीच्या काळापर्यंत
इतर अनेक उपयुक्त व विविध माहितीसह.

लेखक
**दत्तात्रय बाळकृष्ण करकरे**
हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्य; अस्तनींतील निखारा, पेशवाईचा मध्यकाल; मराठ्यांचा इतिहास ( भाग पहिला ) वगैरे पुस्तकांचा कर्ता.
जळगांव; पूर्व खानदेश.

आवृत्ति पहिली.

इ० सन १९२३.

( सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत अडीच रुपये.



धैर्योदार्यचूडामणी, श्रीमंत सरदार गंगाधरराव रघुनाथराव
गंभीरराव देशमूख, देशपांडे, सरकानगो,
सावदें; जिल्हा पूर्व-खानदेश.

ई/५२

# मराठ्यांचा इतिहास.

## भाग दुसरा.

प्रास्ताविक माहिती.

( हिंदुस्थानांतील प्राचीन मुसलमानी राज्यें )

मोंगल बादशाहीच्या काळापर्यंत

इतर अनेक उपयुक्त व विविध माहितीसह.

लेखक

दत्तात्रय बाळकृष्ण करकरे

हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्य; अस्तनींतील निखारा, पेशवाईचा मध्यकाल; मराठ्यांचा इतिहास ( भाग पहिला ) वगैरे पुस्तकांचा कर्ता.

जळगांव; पूर्व खानदेश.

आवृत्ति पहिली.

इ० सन १९२३.

( सर्व हक्क ग्रंथकर्त्यांनें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत अडीच रुपये.

Printed by
*D. G. Sadekar, at the*
**Dhananjaya P. Press,**
and
Published by
*D. B. Karkare, in his Lokmitra Office,*
House No. 698, at Khanopur, District—Belgaum.

# आभार प्रदर्शन.

या भागास मी ज्या ज्या ग्रंथांचे आधार घेतले आहेत; त्या त्या सर्व ग्रंथकारांचा, ज्या ज्या अनेक स्नेह्यांनीं, व वाचनालयांनीं मला आपल्या अमोल्य ग्रंथसंग्रहालयाचा उपयोग करण्याची, व आवश्यक तीं पुस्तकें वापरण्यास जवळ ठेवण्याची परवानगी दिली त्यांचा, व ज्या इतर अनेक स्नेही व मराठ्यांच्या इतिहासाविषयीं अभिमान असणाऱ्या मंडळींनीं माझ्या अंगीकृत कार्यास उत्तेजन देऊन मला निरनिराळ्याप्रकारें उपयुक्त व उदार-पणानें मदत केली, त्या त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

ग्रंथकार.

# अर्पण-पत्रिका.

श्रीमंत, धैर्योदार्यचूडामणी, सरदार,

## गंगाधरराव रघुनाथराव गंभीरराव

सरकानगो, देशमूख, देशपांडे;

सावदें, जिल्हा पूर्वखानदेश,

यांच्या सेवेसीं

हा ग्रंथ

श्रीमंतांच्या परवानगीनें अत्यंत आदरानें

अर्पण केला आहे.

द. बा. करकरे.

# श्रीमंतांचें अभिनंदन

श्रीमंत सरदार गंगाधरराव साहेब यांच्या संबंधीं या ठिकाणीं कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें आवश्यक आहे. श्रीमंतांचा व माझा लहानपणा पासूनचा परिचय असल्यानें श्रीमंतांचा, या ग्रंथास आश्रय देण्याबद्दल मी विनंती केली; व ती त्यांनीं मान्य करून, मराठ्यांच्या इतिहासाच्या पहिल्या व ह्या दुसऱ्या व याच्या पुढील सर्व भागांस, आपला उदार आश्रय देऊन, मला आपलें ऋणी केलें आहे, इतकेंच नव्हें तर श्रीमंतांच्या कृपेंमुळेंच हा सर्व ग्रंथ पूर्ण होणार असल्यामुळें, त्याचें श्रेय **श्रीमंत सरदार गंगाधरराव साहेब** यांनांच देणें इष्ट आहे.

दत्तात्रय.

# सरदार गंगाधरराव रघुनाथराव गंभीरराव देशमुख, देशपांडे, सरकानगो, सावदें जिल्हा पूर्व खानदेश.

श्रीमंत गंगाधरराव रघुनाथराव गंभीरराव, सरकानगो, देशमुख, देशपांडे, व सेकंडक्लास सरदार, सावदें, जिल्हा पूर्व खानदेश, आणि नेमाड, हे, जें घराणें सहाशें पन्नास वर्षांपूर्वी, अर्जुन नाईक या नांवाच्या एका मनुष्याचा मुलगा नामें गुरूदास यानें स्थापन केलें, त्या घराण्याचे वंशज आहेत. गुरूदास हा बादशहा मुबारिक याच्या अतीशय मेहेरबानींतील असून बादशहानें त्यास खानदेश आणि नेमाड प्रांतांतील आशिरगड, सावदें, मांजरोद, वरणगांव, आणि डांगरी परगण्यांची, देशमुखी आणि देशपांडेपणाचें वतन बहाल केलें होतें. त्याच्या मृत्यू नंतर त्याचा मुलगा गंगोजी हा त्या वतनाचा मालक झाला; त्यानें भिल आणि पेंढारी यांच्या मध्यें सलोख घडवून आणण्यांत प्रमुखत्वानें भाग घेतला, आणि बादशाही सैन्यास सामुग्री वगैरेंचा पुरवठा केला. या त्यांच्या कामगिरी बद्दल बादशहा अल्लाउद्दीन यानें त्यास खानदेशांतील एकशें तेवीस गांवची जमेदारी, सरकानगोपणा, " गंभीरराव " हा किताब, व सरदारकीचे सर्व मानमरातब हीं सर्व त्यास वंशपरंपरेनें बहाल केलीं. त्यानंतर हल्लींच्या सरदार साहेबाचे आजे केशवराव गंभीरराव यांनीं आपल्या प्रदेशाच्या हद्दींत " सर्व्हे-सेंटलमेंट " ह्मणजे जमीनीची मोजणी व धाराबंदीचा उपक्रम करण्यांत इंग्रज सरकाराला प्रत्येक प्रकाराची मदत केली, आणि नवीन सुधारणा सुरू करण्याच्या, व पूर्वींच्या कांहीं बाबती दुरुस्त करण्याच्या, कामींही साह्य केलें; ह्या गोष्टी लक्षांत घेऊन या घराण्यांतील हल्लींचे मुख्य पुरुष श्रीमंत गंगाधरराव यांस हिंदुस्थान सरकारनें इ० सन १९०९ मध्यें सरदारकीचा मान अर्पण केला. हिंदुस्थान सरकारनें पूर्व खानदेश जिल्ह्यास " सरदार " ही पदवी अर्पण केल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे.

सरदार गंगाधरराव देशमूख, हे, कांहीं काळ, डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाचे मेंबर, व सावदें म्युनसिपालिटीचे प्रेसिडेंट असून सावदें गांवाची सर्वसाधारण सुधारणा, आणि आरोग्य, या बाबतींत त्यांनीं मौल्यवान कामगिरी बजाविली आहे; व ती सरकारासही मान्य झालेली आहे. त्याप्रमाणेंच त्यांना दुसऱ्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटचे अधिकार देऊन सरकारानें त्यांचा बहुमान केलेला आहे. शिवाय सर्व सावदें परगण्याच्या धर्माधिकारी-पणाचा अधिकारही त्यांच्याचकडे असून संकेश्वर आणि करवीर मठाच्या शंकराचार्यांनी त्यांना नुकताच " धैर्योदार्य चूडामणी " हा किताब देऊन त्यांचा गौरव केलेला आहे.

# Sardar, G. R. GAMBHIR RAO,
## Deshmukh, Deshpande, Sirkango,
## of
## Savda, East Khandesh.

Shrimant Gangadhar Rao Raghunath Rao Gambhir Rao, Sirkango, Deshmukh, Deshpande, and Second Class Sardar, Savda, East Khandesh and Nimar, is the descendant of a family that was founded six hundred and fifty (650) years ago by Gurudas, Son of Arjun Naik. He was a prime favourite of the Emperor Mubarik, who conferred on him the Deshmukhi and Deshpandeship of Asirgarh, Savda, Manjrod, Varangaon, and Dangari Parganas, in Khandesh and Nimar. He was succeeded by his son Gangoji, who took a leading part in establishing peace between the Bhils and the Pindaris, and supplied provisions to the Imperial troops. For these services, the hereditary Jamedari and Sirkangoship of one hundred and twentythree ( 123 ) villages in Khandesh, and the title of " Gambhir Rao," were conferred on him by the Emperor Allauddin, together with all the honours of Sardar. Keshav Rao Gambhir Rao, the grandfather of the pressent Sardar, gave every assistance in the introduction of Surveys and Settlements into his districts, and otherwise aided the Government in introducing Reforms and Improvements, and, in consideration of these services, the Government of India, in 1909, conferred the honour of a Sardarship on the present head of the family. This was the first time that the Indian Government had given the title of Sardar to the Khandesh District.

Sardar Gangadhar Rao Deshmukh, as a member of the District Local Board, and President of the Savda Muncipality, for some time, has rendered valuable services in the cause of sanitation and general improvements of the town of Savda, and these services have been recognized by Government. He has also been honoured by Government by conferring upon him the powers of a Magistrate of the second class. He also holds the powers of Dharmadhikari for the whole of Savda pargana and has been recently honoured by His Holiness the Shankaracharya of the Sankeshwar and Karvir Maths by conferring upon him the title of " Dhairyodarya Chudamani."

# आधारभूत ग्रंथांची यादी.

## इंग्रजी.

1 Brigg's Ferishta,-Vols. 1-4.
2 Caldcotte's Life of Babar.
3 .Elphinston's History of India.
4 Elliot's History of India; Vols. 1-8.
5 Erskine's History of Babar and Humayun.
6 Heeren's Asiatic Nations; Vols. 1 & 2.
7 „ Historical Reserches; Vols. 1 & 2.
8 Holden's Mogal Emperors.
9 Howorth's History of the Mogals.
10 Hunter's History of India.
11 Imperial Gazetter of India; Vol. 2; ( Historical ).
12 Keen's History of Hindustan.
13 „ Fall of the Mogal Empire.
14 Kelkar's The Case for Indian Home Rule.
15 Lane-Poole's Aurangzeb. (Rulers of India).
16 Lyall's British Dominion in India.
17 Macaulay's History of England.
18 Malleson's Akbar ( Rulers of India ).
19 Meadows Tayler's Students History of India.
20 Menezes's The life & religion of Mahommed the Prophet of Arabia.
21 Mill's Htstory of India.
22 Muir's Life of Mahommad.
23 Murray's History of India.
24 Myer's History Ancient and Modern.

25 Price's Jahangir.
26 Sarkar's Aurangzeb; Vols. 1-4.
27 Sydney Owen's India on the eve of the British Canquest.
28 Talbot's Memoirs of Babar.
29 Tratter's History of India
30 Todd's Rajasthan.
31 Vincent Smith's Oxford History of India.
32 Wheeler's History of India; Vols. 1-5.

## मराठी.

१ ओककृत इतिहास तरंगिणी.
२ ,, हिंदुस्थान कथारस.
३ पारसनीसकृत इतिहाससंग्रह.
४ ,, दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ.
५ ,, बुंदेलखंडाचा इतिहास.
६ ,, मसठे सरदार.
७ लोकहितवादीकृत राजस्थानचा इतिहास.
८ सरदेसाईकृत मुसलमानी रियासत.

टीपः—यांशिवाय कारणपरत्वें उपयोगांत आणिलेल्या इंग्रजी, मराठी पुस्तकें वगैरेंचा त्या त्या ठिकाणीं उल्लेख केला आहे.

मध्यप्रांतांतील प्रमुख वर्तमानपत्र

'महाराष्ट्र' ता. १-११-२२ मधील अभिप्रायाचा उतारा.

# मराठ्यांचा इतिहास.

( ले० श्री० दत्तात्रय बाळकृष्ण करकरे, जळगांव ) भाग १ ला. हा आमचेकडे अभिप्रायार्थ आल्यास बरेच महिने झाले. या भागांत प्रत्यक्ष महाराष्ट्राचा किंवा मराठ्यांचा इतिहास बिलकूल आलेला नाहीं; परंतु, सुमारें १ हजार वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत मराठा राष्ट्र निर्माण होण्याचीं चिन्हें दिसूं लागेपर्यंत-पूर्वीच्या २।३ हजार किंवा त्याहून जास्त वर्षांचा हिंदुस्थानचा पूर्वेतिहास या प्रास्ताविक भागांत संक्षेपतःच परंतु व्यापक व मनोरंजक रीतीनें संकलित केला आहे. वेद्कालापासून-आर्य लोक मध्यएशियांत हिंदुस्थानांत आले असें ह्मणतात, तेव्हांपासूनच-हिंदु समाजाचा व हिंदू संस्कृतीचा इतिहास थेट इ. स. १५६२ सालीं तालीकोटच्या लढाईनें विजयानगरच्या राज्याचा नाश होईपर्यंत विहंगम दृष्टीनें पाहून यांत मथित केला आहे. इंग्रजींत प्राचीन हिंदुस्थानच्या इतिहासाचीं कांहीं पुस्तकें गेल्या ४०।५० वर्षांत पैदा झालीं आहेत. परंतु, त्यांतील माहिती विवेचक दृष्टीनें व काळजीपूर्वक एकत्र करून ती मराठी वाचकांस सादर करण्याचें काम अद्यापि कोणी केलें नाहीं. तो प्रयत्न श्री० करकरे यांनीं या पहिल्या भागांत केला आहे. तेणेंकरून माहितीच्या दृष्टीनें हें पुस्तक अमूल्य व वाचनीय झालें आहे. प्रथम वैदिक व पौराणिक कालाचा वृत्तांत व दंतकथा वर्णन करून नंतर इतिहासाच्या अंधुक प्रकाशांतून मुसलमानी वर्चस्वापर्यंत ग्रंथकारानें आपला मार्ग काढिला आहे; अनेक शतकांतील राजकीय इतिहासाचा परामर्ष घेतल्यावर शेवटचीं शंभर पानें हिंदुस्थानचें प्राचीन वाङ्मय, तत्वज्ञान, राज्यव्यवस्था, गणित, ज्योतिष, युद्धशास्त्र, राजनीतिशास्त्र, शिल्प, गायन, वैद्यक, समुद्रयान, हिंदूंच्या परद्वीपांतील वसाहती, व्यापार इ. गोष्टींचे अत्यंत मनोवेधक वर्णन वाचल्यावर प्राचीन हिंदू संस्कृतीचें महत्व व वर्चस्व वाचकांच्या मनावर ठसल्याशिवाय राहणार नाहीं. अर्थांत ही पूर्वेतिहासाची भूमिका रंगविल्यामुळें त्यावर मराठ्यांच्या इतिहासाचें चित्र उठावदार दिसणार आहे. पुढें होणारे 'मराठ्यांच्या इतिहासा'चे १४।१५ भाग विचारांत न घेतले, व हा भाग स्वतंत्र घेतला, तरी तो अत्यंत वाचनीय व संग्रहणीय झाला आहे. यांत तिळमात्र शंका नाहीं. यापुढील भागही असेच मनोरंजक व माहितीपूर्ण निपजतील अशी आह्मास खात्री वाटते. हल्लीं साने, राजवाडे, खरे, पारसनीस, भावे, देव, चांदोरकर,

आपटे; किंकेड व इतिहाससंशोधक मंडळ ( पुणें ) वगैरे अनेक संशोधकांनीं, लेखकांनीं, व संस्थांनीं मराठी इतिहासाचें पुष्कळ नवीन साहित्य प्रसिद्ध केलें आहे. त्याची जुळवाजुळव व चिकित्सा करून त्यांतून मराठ्यांच्या इतिहासाचें मंदिर उभारण्याचें काम कल्पक व चतुर इतिहासकाराचें आहे. रा. सरदेसाई यांनीं तें काम उत्तम तऱ्हेनें चालविलें आहेच परंतु श्री. करकरे यांचा हा प्रयत्न त्याहूनही विस्तृत आहे. त्यांच्या इतिहासाचीं ४ ते ५ हजार पृष्ठें होतील, असा अंदाज आहे; व या ग्रंथांत ' मराठ्यांच्या इतिहासा ' चें यथातथ्य प्रतिबिंब उमटेल, असा आमचा अंदाज आहे.

यासाठीं ग्रंथकर्त्यांस कांहीं स्नेहभावाच्या सूचना करून ' मराठ्यांच्या इतिहास ' काराची आह्मी रजा घेतों. ( १ ) मराठ्यांच्या कारकीर्दींत स्वराज्यविघातक अशा ज्या ज्या चुका मराठ्यांच्या अथवा पेशव्यांच्या हातून घडल्या असतील, त्यांचें त्यांचें आविष्करण करून पुढें त्याच चुका लोकांच्या हातून न घडाव्यात ह्मणून त्यांस ठिकठिकाणीं इशारा देण्यांत यावा. इतिहासकारानें जशी सद्गुणांची पाठ थोपटली पाहिजे; तशीच राष्ट्रीय दुर्गुणांचे कपाळावर काठी मारण्यासही चुकतां कामा नये. ( २ ) इतिहासकारानें ऐतिहासिक सत्याची छपवाछपव करूं नये, हें खरें. परंतु, तें सत्य पुढें मांडतांना हल्लींच्या समाजांत कलहाग्नि न भडकेल, अशी खबरदारी घेतली पाहिजे. कित्येक सत्यें कडू औषधाच्या गोळीप्रमाणें शर्करावगुंठित केल्यास तीं वाचकांस पचूं शकतात ! इतिहास हें अनेक बऱ्यावाईट सत्य गोष्टींचें भांडार आहे. त्यांत टाकाऊ व निरुपयोगी अशाही सत्य गोष्टींची पुष्कळ अडगळ पडली आहे. त्या अडगळींतून भावी राष्ट्राला उपयुक्त व मार्गदर्शक अशी सामुग्रीच निवडून देऊन व ती नीट जुळवून लोकांच्या हातांत देणें, यांतच इतिहासकाराचें कौशल्य आहे. ( ३ ) ऐतिहासिक सिद्धांत व अनुमानें स्वतःच्या शब्दांनीं सांगण्यापेक्षां आपल्या विषयाची मांडणीच अशी करावी कीं, त्या मांडणीवरून वाचकांनीं स्वतःच ते सिद्धांत किंवा तीं अनुमानें सहज काढावींत ! ( ४ ) पहिल्या भागांत ऱ्हस्व दीर्घादिकांचे मुद्रणप्रमाद ठिकठिकाणीं झाले आहेत. अशा महत्वाच्या ग्रंथास ते शोभत नाहींत-ह्मणून पुढील भागांत तिकडे विशेष लक्ष पुरवावें.

श्री० करकरे यांचा ' मराठ्यांचा इतिहास ' महाराष्ट्रांत लोकप्रिय होऊन त्यास सर्व सार्वजनिक व खासगी वाचनलायांत जागा मिळेल, अशी आह्मांस खात्री वाटते. ( पहिल्या भागाची किंमत २॥ रु० )

" वऱ्हाडांतील प्रसिद्ध वर्तमान पत्र "

## उदय—अमरावती. मंगळवार ता० ११ जुलै सन १९२२ इ.

**मराठ्यांचा इतिहास**—श्री. दत्तात्रेय बाळकृष्ण करकरे हे हल्लीं येथें आले असून येथें इतिहासप्रिय लोकांस त्यांनीं गेल्या बुधवारीं सुमारें दोन अडीच तास फारच श्रमपूर्वक मिळविलेली अशी उत्कृष्ट ऐतिहासिक माहिती सांगितली, ही माहिती ज्यानें ऐकली असेल त्यास श्री. करकरे यांनीं इतिहासाचा किती श्रमपूर्वक अभ्यास केलेला आहे, याविषयीं शंका राहणार नाहीं. या माहितीवरून हिंदुस्थानच्या इतिहासाच्या घडामोडींच्या कारणांविषयींहि त्यांनीं आपले कांहीं सिद्धांत बसाविले आहेत व ही माहिती व हे सिद्धान्त एकत्र ग्रथित करून ते " मराठ्यांचा इतिहास " ह्मणून तीन तीनशें पानांच्या चवदा, पंद्रा, भागांच्या ग्रंथांत सुसंगतपणें मराठ्यांचा प्राचीन काळापासून अगदीं अर्वाचीन काळापर्यंत साग्र इतिहास लिहून काढणार आहेत. श्री. सरदेसाई यांच्याशिवाय, सर्व उपलब्ध तुटक तुटक नवी माहिती श्रमपूर्वक संकलित करून सरळ इतिहास लिहून काढण्याचा प्रयत्न मराठींत दुसऱ्या कोणींहि आजवर केला नव्हता, पण या कामाची गरज अत्यंत आहे. आणि हें संकलित इतिहास लेखनाचें काम इतिहासाचीं साधनें उपलब्ध करून घेण्याइतकेंच किंबहुना असल्यास त्याहून थोडें अधिकच कठिण आहे; व हें काम एकानेंच नव्हे, तर अनेकांनीं आपआपल्या दृष्टीनें, व वेळोवेळीं अधिकाधिक साधनें उपलब्ध होतील तसतसें करीत गेलें तरच महाराष्ट्रासारख्या प्रदेशाचा खरा उत्कृष्ट इतिहास कांहीं दिवसांनीं तयार होण्याची आशा आहे. या दृष्टीनें श्री० करकरे यांचें काम अत्यंत स्तुत्य आहे यांत शंका नाहीं व इतकें कष्टाचें काम हातीं घेतल्याबद्दल आह्मी श्री. करकरे यांचें अभिनंदन करितों व सुंदर माहितीनें भरलेल्या श्री. करकरे यांच्या ग्रंथास महाराष्ट्र आश्रय देऊन श्री. करकरे यांस आपलें अंगिकृत दुर्घट कार्य पार पाडण्यास समर्थ करील अशी आशा बाळगतों. श्री. करकरे यांच्या ग्रंथाचा पहिला भाग प्रसिद्ध झाला असून दुसरा भाग छापत आहे. व त्यास आणखी आश्रयदात्यांची गरज आहे.

———

## पुणें येथील डे० व्ह० ट्रा० सोसायटीकडून या ग्रंथाच्या पहिल्या भागास पन्नास रुपये बक्षीस मिळाले, त्या संबंधींच्या पत्राचा उतारा.

॥ श्री ॥

नं. २४३ सन १९२२।२३.

डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीचें ऑफिस,

पुणें शहर ता० २५।८ सन १९२२.

रा. रा. दत्तात्रय बाळकृष्ण करकरे, जळगांव पूर्व-खानदेश. यांस.

वि. वि. या संस्थेकडून आश्रय मिळावा ह्या हेतूनें आपलें ता. २३।७।१९२१ चें अर्जासोबत पाठविलेलें पुस्तक मराठ्यांचा इतिहास भाग १ याचें परीक्षण होऊन ता. २२ आगष्ट सन १९२२ रोजीं भरलेल्या व्यवस्थापक मंडळीचे सभेनें असें ठरविलें आहे कीं, संस्थेनें आपणास सदर पुस्तकाबद्दल रुपये ५० (पन्नास रु.) बक्षीस द्यावे व आपण संस्थेस सदर पुस्तकाच्या आणखी दोन प्रती द्याव्या. सबब ह्या पत्रासोबत पाठविलेल्या बिलाच्या चारी प्रतींवर पेनसलीनें 'सही' असें लिहिलें आहे तेथें सह्या कराव्या व पेनसलीनें फुली केली आहे तेथें तारखा घालाव्या. आणि सदर सर्व प्रति इकडे ताबडतोब परत पाठविण्याचें करावें. पुस्तकाच्या प्रती व बिलाच्या प्रती आपणाकडून आल्यानंतर पुढील व्यवस्था होऊन सुमारें एक महिन्यानें बक्षीसाची रक्कम आपलेकडे मनीऑर्डरीनें पाठविण्यांत येईल. कळावें, लोभ करावा हे विनंति.

"सही इंग्रजी"

चिटणीस.

# प्रस्तावना.

मागील भागांत हिंदुस्थानांतील विजयानगरच्या राज्यापर्यंतचीं हिंदु राज्यें, हिंदु संस्कृति, हिंदू धर्मांतील उदात्त तत्वें, वगैरे बाबतींचें विवेचन केलें आहे. तथापि विजयानगरच्या राज्याचा नाश होण्याच्या अगोदरपासूनच हिंदुस्थानांवर मुसलमान लोकांच्या अनेक स्वाऱ्या होऊन, त्यांनीं, अनेक प्रसिद्ध हिंदू राज्यांप्रमाणेंच, याही वैभव-संपन्न राज्याचा नाश केला आहे; आणि इकडेसच स्थाईक होऊन त्यांनीं हिंदुस्थानांत राज्यें संपादन केलीं आहेत. हिंदुस्थानांत मोंगली साम्राज्य स्थापन होईपर्यंतच्या काळांत, दिल्लीच्या तख्तावरील अनेक राजघराण्यांची उलटापालट झाली; पण बादशहा बाबरपासून हिंदुस्थानांत नवें मन्वंतर सुरू झालें; व हेंच घराणें " हिंदुस्थानचे बादशहा " म्हणून कायम राहून, मोंगल राष्ट्र हें जगांतील अत्यंत वैभव-संपन्न राष्ट्र म्हणून नांवाजलें गेलें तथापि याच बलिष्ट मोंगल सत्तेशीं अवरंगझेबाच्या काळांत सारखें झगडत राहून, मराठ्यांनीं आपलें अस्तित्व कायम ठेविलें आहे; व आपल्या सत्तेचा विस्तार करीत करीत एकेकाळीं तर सुद्धा मोंगल-बादशहा शहाअलम यासच त्यांनीं आपल्या तरवारीस तोफांचें पाठबळ देऊन, दिल्लीच्या तख्तावर आणून बसविलें आहे; म्हणजे मराठ्यांचा इतिहास मोंगल-बादशाहीपासून बनलेला आहे; मराठ्यांचें साम्राज्य मोंगली साम्राज्यांतून निर्माण झालेलें आहे, वाढीस लागलेलें आहे; आणि पुढें औपचारीकरीत्या मोंगल बादशाहीचा सांभाळ करून हिंदुपद्बादशाही स्थापन करण्याचें मराठ्यांचें धोरण बळावत गेलेलें आहे. म्हणून हिंदुस्थानांतील मुसलमानी राज्यें, मोंगल बादशाही व त्या काळांतील युरोपांतील राज्यें यांचें तुलनात्मक विवेचन, मुसलमानी धर्म, व त्याचें रहस्य, त्या काळांत हिंदु लोकांना प्राप्त झालेलें राजकीय वर्चस्व, वगैरे बाबतींत प्रास्तावीक माहिती म्हणून या दुसऱ्या भागांत ग्रथित केली आहे व पुढील इतिहास वांचतांना ती लक्षांत घेणें आवश्यक आहे.

हिंदुस्थानांत मराठ्यांचा राजकीय संबंध मोंगल–साम्राज्याशीं आलेला असल्यामुळें त्या काळापासूनच्या राजकीय स्थितीचें या ठिकाणीं थोडक्यांत विवेचन करणें आवश्यक आहे. हिंदुस्थानांत मोंगली साम्राज्य स्थापन होण्याच्या पूर्वींच कित्येक मुसलमान राज्यकर्त्यांनीं हिंदूमुलींशीं लग्न–संबंध केले होते आणि पुढें मोंगल–बादशाहतींत तर असे लग्न–संबंध पुष्कळच अधीक प्रमाणांत घडून आले. शिवाय मुसलमानी धर्म स्वीकारणाऱ्या हिंदूंची संख्याही अधीक वाढत गेली; तथापि पुढील काळांतील मोंगल–बादशहा, राजपुत्र–मंडळ, व अनेक सरदार व दरबारी मंडळी, ही हिंदू आई-

पासून झालेली असल्यामुळें आणि बाटलेल्या हिंदूलोकांनीं आपले आचार-विचार व चालीरीति कांहींशा कायम ठेविल्यामुळें हिंदूलोकांच्या संस्काराचा थोड्याफार प्रमाणांत मुसलमानांवर पगडा बसला; आणि हिंदूधर्म, हिंदूसंस्कृति, व भाषा, हीं कायम राहून-व कांहीं काळ त्यांची वाढ होऊन-हिंदूंच्या व मराठ्यांच्या उत्कर्षास जीं अनेक प्रमुख कारणें झालीं, त्यांतीलच हेंही एक झालें.

मुसलमान राज्यकर्त्यांशीं लग्न-संबंध करण्याचा प्रघात, मोंगल बादशाहीच्या काळांत प्रथमतःजयपूरकर राजा भगवानदास यानें पाडिला; व आपली मुलगी हुमायून बादशहास दिली; व पुढें तो वाढत गेला; जहांगीर, खुश्रू, शहाजहान वगैरे मंडळी हिंदू आईपासून-रजपूत स्त्रियांपासून झालेली असून हाच प्रघात मोंगल बादशाही मरणोन्मुख झाली तरी कायम होता व त्या वेळींही फरुखसेयर ( कारकीर्द इ. सन १७१३-१९ ) यानें मारवाडचा राजा अजीतसिंह याच्या मुलीशीं लग्न केलें होतें. तथापि हा लग्न संबंध ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचा आहे, व त्यामुळेंच इंग्रजांचें बंगाल प्रांतामध्यें महत्व स्थापन झालें आहे; आणि योगायोग असा कीं या लग्नामुळें फरुखसेयर व अजितसिंह या दोघांपेक्षां इंग्रजांचाच अधीक फायदा झाला; तो प्रकार थोडक्यांत पुढें लिहिल्याप्रमाणें आहे; इ० स १६९६ मध्यें बादशहा अमलगीर ऊर्फ अवरंगझेब यानें आपला नातू शहाजादा अजीमुश्शाम यास बंगालच्या सुभेदारीवर नेमिलें; त्यानंतर दोनच वर्षांनीं, इ० सन १६९८ मध्यें, इंग्रजांनीं त्यास नजराणें देऊन सुतनट्टी, कालीकोट आणि गोविंदपूर हीं तीन गांवें दरसाल ११९५ रुपये सारा भरण्याच्या अटीवर खरेदी केलीं; पुढें इ० सन १७०१ मध्यें मूर्शिदकुलीखान याची अजीमुश्शामच्या हाताखालीं बंगालच्या दिवाणीवर नेमणूक झाली, व पुढें इ० सन १७१३ मध्यें तोच बंगालचा सुभेदार झाला; मूर्शिदकुलीखान हा मोठा करडा अधिकारी असून तो मूळचा ब्राह्मण असून पुढें बाटून मुसलमान झालेला होता; इंग्रजांनीं उपरीनिर्दिष्ट तीन गांवें खरेदी केल्यानंतर त्यांस जमीनदारांची पदवी प्राप्त झाली. व इतर जमीनदारांप्रमाणेंच लोकांनां दंड अथवा शिक्षा करणें,फटके मारणें वगैरे प्रकारांनीं तेही या तीन गांवांवर आपला अंमल चालवूं लागले; तथापि ही गोष्ट हुगळी येथील मोंगल अधिकाऱ्यास पसंत पडली नाहीं, व त्यानें त्याबद्दल अजीमुश्शामकडे कागाळी केली; पण इंग्रजांनीं त्याची तोंडदाबी केल्यामुळें त्या कागाळीचा कांहींही उपयोग झाला नाहीं. तथापि पुढें मूर्शिदकुलीखान कडून इंग्रजांना त्रास होऊं लागला; तेव्हां आपल्या व्यापाराची कायमची फायदेशीर, व योग्य व्यवस्था लावून घेण्याकारितां इ० सन १७१५ मध्यें कलकत्तेकर इंग्रजांनीं दिल्लीस फर्रुखसेयर बादशहाकडे जॉन सर्मन, व कोगीसर होद हे दोन वकील पाठविले; त्यांनीं बंगालचा सुभेदार मूर्शिदकुलीखान याच्या

विरुद्ध बादशहाकडे पुष्कळ गाऱ्हाणें केलें; यावेळीं फर्रुखसेयर यास काळपुळी होऊन तो अतिशय आजारी होता; अशावेळीं—ह्मणजे सर्व वैद्यांचे उपाय थकल्यामुळें प्रत्यक्ष बादशहाच या आजारीपणांतून आपण कसें जगूं, या विवंचनेंत असतां इंग्रजांची तेथें दाद लागणें जवळजवळ अशक्यच होतें; पण इंग्रजांच्या सुदैवानें त्यांच्या उपरीनिर्दिष्ट दोन वकिलांबरोबर हॅमिल्टन या नांवाचा एक शस्त्रवैद्य होता; त्यास बादशहास औषधोपचार करण्याबद्दल विनंती करण्यांत आली; व ती त्यानें तात्काळ मान्य करून, व बादशहावर शस्त्रप्रयोग करून त्यास अल्पकाळांतच पूर्णपणें बरें केलें; नंतर बादशहाच्या या दुखण्यामुळेंच त्याचें अजीतसिंहाच्या मुलीशीं ठरलेलें लग्न लांबणीवर पडलें होतें, तें निर्विघ्नपणें तडीस गेलें; हॅमिल्टन यानें आपणांस जीवदान दिलें, हे त्याचे आपणांवर फार मोठे उपकार झाले, असें बादशहास वाटत असे; त्यामुळें हॅमिल्टन यास त्यानें तो मागता तितकें द्रव्य दिलें असतें; पण त्यानें बादशहाजवळ स्वतः करितां कांहींही मागितलें नाहीं; त्यानें बादशहास अर्ज केला कीं, "बंगालच्या सुभेदारा विरुद्ध कंपनीनें ज्या तक्रारी केल्या आहेत, त्या बादशहानें कबूल करून त्याप्रमाणें फर्मान मिळावें;" उपकारानें बद्ध झालेल्या बादशहानें आपल्या फर्मानाचा काय परिणाम होईल, याचा विचार न करतां, हॅमिल्टनच्या ह्मणण्याप्रमाणें फर्मान काढिलें, आणि मोंगली राज्यांत इंग्रजांना कांहीं ठरीव अटींवर बादशहानें जकातीची माफी कायमची करून दिली. (ता० ६ जानेवारी, इ० सन १७१७.)

हॅमिल्टन याच्या या उदात्त वर्तनावरून काय बोध घ्यावयाचा? इंग्रज लोकांत जे कित्येक अलौकिक सद्गुण आहेत, त्यांतीलच त्यांचा "देशाभिमान" हाही एक सद्गुण आहे. हिंदुस्थानांत याची फारच अल्पप्रमाणांत पैदास आहे; ह्मणून आपण हिंदवासीयांनीं तर या सद्गुणाचें अवश्य अवलंबन केलें पाहिजे. उलटपक्षीं इंग्रजलोकांत हा सद्गुण नसलेल्या लोकांची फारच अल्प संख्या आणि तीही क्वचितच आढळेल. स्वतःच्या फायद्यापेक्षां राष्ट्रीय फायद्याचें महत्व नेहमीं डोळ्यापुढें ठेवून त्या प्रमाणें आचरण करण्याचा गुण इंग्रज लोकांच्या अंगीं पूर्णपणें बाणला असल्यामुळेंच त्यांचा अतीशय उत्कर्ष झाला आहे, व आज सर्व जगभर त्यांचें साम्राज्य पसरलें आहे. स्वतःचा फायदा एका बाजूस सारून राष्ट्राचा फायदा करण्याचा देशाभिमान जिवंत, जाग्रत, व प्रखर असेल तरच राष्ट्रास सुखाचे दिवस येतात; व नंतर राष्ट्रीय सुखाच्या सावलींत व्यक्तींचें हित सहजच साधलें जातें. क्लाईव्हचीं कांहीं कृत्यें दूषणास्पद असलीं तरी मिरजाफरच्या मृत्युपत्रामुळें त्याला जी संपत्ति मिळाली तिचा विनियोग त्यानें आपल्या देशाच्या लष्करी अंमलदारांच्या उपयोगार्थ केला. उलटपक्षीं खर्डा येथील युद्धानंतर, पेशव्यांशीं निजामअलीचा तह झाला

त्यावेळीं, निजामानें नाना फडणीस यास तीस हजार रुपये उत्पन्नाचे गांव जहागीर दिले, ते त्यानें स्वतःकडे ठेवून घेतले; इतकेंच नाहीं तर वरील जाहगिरीसह नानाचें एकंदर वार्षिक उत्पन्न दोनलक्ष त्रेपन्न हजारांचें असून त्यानें देशकार्याकरितां या उत्पन्नांतून कांहींही रकम खर्च केली नाहीं. देशाकरितां स्वार्थत्याग करण्याचा–देशाचा फायदा हें ध्येय नेहमीं डोळ्यापुढें ठेवून, आचरणांत आणून, स्वतःचा फायदा बाजूस सारून देशकार्य, व देशकल्याण पहिल्यानें साधण्याचा महत्वाचा धडा आपण इंग्रजापासून अवश्य शिकला पाहिजे. स्वतःचें पोट भरण्याचा स्वार्थ जनावरांत व पक्ष्यांतही आहे; पण लोक-कल्याण, व देशकल्याण हीं प्रधान मानून स्वदेशाकरितां स्वतःचा स्वार्थ झुगारून देण्याचा सद्गुण आपणही इंग्रजांप्रमाणें अवश्यमेव आपल्या अंगीं आणिला पाहिजे. इंग्रज व फ्रेंच

---

**टीप १:**–नानाफडणीसाचें वार्षिक उत्पन्न खालीं लिहिल्याप्रमाणें होतें, तें:–

| | जहागीर देणारांचें नांव. | दरसाल वसूल; |
|---|---|---|
| १ | पेशवे. ... ... ... | ६००० रुपये. |
| २ | आंग्रे; अलीबागकर. ... ... ... | २००० ,, |
| ३ | गाईकवाड, बडोदेकर. ... ... ... | १०,००० ,, |
| ४ | भोंसले, नागपूरकर. ... ... ... | १०,००० ,, |
| ५ | हैदरअली, म्हैसूरकर. ... ... ... | ८००० ,, |
| ६ | हबशी, जंजीरेकर. ... ... ... | २००० ,, |
| ७ | होळकर, इंदूरकर. ... ... ... | १०,००० ,, |
| ८ | शिंदि, ग्वाल्हेरकर. ... ... ... | ६५,००० ,, |
| ९ | सचीव, भोरकर. ... ... ... | २००० ,, |
| १० | परशुराम भाऊ पटवर्धन मिरजकर. ... ... | ५००० ,, |
| ११ | प्रतिनिधी, ( कोल्हापूरकरांचे. ) ... ... | १००० ,, |
| १२ | प्रतिनिधी ( सातारकराचे. ) ... ... | १०,००० ,, |
| १३ | कारकूनीचे कामाबद्दल. ... ... | ४०,००० ,, |
| १४ | साताराचे मंत्री. ... ... ... | २००० ,, |
| १५ | दुसरे जहागिरदारांकडून. ... ... | ५०,००० ,, |
| १६ | निजाम हैद्राबादकर. ... ... | ३०,००० ,, |
| १६ | एकूण उत्पन्न... | २,५३,००० |

हे हिंदुस्थानांत परस्परांविरुद्ध वर्चस्व प्राप्तिकरितां कांहीं काळ मोठ्या चिकाटीनें सारखे झगडत राहिले; पण स्वकीयांविरुद्ध ते लढले नाहींत. वारनहेस्टिंगस् याचें हिंदुस्थानांतील आयुष्य आपल्या कौन्सिलांतील लोकांशीं भांडण्यांत खर्च झालें, आणि डुप्ले, लाली व बुशी यांचींही आपआपसांत मोठ्या जोराचीं अनेक भांडणें झालीं; पण त्यांनीं आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा नाश करण्याकरितां एतद्देशियांची मदत घेतली नाहीं, किंवा युरोपियन कंपनीविरुद्ध फुटून, फितूरी होऊन, अथवा बंड करून कोणीच युरोपियन निराळा निघाला नाहीं, इतकेंच नव्हे तर हिंदी राजेरजवाड्यांच्या पदरीं जे युरोपियन लोक नोकरींत राहिले, त्यांनींही नोकरीस राहतांना प्रायःअसाच करार केला होता कीं, स्वकीयांविरुद्ध युद्ध सुरू झालें असतां त्यांत आह्मी भाग घेणार नाहीं; ह्मणजे स्वदेश, व स्वकीय ही भावना ते हिंदी राजेरजवाड्यांच्या नोकरींत राहिले तरी विसरले नाहींत, ही गोष्ट आपण ध्यानांत ठेविली पाहिजे. स्वदेश व स्वकीय भक्तिनिष्ठेचा हा धडा आपण सदैव आपल्या डोळ्यापुढें ठेवून त्याप्रमाणें आचरण केलें पाहिजे; इंग्रजांच्या दैवाइतकेंच, स्वदेशप्रीति, स्वकीयांचा अभिमान, राष्ट्रकार्याची तत्परता, स्वार्थत्याग, चिकाटी, दीर्घोद्योग, मेहनती व काटक स्वभाव, कर्तव्यनिष्ठा, वगैरे त्यांच्या अंगीं वसत असलेले अलौकिक व अमोल्य सद्गुणही त्यांच्या उत्कर्षांत व साम्राज्यसंस्थापनेस कारणीभूत झाले आहेत हें कबूल करणें भाग आहे. इंग्रजांच्या संबंधानें लिहितांना ज्याप्रमाणें ऐतिहासिक दृष्टी कायम ठेवून त्यांच्यावर प्रसंगाप्रमाणें टिका करावयाची त्याप्रमाणेंच त्यांनीं केलेलीं सत्कृत्यें, व त्यांच्या अंगीं वसत असलेले सद्गुण याबद्दल त्यांची तारीफही केली पाहिजे; इंग्रजलोकांत जाज्वल्य " देशाभिमान " आहे, आणि हा सद्गुण आपण त्यांच्या पासून शिकलों तर आपलें व हिंदुस्थानचें कल्याण होईल, अशी खात्री आहे.

हिंदुस्थानांतील मुसलमानी इतिहासाचे तीन काळ पाडितां येतात; त्यांपैकीं, हिंदुस्थानावर मुसलमान लोकांनीं स्वाऱ्या केल्या, परंतु इकडे स्थाईक न होतां इकडून लूट मिळवून ते परत स्वदेशीं गेले, तो पहिला काळ; मुसलमान लोक इकडे स्थाईक होऊन त्यांनीं अनेक राज्यें स्थापन केलीं, आणि दिल्ली येथें मोंगल बादशाही स्थापन होईपर्यंत तेथील बादशाहतीचा उपभोग घेतला तो दुसराकाळ; आणि बाबर यानें दिल्ली येथें जें भावी एक अत्यंत वैभवसंपन्न मोंगल साम्राज्य स्थापन केलें; त्या साम्राज्याचा अवरंगझेबापर्यंतचा काळ, हा तिसरा होय. या तीन्हींही काळांसंबंधीं पाहतां असें स्पष्ट दिसून येतें कीं, मुसलमान लोकांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या, त्या पहिल्या काळापासूनच हिंदू राज्यकर्ते, व विशेषतः रजपूत नरेंद्रमंडळी मुसलमानी सत्तेस नेहमीं सारखा मोठ्या जोरानें प्रतिरोध करीत आले आहेत; आणि त्यांच्या स्वाऱ्यांचे सर्व आघातही पहिल्यानें

उत्तर हिंदुस्थानांतील हिंदू व रजपूत राज्यें यांनांच सारखे सहन करून त्यांचा प्रतिकार करीत रहावें लागलें आहे.

हिंदुस्थानांतील हिंदू राज्यें, आणि मुसलमान लोक यांच्या मधील वर्चस्व प्राप्तीकरितां झालेल्या युद्धकलहांची, पहिल्या भागांत व या भागांतील पुढील पानांत आवश्यक ती माहिती दिली आहे; खलीफा उमर याच्या कारकीर्दीत, तैग्रीस नदीवर बसरा हें प्रसिद्ध शहर त्यानें बसविल्यानंतर, त्या बंदरावरूनच हिंदुस्थानांतील सिंध व गुजराथ या प्रांतांशीं तुर्कस्थान देशाचें व्यापारी दळणवळण चालू असे, याच काळांत तुर्कसरदार अबुलआस यानें गुजराथेवर स्वारी केली होती; परंतु आरोर येथील युद्धांत त्याच्या सैन्याचा सर्वस्वीं नाश झाल्यामुळें ती स्वारी पूर्णपणें निष्फळ झाली. पुढें खलीफा उस्मान यानें या युद्धाची संपूर्ण हकीकत आपणास कळावी म्हणून हिंदुस्थानांत आपले कांहीं लोक तपासाकरितां पाठविले, व तो स्वतःही हिंदुस्थानावर चाल करून येण्याच्या विचारांत होता पण तो त्याचा बेत सिद्धीस गेला नाहीं. पुढें खलीफा अल्ली यानें हिंदुस्थानांवर सैन्य पाठवून सिंध प्रांत आपल्या हस्तगत करून घेतला; परंतु अल्लीच्या मृत्यूनंतर त्या प्रदेशावरील त्याचा अंमल नाहींसा झाला. पुढें खलीफा अब्दुल मलिक याच्या कारकीर्दीत खोरासान येथील यजीदाच्या सैन्यानें हिंदुस्थानांवर कित्येक वेळां स्वाऱ्या केल्या पण सिंध प्रांतावर त्याचा अंमल न बसतां तिकडून लूटी मिळवूनच त्यांना परत जावें लागलें; त्यानंतर वलीद व नंतर महंमद कासम यांनीं सिंधप्रांतावर स्वाऱ्या केल्या; त्यानंतर महंमद या नांवाच्या एका मनुष्यानें कनोजवर व अल्मनसूर यानें सिंधप्रांतावर स्वारी केली; याचवेळीं खोरासान येथील राज्यकर्ता यज्द याचा मुलगा तिकडून पळून सिंध प्रांतांत येऊन राहिला होता; अल्मनसूर यानें खलीफा अब्बास याच्या नांवानें सिंध प्रांतावर बरींच वर्षें अंमल चालविला. मनसोरा ऊर्फ मीननगर हें यावेळीं त्याच्या राजधानीचें शहर होतें, पुढें खलीफा हारून-अल्-रशीद यानें आपल्या राज्याची वांटणी केली त्यांत सिंधप्रांत अल्मामून यांस मिळाला; व पुढें इ० सन ८१३ मध्यें तो खलीफा झाल्यावर त्यानें चितोडवर सैन्य पाठविलें; पण अंतस्थ मानगडीमुळें त्यानंतर हिंदुस्थान देशाकडे लक्ष देण्यास त्यास अवसर मिळाला नाहीं. पुढें इ० सन ९७५ मध्यें सबक्तगीन यानें हिंदुस्थानांवर स्वारी केली; व त्यानंतर त्याचा मुलगा महंमूद यानें तर या देशावर अनेक वेळां स्वाऱ्या करून—अनेक देवालयांचा व शहरांचा नाश करून—अगणित संपत्ति स्वदेशीं नेली, व या काळापासून मुसलमानांचें हिंदुस्थान देशाबरोबरील राजकीय दळणवळण भव्य प्रमाणांत सुरू झालें.

चितोड येथील प्रसिद्ध राज्यकर्ता बाप्पारावळ–याला " हिंदवा सूरज ( हिंदचा सूर्य ) " राजगुरू " व " चकवा " ( चक्रवर्ती ) असेंही ह्मणत असत.—हा इ० सन ७६४ च्या सुमारास गादीवर आला; त्यापूर्वीच सुमारें चाळीस वर्षांत हिंदुस्थानावरील मुसलमानांच्या स्वाऱ्यांमुळें उत्तर हिंदुस्थानांतील राज्यकर्त्यांची स्थिति डळमळीत झाली होती. मुसलमानांनीं इ० सन ७२४ मध्यें प्रथमतः पंजाबांतून " भाटी " नांवाच्या क्षत्रिय राज्यकर्त्यास हांकलून दिलें, व त्यानंतर फरीद या नांवाच्या एका सरदारानें अजमीर येथील राज्यकर्ता माणिकराय यास ठार मारून त्या राज्याचा ताबा मिळविला. उलटपक्षीं बाप्पा हा अतीशय पराक्रमी निपजला; त्यानें इराण, तुराण, इस्पहान, कंदाहार, काश्मीर, आणि काबूल वगैरे देश जिंकून तेथील राज्यकर्त्यांच्या मुलींशीं लग्नें केलीं होतीं; शिवाय स्वतः गज्नी शहरावर चाल करून जाऊन व तेथील राज्यकर्ता सेलीम याचा पराभव करून त्यानें तें शहर आपल्या ताब्यांत घेतलें होतें; व या स्वारींतही सेलीमच्या कन्येशीं त्यानें विवाह केला होता. या राज्यकर्त्याला एकंदर १३० मुलगे असून त्यांपैकीं ९८ हिंदू राण्यांपासून व ३२ मुसलमान राण्यांपासून झालेले होते; हा राज्यकर्ता शंभर वर्षांचा होऊन मृत्यु पावला; अशा प्रकारचें दुसरें उदाहरण हिंदुस्थानच्या इतिहासांत क्वचितच आढळेल, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

शहाबुद्दीन घोरी यानेंच हिंदुस्थानदेशांत मुसलमानी राज्याचा पाया घातला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तत्कालीन स्थिति पाहतां रजपुतांचें आपसांतच वैर होतें; आणि चव्हाण व राठोड यांनीं तर आपापसांतच लढून आपला नाश करून घेतला, असें निदर्शनास येतें. अशा प्रकारचीही आपसांतील फाटाफूट मुसलमानांना फार फायदेशीर झाली, आणि दिल्ली, कनोज, चितोड वगैरे राज्यें त्यांनीं जिंकून आपल्या ताब्यांत घेतलीं. शिवाय याच काळांत मुसलमानीसैन्य–स्वकीयांचा नाश करण्याकरितां–आपल्या पदरीं नौकरीस ठेवण्याचा नवा प्रघात सुरू झाला. कनोज व पट्टण येथील राज्यकर्त्यांनीं मुसलमानीसैन्य-आपल्या नोकरींत ठेविलें पण पुढें हेंच सैन्य मुसलमान राज्यकर्त्यांनां सामील होऊन, व त्यांच्या तर्फे हिंदू राज्यकर्त्यांशीं लढून, त्यांच्या राज्यवैभवाचा नाश होण्यास कारणीभूत झालें. यावरून आपण काय बोध घ्यावयाचा? स्वकीयांबरोबर प्रतिस्पर्धा सुरू झाली, ह्मणजे तो स्वकीयही " दुष्मनाचा कांटा " आहे असें वाटूं लागतें; आणि आपल्या वर्चस्वमार्गांतून त्याला पार उखडून टाकण्याचें, व त्याकरितां निरनिराळे सक्तीचे अथवा वाममार्ग शोधीत राहण्याचे त्याचे प्रयत्न सुरू होतात. असे प्रयत्न सुरू झाले ह्मणजे निरनिराळ्या योजनांची त्याच्या टीचभर डोक्यांत इतकी गर्दी होते–टीचभर डोक्यांत टोपलीभर विचार सारखे कोंबीत राहिल्यानें तो इतका विवेक-शून्य बनून जातो—कीं, दूरदर्शीत्व अथवा आपल्या कृतींचे भावी परिणाम याबद्दल विचार

करण्यास त्यास शक्ति अथवा सवडच रहात नाहीं; पण वेळ निघून गेली तरी कृतीचे परिणाम निघून जात नाहींत; कायम राहतात; आणि नंतर शांत डोक्यानें विचार केल्यावर त्यास आपली घोडचूक दिसूं लागते. त्या घोडचुकीचा घोड खिळा त्याचें डोकें ठोकूं लागतो. आपल्या कृतीचा त्यास पश्चात्ताप होऊं लागतो; पश्चात्तापानें कृतीची शुद्धी होत नसल्यामुळें पश्चात्तापाचें भूत त्याला जिवंतपणीं छळूं लागतें. पश्चात्तापाचा समंध त्याच्या मानगुटीवर–नव्हे मनावर बसतो; करणीचीं भूतें डोळ्यापुढें दिसूं-नाचूं लागतात; त्यांचा खडा नंगानाच उघडया डोळ्यांनीं पहावा लागतो, व डोळे मिटले तरी भावनेनें दिसूं लागतो इतकेंच नव्हे, तर अशा पापी कृतीचें प्रायश्चित पिढ्यानुपिढ्याही भोगावें लागतें, हा बोध यावरून घेतला पाहिजे, हें उघड आहे.

खिलजी घराण्याच्या कारकीर्दींत मुसलमान लोकांचा दक्षिणेंत प्रथम प्रवेश झाला. अल्लाउद्दीन यानें दक्षिणप्रांतावर स्वारी करून देवगिरीकर रामदेवराव जाधव याचा पराभव केला; त्यामुळें इलीचपूर व त्याच्या आसपासचा प्रदेश, व पुष्कळ संपत्ति अल्लाउद्दीन यास प्राप्त झाली. या सुलतानाच्या कारकीर्दींत मोंगल लोकांनीं हिंदुस्थानावर अनेक स्वाऱ्या केल्या, पण त्या निष्फळ झाल्या; उलटपक्षीं याच काळांत हिंदुस्थानांत मुसलमानी राज्याची भव्य प्रमाणांत वाढ झाली. दक्षिणेवरील दुसऱ्या स्वारीमुळें तर रामदेवराय हा दिल्लीपतीचा मांडलीक बनला. ( इ० सन १३०६ ) आणि त्यानंतर चाळीस वर्षांनींच हसन गंगू ऊर्फ अल्लाउद्दीनशहा यानें दक्षिणेंत बहामनी राज्याची स्थापना केली.

इ० सन १५२६ मध्यें लोदी घराण्याची समाप्ति होऊन बादशहा बाबर यानें आपल्या मोंगली राज्याची स्थापना केली; तथापि याच काळांत राणा संग या नांवाचा एक अत्यंत पराक्रमी पुरुष चितोड येथें राज्य करीत असून तोही हिंदूपद बादशाही स्थापन करण्याच्या विचारांत होता. पण बाबरच्या स्वारीमुळें त्याचें सर्व राजकारण विस्कळीत झालें व बाबर यशस्वी होऊन त्यानें दिल्ली येथें मोंगल बादशाही स्थापन केली; मेवाडचा राजा रायमल्ल यास संग, पृथ्वीराज आणि जयमल्ल असे तीन पुत्र होते; त्यांपैकीं संग ऊर्फ संग्रामसिंह हा इ० सन १५०९ मध्यें चितोडच्या गादीवर बसला. तो गादीवर येण्यापूर्वींच त्याचा भाऊ पृथ्वीराज याच्या बरोबरील युद्धांत त्याचा एक डोळा गेलेला होता. हा राज्यकर्ता मोठा वैभवशाली असून याच्या कारकीर्दींत मेवाडच्या राज्याची अतीशय भरभराट झाली होती. संग राण्या जवळ ८०,००० स्वार, सात मोठे राजे, नऊ राव, १०४ ठाकूर, रावळ, व रावत या नांवाचे सरदार, व ५०० हत्ती इतकें सैन्य होतें. शिवाय मारवाड ( जोधपूर )

अंबर ऊर्फ अंमेर (जयपूर) येथील राज्यकर्ते त्यास अनुकूल असून ग्वाल्हेर, अजमीर, शिक्री, रायसेन, काल्पी, चंदेरी, बुंदी, गाग्रोन, अबू व रामपुरा येथील राज्यकर्ते त्याचे मांडलिक असून त्यास खंडणी देत होते. त्यानें दिल्ली व माळवा येथील मुसलमानी सैन्याबरोबर एकंदर अठरा लढाया केल्या होत्या; त्यांतील बाकरोल व घाटोली येथील युद्धांमध्यें तर स्वतः दिल्लीपती इब्राहीम लोदी हा हजर असून त्यांत त्याचा पराभव—व अतीशय सैन्य नाश झाला होता, आणि त्याचा एक मुलगा राणा संग याचा कैदी होऊन त्यास संगानें चितोड येथें नेलें होतें. यावेळीं मेवाडच्या राज्याची हद्द उत्तरेस पियानानदी, दक्षिणेस व पूर्वेस माळवा, आणि पश्चिमेस मेवाडचे डोंगर, याप्रमाणें व्यापक होती; आणि बाबर सारखा पराक्रमी पुरुष जर याच संधीस त्यास प्रतिस्पर्धी ह्मणून पुढें आला नसता तर चितोड ही हिंदुस्थानची सार्वभौम राजधानी आणि संगराणा हा चक्रवर्ती होण्याचा समय आला होता, पण बाबरच्या हिंदुस्थानांतील आगमनानें मेवाडच्या व संगाच्या वैभववृद्धीस पूर्णपणें ओहोटी लागली !

बाबर हाही राणा संग याच्या प्रमाणेंच अनेक दुःखसंकटें, हाल, उपवास व वनवास भोगलेला पुरुष असून राजा व वनवासी—जय, पराजय, सुख व आपत्ती—या अवस्था भोगीत भोगीत त्याचा स्वभाव काटक, हिंमती, हिकमती, व विचारी बनलेला होता; पदभ्रष्टतेच्या दुःखानें तो हताश झाला नाहीं, अथवा इब्राहीम लोदी बरोबरील युद्धांत विजयी झाल्यामुळें त्यास उन्मादही झाला नाहीं. दिल्लीचें तख्त हातीं आलें तरी तो ईश्वरास विसरला नाहीं; "मी" ची बाधा त्यास झाली नाहीं; तो या विजय प्राप्तीनंतर मोठ्या नम्रपणानें ह्मणालाः—"हा विजय ईश्वराचा आहे, माझा नाहीं. देवा, तूं सदोदित असाच विजयी ऐस." त्यानंतर एकच वर्षानें व्यक्ति व राष्ट्र यांची भवितव्यता निश्चित करणारी फत्तेपूर शिक्री येथील बाबर व राणा संग यांच्या मधील लढाई झाली. या युद्धाची सर्व तयारी बाबर यानें स्वतः करून तो आग्रा येथून शिक्रीच्या मार्गानें राणा संग याच्यावर चाल करण्यास निघाला; तेव्हां संगही आपणाबरोबर राजस्थानचे सर्व राजे मदतीस घेऊन पुढें आला. पियाना नदी उतरून बाबरच्या पंधराशें लोकांची कत्तल उडविली; अशा रीतीनें पहिल्यानेंच बाबर यास अपशकून झाला; शिवाय त्याच्या जवळील सैन्यही नवें होतें; त्यामुळें तेंही प्रसंगीं कितपत टिकाव धरील अशी त्यास शंका होती; व त्यामुळें आपणांस जय मिळेलच अशी त्यास खात्री वाटत नव्हती; त्यानें रजपूत लोकांवर पाठविलेल्या अनेक टोळ्यांचा पराभव झाल्यामुळें त्याला भीति उत्पन्न झाली होती, आणि त्यांतच काबुलहून आलेल्या एका ज्योतिषानें "या युद्धांत तुझा पराजय होणार" असें

सांगितल्यानें त्यास पश्चात्ताप होऊन तो ईश्वराची करुणा भाकूं लागला होता. आपण कोणतें घोर पाप केलें आहे, व त्याचें क्षालन कसें करावें, याचा तो आपल्या मनांत विचार करूं लागला; तेव्हां कुराणांत–मुसलमानी धर्मशास्त्राप्रमाणें दारू पिण्याची सक्त मनाई असून आपण दारू पितों हेंच आपलें घोर पातक आहे, व त्यामुळेंच आपणांस अपयश भोगणें प्राप्त आहे; असें ह्मणून त्यानें पुन्हां दारूला स्पर्श न करण्याचा निश्चय केला. तो ह्मणतोः–मी माहे जमादी ता० २३ रोज सोमवार या दिवशीं, घोड्यावर बसून आपल्या लष्करी अधिकाऱ्यांची पाहणी करण्यास निघालों असतां एकाएकीं माझ्या मनांत अनेक विचार येऊं लागले. कृतकर्मांचा विचार करून झालेल्या चुकांबद्दल पश्चात्तापपूर्वक सुधारणा करण्याचा माझा परिपाठ आहे; त्याप्रमाणें मला हल्लीं अपयश कां येतें याबद्दल मी आपल्याशींच विचार करूं लागलों; मी आपल्या मनाशींच ह्मणालों, "हे जीवा, तूं ह्या चालू क्रमाप्रमाणें या पातकी व्यवहारामध्येंच किती दिवस सुख, विलास व ऐषाराम भोगीत राहणार आहेस ! बाबारे, तुला कांहीं तरी पश्चात्ताप होऊंदे ह्या पातकामुळें तूं किती अपवित्र बनला आहेस ! वारंवार होणाऱ्या निराशेमध्येंच तूं कसलें सुख मानून घेत आहेस ? तूं मनोविकारांचा अशा रीतीनें किती दिवस गुलाम होऊन राहणार आहेस ? तूं अशा प्रकारच्या आचरणांत आपलें किती आयुष्य व्यर्थ घालविलेस !... तूं पवित्र धर्मकृत्यांत आपलें आयुष्य वास्तवीकपणें खर्च केलें पाहिजेस पण तसें न करितां तूं निषिद्ध व तिरस्करणीय अशा चैनींत, मौजेंत आणि करमणुकींतच नेहमीं मग्न राहून त्यांतच सुख मानितोस; पण यापुढें तरी अशा गोष्टींचा त्याग करून सर्व पातकांपासून मुक्त हो." बाबर ह्मणतो, "ह्या प्रमाणें मी आपल्या जिवाला बोध करून असा निश्चय केला कीं, आपण मद्यपान करितों हेंच आपलें घोर पातक आहे; ह्मणून इतःपर मद्यपान कधींही करावयाचें नाहीं. नंतर मी माझीं सोन्यारुप्यांचीं आणि तशींच दुसरीं सर्व मद्यपात्रें माझ्या समोर आणून फोडविलीं, आणि "पुन्हां मद्यपान करावयाचें नाहीं," अशी मी शपथ घेतली. अशा रीतीनें मी माझें मन पवित्र केलें; मद्यपात्रांचे सर्व तुकडे मी फकीर व गरीब लोकांनां वांटून टाकविले; मला ज्याप्रमाणे पश्चात्ताप झाला, त्याप्रमाणेंच माझ्या बरोबर आसास यानांवाचा एक मनुष्य होता त्यालाही होऊन त्यानें दाढी वाढविण्याचा निश्चय केला; पुढें त्यादिवशीं रात्रीं, व दुसरे दिवशीं मिळून सुमारें तीनशें अमीर, राज्य कारभारांतील मुख्य अधिकारी, शिपाई, व इतर सरदार मंडळी, यांनीही माझ्या प्रमाणेंच पुन्हां मद्यपान करावयाचें नाहीं, अशा शपथा घेतल्या. आमच्या बरोबर जें मद्य होतें, तें आह्मी जमीनीवर ओतिलें, आणि जी दारू बाबा दोस्त यानें आणिली होती, तींत मीठ मिसळून पिण्याला निरुपयोगी करून टाकण्याविषयीं मी हुकूम दिला. जेथें मी दारू

ओतविली त्याठिकाणीं एक दगडी स्थान बांधवून त्या जवळ एक भिक्षागृह बांधण्याचा मी ठराव केला; व मी पुढें जेव्हां फसली सन ९३५ च्या मोहरम महिन्यांत धवलपुराहून शीक्री येथें जातांना मार्गांत ग्वाल्हेर येथें उतरलों त्यावेळीं वरील मद्यपरित्यागस्थान, आणि भिक्षागृह हीं बांधून तयार झालेलीं मीं पाहिलीं. शिवाय मी असा नवस केला होता कीं, जर मला राणा संग याजवर जय मिळाला तर शिक्क्याचा जो कर मी वसूल करीत असे तो मुसलमानास माफ करीन..." नंतर बाबर यानें हा कर माफ केल्याबद्दल आपल्या ताब्यांतील प्रदेशांत जाहीर केलें; नंतर त्यानें आपल्या सर्व लोकांस एकत्र बोलावून त्यांनां उद्देशून मोठें जोरदार व उत्तेजनपर भाषण केलें;तो ह्मणालाः- " भाई हो, आजपर्यंत तुह्मी केवढा लौकिक मिळविला,व अनेक प्रसंगीं कसे विजय संपादन केले तें लक्षांत आणा. काफर लोकांस भिऊन आपण पळालों तर ते लोक आपणांस काय ह्मणतील ? आणि न पळालों तरी आपण शत्रूंच्या हांतून सुटूं असें थोडेंच आहे ? मनुष्यमात्रास जन्माप्रमाणेंच मृत्यु हाही लागलेलाच आहे; आणि कधींतरी आपणासर्वांस या दुःखमय जगांतून गेलेंच पाहिजे. मग अपकीर्तीनें जिवंत राहण्यापेक्षां कीर्ति करून मृत्यु आलेला काय वाईट ? धर्माकरितां जीव देण्याचा प्रसंग आला तरी तेंही सुद्धां पुण्यच आहे. ह्मणून आपल्या जिवांतजीव आहे तोंपर्यंत आपण लढून प्रसंगीं कटूनही मरूं, पण या युद्धांतून अपयश घेऊन केव्हांही परत फिरावयाचें नाहीं अशी आपण सर्व एकदिलानें शपथ घेऊंया. " असें ह्मणून त्यानें आपल्या लोकांकडून, मारूं किंवा मरूं, अशी कुराणावर हात ठेवून शपथ घेवविली, व नंतर आपला तळ उठवून संग राण्याशीं मुकाबला करण्याकरितां तो पुढें कूच करून निघाला.

राणा संग हा अतिशय शूर होता; त्याच्या शरीरावर मूर्तिमंत वीर्याच्या साक्षीच्या खुणा—तरवार भाल्यांच्या जखमांच्या ऐशीं खुणा—दिसत होत्या; भावाशीं युद्ध करितांना एक डोळा, व इब्राहीम लोदीबरोबरील युद्धांत एक हात नाहींसा झाला होता; अशाच दुसऱ्या एका युद्धांत गोळी लागून तो एका पायानें पंगू झाला होता. संग राणा हा असा अलौकिक योद्धा होता; अद्वितिय वीर पुरुष होता; बाबरच्या शब्दांत ह्मणावयाचें ह्मणजे " संगराणा जो इतक्या लौकिकास चढला तो केवळ स्वतःच्या शौर्यपराक्रमामुळेंच होय, " ही त्याची योग्यता बाबर जाणून होता, तरी पण त्याच्या मध्यें असावी तितकी तरतरी व चपलता नव्हती; व हें वैगुण्य बाबर यास माहीत होतें. बाबर ह्मणतोः-" मी जेव्हां काबूल येथें होतों, त्यावेळीं राणा संग यानें आपला वकील माझ्याकडे पाठविला होता; व मी दिल्लीवर चाल करून गेलों तर राणा संग यानें आग्रा शहरावर चाल करून यावें, असा त्या वकिलामार्फत आमचा परस्पर ठराव झाला होता; परंतु मी पुढें

दिल्ली घेऊन आग्राशहरही ताब्यांत घेतलें तरी सुद्धां संग ठिकाणचा हलला नाहीं.' असाच प्रकार यावेळींही घडला. बाबर आपण होऊन पुढें येईल या आशेवर संग राणा स्वस्थ बसला. त्याचा फायदा बाबर यास पूर्णपणें मिळाला. रायसीनचा राजा सिलोदी यानें उभयतांचा स्नेह जुळावा म्हणून केलेली मध्यस्थि व्यर्थ गेली, व उभयतांमधील रणसंग्रामाच्या पूर्व रंगास प्रारंभ झाला.

युद्धास तोंड लागण्यापूर्वी राणा संग याच्या छावणींत राजस्थानमधील राजेरजवाडे, मांडलीक, सरदारमंडळी, व इतर रजपूतवीर मंडळी एकत्र जमली. त्यावेळीं संग राण्यानें उभें राहून सर्वांना उद्देशून मोठें उत्साहजनक व वीरश्रीयुक्त भाषण केलें; क्षात्रधर्मास अनुसरून, व वाडवडिलांचे पराक्रम आठवून प्रत्येकानें या आणीबाणीच्या प्रसंगीं वर्तन करावें, असा त्यानें सर्वांस उपदेश केला, मुसलमानांचा पाडाव करण्याचा हाच योग्य प्रसंग आहे; आणि हा प्रसंग आपण साधिला म्हणजे त्यांना पुन्हां आपलें डोकें वर काढितां येणार नाहीं आणि सर्व देशभर हिंदू पद बादशाहीचा ध्वज फडकत राहील, अशी त्यांची खातरजमा केली. सर्वांनीं उत्तरादाखल मोठा जयजयकार केला; संग राण्यानें युद्धाचा उपक्रम करून रजपूत सैन्य बियानानदी ओलांडून दिल्लीच्या रोखानें पुढें आलें, आणि ता० १६ मार्च १५२८ शनिवार रोजीं फत्तेपूर शिक्री येथें घनघोर युद्ध होऊन बाबर विजयी झाला; आणि हिंदूपदबादशाही स्थापन होण्याचीं चिन्हें व आशा पार नष्ट झाली.

राणा संग हा जरी बाबरचा शत्रू होता तरीही संगाबद्दल त्यास अतीशय आदर वाटत असे; त्याप्रमाणेंच त्याचा प्रिय व पितृभक्त मुलगा हुमायून यास बाबरनें संग राण्याच्या गुणांचें जें वर्णन लिहून ठेविलें होतें तें माहीत असून संगाच्या वंशजाविषयीं त्याच्याही मनांत प्रेमभाव वसत होता; म्हणून गुजराथकर बहादूरशहानें चितोडवर स्वारी केली त्यावेळीं संगाची राणी कर्णावती हिनें हुमायूनकडे राखी पाठविली, व त्यास असा निरोप पाठविला कीं, तुह्मी माझे भाऊ अहांत; तरी यावेळीं आह्मास साह्य करून आमची अब्रू रक्षण करा." ही राखी आल्याबद्दल हुमायुनास अतीशय आनंद झाला; आणि- जरी हुमायून येण्याच्या पूर्वींच राणी कर्णावती हिनें तेरा हजार रजपूत स्त्रियांसह अग्नीकाष्टें भक्षण केलीं होतीं तरी-त्यानें " मी तुमचा राखीबंद भाई झालों. तेव्हां आतां संकटा-

---

टिप १ :—या बाबतींत लोकहितवादीकृत राजस्थानच्या इतिहासांत असें लिहिलें आहे कीं, वरील रक्षाबंधनाचा असाच चमत्कार झाला कीं, ह्या राखीनें केवळ हुमायूनच एकटा चितोडच्या राणीचा भाऊ झाला नाहीं तर त्याच्यापुढें त्याचा

विषयीं कांहींही भीति बाळगूं नका; मी तुमच्या मदतीस येत आहे" असा उलट निरोप पाठवून तो चितोड येथें गेला, तें शहर हस्तगत करून घेतलें, व त्याच्या राजधानीस ह्मणजे मांडवगडास शह देऊन विक्रमादित्याची चितोडच्या गादीवर स्थापना केली.

बादशहा बाबर हा मोठा धोरणी, दिलदार, व परिस्थितीचें योग्य आकलन करून त्याप्रमाणें वागणारा राज्यकर्ता होऊन गेला; त्यानें आपला मुलगा हुमायून यास जो राज्याच्या मजबुती करितां अमोल्य उपदेश केला त्यावरूच त्याची अलौकिक योग्यता निदर्शनास येते; बाबरच्या मृत्यूनंतर हुमायून गादीवर आला आणि त्यास पदभ्रष्ट होऊन जरी तेरा वर्षें—इ० सन १५४०–१५५३ पर्यंत—वनवास भोगावे लागले तरी, उपरीनिर्दिष्ट राणी कर्णावती हिच्या उदाहरणावरून, व त्याच्या अल्पकारकीर्दीतील इतर गोष्टींवरून तोही मोठा विद्वान, विचारी, व नमुनेदार राज्यकर्ता होऊन गेला असेंच दृष्टोत्पत्तीस येतें. तथापि बाबर यानें हिंदुस्थानांत जें आपलें राज्य स्थापन केलें, आणि फत्तेपूरशिक्री येथें संगराण्यावर जो विजय मिळविला त्याला बाबरची कर्तबगारी हें तर कारण प्रमुखत्वानें आहेच; पण त्याशिवायचीं कारणेंही विचारांत घेणें आवश्यक आहे. संगानें एकदम तडफाफडकी बाबरच्या सैन्यावर हल्ला केला असता, तर या युद्धाचा परिणाम, झाला त्याहून निराळा झाला असता, असें मानण्यास आधार आहे; त्याप्रमाणें रायसीनचा राज्यकर्ता सिलौदी हा नालायक मध्यस्थ निवडण्यांत चूक झाली; व प्रकरण अधिक चिघळत गेलें; शिवाय हा घातकी मनुष्य गोटांत फितूरी असून वरकरणीं एकनिष्ठेचें कातडें पांघरून वावरत होता; तो ऐनवेळीं संगाकडून निघून बाबर यास जाऊन मिळाला; व त्यामुळें संगराणा विजयी होण्याचा रंग दिसत होता तो साफ बदलून जाऊन त्यास माघार घेणें भाग पडलें ? काळ नष्ट आला; शिलौदीच्यारूपानें जयचंदाचा अवतार पुन्हां निर्माण झाला; आणि स्वकीयांचा द्रोह करून हिंदूपदबादशाही होण्याची आशा समूळ

---

मुलगा प्रसिद्ध अकबर, त्याचा पुत्र जहांगीर, जहांगीरचा मुलगा शहाजहान, आणि शहाजहानचा मुलगा—हिंदूंचा परमद्वेष्टा जो औरंगजेब, तोही, अनुक्रमें चितोडच्या राणीचे "राखीबंध भाई" अशाच प्रकारचें नातें ठेवीत आले. अवरंगझेबानें आपलें स्वसृप्रेम फारच उत्कृष्ट रीतीनें दाखविलें आहे. —चितोडच्या राणीस त्यानें पाठविलेल्या पत्रांत प्रथमतः "प्रिय व सद्गुणवती भगिनी" असें लिहून शेवटीं "आपलें कुशल व कल्याण इच्छितों" अशा स्पष्ट शब्दांनीं तिजवरील आपली भक्ति व प्रेम दाखवून तिचा गौरव केला आहे.— आणि हें त्याच्या ( अवरंगझेबाच्या ) स्वभाव रीतीवरून पाहिलें असतां अगदीं चमत्कारिक भासण्यासारखें आहे.

नष्ट करून टाकिली ! संगाच्या मागून त्याचा मुलगा रत्न हा गादीवर आला; ( इ. सन १५३०) तोही संगाप्रमाणेंच अतीशय शूर, अभिमानी, साहसी व पराक्रमी होता; आणि बाबरनें नुकत्याच स्थापन केलेल्या राज्यास तो एक जबरदस्त प्रतिस्पर्धी बनला असता, पण आपसांतील स्पर्धेत एका द्वंद्वयुद्धांत तो मारला जाऊन मोंगली राज्यावरील हें गंडांतर आपोआप परभारेंच नाहींसें झालें; व त्यानंतर मोंगली सत्तेशीं वर्चस्वप्रातीकरितां झगडणारा कोणीही बालिष्ट प्रतिस्पर्धी न राहून मोंगल साम्राज्याची मोठ्या झपाट्यानें वाढ होत गेली.

बादशहा अकबर याच्या कारकीर्दीपासून मोंगली साम्राज्य अत्यंत वैभवसंपन्न होत गेलें; अकबराची गणना जगांतील श्रेष्ठ राज्यकर्त्यांमध्यें होते, इतका तो अलौकिक राज्यकर्ता होऊन गेला यांत कांहींहि संशय नाहीं; तथापि तरुण वयांत त्याचें आचरण कित्येक प्रसंगीं क्रूरपणाचें होतें; एके दिवशीं रात्रीं तो नेहमीच्यापेक्षां लवकर निजावयास गेला असतां महालाचा बत्तीवाला झोंपीं गेलेला त्यास आढळला, या क्षुल्लक अपराधाबद्दल त्यानें त्याचा कडेलोट केला; आपल्या कर्तव्यांत चुकलेल्या पहारेकऱ्यांचा छळ करणें; दोन हजार लोकांचीं डोकीं कापवून त्यांचे ढीग रचविणे, अशीं क्रूर कृत्यें अकबरानें केलेलीं आहेत; आणि चितोड काबीज केल्यानंतर त्यानें केलेली कत्तल व इतर अनन्वित प्रकार हे दुर्दैवानें त्याच्या थोर नांवास कमीपणा आणणारे आहेत; तथापि पुढील वयांत त्याचा स्वभाव अतीशय दयाळू व प्रेमळ होत गेला; चितोड येथील संहारामुळें त्याच्या मनाला चटका बसला, व त्या पापाचें क्षालन करण्याकरितां तो अजमीर येथें मैमुद्दीन चिस्ती म्हणून एक साधू होऊन गेला, त्या पिराच्या दर्शनास पायीं चालत गेला; आणि उत्तर वयांत तर त्याचा स्वभाव इतका कोंवळा बनला कीं, राजपुत्र सलीम—भावी जहांगीर-यानें, अलाहाबाद येथें अत्यंत व्यसनाधीन झाल्यावर त्याच्या एका कारकुनानें नोकरीचा राजीनामा दिला, म्हणून त्यास त्यानें जिवंत सोलविलें, आणि त्याच्या दोघांसोबत्यांचे हातपाय तोडून जीव घेतले;; ही गोष्ट अकबरास कळली

---

**टीपः**—चितोड येथील संहारांत जे रजपूत वीर मृत्यू पावले, त्यांचीं जानवीं अकबरानें वजन करून पाहिलीं तीं ७४॥ मण ( साडे चौऱ्याहत्तर मण, कच्चा,४-शेर=१ मण ) भरलीं. हिंदुस्थानांतील सर्व हुंडिवाले व सराफ आपल्या वह्यांवर व पत्रांवर हल्लींही ७४॥ हा आंकडा घालीत असतात; त्याचें कारण असें कीं, कोणी अक्षर बदलील अथवा पत्र, फोडील तर त्यास वरील वजनां इतकीं जानवीं घालणाऱ्या लोकांच्या वधाचें पाप लागेल अशी त्यांची शपथ आहे, असें समजावें. या खुणेंत "चितोड माऱ्या को पाप" असें म्हणतात.

तेव्हां त्यास अतीशय वाईट वाटलें; सलीमच्या या कठोर वर्तनाचा त्याला अतीशय राग आला; आणि मोठ्या उद्वेगानें व कळवळ्यानें तो ह्मणालाः—" अरे, मी नुसती मुंगीसुद्धां चिरडण्यास भितों; मेलेल्या बकऱ्याचीसुद्धां चामडी सोलण्यास मला धीर होत नाहीं; आणि प्रत्यक्ष या माझ्या पोटच्याच मुलानें जिवंत मनुष्यांची अशी दशा करावी ! ! "

मोंगली राज्याच्या इतिहासांत निःसीम पुत्रप्रेम व उज्वल पितृभक्ति, यांचें फक्त एकच उदाहरण आहे;तें ह्मणजे बाबर व हुमायुन यांचें होय; बाबर यानें हुमायूनच्या जिवावरून आपला जीव ओंवाळून टाकिला, आणि हुमायुननें अनेक प्रकारचे हाल, संकटें, आपत्ती, व वनवास भोगीत राहून वडिलांच्या आज्ञेवरून आपला जीव ओंवाळून टाकून आपल्या पितृभक्तीची तोडीस तोड केली ! हुमायूनचा मुलगा अकबर हा हुमायूनच्या मृत्युमुळें तेरा वर्षें तीन महिन्यांचा असतांनाच गादीवर आला; तथापि हुमायूनचा प्रेमळ स्वभाव व त्याचें अकबरावरील अगाध प्रेम, आणि उलटपक्षीं अकबराचा थोर व दिलदार स्वभाव—आणि अखेरपर्यंत त्यानें आपल्या सख्या इतकेंच नव्हे तर सावत्र मातांच्या सुद्धां आज्ञा कधींही उल्लंघन केल्या नाहींत असा वडील मनुष्यांना पूज्य समजून मान देत राहण्याचा स्वभाव, यावरून बाबर, हुमायून याप्रमाणेंच हुमायून व अकबर हें दुसरें उदाहरण झालें असतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं; पण त्यानंतरची परंपरा मात्र अगदींच निराळी आहे; सलीम बंडखोर निघून इ० सन १६०१ मध्यें अकबराशीं युद्धही करण्याकरितां तो अलाहाबादेहून निघाला होता; तीच स्थिती पुढें सलीम-जहांगीर च्या कारकीर्दींत पुन्हां उत्पन्न झाली ? जहांगीर विरुद्ध त्याचा मुलगा खुर्रम-भावी शहाजहान यानें बंड केलें; परंतु त्यांत त्यास यश न आल्यामुळें तो पळून उदेपूरकर राजा कर्ण याच्याकडे आश्रय मागण्यास गेला; त्यावेळीं त्यानें आपलें पागोटें व ढाल काढून राण्यापुढें ठेविली आणि गुढघ्यावर बसून त्यानें कर्ण राजास विनंती केली कीं, आतां माझी अब्रू राखून माझें रक्षण करणें तुमचेकडे आहे. " त्याबरोबर राण्यानें आपल्या डोक्याचें पागोटे काढुन खुर्रमच्या डोक्यावर ठेविलें व त्यानें पुढें काढून ठेविलेलें पागोटें आपल्या डोक्यावर घातलें. व अशा रीतीनें राजा कर्ण यानें खुर्रमच्या संरक्षणाविषयीं त्यास पूर्ण अश्वासन दिलें. व त्याची इतकी बरदास्त ठेविली कीं तोही त्याठिकाणीं ( उदेपूर येथें ) घरच्याप्रमाणें राहिला; राजा कर्ण यानें त्यास आपल्या एका राजवाड्यांतच जागा दिली होती; व नंतर खुर्रम यानें आपणांस राहण्याकरितां उदेपूर येथेंच पुष्कळ संपत्ती खर्च करून एक घुमटाची इमारत बांधिली; व मुसलमानी रिवाजा प्रमाणें त्या घुमटावर अर्धचंद्राकृतीचें निशाण फडकत ठेविलें; खुर्रम यानें त्या इमारतीच्या

दगडी भिंतीवर निरनिराळ्या रंगाच्या मौल्यवान दगडांचीं फुलें, पत्त्या व वेल काढवून आणि इमारतींत अंथरण्याकरितां तुर्कस्थानचे मौल्यवान व सुंदर गालीचे मागवून ती सुंदर इमारत आंतून बाहेरून श्रृंगारलेली होती. त्यानें या इमारतीच्या मध्यभागीं आपल्या कचेरीची जागा ठेविली होती; आणि त्याठिकाणीं, चारी बाजूंनीं चार अप्सरांनीं आपल्या हातांवर तोलून धरिलें आहे, असें एक जाड लांकडाचें कोरलेलें सुंदर चौकोनी सिंहासन ठेविलेलें असून त्यावर तो बसत होता. शिवाय या इमारतीच्या अवारांतच खुर्रम यानें प्रार्थनेंकरितां एक मशीद बांधिली होती; व त्याठिकाणची व्यवस्था व देखरेख ठेवण्याकरितां मदार या नांवाच्या एका फकिरास त्यानें नेमिलें होतें. अशा रीतीनें याठिकाणीं कांहीं दिवस राहून नंतर तो तेथून इराणांत–कांहींच्यामतें गोवळकोंडें येथें–जाऊन राहिला.

शहाजहान हा सलीमच्या सर्व मुलांत अधीक धूर्त असून, तो पहिल्यापासूनच नाना प्रकारच्या खटपटी करून राज्याधिकारी होण्याचा प्रयत्न करीत होता; त्यामुळें त्यानें अनेक वेळां बंडें व कारस्थानें केलीं; आग्रा येथील किल्ला आपल्या ताब्यांत घेण्याची शिकस्त केली; पुढें दिल्ली नजीक पितापुत्रांची लढाई झाली; तींत शहाजहान विजयी होण्याची वेळ आली होती; इतकेंच नाहीं तर त्याच्या सैन्यांतील एका इसमानें जहांगीर यासच खुद्द पकडलें होतें, पण जहांगीरच्या सैन्याकडून तो मारला गेल्यामुळें त्याचे सर्व लोक व शहाजहान हे आपला जीव घेऊन पळाले; व पुढें त्याचा व जहांगीरचा समेट झाला; परंतु त्यानंतरही त्यानें पुन्हां लवकरच बंड केलें; व त्यांतही बाजू अंगावर येते असें पाहून जो पळाला तो कित्येक महिन्यानंतर पुन्हां एकदम बंगालप्रांतांत प्रगट झाला. व पुन्हां काशी येथें झालेल्या युद्धांतही त्यास पराभव खावा लागला. हीच स्थिती पुढें शहाजहान व अवरंगझेब यांची व अवरंगझेब वगैरे भावांभावांमधील युद्धकलहाची ! आणि अवरंगझेबाविरुद्ध त्याचा मुलगा अकबर यानें केलेल्या बंडाची ! !

बादशहा अवरंगझेब याच्या संबंधी मराठ्यांच्या इतिहासाच्या पुढील भागांतही– त्याच्या मृत्यूपर्यंत मराठ्यांशीं त्याचें चाललेलें युद्ध, व त्याचा चरित्रक्रम वगैरे संबंधीं– हकीकत येणार आहे; तरी सुद्धां त्याच्यासंबंधीं या ठिकाणींही उल्लेख करणें आवश्यक आहे. मोंगल बादशहांत व राजघराण्यांतील इतर पुरुषमंडळींत सर्वांत विद्वान पुरुष म्हणजे अवरंगझेब हा होय; त्यानें स्वतः लिहिलेलीं सुमारें ३,००० पत्रें उपलब्ध आहेत, व यावरूनच तो किती दांडगा विद्वान होता, याबद्दल सहज अनुमान करितां येण्यासारखें आहे; अवरंगझेबाच्या लहानपणीं मुल्लासाले या नांवाचा त्याचा एक गुरु होता; त्यास अवरंगझेबानें अनेक पत्रें पाठविलीं असून तीं अवरंगझेबाच्या विद्वत्तेचीं द्योतक आहेत. त्यांतील एका पत्रांत त्यानें आपल्या या शिक्षकाला त्याच्या अज्ञानत्वाबद्दल अतीशय

हिणविलें आहे, व तुह्मी मला निरुपयोगी व व्यर्थ श्रमाचें असें शिक्षण देऊन,-मोठमोठ्या ऐतिहासिक, भूगोलसंबंधीं, व तत्त्वज्ञानविषयक गोष्टी समजावून सांगून माझी बुद्धी अधीक ज्ञानसंपन्न करावयाची ती न करितां-तिचा दुरुपयोग केला, असें त्यास टोंचून लिहिलेलें आहे. हें पत्र पुष्कळ दृष्टीनें मनोरंजक व बोधप्रद आहे; तें खालीं लिहिल्या प्रमाणेंः--

"तुह्मी मला अनावश्यक अशी अरबी भाषा शिकविण्यांत फार दिवस घालवून, माझ्या कोंवळ्या बुद्धीचा आणि तीक्ष्ण स्मृतिशक्तीचा दुरुपयोग केला. ज्या भाषेचा कधींही उपयोग व्हावयाचा नाहीं, ती भाषा राजपुत्रांनां यावी ह्मणून दहा किंवा बारा वर्षें मला शिकवून त्यांत मला मोठा वैयाकरणी अथवा धर्मशास्त्रज्ञ करण्याचा तुमचा विचार होता, तो किती हास्यास्पद होता बरें ? उपयुक्त विद्या व कला यांचें ज्ञान बालकांच्या बुद्धीप्रमाणें देण्याकडे त्यांच्या लहानपणचा काळ घालवावयाचा; त्या कालाचा आमच्या गुरूजींनीं असा दुर्व्यय करावाना ? आहारे भूगोलज्ञाना ! मला पोर्तुगाल, हॉलंड, किंवा इंग्लंड, हे देश काय आहेत व कोठें आहेत हें कळूं नये काय ! ते देश ह्मणजे बेटें आहेत, कां द्वीपकल्पें आहेत, अथवा सपाटीवर किंवा उंचवट्यावर आहेत, हें मला समजूं नये काय ! नुसतें मला चीन, इराण, काशगार, पेगू, तार्तारी, वगैरे ठिकाणचे राजे हिंदुस्थानच्या बादशहाचें नांव ऐकून थरथर कांपतात, एवढें सांगितल्यानें व तें ऐकल्यानें कां इतिहासाची माहिती झाली असें समजावयाचें ! जगावर कसकशीं, व कोणकोणतीं राज्यें आहेत, तेथील रीतीभाती, आचारविचार, राजकारकीर्दी, धर्म वगैरे बाबतींची माहिती, त्या त्या राज्यांचा उत्कर्ष किंवा अपकर्ष, त्या त्या राज्यांची भरभराट होण्यास अथवा त्यांच्यावर आपत्ती येण्यास कोणकोणतीं शहाणपणाचीं, अथवा वेडेपणाच्या चुकांचीं कारणें घडलीं, आणि कोणत्या मोठमोठ्या गोष्टींनीं महान् महान् राष्ट्रांमध्यें विलक्षण फेरफार झाले, ह्यागोष्टी इतिहासाच्या ज्ञानाशिवाय कशा कळाव्या ! त्या तुह्मी मला शिकविल्या काय ? राजपुत्रांनां असे अनेक महत्वाचे व विविध विषय शिकून आपली बुद्धी प्रगल्भ व ज्ञानसंपन्न करावयाची असते, आणि त्यांच्या आयुष्यांतील ज्ञानसंपादनाच्या कालापैकीं प्रत्येक क्षण मोठा किंमतवान असतो, हें समजून तुह्मी माझ्या कालाचा आणि आयुष्याचा कोणता चांगला विनियोग केला ! तुह्मी मला नाहीं नाहीं त्या पोकळ, व, ध्यानांत ठेवण्याला अतिशय कठीण, किंवा बुद्धीमध्यें घोटाळा करून टाकणाऱ्या आणि मनुष्यदेहास किंवा त्याच्या जगतीय वर्तनास केवळ निरुपयोगी, अशा प्रकारच्या परकीय भाषाज्ञानाच्या वगैरे गोष्टी मात्र काय त्या शिकविण्यांत आपली कामगिरी बजाविली, असें दाखविल्या सारखें होत नाहीं काय ? परभाषा शिकवून तिच्या योगानेंच काय तीं शास्त्रें, धर्म विवेचन, न्यायनीति किंवा इतर आवश्यक ज्ञान शिकविण्याचा तुह्मास सुलभ मार्ग होता काय ! हें सर्व आवश्यकज्ञान तुह्माला आपल्या जन्मभाषेंत मला देतां आलें नसतें

काय ! तुह्मी, माझे वडील शहाजहान बादशहा, यांच्या जवळ एकदां असें ह्मणाला होता कीं, "मी औरंगझेबाला तत्वज्ञान शिकवीन" आणि मला स्मरतें कीं तुह्मी मला पुष्कळवर्षें पर्यंत, आकाश, ब्रह्म, घटपट, इत्यादि निरस शद्बांनीं कांहीं विषय समजून देण्याची खटपट करीत होतां व तीं माझ्या मनांत उतरण्याकरितां मी त्याविषयांत माझें डोकें गुंतवीत होतों. पण मला माझ्या उपयुक्त ज्ञानवत्वास आणि माझ्या राज्यकर्तृत्वास हितप्रद असें ह्मणण्यासारखा मला त्या विषयापासून काय लाभ झाला ? तुह्मी जीं काय अवजड व उच्चारण्यासहि कठीण अशीं नांवें घेत होता तेवढीं यात्र कायतीं तुमच्या नेहमीं उच्चारण्यानें माझ्या ध्यानांत राहिलीं; परंतु त्यांच्यासंबंधानें विवेचन किंवा ती समजूत मी तेव्हांच विसरून जात असे, हें तुह्मांस समजत नव्हतें काय ? आणि तें विवेचन किंवा ती समजूत माझ्या ध्यानांत राहून तरी मला त्यांचा आज कितीसा उपयोग झाला असता ? अशा रीतीनें तुह्मी माझ्या कोंवळ्या बुद्धीचा आणि तीक्ष्ण स्मृति शक्तीचा दुर्व्यय नाहीं कां केला ! असे मलभलते व तुमच्या मतानें महत्वाचे विषय मला समजून देण्यांत तुह्मीं इतका मात्र फायदा करून घेतला कीं, त्यांच्या योगानें आह्मां सारख्या मूढ व अज्ञान्यास, तुह्मी ह्मणजे सर्वज्ञ, सर्वशास्त्र पारंगत, आणि अत्यंत पूज्यगुरुवर्य आहांत असा निरर्थक भ्रम उत्पन्न करून, तुह्माला आपलें आह्मांवरील वजन मात्र बरेच दिवस कायम ठेवितां आलें. तुमच्यामध्यें, राजेलोकांची व्यर्थ स्तुती, हांजी हांजी, आणि सत्यापलाप हे गुण मात्र पूर्णपणें वसले आहेत. तुह्मांला माझ्या दरबारांत मी एक उमराव करावें, अशी जी तुमची इच्छा आहे ती मी तुमच्या कोणत्या गुणावर लुब्ध होऊन पूर्ण करावी ? तुह्मी मला लष्करी, व्यावहारिक, किंवा राजकीय शिक्षणापैकीं कोणतें शिक्षण दिलें आहे ह्मणून मी तुह्मांस मान देऊं ? ह्या आवश्यक ज्ञानामध्यें जर तुह्मी मला पारंगत केलें असतें तर मी तुमचा अत्यंत आभारी, व ऋणी होऊन, ज्याप्रमाणें शिकंदर बादशहा, महाविद्वान आरिस्टाटल् या आपल्या परमपूज्य गुरुवर्यावर निष्ठा व भाव ठेवून त्याला मानीत होता, त्याप्रमाणेंच मीही तुह्मांस मानिलें असतें. परंतु तशा प्रकारचें उपयुक्त शिक्षण आणि उपयुक्त विद्या तुह्मांकडून मला कांहींच मिळाल्या नाहींत, व त्यामुळेंच तुमच्याविषयीं माझ्या मनांत आदर अथवा पूज्यभाव मुळींच उत्पन्न होत नाहीं. तुह्मी आलांत तसेच चालते व्हा; आणि आपल्या गांवच्यागांवांत स्वस्थपणें देवाचें नांव घेत पुढील आयुष्याचे दिवस कंठित रहा. माझ्या दरबारांत, तुह्मी प्रविष्ट होऊन, "तुह्मी कोण," हें देखील कोणास समजूं देऊं नये, अशी माझी इच्छा आहे."

वरील पत्रावरून औरंगझेबाची विद्वत्ता व बुद्धिमत्ता हीं पूर्णपणें निदर्शनास येतात; अवरंगझेब हा एक अलौकिक राज्यकर्ता होता, यांत तर कांहींच संदेह नाहीं; प्रत्येक

गोष्ट तो स्वतः करीत होता; मराठ्यांवर त्यानें सतत सतरा वर्षें मोठ्या अट्टाहासानें मोहीम चालविली, त्यावेळीं तो वृद्ध होता, तरीसुद्धां तरुण मनुष्याप्रमाणेंच त्याचा उत्साह, तडफ, तरतरी व चापल्य कायम होतें; या वयांतही तो सारखी मेहनत करीत होता; मराठ्यांना नेस्तनाबूद करण्याकरितां सारखा झटत होता; प्रत्येक गोष्ट स्वतः हौसेनें करीत होता; कितीही संकटें आलीं, आपत्ती कोसळल्या, कितीही लोक अथवा जनावरें मेलीं, दुष्काळ पडला, पटकीची सांथ आली, पावसानें नद्यांस पूर येऊन माणसें–जनावरें, वाहून गेलीं, अन्नाचा दुष्काळ पडला, तरीही तो तिळमात्रही डगमगला नाहीं; मानवी आपत्तींची तर तो केव्हांही पर्वा करणारा नव्हताच, पण दैवी आपत्तींमुळेंही त्याचा धैर्यमेरु केव्हांही यत्किंचित सुद्धां डळमळत नव्हता; काळाला बगल देऊन एकीकडे होण्यापेक्षां काळाशीं झगडून आपला मार्ग काढण्याच्या अट्टाहासांत तो नेहमीं मग्न रहात होता; इतका तो कल्पनातित धैर्याचा होता; दगडी काळजाचा व मनाचा होता; प्रत्येक आपत्तीबरोबर त्याला दुप्पट हिंमत चढत होती; लढाईचे कार्यक्रम व नकाशे तो स्वतः करीत होता; स्वतः लढाईची व सर्व राज्याची व्यवस्था पहात होता. डोळ्याला चष्मा न लावितां स्वतः राज्याचें काम करीत होता, आणि त्याच्या स्वदस्तुरच्या हुकुमाशिवाय राज्यांतील काडीही हलत नव्हती; असा हा अलौकीक पुरुष असूनही त्याच्या कोणत्याच सद्गुणाचें चीज झालें नाहीं, ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे पण त्याला कारणीभूतही स्वतः तोच आहे. तो असामान्य बुद्धिवैभवाचा पुरुष असूनही " अती शहाणा " असल्यानें त्याच्या सर्व अलौकिक गुणांचें मातेरें झालें ! दुष्ट वासना, अन्यायी कृती, दुसऱ्याचें नुकसान करण्याची पापी इच्छा, आणि स्वकीय परकीय हा भेदभाव न करितां सर्वांना छळीत राहण्याची प्रवृत्ति, यामुळें त्याच्यापासून कोणाला सूख झालें नाहीं, आणि सर्व जन्मांत " समाधान " या चार अक्षरांचे चार प्रहरही त्याचे समाधानांत न गेल्यामुळें त्याला स्वतःलाही कधीं सूख लागलें नाहीं. काळजी, कांक्षा आणि कष्ट या तापत्रयांत त्याचा जन्म गेला; आपण करतों हें अयोग्य आहे, हें त्यास माहीत असूनही तशाच गोष्टी मुद्दाम पुन्हां पुन्हां उघड्या डोळ्यानें करीत राहण्याचा त्याचा स्वभाव बनला; तळहातानें झांकल्या जाणाऱ्या टाळूच्या आंतील टीचभर मेंदूंत, सर्व मोंगली साम्राज्य, मराठे, रजपूत व अफगाण, या सर्व व इतर विचारांचें विश्व सहज सांठवून ठेवण्या इतका अवरंगझेब बुद्धिप्रभावाचा असून सुद्धां, त्याच्या कृतीमुळें, त्या बुद्धीप्रभावापासून कोणास फायदा न होतां उलट चटके बसले ! थोडक्यांत ह्मणजे, मराठे, रजपूत, व अफगाण, यांच्या बरोबरील अवरंगझेबाची वागणूक-कुटिल राजनीति, जुलमी व दुराग्रही स्वभाव, अविचारी व हट्टी वर्तन, स्वार्थी व कावेबाज वागणूक, विश्वासघातकी व तिरस्करणीय आचरण,

स्वार्थ साधितांना, व साधण्याकरितां नीतिमत्ता गुंडाळून ठेवण्याची-व ठेवीत राहण्याची संवय, प्रत्येकावर अविश्वास, स्वधर्मीय विजापूर व गोवळकोंडें येथील-त्यास प्रसंगीं मदतगार होऊं शकणाऱ्या-राज्यांचा अन्यायानें अपहार, इमानाच्या व सचोटीच्या वर्तनाचा अभाव, धर्मवेडेपणामुळें, आपल्या प्रजेची गांजणूक व धार्मिक दुराग्रहामुळें इतरांना त्रास, स्थानिक संस्थांचा नायनाट, अवजड अधिकारी सत्तेचें एकीकरण, प्रत्येक काम स्वतः करावयाचें या पद्धतीमुळें इतरांच्या कर्तृत्वशक्तीस पुढें येण्यास वाव न मिळून त्यामुळें राज्यावर घडलेला अनिष्ट परिणाम वगैरे कारणामुळें या महाबुद्धीवान, पराक्रमी, शूर, कर्तबगार, करारी, विद्वान, हिंमती व हिकमती राज्यकर्त्यांचा शेवट अत्यंत दुःखदायक झाला ? आपल्या पन्नास वर्षांच्या कारकीर्दीत त्यानें आपण होऊन आपल्या राज्याचा नाश करून घेतला; आणि त्याच्या मृत्यूनंतर लवकरच ही मोंगल साम्राज्याची इमारत मूळावर बसलेल्या एकाच जोराच्या फटकाऱ्यानें धडाडून खालीं येऊन नामशेष झाली ? ?

अवरंगझेबानें आपल्या आयुष्यांत जीं अनेक घोर कृत्यें केलीं, तीं मृत्यूपूर्वी त्याला सारखीं टोंचीत होतीं; त्याचें मन त्याला सारखें खात होतें; इह लोकींची निराशा व परलोकाची भीति, या दुधारी कातरींत त्याचा देह जिवंतपणीं कापला जात होता; पितृहत्या, भ्रातृहत्या, पुत्रहत्या, स्वकीयांचा व परकीयांचा नाश वगैरे दुष्कृत्यांचीं भूतें त्याच्या डोळ्यासमोर नाचूं लागलीं होतीं, आपण शहाजहान याच्याशीं जसे वागलों तशींच आपलीं मुलें आपल्याशीं वागतील अशी त्यास भीति होती; ह्मणून आपल्या मृत्यूसमयींही त्याला आपले मुलगे जवळ नको होते; व चोहोंकडूनच त्याची स्थिती यावेळीं अत्यंत कष्टमय झाली होती; आपल्या मागें राज्यप्राप्तीकरितां आपलीं मुलें बादशाही डोलाऱ्याभोंवतीं नंग्या तरवारीच्या खड्या तालांत "हायदोस" चा धुडगुस घालतील, असें त्यास वाटत होतें; स्वतःच्या चौदा भावंडांपैकीं आतां तो एकटाच जिवंत राहिला होता; त्याच्या मृत्यूच्यापूर्वी एकच वर्ष–ह्मणजे इ० सन १७०६ मध्यें मुलगी गौहर–आरा, इतर मुली, पुतणे, नातू वगैरे त्याच्यादेखत मृत्युमुखीं पडलेले होते; आणि दुःखांत व यातनांत त्याचा जीव सारखा घुटमळत होता ! यावेळीं त्यानें आपल्या दोनमुलांनां–अज्जमशहा व कामबक्ष यांनां, जीं पत्रें लिहिलीं तीं अत्यंत हृदयद्रावक आहेत, व त्यांवरून औरंगझेबास

---

( १ ) अवरंगझेबानें अज्जमशहास पाठविलेलें पत्रः—

" चिरंजीव शहा अज्जमशहा यासः–आशीर्वाद. माझें अंतःकरण तुझ्याकडे आहे. मला तर वृद्धावस्था प्राप्त होऊन, अशक्ततेनें ग्रस्त केलें आहे. माझ्या सर्व अवयवांतील एकंदर शक्ति नष्ट झाली. मी या जगांत जसा एकटाच परस्थ ह्मणून आलों तसा एकटाच

अखेरच्या वेळीं आपल्या दुष्ट कृतीबद्दल किती पश्चात्ताप झाला होता, व त्याचीं पापें त्याच्यापुढें उभीं राहून, त्यामुळें त्याच्या अंतःकरणाची कशी कालवाकालव होत होती,

---

व परस्थ म्हणूनच जाणार! मी कोण, व कशाकरितां जन्मास आलों, आणि माझ्या प्रारब्धीं काय लिहून ठेविलें होतें, हें मला कांहींच माहीत नाहीं! जो क्षण सुखांत गेला त्यानें आपल्या पाश्चात् दुःखमात्र राखून ठेविलें! मी माझ्या राज्याचा संरक्षकही झालों नाहीं; आणि पालकही झालों नाहीं. माझें बहुमोल आयुष्य व्यर्थ गेलें! मला जसजशी बुद्धी होई तसतसें मी करीत गेलों. माझ्या अंतःकरणास सदूसदूबुद्धीनें जशी जशी प्रेरणा करावी तसा तसा मी वागत असे. माझ्यामध्यें सद्सद्विचारशक्ति नव्हती असें नाहीं. परंतु तिचा कडक प्रकाश माझ्या धुंद दृष्टीनें मला दिसला नाहीं. आयुष्याची शाश्वति नाहीं, हें माझ्या मनांत मी बागविलें नाहीं; गेलेला श्वास परत येत नाहीं; आणि त्यामुळें पुढें माझ्या शाश्वत कल्याणाची मला आशा नाहीं! माझे शरीरांत जो ज्वर असे तो निघाला आहे; व आतां तरी पुढें माझ्या अस्थि आणि चर्म हींच काय तीं अवशिष्ट रहावयाचीं आहेत. प्रिय पुत्र कामबक्ष हा जरी विजापूरकडे गेला आहे तरी तो माझ्या जवळच आहे; आणि माझे पुत्रा! तूं तर त्याच्याहून अगदींच जवळ आहेस. परंतु प्रिय शहाअलम मात्र फार दूर आहे. माझा प्रिय नातू (मूअज्जमचा धाकटा मुलगा अजीम-उश्शान) हा ईश्वरी कृपेनें हिंदुस्थानाजवळ येऊन पोहोंचला आहे. आपली फौजफांटा आणि बाजारबुणगे हीं आतां माझ्या प्रमाणेंच त्रासून निराधार आणि निःशस्त्र झाल्यासारखीं होतील; व त्यांच्याही जीवास माझ्या प्रमाणेंच शांती आणि समाधान यांचा अभाव होऊन, त्यांच्या जीविताची, पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें, किंवा आरशाच्या मागच्या कल्हईसारखी, शाश्वति नाहीं, हें ठरलेलेंच आहे. त्यांचा राजा मी, नाहींसा झाल्यानंतर त्यांना कोणी धनी किंवा पोशिंदा मिळेल किंवा नाहीं, हें त्या बिचाऱ्यांस मुळींच माहीत नाहीं? मी या जगावर कांहीं एक बरोबर आणिलें नाहीं; आणि आतां या जगांतून जातांना मनुष्याचे ठायीं असणारी प्रत्येक गोष्टीची अशाश्वती, व अनियमितता, हीं मात्र मी बरोबर नेत आहे. मला मुक्ति कशी मिळेल याची मला अत्यंत भीति वाटत आहे; आणि ईश्वराचे सान्निध मला कोणकोणत्या दुःसह शिक्षा व यातना भोगाव्या लागतील त्या कोणास माहीत? ईश्वर हा कृपाळू आणि दयानिधि आहे, हें मला पूर्णपणें माहीत आहे, व त्याच्यावर माझा दृढ भरंवसा आहे; परंतु माझ्या कडून जीं अघोर व अक्षम्य पातकें, व कृत्यें घडलीं आहेत, त्यांबद्दल त्या कृपाळू दयासागर परमात्म्यानें मजवर आपली प्रेमदृष्टि कशी ठेवावी, हें मला समजत नाहीं; आणि त्यामुळें माझें चित्त भीतिग्रस्त झालें आहे! माझें प्राणोत्क्रमण झाल्यावर माझे पश्चात् माझें प्रतिबिंब

याची यथार्थ कल्पना होते; जीव जातां जात नाहीं; कष्ट होतां रहात नाहींत; यातना होतां चुकत नाहींत, आणि पश्चात्तापानें संजीवनी विद्या साध्य होणें शक्य

म्हणून कांहीं एक शिल्लक राहणार नाहीं ? असो; मी आपलें शरीररूपी तारूं मृत्यूच्या अगाध समुद्रांत ढकलिलें आहे खरें; तें आतां कोणत्याही प्रकारच्या यातना, विपत्ति किंवा भीति, यांच्या उंच लाटांवर जावो, चढो, किंवा कोठेंही आदळो, वा पडो ! ईश्वर माझ्यामागें माझ्या मुलांनां विजय व वैभव देण्यास समर्थ आहे. तथापि त्यांनीं आपलें आवश्यक कर्तव्य तें केलें पाहिजे. माझा प्रियनातू-बेदरबख्त याच्यावर ईश्वराची कृपा असावी म्हणून मी प्रार्थना करितों. बेदरबख्त-अज्जमशहाचा-वडील मुलगा-याची माझी आतां भेट होणार नाहीं; परंतु त्याला भेटावें, अशी मला इच्छा होत आहे. माझी प्रिय कन्या बेगम-झिनतुन्निसा-ही फार त्रस्त झाल्यासारखी झाली आहे; परंतु ईश्वर हाच सर्वांच्या हृदयांत काय आहे, याचा न्याय करण्यास समर्थ आहे. स्त्रियांचे भलभलते व मूर्खपणाचे विचार त्यांच्या निराशेशिवाय त्यांना दुसरें कांहींही प्राप्त होऊं देत नाहींत; हेंच काय तें माझें शेवटचें म्हणणें. आतां येतों ! येतों ! ! येतों ! ! !

**विशेष खुलसाः**—अजीमउश्शान् हा मूअज्जम ऊर्फ बहादूरशहा याचा दुसरा म्हणजे मोइझ-उद्दीनच्या पाठचा मुलगा होता; अवरंगझेबाच्या मृत्यूसमयीं तो बंगाल्यांत असून या दोन्हीं मुलांनीं अज्जमशहा बरोबर बहादूरशहानें केलेल्या युद्धांत भाग घेतला होता. अजीमउश्शान हा अवरंगझेबाच्या व बहादूरशहाच्या विशेष प्रेमांतील व मेहेरबानींतील असून बहादूरशहाच्या कारकीर्दींत बादशाही खजिना, व मोर्तब त्याच्याच ताब्यांत होतें; बहादूरशहा मृत्यू पावल्यावर त्यानें राज्याची सत्ता आपल्या हातांत घेतली; परंतु त्याच्या तीघाभावांस-मोइझू उद्दीनू, खुजिस्ता अखीर आणि रूफी-उल्-कदर यांना-झुल्फिकारखानानें फूत देऊन अजीमू उश्शानशीं युद्ध करावयास लाविलें; त्यांत अजीमू उश्शानचा पराभव झाला, व तो लगबगीनें पळून जाण्याचा प्रयत्न करीत असतां रावी नदींत बुडून मृत्यू पावला. अज्जमशहा यास बेदर बख्त्, वल्लीजा व अली तेहार असे तीन मुलगे होते; बहादूरशहा बरोबरील युद्धांत, स्वतः अज्जमशहा व त्याचे पहिले दोन मुलगे मारले गेले; व अली तेहार हा जिवंत हातीं लागला, त्यास बहादूरशहानें मोठ्या प्रेमानें वागविलें.

झीनतुन्निसा ऊर्फ पादशहा बेगम ( जन्म औरंगाबाद येथें ता० ५ आक्टोबर इ० सन १६४३; ) ही जन्मभर अविवाहित असून ती आपल्या वडिलाबरोबर ( अवरंगझेब ) दक्षिणेच्या स्वारीवर आलेली होती. ती अवरंगझेबाची खाजगी व्यवस्था पहात असे; औरंगझेबाच्या मृत्यूच्या वेळीं तिचें वय ६४ वर्षांचें होतें; व त्यानंतरही ती पुष्कळ वर्षे जिवंत होती.

नसल्यानें, आपण नाहींशीं केलेलीं माणसें पुन्हां आहेत अशीं करावीं,—जिवंत करावीं, असें मनांत आणिलें तरी त्याचा कांहींही उपयोग नाहीं, ही गोष्ट त्याला अखेरच्या वेळीं पटली।

---

( २ ) अवरंगझेबानें कामबक्ष यांस पाठविलेलें पत्रः—

राजपुत्र कामबक्ष यासः—माझ्या हृदयासन्निध वास करणाऱ्या पुत्रा! माझ्या चालत्या काळांत ईश्वरी आज्ञेनें, व त्याच्या इच्छेप्रमाणें, मी तुला, माझ्यांत सामर्थ्य होतें तितक्या रीतीनें, सर्व प्रकारच्या शहाणपणाचा उपदेश आणि ज्ञानाच्या गोष्टी सांगितल्या; परंतु तुझ्या पोरबुद्धीप्रमाणें तूं माझ्या सांगण्याकडे जितकें लक्ष द्यावयास पाहिजे होतें, तितकें दिलें नाहींस. असो; मी आतां या जगांतून एखाद्या प्रवाशाप्रमाणें जाणार! मी माझें आयुष्य निरर्थक घालविलें याबद्दल मला फार वाईट वाटतें! परंतु आतां त्याचा काय उपयोग? मला माझ्या पातकांचें व अविचारी कृत्यांचें फळ भोगलेंच पाहिजे; व तेंच शेवटीं माझ्या बरोबर येणार? मी व्यर्थ जन्मास आलों, याबद्दल ईश्वर खचित आश्चर्य मानीत असेल? मी व्यर्थ जन्मास आलों, आणि मी आलों तसा एकटाच जावयाचा! मी केलेल्या पापी कृत्यांचा कोणीही वांटेकरी होणार नाहीं! मी आपला आत्मा अनेक दुष्कृत्यांनीं अत्यंत मलिन केला! मला बारा दिवस सतत ज्वर येत होता; परंतु तो आतां गेला. जिकडे जिकडे मी पाहतों तिकडे तिकडे मला ईश्वरी साक्षात्कार दिसतात. त्यांशिवाय दुसरें कांहींही दिसत नाहीं. माझ्या सैन्याचें, बाजार बुणग्यांचें, आणि माझ्या पोटाचें आतां कसें होईल, ही जी मला चिंता आहे, तिचा उपयोग काय? हाय, हाय! कोण हा दुर्वह लोभ आणि मायापाश? माझी दशा काय होईल तें मला कांहींच कळत नाहीं! माझी कंबर जणूं काय मोडून गेली; आणि माझे पाय केवळ तुटल्यासारखे होऊन मला चलनवलन करण्याची देखील शक्ती राहिली नाहीं! जो श्वास जातो तो बरा गेला, असें प्रति निश्वासाला वाटत आहे! मी पुष्कळ पातकें व अनेक घोर कृत्यें केलीं त्याबद्दल ईश्वर मला काय शिक्षा करील तें समजत नाहीं? आतां माझ्यामागें माझ्या सैन्य शिबंदीचा वगैरे बंदोबस्त माझ्या मुलांनीं ठेवावा. त्यांना मी इमानी आणि योग्य अधिकारी समजून माझा सर्व प्रकारचा वारसा व अधिकार ईश्वरास साक्षी ठेवून, त्यांच्या स्वाधीन करितों. अज्जीमशहा जवळच आहे. माझ्याशीं जे प्रामाणिकपणानें वागले, त्यांचा मी प्राणनाश केला नाहीं, व त्यांच्याबद्दलचें अपयश माझ्या डोक्यावर येण्याचें कारण नाहीं. ज्याअर्थीं आतां मी हा लोक सोडून जात आहे, त्याअर्थीं मी तुला तुझ्या आईला व तुझ्या मुलाला, ईश्वराचे संरक्षणाखालीं ठेवून जातों, तो तुमचें रक्षण

औरंगझेब हा एक अत्यंत दैदिप्यमान हिरा होता; पण तो बद दानतीच्या कोंदणांत असल्यानें गारगोटीच्या किंमतीचा झाला होता.! आपल्या आयुष्यभर अघोर

---

करील. मरणकाळच्या यातना आणि क्लेश एकामागून एक मला सारखे भासूं लागले आहेत ! बहादूरशहा अजून जेथें होता; तेथेंच आहे; परंतु त्याचा मुलगा हिंदुस्थानाजवळ येऊन पोहोंचला आहे. बेदरबख्त हा गुजराथेंत आहे. इय्यत-अल्-निसा यानें आजपर्यंत कोणत्याही प्रकारच्या दुःखाचा अनुभव घेतला नव्हता. त्याजवर हल्लीं दुःख संकटांचा केवळ वर्षाव होत असून, त्यांमध्यें तो अगदीं बुडून गेला आहे ! बेगमची काळजी घे; उदेपुरी हिनें माझ्या अजारीपणासंबंधानें फार कष्ट करून अतीशय श्रम सोशिले आणि ती माझ्याशीं सहगमन करण्याची इच्छा करिते; परंतु कोणतीही गोष्ट प्रसंगाप्रमाणें होणारी आहे. आपल्या कुटुंबांतील किंवा दरबारांतील जीं माणसें आहेत त्यांना-मग ते अप्रामाणिक पणानें किंवा अविश्वासानें वागले तरीही-वाईट रीतीनें वागवूं नकोस. आपले हेतू आणि उद्दिष्टकार्यें सिद्धीस न्यावयाचीं झाल्लें ह्मणजे सभ्यता आणि युक्ति यांनींच तुझें काम होईल; व त्याचगुणांची नेहमीं आवश्यकता असते. अंथरूण पाहून पाय पसरावे. आपल्या शक्तीप्रमाणेंच एखादें काम करण्यास हात घालावा. फौजेंतील लोकांचा मुशाहिरा देण्याचा राहिलाच असून, त्यांच्या तक्रारी आणि कटकटी अजून शिल्लकच आहेत. दाराशेखो यानें न्यायानें व सदिच्छेनें आपल्या लोकांस बैठे पगार देण्याचें ठरविलें; तरीपण त्याजकडून त्यांना अगदींच थोडा पगार मिळत आल्यामुळें त्याचे लोक त्याच्यावर नाखूष असत. आतां मी जातों ! मी जें कांहीं बरें वाईट केलें, तें केवळ तुमच्या करितांच केलें; माझ्या विषयीं तुझा मलताच कांहीं ग्रह होऊं देऊं नकोस, व तुला माझ्या कडून जें कधीं दुःख किंवा शिक्षा झाली असेल, तिचें स्मरणही करूं नकोस; त्याबद्दलचा आतां हिशोबच नाहीं असें समज. कोणीही आपला जीव कुडींतून निघून जातांना पाहिला नाहीं; परंतु मला माझा जीव कसा माझ्या कुडींतून निघून जात आहे, तें दिसत आहे ! हाय, हाय ! !

**विशेष खुलासाः-**

( १ )-दाराशेखो हा शहाजहान याचा वडील मुलगा, व अवरंगझेबाचा वडील भाऊ; याचा अवरंगझेबानें ता० ३० आगष्ट इ० सन १६५९ रोजीं वध करविला !

( २ )-उदेपुरी ही औरंगझेबाची अतीशय आवडती बायको होती; कामबक्ष हा हिच्याच पासून औरंगझेबास झालेला मुलगा होता; ( जन्म; दिल्लीयेथें ता० २४ फेब्रुवारी इ० सन १६६७; ) अवरंगझेबाच्या मृत्यूच्यावेळीं तो विजापूर येथील कारभारावर होता; अवरंगझेबानें आपल्या मरणापूर्वी मृत्युपत्र करून आपलें राज्य मुअज्जम,

कृत्यांची, व कुटिल कारस्थानांची सारखी सुधारून वाढविलेली आवृत्ति काढीत राहण्याच्या संवईनें पुढें पुढें त्याचें मन इतकें निगरगट्ट बनून गेलें कीं, आपलीं कृत्येंच मुळीं अघोर आहेत कीं नाहींत, याची सुद्धां त्याला शंका वाटूं लागली! अती लोभी व स्वार्थी स्वभावामुळें त्याची विवेकबुद्धि नष्ट झाली! आपल्या भाऊबंदांचे गळे कापितांना त्याचें मन कचरलें नाहीं; भायातदायादांना नामशेष करितांना त्याला खंत वाटली नाहीं; स्वकीयांच्या गळ्याची तांत बाहेर ओढून काढितांना त्याला द्रव आला नाहीं; अफगाण लोकांच्या कत्तली उडवितांना त्याला पाझर फुटला नाहीं; रजपुतांना नामशेष करण्याच्या लहरींत आपल्या कृत्यांच्या भावी परिणामाबद्दल त्याच्या मनांत विचार आला नाहीं; मराठ्यांना चिरडण्याकरितां केलेल्या खटपटींत आपल्या अन्यायी, अविवेकी दानतीचा काय परिणाम होईल, हें मनांत आणण्याची त्यानें पर्वा केली नाहीं; पण मरतांना मात्र " महत्वाकांक्षेच्या धुराइतकी दुसरी कोणतीही हवा रोगकारक, व सर्वस्व नाशकारक नाहीं."

---

अज्जमशहा व कामबक्ष या आपल्या तीन मुलांना वांटून दिलें होतें, आणि औरंगझेबाच्या मृत्युसमयीं, दक्षिणचें राज्य कामबक्षास मिळावें म्हणून उदेपुरीनेंही पुष्कळ खटपट केली होती; परंतु अवरंगझेब मृत्यूपावल्याबरोबर मुअज्जम–हा काबूलच्या सुभ्यावर होता–हा तावडतोब मोठ्या झपाट्यानें दिल्लीकडे आला; इकडून अज्जमशहाही त्याच्याबर चालकरून गेला, व जाजव येथें युद्ध होऊन त्यांत अज्जमशहा व त्याचे दोन्ही मुलगे मारले गेले; व मुअज्जम हा बहादूरशहा हा किताब धारणकरून बादशाहीपदावर आरूढ झाला; परंतु हें त्याचें कृत्य कामबक्ष यास आवडलें नाहीं, म्हणून बहादूरशहा त्याच्यावर दक्षिणेंत चाल करून आला, हैद्राबादनजीक उभयतांची लढाई होऊन तींत कामबक्ष मारला गेला, (ता० १४ फेब्रुवारी १७०८) व बहादूरशहा सर्व राज्याचा मालक झाला.

---

**टीप १:**—शहाजहान यानेंही असाच आपल्या सर्व प्रतिस्पर्ध्यांचा निकाल उडविला; आणि शहर्यार खुश्रूचे दोन मुलगे, दावरबक्ष व गर्शास्प, आणि दानियलचे दोन मुलगे तहमुरास, व होशंग, या पांच दुर्दैवी राजपुत्रांचा वध करून तो ता० ५ फेब्रुवारी इ० सन १६२८ रोजीं गादीवर आला; शहाजहान व औरंगझेब यांचें हें वर्तन परस्पर एकसारखें आहे; परंतु त्या उभयतांचा पुढील वर्तनक्रम मात्र अगदींच भिन्न व विरुद्ध दिशेचा आहे; आणि त्यामुळेंच शहाजहानची कारकीर्द यशस्वी झाली, आणि औरंगझेबाच्या प्रत्येक राजकारणाचा बोजवारा होऊन त्याच्या चिंध्या सर्वभर उडत राहिल्या, हें या उभयतांच्या आयुष्यक्रमांमधील वैशिष्य आहे.

हें उच्च नीतितत्त्व त्यास आठवलें! त्याच्या पापी कृत्यांचीं भूतें चोहोंकडून त्याला छळूं लागलीं, तेव्हां आपण खरोखरीच अघोर कृत्यें केलीं आहेत, अशी त्याची खात्री झाली; "माझें पुढें कसें होईल ?" अशी त्याला काळजी वाटूं लागली; आणि "ईश्वरासन्निध मला कोणकोणत्या दुःसह शिक्षा व यातना भोगाव्या लागतील," व "माझ्याकडून जीं अक्षम्य पातकें व कृत्यें घडलीं आहेत, त्यांबद्दल ईश्वर तरी मला कशी क्षमा करील," अशी त्यास भीति वाटूं लागली. साधारण मनुष्यसुद्धां कितीही अधोगतीस गेलेला असला तरी-आणि त्याचा स्वभाव कितीही कठोर बनला असला तरी-त्याच्या अंतःकरणांत नेहमीं जागृत असणाऱ्या दुष्ट मनोवृत्तींवर निदान मरतांना तरी सद्सद्विवेकबुद्धीचा दाब निःसंशय बसलाच पाहिजे, हा मानवी सृष्टीचा नियम आहे; मानवी विश्वाची घडामोड करण्यांत परमेश्वराचें मूर्तिमंत अस्तित्व भासविणाऱ्या अनेक चमत्कारांपैकीं हा एक जिवंत व जागता चमत्कार आहे; अर्थात औरंगझेबासारख्या असामान्य विद्वान पुरुषास हा नियम माहीत असलाच पाहिजे, हें उघड आहे; आणि ह्मणूनच त्याच्या भीषण कृत्यांचें महाभीषण स्वरूप त्याच्या डोळ्यांपुढें उभें राहून मृत्यूच्या वेळींही त्याला घोर यातना भोगाव्या लागल्या, व अशाच स्थितींत प्राण घुटमळत घुटमळत या महान् राज्यकर्त्याच्या इहलोकींच्या कष्टमय जीवनयात्रेचा अत्यंत दुःखदायक शेवट झाला!!

अवरंगझेबाचा ज्याप्रमाणें कोणावर विश्वास नव्हता त्याप्रमाणेंच त्याच्यावरही कोणी विश्वास ठेवीत नव्हतें; एखादा अत्यंत विषारी, एकाच लहरींत प्राण घेणारा काळा नाग ज्याप्रमाणें एकदम चटकन उलटून दंश करितो, त्याप्रमाणेंच अवरंगझेबाचें आचरण होतें; न्यायाच्या व नीतीच्या आचरणामुळें उत्पन्न होणारें मनोधैर्य त्याच्याठायीं वसत नव्हतें; सदाचरणामुळें मनाला होणारा आनंद त्याच्या नशीबीं नव्हता; बुद्धिमलिन मन, रक्तमलिन हात, व दुष्कृतिमलिन देह यांचा-मानवी चारित्र्याच्या असुरी उन्मादाचा, अढळ मनोवृत्तीचा व अभेद्य अशा अहंकाराचा, औरंगझेब हा एक मूर्तिमंत पुतळा होता; महत्वाकांक्षेनें झपाटलेला मानवी देह-देहाची ओली माती-जमीनीवर पडेपर्यंत किती परमावधीच्या अधोगतीप्रत जाते, याचें हें एक ठळक उदाहरण होतें; अवरंगझेबानें केलेलीं अनेक युद्धें-आवश्यक ह्मणून नव्हे तर-स्वार्थानें प्रेरित होऊन मुद्दाम आपणहून आगळिकीनें केलेलीं होतीं; राज्यांत व राज्याबाहेर त्याला अनेक शत्रू उत्पन्न झाले होते; त्याच्या जिवंतपणींच

---

टीप १:—" St Augustine, looking out from his City of god over the still vast domain of Rome debates the quesion whether it is fitting for good men to rejoice in

मोंगली राज्याला उतरतीकळा लागली होती; मोंगली राज्य वैभवसंपन्न असतां त्या राष्ट्राचीं दूरवरचीं लष्करी ठाणीं काबूल व कंदाहार येथें होतीं; परंतु अवरंगझेबाच्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं त्याची त्या ठाण्यांवरील सत्ता नष्ट झाली होती; बर्नीयरच्या म्हणण्याप्रमाणें, "दरबारांतील अनेक अमीरउमरावांचा थाटमाट चालू राहण्याकरितां अवश्य असणारा, आणि लोकांना आपल्या दाबांत ठेवण्याच्या उद्देशानें बाळगलेल्या मोठ्या सैन्याच्या पगाराकरितां अगत्य लागणारा अवाढव्य खर्च भागवावा लागत असल्यामुळें देशाची दुर्दशा झाली आहे—आणि त्यामुळें प्रजाजनांचे किती भयंकर हाल होत आहेत, याबद्दल योग्य कल्पना करून देणेंही अशक्य आहे" इतकी प्रजेची विपन्नावस्था झाली होती; आणि "अवरंगझेबाचें उतारवय, त्याच्या जुलुमाविरुद्ध हिंदू लोकांनीं नेटानें केलेलें, आणि स्पर्शजन्य रोगासारखें फैलावत गेलेलें बंड, त्याचा मृत्यू हीच इशारत असें समजून त्याच्या मुलांमध्यें आपआपसांत होणाऱ्या भावी यादवीचा निश्चितपणा, लढाईच्या परिणामावरच निव्वळ अवलंबून असलेलें बादशाही तख्त, सांपत्तिक अडचणी, आणि चोहोंकडे दिसून येणारी राज्यकारभाराची झालेली विस्कळीत घडी, हीं सर्व पूर्वेकडील देशांतील मोंगली राजघराण्याच्या दौर्बल्याचीं—ऱ्हासाचीं आणि जवळ जवळ नामशेष होण्याचीं साधारणतः चिन्हें होतीं, असें उघड दृष्टोत्पत्तीस येत होतें." आणि अवरंगझेबाच्या मृत्यूनंतर पुढें लवकरच हें भविष्य खरें ठरलें!

अवरंगझेबाच्या मृत्यूनंतर मोंगल साम्राज्याचे तुकडे होण्यास सुरवात झाली; दक्षिणेंत निजामानें आपलें स्वतंत्र राज्य स्थापन केलें; महाराष्ट्र, गुजराथ, माळवा, व वऱ्हाड हे प्रांत मराठ्यांनीं घेतले; बंगाल व औंध हे दोन महत्वाचे प्रांत बादशाही अमलाखालून जाऊन तेथें स्वतंत्र राज्यें निर्माण झालीं; कर्नाटक प्रांतावर मराठे व निजाम हे आपला हक्क सांगूं लागले; जाठ व रोहिले यांनीं कांहीं बादशाही प्रदेश आपल्या ताब्यांत घेतला; शीख लोकांच्या ताब्यांत पंजाब गेला; रजपूत राज्यकर्ते स्वतंत्र झाले; नादीरशहाच्या स्वारीनें मोंगल बादशाहीचा मोठ्या जोरानें शक्तिपात होऊन त्यानें सिंधूनदाच्या पश्चिमेकडील प्रदेश

---

the expansion of empires, even when the victors are more civilized than the vanquished, and the wars just and unprovoked. His conclusion is, that to carry on war, and extend rulership, over subdued nations seems to bad men felicity, but to good men a necessity."

अर्थः—"सेंट ऑगस्टाइन यानें आपल्या प्रभूच्या निवासस्थानांतून तत्कालीन वाढत्या जगड्व्याळ रोमनसाम्राज्यावर नजर फेंकिली; आणि जरी लढाया अकारण झाल्या

आपल्या ताब्यांत घेतल्यामुळें तिकडील बादशाही सत्ता नष्ट झाली; ज्या औरंगझेबाचा सर्व हिंदुस्थानभर दरारा होता, त्याच्याच मृत्यूनंतर पन्नास वर्षांच्या आंतच "मोंगल बादशहा" हा एक निव्वळ नष्ट ऐश्वर्याचें अवशिष्ट छायाचित्र बनून गेला! दगलबाज प्रधानमंडळाच्या व अधिकार बळकावूं पाहणाऱ्या महत्वाकांक्षी सरदारांच्या हातांतील एक निव्वळ बाहुलें बनला आणि पुढील काळांत तर मराठे व इंग्रज यांच्या मेहेरबानीनें व आश्रयानें त्यास कालक्रमणा करावी लागली!! व शेंवटीं इ० सन १८५७ च्या बंडाच्या काळांत, हिंदुस्थानांत एके काळीं वैभवसंपन्न, प्रसिद्ध व वीर्यशाली ह्मणून दुमदुमत असलेल्या मोंगल सम्राटाचें छयाचित्र दिल्लींतून नाहींसें होऊन, त्याबरोबरच बाबरच्या राजघराण्याचा इतिहासही समाप्त झाला।!!

मोंगली व मराठी साम्राज्याचा इतिहास वाचतांना तत्कालीन राजकीय परिस्थिति लक्षांत घेऊनच मराठे व मोंगल यांच्या यशापयशाचा विचार केला पाहिजे; मोंगली राज्य व मोंगलबादशहा नष्ट झाले, तरी त्यांची आठवण नष्ट होणें शक्य नाहीं, आणि अवरंगझेबापर्यंतचा प्रत्येक बादशहा कर्तबगारच होऊन गेला, यांत कांहींही संशय नाहीं; या बाबतींत सिडने ओवेन हा "India on the eve of British Conquest." या आपल्या पुस्तकांत मोठ्या जिज्ञासेनें असें ह्मणतो कीं, "या मोंगल घराण्यांत जसे एकामागून एक लढवय्ये राज्यकर्ते होऊन गेले, तसें उदाहरण दुसऱ्या कोणत्या घराण्याचें आहे? या घराण्यांतील पहिला बादशहा साम्राज्य संस्थापक बाबर; तिसरा अकबर; यानें तर साम्राज्याचा पुनरुद्धार करून त्याचा विस्तार केला; व त्यानें चार्लस धी ग्रेटशीं तुलना करितां येईल अशीं युद्धें केलीं. शिवाय त्यानें

---

असल्या, अथवा सकारण करण्यांत आल्या असल्या, आणि जरी जेते हे जितांपेक्षांही अधीक सुधारलेले असले, तरीसुद्धां साम्राज्याचा विस्तार करण्यांत सूज्ञ मनुष्यास आनंद वाटावा कीं काय? या प्रश्नाची त्यानें चर्चा केली आहे. आणि त्यानें असें अनुमान काढिलें आहे कीं, जितराष्ट्रांबरोबर लढाई चालविणें, आणि त्यांत राज्यविस्तार करणें, हें दुर्जनाला आनंदकारक होतें; परंतु तेंच सज्जनाला मात्र आवश्यक वाटतें."

१-"An congruat bonis latius velle regnare."

"आपल्या साम्राज्याचा विस्तार व्हावा, अशी इच्छा सूज्ञ मनुष्यानें करणें, हें योग्य आहे कीं काय?" De civitate Dei, Lib IV 15.

---

टीप १:—The Materials necessary for a sound judgement of facts are not found in the success or failure

लष्करी पद्धतींतही पुनर्रचना केली; आणि सहावा बादशहा आलमगीर हा आपल्या तरुण-पणापासूनच मोठा लढवय्या असून आपल्या आयुष्याचीं शेवटचीं तेवीस वर्षे, एका दीर्घकालीन युद्धांत घालवून, त्या युद्धाचा शेवट न होतांच जर्जर होऊन आपल्या वयाच्या ८६ व्या वर्षीं मृत्युमुखीं पडला.'' अर्थात मोंगल बादशहांत कर्तबगारी असल्या-मुळेंच त्यांचें राज्य जवळ जवळ दोन शतकें मोठ्या जोमांत अस्तित्वांत राहिलें, यांत तर कांहींच शंका नाहीं; शिवाय हीही महत्वाची गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं, हिंदुस्थानांत इंग्रज येण्यापूर्वीं हिंदू व मुसलमान या उभयतांनींही अत्यंत यशस्वीपणें राज्यें चालविलीं आहेत; इतकेंच नाहीं तर मि० फिल्डिंगहाल यानें आपल्या "Passing of Empire" या ग्रंथांत म्हटल्याप्रमाणें "शेंकडों वर्षांपूर्वीं हिंदुस्थानांत टिकाऊ, जोमदार, व स्वतंत्र राज्यें होतीं; लोक धाडसी, चपळ व बुद्धीमान असून सर्व दर्जाच्या लोकांत सर्वसाधारण-पणें उच्च दर्जाची सुधारणा वसत होती. मला असें वाटतें कीं, पांच सहाशें वर्षांपूर्वीं हिंदुस्थानचे लोक युरोपच्या लोकांपेक्षां बहुतेक सर्व बाबतींत फार पुढें होते, ही गोष्ट पुष्कळ लोकांना पटत आहे, आणि खुद्द इंग्रज लोकांनाच ही गोष्ट कबूल करावी लागेल कीं, ते येथें येण्यापूर्वीं, हिंदुस्थांत जी राज्यपद्धति प्रचारांत होती, तिचेंच त्यांना

---

of undertakings. Exact Knowledge of the sitnation that has provoked them forms no inconsiderable element of History.

METTERNICH.

---

१-" But what royal dynasty can exhibit a prouder or more remarkable muster-roll of six consecutive fighting soverigns among whom the first is Babar, the precocious, ubiquitous and irrepressible founder of the empire; the third Akbar who refounded and extended it in wars that may challenge comparison with those of Charles the Great and who throughly remodelled the military system; the Sixth Alamgir, who, a warrior from his youth upwards wore out the last 23 years of a long and agitated life in the one, coutinuous, and laborious campaign and horness unsated with war at the died in advanced age of eighty eight."

बहुतांशीं अनुकरण करावें लागेलें " यावरून त्या त्या काळाच्या राजकीय परिस्थितिप्रमाणें मोंगल व मराठे यांचीं राज्यें निदान युरोपांतील राज्याच्या तोडीचीं होतीं, असेंच निदर्शनास येत आहे; हिंदुस्थानांतील मुसलमानी राज्यांचा, आणि मोंगल बादशाहीचा इतिहास अनेक दृष्टीनें बोधप्रद आहे; व तो मनन करून त्यापासून बोध घेतल्यास तो कल्याणप्रद होईल, अशी आशा आहे.

---

१–" Some hundreds of years ago there were in India Kingdoms that were stable, Strong and free. The peoples were enterprising, active and intelligent, and a high degree of civilisation was common throughout all classes. I think it is generally realised that five or six hundred years ago India was a head of Europe in most matters. And English men themselves must admit that they have borrowed not a little from the administrative Systems which were already in operation when they came."

मु० जळगांव,
ता० १ ज्यानेवारी १९२३ इ. } द. बा. करकरे.

# अनुक्रमणिका.

दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें; आणि दक्षिणेंतील त्या काळाच्या इतिहासाचें महत्व; पान; १; त्याकाळांत मराठ्यांच्या राजकीय उत्कर्षास घडत गेलेल्या अनुकूळ गोष्टींचें विवेचन; पान १-३; पूर्वरोमन बादशाहीचा ऱ्हास; पान ३; मुसलमानी धर्मसंस्थापक महंमद पैगंबर याचा जन्म; त्याचें पूर्वचरित्र; मुसलमानी धर्माची स्थापना; त्याचें मदीना येथें पलायन; हिजरी सनाची सुरवात; पान ३-५; महंमद मादिना येथें आल्यानंतर त्याच्या शिष्य समुदायाची दीडलाख पर्यंत वाढ झाली; व तो मादिना येथें राज्यकारभार करूं लागला; महंमदाचा उपदेश; त्यानें आपल्या अनुयायांमध्यें लष्करी तेज उत्पन्न केलें; पान ६; मुसलमानी धर्माची झपाट्यानें वृद्धि होण्यास सुरवात झाली. महंमदानें मक्काशहरावर स्वारी केली; तें शहर हस्तगत करून घेतलें; त्यानें रोमनसाम्राज्याच्या आशिया खंडांतील प्रदेशांवर अनेक स्वाऱ्या करून कांहीं प्रदेश हस्तगत करून घेतला; पान ७, महंमदानें अरबस्थानांतील ज्यू ऊर्फ यहूदी लोकांस आपला धर्म स्वीकारणें भाग पाडिलें; त्याचा मृत्यू; धर्मप्रसार व राज्यवृद्धि ह्या दोन बाबतींची मुसलमानांनीं सांगड घालून आपला धार्मिक व राजकीय उत्कर्ष करून घेतला; पान ७-९; विजयानगरकर व मराठे, यांच्याही बाबतींत असाच प्रकार घडलेला असून त्यासंबंधीं विवेचन; पान ९-१०; इंग्रजांनीं व्यापार व राजसत्ता या दोन बाबतींची सांगड घालून, व परस्परांना एकमेकांचा आधार व दुजोरा देऊन, हिंदुस्थानांत आपला व्यापार व राजकीय उत्कर्ष करून घेतला, त्यासंबंधीं विवेचन; व इतर व्यापारविषयक हकीकत; पान १०-१६; महंमद पैगंबराच्या मृत्यूनंतर दीडशें वर्षांच्या आंतच मुसलमान लोकांनीं मोठमोठे पराक्रम करून आपला धार्मिक व राजकीय उत्कर्ष करून घेतला, त्यासंबंधीं विवेचन; पान १७; मुसलमानी धर्माची व त्यांतील मूलतत्वांची माहिती; पान १७-२१; महंमदाच्या मृत्यूनंतर अबूबकर, उमर, उस्मान व अली हे चार खलीफा अनुक्रमें गादीवर आले; पान २१-२२; खलीफा अबूबकर याच्या कारकीर्दीत घडलेल्या महत्वाच्या गोष्टी; पान २२-२४; खलीफा उमर याच्या कारकीर्दीची हकीकत; पान -२४; खलीफा उस्मान याची कारकीर्द; पान २५; खलीफा अली याच्या कारकीर्दीचें विवेचन; पान २५-२६; बादशहा बाबर यानें हिंदुस्थानांत मोंगल साम्राज्य स्थापन केलें, त्या काळांत ताबूत करण्याचा प्रचार सुरू झाला, त्यासंबंधीं माहिती; पान २७-२८; इदीच्या सणाचें महत्व, व त्यासंबंधीं माहिती; पान २८; मुआविया यानें अरबी खिलाफत

दमास्कस येथें नेली, पान २८; खलीफा मुआविया याची कारकीर्द; पान २९; अब्दुल मलिक याची कारकीर्द, व त्या काळांत घडलेल्या महत्वाच्या गोष्टी; पान २९-३०; दमास्कस येथील उमईद् वंश नामशेष होतो; अब्दुल आब्बास यानें खलीफाची गादी बगदाद् येथें नेली; उमईद् वंशाची स्पेनमध्यें स्वतंत्र खिलाफत निर्माण झाली; पान ३०-३१; अरबलोकांनीं या काळांत विद्या, वाङ्मय व विजय या बाबतींत केलेली विशेष प्रगती; पान ३१-३२; इजिप्तमधील फातिमईद् वंशाची स्थापना, व नाश या संबंधीं हकीकत; पान ३२; इजिप्तमध्यें अब्बासी वंशाची स्थापना व नाश यासंबंधीं हकीकत; टर्कीचा बादशहा सलीम हा इजिप्त देश जिंकून घेतो; व तेथील अब्बासी वंशाकडून खिलाफतीची गादी, व खलिफाचें पद आपणास प्राप्त करून घेतो; पान ३२-३३; मुसलमानी जगाच्या इतिहासाच्या दृष्टीनें नवव्या शतकाचें महत्व; व त्याचे राजकीय परिणाम यासंबंधीं विवेचन; पान ३३-३५ सामानी वंशाची हकीकत; पान ३५; सेल्जुक व ऑटोमन तुर्कांची हकीकत; पान ३४-४१; मुसलमान लोकांनीं भव्य प्रमाणांत गुलामगिरीची पद्धति प्रचारांत आणिली, त्यासंबंधीं तुलनात्मकदृष्ट्या विवेचन; पान ४१-४४; मुसलमानी धर्म व राज्य यांचा विस्तार होण्याला गुलामसंस्थेचा कसा अतीशय उपयोग झाला, त्यासंबंधीं विवेचन; पान ४४-४६; मोंगल अथवा तार्तार मोंगल यांनीं युरोप व आशियाखंडांत अलौकिक पराक्रम गाजविले, त्यासंबंधीं व चंगीझखाना-संबंधीं हकीकत; पान ४६-४७; चंगीझचा मुलगा ओक्ताई हा गादीवर आल्यावर त्याचा पुतण्या व प्रसिद्ध मोंगल सरदार बातू यानें युरोपखंडावर स्वारी केली; व रशिया हा देश आपल्या हस्तगत करून घेतला; त्यासंबंधीं हकीकत; पान ४७-४८; चंगीझखानाच्या वंशजांची हकीकत; पान ४६-४८; युरोप आणि आशिया खंडाच्या पूर्वकालीन राजकीय परिस्थितीचें, व मुसलमानांच्या हल्ल्यामुळें या दोन्हीं खंडांवर घडून आलेल्या चांगल्या व वाईट परिणामांचें विवेचन; पान ४७-५०; इराणांतील सामानी वंशाची हकीकत; पान ५०; सामानी वंशांतील पांचवा सुलतान अबदुल मलिक याच्या विशेष प्रेमांतील तुर्क गुलाम अलप्तगीन हा गज्नी येथें एक स्वतंत्र राज्य स्थापन करितो; पान ५०-५१; त्याचा मृत्यू; व त्याचा जांवई सबक्तगीन हा गादीवर येतो; पान ५१; तो पंजाबचा राजा जयपाळ याच्याबरोबर युद्ध करून त्याचा पराभव करितो; नीलआब प्रांत सबक्तगीनच्या ताब्यांत जातो; त्या प्रांताचा कारभार पाहण्यास पेशावर येथें आपला एक सरदार ठेवून तो स्वदेशीं परत जातो; त्याचा मृत्यू; पान ५१-५२; सबक्तगीनचा मुलगा इस्मईल हा गादीवर येतो, त्यास महंमूद पदभ्रष्ट करून राज्य बळकावितो; पान ५२; सुलतान महंमूद याच्या कारकीर्दीची हकीकत; पान ५२-५३;

त्याची न्यायप्रियता व आचरण; पान ५३-५४; त्याचा मृत्यू; त्याचा मुलगा महंमद हा गादीवर येतो; त्यास त्याचा भाऊ मसाऊद हा पदभ्रष्ट करून राज्य मिळवितो, त्याची कारकीर्द; पदभ्रष्टता; व महंमदाचें पुन्हां राज्यारोहण; त्याची अल्प कारकीर्द; राज्यकर्त्यांची अदलाबदल; व शेवटीं सुलतान बहिराम यांचें राज्यारोहण; पान ५४-५५ बहिरामगज्नी याच्या कारकीर्दीची हकीकत; सबक्तगीनच्या वंशाचा शेवट; पान ५५-५६ शहाबुद्दीन घोरी याच्या हिंदुस्थानावरील स्वाऱ्या; तो हिंदुस्थानांत बराच प्रदेश हस्तगत करून घेऊन त्या प्रदेशाचा कारभार पाहण्यासाठीं कुतुबुद्दीनऐबक या नांवाच्या आपल्या एका सरदाराची नेमणूक करितो; शहाबुद्दीनचा खून; व त्याचा हिंदुस्थानांतील कारभारी कुतुबुद्दीन हा दिल्ली येथें एक स्वतंत्र राज्याची स्थापना करितो; पान ५७, त्याच्या कारकीर्दीची व त्यानें बांधिलेल्या कुतुबमिनार या प्रचंड इमारतीची हकीकत; त्याचा मृत्यु; त्याचा जांवई शमसुद्दीन अल्तमश हा गादीवर येतो; पान ५७-५८; त्याची कारकीर्द; मृत्यु; त्याचा मुलगा रुकुनुद्दीन हा गादीवर येतो; त्याची पदभ्रष्टता; सुलताना रझिया ही गादीवर येते; तिच्या कारकीर्दीची हकीकत; पान ५८-६०; मिसर देशाचा शेवटचा राज्यकर्ता दिओनिसियस टॉलेमी याची सौंदर्यसंपन्न राणी क्लिओपाट्रा हिची हकीकत; पान ६०-६१; सुलताना रझिया हिचा मृत्यू; राजपुरुषाची अदलाबदल; अल्पमशचा मुलगा नासिरुद्दीन महंमद हा गादीवर येतो; पान ५९-६१; त्याची कारकीर्द; मृत्यू पान ६१-६३; त्याचा वजीर गियासुद्दीन बल्बन याचें राज्यारोहण; व त्याच्या कारकीर्दींत घडलेल्या महत्वाच्या गोष्टी; पान ६३-६५; त्याचा, आपला मुलगा महंमूद यास उपदेश; ६५-६९; तो महंमुद यास मोंगल लोकांवर पाठवितो; पान ६५; गियासुद्दीन बल्बनचा स्वभाव, राहणी, व वागणूक, यासंबंधीं विवेचन; पान ६७-७०; मोंगला बरोबरील चकमकींत महंमूदाचा मृत्यु; त्यामुळें गियासुद्दीनच्या मनास धक्का बसतो; त्याचा मृत्यू; पान ७०; फारशी भाषेंतील लोकोत्तर व अती प्रसिद्ध कवी सेखसादी याची माहिती; पान ६९-७०; कैकोबाद याचें राज्यारोहण; त्याची विषयी व व्यसनी वागणूक; जलालुद्दीन फिरोज खिलजी हा त्याचा वध करून त्या घराण्याचा शेवट व आपल्या घराण्याची स्थापना करितो; त्याची कारकीर्द; पान ७०-७१; मुसलमानांचा पहिल्यानेंच दक्षिणेंत प्रवेश; अल्लाउद्दीनची दक्षिणेवर स्वारी; पान ७१-७२; तो दक्षिण प्रांतीं दिग्विजय मिळवितो; व परत आल्यावर आपला काका जलालुद्दीन यास कपटानें ठार मारून राज्याधिकारी होतो; पान ७२-७३; त्याची कारकीर्द, व स्वभाव वर्णन पान ७४-७६; मृत्यू; त्याचा मुलगा मुबारिक हा गादीवर येतो; त्याचें निंद्य आचरण खुस्रु त्यास ठार मारितो; राज्य बळकावितो; त्याचीं नीच कृत्यें; त्याचा शेवट, तघ्लक

घराण्याची स्थापना; पान ७६–७७; ग्यासुद्दीन तघ्लक याची कारकीर्द पान ७७–७९; मृत्यू; महंमद याची कारकीर्द; पान ७९–८१; त्याच्या अचाट कल्पना, तो दौलताबादचा प्रचंड किल्ला बांधितो; पान ८०–८१; त्याचा मृत्यू; फिरोजशहाची कारकीर्द; पान ८१–८७; त्याची हिंदूधर्मावरील वक्रदृष्टी; पान ८१–८२; त्यानें केलेलीं लोकोपयोगीं कृत्यें; पान ८२–८५; त्यानें "फिरोजाबाद" यानांवाचें शहर वसविलें; "काली मशीद" यानांवाची इमारत बांधिली; पान ८५–८७; त्यानें केलेलीं इतर कृत्यें; पान ८६–८७; त्याचा मृत्यू; राज्यकर्त्यांची अदलाबदल; महंमद गादीवर येतो; पान ८७–८८; तैमूरलंगाची हकीकत; व त्याच्या हिंदुस्थानावरील स्वारीचें वर्णन; पान ८८–९६; तो स्वदेशीं परत जातो; त्याचा मृत्यू; पान ९५–९६; तैमूरचें वैभव व शिस्त याविषयीं माहिती; व त्याच्यासंबधीं स्पेनचा वकील क्लॉव्हिगो याचा अभिप्राय; पान ९६–९८; तैमूरलंगाची योग्यता; पान ९८–९९; मृत्यू; पान ९९; तैमूरलंगानें राज्यव्यवस्थेचे केलेले बारा नियम; पान ९९–१०३; त्याच्या राज्याची तत्कालीन युरोपियन राज्यांशीं तुलना; पान १०३–१०५; तैमूरलंग हिंदुस्थानांतून परत गेल्यावर माजलेली अंदाधुंदी; राज्यकर्ता महंमूद याची पुन्हां गादीवर स्थापना; त्याचा मृत्यू; तुघ्लक घराण्याचा शेवट; पान १०५–१०६; लोदी घराण्याची स्थापना; दौलतखान लोदी याची कारकीर्द; पान १०६; मुबारिक व महंमद यांची कारकीर्द; पान १०६–१०७; बहिलोल लोदी हा दिल्ली येथील राज्यकर्ता होतो; पान १०७; त्याचें पूर्ववृत्त, पान १०७–१०८; त्याचा मृत्यू शिकंदर गादीवर येतो; पान १०८; शिकंदरची कारकीर्द; व त्याचा धार्मिक दुराग्रह; पान १०८–१०९; त्याची न्यायप्रीयता; पान १०९–११०; मृत्यू; त्याचा मुलगा इब्राहीम हा राज्यपदारूढ होतो; त्याच्या कारकीर्दीतील भानगडी; बाबरची हिंदुस्थानावर स्वारी; पान १११; दिल्ली येथें मोंगल राष्ट्राची स्थापना; बाबर राज्यावर बसतो; पान १११–११२, गज्नीच्या महंमदापासून मोंगल साम्राज्याची स्थापना होईपर्यंतच्या हिंदुस्थानांतील राजकीय स्थितीचें विवेचन; पान ११२–११४; हिंदुस्थानांतील मोंगल साम्राज्याच्या माहितीचा प्रारंभ; बाबरच्या पूर्वजांची हकीकत; पान ११५; बाबर याची, हिंदुस्थानांत राज्यसंस्थापना करीपर्यंतची हकीकत; पान ११६–१२१; त्याचें संगराण्याबरोबर युद्ध, व त्यांत त्यास मिळालेला विजय; पान १२२–१२३; हुमायूनचा प्रतिस्पर्धी शीरशहासूर याचा पूर्ववृत्तांत; पान १२३–१२५; बाबरचा मृत्यू; व त्याच्या परोपकारी व प्रेमळ स्वभावाचें वर्णन; १२५–१२६; त्याची न्यायप्रीयता; पान १२६–१२७; बाबरचा हुमायून यास मौल्यवान उपदेश; पान १२८–१२९; बाबरची योग्यता; पान १३०–१३२; हुमायून गादीवर येतो; पान १३२; हुमायूनच्या चरित्रांतील

वैशिष्य; व त्याची उज्वल पितृभक्ति; पान १३२-१३३; त्याचें शीरशहा सूर बरोबरील युद्ध; व त्यांत शीरशहाचा पराभव; १३३-१३४ हुमायूनचा फाजील दयाळू स्वभाव; शीरशहाला पूर्वीप्रमाणेंच बलिष्ट व भीतिप्रद स्थितींत पुन्हां ठेवण्यांत हुमायूनची झालेली राजकीयदृष्ट्या असमंजस चूक; व तिचे भावी परिणाम; पान १३३-१३४; गुजराथचा राज्यकर्ता बहादूरशहा याजबरोबर युद्ध; बहादूरशहाचा पराभव होतो; गुजराथ प्रांत हुमायूनच्या ताब्यांत येतो; पान १३४-१३५; इतक्यांस शीरशहाचें बंड होतें; शीरशहाचा घातकी स्वभाव; आणि त्याचे भावी परिणाम; पान १३६; तो हुमायूनचा बक्सार नजीक पराभव करितो; पान १३७; हुमायूनवरील संकटपरंपरा पान १३७-१३९; शीरशहाचा प्राणनल्लुबरोबरील विश्वासघात; तो कालिंजरच्या किल्लयास वेढा घालतो; त्याचा मृत्यू; पान १४०-१४१; त्याचें स्वभाववर्णन; पान १४१-१४३; खानदेश मधील खाजानाईकाची हकीकत; पान १४३-१४७; सलीमशहाचें राज्यारोहण; पान १४४; त्याचें आपला भाऊ अदीलखान याच्याशीं विश्वासघाताचें वर्तन; व त्याचा परिणाम; पान १४६-१४८; त्यानें सलीमगड हा किल्ला बांधिला; पान १४८; त्याचा मृत्यू; महंमदशहा गादीवर येतो; पान १४९; हिंदुप्रधान हिमू याची हकीकत; पान १४९; हुमायूनच्या पदभ्रष्टते नंतरची हकीकत; हमीदाबानूशीं त्याचें लग्न होतें; पान १५०-१५२ हुमायूनची विवन्नावस्था; अकबराचा जन्म; पान १५२; हुमायूनचा हिंदुस्थानाबाहेरील वनवास; पास १५३-१५६; तो पुन्हां राज्यारूढ होतो; मृत्यू; पान १५६-१५८; हुमायूनची राणा संग याच्या घराण्याबद्दलची पूज्य बुद्धी; पान १५८-१५९; हुमायूनचें स्वभाववर्णन, व संतती; पान १५९-१६०; त्यानें बांधिलेल्या पुराणाकिल्लयाची हकीकत; पान १६०-१६१; हुमायूनविषयीं आर्स्किनचा अभिप्राय; पान १६१--१६२; अकबराचें राज्यारोहण; व तत्कालीन राजकीय स्थिती; पान १६२-१६४; अकबराचें हिमूबरोबरील युद्ध, व हिमूचा मृत्यू; पान १६४-१६५; बहरामखानाची हकीकत; पान १६५-१६७; अकबराची दाई महांम अनागा, व तिचा मुलगा आदमखान यांची हकीकत; पान १६७-१६८ आदमखानाची विश्वासघातकी वागणुक, व त्याचा परिणाम; पान १६८-१७०; राणी रूपमती व बाझबहादूर यांची हकीकत; पान १७०-१७१; अकबर, रजपूत व बुंदेले राज्यांवर आपलें वर्चस्व स्थापन करितो; पान १७१-१७२; राणी दुर्गावती हिची हकीकत; पान १७२-१७४; अकबर, गुजराथ, बंगाल, बिहार, ओढया व सिंध, हे प्रांत सर करितो; पान १७४-१७६; दक्षिण प्रांतावर स्वारी; पान १७६-१७७; अकबरास भाऊ, मामा व मेव्हणा यांच्याकडून त्रास होतो; पान १७७-१७९; अकबराची शोकपरंपरा; पान १८०; जहांगीरचें दुर्वर्तन; पान १८१;

अबुल्फज्ल याचा मृत्यू; पान १८१-१८६; अकबराचें धार्मिकसहिष्णुत्व व सुधारणा; पान १८६-१८८; अकबराचा मृत्यू; पान १८६; जहांगीरचें राज्यारोहण; पान १८८-१८९; त्याचे राज्यकारभाराच्या बाबतींतील बारा नियम; पान १९०-१९२; जहांगीरच्या दरबारीं इंग्रज वकील सर टामस रो यांचें आगमन; पान १९३; जहांगीर बादशाहाची न्यायप्रीयता; पान १९३-१९५; जहांगीरचा मृत्यू; शहाजहानचें राज्यरोहण; पान १९६; त्याचीं धार्मिक मतें; पान १९७-१९८; शहाजहान बादशहाच्या वैभवाचें वर्णन; पान १९९-२००; टॅव्हर्नियर यानें मयूरसिंहासनाचें केलेलें वर्णन; पान २००-२०३; हिंदुस्थानांतील स्त्रियांची माहिती; पान २०३-२०५; शहाजहानच्या प्रेमळ स्वभावाचें, त्याच्या मुलीच्या बाबतींतील उदाहरण; पान २०४-२०८; शहाजहानची न्यायप्रीयता पान २०८; शहाजहानच्या कारकीर्दीतील इमारत कामें; पान २०८-२११; शहाजहानचा मृत्यू; औरंगझेबाचें राज्यारोहण; पान २११; त्याचें स्वभाव वर्णन व योग्यता; पान २१२-२१६; त्याची विध्वंसक राज्यपद्धति; पान २१७-२१९; त्याची राहणी; पान २२०-२२१; मोंगल बादशाहींत स्थानिक सुभेदारांवरील नियंत्रणाचीं उदाहरणें; पान २२२-२२६; मोंगली बादशाहीचें स्वरूप, संपत्तिकस्थिति, तुलना, व निष्कर्ष; पान २२७-२३८.

# भाग दुसरा.

# प्रास्ताविक माहिती.

( मागील भागावरून पुढें चालू. )

मागील भागांत प्राचीन कालापासून विजयानगरच्या हिंदू राज घराण्यांच्या अखेरीपर्यंतची हकीकत देऊन त्यांत मुसलमान लोकांच्या हिंदुस्थान देशावरील स्वाऱ्यांचा, व त्यांनी अनेक हिंदू राज्यांना नामशेष करून त्याठिकाणीं आपलें वर्चस्व प्रस्थापित केल्याचा, उल्लेख आलेला आहे. तथापि हिंदुस्थानांतील दक्षिण महाराष्ट्रांतील विजयानगरचें राज्य आणि महाराष्ट्रांतील मराठ्यांचें राज्य, यांच्यामधील "मुसलमानी राज्यांचा काळ" हा एक सळंग साखळी जोडणारा मध्यवर्ती दुवा आहे; त्यामुळें,-मोडकरकृत दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांचा इतिहास भाग तिसरा, याच्या प्रस्तावनेंत ह्मटल्या प्रमाणें-"दक्षिणेचा या काळाचा इतिहास फार महत्वाचा आहे; उत्तरहिंदुस्थानांत अटकेपासून किंबहुना काबूलपासून तों तहत कलकत्त्या पर्यंत मोंगलबादशाहांचा अंमल बसला होता; तसेंच राजपुताना, माळवा वगैरे सर्व मध्यहिंदुस्थान, गुजराथ इत्यादि मुलखांतही मोंगल बादशाहांचा करडा अंमल बसला होता. दक्षिणेंत स्वतंत्र अशा दुसऱ्या मुसलमान राजांचा अंमल होता; ह्मणून त्यांवरही मोंगल बादशाहांनीं छाप बसवून त्यांजवर प्रथम खंडणी बसविली व मागाहून एका मागून एक अशीं तीं राज्यें खालसा करण्यास मोंगलांच्या प्रचंड सेना दक्षिणेंत येऊं लागल्या. ज्यावेळीं मोंगल बादशाही औरंगजेब बादशाहाच्या काळांत वैभवाच्या व सार्वभौमत्वाच्या कळसास पोहोंचली होती त्यावेळीं खुद्द औरंगजेबाच्या हयातींतच मोंगलांच्या शक्तिस न जुमानितां मराठ्यांनीं दक्षिणेंत मराठी राज्याची स्थापना केली, याचें आश्चर्य वाटल्यावांचून कधींही रहात नाहीं; आणि मराठ्यांनां एकाएकीं इतका जोर व उत्साह कशानें आला, व याचीं कारणें काय असावीं, हे विचार सहजीं मनांत आल्यावांचून रहात नाहींत. शिवाजी सारखा जरी महागुणवान्, व प्रतापी पुरुष निपजला, तरी असें अचाट कार्य सिद्धीस जाण्यास अनुकूल गोष्टी असल्याशिवाय त्याच्या गुणाचें, व प्रतापाचें चीज कधींही झालें नसतें; ह्मणून मराठ्यांना अनुकूळ अशा गोष्टी कसकशा घडत गेल्या,-व त्यांचा फायदा मराठ्यांनां कसा मिळाला-हें दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांच्या इतिहासावरून समजून येतें.

दक्षिणेंत मुसलमानांचा अंमल स्थापित झाल्यापासून हबशी, इराणी, मोंगल, अफगाण वगैरे अनेक जातीचे मुसलमान परदेशांतून या राज्यांत येत व त्यांनां ते राजे आपल्या फौजेंत नोकरीस ठेवीत; तरी दक्षिणेकडील मराठेलोकांस आपल्या फौजेंत नोकरीस ठेविल्याशिवाय त्यांचें चालत नसे; कारण त्यांचा चपलपणा, साधेपणा, व काटकपणा त्यांनां फार फायदेशीर होत असे. त्यामुळें त्यांच्या फौजेंत मराठ्यांची जास्त जास्त भरती होत गेली; व पुढें जेव्हां मुसलमान राजांमध्येंच आपापसांत एकसारख्या लढाया सुरू झाल्या तेव्हां तर त्यांच्या सैन्यांत मराठ्यांची अतीशयच भरती होत चालली; या मुसलमान राजांच्या पदरीं जे " बर्गीस्वार " ह्मणून असत, ते तर बहुतेक मराठे हेच असत; आणि अल्पकाळांत मोठमोठ्या दौडी करून एकाएकीं शत्रूवर छापे घालण्यास, त्यांची रसद बंद करण्यास, कही कबाड मारण्यास ( ह्मणजे शत्रूचा रसद लुटून आणण्यास ) त्यांचा फारच उपयोग होत असे.

अशा रीतीनें दक्षिणेंतील मराठे व मावळे, यांना या मुसलमानी राजांच्या लष्करांत नोकऱ्या मिळत गेल्यानें त्यांनां आयतीच युद्धकला येत जाऊन ते दिवसेंदिवस युद्धनिपुण बनत चालले; पुढें जसजसें या राजांचें राज्य वाढत चाललें तसतसे ते व त्याचे जातभाई ऐषारामी बनत जाऊन, मराठे व मावळे लोकांवर युद्धाचें काम अधिक अधिक पडत चाललें; ऐषारामाचें सहकारी आलस्य वाढत जाऊन वजीर, सुभेदार, वगैरे मोठे मुत्सद्दीपणाचे व महत्वाचे अधिकारही मराठ्यांनां देण्याचा कित्येक ठिकाणीं प्रसंग येऊं लागला; व त्यामुळें मराठ्यांच्या आंगीं स्वाभाविकरित्याच राज्य चालविण्याची पात्रता दिवसेंदिवस वाढत गेली; बाकी गोष्टी मुसलमान कारकीर्दीनें स्वाभाविकच अनुकूल केल्या होत्या. गोब्राह्मणाचा वध व छळ करणें, हिंदू लोकांनां बाटविणें, त्यांचीं देवळें भ्रष्ट करणें व पाडणें वगैरे गोष्टी सतत चालल्यामुळें हिंदुलोकांचीं मनें दूषित होऊन कोणी पुढारी मिळाल्यास मुसलमानांचा प्रतिकार करण्याची त्यांची तयारी होती; त्यामुळें जेव्हां जेव्हां मुसलमान राजांच्या दरबारांत ऐषाराम व त्याबरोबरच आळस वाढत गेला त्यावेळीं एखाद्या घरभेद्या प्रमाणें, मराठ्यांना त्यांची खरी स्थिती समजली; आणि अखेर शहाजहान बादशहाची फौज व त्याचे मोठमोठे सरदार यांनीं अहंमदनगर खालसा करून त्या ठिकाणी मोंगली अंमल स्थापिला असतां शिवाजीचा बाप शहाजी यानें स्वपराक्रमानें मोंगलाकडून कांहीं प्रदेश जिंकून घेऊन नवीन राजा स्थापन करून कांहीं दिवस निजामशाहीची पुन्हां स्थापना केली, तेव्हां त्याचा गुणवान, धाडसी व शूर पुत्र जो शिवाजी त्यास धीर येऊन या सर्व स्थितीचा सदुपयोग करून घ्यावा, व स्वराज्याची स्थापना करावी, व ती स्थापना करण्यास लोकांस ईर्षा व स्फुरण आणण्यास गोब्राह्मणाचें रक्षण करणें व हिंदूधर्माची स्थापना करणें, हाच उद्देश आहे असें प्रसिद्ध

करावें, असें शिवाजी सारख्या पुरुषाच्या मनांत यावें हें साहजीक होतें; शिवाय भावीक व भोळ्या हिंदूंना भरवसा वाटावा ह्मणून रामदासासारख्या राजकारणी साधूची व श्रीभवानी देवीचीही आपणास आज्ञा झाली आहे, असेंही त्यानें प्रसिद्ध केलें; याप्रमाणें युद्धनिपुण झालेल्या मराठ्यांस पुढें करून व राजनीतिनिपुण ब्राह्मणमुत्सद्यांस कारभारकरण्यास घेऊन शिवाजीनें स्वराज्याच्या स्थापनेचा पाया घातला; व पुढें जरी अवरंगझेबानें स्वतः दक्षिणेंत येऊन शिवाजीचा वडील मुलगा संभाजी यास धरून सुळीं दिलें तरी रामचंद्रपंत आमात्य यानें पुढें सरून संताजी, धनाजी सारख्या मराठ्या वीरांस कसलेल्या व अनुभवी मोंगली फौजेवर सोडून शिवाजीनें जन्मास आणिलेला राज्यवृक्ष वाढीस लाविला; ह्मणजे जर मराठ्यांना व मावळ्यांना मुसलमान राज्यांच्या लष्करांत व दरबारांत युद्धनैपुण्य व मुत्सद्दी-पणा येऊन, त्यांना योग्यता आली नसती तर, तशा विनयोग्यतेच्या लोकांच्या साह्यानें, शिवाजी सारख्या वीरास, इतर गोष्टी अनुकूल असल्या तरी, कसलेल्या मोंगली सैन्याबरोबर टक्कर मारितां आली नसती.....सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, मराठ्याचा उत्कर्ष कसा झाला, व तो होण्यास अनुकूल अशा कोणत्या गोष्टी घडून आल्या, हें समजण्यास दक्षिणेचा त्याकाळचा मुसलमानी कारकीर्दीचा इतिहास फार उपयोगी पडतो; परंतु तो दक्षिणेपुरताच असल्यामुळें मुसलमानी जगाची माहिती मिळून त्यांची एकंदर राजकीय परिस्थिती लक्ष्यांत येण्यास तो अपूर्ण माहितीचा ठरतो; ह्मणून मुसलमान लोक, त्यांचा धर्म, त्यांची राजकीय स्थिती, हिंदुस्थानांतील, व मुसलमानी काळांतील हिंदू लोकांची राजकीय परिस्थिती, मुसलमान राज्यकर्त्यांमधील गुणदोष, त्यांच्यामधील निरनिराळे धार्मिक मतभेद, व त्यामुळें उत्पन्न झालेली भयंकर घोटाळ्याची व धोक्याची राजकीय परिस्थिती, त्या राज्यांत मराठ्यांना प्राप्त होत गेलेलें महत्व वगैरे माहिती अनुषांगिक हकीकतीसह पहिल्यानें थोडक्यांत ग्रथित केली आहे, व त्यावरून तत्कालीन एकंदर राजकीय परिस्थितीचें निरिक्षण करितां येऊन मराठ्याच्या राजकीय उत्कर्षाची पूर्वस्थिती पूर्णपणें लक्षांत येईल, अशी आशा आहे.

इसवी सनाच्या पांचव्या शतकांत ह्मणजे इ. सन ४१० मध्यें रोमची पुरातन प्रसिद्ध व बलाढ्य बादशाही नामशेष झाली. त्यानंतर तिची एक शाखा "पूर्वरोमन बादशाही" या संज्ञेनें पंधराव्या शतकापर्यंत युरोपांत कान्स्टांटिनोपल येथें राज्य करीत होती. याच रोमन बादशाहीस मुसलमान लोकांनीं नामशेष करून युरोपांतील तुर्कस्थान अथवा टर्कीमध्यें आपलें राज्य स्थापन केलें.

मुसलमानी धर्माचा संस्थापक महंमद उर्फ महंमद पैगंबर ( देवाचा प्रेषित ) या नांवाचा एक महापुरूष असून तो अरबस्थानांतील मक्का या शहरांत कुरेश अथवा

कोरेश या जातींत हष्मी कुळांत इ. सन ५७० या वर्षीं ( कांहीं ठिकाणीं इ. सन ५६९ यावर्षीं असा उलेख आढळतो. ) जन्मास आला; याच्या आजाचें नांव अब्दुल मुतालेब असें होतें, व तो मोठा प्रसिद्ध व दानशूर व्यापारी ह्मणून त्याची अतिशय कीर्ती असून एकदां दुष्काळाच्या वेळीं आपल्या पदरचें पुष्कळ धान्य व संपत्ति खर्च करून हजारों दुष्काळ पीडितांचे प्राण त्यानें वांचविले होते; अब्दुल मुतालेब हा ११० वर्षांचा होऊन मृत्यु पावला; त्यास सहा मुलीं आणि तेरा मुलगे अशीं एकंदर एकूणीस मुलें होतीं; त्यांमध्यें अबदुल्ला या नांवाचा एक सुंदर मुलगा असून त्याच्यावर मुतालेब याची अतीशय प्रीती होती; या मुलाचें अमीना या नावांच्या एका मुलीशीं लग्न झालें, व या स्त्रीपुरुषांच्या पोटीं महंमद पैगंबर हा जन्मास आला. महंमद हा लहान असतांनाच त्याचे आईबाप मृत्यू पावले, त्यामुळें त्याचा चुलता अबू तालीब (ऊर्फ अबूतलेब) यानें त्याचें पालनपोषण केलें. अरबस्थान हा देश अतीशय रुक्ष, रेताड आणि नापीक असल्यामुळें तेथील लोक मेंढ्यांचे व गुरांचे कळप घेऊन ते चारण्याकरितां चोहोंकडे भटकत फिरत असत, अथवा उंटांचीं कारवानें घेऊन परदेशां बरोबर व्यापार करीत असत; त्याप्रमाणेंच महंमद हा लहानपणीं मेंढ्यांचे कळप चारीत होता; आणि तो मोठा झाल्यावर त्यानें इतरांप्रमाणें उंटांचीं कारवानें घेऊन व्यापार करण्यास सुरवात केली होती; त्यानंतर व्यापारा निमित्त मक्का, दमास्कस आणि सीरिया प्रांतांत त्यानें अनेक खेपा केल्या. त्यास फारशी भाषेचें ज्ञान नव्हतें; तथापि त्याची कल्पना व आकलनशक्ति, आणि दूरदृष्टी अतीशय प्रखर असून तो अलौकिक बुद्धिवान होता. शिवाय लहानपणापासूनच त्याची बुद्धी धर्ममार्गाकडे वळलेली असून तो मूर्तिपूजेच्या विरुद्ध होता. महंमद हा आपला नवीन धर्म स्थापन करीपर्यंत आरब लोक मूर्तिपूजक होते; व ते सूर्य, चंद्र, तारे वगैरेचें भजन पूजन करीत असून, आणि त्यांचें मक्का येथें "काबा" या नांवाचें एक प्रसिद्ध व पुरातन मंदिर असून त्यांत निरनिराळ्या व अनेक देवतांच्या मिळून तीनशें मूर्ती ठेवलेल्या होत्या; व दूरदूरच्या प्रदेशांतून या मंदिराचें दर्शन घेण्याकरितां अनेक यात्रेकरू त्याठिकाणीं नेहमीं येत होते, महंमदानें आपल्या वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षीं खदीजा या नांवाच्या एका संपत्तिमान विधवा स्त्रीशीं लग्न केलें; त्यामुळें त्यास पुष्कळ संपत्ति मिळाली. ही बाई त्याच्यापेक्षां पंधरा वर्षांनीं मोठी होती. लग्न झाल्यानंतरही महंमदानें कांहीं काळ व्यापार केला; परंतु लहानपणापासून त्याला धार्मिक याबतींविषयीं व अनेक धर्मांविषयीं विचार करण्याची संवय लागली होती; व प्रवासांत निरनिराळ्या लोकांविषयीं त्यास माहिती झाल्यामुळें त्याचें मन विशेषच उत्सुकतेनें धार्मिक-

विषयांकडे वळलें होतें. अरबलोक मूर्तिपूजा करितात, ही गोष्ट त्यास पसंत नसल्यामुळें त्याला त्याबद्दल अतिशय वाईट वाटलें, आणि आपण एक नवाच धर्म स्थापन करून लोकांस सत्य भक्तिमार्ग दाखविला पाहिजे, असा त्यानें निश्चय केला; आपणांस परमेश्वरी स्फूर्ती झाली आहे असें ह्मणून त्यानें आपल्या वयाच्या ४० व्या वर्षीं एकेश्वरी मताचा एक निराळाच धर्म स्थापन केला, व आपली बायको खदीजा, चुलतभाऊ ह्मणजे अबू तालीब याचा मुलगा अल्ली व जांवई या तिघांनीं त्यानें आपल्या या नूतन धर्माची पहिल्यानें दिक्षा दिली; व इतरांनाही तो तसाच धर्मोपदेश करूं लागला. त्यानें लोकांस असें सांगितलें कीं, मी आतां जो ईश्वरप्रणित "कुराण" या नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध करीत आहे, तो परमेश्वरानें मला गाब्रियल या नांवाच्या एका देवदुताच्या द्वारें दिलेला आहे. व हें खरें धर्मशास्त्र असून त्याप्रमाणें लोकांनीं आचरण करावें, व त्यांनां तें करण्यास लावावें, असा परमेश्वरानें मला हुकूम दिलेला आहे; अशा रीतानें आपल्या वयाच्या ४० व्या वर्षीं महंमद हा आपणास पैगंबर-ह्मणजे देवाचा प्रेषित-असें ह्मणवून घेऊं लागला, व त्यास त्यानंतर आपली बायको, चुलत भाऊ व जांवई यांशिवाय आणखी पांच शिष्य या नवीन धर्मांत येऊन मिळाले. तथापि सर्व-साधारणतः आरब लोकांस व "काबा" मंदिराचे रक्षक असलेल्या त्याच्याच कुरेश जातांस महंमदाचा हा नवीन धर्म मान्य नव्हता; त्यामुळें त्यांनीं त्याचा छळ करण्यास प्रारंभ केला; इतक्यांतच त्याच्या वयाच्या पन्नासाव्या वर्षी त्याची बायको खदीजा ही ही मृत्यू पावली. त्यामुळें तो उदास झाला, व मक्का शहराचा त्याग करून तेथून अजमासें अडीचशें मैलांवर असलेल्या मदिना या नांवाच्या शहरीं जाऊन तेथें वास्तव्य करावें, असा त्यानें विचार केला, व त्याप्रमाणें तो मक्का येथून तिकडे पळून गेला. त्यावेळीं अबूबकर या नांवाचा एकटाच शिष्य काय तो त्याच्या बरोबर होता. हा अबू-बकरही मोठा हुषार असून त्यानेंच पुढें कुराणांतील निरनिराळ्या वेळीं प्रसिद्ध झालेल्या अध्यायांचें एकीकरण केलें; महंमद हा मक्का सोडून पळाला, असें त्याच्या विरुद्ध असलेल्या मंडळीस कळल्यावर कित्येक लोकांनीं त्यास ठार मारण्याकरितां त्याच्या पाठलागावर मारेकरी पाठविले; परंतु त्या सर्वांची नजर चूकवून तो मोठ्या कष्टानें अबू बकरसह मदिना येथें इ. सन ६२२ मध्यें ता. १५ जुलई रोजीं आपल्या वयाच्या ५३ व्या वर्षीं सुरक्षितपणें येऊन पोहोंचला. या पलायनास अरबी भाषेंत "हिजरा" असें ह्मणतात; व त्यावरूनच अरबी अथवा महंमदानें चालू केलेल्या सनाला "हिजरी सन" असें ह्मणत असून याच कालापासून त्याची गणना करण्यास सुरवात झाली आहे.

महंमदाचें असें ह्मणणें होतें कीं, देव हा एकच आहे; आपआपसांत परस्परांशीं युद्ध करणें, व मूर्तीची पूजा करणें, या गोष्टी निषिद्ध आहेत; या आपल्या धर्मतत्वांचा त्यानें मादिना येथें उपदेश करण्यास सुरवात केली, आणि तीन वर्षांतच त्याठिकाणीं त्याच्या सभोंवतीं पुष्कळच शिष्यसमुदाय जमा झाला. महमंद मक्का येथून स्थानत्याग करून मादिना येथें गेला, तथापि मक्केंतील लोकांनीं त्याठिकाणीं जाऊनही त्याचा छळ चालू ठेविला होता; त्यामुळें त्यास स्वतःचा बचाव, व स्वस्थापित धर्माचें संरक्षण करण्याकरितां हातांत शस्त्र घेणें भाग पडलें; त्यानंतर त्यानें असा परमेश्वरी हुकूम प्रसिद्ध केला कीं, आजपर्यंत शांततेनें व नम्रपणानें या नवीन धर्माचा लोकांनां उपदेश करण्यांत आला; परंतु पूर्व दुराग्रहामुळें त्यांनीं त्याचा स्वीकार केला नाहीं; ह्मणून यापुढें मी प्रस्थापित केलेला धर्म जे लोक स्वीकारणार नाहींत, त्यांनां शस्त्रानें पादाक्रांत करावें, व आपल्या धर्माची त्या लोकांत वृद्धी करावी. या कामीं यश आल्यास आपल्या धर्माची वृद्धी होऊन शिवाय आपणास संपत्तीचाही लाभ होईल, आणि मृत्यु आल्यास महत्पुण्य घडून आपणास स्वर्गाचा मार्ग मोकळा होईल, * अशा रीतीनें महंमदानें आपल्या अनुयायांमध्यें नवें लष्करी तेज उत्पन्न केलें, व त्यांनां, आणि महंमदाला तरवारीच्या बळावर आपण आपल्या धर्माचा निरनिराळ्या प्रदेशांत व चोहोंकडे प्रसार करूं शकूं, अशी खात्री वाटूं लागली.

महमंद मादिना येथें येऊन राहिल्यानंतर मक्केमधील एक प्रसिद्ध सावकार, व वजनदार मनुष्य, आणि कुराणांतील निरनिराळ्या अध्यायांचें एकीकरण करणारा त्याचा शिष्य अबूबकर याची मुलगी नामें आयेषा हिच्याशीं त्यानें लग्न केलें; त्यानंतर त्याचा शिष्य-समुदाय सारखा वाढत जाऊन त्याच्या सभोंवतीं थोडक्याच काळांत दीड लक्ष मंडळी एकत्र जमा झाली. तेव्हां महंमदानें मादिना येथील बेबंदशाही मोडून सुव्यवस्था केली

---

* गीतेंत भगवान श्रीकृष्णानी ( सांख्य योग; अध्याय दुसरा श्लोक ३७ पहा; ) अर्जुनाला युद्धास उद्युक्त करितांना अशाच आशयाचा उपदेश केला आहे तो येणें प्रमाणें:-

**हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ॥**
**तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ॥**

**अर्थः**—युद्धांत मारला गेलास तर तुला स्वर्ग प्राप्ति होईल, व यशस्वी झालास तर पृथ्वीचें राज्य मिळेल—ह्मणजे जय अथवा पराजय, यांतील कांहींही घडून आलें तरी तुला लाभच प्राप्त होणार आहे, आणि जयाविषयीं जरी खात्री नसली तरी लाभाविषयीं तिळमात्रही संशय नाहीं—ह्मणून हे अर्जुना, ( शत्रूस मारीन किंवा मरेन असा ) मनाचा निश्चय करून युद्ध करण्यास तयार हो.

नवीन कायदे घडविले, त्याठिकाणीं तो राज्यकारभार करूं लागला; व आपल्या सैन्यास आसपासच्या प्रदेशांवर स्वाऱ्या करण्यास पाठवून तो लूट मिळवूं लागला. त्यावेळीं "युद्धांत मिळविलेली लूट सर्वांनीं सारखी वांटून घ्यावी," असा परमेश्वरी हुकूम आहे, असें त्यानें प्रसिद्ध केलें; त्यामुळें विजयाबरोबरच अनायासें संपत्तीचाही फायदा मिळून शिवाय धर्मवृद्धिही होण्याची आशा व बहुतेक खात्री असल्यानें महंमदाचे अनुयायी मोठ्या उत्सुकतेनें व हुरूपानें युद्धें करूं लागले, व त्यामुळें महंमदाचा आत्मविश्वास व त्याचें सामर्थ्य इतकें वाढलें कीं, लवकरच त्यानें आसपासच्या राज्यकर्त्यांनां आपला धर्म स्वीकारण्यास सक्तीनें भाग पाडिलें आणि इराणचा बादशहा खुश्रू दुसरा, कान्स्टांटिनोपल येथील बादशहा हेराक्लिअस, इजिप्तचा राजा मोकाकाज आणि इथिओपियाचा राजा, वगैरे मंडळीकडे आपले वकील पाठवुन आपण संस्थापित केलेला धर्म स्वीकारण्या विषयीं त्यांना विनंती केली; तेव्हां त्यांपैकीं इराण देशाशिवायच्या इतर राज्यकर्त्यांनीं महंमदाच्या पत्रांचा योग्य आदर केला परंतु इराणचा बादशहा खुश्रू ( ऊर्फ दुसरा खुशरू परव्हीज ) यानें त्याच्या पत्राचा अनादर केला इतकेंच नव्हे तर त्यानें तें पत्र फाडून टाकिलें; त्यामुळें महंमदास अतीशय राग आला, आणि "इराणच्या ह्या उन्मत्त बादशहानें जसे माझ्या पत्राचे तुकडे तुकडे उडविले, त्याप्रमाणेंच माझे धर्माभिमानी व शूर अनुयायी त्याच्या राज्याचे तुकडे तुकडे करून टाकितील" असे त्यानें उद्‌गार काढले. महंमदाचे हे उद्‌गार त्याच्या मृत्यूनंतर शंभर वर्षांनीं खरे झाले, आणि मुसलमानांनीं तो देश जिंकून आपल्या ताब्यांत घेतला.

महंमद हा मदीना येथील कारभार पाहूं लागून त्या ठिकाणीं त्याचें वर्चस्व पूर्णपणें प्रस्थापित झाल्यानंतर त्यानें एक मोठें सैन्य तयार केलें, आणि मक्का शहरावर स्वारी करून तें शहर त्यानें आपल्या हस्तगत करून घेतलें. "काबा" मंदिरांतील सर्व मूर्तींचा विध्वंस उडविला, व त्याच ठिकाणीं त्यानें आपल्या नूतन धर्माची प्रार्थना सुरू केली. या काळापासून काबा हें ठिकाण मुसलमान जनतेचें श्रेष्ठ प्रार्थना मंदीर, आणि जगांतील मुसलमान यात्रेकरूंचें श्रेष्ठ पवित्र स्थान बनलें. याकाळांत अरबस्थानच्या आजूबाजूच्या प्रदेशांत खिस्ति धर्मास ग्लानी आलेली होती, आणि त्यांतील राजकीय परिस्थितिही बरीच घोटाळ्याची व अंदाधुंदीची झाली होती. ही संधी साधून महंमदानें आसपासच्या प्रदेशांवर आपलें वर्चस्व स्थापन केलें व आपल्या शूर सैन्यासह रोमन साम्राज्याच्या ताब्यांतील आशिया खंडांतील प्रदेशांवर अनेक स्वाऱ्या करून त्या बादशाहतीच्या ताब्यांतील कित्येक प्रदेशही त्यानें हस्तगत करून आपल्या अमलाखालीं आणिले; त्याप्रमाणेंच अरबस्थानामध्यें या कालांत कांहीं यहूदी लोक रहात असत, त्यांना महंमदानें इ० सन

६२७ मध्यें आपला धर्म स्वीकारणें भाग पाडिलें; आणि इ० सन ६२९ पासून इ० सन ६३२ पर्यंतच्या काळांत सर्व अरबस्थानभर महंमदाच्या या नव्या धर्माचा प्रसार होऊन अरब लोकांच्या इतर देशांवरील मोहिमांनां जोराचें चलन मिळालें; इ० सन ६३२ या वर्षी महंमद हा एका मोहिमेवर गेला असतां त्याची प्रकृती बिघडली, आणि तो इतका आजारी झाला कीं, आतां आपण या दुखण्यांतून जगत नाहीं, अशी त्याची खात्री झाली. तेव्हां त्यानें आपणा बरोबरील मंडळीस आपणासमोर बोलावून घेतलें; त्यांनां आपल्या या नवीन धर्माची वृद्धि करण्याविषयीं आग्रहानें बजाविलें; या कार्यांत ईश्वर तुह्मांस खात्रीनें यशस्वी करील, आणि तुह्मांस वर्चस्व प्राप्त होऊन तुह्मी श्रेष्ठ-पदास पोहोंचाल, असा त्यानें त्यांनां आशीर्वाद दिला; अरबस्थानांत एकही मूर्तिपूजक राहूं देऊं नका, अशी त्यांना ताकीद दिली, आपणा जवळील सर्व संपत्ती गरीब व निराश्रित लोकांनां वांटून टाकिली, सर्व गुलामांना बंध मुक्त केलें, आणि मदिना येथें आपल्या वयाच्या ६३ व्या वर्षी इ० सन ६३२ मध्यें, शुक्रवारीं, आयेशा बिबीच्या महालांत, तिच्या मांडीवर डोकें ठेवून, मोठ्या शांतपणानें तो मृत्यू पावला. त्यानंतर तीन दिवसपर्यंत त्याचें मृत शरीर लोकांनां पाहण्याकरितां जतन करून ठेवण्यांत आलें, व नंतर त्यास, महंमदानें आपल्या जिवंतपणीं बांधिलेल्या मदिना येथील " माशिद उलूबेनी " या ठिकाणीं पुरण्यांत आलें. इ० सन ६३२ नंतर-ह्मणजे मुसलमानी धर्माचा संस्थापक, व जगांतील एक महाशूर अलौकिक बुद्धीमान, व अचाट कर्तृत्ववान असा पराक्रमी पुरुष महंमद पैगंबर हा मृत्यु पावल्यानंतर, त्याच्या अनुयायांनीं या धर्माचा चोहोंकडे अतिशय प्रसार केला, व कांहीं काळ पर्यंत त्यांनीं जगांत निर्विवाद असें आपलें राजकीय वर्चस्व संपादन करून ते श्रेष्ठ सत्ताधीश बनून गेले.

या नवीन मुसलमानी धर्माचें-इस्लाम धर्माचें-संरक्षण व वृद्धि या प्रीत्यर्थ महंमदानें, व त्याच्या अनुयायांनीं जीं अनेक धर्मयुद्धें केलीं त्यांस " जिहाद "-ह्मणजे धर्मयुद्ध अथवा धर्मार्थ युद्ध-असें ह्मणतात. अशा युद्धांत जे मुसलमान मृत्यू पावले त्यांना " शहीद "-ह्मणजे धर्माकरितां प्राण देणारे-असें ह्मणतात. आणि या शहिदांनां स्वर्ग लोकाची प्राप्ती होत असते, असें ते मानितात. महंमद व त्याचे अनुयायी हे युद्धांत पाडाव करून आणिलेल्या लोकांनां होतां होईल तों आपला धर्म स्वीकारिण्यास भाग पाडीत असत; आणि हा धर्म न स्वीकारिणाऱ्या लोकांजवळून दंडाच्यारूपानें " चटी " या नामाचा एक कर, ह्मणजे विवक्षित ठरींव रक्कम घेऊन ते त्यांनां सोडून देत असत. याच पद्धतीस पुढें " जझिया " ( झजिया अथवा जीझिया ) हें नांव प्राप्त झालें. थोडक्यांत ह्मणजे मुसलमान लोकांनीं जे जे प्रदेश जिंकून आपल्या अमलाखालीं आणिले,

त्यांतील सर्व परधर्मीय जितप्रजा, आणि आपला जेता मुसलमानी समाज यांच्यामध्यें भेदभावद्योतक असे कित्येक नवीन नियम निर्बंध प्रचारांत आणिले; उदाहरणार्थ, जिंकलेल्या लोकांनीं मुसलमानी पेहराव करूं नये; त्यांच्याप्रमाणें शस्त्रें धारण करून रस्त्यानें फिरूं नये; घोड्यावर बसतांना उपलंगीच बसावें; खोगीर उपयोगांत आणूं नये व दरवर्षी त्यांनीं कांहीं विवक्षित ठराविक रक्कम " जीझिया " कर ह्मणून देत जावी, वगैरे; या नियम निर्बंधांचें, आपल्या श्रेष्ठ सत्तेचें द्योतक ह्मणून, राजकीय दृष्ट्या जरी समर्थन होण्यासारखें असलें तरीं सुद्धां हे सर्वच नियम जिंकलेल्या प्रजेस कमीपणा आणणारे होते, आणि त्यांतल्यात्यांत 'जीझिया' हा कर तर त्यांनां विशेषच अपमानकारक व मानभंगकारक, आणि ढोबळ भेदभावदर्शक व जाचक असाच होता; आणि मुसलमान, मुसलमानी धर्माचा स्वीकार केलेले, व करणारे नागरिक जन, साधू, फकीर, निराश्रित, व गुलाम वगैरे परिजन, एवढ्यांनाच हा कर कायतो माफ असून, याशिवाय बाकीच्या सर्वांकडून तो सरसकट वसूल करून घेण्यांत येत असे.—ह्मणजे धर्मप्रसार, व राज्यवृद्धी, या दोन बाबतींची मुसलमानांनीं सांगड घालून त्या एकजीव केल्या. या दोन्ही बाबती परस्परांनां आधारभूत राहणाऱ्या, होणाऱ्या व वृद्धी पावणाऱ्या होत्या; त्यामुळें त्या नेहमीच अन्योन्य पोषक होत राहून, मुसलमान लोकांच्या तत्कालिन धार्मिक व राजकीय उत्कर्षास कारणीभूत झालेल्या आहेत. कारण धर्माच्या नांवाखालीं ज्या प्रमाणें त्यांच्या राज्याचा विस्तार होत गेला, त्याप्रमाणेंच राज्यवृद्धीनेंही उलट धर्मवृद्धीस मदत केल्यामुळें जिंकिलेल्या प्रदेशांत धर्मवृद्धी होत गेलेली आहे; आणि हिंदुस्थान देशांत त्यांचीं अनेक मुसलमानी राज्यें स्थापन होऊन व त्याशिवाय दिल्ली येथें त्यांनीं बादशाहत स्थापन करून कांहींकाळ ते या देशाचे बादशहाही बनलेले आहेत.

असाच प्रकार विजयानगरकर व मराठे यांच्याही बाबतींत घडलेला आहे; प्रसिद्ध माधवाचार्य ऊर्फ विद्यारण्य स्वामी व त्याचा भाऊ सायणाचार्य यांनीं, विजयानगरकर पहिला हरीहर व बुक्क, व दुसरा हरीहर वगैरे राज्यकर्त्यांनां हाताशीं धरून-धर्म व राज्य या दोन्हीं बाबतींचा मिलाफ करून,-मुसलमानांच्या वाढत्या सत्तेस, " जबरदस्त प्रतिबंधक आडकाठी, " अशी एक मध्यवर्ती राज्यसत्ता निर्माण करून, व वाढीस लावून, तिच्याकडून, कांहीं काळपर्यंत मुसलमानांच्या त्या प्रदेशांकडील वाढत्या सत्तेस भयंकर प्रतिरोध करण्याची अत्यंत महत्वाची कामगिरी बजावून घेतली. त्या प्रमाणेंच महाराष्ट्रांत समर्थ रामदास व शिवाजी या उभयतांनीं मिळून—जरी रामदासानें राजकारणांत केव्हांही प्रत्यक्ष भाग घेतला नाहीं तरी, आणि शीख लोकांप्रमाणें धार्मिक असंतोषामुळें, ह्मणजे त्यांच्या धर्मगुरुचा वध झाल्यानंतर त्यांच्या धार्मिक चळवळीस ज्या प्रमाणें राजकीय स्वरूप

प्राप्त झालें, तसें मराठ्यांच्या राजकीय घटनेचें स्वरूप नसून मराठ्यांची राजकीय चळवळ सुरू होण्यापूर्वीच जरी महाराष्ट्रांत धार्मिक चळवळ पूर्णपणें जोरांत होती तरी,—धर्म व राज्य यांचें एकीकरण करून हिंदुस्थानांतील मराठा साम्राज्याची वृद्धी केली; आणि भगव्या झेंड्याच्या रूपानें दृग्गोचर होणारा धर्म, व मराठ्यांमध्यें उत्पन्न झालेल्या दिग्विजयी शक्तीनें वाढत गेलेलें लष्करी तेज या जोड शक्तींचा मिलाफ होऊन, अल्पावकाशांतच हिंदुस्थानच्या राजकीय रंगभूमीवर त्यांची प्रमुखत्वानें गणना होऊं लागली, त्या प्रमाणेंच इंग्रजानींही, धर्म व राज्य नव्हे, पण व्यापार व राज्य, या उभयतांची सांगड घालून आपला उत्कर्ष करून घेतला. इंग्रज ईस्टइंडिया कंपनीचा हिंदुस्थानांत व्यापारी बाबतींत उत्कर्ष होत गेल्यावर तिनें हळुहळु राजकीय बाबतींत भाग घेण्यास सुरवात केली;–पुढील काळांत या देशांत वर्चस्वाचें बक्षीस मिळविण्याकरितां झगडणाऱ्या प्रतिस्पर्ध्यांत मराठ्यांना हीच इंग्रज कंपनी एक जबरदस्त प्रतिस्पर्धी बनली;–आणि आपल्या राजकीय श्रेष्ठत्वाच्या मार्गांतील प्रत्येक दुष्मनाचा कांटा साध्या अथवा सख्तीच्या मार्गानें निर्जिव अथवा नामशेष करून इंग्रज लोक शेवटीं या देशाचें सार्वभौम सरकार बनलें. तथापि राज्या-इतकेंच व्यापारालाही त्यांनीं त्याकाळीं महत्व दिलें आहे, आणि त्यांचा व्यापारी इतिहासही राजकीय इतिहासासारखाच महत्वाचा आहे; ह्मणून मराठ्यांच्या इतिहासाशीं, जरी त्याचा प्रत्यक्ष संबंध नाहीं तरी थोडेंसें विषयांतर केल्याचा दोष पतकरून, ती हकीकत या ठिकाणीं ग्रथित केली आहे.

प्रारंभीं इंग्रज ईस्ट इंडिया कंपनी पूर्वेकडील देशांशीं व पुढें हिंदुस्थानांत येऊन व्यापार करूं लागल्यावरही, इंग्रजांच्या मनांत, व्यापार व राज्य या उभयतांची सांगड घालावी असा विचार नसावा असें ह्मणतां येईल. परंतु त्यानंतर लवकरच, त्यांच्या मनांत हा विचार उद्भवला,-" आपण स्वतःच आपलें व्यापारी महत्व वाढवावें, आपली सांपत्तिक स्थिती विशेष भरभराटीस आणावी, व्यापारावर मिळविलेल्या संपत्तीनें सैन्य व युद्धोपयोगी सामुग्री तयार करून जय्यत ठेवावी, व जसजशी अधिक संपत्ति मिळेल तसतशीं तीं वाढवून आपलें संरक्षण करावें, वर्चस्वस्थापन करावें, व तें वाढवीत नेऊन हिंदुस्थानांत पुढें आपलें साम्राज्य स्थापन करावें, " असे विचार निदान इ० सन १६८७ च्या थोडा काळ तरी अगोदर पासून इंग्रज लोकांच्या मनांत घोळत होते, असें दिसतें. कारण, आपली सांपत्तिक स्थिती भरभराटीची व्हावी, या इरायानें, आणि त्यामुळें सैन्य सामुग्री वगैरे साधनांनीं सामर्थ्यवान होऊन मोंगली स्थानिक अधिकाऱ्यांच्या पारतंत्र्यांत न राहतां आपण स्वतःच आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित करावें, या इच्छेनें त्यांनीं आपल्या प्रतिनिधींना आपला वसूल ( अथवा उत्पन्न ) वाढविण्याकरितां जितके श्रम घेववतील तितके

घेण्याकरितां सक्त हुकूम सोडिले होते; त्यांनीं या बाबतींत ( इ० सन १६८७ मध्यें असें लिहिलें आहे कीं, " आह्माला आमच्या व्यापारासंबंधानें जितकी काळजी आहे, तितकीच आमच्या वसुलाच्या वाढीसंबंधानेंही आहे. कारण याच वसुलामुळें, जरी आमच्या व्यापाराला पन्नास धक्के बसले तरी, आह्माला आमचें सैन्य सुरक्षित राखितां येईल; ह्याच वसुलीमुळें आह्माला हिंदुस्थानामध्यें आमचें राष्ट्र बनवितां येईल...आणि याच कारणामुळें डचलोकांचीं जितकीं सर्व साधारण पत्रें आह्मास पहावयास मिळालीं, त्यांवरून असें दिसतें कीं, व्यापारासंबंधानें जर ह्या धूर्त लोकांनीं एक कलम लिहिलें असेल, तर त्यांची राज्य-व्यवस्था, त्यांचें दिवाणी व लष्करी धोरण, लढाया आणि त्यांच्या वसुलाची वाढ, या संबधानें त्यांनीं दहा कलमें लिहिलेलीं असत; आणि ह्या वेळीं इंग्लिशांचा हेतू त्यांच्या शद्बांनींच सांगावयाचा ह्मणजे " डच लोकांप्रमाणेंच दिवाणी व लष्करी सत्ता आपणही स्थापन करावी, व अशा तऱ्हेनें आपल्या उत्पन्नाच्या वसुलीची बाब इतकी वाढवावी कीं त्यामुळें पुढें आपणास खात्रीनें एक मोठें व मजबूत पायावर उभारिलेलें ब्रिटिशराष्ट्र हिंदुस्थानामध्यें स्थापन करितां येईल. " ( लंडन येथील ईस्टइंडिया कंपनीच्या व्यवस्थापक मंडळानें, फोर्टसेंटजार्ज ( मद्रास ) येथील प्रेसिडेंटास ता. १२ दिजंबर इ. सन १६८७ रोजीं पाठविलेल्या पत्रांतलि उतारा ). यावरून हें लक्षांत येईल कीं इंग्रजानी पूर्वेकडील देशांशीं, व हिंदुस्थानांशीं व्यापार सुरू करून त्या व्यापारावर पुष्कळ संपत्ती मिळविली, आणि ह्या व्यापार सुरक्षित ठेवण्याकरितां त्यांनां याच व्यापारावर मिळविलेल्या संपत्तीच्या मदतीनें आपलें स्वतंत्र सैन्य तयार करून तें नेहमीं सज्ज ठेवावें लागलें. आणि व्यापारावर मिळविलेल्या संपात्तिमुळें त्यांनां तें ठेवितां आलें; ह्मणजे सागरी सत्ता व आरमारी सामर्थ्य यामुळें त्यांच्या व्यापाराची कल्पनातीत भरभराट झाली; त्यांनां अतीशय संपत्ती मिळत गेली, व त्याबरोबरच त्यांचें आरमारी सामर्थ्य, लष्करी बळ, व राजकीय महत्व सारखें वाढत गेलें; इंग्लंडला या व्यापारापासून अतीशय भयंकर नफा मिळत होता; सतराव्या शतकाच्या पहिल्या अर्ध भागांत ईष्ट इंडीज मधील मसाल्यांच्या बेटांतील व्यापार अत्यंत फायद्याचा व महत्वाचा होता; आणि इ. सन १६०६ मध्यें क्लोव्ह बेटांत एका इंग्लिश जहाजानें व्यापारी मालासह तो विकण्याकरितां जलपर्यटन केलें, त्यांत त्या मालाची विक्री होऊन त्याला मूळ मुद्दलावर शेंकडा दोनशें चौतीस टक्के नफा झाला होता; ( Annals of the East India Company हें पुस्तक पहा). जगाच्या राजकीय इतिहासांत सागरी सत्तेचें अत्यंत महत्व मानिलेलें आहे; सर वॉल्टर रॅले यांच्या शद्बांत सांगावयाचें ह्मणजे "ज्याच्या ताब्यांत समुद्र त्याच्या ताब्यांत व्यापार, ज्याच्या ताब्यांत व्यापार त्याच्या ताब्यांत जगाची संपत्ति, आणि

शेवटीं प्रत्यक्ष सर्व जगही* " असतें ही गोष्ट अगदीं सत्य आहे; जगांतील कोणत्याही दर्यावर्दी राष्ट्राचें जीवित्व सर्वस्वी परदेशीय व्यापारावरच अवलंबून असतें, आणि निदान

---

* टीपः—Whosoever commands the sea, commands the trade, Whoso-ever commands the trade, commands the riches of the world; and consequently the world itself.—*Raleigh.*

सर हंफ्रे गिलबर्ट आणि सर वॉल्टर रॅले या नांवाचे दोन सावत्रबंधु इंग्लंड मधील डेव्हनशायर प्रांतांतील राहणारे होते. या उभयतांनीं, " उत्तरअमेरिकेंत आपण वसाहती कराव्या" अशी एलिझाबेथ राणीस सल्ला दिली व गिलबर्ट हा स्वतः इ. सन. १५७८ मध्यें आपणाबरोबर ११ जहाजें व पांचशें लोक घेऊन न्यूफाउंडलंड बेटांत गेला; परंतु ही स्वारी निष्फळ होऊन त्यास परत येणें भाग पडलें; त्यानंतर तो पुन्हां इ. सन १५८३ मध्यें त्याच बेटांत गेला, तेथें एक वसाहत स्थापन करून दक्षिणेकडे किनाऱ्यांची टेहळणी करण्याकरितां वळला; तथापि त्याच्या लोकांनीं त्यास इंग्लंडमध्यें परत जाण्याविषयीं आग्रह केल्यामुळें तो परत येण्यास निघाला; परंतु एके रात्रीं समुद्रांत मोठें तुफान होऊन त्यांत तो, त्याच्या बरोबरील सर्व लोक आणि त्याचें " स्क्वीरल (Squirrel) हें जहाज समुद्रांत बुडून, त्या सर्वांचा नाश झाला. सर हंफ्रेगिल्बर्ट यांस "इंग्लिश वसाहतींचा जनक " असें ह्मणतात.

गिल्बर्ट प्रमाणेंच सर वॉल्टर रॅले हा अमेरिकेंत गेला, आणि तेथें त्यानें एक वसाहत स्थापन केली; हीच इंग्रजांची त्या देशांतील पहिली वसाहत असून कुमारी राणी एलिझाबेथ हिच्या सन्मानार्थ तिला " व्हर्जीनिया " हें नांव देण्यांत आलें; परंतु ही वसाहत पहिल्यानें फारशी यशस्वी झाली नाहीं; कारण तेथें वसाहत करण्यास गेलेली मंडळी तेथील जमीन लागवडीस आणण्याऐवजीं तेथें सोनें मिळाल्यास पहावें ह्मणून उद्योगास लागली; त्यानंतर रॅले हा इंग्लंडमध्यें परत आला; तेव्हां त्यानें आपणाबरोबर तिकडून तंबाकू व बटाटे, यांचीं झाडें इंग्लंडांत आणिलीं; यांपैकीं तंबाकू हा युरोपांत पुष्कळच पूर्वीं ह्मणजे इ. सन १४९३ मध्यें माहित झाला होता; आणि स्पेन देशांमधील लोकांनीं इ. सन १४९२ मध्यें सांटा डोमिंगो बेटांत तेथील इंडियन रहिवाशांनां तंबाकू ओढतांनां पाहून, तंबाकूचीं झाडें युरोपांत स्पेन देशांत आणून व लावून, नंतर तंबाकूचा सर्व युरोपभर प्रसार केला होता; तथापि तोंपर्यंत इंग्लिशांनां, तंबाकू ही काय वस्तू आहे, हें माहित नव्हतें, व रॅले यानेंच त्याची आपल्या देशबांधवांना माहिती करून दिली, असें ह्मणतात; त्याप्रमाणेंच रॅले यानें बटाट्यांचीं झाडें ऐर्लंडमध्यें आपल्या शेतांत लाविलीं, आणि इंग्लिश व ऐरिश लोकांनां त्या संबंधीची माहिती करून दिली; त्या वेळेपासून बटाटे इंग्लंड व ऐर्लंडमध्यें खाण्याच्या उपयोगांत

सतत दोन शतकें पर्यंत इंग्लंडनें आपलें सर्व धोरण समुद्रावरील वर्चस्व, व परदेशांवरील

आणण्यांत येऊं लागले, आणि ऐर्लंडमध्यें तर हल्लींही बटाटे हाच ऐरिशलोकांचा मुख्य खाण्याचा पदार्थ बनून गेलेला असून त्याच्यावरच बहुतेक सर्वांशीं त्यांचें जीवन अवलंबून आहे. व्हर्जीनियाजवळील उत्तरकॅरोलीना या प्रांताच्या राजधानीच्या शहरास त्याच्या स्मरणार्थ व सन्मानार्थ रॅले हेंच नांव देण्यांत आलें आहे. सर वाल्टर रॅले हा मोठा धाडशी खलाशी, प्रवासी व शूरयोद्धा होता; व तो एलिझाबेथ राणीच्या विषेश मेहेरबानींतील होता.

एलिझाबेथ मृत्यू पावल्यानंतर स्टूअर्ट घराण्यांतील पहिला जेम्स हा गादीवर आला. (इ. सन १६०३ मध्यें.) याच्या कारकीर्दीच्या प्रारंभींच, रोमनक्याथालिक लोकांनीं, जेम्स राजा व इतर प्राटेस्टंट पंथाचे सरदार वगैरे मंडळी, यांना ठार मारण्याचा, व अरबेला स्टूअर्ट हीस त्याच्या ऐवजीं गादीवर बसविण्याचा एक भयंकर कट उभारिला; आणि पार्लमेंट सभागृहाच्या खालील तळघर भाड्यानें घेऊन व त्यांत दारूचीं पिपें भरून ठेऊन-जेम्स राजा आणि लार्ड व कामन्स सभेंतील सभासद् पार्लमेंटच्या सभागृहामध्यें तें उघडण्याच्या वेळीं एकत्र जमतील त्यावेळीं—त्यास आग लावुन तें उडवून देण्याची सिद्धता केली; हा भयंकर कट अत्यंत गुप्त ठेवण्यांत आला होता; परंतु त्यांतील एका मनुष्यानें, आपल्या पार्लमेंटचा सभासद असलेल्या एका नातलगास, भावी भयंकर अरिष्टाची मोघम सूचना दिली, आणि ता. ५ नोव्हेंबर रोजीं (इ. सन १६०३) पार्लमेंटची पहिली सभा भरण्याच्या वेळीं तेथें हजर न राहण्याविषयीं त्यास कळविलें; परंतु त्यास हें पत्र मिळाल्याबरोबर त्यानें तें गुप्त न ठेवितां तावडतोब जेम्स राजास दाखविलें; त्याबरोबर या संबंधांत लागलीच चोहोंकडे मोठ्या जोरानें तपास सुरू झाला, त्यावेळीं पार्लमेंट गृहाच्या खालील तळघरही तपासण्यांत आलें; तों त्यांत सहा मोठमोठीं पिपें दारूनें भरून ठेविलेलीं आहेत, व गै फॉक्स (Guy Fawkes) या नांवाचा एक मनुष्य तेथें जवळच सूचना मिळाल्याबरोबर दारूच्या पिपांस आग लावण्याकरितां तयारीनें उभा आहे असें आढळून आलें; तेव्हां त्यास पकडून या कटासंबंधीं चौकशी करण्यांत आली; आणि गै फॉक्स वगैरे पुढारी मंडळीला देहांत शासन करून हा कट मोडून टाकण्यांत आला; लेडी अरबेला स्टूअर्ट हिला, या कटासंबंधीं कांहींही माहिती नसतांनासुद्धां, आपल्या परवानगीशिवाय तिनें लग्न केलें असा तिच्यावर आरोप ठेऊन तिला लंडन टॉवरमध्यें कैदेंत ठेवण्यांत आलें, आणि त्याच ठिकाणीं ती वेडी होऊन मृत्यू पावली; या कटास "मेनप्लॉट" अथवा "गनपॉवडर प्लॉट" असें ह्मणतात;-त्या नंतर जेम्सराजाला पकडून, त्यास लंडन टॉवरमध्यें घेऊन जाऊन, त्याच्या कडून पुढें आपणास विशेष चांगल्या रीतीनें वागवूं अशाबद्दलचें वचन मिळवून घेण्याबद्दल

व्यापार-सर एच. पारनेल यांच्या ह्मणण्याप्रमाणें, इंग्लंडच्या अठराव्या शतकांतील बहुतेक सर्व लढाया ज्या व्यापाराकरितांच करण्यांत आल्या होत्या तो व्यापार-वाढविण्याकडेसच ठेविलें होतें; अशा प्रकारच या सागरी सत्तेचें महत्व असून रॅले प्रमाणेंच बेकन यानें आपल्या-" Of the true Greatness of kingdoms " या पुस्तकांत या संबंधानें असे उद्गार काढिले आहेत कीं, " खरोखर यावेळीं आह्मा युरोपस्थ लोकांना समुद्रावरील सत्तेचा फायदा पुष्कळच आहे; आणि विशेषतः ग्रेट ब्रिटनच्या राज्याला तर " सागरी सत्ता " ही एक मुख्य देणगी आहे; कारण एकतर युरोपांतील बहुतेक राष्ट्रें समुद्र वेष्टित आहेत आणि दुसरें दोन्हींही-ह्मणजे ईस्ट व वेस्ट इंडीज मधील संपत्ति पुष्कळ अंशीं ज्याची समुद्रावर अधिक सत्ता असेल, त्याला सुलभ रीतीनें मिळण्यासारखी आहे ह्मणजे सर आलफ्रेड लायलच्या ह्मणण्याप्रमाणें (British Dominion in India हें पुस्तक पहा) " ईस्ट इंडिया कंपनीच्या फार पूर्वीच्या दफ्तरांत असा दाखला आढळतो कीं, आशिया खंडांतील गलबतें जातां येतां येण्यासारख्या सर्व समुद्र किनाऱ्यांवरील प्रदेशांत, अरबी समुद्रांत, इराणच्या आखातांत, आणि हिंदुस्थानच्या पश्चिमेपासून तों

---

रोमन कॅथलिक पंथाच्या लोकांनीं असाच दुसरा " बायप्लॉट " या नांवाचा कट केला होता; परंतु तोही उघडकीस येऊन त्या कटाच्या प्रवर्तकाचा व साथीदारांचा वध करून तोही पहिल्याकटाप्रमाणेंच साफ नामशेष करण्यांत आला; या कटांत सर वॉल्टर रॅले हा सामील असल्याचें निदर्शनास आल्यावरून त्यास देहांत शिक्षा देण्यात आली; परंतु ती अमलांत न आणितां त्यास लंडन टॉवरमध्यें प्रतिबंधांत ठेवण्यांत आलें. याठिकाणीं तो तेरा वर्षे कैदी ह्मणून राहिला होता. या अवधींत त्यानें "History of the World-जगाचा इतिहास-या नांवाचा एक ग्रंथ लिहिला. पुढें इ. सन १६१६ मध्यें त्यानें दक्षिण अमेरिकेमधील सोन्याच्या एका खाणीचें ठिकाण दाखवितों, असें कबूल केल्यावरून, त्यास बंधमुक्त करण्यांत आलें व तो आपणाबरोबर कांहीं माणसें घेऊन दक्षिणअमेरिकेंत गेला; परंतु त्याला तेथें सोन्याची खाण तर सांपडली नाहींच, परंतु उलट त्याच्या अनुयायांनीं तिकडे वसाहत करून राहिलेल्या कांहीं स्पॅनिश-लोकांशीं भांडण केलें, आणि त्यांचें गांव जाळून टाकिलें. परंतु यावेळीं पहिला जेम्स व त्याचा आवडता सल्लागार ड्यूक ऑफ बकिंगहाम यांचें स्पेनच्या राजाशीं विशेष सख्य असून ते, चार्लस प्रिन्स ऑफ वेल्स याच्या बरोबर स्पेनच्या राजकुळांतील एका मुलीचें लग्न जमविण्याच्या खटपटींत होते; त्यामुळें, रॅले हा दक्षिण अमेरिकेंतून परत आल्यावर, स्पेनच्याराजास संतुष्ट करण्याकरितां, त्यास पंधरा वर्षांपूर्वीं सुनावण्यांत आलेली शिक्षा अमलांत आणून त्याचा ( इ. सन १६१८ मध्यें ) वध करण्यांत आला!

तहत चीनच्या ईशान्य दिशेपर्यंत लागणाऱ्या प्रत्येक बेटाशीं, ज्याठिकणीं व्यापार करणें शक्य होतें त्या त्या ठिकाणीं, युरोपियन राष्ट्रें व्यापारी नफा, आणि विशिष्ट हक्क हीं मिळविण्याकरितां यावेळीं नेटानें झगडत होतीं. ज्या बक्षिसाकरितां त्यांची चढाओढ लागली होती, त्याचें महत्व किती आहे, हें त्यांना त्यावेळीं सुद्धा पूर्णपणें माहीत होतें, आणि त्यानंतरच्या इतिहासावरून असें सिद्ध झालेलें आहे कीं, त्या झगडणाऱ्या राष्ट्रांची युरोपांतील संपत्ती, स्वातंत्र्य, आणि राजकीय वर्चस्व, हीं त्यांच्या हिंदुस्थानांतील जयापजयावरच विशेषत: अवलंबून होतीं. स्पेनचें मोठें आरमार आणि सैन्य हीं परदेशांतून आणिलेल्या मालाच्या नफ्याच्या पैदासीवरच पोसलीं जात असत; डच लोकसत्तात्मक राष्ट्रानें प्रतिरोध करण्यांत दाखविलेल्या भयंकर चिकाटीच्या मुळाशीं त्या लोकांचा समुद्रावरील असलेला व्यापार हेंच कारण होतें आणि इंग्लंडचा मोठेपणाही त्याच्या जगभर पसरलेल्या व्यापारामुळेंच प्रस्थापित झालेला आहे; त्या प्रमाणेंच इ० सन १६६४ मध्यें इंग्लंड व हालंड या दोन देशांमध्यें व्यापारी चुरशीमुळें युद्ध सुरू होण्याचा रंग दिसत होता, त्यावेळीं, फ्रान्सच्या गादीवर चवदावा लुई हा राजा असून, त्याचा प्रधान कॉलबर्ट यानें त्याचें मन फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी स्थापन करण्याकडेस नुकतेंच वळविलें होतें; आणि त्याची त्या वेळची राज्यपद्धती शांतता राखण्याची होती; कारण लढाई सुरू झाली तर जें राष्ट्र विजयी होईल त्या राष्ट्राचें आरमारी वर्चस्व अजिंक्य होण्यामध्यें तिचा शेवट होईल असें त्यास भय होतें, आणि इंग्लंड या युद्धांत यशस्वी झाल्यास सागरी अजिंक्य सत्ता, व व्यापारी अप्रतिहत वर्चस्व त्या देशास प्राप्त होईल असें त्यास वाटत होतें; त्यामुळें जरी हालंड व फ्रान्स यांच्यामध्यें, तह होऊन त्या अन्वयें, परस्परांनीं एकमेकांनां प्रसंगीं मदत करावी असें ठरलें होतें तरी, इ० स० १६६४ मध्यें त्याच्या फ्रेंच वकीलानें त्यास फ्रान्समध्यें जेव्हां लंडन येथून " इंग्लंड, हालंड बरोबर दोन हात करण्यास तयार आहे " ( on meurt d'envie de les attaquer ) प्रतिस्पर्धेमुळें त्यांच्यावर ( डच लोकांवर ) हल्ला करण्याकरितां ते ( इंग्रज लोक ) आपलीं मनगटें चावीत आहेत " ) असें कळविलें तरी नाईलाज होईपर्यंत या युद्धांत हालंडला न मिळतां आरमारी सत्तेचा समतोलपणा राखण्याकडे त्याची प्रवृत्ती होती; आणि त्यानें इ० सन १६६५ च्या एप्रील महिन्यामध्यें आपल्या वकिलांना जीं पत्रें लिहिलीं त्यांतही अशाच आशयाचा उल्लेख केला होता; तो ह्मणतो; "यानंतर इतर राष्ट्रांना इंग्लंडशीं समुद्रांवरील वर्चस्वाबद्दल लढाया करणें फार कठीण जाईल. इंग्लिशांनीं जें वर्चस्व मिळविण्याकरितां नेहमीं धडपड केली आहे, आणि अजूनही आस्था दाखवित आहेत, त्यावरून कोणीही असें ह्मणूं शकेल कीं, हा हेतु, आणि जगांतील सर्व व्यापार आपल्या ताब्यांत आणण्याचा हेतू, हे दोन्हींही वर नमूद केलेल्या राष्ट्राराष्ट्रांमधील

निमित्ताला टेकलेल्या भांडणाला मूळ कारणीभूत आहेत " * या सर्व विवेचनावरून सागरी सत्तेचें केवढें महत्व आहे, आणि त्यामुळें व्यापार, व संपत्ती कशी मिळवितां येते आणि सागरी सत्तेमुळेंच वाढत जाणाऱ्या व्यापारामुळें राष्ट्राचा केवढा उत्कर्ष होतो, याचें कोणासही सहज अनुमान करितां येईल; याच सागरी सत्तेच्या जोरावर इंग्लंडने आपला व्यापार अतीशय भरभराटीस आणिला, आणि त्याच व्यापारानें मिळविलेल्या संपत्तीनें आपल्या आरमाराची अधिक अधिक सुधारणा करून त्यांत भर घातली; या बाबतींत अर्ल ऑफ डॅन्बी यांस ब्रिसबेन यानें पाठविलेल्या पत्रांत, ( ता. २५ जून इ. सन १६६७ " डॅन्बीचीं पत्रें " पान ३१५ पहा ) तो ह्मणतो कीं, " सतरा वर्षांच्या मागें या बाबतींत बोलणाऱ्या लोकांनीं बांधिलेल्या अटकळीहूनही अधिक प्रमाणानें आपला व्यापार आणि नौकानयन यांची सुधारणा करण्यांत राजाला यश आलें आहे...आणि आतां तर इंग्लंडच्या व्यापाराचा इतका कळस झाला आहे कीं, तो इतका वाढेल, यावर भरंवसा ठेवणें हें जितकें एकेकाळीं कठिण होतें, तितकेंच तो असाच पुढेंही चालू राहील, असें मानणेंही कठीण आहे. " वरील विवेचनावरून इंग्लंडचा व्यापार किती भरभराटींत आला होता, त्या व्यापारावर इंग्लंडला केवढा नफा मिळत होता, हा व्यापार आपल्या हातीं कायम रहावा ह्मणून इंग्लंडचें राष्ट्र केवढी आस्था दाखवीत होतें, आणि याच व्यापारामुळें, सागरी सत्ता वाढवीत नेऊन, इंग्लंडचें राज्य जगांत केवढें बलाढ्य बनलें, वगैरे बाबती संबंधी बराच बोध होण्यासारखा आहे आणि पुढील काळांत इंग्रजांचा मराठ्यांशीं संबंध आलेला असल्यानें, त्या त्या प्रसंगीं इंग्रजासंबंधी माहिती ग्रंथित करण्यांत येणार असल्यानें, या ठिकाणीं प्रतिपाद्य विषयास पोषक व आवश्यक तेवढीच अनुषंगिक माहिती दिलेली आहे;-आणि थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे व्यापार व राज्य-ह्मणजे सत्ता, या दोन बाबतींची सांगड बांधून, व परस्परांनां एकमेकांचा आधार व दुजोरा देऊन हिंदुस्थानांत इंग्रजांनीं आपला व्यापार व वर्चस्व यांची वृद्धि केली आहे, आणि तागडी व तरवार हीं उभयतां परस्परांनां पोषक बनल्यामुळें अखेरीस इंग्रज लोक हिंदुस्थान देशाचे सार्वभौम सरकार झालेले आहेत.

---

* टीप:—" Apre's quoi il serrit tre's difficile aux autres puissances de cantester aux Anglais cet empire de la mer auquel ils out de tout temps aspire', et dont aujourd'hui ils se moutrent si avides qu'on peut dire que ce dessein et celui de s'emparer de tout le commeree du monde sont les deux ve'ritables causes de toutes les querelles qu'ils suscitent aux dits E'tats."

मुसलमानी धर्मसंस्थापक महंमद पैगंबर हा मृत्यू पावल्यावर दीडशें वर्षांच्या आंतच मुसलमान लोकांनीं मोठमोठाले पराक्रम करून-आशिया, यूरोप आणि आफ्रिका या तीन्हींही खंडांत दिग्विजय करून आशियामायनर, तुर्कस्तान, सीरिया, इराण, अफगाणिस्थान, तार्तरी, मिसर वगैरे देशांत आपलें राजकीय वर्चस्व स्थापन करून या सर्व प्रदेशांमध्यें आपल्या धर्माचा इतका झपाट्यानें विस्तार केला कीं, त्या धर्माच्या लोकांची संख्या वीस कोटीपर्यंत वाढली. त्याप्रमाणेंच,-मुसलमान लोकांनीं अशा रीतीनें विलक्षण दिग्विजय संपादिल्यामुळें-जगाच्या राजकीय इतिहासांतही चमत्कारिक स्थित्यंतर घडून आलें; सीरिया देश अरब लोकांनीं जिंकून घेतल्यामुळें ख्रिस्ताची चरित्रभूमी असलेलें जरूसलेम हें शहर मुसलमान लोकांच्या ताब्यांत गेलें; त्यामुळें ख्रिस्ती लोकांचें त्या भागांतील महत्व कमी झालें, आणि मुसलमान लोकांनीं त्या प्रांतावर " जिझीया " कर बसविला. तथापि हा कर देण्याचें ज्या ख्रिस्ती लोकांनीं कबूल केलें, त्यांना अरब लोकांनीं कोणत्याही प्रकारें उपद्रव दिला नाहीं; इतकेंच नाहीं तर उलट ख्रिस्ती देवालयें, व त्यांचीं उत्पन्नें त्यांनीं पूर्वीप्रमाणेंच निर्वेध रीतीनें कायम चालू ठेवलीं. त्याप्रमाणेंच त्यांनीं इराण देश हस्तगत केल्यावर तेथील लोकांचें व त्यांच्या धर्माचें हजारों वर्षांपासून चालत आलेलें महत्व नष्ट झालें. या लोकांपैकीं कांहींनीं मुसलमानी धर्माचा स्वीकार केला. परंतु जे विशेष अभिमानी होते त्यांनीं मुसलमानी धर्म स्वीकारला नाहीं, व त्यांचा अंमलही कबूल केला नाहीं. त्यामुळें त्यांना देशत्याग करावा लागला, व ते इराणांतून हिंदुस्थान देशांत आश्रयाकरितां पळून येऊन पश्चिम किनाऱ्यावर गुजराथेंत नवसरी, संजन वगैरे ठिकाणीं स्थाईक झाले. हेच लोक, हल्लीं हिंदुस्थानांत असलेले " पारशी " हे असून त्यांना या देशांत स्थाईक होऊन बाराशें वर वर्षांचा काळ लोटला आहे. व आजतागायत त्यांनीं आपला धर्म कायम ठेविला असून ते आपल्या जुन्या देवतांचीच उपासना करीत आहेत. इराण देशाप्रमाणेंच अरबांनीं, इजिप्त सह आफ्रिकेचा दक्षिण किनारा आपल्या हस्तगत करून घेतला, व त्या सर्व प्रदेशांवरही त्यांनीं आपलें वर्चस्व स्थापन करून ते बलाढ्य बनले.

महंमदानें स्थापन केलेल्या धर्मास " इस्लाम " ह्मणजे तारण मार्ग,-अथवा इस्लामी धर्म ह्मणजे तारक धर्म, अशी संज्ञा असून मुसलमानांच्या धर्म ग्रंथास 'कुराण' असें ह्मणतात; मनुष्यास त्याच्या मृत्यूनंतर पुनर्जन्म येत नाहीं, एकट्या परमेश्वरावांचून दुसरा देव नाहीं, ज्याच्या त्याच्या बऱ्यावाईट कृतीप्रमाणें, व पापपुण्याप्रमाणें परमेश्वर त्यास फळ देत असतो, मनुष्य मृत्यु पावल्यावर त्यास बरी अथवा वाईट गती लागलीच न मिळतां त्याचा जीवात्मा तसाच पडून राहून नंतर परमेश्वर एकदांच सर्वांचा

न्याय करितो, व ज्याच्या त्याच्या चांगल्या वाईट कृत्याप्रमाणें त्यास स्वर्ग अथवा नर्क-वास ह्मणजे "जन्नत" अथवा जहन्नम देत असतो, असें या धर्माचें मत आहे. धर्माकरितां युद्धांत मृत्यु येण्या इतकें दुसरें कोणतेंही मोठें पुण्य नाहीं, त्या प्रमाणेंच शुचिर्भूतपणा ठेवणें, मक्केकडे तोंड करून व जमीनीवर गुढघे टेंकून दररोज पांच वेळां परमेश्वराची प्रार्थना करणें, गरिबास दानधर्म करणें, मूर्तिपूजा न करणें, देव हा एकच असून, कुराण हें ईश्वरदत्त शास्त्र आहे असें मानणें, ज्याची इच्छा असेल त्यास आपल्या धर्मांत घेणें, न्यायाचें, उदारपणाचें, व समान बंधुत्वाचें वर्तन ठेवणें, उपवास करणें, दुसऱ्याचें घेतलेलें कर्ज परत देणें, दुसऱ्यास दिलेल्या कर्जावर अथवा ठेवीवर व्याज न घेणें, व्याजानें कर्ज न देणें, सत्य, शुद्ध, व सचोटीचें आचरण ठेवणें, प्रत्येकानें स्वतः काम करून आपलें पोषण करणें, मद्यपान अथवा अफू, भांग वगैरे मादक पदार्थांचें सेवन न करणें, जुगार न खेळणें, मुहूर्त अथवा शकून न पाहणें, ईश्वराचें नांव घेऊन जनावराची हिंसा केल्यास तें पाप नाहीं असें मानणें, डुकराचें मांस, आपोआप मेलेल्या जनावराचें मांस, ईश्वराचें नांव घेतल्याखेरीज मारिलेल्या जनावराचें मांस, मूर्तीस नैवेद्य दाखविलेलें अन्न अथवा मांस, निषिद्ध मानून तें भक्षण न करणें, अनुकूल असल्यास मक्केची यात्रा करणें, सुंता करणें, वगैरे गोष्टी या धर्मांतील मूलतत्वें ह्मणून गणिलीं गेलेलीं आहेत. मुसलमान लोकांत मुख्य बारा इमाम मानितात; ते:—१ अली, २ हसन, ३ हुसेन, ४ दुसरा अली, ५ महंमद, ६ जाफर, ७ मुसा, ८ तिसरा अली, ९ दुसरा महंमद, १० चवथा अली, ११ हसन, व १२ तिसरा महंमद, हे असून यांतील शेवटचा इमाम तिसरा महंमद हा इ. सन ८७९ मध्यें आपल्या वयाच्या बाराव्या वर्षी मृत्यू पावला. सर्व मुसलमान लोक, धर्मसंस्थापक महंमद यांस पैगंबर, अथवा ईश्वरी पुरुष असें मानितात, व ते त्याचें एकेरी नांव कधींही न घेतां त्याबरोबरच "महंमद मुस्तफा सल्लल्ला हो अलेहे व अलेही व सलं (अथवा सलम्) असा आशिर्वादही ह्मणतात. त्याप्रमाणेंच ज्यास मुसलमानी धर्माची दिक्षा द्यावयाची असेल त्यास "लाइलाहइल्लाल्लाह महंमद रसूलुल्लाह"—ह्मणजे देव हा एकच आहे, व महंमद हा त्याचा प्रेषित आहे,—हा कलमा विश्वासानें पढावा लागतो. अकबर बादशाहाच्या वेळीं पाडिलेल्या सोन्याच्या मोहरांवर एका बाजूस हाच कलमा लिहिलेला आहे; त्यामुळें ही मोहोर विशेष शुभदायक मानण्याचा मुसलमान लोकांत प्रघात आहे, त्याप्रमाणेंच विजापूर येथील शहराच्या पश्चिम अंगास कोटाबाहेर अजमासें अर्धा मैलावर असलेल्या "इब्राहीम-रोजा" मधील दर्ग्याच्या भिंतीच्या सर्व दगडांवर कुराण कोरिलेलें असून त्यांतही वरील कलमा कोरिलेला आहे, व हें ठिकाणही मुसलमान लोकांत विशेष पवित्र

मानण्यांत येत आहे; कोणत्याही इष्ट कार्याची सुरवात करितांना मुसलमान लोक "बिसमिल्लाहिर्हरमार्निरहीम-परम दयाळू परमेश्वराच्या नांवानें"-हे शब्द उच्चारितात. ते परमेश्वरास "अल्लाहुताला" असें ह्मणतात, व त्याचें धर्मशास्त्र जें कुराण तें ईश्वरदत्त आहे, असें मानून, गुढगे टेकून व मक्केकडे-ह्मणजे पश्चिमेकडे-तोंड करून ते दिवसांतून पांच वेळां ईश्वराची प्रार्थना करितात; या प्रार्थनेची, कयाम, रुकू, कोदा आणि सिज्दा अशीं चार आसनें आहेत; त्यांपैकीं उभें राहून प्रार्थना करितात त्यास कयाम, वांकून प्रार्थना करितात त्यास रुकू, जमीनीवर नुसते गुढगे टेंकून प्रार्थना करितात त्यास कोदा आणि जमीनीवर गुढगे, हात, व डोकें टेंकून प्रार्थना करितात त्यास सिज्दा असें ह्मणतात; या चार आसनांपैकीं ख्रिस्ती व ज्यू धर्मांत सिज्दा हें आसन नसून तें फक्त मुसलमानांतच आहे. सिज्दा ज्या ठिकाणीं करावयाचा त्या ठिकाणास "मस्जीद" असें ह्मणतात; सिज्दा हा फक्त ईश्वरासाठींच असून तो कोणत्याही माणसास अथवा माणसासाठीं करावयाचा नाहीं, असा मुसलमानी धर्मांत निर्बंध आहे. या प्रार्थनेस नमाज पढणें असें ह्मणतात; नमाजाची वेळ झाली ह्मणजे "अल्ला हो अकबर"-ईश्वर श्रेष्ठ आहे याशब्दांनीं सर्वांना नमाज पडण्यास मशीदींत येण्याकरितां पुकारणी करण्यांत येते, व त्याप्रमाणें पुष्कळ मंडळी एकत्र जमून मोठ्या मनोभावानें नमाज पढण्यांत येतो.

मुसलमानांच्या धर्मग्रंथाचीं-ह्मणजे कुराणाचीं-इमाम, व दीन अशीं दोन प्रकरणें आहेत; आणि त्यांपैकीं पहिल्यांत धर्मतत्वें, व दुसऱ्यांत धार्मिक आचारमार्ग, यांचें विवेचन केलेलें आहे. कुराणाचे एकंदर तीस भाग आहेत; त्यांस "सिपारे" असें ह्मणतात; कुराणाचे एकंदर अध्याय ११४ आहेत व त्यांत अजमासें सहाहजार पद्यें असून ७७६३९ शब्द व ३२३०१५ वर्ण आहेत; कुराणाशिवाय, महंमदाचीं भाषणें, त्यानें केलेलीं कृत्यें, ठरविलेले आचार अथवा नियम निर्बंध, व दिलेले निर्णय, वगैरे गोष्टी त्याच्या मृत्यूनंतर अजमासें शंभर वर्षांनीं एकत्र करून त्याचाही एक निराळा धर्मग्रंथ तयार करण्यांत आला आहे; त्यास "सुन्ना" असें ह्मणतात, व तोही कुराणासारखाच पूज्य, माननीय, व आधारभूत ह्मणून गणला गेलेला आहे. मुसलमानी धर्मांत हिंदूप्रमाणें स्वतंत्र उपाध्याय वर्ग नाहीं; व धार्मिक संस्कार, अथवा विधी आचरून त्यांच्या योगानें पापक्षालन होण्याला मार्ग नाहीं. ईश्वर लोकांना धर्मोपदेश करण्याकरितां ज्या विभूतीची योजना करितो, त्यास ते पैगंबर असें ह्मणतात; त्याप्रमाणेंच मुसलमानी धर्माच्या मुख्य आचार्यास "इमाम" आणि महंमद पैगंबराच्या मागें धर्म व राज्य यांची व्यवस्था ज्यांच्याकडे सोंपविली गेली, त्यांना "खलीफा" असें ह्मणतात. कुराणांत कित्येक "फेरिस्ते" अथवा देवदूत वर्णिलेले असून त्यांपैकीं मिकाईल, अजराईल, व

अजाजिल हे प्रमुख म्हणून गणिले गेलेले आहेत; आणि त्यांपैकीं मिकाईल हा युद्धसमयीं साह्य करितो, अजराइल हा,–हिंदुलोकांच्या " यम " या नांवाच्या देवते प्रमाणें–दंड करितो, आणि अजाजिल हा, ईश्वरशापानें सैतान होऊन लोकांना पापबुद्धी व पापाचरण यांच्याकडे ओढून नेतो, असें त्यांच्या शास्त्रांत वर्णन केलेलें आहे. महंमदानें नवीन धर्म स्थापन करितांना इब्राहीम, इस्मइल, इशाक, याकूब, मूसा व ईसा, यांनीं ज्या स्वन्या धर्मांचो पूर्वीं स्थापना केली, त्याच धर्मांचा मी ईश्वरी प्रेरणेनें जीर्णोद्वार करीत आहे, आणि कुराण हा ईश्वरप्रणित धर्मग्रंथ आहे, व तो त्याच्या दूतामार्फत मला मिळाला आहे असें लोकांस सांगून त्यानें तो प्रसिद्ध केला असून त्यांत, बारा इमामाप्रमाणेंच, आदम, नोहा, इब्राहीम, मूसा, ईसा, व महंमद असे सहा पैगंबर मानिलेले आहेत. त्याप्रमाणेंच जन्नत, म्हणजे स्वर्ग आणि जहन्नम म्हणजे नर्क हे मनुष्यास ज्याच्यात्याच्या पापपुण्याप्रमाणें कायमचे मिळतात. सदाचरणानें व स्वधर्मानें मनुष्यानें आपलें आचरण ठेविलें तरच मुक्ती मिळण्याचा संभव असून, तोही निव्वळ ईश्वरी कृपेवरच अवलंबून आहे असें या धर्माचें मत आहे; यहूदी ( म्हणजे ज्यू ) लोकांत इब्राहीम, इस्मईल, इशाक, याकूब, मूसा व ईसा ( म्हणजे येशु अथवा येशुख्रिस्त ) हे सहा पैगंबर मानितात; व ते मुसलमानासही मान्य आहेत; आणि सुंता करण्याची चाल ही त्यांनीं यहुदी लोकांपासुनच घेतलेली आहे; तथापि मुसलमान, यहूदी व ख्रिस्ती धर्मांत विरोध असून ख्रिस्ती व ज्यू धर्मास सिज्दा हें आसन मान्य नाहीं, व ख्रिस्ती लोक महंमदास मात्र पैगंबर म्हणून कबूल करीत नाहींत; ख्रिस्ताच्या अनुयायांनीं ख्रिस्तास ईश्वराचा पुत्र ठरविलें आहे, व तीन देव मानिले असून हेंच मुख्यतः त्याचें स्वरूप आहे.

महंमद पैगंबराच्या पूर्वी मुली लहान असतानाच त्यांना जिवंत पुरून टाकण्याची रुढी प्रचारांत होती; कारण बायकांमुळें खर्च वाढून कुटुंबाची अब्रू जाते असा त्याकाळीं समज होता; त्यामुळें अर्थातच बायकांची संख्या कमी होऊन अनेक बंधू मिळून एकच स्त्री करण्याचा प्रघात पडला होता; परंतु महंमदानें ही चाल बंद केली; आणि एकाच पुरुषानें चारापेक्षां अधिक स्त्रिया करूं नयेत, असा निर्बंध ठरविला; त्याप्रमाणेंच त्यानें व्यभिचाराचीही सक्त बंदी केली; शिवाय कुराणांतही व्यभिचार हें महा पाप गणिलेलें आहे, व त्याबद्दल स्त्रियांना देहांताची व पुरुषांना फटक्याची शिक्षा सांगितलेली आहे; शिवाय साधू संत, मानवी विभूती, अथवा इतर प्राणी किंवा वस्तू यांपैकीं कशाचीही प्रतिमा करणें, त्याची पूजा करणें, मृत मनुष्याचें स्मरण कायम ठेवण्याकरितां, अथवा त्याच्या विषयीं आदरभाव व्यक्त करण्याकरितां त्याचें श्राद्ध, उत्सव, पुण्यतिथी अथवा अशाच प्रकारचे दुसरे धार्मिक विधी करणें, अथवा त्याच्या आत्म्याच्या शांतीसाठीं प्रार्थना

करणें, किंवा करुणा भाकणें, या गोष्टी कुराणांत मना केलेल्या आहेत; आणि " प्रत्येक मनुष्याने आपल्या आयुष्यांतच काय तो पुरुषार्थ साधून घ्यावा, मृत्यूनंतर त्याची कांहींही किंमत नाहीं; असें असतां आपल्या मृत्यूनंतर सुद्धां आपली योग्यता मोठी आहे, असें समजून ती कायम ठेवण्याचा प्रयत्न करणें निंद्य होय," असा महंमद पैगंबराचा उपदेश आहे.

मुसलमान लोकांत हिंदू व ख्रिस्ती लोकांप्रमाणेंच वर्षाच्या बारा महिन्यांची कालगणना करितात; ते बारा महिने ह्मणजे १ मोहरम, २ सफर, ३ रबीलावल, ४ रबीलाखर, ५ जमादिलाखर, ६ जमादिलावल्, ७ रज्जब, ८ साबान, ९ रमजान, १० सव्वाल, ११ जिल्काद, आणि १२ जिल्हेद, हे आहेत; त्यांतील रमजान हा उपवासाचा, व मोहरम, रज्जब, जिल्काद, व जिल्हेज हे चार महिने पवित्र ह्मणून मानण्यांत येतात. मुसलमान लोकांत हिंदूंप्रमाणेंच लग्नाच्या बाबतींतील सर्व अधिकार वधुवरांच्या आईबापाकडेसच असतो; त्याप्रमाणेंच त्यांच्यांत लग्नें लावण्याचा अधिकार फक्त काजीस मात्र असून त्याच्या खेरीज अथवा त्याच्या हुकूमाखेरीज लग्न लागूं नये, असा त्यांच्यांत निर्बंध असतो; लग्न होण्याच्या आधीं "हेन्नाबंदी"चा ह्मणजे नवऱ्या मुलाचे हात हेन्ना ( मेंदी ) नें रंगविण्याचा विधी करण्यांत येतो, आणि हिंदू लोकांतील हळदीप्रमाणेंच वधूच्या घरून हा हेन्ना नवऱ्या मुलाच्या हातापायास लावण्याकरितां येत असतो. राजेरजवाडे, अमीर उमराव, जहागिरदार जमिनदार वगैरे बडे लोकांमधील हा विवाह समारंभ असल्यास हेन्ना बरोबर दागदागिने, मौल्यवान नजरनजराणे व पोषाख पाठविण्यांत येतात आणि हेन्ना लावण्याचा विधी मोठ्या थाटानें करण्यांत येतो; हेन्नाचा विधी आटोपल्यावर वराकडील मांडवांत दरबारचा समारंभ होतो; त्यावेळीं नाच अथवा गाणे होतें; बाहेर दारूकाम सोडण्यांत येतें सर्व नजराणे मोठमोठ्या ताटांत घालून मांडून ठेवण्यांत येतात; व रात्रीं थाटाची मेजवानी होते. त्यानंतर निश्चित झालेल्या विवाहकालापूर्वीं मोठ्या भपक्याची व जमावाची मिरवणूक निघून नवरा मुलगा वाजत गाजत वधूच्या घरीं जातो; निश्चित कालीं लग्न लागून, पानसुपारी, अत्तरगुलाब, दारूकाम, व आषतबाजी सोडणें, वगैरे सह मोठ्या थाटाचा समारंभ होतो; त्यानंतर वराकडून वधूस देणगी देण्यांत येते, व मेजवान्या, खाने, शेवटीं परत भेटी, व परत पोषाखाचा दरबार होऊन हा समारंभ पूर्ण होतो.

महंमदाच्या मृत्यूनंतर ( इ. स. ६३२ ) त्याच्या गादीवर मदीना येथें लोकांनीं निवडलेले चार खलीफा एकामागून एक गादीवर आले; तेः–१ अबुबकर ( इ. सन ६३२ ते ६३४ ) २ उमर, ( इ. सन ६३४ ते ६४४ ) ३ उस्मान, ( इ. सन ६४४ ते ६५६ ) आणि ४ अली, ( इ, सन ६५६ ते ६६१ ). या चार खलीफांची मिळून एकंदर कारकीर्द

२९ वर्षांची असून या काळास "अरब लोकसत्ताक राज्य" अथवा "अरब रिपब्लिक" असें ह्मणतात. या चार खलीफांपैकीं पहिले दोघे महंमदाचे सासरे, व दुसरे दोघे त्याचे जांवई असून ते चारांही महंमदाचे सरदार होते. या चारी खलिफांचें आचरण महंमदाप्रमाणेंच शुद्ध आणि पवित्र असून ते साधुप्रमाणें रहात असत व त्यांना मदिना येथील महंमदाच्या शिष्यांच्या लोकसभेनें निवडिलेले असून त्यांना "हजरत" अशी संज्ञा आहे. यांपैकीं चवथा खलीफा अल्ली यास महंमदाची मुलगी नामें फातिमाबिबी ही दिली होती, व या बाईपासून त्यास हसन व हुसेन असे दोन मुलगे झाले होते; याचे मुलांच्या वंशजांस "सय्यद" असें ह्मणतात, हे लोक आपल्या डोक्यास हिरवें पागोटें अथवा पटका बांधितात; सर्व मुसलमानांत सय्यद हे श्रेष्ठ गणले जातात. व त्यांच्यांत हिंदूलोकांतील श्रेष्ठ जातीप्रमाणेंच स्त्रियांचे पुनर्विवाह होत नाहींत. अल्लीस फातिमाबिबीशिवाय इतर बायका होत्या. व त्यांच्यापासूनही त्यास संतती झाली होती. या संततीस व तिच्या पुढील वंशजांस "अलवी" अशी संज्ञा आहे.

पहिला खलीफा अबूबकर हा बराच वृद्ध होता; त्यामुळें दोनच वर्षांनीं (इ. सन ६३४ मध्यें) तो मृत्यू पावला. याच्या कारकीर्दीत मदिना शहराजवळच मोसिलामा या नांवाच्या मनुष्यानें एक मोठें बंड उभारिलें; परंतु अबूबकरचा प्रसिद्ध व शूर सरदार खालेद यानें तें नामशेष करून टाकिलें; त्यानंतर अरबसैन्य तुर्कस्थान आणि इराण या देशांकडे वळलें; आणि खालेद यानें दमास्कस हें सुसंपन्न शहर हस्तगत करून घेतलें. अबुबकूर नंतर उमर हा खलीफा गादीवर आला त्यानें त्याचवर्षी आपला शूर सरदार अमरु याच्या सेनापतित्वाखालीं सीरिया प्रांत व जरूसलेम, रोमन लोकांपासून काबिज करविलें. यावेळीं रोमन लोकांच्या कवायती फौजेनें अरबांचा प्रतिकार करण्याचा मोठ्या नेटानें प्रयत्न केला; परंतु त्यांत मुसलमानांनीं त्यांना माघार घेणें भाग पाडून तें शहर आपल्या हस्तगत करून घेतलें; त्यामुळे रोमन बादशहा हिराक्लियस यास येशू ख्रिस्ताचा अस्सल क्रूस आपल्या पूर्व रोमन साम्राज्याच्या राजधानींत कान्स्टांटिनोपल येथें मोठ्या दुःखानें नेऊन जतन करून ठेवावा लागला. तथापि हा प्रदेश व ख्रिस्ताची पवित्र भूमी परत मिळविण्याकरितां रोमन लोकांनीं सतत तीन वर्षें-इ. सन. ६३७ पर्यंत-मोठ्या चिकाटीनें आपले प्रयत्न एक सारखे चालू ठेवले होते, परंतु त्याचा कांहींही उपयोग न होतां अखेरीस सीरिया प्रांत व जरूसलेम अरबांच्याच ताब्यांत राहिलें. त्यानंतर त्याच शूर सेनानायकानें-अमरु यानें-रोमन लोकांपासून इजिप्त देश हस्तगत करून घेतला, व सतत एक वर्षपर्यंत त्या देशाची राजधानी अलेक्झांड्रिया येथें रोमन लोकांशीं मोठ्या निर्वाणीचा युद्धप्रसंग करून त्यानें रोमन लोकांस तें शहर सोडून जाणें भाग पाडिलें. थोडक्यांत ह्मणजे मुसलमान लोकांनीं रोमन लोकांकडून

इजीप्तसुद्धां आफ्रिका खंडाचा सर्व उत्तर किनारा जिंकून आपल्या ताब्यांत आणिल्यामुळें या व्यापक प्रदेशाचा पुढील इतिहास बदलून गेला, व दक्षिण युरोपप्रमाणें त्यांत पुढें सुधारणा न होतां तो आजतागायत पुष्कळच प्रमाणांत मागसलेल्या स्थितींत राहिला.

अरब लोकांनीं, जगांतील वाङ्मयविषयक निरनिराळ्या बाबतींत अमोल्य भर घातली, याबद्दल इतिहासांत अनेक दाखले उपलब्ध आहेत; पण त्याप्रमाणेंच, त्यांनीं जगांतील अमोल्य ज्ञानसंग्रहाचा नाश केला असाही उल्लेख आढळतो; अमरू यानें अलेक्झांड्रिया शहर हस्तगत केल्यानंतर त्यास त्या ठिकाणीं एक मोठें भव्य, पुरातन, व रोमन लोकांनीं मोठ्या काळजीनें जतन करून ठेविलेलें महत्वाचें ग्रंथसंग्रहालय असल्याचें आढळून आलें. तेव्हां "त्याची काय व्यवस्था करावयाची," असें त्यानें खलिफा उमर यास विचारिलें; त्यावर खलिफानें अमरू यांस असें लिहून कळविलें कीं, "जर हा ग्रंथसंग्रह आपल्या धार्मिक ग्रंथांशीं मिळता असला तर तो जतन करून ठेवण्याची मुळीं आवश्यकताच रहात नाहीं; आणि जर तो कुराणाच्या विरुद्ध असला तर तो मुळींच अस्तित्वांत ठेवणें इष्ट नाहीं; सबब तो जाळून टाकावा." खलीफाचें असें उत्तर आल्यावर अमरूनें तो सर्व ग्रंथसंग्रह जाळून टाकिला; आणि त्यासंबंधीं असा प्रवाद आहे कीं, तो संग्रह एवढा मोठा होता कीं, अलेक्झांड्रिया येथील चारशें हमामखान्यांमध्यें ( स्नानगृहें ) सहा महिनेपर्यंत त्या पुस्तकांवर अंघोळीचें पाणी तापविण्यांत येत होतें. ( इ. सन ६४० ) गिबननें आपल्या इतिहासांत ही गोष्ट खरी नाहीं असें ह्मटलें आहे; आणि त्याप्रमाणें ती खरी नसल्यास उत्तमच आहे; तथापि ती खरी असल्यास मात्र अरब लोकांच्या कर्तृत्वास कमीपणा आणणारी आहे; शिवाय अमरु हा पुष्कळच बरा ह्मणविला जाईल असले-चंगीझखान, तैमूरलंग, नादीरशहा, यांच्याप्रमाणें-क्रूरकर्मे जगांत निर्माण झालेले आहेत; व त्यांत चंगीझखानास अग्रस्थान दिल्यास तें शोभण्यासारखें आहे; हा सरदार इ० सन ११६२ मध्यें मोंगल वंशांत जन्मास आला. तो अतिशय शूर, धाडशी व पराक्रमी, पण महाभयंकर क्रूरकर्मा, व मानवी जातीचा महान् शत्रू होता; आणि त्यानें आपल्या आयुष्याच्या शेवटच्या नुसत्या वीस वर्षांतच एक कोटी चाळीस लक्ष (१,४०,०००००) मनुष्यांची कत्तल केली, असा उल्लेख आढळतो. त्याप्रमाणेंच तो इतका अडाणी होता कीं, तो विद्येचा व धर्माचा नेहमीं उपहास करीत असे, आणि ईश्वर ह्मणजे काय याची तर त्याला तिळमात्रही ओळख नसे. शिवाय त्यानें ज्याप्रमाणें भयंकर कत्तली केल्या त्याप्रमाणेंच आशिया खंडांतील अत्युत्तम पुस्तकालयांतील अमोल्य ग्रंथसंग्रहालयांचा उपयोग त्यानें आपल्या घोड्यांना मऊ पथाऱ्या करण्याकडे केला. त्याप्रमाणेंच त्याला आपल्या धर्माचीही ओळख नव्हती व दुसऱ्यांच्या धर्माची तर ओघा

ओघानेंच त्यास किंमत न वाटणें स्वाभाविक होतें. त्यामुळें त्यानें एकदां बायबलची (ख्रिस्ती लोकांच्या धर्मग्रंथाची) होळी केली तर एकदां प्रत्यक्ष बुखारा येथील मशीदींतील कुराणही त्यानें घोड्याकडून तुडविलें! ही गोष्ट तो जिवंत असतांनाची आहे. पण आपल्या मृत्यूपूर्वीही या रुधिरप्रीय मनुष्यानें आपल्या मृत्यूनंतर आपल्या आत्म्याच्या शेवेकरितां चाळीस कुमारिकांचे आत्मे पाहिजेत अशी आज्ञा केली होती; त्याप्रमाणें तो मृत्यू पावला तेव्हां चाळीस कुमारिकांना ठार मारण्यांत आलें! चंगीझखान हा इ. सन. १२२७ मध्यें कास्पियन समुद्राच्या कांठीं मृत्यू पावला. या पुरुषाइतका अत्यंत बलाढ्य, पण तितकाच क्रूर, अडाणी, अविवेकी व अनावर असा पुरूष निपजल्याचें इतिहासांत दुसरें उदाहरण दृग्गोचर होत नाहीं; आणि त्यामानानें खलीफा उमर व त्याचा सरदार अमरू हे पुष्कळच बरे असें ह्मटल्याशिवाय रहावत नाहीं.

सीरिया व इजिप्त या देशांप्रमाणेंच याच काळांत अरब लोकांनीं इराण देश जिंकून घेतला. यावेळीं इराण देशांत सासानिध उर्फ सासान कुळांतील येझदिजिर्द या नांवाचा राजा राज्य करीत होता. अरब लोकांनीं इराणच्या राज्याच्या अमलाखालील ईराक्श हें शहर हस्तगत करून घेतलें, तेव्हां तें परत घेण्याकरितां, येझदिजिर्द यानें फिरुकशाद या नांवाच्या आपल्या एका शूर सरदाराबरोबर एक मोठें सैन्य देऊन त्यास त्यांच्यावर पाठविलें; परंतु अरब सरदार सादएब्न वाकास यानें त्याचा पूर्ण पराभव करून त्यास माघार घेणें भाग पाडिलें. (इ० सन ६३८) तथापि उभयतां मधील हें युद्ध समाप्त न होतां पुन्हां पुढें इ० सन ६४१ मध्यें नाव्हेंद या ठिकाणीं मोठ्या जोराचें युद्ध झालें; अखेरीस अरब सरदार नोमन यानें इराणी सैन्याची पूर्णपणे धुळधाण उडविली; राज्यकर्ता येझदिजिर्द हा मारला गेला, आणि साडे चारशें वर्षें इराण देशावर राज्य करीत असलेल्या सासान घराण्याचा नाश होऊन त्या देशावर अरब लोकांचा अंमल चालू झाला;

अशा रीतीनें इराण देश अरब लोकांच्या ताब्यांत गेल्यानंतर त्यांनीं त्या देशांतून सीरिया देशाप्रमाणेंच पुष्कळ गुलाम पकडून स्वदेशांत आणिले; अशा गुलामापैकीं एकाचा न्याय करीत असतां त्यानें खलीफा उमर यास सुऱ्यानें भोंसकून ठार मारिलें; (इ० सन ६४४) त्यानंतर लोकसभेनें त्याच्या जागीं उस्मान याची खलीफा ह्मणून नेमणूक केली.

खलीफा उमर हा विशेष शिस्तीचा व साधा पुरुष होऊन गेला; त्यास डामडौल आवडत नसे; या काळापर्यंत हिजरी सन फारसा प्रचारांत नव्हता, तो या खलीफानें चालू केला, आपल्या सैन्यास नियमीतपणें पगार देण्याची व वृद्ध आणि व्यंगास्त्र आलेल्या सैन्यांतील लोकांना बैठें वेतन देण्याची त्यानें नवी पद्धत सुरू केली; सारांश हा खलीफा मोठा कर्तृत्ववान, शूर व नामांकित होऊन गेला यांत संदेह नाहीं.

खलीफा उमर नंतर गादीवर आलेला खलीफा उस्मान, हाही मोठा शूर व पराक्रमी असून त्यानें आपल्या कारकीर्दींत एक प्रचंड आरमार तयार केलें, आणि भूमध्य समुद्रावर आपली सत्ता प्रस्थापित करून माल्टा, ऱ्होडस, ग्रीस, आणि आफ्रिकेचा उत्तर भाग जिंकून आपल्या ताब्यांत आणिला. प्रसिद्ध व पुरातन शहर कार्थेज जिंकून घेऊन त्याचा विध्वंस उडविला, व या सर्व प्रदेशाचा तो पूर्ण सत्ताधीश बनला. या खलिफानें आपल्या कारकीर्दींत कुराणाची एक प्रत शुद्ध करवून बाकीच्या अस्तित्वांत असलेल्या सर्व प्रती जाळून टाकिल्या; हीच शुद्ध प्रत आज तागायत अस्तित्वांत व चालू राहिलेली आहे. या काळापासून मुसलमानांत आपसांत वर्चस्व प्राप्तीकरितां भयंकर द्वेषभाव उत्पन्न होऊन त्यांतच या खलिफाचा वध झाला, व चवथा खलिफा अल्ली हा गादीवर आला. या चारी खलिफांच्या कारकीर्दींत मुसलमानांचें अतिशय महत्व वाढलें; त्यांनीं निरनिराळ्या-व्यापक प्रदेशावर आपलें राजकीय व धार्मिक वर्चस्व प्रस्थापित केलें; तुर्कस्थान, सीरिया, इराण, काबूल, तार्तरी, मिसर वगैरे देशांवर स्वाऱ्या केल्या, आणि थेट हिंदुस्थान देशा-पर्यंत आपलें राजकीय आकर्षण आणून भिडविलें.

चवथा खलीफा अल्ली याच्या कारकीर्दींत मुसलमानांतील आपसांतील द्वेष-भावाची परमावधी झाली; आणि त्यांत अल्लीचा खून होऊन त्याचे मुलगे हसन व हुसेन हे इराणांत पळून गेले, व उमईद वंशांतील मुआविया या नांवाच्या एका शूर पुरुषानें (हा सीरिया प्रांताचा सुभेदार होता.) मदिना येथील खिलाफत बळकावून ती दमास्कस येथें नेली. (इ० सन ६६१) त्यानंतर त्यानें हसन व हुसेन यांचा पिच्छा पुरवून त्यांचा व त्यांच्या विस्तृत वंशाचा मोठ्या क्रूरपणानें नाश केला. पैगंबराच्या वंशाची ही मोठी क्रूर कत्तल हल्लीं मुसलमान लोक ताबुतांत दाखवितात. यासंबंधीं थोडक्यांत अशी हकीकत आहे कीं, मुआवियाचा मुलगा यजीद यानें,–इ. सन ६६९ यावर्षी–अल्लीचा वडील मुलगा हसन यास विष प्रयोग करून ठार मारिलें; आणि त्याचा धाकटा भाऊ हुसेन यास मी "खलिफा" आहे, अशी त्यानें शफत पूर्वक कबूली द्यावी म्हणून त्यास अतिशय आग्रह केला; परंतु हुसेन हा तशी शफत घेऊन कबूली देईना; त्यामूळें यजीद यास अत्यंत राग येऊन त्यानें हुसेनवर सैन्य पाठविलें, व त्याच्याशीं घनघोर संग्राम केला. या युद्धास सकाळपासून प्रारंभ झाला, व त्यांत हुसेनचे सर्व सोबती एकामागून एक तीर लागून मृत्यू पावले. यापैकीं सतरा माणसें फातिमाच्या औरस वंशांतलि होतीं. शिवाय हुसेनचीं लहान लहान मुलेंही तीरांच्या जखमांनीं मृत्यू पावलीं; हुसेन यांस सर्व शरीरभर चौतीस जखमा लागून–आणि त्याच्या अंगांत तीस तीर राहून–तोही शेवटीं मृत्यू पावला।

व या भयंकर कत्तलींतून हसन व हुसेनची बहीण नामें झैनाब, व अली आणि उमर हे दोन मुलगे, एवढींच माणसें कायतीं बचावून जिवंत राहिलीं.

मुसलमानांत शीया व सुनी असे दोन पंथ आहेत; त्यापैकीं शिया पंथाचा कल, व त्यांची धार्मिक व इतर मतें हिंदूधर्माशीं बऱ्याच प्रमाणांत मिळतीं असून ते देवभोळे आहेत; पैगंबरानंतर जे पहिले तीन खलीफा झाले, त्यांचा पैगंबराशीं शरीर संबंध पोहोंचत नसल्यामुळें ते माननीय नाहींत, असें या पंथांतील लोकांचें मत असून ते पहिल्या तीन खलीफांस मानीत नाहींत; तर महंमद पैगंबराच्या वंशासच ते भजतात; ह्मणजे सय्यद घराण्याच्या शरिरांतील धमन्यांतून महंमद पैगंबराचें शुद्ध रक्त अद्यापि खेळत आहे. असें समजून ते पैगंबराच्या वंशास भजतात, व हिंदुंच्या मूर्तिपूजेच्या धर्तीवर ताबुतांत हुसेनचें भजन करितात; थोडक्यांत ह्मणजे अलीच्या पक्षास शिया ह्मणतात. उलटपक्षीं सुनी पंथाचा कल व त्यांचीं धार्मिक व इतर मतें हिंदू धर्माशीं पुष्कळच अंशीं विरोधी आहेत; व हिंदूधर्म ह्मणजे निव्वळ मूर्तिपूजा, असें त्यांचें मत आहे. ते देवभोळे नाहींत, व परमेश्वराचें स्वरूप, पुनर्जन्म वगैरे बाबतींतील त्यांचीं मतेंही हेकेखोरपणाचीं नाहींत. पैगंबरानंतर जे चार खलीफा होऊन गेले ते मादिना येथील धर्मसभेनें निवडलेले असल्यामुळें ते माननीय आहेत असें समजून या पंथांतील लोक पहिल्या चारी खलिफांस मानितात, आणि महंमदाच्या औरस वंशजांत दैविक अंश आहे असें त्यांना वाटत नाहीं, त्यामुळें ते पैगंबराच्या वंशजांस भजत नाहींत. शिया व सुनी या पंथांतील विरोधाचें स्वरूप थोडक्यांत वर लिहिल्याप्रमाणें आहे!

इ० सन १५१६ मध्यें कान्स्टांटिनोपल येथील बादशहा पहिला सेलीम ऊर्फ सुलेमान धी ग्रेट यानें ईजिप्त देश जिंकून आपल्या राज्यात जोडिला, त्यावेळीं त्यानें पैगंबराच्या अस्थि व तेथील आब्बासी वंशांतील खलीफा मूतवाकिल यांजकडून खिलाफतीचें पद आपणास प्राप्त करून घेतलें. तेव्हांपासून ऑटोमन ह्मणजे युरोपांतील टर्कीचा बादशहा यांसच मुसलमान लोक सर्व साधारणतः आपला खलीफा असे मानितात परंतु तो महंमदाच्या वंशापासून जन्मलेला नसल्यामुळें शियापंथी कट्टे मुसलमान त्यास आपला खलीफा न मानितां इराणच्या शहास आपला खलिफा मानितात, त्याप्रमाणेंच मोरोक्को व त्याच्या आसपासच्या प्रदेशांतील मुसलमान लोक मोरोक्कोच्या सुलतानास आपला खलीफा समजतात; तथापि हल्लीं मुसलमानी धर्माचा पूर्वीप्रमाणें प्रसार होत नसल्यामुळें तुर्कस्थान ऊर्फ टर्कीच्या सुलतानासच सर्व साधारणतः खलीफा मानण्यांत येत असतें; थोडक्यांत ह्मणजे शिया व सुनी या उभयतां पंथांचा त्यांच्या धर्माशीं कोणत्याही प्रकारें संबंध नसून उभयतांचें "कुराण" हेंच धर्मपुस्तक आहे. तथापि त्या पंथांमध्यें वर

लिहिलेला महत्त्वाचा विरोध असून त्यामुळें त्यांच्यांत पुढें भयंकर युद्धकलह माजून गेले आहेत.

हिंदुस्थानांत दिल्ली येथें मोंगली साम्राज्याची स्थापन करणारा बादशहा जहिरुद्दीन महंमद बाबर हा शिया पंथीं होता. तो मोठा भाविक असून इराणांत करबेला येथें हुसेनची कत्तल झाल्यावर त्यास ज्या ठिकाणीं पुरण्यांत आलें, त्याठिकाणीं जाऊन त्याच्या कबरीचें दरवर्षी नियमानें एक वेळां दर्शन घेत जावें, असा त्याचा पुष्कळ वर्षांपासून क्रम होता; व हिंदुस्थानांत येऊन राज्यसंस्थापना करीपर्यंत त्यानें तो नियमितपणें सुरू ठेविला होता. परंतु त्यानंतर राज्य कारभार दुसऱ्यावर सोंपवून हुसेनच्या कबरीचें दर्शन घेण्यास करबेला येथें जाणें त्यास राजकीय परिस्थितीच्या अस्थिरपणामुळें अशक्य झालें. त्यावेळीं त्यानें आपणाजवळील मौलवी लोकांना या बाबतींतील शास्त्रार्थ विचारिला; त्यावर कुराणांतील वचनें व आधार काढून त्या धोरणानें त्यांनीं त्यास असें सांगितलें कीं, "करबेला येथें जी हुसेनची कबर आहे, तिची दरवर्षी प्रतिमा करून तुह्मी तिचें दर्शन घेत जा; ह्मणजे प्रत्यक्ष करबेला येथें जाऊन हुसेनच्या कबरीचें दर्शन घेतल्याप्रमाणेच होईल. कारण खुद्द पैगंबरालाही मक्केंतून पळाल्यावर अशीच प्रतीमा करावी लागली होती." बाबर यांस मौलवी लोकांचें हें ह्मणणें योग्य वाटलें; व त्यानें दहा दिवस हुसेनच्या मृत्यूचा समारंभ करण्यास सुरवात केली.

अशा रीतीनें खुद्द बादशहा बाबर यानेंच दरवर्षी हुसेनची प्रतिमा करण्याचा प्रघात सुरू केल्यानंतर त्याचे सर्व सरदार, दरकदार व देशभर पसरलेली इतर मुसलमान मंडळी यांनींही त्याचेंच अनुकरण केलें; आणि हिंदुस्थानांत ताबूत करण्याचा प्रघात सुरू होऊन पुढें पुढें तर तो इतका वाढला कीं, अनेक हिंदू लोकसुद्धां ताबूत करूं लागले. हा प्रघात इराणांत खुद्द करबेला येथेंही प्रचलीत नसून तो फक्त हिंदुस्थानांतच आहे. हे ताबूत मुसलमानी मोहरमच्या महिन्यांत होतात. "चांद-रात" ह्मणजे ज्या दिवशीं चंद्र दिसेल त्या दिवशीं आलाव्या जवळ कुदळी मारितात; त्यानंतर पांचव्या तारखेस स्वाऱ्या बसतात; सातव्या तारखेत स्वाऱ्या उठून "हुजूम" करितात; ह्मणजे गांवांत फिरतात. नवव्या तारखेस ताबूत व स्वाऱ्या हुजूम करण्याकरितां बरोबर उठतात. याच तारखेची रात्र ही कत्तलीची असल्यानें तिला मुसलमान लोक "कत्तलकी रात" असें ह्मणतात. त्यानंतर दुसऱ्या दिवशीं ह्मणजे दहाव्या तारखेस दुपारनंतर चार वाजतां ताबूत व स्वाऱ्या थंड्या होण्याकरितां आपल्या जागेवरून उठतात. या दहा दिवसांत धर्मनिष्ठ मुसलमान लोक उपवास पाळितात; व "मातम" दुःख प्रदर्शन करितात. त्याप्रमाणेंच दहाव्या तारखेनंतर तीन दिवसांनीं ह्मणजे तेराव्या तारखेस "खतम" देतात; ह्मणजे हिंदू लोकांत ज्याप्रमाणें मृत मनुष्याच्या सुतकांतून मोकळे

झाल्यावर आपल्या इष्टमित्र मंडळीसह एकत्र जमून त्याचा " दिवस " अथवा " तेरावा " करितात, त्याप्रमाणेंच मुसलमान लोकही हुसेनचा दिवस करितात. कत्तलच्या रात्रीं, व दहाव्या तारखेस दिवसा—ताबूत व स्वाऱ्या थंड्या होण्याकरितां उठतात त्या दिवशीं ठिकठिकाणीं साखरपाणी व सरबत ठेवण्याची, व तें लोकांना फुकट पाजण्याची व्यवस्था करण्यांत येतें; शिवाय या दहा दिवसांत आणि मुख्यत्त्वें करून नवव्या व दहाव्या तारखेस फकीर, गरीब, निराश्रित वगैरे लोकांना अन्न, पैसा, कपडा, इत्यादी रूपानें दानधर्म करण्यांत येतो. ईश्वराची अथवा विभूतींची प्रतिमा करून तिची पूजा करणें हें मुसलमानी धर्मांत पाप गणिलेलें आहे; त्यामुळें कित्येक मुसलमान ताबूत करीत नाहींत; अथवा या उत्सवांत भागही घेत नाहींत; तथापि ही संख्या अल्प असून मोंगली बादशाहत स्थापन झाल्यानंतर पुढील वैभव संपन्न कालापासून ताबूतांचा प्रचार इतका वाढला कीं, ठिकठिकाणीं भजन-पूजन चालून त्यास हिंदू लोकांच्या देवस्थानाप्रमाणें महत्व प्राप्त झालें; आणि आज तागायत ही तें तसेंच कायम आहे.

ताबुताच्या सणाप्रमाणेंच " ईद " या सणाचेंही मुसलमानांत विशेष महत्व मानिलेलें आहे; हा सण रमजान महिन्यांच्या अखेरीस असतो. रमजान महिन्याच्या शेवटच्या तारखेस चंद्रदर्शन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशीं, शास्त्राप्रमाणें ईदीचा दिवस धरितात; त्या दिवशीं चंद्रदर्शन झालें नाहीं तर दुसऱ्या दिवशीं ईद न धरितां, दुसऱ्या दिवशीं पुन्हां चंद्रदर्शन करून किंवा त्या दिवशीं चंद्रदर्शन न झालें तरी त्याच्या दुसऱ्या दिवशीं ईद धरावी, असा शरा आहे. चंद्र दर्शन करून दुसऱ्या दिवशीं ईदीच्या संबंधानें मशीदींत नमाज व खुत्बा करितात; आणि चंद्र दर्शन झाल्याशिवाय रमजानच्या उपासाची पारणा होत नाहीं; इतकेंच नाहीं तर शराप्रमाणें सुमारें साडे अकराच्या पलीकडे नमाज व खुत्बा करणें, ह्या गोष्टी धर्म बाह्य ( मकरूब ) मानिलेल्या आहेत.

वर वर्णन केल्याप्रमाणें उमईद अथवा ओमियादी वंशांतील सीरिया प्रांताचा सुभेदार मुआविया यानें मदिना येथील अरबी खिलाफत महंमदाच्या मृत्यू नंतर तीसच वर्षांत दमास्कस येथें नेऊन ( इ० सन ६६१ या वर्षी ) तें शहर आपल्या राजधानीचें ठिकाण केलें. त्यानंतर त्या ठिकाणीं ती इ० सन ७५० पर्यंत ह्मणजे ८९ वर्षें टिकली या अवधींत अरबांनीं आशिया मायनर जिंकिल्या नंतर पूर्व रोमन बादशाहतीची राजधानी असलेल्या कान्स्टांटिनोपल या अति प्रसिद्ध, व विशेष महत्वाच्या शहराला शह देऊन युरोप खंडाचें पूर्व नाकें असलेली महत्वाची अशी बास्फरसची सामुद्रधुनी हस्तगत करून घेण्याचा पांच वर्षें—इ० सन ६७३ ते ६७७ [पर्यंत सतत] प्रयत्न केला; परंतु त्यांत त्यांना यश आलें नाहीं. तथापि अरब लोकांचा या नाक्याच्या ठाण्यावर विशेष

डोळा असल्यामुळें त्यानंतर पुन्हां चाळीस वर्षांनीं इ० सन ७१७-१८ मध्यें, त्यांनीं पुन्हां तें ठिकाण हस्तगत करून घेण्याचा प्रयत्न केला; परंतु रोमन बादशहा लिओ इसोरियन यानें याही वेळीं त्यांचा प्रयत्न हाणून पाडून त्यांना माघार घ्यावयास लाविलें; पण इतकें झालें तरी अखेरीस ओटोमन तुर्कांनीं दुसऱ्या महंमदाच्या कारकीर्दीत ( इ० सन १४५१ ते १४८० ) कान्स्टांटिनोपल व बास्फरसची सामुद्रधुनी इ० सन १४५३ मध्यें आपल्या हस्तगत करून घेतली; ती आजतागायत त्यांच्याच ताब्यांत आहे.

खलीफा मुआविया, हा, वीस वर्षें राज्यकारभार करून इ० सन ६७९ मध्यें मृत्यू पावला; याच खलिफाच्या कारकीर्दींत खलीफा नेमण्याच्या पूर्वपद्धतींत फेरबद्दल करण्यांत आला, व हें पद नेहमीं स्वतःच्या वंशाकडेच चालत रहावें, अशी नवी पद्धती त्यानें सुरू केली; परंतु त्यामुळें लोक सभा नामशेष झाली; खलीफावरील जनतेचा दाब नाहींसा झाला व एकतंत्री, कारभार सुरू होऊन पुढें खलीफत कमजोर होत गेली. मुआवियाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा यर्जाद, त्यानंतर दुसरा मुआविया, व नंतर मरवान, असे तीन साधारण कर्तृत्वाचे खलीफा गादीवर आले. त्यानंतर अब्दुल मालिक या नांवाचा एक शूर व कर्तृत्ववान खलीफा इ०सन ६८४ मध्यें गादीवर आला. त्याच्या जवळ तरिक या नांवाचा एक मोठा शूर सेनानायक होता; त्यानें युरोप खंडाच्या नैऋत्य व स्पेन देशाच्या दक्षिण टोंकावर एक "जेबल" ह्मणजे किल्ला बांधुन त्यास आपलें "जेबल-तारिक "-ह्मणजे तरीकनें बांधिलेला किल्ला हें नांव दिलें; हाच प्रसिद्ध जिब्रालटरचा किल्ला होय; युरोप आणि आशिया या दोन्हीं खंडांमध्यें अतिशय प्राचीन काळापासून व्यापार चालू असून प्राचीन काळीं ह्मणजे इ० सनापूर्वी दोन हजार वर्षांचे अगोदर तो खाल्डियन लोकांच्या ताब्यांत होता; पुढें अरब आणि फिनिशीयन या उभयतांनीं त्यांत प्रमुख स्थान मिळविलें यापैकीं फिनिशियन लोकांचें राज्य भूमध्य समुद्रावर सीरिया प्रांताच्या किनाऱ्यास होतें, व इ० सनापूर्वी एकहजार वर्षांपासून इ० सनापूर्वी पांचशेंपर्यंत ह्मणजे पांचशें वर्षेपर्यंत तें व्यापारामुळें अतिशय संपन्न बनलेलें होतें; या फिनिशियन लोकांची एक शाखा आफ्रिका खंडाच्या उत्तर किनाऱ्यावर उदयास आली, व तिनें सिसिली बेटानजीक आफ्रिका खंडाचें टोंक ज्या ठिकाणीं भूमध्य समुद्रांत जाऊन घुसलें आहे, त्याठिकाणीं कार्थेज हें शहर व बंदर वसवून तेथें आपलें एक स्वतंत्र राज्य स्थापन केलें; आणि कार्सिका, माल्टा, सार्डीनिया, स्पेनचा दक्षिण भाग व त्या देशालगतचीं बेटें, हीं आपल्या अमलांखालीं आणिलीं; या राज्यांतील फिनिशियन लोक पूर्वेकडील देशाशीं व्यापार करून अतिशय सधन झाले होते; त्यामुळें रोमन लोकांत त्यांच्यासंबंधीं अतिशय स्पर्धा उत्पन्न होऊन त्यांनीं फेनीशियन लोकांस

नामशेष केलें, व कार्थेज येथें रोमन अंमल सुरू केला; हेंच कार्थेज शहर अब्दुल मलिक या खलिफाच्या कारकीर्दीत मुसलमान लोकांनीं जाळून टाकिलें. या काळांत रॉड्रिक या नांवाचा एक राजा स्पेनमध्यें राज्य करीत होता; त्यानें आपला शूर गॉथ सरदार काउंट ज्यूलियन यास अतिशय वाईट रीतीनें वागविलें; त्यामुळें रॉड्रिक याचा सूड उगविण्याकरितां त्यानें मुसलमान लोकांस स्पेनमध्यें बोलाविलें; त्याप्रमाणें त्यांचा दुसरा प्रसिद्ध सरदार अब्दूर्रहमान यानें इ० सन ७११ मध्यें, साधु स्वभावाचा खलिफा दुसरा उमर याच्या कारकीर्दीत त्याच्या हुकुमानें जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीमधून स्पेन देशांत जाऊन तो देश हस्तगत करून घेतला.—आफ्रिका खंडांतील ट्यूनिस प्रांत आपल्या हस्तगत करून घेऊन कैरो ऊर्फ कायरो हें शहर वसविलें—आणि पिरनीज पर्वत ओलांडून अरबांनीं फ्रान्स देशावर चाल केली; परंतु टुर्स येथील विध्वंसकारक पराजयानंतर मुसलमान लोक आजतागायत पुन्हा पिरनीज पर्वताच्या पलीकडे गेले नाहींत;

खलीफा मुआविया याच्या कारकीर्दीपासून निव्वळ " जन्माचा योगायोग " ( Accident of Birth ) अथवा " जन्मयोग " प्रधान मानिला गेल्यानें मुसलमानांचें राजकीय दृष्ट्या जेवढें नुकसान झालें, त्याहूनही पुष्कळच अधिक पटीनें टुर्सच्या विध्वंसकारक पराजयामुळें तें झालेलें आहे; आणि युरोपियन राष्ट्रांवरील भयंकर अरिष्ट नाहींसें होऊन पुढें तें खंड सुधारणा संपन्न व श्रीमान बनलेलें आहे.

या काळानंतर लवकरच इ० सन ७५० मध्यें दमास्कस येथील उमईद वंश नामशेष झाला; तथापि या वंशांतील खलीफांचें वैभव असामान्य असून त्यांच्या राजधानीचें शहर दमास्कस हें अतिशय श्रीमंत व सौंदर्यवान होतें. आणि त्याची त्या काळांत जगांतील सर्व शहरामध्यें " पहिल्या प्रतीचें उत्तम शहर " म्हणून गणना होत होती. सर्व शहरभर पाण्याचा मुबलक पुरवठा व्हावा म्हणून सात मोठमोठाले कालवे बांधून शहरांत आणिले होते. नळ बांधून सर्व शहरभर तें खेळविण्यांत आलें होतें आणि थोडक्यांत म्हणजे मोठमोठे वाडे, इमारती, खलिफांचे राहते वाडे, विस्तिर्ण बागा, ठिकठिकाणीं पाण्यानें भरलेले हौद, व पाणी उडत असलेली कारंजी, नक्षीदार कमानी, घुमट, मनोरे वगैरे साधनांनीं त्या शहरास कल्पनातित शोभा व रमणीयता प्राप्त झाली होती.

खलीफा मुआवियानें अल्लीच्या वंशाचा पाडाव करून मदिना येथून दमास्कस येथें खिलाफत नेल्यावेळेपासून या उभयतां वंशामध्यें हाडवैर चालत आलेलें होतें, आणि अलीचा वंश मुआवियाच्या वंशाचा पाडाव करण्याची संधी पहात होता. त्याप्रमाणें इ० सन ७५० मध्यें या वंशांतील शेवटचा खलीफा मरवान ( दुसरा ) हा गादीवर असतांना

महंमद पैगंबराचा चुलता अब्दुल आब्बास यानें त्याचा झाब नदीवरील युद्धांत पराभव केला, आणि तेथील नदीच्या कांठीं बगदाद् या नांवाचें एक शहर स्थापन करून दमास्कस येथून इ० सन ७५० यावर्षी खलीफांची गादी त्या ठिकाणीं नेली; या खलिफांना "आब्बासी खलिफा" असें ह्मणतात; अब्दुल आब्बास याच्या मृत्युनंतर त्याचा भाऊ मनसूर हा खलिफा झाला; आणि इकडे मुआवियाच्या अथवा उमईद् वंशांतील अब्दुरहिमान या नांवाच्या एका पुरुषानें इ० सन ७५० नंतर सहाच वर्षांनीं इ० सन ७५६ मध्यें स्पेन देशांत आपली एक स्वतंत्र गादी स्थापन केली, आणि सुलतान ही पदवी धारण करून तिकडे त्यानें आपला अंमल सुरू केला; या वंशाच्या राजधानीचें शहर कोर्डोव्हा हें असून, तिथला अब्दुरहिमान हा आपणास खलीफा ह्मणून घेऊं लागला, व अशा रीतीनें युरोपांतील स्पेन देशामध्यें एक स्वतंत्र खिलापत निर्माण झाली. कोर्डोव्हा हें शहर या घराण्यांतील खलीफांनीं अतिशय भरभराटीस आणिलें, आणि तेथील विद्यालयाचा तर सर्व जगभर लौकिक पसरला होता; या वंशानें स्पेनमध्यें इ० सन ७५६ पासून इ० १०३१ पर्यंत ह्मणजे २७५ वर्षें राज्य केलें; परंतु इ० सन १०३१ मध्यें ऑल्फंझो यानें त्यांच्या सत्तेचा नाश करून स्पेन देशामध्यें पुन्हा ख्रिस्ती राज्याची स्थापना केली; त्या प्रमाणेंच इकडे बगदाद् येथें आब्बासी वंश इ० सन ७५० पासून इ० सन १२५८ पर्यंत, ह्मणजे ५०८ वर्षें अस्तित्वात राहून त्यानंतर तो नामशेष झाला.

बघदाद् येथील या आब्बासी वंशांत अल्मसुद हारून उर्फ हारून-अल्-रशीद् (इ० सन ७८६ ते इ० सन ८०९) व त्याचा दुसरा मुलगा मामून उर्फ अब्दुल्ला अल्-मामून, (इ० सन ८१३ ते ८३३) हे अतिशय प्रसिद्ध खलीफा निर्माण झाले; व त्यांच्या कारकीर्दींत निरनिराळ्या विद्या, शास्त्रें, तत्वज्ञान व इतर वांग्मय विषयक बाबतींत अरब लोकांनीं अतिशय प्रगती करून कीर्ती मिळविली; व त्यांनींच बहुविध ज्ञानाचा सर्व जगभरही प्रसार केला; त्याप्रमाणेंच दवाखाने, धर्मशाळा, रस्ते, कालवे, पूल, वगैरे अनेक लोकोपयोगी कामें करून त्यांनीं आपल्या प्रजेची अतिशय भरभराट केली. या खलीफांच्या कारकीर्दींत पहिल्या दीडशें वर्षांत विद्या, वांग्मय व विजय या तीन्हीही बाबतींत अरबांनीं अग्रस्थान मिळविलें; खलीफा हारून यानें रोमचा बादशहा निसीफोरस याचा पराभव करून त्याच्यापासून खंडणीही वसूल केली; आणि पश्चिमेस भूमध्यसमुद्रापासून तों पूर्वेस थेट सिंधूनदापर्यंत, आणि उत्तरेस मध्यआशियांतील आशिया मायनर मधील मैदानापासून तों दक्षिणेत थेट हिंदी महासागरापर्यंत आपली अबाधित सत्ता स्थापन केली. तथापि या वंशांत पुढील काळांतील खलीफा दुर्बळ निघाले, व नवव्या शतकाच्या प्रारंभापासूनच त्यांच्या सत्तेस ओहोटी लागण्यास प्रारंभ होऊन आशिया

खंडांतील त्यांच्या ताब्यांतील प्रदेशही स्वतंत्र होण्याच्या मार्गास लागले. इ० सन ८२० मध्यें खोरासान प्रांत त्यांच्या हातांतून गेला, आणि त्या ठिकाणीं याकूब या नांवाच्या एका इसमानें आपलें स्वतंत्र राज्य स्थापन केलें; त्याप्रमाणेंच मध्य आशियांतील बुखारा, सीरिया व आफ्रिकेंतील इजिप्त वगैरे देश व निरनिराळे प्रांतिक सुभेदारही स्वतंत्र होऊन इ० सन ९४५ च्या सुमारास तर बगदादची खिलाफत पूर्णपणें कमकुवत होऊन ती पुढें इ० सन १२५८ पर्यंत कशी तरी जीव जगवून टिकत राहिली. या खलीफांच्या कारकीर्दींत बगदाद हें शहरही, दमास्कसप्रमाणेंच अत्यंत वैभव संपन्न, रमणीय म्हणून गणलें गेलेलें असून त्या ठिकाणींही ठिकठिकाणीं हौद बांधून सर्व शहरभर मुबलक पाणी आणून सोडिलें होतें, व दमास्कसप्रमाणेंच त्या शहरासही अपूर्व शोभा आली होती.

स्पेनदेशाप्रमाणेंच उत्तर आफ्रिका अरब लोकांनीं जिंकिल्यावर इजिप्तदेशावर इ० सन ६४१ पासून इ० सन ८६८ पर्यंत म्हणजे २२७ वर्षें अरबांचा ताबा होता; व तेथील कारभार चालविण्याकरितां तेच इजिप्तमध्यें आपले अधिकारी पाठवीत असत; तथापि इ० सन ८६८ पासूनच तेथील अधिकारी स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करीत होते, त्याप्रमाणें इ० सन ९०९ मध्यें फातिमाईद वंशानें आपलें राज्य इजिप्त मध्यें स्थापन केलें; हें राज्य फातिमा हिच्या वंशजांनीं स्थापन केलें असल्यामुळें त्यास "फातिमईदवंश" असें ह्मणतात. या खलिफांच्या राजधानीचें शहर टयूनिस नजीक महदिया हें असून सर्व उतर आफ्रिका या खलिफांच्या ताब्यांखालीं होती. या खलिफांचा सरदार जवान यानें काहिरा या नांवाचा एक किल्ला बांधिला; त्याच प्रसिद्ध किल्याच्या पायथ्याशीं हल्लींचें कायरो ऊर्फ कैरो हें शहर आहे. या खिलाफतीचा, पुढील धर्म-युद्धांत प्रसिद्धीस आलेला शूर सीरियन सरदार सलाद्दिन यानें, इ० सन ११७१ मध्यें नाश केला; फातिमाईद वंशानंतर इजिप्तमध्यें आब्बासी वंश स्थापन झाला; या संबंधी अशी माहिती आढळते कीं बगदाद येथील खलीफांच्या राज्यांत सेल्जुक तुर्क हे अतिशय बलाढ्य व खलीफास डोईजड झाल्यानंतर इ० सन १०५० मध्यें सेल्जुक तुर्क सरदार तुघ्रल बेग याच्याकडेस खलीफांनीं राज्यकारभारासंबंधीचे सर्व अधिकार सोपविलें त्यामुळें धार्मिक शिवायच्या इतर बाबतींत फारच थोडा—अथवा "नाहीं" असेंच म्हणण्याइतपत अधिकार खलीफांच्या हातीं राहिला. ही व्यवस्था शंभर वर्षेंपर्यंत,—म्हणजे पूर्वेकडून मोंगल लोकांनीं येऊन सेल्जुक तुर्कांना जिंकून, बगदाद शहर ताब्यांत घेऊन, तेथील खलीफा व खिलाफत यांचा नाश उडवीपर्यंत चालू होती; त्यानंतर खलीफाचा एक नातलग बगदाद येथून आपला जीव जगविण्याकरितां इजिप्तमध्यें

कायरो येथें गेला; आणि त्याठिकाणीं इजिप्तच्या सुलतानाच्या परवानगीनें त्यानें खलीफा हें पद धारण केलें; त्यास मुसलमानी जगांतील पुष्कळ मुसलमान लोक आपला खलीफा अथवा धर्मगुरू असें मानीत होते; परंतु त्याच्याजवळ सैन्यही नव्हतें, आणि त्या देशाच्या राज्यकारभारामध्येंही त्याचा कोणत्याही प्रकारें संबंध नव्हता. इ० सन ११७१ मध्यें सलादिन यानें फातिमईद खिलाफत नष्ट केल्यानंतर इ० सन १५१७ पर्यंत इजिप्त देश मॉमलुक ( बगदादचे खलीफा आणि सामानी सुलतान हे तुर्क लोकांना आपल्या सैन्यांत आणि खास स्वतःच्या संरक्षणासाठीं "शरीरसंरक्षक" ह्मणून नोकरींत ठेवीत असत; याच शूर व लष्करी बाण्याच्या तुर्क लोकांना इजिप्तमध्यें मॉमलुक अशी संज्ञा प्राप्त झाली. ) सरदारांच्या ताब्यांत होता; तो इ० सन १५१६ मध्यें टर्कीचा बादशहा सेलीम यानें तेथील सरदारमंडळांकडून जिंकून घेतला, त्यावेळीं त्यानें तेथील आब्बासी वंशाकडून खिलाफतीची गादी व खलीफांचें पद आपणास प्राप्त करून घेतलें.

मुसलमानी जगाच्या इतिहासाच्या दृष्टीनें नववें शतक हें विशेष महत्वाचे ह्मणून मानिलें जाण्यासारखें असून याच शतकांत इस्लामधर्मांत मानवजातीची पुष्कळच मोठी भर पडलेली आहे, आणि त्याचे राजकीय परिणामही अतिशय महत्वाचे असेच घडून आले आहेत; मध्यआशियांतील मोंगल, तुर्क, तार्तार वगैरे धनगरी पेशाचे लोक प्रारंभीं मुसलमान नसून त्यांच्यांपैकीं मांचू ऊर्फ मोंगल हे बुद्धधर्मी व तिबेटच्या लामाचे अनुयायी होते; या लोकांची वस्ती बुखारा शहराच्या आसपास, व पश्चिम भागांत होती, आणि तार्तार लोक उत्तरभागांत सैबेरिया प्रांतांत व त्याच्या आसपास रहात होते. तथापि या लोकांची स्थाईक अशी कोठेंही वस्ती नव्हती, व ते गुरांचे कळप घेऊन त्यांना चारीत असत; हे लोक सर्व मध्यआशियाभर आपल्या टोळ्या करून भटकत फिरत, आणि गुरें चारून व आसपासच्या प्रदेशांत लूटफाट करून ते आपली उपजीविका करीत. या सर्व लोकांनीं पुढें मुसलमानी धर्म स्वीकारिला, व जगाच्या इतिहासांत पुढील काळांत ते अतिशय प्रसिद्धीस आले. तथापि मूळ अस्सल मुसलमान ह्मणजे आरब लोक हे असून त्यांना "सॅरसीन ( सारासीन ) असेंही नांव आहे. तार्तार व तुर्क हे उभयतांही एकच असून तार्तार लोकांनाच पुढें तुर्क ही संज्ञा प्राप्त झाली आहे. तुर्क व मोंगल या उभयतांनाही "तुराणी" अथवा "तुराणी" असें म्हणतात. तुराण देश म्हणजे हल्लींचा आशियाखंडांतील तुर्कस्थान हा देश असून त्यांतील पूर्वेच्या बाजूस म्हणजे चीनदेशाच्या उत्तरेकडील मंगोलिया या नांवाच्या प्रांतांत मोंगल लोक रहात असत व पश्चिमेकडील बाजूस तुर्क लोक रहात असत, तुर्क आणि अरब हे

निरनिराळे असून त्यांचें परस्परांत वैर होतें; त्यामुळें पुढील धर्मयुद्धांत अरब लोकांनीं तुर्कांना मदत केली नाहीं; म्हणून ख्रिस्ती राष्ट्रांना तुर्कांबरोबर दोनशें वर्षे टिकाव धरितां आला; आणि मुसलमानांना जुटीच्या बळाचा फायदा न मिळाल्यामुळें–आणि तोच युरोपियन ख्रिस्ती राष्ट्रांनीं जूट करून मिळवून घेतल्यामुळें–युरोपियन राष्ट्रें जगून तीं पुढें बलाढ्य होत गेलीं; ज्या तुर्कांचा, त्यांनीं इ० सन १४५३ मध्यें पूर्वरोमन बादशाहतीची राजधानी इस्तंबूल, अथवा कान्स्टांटिनोपल हस्तगत करून घेतल्यानंतर सतत शंभर वर्षे सर्व युरोपभर दरारा बसला होता त्या ऑटोमन तुर्कांचें युरोपांतील तुर्की राष्ट्र कमकुवत होत गेलें; आणि तें राष्ट्र म्हणजे पंधराव्या शतकांतील सत्ता, शौर्य व वैभव यांची निव्वळ पडछायाच म्हणून होऊन राहिलें.

शिवाय या तुर्कांमध्येंही सेल्जुक तुर्क ( Seljuk Turks ) आणि ऑटोमन तुर्क ( Ottoman Turks ) असे दोन भेद आहेत; तुर्कस्थानांत सेल्जुक या नांवाचा एक सरदार होता; त्यानें आपल्या अनुयायांसह बुखारा येथें जाऊन मुसलमानी धर्माची दीक्षा घेतली, व त्यानंतर त्याच्या अनुयायांना "सेल्जुक" ही सर्वसाधारण संज्ञा प्राप्त झाली. प्रारंभीं महंमद पैगंबरापासूनचे सर्व मुसलमान म्हणजे, आरब हे लोक होत; याच लोकांनीं प्रथम धर्म व राज्यविस्तार केला; अरबस्थानांतून ते दिग्विजय मिळवीत चोहोंकडे पसरले; आणि बगदाद येथील खलीफा वलीद याच्या कारकीर्दीत आरब सरदार महंमद कासीम यानें इ० सन ७११ मध्यें हिंदुस्थानांत सिंधप्रांतावर स्वारीही केली होती; परंतु त्यांची ही या देशावर पहिली आणि शेवटची स्वारी असून हिंदुस्थानांत आलेले मुसलमान, म्हणजे बहुतेक तुर्क व मोंगल हेच मुख्यत्वें करून होत; मध्य आशियांतील सपाट प्रदेशांत हे लोक, हूण व सिथियन लोकांप्रमाणें चोहोंकडे टोळ्या करून भटकत फिरत असत; परंतु पुढें त्यांची संख्या अतिशय वाढत गेली, आणि ते तिकडे युरोप व इकडे सर्व आशियांत व हिंदुस्थानांतही पसरले, आणि याच लोकांनीं हिंदुस्थानांत राजकीय वर्चस्व मिळवून ते कांहीं काळपर्यंत इकडे पूर्ण व व्यापक प्रदेशाचे सत्ताधीश बनले; आरब लोकांनीं जरी इ० सन ७११ नंतर हिंदुस्थानदेशावर स्वारी केली नाहीं, तरी इराणी आखातावर वस्ती करून राहिलेले आरब लोक हिंदुस्थानदेशाबरोबर नेहमीं व्यापारी दळणवळण ठेवीत आलेले होते; इसवीसनापूर्वी एक हजार वर्षांपासून इ० सनानंतर एक हजार वर्षेपर्यंत, आशियाखंडामधील मिसर, सीरिया, पालेस्टाइन, आशियामायनर, अरबस्थान, इराण वगैरे जीं राज्यें प्रसिद्धीस आलीं, त्यांस "सेमेटिक राज्यें" असें सर्वसाधारण नांव आहे. या सर्व सेमेटिक राज्यांचा हिंदुस्थान देशाबरोबर अति प्राचीनकाळापासून व्यापार चालत होता; व त्यांत

अरबस्थान देशानें व आरब लोकांनीं प्रमुखत्वानें भाग घेतला होता; राजकीय दृष्ट्या संतोतंत म्हणावयाचें म्हणजे आरब लोकांनीं इ० सन ७११ पर्यंत हिंदुस्थानावर एकंदर तीन स्वाऱ्या केल्या असें म्हणतां येईल, त्यांपैकीं पहिली म्हणजे खलीफा उमर याच्या कारकीर्दीत इ० सन ६३७ मध्यें आरब लोकांची एक टोळी ठाणें येथें आली होती; दुसरी म्हणजे, इ० सन ६६४ मध्यें, खलीफा मुआविया याच्या काळांत, महयल या नांवाचा एक आरब सरदार समुद्रमार्गानें आपणाबरोबरील सैन्यासह थेट मुलतान-पर्यंत गेला होता, आणि तिसरी म्हणजे खलीफा वलीद याच्या कारकीर्दीत बसरा प्रांतांतून आपल्या सैन्यासह महमद्‌काशीम यानें इ० सन ७११ मध्यें सिंधप्रांतावर स्वारी केली होती; तथापि या शेवटच्या स्वारीसच राजकीय दृष्ट्या "स्वारी" असें नांव देतां येईल; कारण त्या स्वारीचे परिणाम क्रांतिकारक असे घडून आलेले आहेत; तिकडील प्रजेवर भयंकर धार्मिक जुलूम होऊन तिचा अतिशय छळ झालेला आहे, रजपूत राजा दाहीर मारला जाऊन त्या राजघराण्याची धूळधाण उडालेली आहे, आणि त्या प्रांतांत कांहीं काळपर्यंत आरब लोकांनीं आपलें राजकीय वर्चस्व स्थापन केलें आहे; इतकेंच नाहीं तर सिंध प्रांतांत आलेल्या आरब लोकांनीं पुढें मुलतान व इतर ठिकाणीं आपल्या वसाहती स्थापन केल्या आहेत, आणि अजमासें दोनशें वर्षेपर्यंत सिंध प्रांतांत, खालपासून वर थेट मुलतानपर्यंत पैगंबराच्या कुरेश जातीच्या आरब लोकांनीं निरनिराळ्या ठिकाणीं, आपला अंमल गाजविला आहे.

बगदाद येथें आब्बासी खलीफांच्या कारकीर्दीत, जसजसें त्यांचें सामर्थ्य कमी होत गेलें, तसतसें इराणी लोकांचें महत्व वाढत जाऊन, व ते प्रबळ होऊन त्यांच्यापैकीं सामानी वंशांतील एका शूर पुरुषानें आक्सस ऊर्फ अमुदार्या नदीच्या आसपासच्या प्रदेशांत आपलें एक स्वतंत्र राज्य स्थापन केलें, आणि समर्कंद ही त्याची राजधानी केली; हा वंश सामान या नांवाच्या एका शूर सरदारापासून सुरू झाला असल्यामुळें त्यास "सामानी" हें नांव प्राप्त झालें; बगदाद येथील खलीफांच्या काळांत, इ० सन ८०० च्या सुमारास, सामान हा खोरासान प्रांताचा कारभारी होता; हा मूळ फारसी धर्मानुयायी असून त्यानें आपल्या मुलासह मुसलमानी धर्म स्वीकारिला, या मुलाचें नांव आसद्‌खान हें असून त्यास अहंमद वगैरे चार मुलगे होते; हे चारीही मुलगे खलीफाच्या पदरीं नौकरीस राहिले; आणि त्यानंतर ते चार निरनिराळ्या प्रांताचे अधिकारी बनले; यांपैकीं फरगाण प्रांताचा अधिकार अहंमद यास मिळाला. (इ० सन ८१९ मध्यें) त्यानंतर दिवसेंदिवस तो अधिक अधिक प्रबळ होत गेला, आपल्या इतर भावांच्या ताब्यांतील प्रांत त्यानें आपल्या हस्तगत करून घेतले आणि

तो स्वतंत्रपणें राज्यकारभार चालवूं लागला; त्यानंतर त्याचा मुलगा इस्माईल हा तर विशेषच कर्तृत्ववान निपजला, आणि त्यानें खलीफांच्या सत्तेस ओहोटी लागलेली आहे असें पाहून त्यांच्या ताब्यांतील पूर्वेकडील सर्व प्रदेश आपल्या हस्तगत करून घेतला. बुखारा हें आपल्या राजधानीचें शहर केलें, आणि हिंदुस्थानच्या सरहद्दीवरील सिंधूनदापासून बगदादपर्यंत व इराणच्या आखातापासून आरल समुद्रापर्यंत आपल्या राज्याचा विस्तार केला. या सामानी वंशाबरोबर बगदाद येथील खलीफांचा, मोठा तीव्र वैरभाव असून त्या परस्परांमध्यें नेहमीं तंटाभांडणें सुरू असत; त्यावेळीं खलीफांनीं स्वतःच्या राज्याचें संरक्षण करण्याकरितां, आणि स्वतःच्या शरीरसंरक्षणाकरितां, सेल्जुक तुर्कांना आपल्या पदरीं नोकरीस ठेविलें; परंतु हेच लोक पुढें अतिशय बलाढ्य होऊन गेले; आणि इ० सन १०५० मध्यें सेल्जुक तुर्क सरदार तुघ्रल बेग याच्या हातीं बगदादच्या राज्याचीं सर्व सूत्रें जाऊन तेथील खलिफा हे सेल्जुक तुर्कांच्या हातांतील एक निश्चळ बाहुलेंच बनून गेले; त्यानंतर तुघ्रल बेग यानें आपला भाऊ चागर बेग याच्या मदतीनें गज्नवी महंमदाशीं झगडून त्याच्या ताब्यांतील तुर्कस्थानचा प्रदेश हिसकावून घेतला; व आपलें राज्य स्थापन केलें, (इ० सन १०५५) बगदाद हें शहर हस्तगत करून घेऊन तें आपल्या राजधानीचें ठिकाण केलें आणि "सुलतान" ही पदवी धारण करून तो स्वतंत्रपणें राज्य करूं लागला. हा शूर पुरुष इ० सन १०६३ या वर्षी मृत्यु पावला, व त्याच्या नंतर आरस्लान (इ० सन १०६३ ते इ० सन १०७२ पर्यंत) आणि मलिकशहा (इ० सन १०७२ ते इ० सन १०९२ पर्यंत) असे दोन पराक्रमी सुलतान अनुक्रमें गादीवर आले; आणि त्यांनीं या राज्याची पुष्कळच वृद्धि केली; हें राज्य इ० सन ११५७ पर्यंत—म्हणजे सुलतान संजर याच्या इ० सन १११७ ते इ० सन ११५७ पर्यंतच्या चाळीस वर्षांच्या कारकीर्दीच्या अखेरीपर्यंत—सुस्थितींत राहिलें; परंतु त्यानंतर, याही राज्याचा ऱ्हास होण्यास सुरवात झाली; बगदाद येथील खलीफांच्या राज्याप्रमाणेंच याही राज्यांत तुर्क लोकांचा अतिशय भरणा असून खुद्द राज्यकर्त्यांच्या शरीरसंरक्षकांचें कामही याच लोकांकडे असे; या लोकांस "मॉमेलुक" असें म्हणत; हेच लोक याही राज्यांत पुढें अतिशय प्रबळ झाले, आणि त्यांच्यापैकीं कांहीं प्रमुख व बलिष्ट पुढाऱ्यांनीं सेल्जुक बादशाहतीच्या ताब्यांतलि अनेक प्रांत हस्तगत करून घेऊन ते त्या त्या प्रांताचे सत्ताधारी बनले, व स्वतंत्रपणें कारभार करूं लागले; याच लोकांस "अॅटॅबेग" म्हणजे अज्ञान राजाचे संरक्षक, अशी संज्ञा मिळाली; सेल्जुक तुर्क हे मोठे शूर व लढवय्ये असून त्यांनीं आपल्या भरभराटीच्या काळांत सीरिया,

आशियामायनर आणि इराण, हे देश जिंकून भूमध्यसमुद्रापासून तों तहत अफगाणिस्थानापर्यंतच्या व्यापक प्रदेशभर आपली सत्ता गाजविली; परंतु सीरिया प्रांत व जरूसलेम तुर्क लोकांच्या ताब्यांत गेल्यानंतर, खिस्ती लोकांना त्यांच्याकडून अतिशय त्रास होऊं लागला; जरूसलेम हें शहर आशियाखंडाच्या पश्चिमभागीं पालेस्टाईन प्रांतांत असून तें येशुख्रिस्ताचें चरित्रस्थळ आहे; हें शहर सेल्जुक तुर्कांच्या हस्तगत झाल्यानंतर त्यांनीं त्याठिकाणचीं ख्रिस्तीमंदिरें जमिनदोस्त केलीं, आणि अतिशय धार्मिक जोरजुलूम सुरू होऊन त्याठिकाणीं दर्शनास जाणाऱ्या ख्रिस्ती लोकांसही अतिशय त्रास होऊं लागला; पिटर या नांवाचा फ्रान्स देशांतील एक साधू जरुसलेम येथें गेल्यावेळीं त्यास तुर्क लोकांकडून ख्रिस्ती लोकांस अतिशय त्रास होत असल्याचें आढळून आलें; तेव्हां त्यानें युरोपांत परत जाऊन सर्व ख्रिस्ती राष्ट्रांच्या दरबारीं ही हकीकत कळविली, आणि यात्रेकरू वगैरे ख्रिस्ती लोकांना दुःखमुक्त करण्याबद्दल त्यांना विनंती केली; त्यावरून ख्रिस्ती राष्ट्रांनीं एक होऊन तुर्क लोकांशीं अनेक धर्मयुद्धें केलीं; परंतु अखेरीस जरूसलेम त्यांच्या हातीं न येतां तें मुसलमानांच्याच ताब्यांत कायम राहिलें.

बगदाद येथील आब्बासी खिलापतीच्या ताब्यांतील पूर्वेकडील सत्तेचा नाश सामानी सुलतानांनीं आणि पश्चिमेकडील सत्तेचा नाश सेल्जूक तुर्कांनीं केल्यानंतर पुढें इ० सन १२५८ मध्यें चंगीजखानाच्या वंशांतील मोंगलांनीं ती पूर्णपणें नष्ट करून टाकिली; याच वर्षी इस्माईल या नांवाच्या मूळच्या एका सारासान अथवा आरब वंशांतील पुरुषानें स्वपराक्रमानें इराणचें राज्य मिळविलें, आणि तेवीस वर्षें राज्य करून तो इ० सन १२८१ मध्यें मृत्यु पावला; याच घराण्यांत पुढें आब्बास या नांवाचा एक मोठा शूर व पराक्रमी राजा गादीवर येऊन त्यानें तुर्क लोकांचा अनेक वेळां पराभव केला; आणि याच शाहानें (इराणच्या बादशहास शाहा अथवा सोफी असें म्हणतात.) इराणी आखाताच्या तोंडाजवळ असलेलें ऑर्मझ हें बेट इ० सन १६२२ मध्यें, इंग्रजांची मदत मिळवून पोर्तुगीज लोकांजवळून जिंकून घेतलें.

सेल्जुक तुर्कांप्रमाणेंच दुसरा बलाढ्यवर्ग म्हणजे "ऑटोमन तुर्क" हा होय; याच ऑटोमन तुर्कांनीं, सेल्जुक तुर्कांच्या सत्तेचा नाश केला; आर्तोघ्रल या नांवाच्या एका शूर सरदाराचा मुलगा उस्मान (जन्म इ० सन १२५८, मृत्यु इ० सन १३२६) हा मोठा शूर व पराक्रमी निपजून त्यानें इ० सन १२८८ मध्यें आशियामायनरमधील सेल्जुक तुर्कांचें राज्य हस्तगत केलें, आणि यावेळेपासून ऑटोमन तुर्कांचा कांहीं काळपर्यंत परमावधीचा राजकीय उत्कर्ष होत गेला. "उस्मान" या नांवावरून "ऑटोमन हा शब्द प्रचारांत आलेला आहे, याच ऑटोमन तुर्क लोकांचें हल्लीं युरोपांतील टर्की

अथवा तुर्कस्थानामध्यें राज्य असून तेथील मागें होऊन गेलेल्या व चालू सुलतानास याच मूळ पुरुषाच्या नांवावरून, सर्वसाधारणतः " उस्मानअली " या नामाभिधानानें संबोधण्यांत येत असतें; उस्मान नंतर त्याचा मुलगा ओर्खान हा गादीवर आला. हाही मोठा शूर असून त्यानें आपल्या राज्याचा बराच विस्तार केला; त्याच्यानंतर प्रसिद्ध सुलतान मुराद हा अधिकारारूढ झाला; याच्या कारकीर्दींत ऑटोमन तुर्कांनीं इ० सन १३५८ मध्यें हेलेस्पाँटची सामुद्रधुनी ओलांडून युरोपखंडांत प्रवेश केला, आणि पुढील अवघ्या चाळीस वर्षांतच बाल्कन द्वीपकल्पाचा सर्व व्यापक पट्टा त्यांनीं आपल्या सत्तेखालीं आणिला. सुलतान मुराद हा २९ वर्षें राज्य करून इ० सन १३८९ मध्यें मृत्यु पावला, आणि बयाजीद हा गादीवर आला; हाही सुलतान कर्तृत्ववान असून त्यानेंही ऑटोमन राज्याचा विस्तार केला. बल्गेरिया प्रांतांतील निकोपोलिस येथील युद्धांत जुटीच्या व जोरदार ख्रिस्ती सैन्याचा पूर्ण पराभव करून त्यांची भयंकर कत्तल उडविली; आणि पूर्व रोमन बादशाहतीच्या राजधानीचें शहर कान्स्टांटिनोपल हस्तगत करण्याच्या तो उद्योगास लागला; परंतु इतक्यांतच समरकंद येथील झगताई मोंगल राजघराणें पालथें घालून तेथील राजगादी इ० सन १३६९ यावर्षीं बळकाविणारा प्रसिद्ध धाडसी पुरुष तैमूरलंग ( जन्म इ० सन १३३५ मृत्यु इ० सन १४०५ मध्यें उत्रार येथें ) यानें बायजीदवर स्वारी करून त्याचा अंगोरा येथें पराभव केला; त्यामुळें कान्स्टांटिनोपलला दिलेला शह त्यास मागें घेणें भाग पडलें, तथापि सुलतान दुसरा महंमद याच्या कारकीर्दींत ( इ० सन १४५१ ते इ० सन १४८० ) तुर्कलोकांनीं पुन्हा कान्स्टांटिनोपल या शहरास वेढा देऊन तें इ० सन १४५३ मध्यें हस्तगत करून घेतलें, आणि तेथील बादशहाचा वध करून तेथें आपली बादशाहत स्थापन केली; त्यामुळें युरोपचा भावी इतिहास साफ बदलून गेला; त्यामुळें पुढें सतत एक शतकभर युरोपियन ख्रिस्ती राष्ट्रांना ऑटोमन तुर्क ही एक जिवंत आणि " मूर्तिमंत भीति " भासूं लागली; त्यामुळें युरोपांतील सर्व ख्रिस्ती राष्ट्रांची स्थिती अत्यंत चिंताजनक, व अशाश्वत अशी बनून गेली; व पुढील शंभर वर्षें सर्व युरोपखंडभर त्याचा भयंकर दरारा वाटत राहिला; त्यामुळें त्यांच्या स्वतःसंबंधींच्या आत्मविश्वासास, कर्तृत्वास आणि कर्तबगारीस जोराचें चालन मिळून त्यांनीं अनेक दिग्विजय केले, त्यामुळें इस्तंबूल येथील सेंट सोफियाच्या मंदिरावर सतत एक हजार वर्षें फडकत असलेला ख्रिस्तांचा क्रूस तेथून निघून त्याठिकाणीं आजतागायत मुसलमानाचा चांद फडकत राहिला आहे, आणि थोडक्यांत ह्मणजे मुसलमान लोकांनीं जगाच्या इतिहासांत अनेक पराक्रम गाजवून, आपली कर्तबगारी आपल्या शत्रूंच्या पूर्णपणें प्रत्ययास आणून दिलेली आहे.

ऑटोमन तुर्क बादशहांपैकीं विजयी व प्रसिद्ध बादशहा सुलतान सुलेमान धी ग्रेट याच्या कारकीर्दीच्या अखेरीपर्यंत (इ० सन १५२० ते १५६६) हें राज्य अत्यंत भरभराटींत होतें; त्यांनीं क्रीमियाचें द्वीपकल्प, ग्रीस, हंगेरी, इराण, अरबस्थान, इजिप्त, मेसापोटेमिया, सीरिया, आल्जियर्स, ट्यूनिस आणि उत्तर आफ्रिकेचा बहुतेक भाग, व ऱ्होड्स बेट–हे सर्व प्रदेश आपल्या हस्तगत करून घेऊन भूमध्य समुद्रावर आपली सत्ता बसविली होती, आणि पूर्वेस युफ्रेटीस नदी, पश्चिमेस जिब्राल्टर, दक्षिणेस नाईल नदीवरील आस्वान अथवा आसुअन ( Assuan ) आणि उत्तरेस हंगेरींतील बुधापेस्त या शहरापर्यंतच्या व्यापक प्रदेशभर त्यांचा अंमल चालत होता; शिवाय त्यांनीं इतालींत प्रवेश केला होता, आणि हंगेरी देश हस्तगत केल्यानंतर ते थेट जर्मनीच्या सरहद्दीपर्यंतही जाऊन पोहोंचले होते; हंगेरी देश पुढें दीडशें वर्षेंपर्यंत ऑटोमन तुर्कांच्या ताब्यांत होता; व त्यानंतर तो स्वतंत्र झाला; परंतु ग्रीस देश अजमासें चारशें वर्षें त्यांच्या ताब्यांत होता; या अवधींत ग्रीक लोकांना त्यांच्याकडून अतिशय त्रास झाला; त्यामुळें ते तुर्कांच्या अंमलाला अगदीं कंटाळून जाऊन त्यांनीं त्या राजाबरोबर इ० सन १८२१ मध्यें युद्ध आरंभिलें; यावेळीं त्यांना साह्य करण्याकरितां इतर युरोपियन राष्ट्रांनींही मदत पाठविली व हें युद्ध पुष्कळ काळपर्यंत चालूं राहिलें; त्यांत उभयपक्षांची पुष्कळ प्राणहानी झाली; आणि याच युद्धांत ग्रीक लोकांच्या मदतीस आलेला इंग्लंडमधील प्रसिद्ध कवी लार्ड बायरन हा मारला गेला; पुढें ग्रीक लोकांस साह्य करण्याकरितां, इंग्लिश आरमाराधिपती सर एडवर्ड कॉड्रिंग्टन याच्या नेतृत्वाखालीं इंग्लंड, फ्रान्स, आणि रशिया, या तीन्ही राष्ट्रांचें एकत्र झालेलें आरमार इ० सन १८२७ च्या आक्टोबर महिन्यामध्यें नॅव्हारिनोच्या आखातांत आलें; या आरमारानें तेथील तुर्क आरमारावर हल्ला करून त्याचा पूर्णपणें विध्वंस उडविला व तुर्कांचा पूर्ण पराभव होऊन इ० सन १८२९ मध्यें ग्रीस देश तुर्क सत्तेपासून पूर्णपणें स्वतंत्र झाला. अशा रीतीनें सुलतान सुलेमानच्या मृत्यूनंतर ऑटोमन तुर्कांच्या सत्तेस ओहोटी लागत गेली, आणि त्यांनीं मिळविलेले बहुतेक सर्व प्रदेश त्यांच्या ताब्यांतून एकामागून एक नाहींसे होत जाऊन, आजच्या स्थितींत तर टर्कीचें राज्य हें पूर्ववैभवाचें, ऐश्वर्याचें व जयजयकाराचें एक निव्वळ छायाचित्र म्हणूनच कायतें अस्तित्वांत राहिलेलें आहे.

वरील विवेचनावरून हें लक्षांत येईल कीं, मुसलमानी समाजांतील आरब व तुर्क–यांत सेल्जुक व ऑटोमन या दोन्हीं तुर्कांचा समावेश होतो–यांनीं जगांत मोठमोठे पराक्रम गाजवून राज्येंही निर्माण केलीं होतीं त्याप्रमाणेंच त्यांच्यांतील मोंगल लोकांनींही अनेक पराक्रम गाजविले असून कांहीं काळपर्यंत त्यांनींही आपलें निर्विवाद

राजकीय वर्चस्व प्रस्थापित करून ते अतिशय भरभराटीप्रत पोहोंचले होते; आणि खुद्द हिंदुस्थानांतही मोंगली बादशाहत स्थापन होणाऱ्या पूर्वी-सेल्जुक व ऑटोमन तुर्कांशिवाय तिसऱ्या-अफगाण तुर्कांचेंच राज्य होतें. आणि पुढें मोंगलांनीं आपली बादशाहत स्थापन केली होती. मोंगल लोक हे प्रसंग पडेल त्याप्रमाणें पंथांतर करीत असत; तथापि त्यांच्यांतील अस्सल धर्मनिष्ठा अथवा कडवेपणा यांत मात्र तिळमात्रही कमतरता होत नसे; हिंदुस्थानच्या इतिहासांतील भावी प्रसिद्ध पुरुष अलप्तगीन, सबक्तगीन, महंमूद गज्नवी हे तुर्क होते; चंगीझखान व तैमूरलंग हे उभयतांही पराक्रमी पुरुष मूळचे मोंगल होते, आणि हिंदुस्थानांत मोंगली बादशाहतीची स्थापना करणारा बादशहा जहिरूद्दिन महंमद बाबर हा बापाकडून तैमुरलंगाचा सहावा वंशज असून तो आपल्या आईकडून चंगीझखानाचा वंशज होता; मोंगल लोक हे मंगोलिया प्रांतांतून मध्य आशियांत आल्यानंतर आपणास तुर्क असेंही ह्मणवून घेऊं लागले. मुसलमानी समाजानें, आशिया, युरोप व आफ्रिकाखंडांत अनेक दिग्विजय मिळविले; पण त्याबरोबरच गुलामगिरीस जोराचें चालन मिळून तिचें अतिशय प्राबल्य झालें; महंमद पैगंबराच्या काळापासून मुसलमानी धर्म स्थापन होऊन त्याचा जोरानें चोहोंकडे प्रसार करण्यास मुसलमानांनीं प्रारंभ केल्यानंतर जे परधर्मीय लोक आपला धर्म खुषीनें स्वीकारणार नाहींत त्यांच्यांशीं युद्ध करून व त्यांना जिंकून इस्लामी धर्माची दीक्षा देण्याचा व त्यांना गुलाम करून आपल्या देशांत नेण्याचा सारखा सपाटा चालविला. या गुलामांत स्त्री, पुरूष व मुलें या सर्वांचा समावेश होत असे; व या लोकांकडूनच ते आपलीं कामें करून घेत असत; यापैकीं इमानी व कष्टाळू गुलामांस जरी ते स्वतःच्या मुलाप्रमाणें वागवीत आणि सुंदर स्त्रियांशीं लग्नें करीत तरी-आणि गुलामगिरीच्या या पद्धतीमुळें, व इस्लामी धर्माचें गुलामगिरीस पाठबळ असल्यामुळें जरी त्यांच्या धर्माचा प्रसार व्यापकपणें होण्यास हीच पद्धत बहुतांशीं कारणीभूत झाली असली तरी-एकंदरींत त्यामुळेंच गुलामगिरीचें अतिशय प्राबल्य माजलें; आणि आशियाप्रमाणेंच युरोपखंडांतही या पद्धतीचा उपक्रम झाला. ऑटोमन सुलतानही, युरोपांत, अशाच प्रकारें जेव्हां जेव्हां नवा प्रदेश हस्तगत करून घेत त्या त्या वेळीं, तेथील ख्रिस्ती लोकांस गुलाम करून स्वदेशांत आणित असत; पुढें त्यांतील तरुण, देखणे व चलाख मुलगे निवडून काढून, व त्यांना उत्तम लष्करी शिक्षण देऊन त्यांच्या स्वतंत्र पलटणी बनविण्याची नवी पद्धत त्यांनीं सुरू केली व तिला त्यांनीं "जान-निसारी" अथवा जीवसंरक्षक ( याचाच जॅनिझरी, व "ज्यानिझरीज" Janizaries हा अपभ्रंश आहे. ) हें नांव दिलें. हें सैन्य विशेष उपयोगीं व परिणामकारक कामगिरी बजाविणारें असें होतें, त्यामुळें पुढें युद्धें

बंद झाली तरी; ही जानेझरी पलटण कायम ठेवण्याच्या उद्देशानें, दरसाल सर्व खिस्तीप्रांतांनीं मिळून दोन हजार बालवयाचीं खिस्ती मुलें आटोमन सुलतानाच्या नोकरींत देत जावीं, असा त्यांनीं त्यांच्याकडून करार करून घेतला होता. हीं मुलें आठ वर्षांचीं असतांनाच निवडून घेत असत; व त्यांना उत्तम लष्करी शिक्षण देऊन त्यांची स्वतंत्र "जानेझरी" पलटण ठेवण्यांत येत असे; आणि तिच्याकडेसच बादशहाचें खास शरीरसंरक्षण, त्याचा राजवाडा, किल्ला व राज्य यांचें संरक्षण, परराज्याबरोबरील युद्धें, वगैरेंची महत्वाची कामगिरी सोंपविलेली असे; हा प्रघात सतत तीनशें वर्षें चालू राहिला; परंतु पुढें तुर्कांच्या सत्तेस ओहोटी लागल्यानंतर तो बंद पडला.

अशा रीतीनें ही गुलामगिरीची पद्धत मुसलमानांनीं भव्यप्रमाणांत प्रचारांत आणिली; तथापि "गुलाम" या शब्दाचा अर्थ मुसलमान व खिस्तीलोक निरनिराळा करीत असत; "गुलाम" हा शब्द कानाला चमत्कारिक लागतो, मनाला चमत्कारिक वाटतो व तो मनुष्याच्या हीनस्थितीचा द्योतक आहे, असा मनांत एकदम विचार उत्पन्न होतो; पण मुसलमानी राज्यांत गुलामास कित्येक वेळां मुलांहूनही अधिक प्रेमानें वागविल्याचीं उदाहरणें आहेत; आणि गुलामही आपला धनी सोडून त्याच्या परवानगीनें सुद्धां नवीन धन्याकडे जाण्यास नाखुष असून प्राणघातापर्यंत त्याची मजल गेल्याचें उदाहरण आहे. मूर्तिजा निजामशहा यानें गोवळकोंडेकर इब्राहिम कुतुबशहा याची कुमक मिळवून अली बेरीदशहावर स्वारी करण्याचें ठरविलें. तेव्हां अली बेरीदशहानें, विजापूरकर अली आदिलशहाकडे कुमक मागितली; परंतु त्यानें, मला अमके दोन खोजे गुलाम द्याल तरच मदत करितों" अशी अट घातली. तेव्हां नाइलाजानें बेरीदशहानें त्या विवक्षित दोन गुलामांना आदिलशहाकडे जाण्यास सांगितलें; परंतु त्यांना आपल्या धन्यास सोडून जाण्याची इच्छा नसल्यानें ते तिकडे जाण्यास खुषी नव्हते; तथापि बेरीदशहानें त्यांना तसेंच जबरीनें तिकडे पाठविलें; म्हणून त्यांपैकीं एकानें विजापूर येथें पोहोंचल्यावर पहिल्याच मुलाखतींत अली आदिलशहास ठार मारिलें. (इ० सन १५८० ) त्याप्रमाणेंच मुसलमानी राजघराण्यांत व दरबारांतही गुलामांचें अतिशय महत्व असून राज्यकर्त्यांची अदलाबदल करण्याइतकें त्यांचें वर्चस्व परमावधीस गेलें असल्याचेंही आढळतें. शिवाय याच "गुलाम" वंशानें इ० सन १२०६ पासून इ० सन १२८८ पर्यंत दिल्ली येथें राज्य केलें आहे; आणि आजपर्यंत जगांत मुसलमानी समाजांतील ज्या तीन स्त्रियांनीं राज्यपदाचा उपभोग घेतला, त्यांतील एक स्त्री याच गुलाम वंशांतील होती असा इतिहासांत दाखला आहे. ती स्त्री म्हणजे सुलतान अल्तमश याची पराक्रमी, बुद्धिमान्, कर्तृत्ववान व हुषार मुलगी सुलताना रेझिया ही

असून दिल्ली येथील तख्तावर बसलेली ही पहिलीच स्त्री होय. ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. थोडक्यांत म्हणजे "गुलाम" या शब्दाचा अर्थ मुसलमानी राज्यांत निंद्य रीतीनें करण्यांत येत नसे. या बाबतींत मुसलमानी रियासतींत असें म्हटलें आहे कीं, "गुलाम" या शब्दांत हल्लीं तिरस्करणीय अर्थ आहे; गुलाम म्हणजे धन्याचा बंदा नोकर, त्यास स्वतंत्रता नाहीं व धन्याच्या मर्जीपलीकडे त्यास स्वतःचें जीवन नाहीं. धन्याच्या जंगम मिळकतीचाच तो एक भाग होय. अर्थात मनुष्यपणाचे जे जे नैसर्गिक हक्क आहेत, ते त्यास मिळावयाचे नाहींत. अशा अर्थानें गुलामरूपीं संस्थेचा उदय फार प्राचीनकाळीं झाला. तथापि पूर्वेकडील राष्ट्रापेक्षां पाश्चात्य राष्ट्रांतच गुलामगिरीचें हिडिस स्वरूप परमावधीस पोहोंचलें. ग्रीक व रोमन लोकांमध्यें गुलाम होते. बहुधा लढाईत पाडाव करून आणिलेल्या लोकांचा भरणा या गुलामांत होत असे. मुसलमानांच्या वेळेस ह्या गुलामगिरीचें प्रस्त फार वाढलें, आणि मध्यकालीन ख्रिस्तीराजांनीं तर ह्या कामीं अमानुषपणाची कमाल केली. एखाद्या ठिकाणच्या लोकांस जबरीनें पकडून त्यांस दुसऱ्या देशांत नेऊन कामास लावणें, किंवा त्यांचा क्रयविक्रय करणें हे निंद्य प्रकार युरोपियन लोकांनीं सुरू केले. ( ब्रिटिश रियासत पहा ).

---

टीप १:-ब्रिटिश रियासत भाग २ पान २१२-२१३-३६४-३६५ यांत या बाबतींत खालील प्रमाणें खुलासा केलेला आहे, तोः-...स्पेन, पोर्तुगाल व इंग्लंड या सर्वांनीच इकडे थोडेंबहुत क्रूर आचरण केलें आहे. तथापि पूर्वद्वीपसमूहाचा गड्डा आयताच डच लोकांच्या हातीं लागल्यामुळें, व हिंदुस्थानांतील मोंगलबादशाही प्रमाणें तिकडे कोणतेंही मजबूत राज्य नसल्यामुळें, डचलोकांच्या हातून भयंकर अनर्थ झाले. व्यापार करण्यास पैसा पाहिजे व पैशासाठीं राज्य पाहिजे ही परंपरा पोर्तुगीज लोकांप्रमाणें डच लोकांस जरूर वाटली. पोर्तुगीझांचा शहाणा सरदार अल्बुकर्क यानें ती जरूर भागविण्याचा प्रयत्न केला, पण त्यास युरोपांतील त्याच्या सरकारचें पाठबळ नसल्यामुळें यावें तसें यश आलें नाहीं. तीच गोष्ट डच सरदार कोन यानें तडीस नेली. त्यास संपूर्ण डच राष्ट्राचें पाठबळ मिळालें. युरोपांतील बायकापुरुष आणून इकडे स्वतःच्या वसाहती तयार करावयाच्या, ही कल्पना कितीही सुंदर असली तरी शक्य नाहीं, असें अलीकडे सिद्ध झालें आहे. पण कोन याला हें त्या वेळेसच कळून चुकलें होतें. यासाठीं जितके मिळतील तितके पूर्वेकडील मजूर लोक मिळविण्याचा त्यानें यत्न केला. यासाठीं ( १ ) बेटांत सांपडलेल्या लोकांस त्यानें गुलाम केलें ( २ ) आफ्रिका आणि आशिया या खंडांतील देशांतून मिळतील तितके गुलाम आणविण्याची त्यानें तजवीज केली, व ( ३ ) रस्त्यांत सांपडतील तितके लोक आणून तो ह्या बेटांत भरूं

पण मुसलमानांचा प्रकार ह्याहून भिन्न होता. मुसलमानांचा संचार जेव्हां पॅसिफिक महासागरापासून अटलांटिक महासागरापर्यंत होऊंलागला, तेव्हां मार्गांतील अनेक लोकांचा

---

लागला. ह्या तीन गोष्टींवरून पोर्तुगीज लोकांचा व डच लोकांचा जुलूम यांजमधील अंतर कळण्याजोगें आहे. पोर्तुगीज लोकांनीं नुसते देश जिंकिले, पण डच लोकांनीं देश जिंकून सर्व लोकांस गुलाम बनविलें. पोर्तुगीज लोक दुसऱ्या लोकांनीं आणिलेले गुलाम विकत घेत; पण डच लोकांनीं ह्या कामाकरितां सर्व समुद्रांत फिरतीं आरमारें ठेविलीं होतीं. अशा रीतीनें त्यांनीं असंख्य लोक गोळा केले. तिसरा प्रकार तर मोठा चमत्कारिक आहे. पूर्वेकडील चीन वगैरे देशांच्या किनाऱ्यावर हत्यारबंद माणसें पाठवून वाटेल त्या लोकांस पकडून आणण्याचा क्रम किती निंद्य आहे, याची कल्पनाच केली पाहिजे. इतक्या लोकांची मजूरी व वाटेल तितकी जमीन फुकट मिळाल्यामुळें मसाल्यांचीं झाडें लावून त्यांनीं डच राष्ट्रास अपरिमित फायदा करून घेतां आला. उगाच कोठें थोडयाशा इंग्रजांची आडकाठी होती, तीही अंबोयनाच्या प्रकारानें बंद झाली. कोणाही एतद्देशियास ते लहानसा रोपटाही लावूं देत नसत. अशा रीतीनें सर्व लोकांपासून कसोशीनें श्रम घेऊन उष्ण कटिबंधांतील अति सुपीक जमीन या राष्ट्रानें शेंकडों वर्षें पिकवून खाल्ली. हा केवढा फायदा, आणि लोकांवर केवढा नाहक जुलूम ! ! ! "

इंग्रज लोकांविषयीं थोडक्यांत स्पष्ट व सत्य ह्मणावयाचें ह्मणजे ते अंबोयना बेटांतील कत्तलीनंतर हिंदुस्थानांत येऊन व्यापार करूं लागले. त्या सतराव्या शतकांतील काळांत, डच व पोर्तुगीज लोकांप्रमाणेंच त्यांचेंही आचरण दूषणास्पद होतें, असेंच, ह्मणणें भाग पडतें. " आनंदी राजा " दुसरा चार्लस हा इंग्लंडच्या गादीवर असल्यावेळीं ( इ० सन १६६० ते इ० सन १६८५ ) आपल्या समान शिलाच्या, व्यसनी, नालायक, व देशाच्या कल्याणाविषयीं पूर्णपणें बेफिकीर असलेल्या स्त्रीपुरुषांनीं तो नेहमीं घेरलेला असे; व त्यांच्या सहवासांत नेहमीं तो विलासांत, ऐषारामांत व व्यसनांत मग्न असे. " यावेळीं व्यभिचार व मद्यपान यांची विलायतेंत फार वाढ झाली होती; प्रत्यक्ष राजा दुसरा चार्लस हा व्यसनांचा केवळ पुतळा बनला होता; त्याचा अनुवाद हिंदुस्थानांत झाल्याशिवाय राहिला नाहीं. लोकांवर जुलूम करणें, लांच खाणें, स्वधर्माची निंदा करणें, दुसऱ्यास निष्कारण प्रतिबंधांत ठेवणें, बंड करणें, अशा प्रकारचे आरोप कंपनीच्या नोकरांवर वारंवार येत असत; दारू पिऊन दंगा करण्याचा प्रकार हरहमेश चालू असे; अशा दंगेखोरांस ताब्यांत ठेवणें मोठें कठीण पडे. त्यावेळच्या स्त्रियाही पुरुषांप्रमाणें

पाडाव होऊन, त्यांच्या झुंडीच्या झुंडी मुसलमान सरदारांच्या पदरीं जमत चालल्या आणि त्यांस मुसलमानी धर्माची दीक्षा मिळाली. अशा पाडाव झालेल्या लोकांनीं दंगा वगैरे करूं नये ह्मणून पुष्कळदां त्यांची एकजात कत्तल करण्यांत येई, आणि कित्येकदां तैमूरलंगासारखे धाडशी व क्रूर पुरूष पाडाव केलेल्या लोकांचा शिरच्छेद करून त्यांच्या शीरांचे मनोरे बांधीत, आणि अशा रीतीनें लोकांवर आपला दहशत बसवीत.

"पण मुसलमानी धर्म व राज्य ह्यांचा विस्तार करण्याला ह्या गुलामांचाच उपयोग विशेष झाला आहे; तुर्क अफगाणांच्या अमदानींत तर गुलामांची ही संस्था ह्मणजे नांवलौकिक व पराक्रम गाजविण्याची एक उपयुक्त शाळाच बनली. एखाद्या सरदाराच्या लगामीं राहून आणि त्याचें अनुकरण करून नशिबाची परिक्षा पहाणे, हा

---

व्यसनाधीन झालेल्या असत; सेंटहेलेना येथें आणिलेले गुलाम काम चांगलें करीनात ह्मणून त्यांच्या जातीच्या बायका गलबतें भरून आणिल्या तेव्हां त्यांचें मन ताळ्यावर येऊन, ते काम करूं लागले. त्याच प्रमाणें कंपनीनें आपल्या सोल्जरांसाठीं, व इतर नोकरांसाठीं विलायतेंतून वेळोवेळीं इकडे बायका पाठविण्याची तजवीज केली; पण अशा बायकांच्या उदरनिर्वाहास साधन नाहींसें झाल्यामुळें, व सर्वांचीं लग्नें होणें शक्य नसल्यामुळें विलायतेहून बरोबर आणिलेली सदाचरणाची अल्प पुंजी रसातळास जाऊन, पोटापाण्यासाठीं तरी त्यांस असन्मार्ग पतकरावा लागला. त्यांचें धर्मबाह्य व नीतिभ्रष्ट वर्तन सुधारण्यासाठीं आँजियर ( सुरत येथील इंग्रज वखारीचा प्रेसिडेंट व मुंबईचा गव्हर्नर; इ० सन १६६९ ते इ० सन १६७७ ) यानें पुष्कळ प्रयत्न केले, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. राजा दुसरा चार्लस ह्याचा छानछोकी स्वभाव कळण्यासाठीं इ० सन १६८३ तील विलायतेहून आलेल्या एका पत्राचा उतारा खालीं दिला आहे. तो:—"राजाची आज्ञास अशी आज्ञा झाली आहे कीं, हिंदुस्थानांतून एक अतिशय ठेंगू सतरा अठरा वर्षांचा शिद्दी पुरुष व चौदा चौदा वर्षांच्या दोन शिद्दी मुली पैदा करून पाठवाव्या. त्या मिळतील तितक्या ठेंगू व सुंदर असाव्या. त्या नीट व्यवस्थेनें गलबतावर चढवून त्यांची उत्कृष्ट काळजी घेण्याविषयीं कप्तानास ताकीद द्यावी. विशेषतः मार्गांत खलाशी लोक त्या मुलींचें पातिव्रत्य भ्रष्ट करणार नाहींत अशी सक्त तजवीज ठेवावी. रस्त्यांत त्यांच्या खाण्यापिण्याची व कपड्यालत्यांची व्यवस्था नीट ठेवावी, आणि त्यांच्या अंगावर इकडच्या चालीचे हातापायांतले वगैरे सर्व प्रकारचे खोटे दागिने त्यांजबरोबर पाठवावे." इकडच्या लोकांचा जनावराप्रमाणें सौदा करण्याचा प्रघात त्यावेळीं किती होता हें यावरून दिसून येतें;" ( ब्रि० रि० भाग २ रा पान ३६४-६५ पहा. )

एक धंदाच झाला. सेल्जुक तुर्कांच्या राज्यांत गुलामांचा उदय झपाट्यानें झाला. सेल्जुक सुलतान मलीकशहा ह्याच्या लष्करांतून पुढें अनेक पुरुष निरनिराळ्या प्रांताच्या कारभारावर राहून भरभराटीस चढले. त्यांस मलिकशहाचा गुलाम म्हणवून घेण्यांत मोठी धन्यता वाटे. जन्मानें मनुष्य कितीही हलका असला तरीही त्यास इतरांच्या बरोबरीनें नांव काढण्याची सारखी संधी ह्या गुलामगिरींत मिळत असे. कित्येक सुलतानांची भक्ती प्रत्यक्ष मुलापेक्षां गुलामावर जास्त असे; एकवार गुलामगिरींतून वर जाऊन उदय झाल्यावर दरेक पुरुष पुन्हां आपल्याजवळ नवीन गुलामांचा भरणा करी; आणि अशा रीतीनें ही गुलामांची संस्था नेहमीं वाढत जाऊन ती मुसलमानी राज्यास फार उपयोगाची झाली. तेराव्या शतकांत इजिप्त देश जिंकणारे मामेलूक नांवाचे तुर्क सुलतान आरंभीं अशा गुलामांतूनच वाढलेले होते. महंमद घोरी व कुतुबुद्दीन यांनां गुलामांचें महत्व विशेष वाटत असे. एकदां महंमद घोरी आपल्या एका सोबत्याशीं गोष्टी करीत बसला असतां तो सोबती म्हणाला, कायहो आपणास मूल नाहीं, ही केवढी दुःखाची गोष्ट आहे. मूल असतें तर आपल्या वंशाचें नांव तरी पाठीमागें राहिलें असतें. त्यावर घोरी सुलतानानें उत्तर दिलें, काय, मला मूल नाहीं म्हणता! माझीं मुलें हजारों आहेत. हे तुर्की गुलाम माझ्या पदरीं जमले आहेत, हे माझीं मुलें नाहींत तर कोण! हे माझ्याहूनही जास्त पराक्रम करून माझें राज्य व कीर्ति वाढविणार नाहींत काय? ही गोष्ट खरी ठरली. जी गोष्ट मुलास साध्य होणें शक्य नव्हतें ती ह्या गुलामांनीं सिद्धीस नेली. मुलगा झाला तरी बापासारखा शहाणा व पराक्रमी निघतोच असें नाहीं. पुष्कळदां बापाचे पराक्रमामुळें घरांत श्रीमंती व ऐषआराम वाढून मुलें ऐदी व निःसत्वच बनतात. तीं मुलें वाईट निपजलीं तरी त्यांसच पुढें राज्यावर बसवावें लागतें. त्यांस दूर सारण्याचें साधन रहात नाहीं. बाप सुद्धां आपल्या एखाद्या पराक्रमी सरदारास राज्य न देतां आपल्या ऐदी मुलानें आपल्या मागें राज्यावर बसावें यासाठीं हापापलेला असतो. पण गुलामगिरी म्हणजे पराक्रमाची शाळा, त्या शाळेंतून निभावून बाहेर येण्यास अंगची योग्यताच पाहिजे. योग्यता नसल्यास तो नाहींसा व्हावयाचा. अशा प्रकारें नशिबाच्या चाळणींतून गाळून निघाल्यावर जो निभावला, ( Survival of the fittest ) तो गुलाम. मुसलमानांच्या वृद्धीस ही संस्था आशियाखंडांत फारच उपयोगी पडली. आणि अफगाण सुलतानास तर तिजपासून चांगलाच फायदा झाला. महंमद घोरीचे चार मुख्य सरदार ह्या गुलामांतून पुढें आले. अफगाणिस्थानांत एल्डोझ, सिंधप्रांतांत कुबाचा, बंगाल्यांत बखत्यार खिलजी आणि दिल्लीस कुतुबुद्दीन. आरंभीं गुलामांतून वर आले म्हणून त्यांचें कूळ नेहमींच हीन

असें नाहीं. सारांश गुलामगिरीच्या पेशाला पाश्चात्य लोकांत जो निंद्य अर्थ आहे, तो पूर्वेकडच्या ह्या मुसलमानी अमदानींत नव्हता, हें लक्षांत ठेविलें पाहिजे." त्याप्रमाणेंच युरोपियन लोकांनीं त्यांना वागविण्यांत जो निंद्य मार्ग स्वीकारिला होता, तसा मार्ग मुसलमान राज्यकर्त्यांनीं कधींही स्वीकारिला नव्हता, हीहि महत्वाची गोष्ट विचारांत घेतली पाहिजे.

वरील विवेचनावरून मुसलमानीं राज्यांत गुलामांना केवढें महत्व होतें, याची योग्य कल्पना होईल. परंतु गुलामामुळें ज्याप्रमाणें मुसलमानांचा धर्म व राज्य यांचा विस्तार होत गेला व त्यांचा उत्कर्ष होत गेला, त्याप्रमाणेंच खलीफांच्या हातीं, वंशपरंपरेनें राजसत्ता स्थीर झाल्यानंतर ते अनियंत्रित बनून गेल्यामुळें प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेस त्यांच्या राज्यांत,-आणि साधारणतः सर्व मुसलमानी राज्यकर्त्यांच्या काळांत थारा मिळाला नाहीं; आणि ह्मणूनच त्यांच्या राज्याविषयीं प्रजेस वाटणारा आपलेपणाचा अभिमानही कायम राहिला नाहीं. तथापि कर्तृत्ववान राज्यकर्ते गादीवर असतांना हा उणेपणा झांकून राहिला; परंतु कर्तृत्वहीन राज्यकर्ते गादीवर येऊं लागल्यावर त्यांच्या सत्तेस ओहोटी लागून हें व्यंग तात्काळ बाहेर आलें, आणि आपलें राजकीय वर्चस्व प्रस्थापित करूं पाहणाऱ्या कर्तबगार व शूर पुरुषांनीं राजसत्तेच्या मुळावर मारिलेल्या एकाच वर्मी व जोराच्या घावानें ती नामशेष होऊन गेली.

सेल्जूक तुर्क व ऑटोमन तुर्क यांच्याप्रमाणेंच मोंगल अथवा तार्तार मोंगल यांनींही पूर्वकाळीं आशिया व युरोपखंडांत अलौकिक पराक्रम गाजविले आहेत. या लोकांमध्यें चंगीझखान या नांवाचा एक अतिशय शूर व धाडसी पुरुष निर्माण झाला; व या पुरुषाच्या काळापासूनच त्यांच्या अचाट पराक्रमास सुरवात झाली. चंगीझच्या आजाचें नांव पुरतन हें असून बापाचें नांव येका बहादूर अथवा युझगाई हें होतें. त्याप्रमाणेंच चंगीझखान हें त्याचें मूळचें नांव नसून तेमूजीन हें मूळ नांव होतें. त्याचा जन्म इ० सन ११६३ मध्यें झाला; त्याचा बाप युझगाई हा चीनच्या राज्यांत पहिल्यानें सरदार असून तो पुढें स्वतंत्र झाला. तो तेमूजीन हा बारा वर्षांचा असतां इ० सन ११७५ मध्यें मृत्यू पावला. तेमूजीन हा पुढें वयांत आल्यावर मोठा शूर निपजला. त्यानें आपल्या आसपासच्या भटकत फिरणाऱ्या तार्तार लोकांना जिंकून आपल्या नियंत्रणाखालीं आणिलें व त्यांना लष्करी शिक्षण देऊन त्यांचें एक अफाट व बलाढ्य सैन्य बनविलें. आशियाखंडांतील अनेक देश पादाक्रांत केले, आणि इ० सन १२०६ या वर्षी आपल्या पहिल्या नांवाचा त्याग करून सरदार मंडळीची एक सभा भरवून, त्यानें चंगीझखान हें

नांव धारण केलें, आणि याच वेळेपासून त्यास "चंगीझखान" या नांवानें ओळखण्यांत व संबोधण्यांत येऊं लागलें.

चंगीझखानानें इ० सन १२१० पर्यंत आशियाखंडांत दिग्विजय मिळवीत पूर्वेस पूर्वसमुद्रापासून पश्चिमेस कास्पियन समुद्र व उत्तरेस व्होल्गानदीपर्यंत आपल्या राज्याचा विस्तार करून, बुखारा, काबूल, कंदाहार, खोरासान व इराण वगैरे देशही आपल्या स्वामित्वाखालीं आणिले. या वेळीं अफगाणिस्थानांतील खारीजम प्रांतावर सेल्जुक तुर्कांपैकीं सुलतान महंमद या नांवाचा राजा राज्य करीत होता; व अरबस्थान, तुर्कस्थान व इराण हे तीन्हीही देश त्याच्या अमलाखालीं होते. या सुलतानानें; चंगीजखानाच्या सैन्याची आगळीक केली, त्यावरून चंगीझनें आपल्या सात लाख सैन्यासह त्याजवर स्वारी केली, आणि त्याचा पराभव करून त्याच्या ताब्यांतील इराणचा प्रदेश आपल्या हस्तगत करून घेतला. त्यानंतर त्यानें चीनच्या राज्यावर स्वारी केली. चीनचा प्रचंड व दुर्घट तट ओलांडून तो आपल्या अफाट सैन्यासह त्या देशांत शिरला. राजधानीचें शहर खानबलिक ऊर्फ पेकीन व त्या देशाचा सर्व उत्तरभाग आपल्या हस्तगत करून घेतला, आणि युरोपखंडांत थेट जर्मनीपर्यंतही त्याच्या सैन्यानें दौड मारिली. पुढें अशाच एका स्वारींत असतांना तो कास्पियन समुद्राच्या कांठीं इ० सन १२२७ मध्यें मृत्यु पावला. या क्रूरकर्मी परंतु अत्यंत धाडसी व शूर मनुष्याची गणना जगांतील प्रसिद्ध पुरुषांमध्यें करण्यांत येते. इतकेंच नाहीं तर जगांत असा दुसरा पुरुष आजपर्यंत निर्माण झाला नाहीं, असेंही मानण्यांत येतें.

चंगीझखान मृत्यु पावला त्यावेळीं त्याच्या राज्याची हद्द वायव्येस युरोपांत नीपर नदीपर्यंत, आग्नेयेस आशियाखंडांत हिंदुस्थानच्या सरहद्दीवरील सिंधूनदापर्यंत, आणि पूर्वेस पॅसिफिक महासागरापर्यंत जाऊन भिडली होती. ह्मणजे पिंवळ्या समुद्रापासून काळ्या समुद्रापर्यंत त्याच्या राज्याचा व्यापक विस्तार झालेला असून त्या राज्याची लांबी साडेपांच हजार मैल, व रुंदी तीन हजार मैल होती; व त्याची व्याप्ती हल्लींच्या हिंदुस्थान देशाच्या चौपट होती. चंगीझखानास ओक्ताईखान, झगताईखान, जुजीरखान, आणि तुलूईखान असे चार मुलगे होते, व त्यांना त्यानें आपलें सर्व राज्य वांटून दिलें होतें. यापैकीं, ओक्ताई हा विशेष पराक्रमी होता. तो इ० सन १२२७ मध्यें गादीवर आल्यावर त्याच्या कारकीर्दींत त्याचा धाकटा भाऊ जुजीरखान याचा पराक्रमी मुलगा बातू यानें, युरोपखंडावर स्वारी केली; मास्को, कीव्ह, बुदापेस्त व दुसरीं अनेक शहरें जाळून व तेथील लोकांच्या भयंकर कत्तली उडवून रशिया व हंगेरी हे देश उध्वस्त करून टाकिले, आणि रशियांतील अनेक लहान मोठ्या राज्यांचा पाडाव करून तो देश आपल्या ताब्यांत

घेतला. हा देश सतत अडीचेशें वर्षें मोंगल लोकांनीं आपल्या ताब्यांत ठेवला, आणि इ० सन १२३८ पासून इ० सन १२४१ पर्यंत अर्धा ह्मणजे दक्षिण युरोपखंड त्यांनीं नामशेष करून टाकिला. परंतु इ० सन १२४१ मध्यें ओत्काईखान मृत्यु पावला आणि बातू हा युरोपखंडांतून परत आला. त्यामुळें या तार्तार मोंगलांच्या हातून युरोपखंडाची यावेळीं सुटका झाली. तथापि युरोपांतील रशिया देशावर त्यांचा इ० सन १४७० पर्यंत अंमल चालू होता. त्यानंतर आयव्हन या नांवाच्या एका शूर व पराक्रमी पुरुषानें त्यांना रशियामधून हांकलून दिलें, आणि स्वतः तेथील राज्यपद धारण केलें. हाच अर्वाचीन रशियाचा पहिला बादशाहा असून ( इ० सन १४६२ ते १५०५ ) या वेळेपासून त्यास " आयव्हन धी ग्रेट " अशी संज्ञा प्राप्त झाली.

ओत्काईखानानंतर तुलुईखानाचा मुलगा कुब्लाईखान यानें चीन देश आपल्या हस्तगत करून घेऊन पेकीन हें शहर आपल्या राजधानीचें ठिकाण केलें. त्याच्या वंशास चीनच्या इतिहासांत " युएन वंश " असें म्हणतात. या वंशानें त्या देशांत दीडशें वर्षें आपला अंमल गाजविला. पुढें रशियाप्रमाणेंच याही देशांतील त्यांची सत्ता इ० सन १३६८ मध्यें नष्ट होऊन चिनी लोकांनीं त्या ठिकाणीं पुन्हां आपलें राज्य स्थापन केलें. कुब्लाईच्या मृत्यूनंतर तार्तार मोंगलांच्या वर्चस्वास उतरती कळा लागली. त्यानंतर पुढें केव्हांही आजतागायत आशियांतील लोकांनीं युरोपखंडावर स्वारी करून तिकडे आपला अंमल बसविला नाहीं; उलट युरोपियन राष्ट्रांनींच वर्चस्वाचें क्षेत्र ( Sphere of Influence संरक्षित दोस्तसरकार, Protectorate Ally संरक्षित राज्य Protectorate मांडलीक राज्य Dependency मांडलीक राज्यकर्ता Dependent Prince स्वतंत्र राज्यकर्ता अथवा दोस्तसरकार ( Independent Prince or Ally ) तैनाती दोस्ती, ( Subsidiary Alliance ) आघात प्रतिबंधक राज्य, ( Buffer State ) वगैरे निरनिराळ्या संज्ञेनें, व संबंधानें आशियाखंडांतील बहुतेक सर्व राज्यांवर आपलें वर्चस्व स्थापन करून तें आजतागायत कायम ठेविलें आहे.

युरोपखंडाच्या पूर्वकालीन परिस्थितीसंबंधानें पाहतां, मुसलमानी रियासतींत म्हटल्याप्रमाणें "ऐतिहासिक कालांत युरोपवर तीन मोठाले घाले आले. पाहिला घाला युरोपच्या उत्तरेकडून गाथ वगैरे रानटी लोकांनीं घालून रोमन बादशाहीचा विध्वंस केला; ( इ० सन ४१० ) परंतु त्यामुळें युरोपियन सुधारणेचें नुकसान न होतां तिचा फायदाच झाला; व रोमन बादशाहीच्या जीर्ण सुधारणेला ह्या रानटी लोकांच्या ताज्या दमाची व प्रखरतेची नवीन पुष्टी मिळाली. दुसरा हल्ला अरब मुसलमानांनीं आठव्या शतकाच्या आरंभीं केला; त्यांत त्यांनीं पश्चिमेकडून स्पेन वगैरे देश जिंकिले. ह्या हल्ल्यामुळें युरोपीय

सुधारणेचा कांहीं फायदा झाला, व कांहीं नुकसानही झालें. आरब लोकांनीं युरोपांत पुष्कळ ज्ञान आणिलें; पण त्याचबरोबरच त्यांनी पुष्कळ गोष्टींचा नाशही केला; तिसरा हल्ला मध्यआशियांतील मोंगल व तुर्क लोकांनीं केला; हा शेवटचा हल्ला सुमारें दोनशें वर्षें एकसारखा चालूच होता."

"मोंगलांच्या या हल्ल्यानें युरोपचें अतिशय नुकसान झालें. रशियावर स्वारी करून तेथील बाल्यावस्थेंत असलेल्या सुधारणेचा चंगीझखान व त्याच्या मागून आलेले मोंगल सरदार यांनीं उच्छेद केला; रशियांत अनेक लहान लहान राज्यें होतीं; त्या सर्वांस मोंगलांनीं जिंकिलें, आणि अडीचशें वर्षेंपर्यंत त्यांस आपल्या अंमलाखालीं ठेऊन त्यांपासून चोपून खंडणी घेतली; या अडीचशें वर्षांच्या परचक्री अंमलामुळें युरोपांत रशियन राष्ट्राचा भावी इतिहास बदलून गेला, आणि त्यास पुष्कळ वर्षें आपलें डोकें वर काढितां आलें नाहीं. अशीच स्थिती दक्षिण युरोपांतील लोकांचीही झाली. ह्या कारणास्तव मोंगलांच्या स्वारीचें एवढें महत्व आहे. मोंगला नंतर पुढें कोणीही आशियाच्या लोकांनीं युरोपावर स्वारी करून तेथील लोकांवर आपला ताबा बसविलेला नाहीं."

"आशिया खंडांत मोंगल लोकांनी भयंकर नुकसान केलें; मोठ मोठ्या विस्तीर्ण प्रदेशांतील एकून एक लोकसंख्या त्यांनीं नाहींशी केली; त्यामुळें ज्या अनेक राष्ट्रांचा निःपात झाला, त्यांच्या सुधारणेचा आज मागमूसही सांपडत नाहीं; आग्नेईस युरोपच्या तुर्कांचा प्रभाव, व रशियांत मोंगलांचा प्रभाव, हे मात्र चिरकालीन राहिले."

"परंतु वाईटापासून चांगलेंही निपजत असतें; मोंगलांच्या स्वाऱ्यांमुळें आशिया व युरोप यांजमध्यें दळणवळणाचे मार्ग सुरू झाले. मोंगलांनीं नवीन अफाट रस्ते बांधिले; सैबेरियन रेलवे नुकतीच बांधण्यांत आली आहे, त्यापूर्वी हे मोंगलांचेच मार्ग दळणवळणासाठीं चालू होते; व दोन खंडांमधील व्यापारी तांडे, निरनिराळ्या राष्ट्रांचे वकील, व एकंदर लोकांचें जाणें येणें ह्याच मार्गांनीं होत होतें. अशा तऱ्हेचे हमरस्ते बांधण्याचें श्रेय प्रथम मोंगलांनीं घेतलें, ह्मणून मार्कोपोलो, ( हा प्रसिद्ध प्रवासी व्हेनीस येथील राहणारा होता. ) सारख्यांचे प्रवास शक्य झाले. ह्या हमरस्त्यांमुळें प्राच्य लोकांचें ज्ञानभांडार, त्यांची संस्कृती, त्यांचे उदात्त विचार व त्यांच्या थोर कल्पना ह्यांचा लाभ युरोपास झाला. तेणें करून युरोपियन राष्ट्रांच्या ठायीं नवीन प्रगति उत्पन्न होण्याची सोय झाली;"–ह्मणजे यादृष्टीनें मोंगल लोकांनींही जगाच्या संस्कृतींत भर घालण्याचें पुष्कळच प्रमाणांत श्रेय घेतलें आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

इसवी सन १००० वर्षांपासून हिंदुस्थानांत मुसलमानी काळास सुरवात झाली; व त्यांनीं या देशावर अनेक स्वाऱ्या केल्या व हिंदुस्थानांतील अनेक वीर पुरुषांनीं त्यांचा सारखा

प्रतिकार केला; यापैकीं शेवटचा योद्धा पृथ्वीराज चव्हाण हा होय. या शूर पुरुषाचा पाडाव झाल्यानंतर बाराव्या शतकाच्या प्रारंभापासून हिंदुस्थान देशावर मुसलमानांचा अंमल स्थापित झाला; व मोंगली बादशाहीच्या अखेरीपर्यंत अनेक मुसलमान राजघराणीं निर्माण झालीं; पण त्या बरोबरच त्यांच्यांत ऐषआराम वाढत जाऊन व दारूचें व्यसन शिरून तें अतीशय बळावलें; त्याप्रमाणेंच कित्येक मुसलमान राज्यकर्ते विषयी, व्यसनी, जुलमी व क्रूर निर्माण झाले; तथापि त्यांच्यांत पुष्कळ राज्यकर्ते प्रजादक्ष व सद्गुणीही निघाले; इतकेंच नव्हे तर फक्त हिंदुस्थानच्याच नव्हे तर जगाच्याही इतिहासांत शोभण्यासारखे कित्येक राज्यकर्ते अलौकिकही निपजले; शिवाय, मुसलमानांनीं पहिल्या पहिल्या केलेल्या स्वाऱ्यांत पुष्कळ लूट परदेशीं नेली असून पुढें नादीरशहा, अहंमदशहा अबदाली वगैरे मुसलमानांनींही हिंदुस्थानदेशांतून मुबलक लूट आपणाबरोबर नेलेली आहे. परंतु मुसलमानांनीं हिंदुस्थानांत राज्यें संपादन करून ते इकडेच स्थाईक झाल्यानंतर देशांतील पैसा देशांतच राहिला आहे, व तो स्थाईक राज्यकर्त्यांपैकीं कांहींनीं लूट करून कित्येक वेळां मिळविला असला तरी तो अन्यरूपानें पुन्हां प्रजेंतच खेळत राहिलेला आहे. युरोपांतील एकाही राष्ट्रानें उपभोगिलें नाहीं असें अमर्यादित वैभव त्यांनीं पिढ्यानुपिढ्या भोगिलें आहे; व देशांतील संपत्ती देशांतच खर्च करून त्यांनीं आपलीं अनेक कृत्यें अजरामर करून ठेविलीं आहेत, व्यंग अथवा वाईटपणाच पहावयाचा तर युरोपांतही पुष्कळ राज्यकर्ते वाईट निघाल्याचीं अनेक उदाहरणें दाखवितां येतील. चांगलें व वाईट यांचें नेहमींचेंच मिश्रण असतें; ह्मणून चांगल्या वाईटाची तुलना करून मुसलमानी राज्यांत हिंदु प्रजेस कितपत राजकीय महत्व प्राप्त झालें, यासंबंधीं, आणि त्यांच्या कारकीर्दीपेक्षांही त्यांच्या गुणदोषासंबंधीं थोडक्यांत उल्लेख करणें अवश्यक आहे. शिवाय दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांत मराठ्यांनां प्राप्त झालेलें महत्व, हें, हिंदुस्थानांतील मोंगली बादशाहींत हिंदुलोकांनां प्राप्त झालेल्या महत्वाच्या मानानें—आणि व्यापक व राष्ट्रीय दृष्टीनें अधिक महत्वाचें आहे; म्हणून त्यासंबंधीं प्रारंभीं थोडक्यांत विवेचन केलें आहे.

इराणांत नवव्या शतकांत "सामानी" या नांवाचा एक वंश राज्य करीत होता, या वंशांतील पांचवा सुलतान अबदुलमलिक याच्या जवळ अलप्तगीन या नांवाचा एक तुर्क गुलाम असून, तो अबदुलमलिक याच्या विशेष प्रेमांतील होता; म्हणून इ० सन ९६७ मध्यें त्यानें अलप्तगीन यास खोरासान प्रांताच्या सुभेदारीवर नेमिलें होतें. पुढें दोनच वर्षांनीं अबदुलमलिक मृत्यु पावला, व त्याचा मुलगा मनसूर हा गादीवर आला; तेव्हां त्यास पदच्युत करून आपण गादी मिळवावी म्हणून अलप्तगीनानें कारस्थान उभारिलें; म्हणून मनसूर यानें त्यास सुभेदारीवरून काढून टाकिलें. तेव्हां त्यानें गज्नी

येथें एका स्वतंत्र राज्याची स्थापना केली. तो इ० सन ९७६ यावर्षीं मृत्यु पावला व त्याचा जांवई सबक्तगीन हा त्याच्या जागीं गादीवर आला.

सबक्तगीन हा अलप्तगीनजवळ एक तुर्क गुलाम होता. तो पहिल्यानें स्वाराची नोकरी करीत असतां एकदां रानांत शिकारीस गेला, त्यावेळीं त्यानें एक हरिणीचें पाडस पकडिलें; परंतु तें घेऊन तो परत येत असतां त्याची आई हरिणी ही उड्या टाकीत आपल्या घोड्यामागून पळत येत आहे, असें पाहून त्यास तिची फार दया आली. त्यानें त्या पाडसास सोडून दिलें; व तो तसाच परत आला. त्याचरात्रीं महंमद पैगंबर त्याच्या स्वप्नामध्यें आला व त्यास म्हणाला कीं, तूं आज जें सत्कृत्य केलेंस त्याबद्दल तुला राज्यपद प्राप्त होईल." त्यानंतर त्याचा भाग्योदय झाला; व अलप्तगीन यानें त्यास आपली मुलगी देऊन, आपल्या पाठीमागें राज्याचा वारस केलें.

सबक्तगीनाच्या राज्याची पूर्वसरहद्द पंजाब प्रांतास भिडलेली असून, त्या प्रांतावर जयपाळ या नांवाचा एक हिंदुराजा राज्य करीत होता. अरबलोकांपासून पूर्वीं सिंधमधील हिंदु प्रजेस पुष्कळच त्रास भोगावा लागला असून त्याची हिंदुलोकांनां पूर्ण आठवण होती. त्यामुळें तसाच त्रास आपणासही पुन्हां भोगावा लागूंनये म्हणून कित्येक रजपूत राजांनीं एका केली. त्यांत लाहोरचा राजा जयपाळ हा प्रमुख होता. तो आपल्या बरोबरील सैन्य घेऊन सिंधूनद उतरून सबक्तगीनाच्या प्रदेशांत चाल करून गेला. तेव्हां त्याच्याशीं युद्ध करण्याकरितां, सबक्तगीन हा स्वत; आपला बारा वर्षांचा मुलगा महंमूद यास बरोबर घेऊन पुढें चालून आला; परंतु उभयतांमध्यें युद्ध सुरू होणार इतक्यांतच मोठ्या जोराचा वारा सुटून तुफान होऊन भयंकर पर्जन्यवृष्टी झाली; त्यामुळें उभयतांच्याही सैन्याची दुर्दशा झाली; आणि रजपूत लोकांनां तर त्यामुळें विशेषच भीति उत्पन्न झाली; व जयपाळानें सबक्तगीनाशीं तहाचें बोलणें लाविलें. तें महंमुदास मान्य नव्हतें परंतु गोष्ट निकरावर येणार असें पाहून सबक्तगीनानें विचार करून तें मान्य केलें; त्यावेळीं पन्नास हत्ती व कांहीं द्रव्यही देण्याचें जयपाळानें कबूल केलें; परंतु तो लाहोर येथे परत गेल्यावर त्यास या अपमानास्पद तहाबद्दल लाज वाटूं लागली, व सबक्तगीनाकडून खंडणी मागण्याकरितां आलेल्या लोकांस त्यानें प्रतिबंधांत टेविलें. तेव्हां सबक्तगीन यानें संतापानें जयपाळावर मोठ्या सैन्यानिशीं स्वारी केली. इकडे जयपाळ यानेंही दिल्ली, अजमीर, कालिंजर आणि कनोज येथील राजांची मदत मिळविली, व त्याच्याबरोबर युद्ध सुरू केलें. तेव्हां सबक्तगीनानें रजपूत सैन्यांतील एका नाक्याच्या जागेवर मोठ्या आवेशानें पांच पांचशें लोकांच्या टोळ्या एकामागें दुसरी अशा लागोपाठ पाठवून त्या सैन्याची फळी फोडिली, व मोठ्या जोरानें हल्ला करून त्यांचा पूर्ण पराजय करून टाकिला. सिंधूनदाच्या

" नील-आब " अथवा नीलाब या प्रदेशाचा पश्चिमेकडील भाग ताब्यांत घेऊन, व त्या प्रांताचा कारभार पाहण्यास पेशावर येथें आपला एक सरदार ठेऊन तो स्वदेशीं परत गेला; व वीस वर्षें राज्याचा उपभोग घेऊन इ० सन ९९७ यावर्षी गज्नी येथें जात असतां मार्गांत मृत्यु पावला. त्यानें आपला मुलगा इस्माइल यास राज्याचा वारस ठरविलें होतें, व त्याप्रमाणें तो सबक्तगीनच्या मृत्यूनंतर गादीवर करूं लागला होता; परंतु त्याचा भाऊ व सबक्तगीनाचा दासीपुत्र महंमूद यानें त्यास पदभ्रष्ट करून राज्य बळकाविलें, व " सुलतान " हें पद धारण केलें. हें पद आजपर्यंत दुसऱ्या कोणत्याही तुर्क राजानें धारण केलें नव्हतें, त्यामुळें त्यांच्यांतील महंमूद यांसच पहिला सुलतान असें ह्मणतात.

सुलतान महंमूद हा मोठा शूर व महत्वाकांक्षी होता. त्यानें इ० सन १००१ पासून १०२४ पर्यंत हिंदुस्थानावर एकंदर सतरा स्वाऱ्या केल्या; त्यांपैकीं इ० सन १०१७ मधील नववी स्वारी महत्वाची असून तींत त्यानें कनोज, मथुरा वगैरे शहरें लुटून भरभक्कम संपत्ति मिळविली. याच स्वारींत बरण ऊर्फ बुलंद शहर येथील हिंदुराजा हरदत्त हा महंमुदास शरण येऊन त्यानें आपल्या दहा हजार अनुयायांसह मुसलमानी धर्माची दीक्षा घेतली. त्यानंतर इ० सन १०२१-२३ या वर्षी दहावी व अकरावी अशा दोन स्वाऱ्या करून लाहोर येथील राजा अनंगपाळ व त्याचा मुलगा जयपाळ यांचा पराभव करून त्यानें पंजाब प्रांत आपल्या राज्यास जोडला, व त्या प्रदेशाच्या संरक्षणाकरितां सिंधु नदीच्या पूर्वेस कायमची फौज ठेवून दिली. हा सुलतान पैशाचा अतिशय लोभी होता. मरणापूर्वी त्यानें आपली सर्व संपत्ती एके ठिकाणीं आणवून तिची शेवटची भेट घेतली. त्यावेळीं आपण आतां तीस मुकणार असें मनांत येऊन त्यास अतिशय दुःख झालें व तो प्रत्यक्ष रडलाही; पण एवढ्या थोरल्या संपत्तींतून तिळमात्रही त्यानें कोणासही न देतां ती जशाच्या तशाच परत जामदारखान्यांत नेऊन ठेविली. हा सुलतान विद्या व कला, यांचा विशेष पुरस्कर्ता होता; प्रसिद्ध ज्योतिषी अल्बेरुनी, साधु फरार्वी, इतिहासकार उत्बी व बैहाकी, कवी व " शहानामा " ग्रंथाचा कर्ता फिर्दोसी, अन्सारी, फरुखी, अस्जुदी, हे सर्व याच सुलतानाच्या आश्रयाला होते; व फावल्यावेळीं तो या विद्वान लोकांच्या सहवासांत काळ घालवीत होता. त्यानें गज्नी येथें एक मोठा पाठशाळा, पुस्तकालय व पदार्थ संग्रहालय स्थापन केलें हिंदुस्थानांतून कुशल कारागीर गज्नी येथें नेऊन तेथें सुंदर इमारती बांधून तें शहर सुशोभित केलें, आणि शहरांत कालवे आणून व ठिकठिकाणीं हौद व कारंजीं बांधून शहरभर पाण्याचा पुरवठा केला. महंमूद हा विद्वान लोकांचा अतिशय परामर्ष घेत असे, व त्यांना उत्तेजन देण्याकरितां तो दरसाल तीस लाख रुपये खर्च करीत असे.

तथापि त्याच्या नेहमींच्या अतिशय लोभी स्वभावाचें, त्यांत मिश्रण झालेलें असे. महंमुदाच्या आश्रयांत असलेल्या कवींत फिर्दोसी हा सर्वांहून श्रेष्ठ होता. त्यास महंमुदानें एक कविताबद्ध ग्रंथ लिहिण्यास सांगून त्याच्या दर ओळीस एक दिनार देण्याचें कबूल केलें. दिनार हें नाणें सोन्याचें व रुप्याचेंही असे; परंतु ठराव झाला होता तो मोघम असून अमूक धातूचें दिनार द्यावयाचें असें स्पष्ट ठरलें नव्हतें; तथापि महंमूद हा आपणास सोन्याचें दिनार देईल अशी फिर्दोसी याची कल्पना होती; परंतु ती खरोखरच कविकल्पना आहे, असें त्याच्या प्रत्ययास आलें. कारण तो ग्रंथ पुरा करून त्यानें महंमुदाकडे नेला तेव्हां त्याबद्दल तो त्यास रुप्याचे दिनार देऊं लागला; त्यामुळें फिर्दोसी यास राग येऊन तो महंमुदाच्या दरबारांतून निघून गेला, आणि त्यानें महंमुदास उपहासास्पद वाटणारा दुसरा एक ग्रंथ तयार करून तो त्याजकडे पाठविला; तरी महंमुदास त्याबद्दल राग आला नाहीं; उलट फिर्दोसी याचा राग जावा ह्मणून त्यानें त्याच्याकडे बहुमोल नजराणा पाठविला परंतु तो नजराणा घेऊन महंमुदाचीं माणसें त्याच्या घरीं पोहोंचलीं तेव्हां तो मृत्यु पावून त्याचें शव अंत्यविधीकरितां स्मशानांत नेण्यांत येत होतें ! ईश्वरीलीला अशीच अगाध आहे ! !

महंमूद हा अतिशय न्यायी असून रयतेस बरोबर न्याय मिळावा या विषयीं तो फार काळजी घेत असे. एकदां तो आपल्या राजधानींत गज्नी येथें असतां त्याच्याकडे कोणी एका मनुष्यानें येऊन असा अर्ज केला कीं, "आपले दरबारचा कोणी एक मोठा कामगार दररोज रात्रीं माझ्या घरीं येतो, व मला घराबाहेर घालवून माझ्या स्त्रीशीं व्यभिचार करितो. तरी या जुलुमापासून सरकारानें माझें संरक्षण करावें" हें त्या गृहस्थाचें भाषण ऐकतांच महंमूद मनांत एकदम दचकला, व हा दुराचारी पुरुष, ह्मणजे आपलाच मुलगा असावा, अशी त्यास शंका उत्पन्न झाली; तथापि तो कोणीही असो, असा विचार करून खरा न्याय देण्याच्या बुद्धीनें त्यानें त्या गांजलेल्या मनुष्यास असा हुकूम दिला कीं, "तो पुरुष आज रात्रीं तुझ्या घरीं आल्याबरोबर मला ताबडतोब कळीव" त्याप्रमाणें रात्रीं तो पुरुष त्याच्या घरीं आल्यावर, त्या मनुष्यानें हें वर्तमान महंमूदास, जाऊन सांगितलें. तेव्हां महंमूद लागलींच कांहीं लोक बरोबर घेऊन त्याच्या घरीं गेला, आणि आपल्या लोकांना घरांत पाठवून त्यानें तो अपराधी पकडविला; नंतर त्यानें मशाली विझविण्याचा हुकूम दिला, आणि मोठा घोष करवून त्या गलबल्यांत त्यानें त्या अपराध्यास ताबडतोब ठार मारलें; नंतर पुन्हा मशाली लाववून त्याचें प्रेत पाहिलें; हात जोडून व डोळ्यांत पाणी आणून त्यानें परमेश्वराची अनन्यभावानें स्तुती केली; व तेथें थोडीशी भाकर आणवून ती खाऊन तो

घटा घटा पाणी प्याला; जवळच्या मंडळीस त्याच्या ह्या एकंदर आचरणा बद्दल मोठा आचंबा वाटला, व त्यांनीं त्यास असें करण्याचें कारण काय ह्मणून विचारिलें; तेव्हां महंमूदानें उत्तर दिलें कीं, "दिवे मालवविले, व मोठा शद्ब करविला याचें कारण असें आहे कीं, अपराधी कोणी माझा आप्त असला तर त्यास पाहिल्यानें किंवा त्याचा शद्ब ऐकल्यानें त्याच्या विषयीं मला पक्षपात करण्याची बुद्धि उत्पन्न होऊं नये; अशा दुष्टकामांत माझा कोणी आप्त सांपडला नाहीं, व त्याचा वध करण्याचा प्रसंग देवानें मजवर आणिला नाहीं, ह्मणून मी त्याचे आभार मानिले आणि हा माझाच मुलगा असावा या काळजीनें मला दिवसभर धड अन्नपाणीही घेतां आलें नाहीं, ह्मणून मी आतां भाकरी खाऊन पाणी प्यालों." असा हा न्यायी सुलतान मधुमेहानें आपल्या वयाच्या त्रेसष्ठावे वर्षी, इ० सन १०३० मध्यें एप्रील ता० ३० रोजीं गज्नी येथें मृत्यु पावला. तो अंतःकरणाचा क्रूर नव्हता; व त्यानें केलेल्या अनेक स्वाऱ्यांमध्यें मुद्दाम कोणावरही जुलूम केला नाहीं. इतकेंच नव्हे तर तो स्वतः विशेष धर्मनिष्ठ असून सुद्धां त्यानें स्वधर्माच्या प्रसारा करितां कोणावर जुलूम केला नाहीं, किंवा परधर्मीयांवर झीजिया करही बसविला नाहीं; तथापि याच सुलतानाच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांतील भावी मुसलमानी राज्याचा पाया घातला गेला. पंजाब प्रांत मुसलमानाच्या ताब्यांत गेल्यानें, त्यांच्या पुढील राज्य संस्थापनेस त्याचा पायाप्रमाणें उपयोग होऊं लागला, आणि याच पायावर हिंदुस्थान देशांत साम्राज्याची टोलेजंग इमारत भरण्याचें कार्य त्यांनीं भावी काळांत सिद्धीस नेलें.

महंमूद यास महंमद व मसाऊद असे दोन जुळे मुलगे होते; त्यांपैकीं महंमद हा गादीवर आला; परंतु त्याच्याशीं युद्ध करून मसाऊदनें त्यास पदभ्रष्ट केलें, व त्याचे डोळे काढून त्यास प्रतिबंधांत ठेवून आपण राज्याधिकारी झाला. त्यानें हिंदुस्थानावर इ० सन १०३३ व १०३९ मध्यें अशा दोन स्वाऱ्या केल्या; पुढें तुघ्रलबेगनें मसाऊद यास पदभ्रष्ट करून महंमदास गादीवर बसविलें; परंतु तो अंध असल्यामुळें त्याचा मुलगा अहंमद हा कारभार पाहूं लागला. त्यानें मसाऊद याचा इ० सन १०४० मध्यें वध केला. मसाऊद हा मोठा शूर असून हत्तीबरोबरही तो युद्ध करून त्यास जेरीस आणीत असे, एवढी त्याची प्रचंडशक्ती होती; शिवाय त्यास विद्येची व इमारती बांधण्याची विशेष अभिरुची होती; व तोही त्याचा बाप महंमूद याच्याप्रमाणेंच मद्यप्राशन करीत होता; तथापि महमूद मितपानी होता; उलटपक्षीं मसाऊदच्या दरबारांत मद्यप्राशनाचा मोठा सपाटा चालत होता आणि गज्नी जवळील फिरोजबागेंत, फौजेची कवाईत झाल्यावर, मद्यपानाचे मोठमोठे समारंभ उडत असत.

महंमद गादीवर आला, तथापि एकच वर्षांत (इ० सन १०४१) मौदूद यानें त्याचा वध केला. याच्या कारकीर्दींत हिंदु राज्यकर्त्यांनीं लाहोरला वेढा दिला, परंतु त्यांत अखेरीस त्यांनांच पराभूत व्हावें लागलें. मौदूद हा इ० सन १०४९ मध्यें मृत्यु पावला. त्यानंतर, त्याचा चार वर्षांचा मुलगा मसाऊद हा गादीवर आला; परंतु त्यास त्याचा काका व मैदूदचा भाऊ अबुलहसन यानें पदभ्रष्ट केलें, व स्वतः राज्याधिकारी झाला; हा राज्यकर्ता बराच शूर असून त्यानें मुसलमानाच्या अंमलाखालून गेलेला पंजाब प्रांत परत मिळवून सिंधऱ्या कांहीं भागावरही आपला अंमल चालू केला; त्यास महंमुदाचा मुलगा अबूलरशीद यानें इ० सन १०५१ मध्यें पदभ्रष्ट केलें, पण एक वर्षांतच तोही पदच्युत होऊन मसाऊदचा मुलगा फर्रुखजाद हा गादीवर आला. तो इ० सन १०५८ मध्यें मृत्यु पावला, व त्याचा भाऊ इब्राहीम हा गादीवर आला. त्यानें सतत चाळीस वर्षें राज्य केलें. त्या अवधींत फक्त एकदांच इ० सन १०७९ मध्यें त्यानें पंजाब प्रांतावर स्वारी केली होती. हा सुलतान अतिशय धार्मिक असून त्यानें कुराणाचें भाषांतर केलें होतें. त्यास चाळीस मुलगे व छतीस मुली अशीं एकंदर शहात्तर अपत्यें होतीं. या सुलतानासारखीं सतत चाळीस वर्षें राज्यकारभार चालविल्याचीं आणि तोही पुष्कळच सुखानें व शांततेनें चालविल्याचीं व इतकी संतती झाल्याचीं उदाहरणें इतिहासांत क्वचित्च आढळून येतात. हा राज्यकर्ता इ० सन १०९८ मध्यें मृत्यु पावला, व त्याचा मुलगा मसाऊद हा गादीवर आला. हा राज्यकर्ता इब्राहीमच्या मानानें पुष्कळच शूर व विद्वान होता. त्यानें सर्व कायद्यांचें एकीकरण करून त्याप्रमाणें न्याय देण्याची व्यवस्था केली. आणि आपल्या सरदारांनां हिंदुस्थानांत पाठवून थेट गंगानदीपर्यंतच्या प्रदेशांतून लूट मिळवून आणविली; याच सुलतानाच्या कारकीर्दींत तुर्क लोकांनीं गज्नीचा बहुतेक प्रदेश आपल्या हस्तगत करून घेतला; पुढें मसाऊदचा मुलगा अर्स्लान हा गादीवर आला; परंतु सेल्जुकसुलतान संजर याच्या बरोबरील युद्धांत तो मारला गेल्यानें, संजर यानें अर्स्लानचा भाऊ बहिराम यास इ० सन १११८ मध्यें गादीवर बसविलें.

सुलतान बहिरामगज्नी हा फार न्यायी व दयाशील होता, व त्याची एक मुलगी घोर प्रांताचा सुभेदार कुतुबुद्दीन यास दिली होती; परंतु या उभयतांत वैमनस्य येऊन बहिरामानें कुतुबुद्दीन याचा वध केला; त्यामुळें त्याचे भाऊ सैफुद्दीन व अल्ला-उद्दीन हे गज्नीवर चाल करून आले, तेव्हां बहिराम कर्मानच्या डोंगरांत पळून गेला; ह्मणून सैफुद्दीन हा त्याच्या तोंडावर गज्नी येथें राहिला व अल्लाउद्दीन हा आपल्या घोर प्रांताची राजधानी फिरोजकोह येथें परत गेला; पुढें हिंवाळा लागल्यानंतर गज्नी व फिरोजकोह येथील दळणवळण बंद पडल्यावर उभयतांमध्यें युद्ध सुरू झालें; त्यावेळीं

सैफूचें सैन्य बहिरामास जाऊन मिळालें, व तोही पाडाव होऊन त्याच्या हातीं सांपडला; तेव्हां बहिरामानें त्याची धिंड काढून व त्याचे हाल हाल करून त्यास ठार मारिलें. त्यामुळें हें वैर विकोपास गेलें, व त्याचा भाऊ अल्लाउद्दीन हा अतिशय त्वेषानें बाहेरामावर चाल करून आला. युद्ध सुरु होतांच बहिराम भीतीनें पळाला, व सतत तीन दिवस अल्लाउद्दीनयानें गज्नी शहरांत तरवार व अग्नी यांचा भयंकर प्रळय माजविला व तें शहर निर्जन, ओसाड व ऐश्वर्यहीन केलें. इकडे बहिराम हा वनवास भोगीत हिंदुस्थानाकडे वळला, परंतु नानाप्रकारच्या संकटांनीं व दुःखांनीं, इ० सन ११५२ मध्यें रस्त्यांतच त्याचा अंत झाला.

गज्नी शहर सेल्जुक तुर्कांनीं हस्तगत केल्यानंतर तेथील सुलतानांपैकीं सुलतान खुश्रू हा हिंदुस्थानांत आला, व त्यानें इ० सन ११५३ मध्यें लाहोर येथें आपलें स्वतंत्र राज्य स्थापन केलें; व सात वर्षें शांततेनें राज्यकारभार करून तो इ० सन ११६० मध्यें मृत्यु पावला; व त्याचा मुलगा खुश्रूमालिक हा गादीवर आला; या सुलतानाच्या कारकीर्दींत इ० सन ११८८ मध्यें शहाबुद्दीन ऊर्फ महंमद यानें हिंदुस्थानावर दुसरी स्वारी केली, त्यावेळीं खुश्रूमलीक याचा पाडाव केला व त्याच्या मुलास बळजबरीनें ओलीस घेऊन त्याच्या राज्याचा नाश केला. विश्वासघातानें मलिक यास त्याच्या कुटुंबासह कैद करून ग्यासुद्दीनकडे पाठविलें. त्यानें कांहीं काळानें (इ० सन ११८६ मध्यें) मलीक याचा वध केला, व अशारीतीनें सबक्तगीनाच्या वंशाचा शेवट झाला.

सुलतान अल्लाउद्दीन हा इ० सन ११५६ मध्यें मृत्यु पावला. त्यास सैफुद्दीन या नांवाचा एक मुलगा व ग्यासुद्दीन व शहाबुद्दीन असें दोन पुतणे होते. अल्लाउद्दीन याच्या मृत्युनंतर एकच वर्षांत सैफुद्दीन याचा खून झाला, व ग्यासुद्दीन व शहाबुद्दीन हे उभयतां मिळून राज्य चालवूं लागले; दोघां भावांनीं व राजांनीं एक मतानें राजकारभार चालविल्याचें मुसलमानी इतिहासांत हें एवढें एकच उदाहरण आहे; इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानांतील मुसलमानी निरनिराळीं राज्यें, मोंगल बादशहात, मराठा साम्राज्य व इतर मराठी राज्यें यांच्यामध्येंही असें उदाहरण आढळून येत नाहीं. मराठ्यांच्या इतिहासांत पुतणे माधवराव व नारायणराव यांच्या कारकीर्दींत अल्पकाळ काका राघोबा याच्या सल्ल्यानें राज्य चालविण्याचा दोनदां अयशस्वी प्रयत्न करण्यांत आला होता; पण उभयतां उदाहरणांमध्यें विशेष फरक असा आहे कीं, ग्यासुद्दीन व शहाबुद्दीन हे प्रारंभापासूनच सलोख्यानें वागून, एकमतानें राज्यकारभार चालवीत होते; उलटपक्षीं, राघोबाशीं सलोखा करून एकमताची मोट बांधण्याकरितां, त्यास राज्य कारभारांत घेण्यांत आलें होतें; त्यामुळें या उभयतां बंधूंनीं व राजांनीं एकमतानें राज्यकारभार चालविला ही गोष्ट जगाच्याही इतिहासांत अपूर्व आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

या उभयतां बंधूंपैकीं पश्चिमेकडील प्रांताचा कारभार ग्यासुद्दीन पहात असे, परंतु त्यानें हिंदुस्थानच्या कारभाराकडे कधींही लक्ष दिलें नाहीं; उलटपक्षीं त्याचा भाऊ शहाबुद्दीन ऊर्फ महंमद याचें लक्ष पहिल्यापासूनच हिंदुस्थान देशाकडे वेधलें होतें. त्यानें इ० सन ११७६ पासून इ० सन ११९५ पर्यंत हिंदुस्थानावर सात स्वाऱ्या केल्या व बराच प्रदेश हस्तगत करून आपला हुषार व विश्वासू गुलाम कुतुबुद्दीन ऐबक यास त्या सर्व प्रदेशाचा कारभारी नेमिलें. ग्यासुद्दीन घोरी हा इ० सन १२०२ मध्यें मृत्युपावल्यावर शहाबुद्दीन हा सर्व राज्याचा अधिकारी झाला; त्यानंतर चारच वर्षांनीं इ० सन १२०६ मध्यें सिंधूनद्याच्या कांठीं गक्कर जातीच्या रानटी लोकांनीं त्याचा खून केला; तेव्हां हिंदुस्थानांतील त्याचा कारभारी कुत्बउद्दीन ऊर्फ कुतुबुद्दीन यानें दिल्ली येथें स्वतंत्र राज्य स्थापन केलें, आपल्या नांवानें खुत्बा वाचविला, व आपल्या नांवाचें नाणें पाडून तो स्वतंत्रपणें राज्यकारभार चालवूं लागला. थोडक्यांत ह्मणजे इ० सन ७११ मधील महंमद कासीम याच्या सिंध प्रांतावरील स्वारीच्या काळापासून, मुसलमानांनीं या देशावर सतत स्वाऱ्या करून शहाबुद्दीन घोरी यानें हिंदुस्थानांत मुसलमानी सत्ता स्थापन केली, आणि गुलाम वंशांतील कुतुबुद्दीन यानें दिल्ली येथें स्वतंत्र राज्य स्थापन केलें; त्याचवेळीं शहाबुद्दीन घोरी याचा दुसरा सरदार बखत्यार खिलजी यानें बंगाल व बहार प्रांतांत आपलें स्वतंत्र राज्य स्थापन करून तो तिकडे राज्यकारभार चालवूं लागला, व अशा रीतीनें हिंदुस्थानांत मुसलमानांची सत्ता स्थापन झाली.

हिंदुस्थानांतील निरनिराळया मुसलमानी सत्ताधाऱ्यांच्या, व राजकुळांच्या, आणि मोंगल बादशाहीच्या हकीकतींचा इतिहास, या ठिकाणीं प्रास्ताविक माहिती ह्मणून सुद्धां, साग्ररीतीनें देतां येणें शक्य नसून, तसा तो देणेंही अप्रस्तुत होईल; ह्मणून विहंगमदृष्टया, व थोडक्यांतच त्यासंबंधीं या ठिकाणीं उल्लेख केला आहे; व त्यांतही हिंदू व मराठे यांच्या उत्कर्षास साधनीभूत गोष्टी कोणत्या घडल्या, व त्यांच्यांतील राज्यकर्त्यांमध्यें विशिष्ट प्रकारचे राज्यकर्ते कोण कोण निपजले, हें दाखवून तत्कालीन राजकीय स्थितीसंबंधानेंही प्रसंगानुसार विवेचन केलें आहे.

कुतुबुद्दीन हा हिंदुस्थानांतील पहिला मुसलमान राज्यकर्ता असून, त्यानें आपल्या ताब्यांतील एकंदर प्रदेशाचा उत्तम बंदोबस्त ठेविला, आणि मोठ्या न्यायानें व सौम्यतेनें कारभार चालविला. हा सुलतान मोठा दयाळू होता, व त्याच्या अप्रतिम औदार्यावरून त्यास "लख-बक्ष" ह्मणजे, लाखरुपये दान देणारा असें नांव मिळालें होतें. तो इ० सन १२१० मध्यें घोड्यावरून पडून मृत्यु पावला. या सुलतानानें दिल्ली येथील जुम्मामशीद पहिल्यानें बांधिली, आणि दिल्ली जवळ त्यानें आपलें नांव देऊन

" कुतुब-मिनार या नांवाची एक प्रचंड इमारत व विजयस्तंभ बांधिला. ही गगनचुंबित अत्युतम इमारत दिल्ली पासून अकरा मैलांवर आहे. पारीस येथें " एफेल टॉवर " या नांवाचा एक प्रचंड लोखंडी मनोरा इ० सन १९११ मध्यें प्रदर्शनाच्या वेळीं तयार करण्यांत आला. हा मनोरा लोखंडी असल्यामुळें तो सोडून दिला तर सर्व जगामध्यें कुतुबमिनार इतका उंच मनोरा दुसरा कोणताही नाहीं. अलेक्झाँड्रिया येथील " पांपीचा जयस्तंभ " केरो येथील हुसनच्या मशीदीचा मनोरा, पेट्रोगॉड येथील " अलेक्झाँडर कॉलम्," अथवा अमेरिकेंत न्यूयॉर्क जवळ असलेला १५१ फूट उंचीचा पुतळा—फ्रान्सनें अमेरिकेंतील वसाहतवाल्यांना गुप्तरीतीनें परंतु मोठ्या नेटानें केलेली मदत फलद्रूप झाल्यामुळें त्यांचें राजरोस अभिनंदन करून, व या गोष्टीचें स्मारक म्हणून फ्रान्सनें आपल्या देशांत मुद्दाम तयार करवून अमेरिकेस नजर केलेला, व त्यांनीं न्युयार्कबेमध्यें किनाऱ्याजवळ बसविलेला १५१ फूट उंचीचा स्वातंत्र्यसूचक पुतळा—यांपैकीं एकालाही कुतुबमिनारची बरोबरी करवणार नाहीं. हा मनोरा लाल दगडाचा बांधिलेला असून त्याची उंची जमिनी पासून २३८ फूट १ इंच आहे. व त्याच्या पायाचा व्यास ४७ फूट २ इंच असून अगदीं शिरोभागाचा व्यास ९ फूट आहे. ह्या मनोऱ्याचा तळ मजला दोन फूट उंचीच्या जोतयावर असून मधली इमारत २३४ फूट १ इंच आणि शेवटच्या घुमटाचा पाया दोन फूट उंच, मिळून एकंदर २३८ फूट १ इंच उंची आहे. हा मनोरा पूर्वी ३०० तीनशें फूट उंच असून त्यावर एकंदर सात मजले होते, असें म्हणतात. परंतु हल्लीं अगदीं शेवटच्या मजल्यासह एकंदर फक्त पांच मजलेच अस्तित्वांत आहेत. शिवाय हा मनोरा जरी इतका उंच आहे तरी त्याच्या आंतील जिना ऐसपैस व चांगला आहे. पांच मजले मिळून एकंदर ३७६ पायऱ्या असून आंतील बाजूस हवा व उजेड यांची चांगली सोय केलेली आहे. दरेक मजल्यावर प्रेक्षकास विश्रांति घेण्याकरितां गच्ची काढलेली आहे आणि असा हा अद्वितीय मनोरा बांधून सुलतान कुतुबुद्दीन यानें जगांत आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे.

कुतुबुद्दीनच्या मृत्युनंतर त्याचा जांवई शमसुद्दीन ऊर्फ शम्स–उद्दीन अल्तमश हा गादीवर आला. त्यानें आपल्या कारकीर्दीत, सिंधूनदापासून भागीरथीनदीपर्यंतचें बहुतेक उत्तर हिंदुस्थान, आपल्या अंमलाखालीं आणिलें, आणि त्यामुळें हिंदू लोकांच्या ठिकठिकाणीं असलेल्या कित्येक अवशिष्ट राजसत्ता नष्ट होत गेल्या. त्याप्रमाणेंच याच सुलतानाच्या कारकीर्दीत मोंगल लोकांचा हिंदुस्थानांत पहिल्यानें शिरकाव झाला, त्याचेंच पर्यवसान पुढें दिल्ली येथें मोंगल बादशाही स्थापन करण्यांत झालें.

अल्तमशाच्या मृत्युनंतर सुलताना रझिया, ही गादीवर आली. अल्तमशाचा वडील मुलगा रुक्नुद्दीन हा बापाच्यामागें फिरोजशहा हें नांव धारण करून गादीवर आला होता; व तो अतिशय विलासी व दुर्वर्तनी असल्यामुळें त्याची आई राज्यकारभार पहात होती; परंतु तीही स्वभावानें अतिशय दुष्ट होती; त्यामुळें या उभयतांकडून दरबारच्या मंडळीस अतिशय त्रास होऊन त्यांनीं फिरोजशहास पदभ्रष्ट करून सुलताना रझिया हिला गादीवर बसविलें होतें. ही सुलताना गादीवर आल्यावर तिनें "रझियातुद्दीन" ह्मणजे धर्मभक्त असा किताब धारण केला. ही अल्तमश जीवंत असतांना सुद्धां राज्याचा कारभार पहात असे. ही बाई मोठी पराक्रमी, बुद्धिवान् व धीट असून, स्त्री असूनही, राज्य चालविण्याला अत्यावश्यक असलेली कर्तृत्वशक्ती तिच्या ठायीं पूर्णपणें वसत होती; व ती स्वतः अचाट, उद्योगी, बुद्धिमान, न्यायी व सभाधीट असून ती मर्दानी पोशाख करून दररोज दरबारांत येऊन बसून स्वतः सर्व कामकाज पहात होती; व कामांचा निकाल करीत होती. शिवाय तिनें पूर्वीच्या कित्येक वाईट चाली बंद करून व कित्येक कायद्यांची दुरुस्ती करून दरबारांतील सर्व अमीर उमरावांस संतुष्ट राखिलें होतें; आणि थोडक्यांत ह्मणजे "तिच्या अंगीं राज्यकर्त्या पुरुषाला आवश्यक असलेले सर्व सद्गुण वसत होते; आणि अत्यंत कसोशीनेंच तिचें वर्तन तपासिलें तर "ती जात्या बायको होती" एवढाच काय तो दोष तिच्याठायीं वसत होता." परंतु अखेर प्रेमविषयक बाबतींत गुरफटली जाऊन तिची फसगत झाली. एका हबशी गुलामावर तिचें प्रेम जडलें, व तिनें सर्व कारभार त्याच्या हवालीं सोंपविला; परंतु ही गोष्ट दरबारच्या लोकांस न आवडून त्यांनीं बंड केलें. त्यांत तो हबशी गुलाम मारला गेला व सुलताना कैद होऊन तिला अल्टूनिया या सरदाराच्या दिमतींत प्रतिबंधांत ठेव्ण्यांत आलें. तेव्हां दरबारी मंडळीस पुन्हा आपल्या पक्षाकडे करून घेण्याकरितां तिनें त्या सरदाराशींच लग्न लाविलें; परंतु लोकक्षोभ त्यामुळें कमी न होतां अखेरीस ती व तो सरदार पकडले जाऊन त्या उभयतांचाही वध करण्यांत आला आणि तिचा भाऊ मोइझ–उद्दीन बहराम हा गादीवर आला; (इ० सन १२३९) पण त्याचाही त्याचा वजीर यसत्यारउद्दीन यानें इ० सन १२४१ मध्यें खून केला, व अल्तमश याचा नातू व रुक्नुउद्दीन याचा मुलगा अल्लाउद्दीन मसूाऊद हा गादीवर आला; परंतु त्यास त्याचा चुलता व अल्तमशाचा मुलगा नासिरुद्दीन महंमद यानें दरबारच्या मंडळीच्या अनुमतीनें व मदतीनें, इ० सन १२४३ मध्यें त्यास पदच्युत केलें, व आपण राज्यपदावर आला. या उभयतां राज्यकर्त्यां पैकीं बहराम हा विषेश कर्तृत्ववान नव्हता, व मसाऊद हा तर विलासी असून क्रूरही होता; व सुव्यवस्थित राज्यकारभार करण्याकडे त्याचें बिलकुल लक्ष नव्हतें. याउभयतांही

राज्यकर्त्यांच्या कारकीर्दीत हिंदुस्थानावर मोंगलांचे तीन वेळां हल्ले आले; त्यांपैकीं बहरामच्या कारकीर्दीत एक व मसाऊदच्या कारकीर्दीत दोन हल्ले झाले असून ते तीन्हीही मोठ्या शौर्यानें परतवून लावण्यांत आलेले आहेत; परंतु या उभयतांही राज्यकर्त्यांची कारकीर्द फारशी महत्वाची अथवा रयतेस सुखावह झालेली नाहीं आणि त्या मानानें सुलताना रझिया हिची कारकीर्द पुष्कळच सुखावह झाली असून ती त्या उभयतांच्या मानानें अतिशयच कर्तृववान होती, पण अखेरीस राणी क्लियोपाट्रा हिच्याप्रमाणेंच, पण कांहिंशा निराळ्या प्रकारानें सुलताना रझिया हिचा शेवट होऊन, या उभयतांच्या बाबतींत बऱ्याच प्रमाणांत इतिहासाची पुनरावृत्ति झालेली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं[१].

---

टीप १:–क्लियोपाट्रा ही मिसर देशाचा शेवटचा राज्यकर्ता दिओनिसियस टॉलेमी याची बायको होती. ही स्त्री मोठी हुषार, पराक्रमी, विषयी, अतिशय विलासी व लाखांत उमटून पडणारी अशी पराकाष्टेची सौंदर्यसंपन्न होती. तिचीं वापरण्याचीं सर्व वस्त्रें अत्यंत मौल्यवान तलम रेशमी कापडांचीं असून त्यांची किंमत वजमानें जवळ जवळ सोन्याच्या भारंभार असे. तिचे सर्व दागदागिने उत्तम सुवर्णाचे असून ते विशेष मौल्यवान मोतीं व रत्नें यांनीं जडविलेले असत. तिच्याजवळ हिंदुस्थानांतील मौल्यवान व पाणीदार मोत्यांचीं बनविलेलीं कुंडलें, अथवा कर्णफुलाची एक जोडी होती व तिची एकटीचीच किंमत, त्यावेळीं पंधरा लाख रुपये होती; ह्मणजे हल्लींच्या दिवसांत सहापट भावाची वाढ धारल्यास या नुसत्या कर्णफुलाचीच किंमत जवळ जवळ एक कोट रुपये होती. अशा ह्या अलौकिक स्त्रीचें तिच्या नवऱ्याशीं भयंकर वैर उत्पन्न झालें; व उभयतांनीं सैन्यें जमवून परस्पराशीं युद्ध केलें; त्यांत तिचा नवरा दिओनिसियस याचा पूर्ण पराजय झाला, व तो जीवाच्या भीतीनें पळत असतां नाईल नदींत बुडून मृत्यु पावला; तेव्हां क्लिओपाट्रा ही स्वतः राज्यपदारूढ झाली. आपल्या महत्वस्थापनेंत आड येऊं पाहणाऱ्या आपल्या स्वतःच्या भावास तिनें विष देऊन ठार मारिलें, व नवऱ्याचा आणि भावाचा निकाल उडविल्यावर ती निर्वेधपणें राज्यकारभार चालवूं लागली, परंतु या गोष्टीस फार काळ लोटला नाहीं तोंच रोमन सरदार मार्क अँटनी यानें, ब्रूटस व कॅसियस यांचा पराभव केल्यानंतर क्लियोपाट्रा हिला, तिनें ब्रूटस यास साह्य केलें होतें ह्मणून शिक्षा करण्याकरितां इतालीच्या दक्षिणेस असलेल्या सिसिली बेटांत बोलाविलें; व अँटनी याचा हा निरोप पोहोंचल्याबरोबर ती तिकडे जाण्यास निघाली. यावेळीं तिचें गलबत विशेष उत्तम प्रकारें शृंगारिलेलें होतें; त्यास विशेष मौल्यवान रेशमी कापडाचीं शिडें लाविलीं होतीं. नानाप्रकारचे भारी किंमतीचे सुगंधी पदार्थ जिकडे तिकडे पसरल्यामुळें तें गलबत सुवासाच्या घमघमाटानें भरून गेलें होतें; हातांत सुंदर रुप्याचीं वल्हीं घेऊन तरुण व सुस्वरूप

अल्तमशाचा मुलगा नासिरुद्दीन महंमद हा मोठा प्रजादक्ष राज्यकर्ता होऊन गेला; तो मोठा विद्वान असून त्याची राहणी अतिशय साधी असे. तो लहान असतांनाच अल्तमशानें त्यास बंगालच्या कारभारावर नेमिलें होतें; परंतु अल्तमश मृत्यु पावल्यावर,

---

स्त्रिया वाद्यांच्या तालसुरावर, तें वल्हवीत होत्या; आणि या सर्व प्रवासभर राणी क्लिओपाट्रा ही, त्या स्त्रियांमध्यें एका शोभिवंत व मौल्यवान पलंगावर गाद्यागिर्द्यांच्या मऊ शेजेवर मोठ्या मिजासीनें व बेफिकिरीनें पहुडलेली होती. असें हें सुंदर स्त्रियांचें गलबत सिसिली बेटांत पोहोंचल्यावर, राणी क्लिओपाट्रा हिला पाहतांक्षणींच अँटनी पूर्णपणें गडबडून गेला. त्याचें शौर्य व पराक्रम पार लटपटून जाऊन तिच्या सौंदर्यानें मोहित होऊन तो तिचा बंदागुलाम बनला. ज्याला मोठमोठे वीर व सेनानी थरथरा कांपत असत, व ज्याच्या नांवाचा विलक्षण दरारा असून ज्यानें कित्येक वीर जिंकून त्यांना आपली सेवा करण्यास भाग पाडिलें होतें, तोच अलौकिक योद्धा अँटनी, क्लिओपाट्रेचा सेवक बनून तिच्या कृपेची याचना करूं लागला; आणि तिला शासन करण्याचा मूळ हेतू त्याच्या मनांतून साफ नाहींसा होऊन तो स्वतःला विसरून तिच्या चरणीं पूर्णपणें लीन होऊन गेला; व पुढें उभयतांनाही एक क्षणभर सुद्धां परस्परांवांचून करमेनासें होऊन तीं उभयतां नेहमीं विलासांत मग्न होऊन राहिलीं. नंतर ऑक्टेव्हियस या रोमन सरदारानें, अँटनीशीं युद्ध करून त्याचा ग्रीस देशांतील ऑक्टिम् या गांवीं पूर्णपणें पराजय केला. तेव्हां या अपमानामुळें अतिशय दुःख होऊन अँटनी यानें आपल्या हातानें आपणास ठार मारून घेतलें. तेव्हां क्लिओपाट्रा हिचा सर्व आधार नष्ट होऊन आपण ऑक्टेव्हियसच्या हातीं सांपडल्यास तो आपणास कैद करून रोम येथें नेईल व त्या ठिकाणीं आपल्या नानाप्रकारें विटंबना होतील, अशी तिला भीति वाटूं लागली, आणि असा अपमान सोसून जगण्यापेक्षां मरण बरें असा विचार करून तिनें आत्महत्या करण्याचा निश्चय केला; आणि त्या कृत्यास तिला साधनही फार उत्तम मिळालें. तें असें कीं, मिसर देशामध्यें "आप्स" ह्या नांवाची एक नागाची जात आहे; या नागानें दंश केला ह्मणजे प्राण्यास तिळमात्रही वेदना न होतां झोंप लागल्यासारखें वाटून त्या गुंगींतच त्याचा प्राण निघून जातो. तसा एक नाग क्लिओपाट्रा हिनें आपणास डसवून घेतला; त्या योगानें ती लागलीच मृत्यु पावली, आणि अशा रीतीनें मिसर देशाची प्रसिद्ध व सौंदर्यसंपन्न राणी क्लिओपाट्रा हिचा इ० सनापूर्वी ३० व्या वर्षीं मोठ्या दुःखदायक व करुणास्पद रीतीनें शेवट झाला ! ! ह्मणजे सुलताना रझिया व क्लिओपाट्रा या उभयतांच्याही प्रेमाचा शेवट सारखाच शोक-जनक, व त्यांच्या नाशासही सारखाच कारणीभूत होऊन बसला.

त्याची दुसरी स्त्री व नासिरुद्दीन महंमद याची दुष्ट स्वभावाची सावत्र आई हिनें,-आपला मुलगा रुक्नुद्दीन ऊर्फ फिरोजशहा हा गादीवर आल्यावर,-त्यास प्रतिबंधांत ठेविलें होतें; परंतु पुढें अल्लाउद्दीन मसाऊद हा गादीवर आल्यावर त्यानें नासिरुद्दीन महंमद याची प्रतिबंधांतून मुक्तता करून त्यास बैराक प्रांताच्या सुभेदारीवर नेमिलें होतें. याठिकाणीं असतां त्यानें विशेष दक्षतेनें राज्यकारभार चालविला. तो सुभेदारासारख्या "प्रांताचा राजा" एवढ्या मोठ्या अधिकारावर असूनही अतिशय साधेपणानें वागत असे, आणि तोही इतका कीं, साधेपणा हा एक दुर्गुण अथवा छांदिष्टपणा आहे, असेंच त्याच्या बाबतींत ह्मणणें भाग पडतें; कारण प्रतिबंधांत असतांना तो स्वतः कुराणाच्या नकला करून व त्या विकून आपला व आपल्या बायकोचा उदरनिर्वाह करीत असे; इतकेंच नाहीं तर पुढें सुभेदार व नंतर राज्यकर्ता झाल्यावरही, हा धंदा त्यानें मरेपर्यंत चालू ठेविला होता. या काळांत व त्यांतही मुसलमानांत, अनेक स्त्रिया करण्याचा व उपस्त्रिया ठेवण्याचा सर्वसाधारण प्रघात असतां व त्यास तशी ऐपत असतां त्यानें अखेरपर्यंत मोठ्या दक्षतेनें एकपत्नीव्रताचें पालन केलें. त्याची बायको घरचीं कामें स्वतः करीत असे. एके दिवशीं स्वयंपाक करीत असतांना तिचीं बोटें भाजलीं; तेव्हां स्वयंपाक करण्यासाठीं एक बाई ठेवण्याविषयीं तिनें नवऱ्यास विनंती केली; परंतु तिचें ह्मणणें शांतपणानें ऐकून घेऊन तो तिला म्हणाला, "मी राज्याचा केवळ संरक्षक आहें; मालक नाहीं; म्हणून मी आपल्या स्वतःच्या खर्चाचा भार राज्यावर लादणें योग्य नाहीं; यासाठीं तूं शांतमनानें आपलें काम करीत जा, म्हणजे ईश्वर तुला त्याचा योग्य मोबदला देईल." त्याप्रमाणेंच त्याचें अन्नही एखाद्या वनवासी साधूप्रमाणें अतिशय साधें असे. वास्तविक विचार केल्यास राज्यकर्त्यांमध्यें इतका साधेपणा व स्वार्थत्याग असणें, राजकीयदृष्ट्या हितावह होत नाहीं, पण त्याबरोबरच राज्यकारभाराकडे दुर्लक्ष्य करून ऐषआराम भोगीत राहण्याच्या प्रवृत्तीमुळें घडून येणारे घातुक परिणामही भोगावे लागण्याची अशा साधेपणांत व स्वार्थत्यागांत भीति रहात नाहीं. नासिरुद्दीन महंमद यानें सतत वीस वर्षें राज्यकारभार केला, परंतु या सर्व अवधींत त्यानें राज्यकारभाराकडे बिलकुल दुर्लक्ष्य केलें नाहीं, इतकेंच नव्हे तर आपल्या प्रजेची उन्नति करण्याची कोणतीही संधी त्यानें वायां घालविली नाहीं. तो राजा असूनही मरेपर्यंत, कुराणाच्या नकला करून व त्या विकून स्वतःच्या श्रमानें जेवढें मिळेल तेवढ्यावरच तो आपला व आपल्या बायकोचा निर्वाह करीत होता, व हरएक बाबतींत त्याचें आचरण सचोटीचें, स्वार्थत्यागाचें, न्यायाचें व शहाणपणासारखेंच होतें; तो राज्यपदावर आला पण स्वतः राज्यपद मिळविण्याच्या लोभानें अल्लाउद्दीन मसाऊद यास त्यानें पदभ्रष्ट केलें नव्हतें. तर दरबारच्या मंडळींनीं अल्लाउद्दीन मसाऊद

यास पदभ्रष्ट करून व त्यास बैराकच्या सुभेदारीवरून बोलावून आणून त्याच्या हवालीं राज्यपद केल्यामुळें तो राज्यपदावर आला होता आणि त्यानंतरही जरी तो साधेपणानें वागत असे तरी तो त्याचा साधेपणा, राज्यकारभारांत ढिलाई, अव्यवस्था अथवा त्याची वर्चस्वहानी होण्यांत रूपांतर झाला नव्हता, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. त्यानें गादीवर आल्यावर जुन्याबंडखोर सरदारांना कामावरून दूर करून त्यांच्या जागीं दुसऱ्या लायक इसमांच्या नेमणुका केल्या. वायव्येकडील प्रदेशाच्या मार्गानें होणाऱ्या मोंगलांच्या हल्ल्यांचा प्रतिकार करण्याकरितां त्यानें त्या सरहद्दीवर सैन्य ठेवून त्यांचा बंदोबस्त केला; यमुनानदीच्या आसपासचीं कित्येक लहान लहान स्वतंत्र राज्यें, माळवा प्रांताचें राज्य व बुंदेलखंडांतील नरवरचें राज्य, हीं त्यानें आपल्या अंमलाखालीं आणिलीं. मेवाडी व रजपूत लोकांचीं बंडें मोडिलीं, ( इ० सन १२५८ ) आणि त्याच्या पंजाब प्रांतांतील शीरखान या नांवाच्या सुभेदारानें इ० सन १२५० मध्यें मोंगल लोकांचा पराभव करून गज्नी शहर हस्तगत करून घेतलें. या सुलतानाच्या कारकीर्दींत इराणचा राज्यकर्ता हुलाकू याजकडून त्याच्या दरबारीं एक वकील आला होता. त्याचा सुलतानानें अतिशय आदरसत्कार करून त्याच्या सन्मानार्थ अनेक समारंभ केले व आपल्या अनेक मांडलीक राज्यकर्त्यांना बोलावून आणवून दिल्ली येथें एक मोठा दरबार भरविला. त्याप्रमाणेंच चंगीझखानाच्या त्रासानें कंटाळून दिल्ली येथें आश्रयास येऊन राहिलेल्या पंचवीस राज्यकर्त्यांचाही त्यानें योग्य परामर्ष घेतला. या सर्व वरील हकीकती वरूनच हा सुलतान जरी अतिशय साधा व स्वार्थत्यागी होता तरी राज्यव्यवस्था व राज्यधोरण हीं त्याला पूर्णपणें अवगत होतीं, हें उघड होतें. आणि त्याचा हुशार व कर्तृत्ववान् वजीर व पुढें राज्यकर्ता झालेला सुलतान ग्यासुद्दीन बल्बन याच्या नियंत्रणाखालीं राज्यकारभार सोंपवून त्यानें आपल्या कारकीर्दींत प्रजेचें व राज्याचें पुष्कळ कल्याण केलें होतें; असें दृष्टोत्पत्तीस येतें. राजसत्ता हातीं असतांही, एखाद्या काबाडकष्ट करणाऱ्या गरीब मनुष्याप्रमाणें अथवा एखाद्या वनवासी साधूप्रमाणें गरिबींत दिवस घालवून एकपत्नीव्रत पाळून प्रजेच्या कल्याणाकरितां झटणारे राजे जगांत फारच थोडे आढळून येतात, व मुसलमानांच्या ऐषआरामी इतिहासांत तर ते अपवादात्मकच आहेत; म्हणून दहा मुसलमान राज्यकर्ते अयोग्य निपजले असें गृहीत धरिलें तरी या एका कर्तबगार, शूर व शुद्धाचरणी पुरुषाच्या उज्वल कृतीनें, त्या दहांच्या अयोग्यतेमुळें झालेली हानि, सहज भरून निघते, असें म्हणतां येईल.

हा साधुस्वभावी सुलतान इ० सन १२६६ मध्यें मृत्यु पावला व त्यास पुत्रसंतति नसल्यामुळें त्याचा वजीर ग्यासुद्दीन बल्बन हा गादीवर आला; या सुलतानाचें फेरिस्त्यानें जें वर्णन केलें आहे त्यावरून असें दिसतें कीं, त्याचा स्वभाव मोठा डामडौली होता, त्याची

स्वारी मोठ्या थाटाची व भपक्याची निघत होती. त्याच्या स्वारीचे हत्ती एकजात सुवर्णमय वस्त्रांनीं सजविलेले असत. त्याच्या स्वारीच्या लवाजम्यांत एकजात एक हजार तार्तर स्वार असत; आणि त्यांचीं शस्त्रें मौल्यवान व पाणीदार असत. त्याप्रमाणेंच नागव्या लखलखीत तरवारींसह पांचशें हलकारे त्याच्या स्वारी बरोबर चालत असत; व अशा रीतीनें तो आपला दरारा बसविण्याचा प्रयत्न करीत असे. असा हा डामडौली सुलतान होता तरी न्याय देण्याच्या बाबतींत तो निःपक्षपाती होता. शिवाय भरंवशाच्या अथवा अधिकाराच्या जागांवर हिंदू लोकांची नेमणूक न करण्याबद्दल त्यानें सक्त नियम केला होता, आणि स्वजातीचीच उन्नति करण्याकडे त्याचा नेहमीं विशेष कल होता; तरी हिंदू लोकांना अन्यायानें वागविण्याची अथवा छळण्याची त्याची कधींही प्रवृत्ति नव्हती. तर अपराध्यास कडक शिक्षा व कामगिरी करणारास योग्य बक्षीस देण्यास तो नेहमीं तत्पर होता. शिवाय तो विद्येचा व शिल्पीचा अतिशय भोक्ता होता. त्यानें मुसलमानी विद्येस पुष्कळ उत्तेजन दिलें होतें. आणि आपल्या दरबारांतही त्यानें पुष्कळ विद्वान मंडळीस आश्रय दिला होता. मद्यपान करणारास त्यानें अत्यंत कडक शिक्षा ठरविली होती, आणि आपल्या दरबारी मंडळीपैकीं कोणासही तें व्यसन नसावें, अशाबद्दल त्याचा अतिशय कटाक्ष होता; त्याप्रमाणेंच न्यायाच्या बाबतींत त्याच्या कडकपणाच्या गोष्टी प्रसिद्ध आहेत. एकदां त्याच्या एका सरदाराच्या मुलानें मद्यपानाच्या निशेंत आपल्या एका नोकराचा वध केला, त्यावेळीं त्याच्या बायकोनें येऊन त्याबद्दल सुलतानाकडे फिर्याद केली. तेव्हां लागलीच त्यानें त्या सरदाराच्या मुलास आपणासमक्ष बोलावून आणून त्याच्यावर काम चालविलें व तो गुन्हेगार ठरल्यामुळें त्यास भर दरबारांत देहांत शिक्षा सांगून ती त्यानें तेथल्या तेथेंच अंमलांत आणिली; त्याप्रमाणेंच त्याच्या ताब्यांतील अयोध्या प्रांताच्या सुभेदारानें असाच एक गुन्हा केला; तेव्हां त्या मयत मनुष्याची बायको त्याबद्दल सुलतानाकडे फिर्याद घेऊन आली. त्यावेळीं त्यानें त्या सुभेदारास आपल्यासमोर बोलावून आणून त्याची चौकशी केली, व त्यानें अपराध केला असें सिद्ध झाल्यावर सर्वांच्या देखत पांचशें फटके मारून, त्यास मयताच्या स्त्रीच्या हवालीं केलें. त्याच्या कारकीर्दींत, बंगालप्रांतांत बल्बनचा सरदार तुघ्रलखान यानें बंड केलें; तेव्हां त्याचा बंदोबस्त करण्याकरितां सुलतानानें त्याच्यावर दोनदां सैन्य पाठविलें; परंतु दोन्हीही वेळां त्याच्या सैन्याचा तुघ्रलखानानें पराभव केला. तेव्हां भर पावसाळ्यांत सुलतान स्वतः तिकडे गेला; परंतु स्वतः बादशहा आल्याचें पाहून तुघ्रलखान पळून जाऊन कोठें लपून बसला; व बरेच दिवस झाले तरी त्याचा पत्ता लागेना, तेव्हां सुलतानानें कोल प्रांताचा सुभेदार मलिक मुकद्दम यास, त्याच्याबरोबर एक लहानशी सैन्याची तुकडी देऊन, त्याच्या तपासाकरितां

पाठविलें; व तपास करितां करितां त्यास तुघ्रलखानाची छावणी एका नदीच्याजवळ पडलेली आढळली. तेव्हां मलिक हा आपणाबरोबर कांहीं लोक घेऊन थेट तुघ्रलच्या तंबूंत गेला; तेव्हां तुघ्रलखान घाबरून तसाच पळाला व नदींतून पोहून पलीकडे जाण्याचा प्रयत्न करूं लागला; परंतु त्यास मलिकचा बाण लागून तो जखमी झाला; तेव्हां मलीकनें लगट केली, व नदींतच त्याचें शीर कापून घेऊन धड तसेंच वहात जाऊं दिलें. नंतर दुसऱ्या दिवशीं सुलताननें तुघ्रलच्या सर्व बायकामुलांस ठार मारिलें, व अनेक वधस्तंभ उभे करून त्यानें हजारों लोकांचा मोठ्या क्रूरपणानें वध केला; अशा रीतीनें त्या प्रांतांत स्थिरस्थावर करून त्यानें आपला दुसरा मुलगा बोग्राखान याजकडेस तेथील कारभार सोंपविला, व "जर वाईट लोकांच्या नादीं लागून तूं तिकडे स्वतंत्र होण्याची खटपट करिशील तर तुझीही अशीच दशा होईल हें लक्षांत ठेव" असें त्यास बजावून त्याची तिकडे रवानगी केली; तथापि एकंदरींत पहातां हा सुलतान क्रूर असावा असेंच म्हणणें भाग पडतें. त्यानें दिल्लीच्या आसपास नेहमीं होत राहणारे बंडावे मोडून टाकिले, पण ते मोडतांना त्यानें एकंदर एक लाख लोक ठार मारिले. त्याप्रमाणेंच सरहद्दीवर तुर्क लोक नेहमीं बंडें करीत असत; त्यांचाही त्यानें असाच क्रूरपणानें बंदोबस्त केला; तथापि तो बंगाल प्रांतामधून परत आला न आला तोंच मोंगल लोकांनीं मुलतानावर हल्ला केल्याची त्यास बातमी मिळाली. त्यावेळीं त्याचें वय ऐशीं वर्षांचें होतें. अशा स्थितींत तिकडील बंदोबस्त करण्याकरितां, त्यास नाइलाजानें तिकडे आपला लाडका मुलगा महंमूद यास पाठविणें भाग पडलें; त्यावेळीं या सुलताननें आपल्या मुलास जो मोठा मननीय उपदेश केला, तो फेरिस्त्यानें आपल्या ग्रंथांत नमूद केला आहे, तो येणें प्रमाणें:-

"माझें आजपर्यंतचें सर्व आयुष्य राज्यकारभार करण्यामध्यें खर्च झालेलें आहे, आणि आतां लवकरच मी मृत्यु पावणार आहे; म्हणून मला आजपर्यंत जगांत जो अनुभव मिळाला, तो तुला उपयोगीं पडावा ह्या इच्छेनें मी तुला सांगत आहे;" ( त्याप्रमाणें तूं वागल्यास तुझें कल्याण होईल.)

(१) तूं राज्यपदारूढ झालास म्हणजे नेहमीं "मी ईश्वराचा प्रतिनिधी आहे" असें समजून त्याप्रमाणें वागत जा; आणि "राज्यकर्ता" या नात्यानें, तुझ्यावर केवढी जबाबदारी येईल, हें अगोदर पासूनच तूं पूर्णपणें ओळखून ठेव, आपल्या इभ्रतीस न साजेल अशा असभ्य वर्तनानें तूं आपल्या श्रेष्ठ पदास लांछन आणूं नकोस; इतकेंच नव्हे तर हलकट व लोभी मनुष्यांशीं तूं कधींही सख्य करूं नकोस अथवा

त्यांचा आपल्या राज्यकारभारांत कधींही शिरकाव होऊं देऊं नकोस, हें तूं पूर्णपणें ध्यानांत ठेव.

( २ ) तूं आपल्या मनोविकारांनां कधींही अनियंत्रित होऊं न देतां, नेहमीं विवेकानें वागत जा. क्रोधाच्या आधीन कधींही व्हावयाचें नाहीं, अशा बद्दल खबरदारी घेत जा; कारण "क्रोध" हा मनुष्यमात्राचा शत्रू तर आहेच, पण त्यांतल्यात्यांतही राज्यकर्त्यांचा घात करण्यास तोच मुख्यतः कारणीभूत होत असतो, हें ध्यानांत ठेव.

( ३ ) तूं नेहमीं सारासारविचार करीत जा; नेहमीं सत्कृत्यें करण्यामध्यें दक्ष रहात जा; नेहमीं सद्बुद्धि ठेवून वागत जा; आणि शहाणपणानें खर्चाची काटकसर करीत राहून, औदार्याच्या कामीं तूं सढळ हातानें आपल्या संपत्तीचा विनियोग करीत जा.

( ४ ) तूं नेहमीं आपल्या आचरणानें ईश्वरभक्तीचा ठसा लोकांच्या मनावर उमटवीत रहा. आणि वाईट आचरण व नास्तिकपणाची वागणूक, याबद्दल कोणासही योग्य शिक्षा केल्याशिवाय राहूं नकोस, हें लक्षांत ठेव.

( ५ ) तूं आपल्या दरबाराच्या कामांत नेहमीं पूर्णपणें लक्ष ठेवीत जा; म्हणजे कारस्थानी व अप्रामाणिक कारभाऱ्यांच्या हातून तूं कधींही फसला जाणार नाहींस,

( ६ ) तुला आपल्या राज्याचा कारभार इतर अधिकाऱ्यांमार्फतच चालवावा लागेल; म्हणून त्यांनां नुसते हुकूम देऊन त्यांच्यावर विसंबून न रहातां, दिलेल्या प्रत्येक हुकुमाची, यत्किंचितही हयगय अथवा कसूर न होतां, त्यांच्याकडून तात्काळ योग्य बजावणी होते कीं नाहीं, हें तूं नेहमीं मोठ्या दक्षतेनें पहात जा.

( ७ ) तूं सद्गुणी व लायक असे न्यायाधीश निवडून काढून सर्व राज्यभर निरंतर आपल्या न्यायाचा प्रकाश पाडीत रहा.

( ८ ) तूं राज्यपुरुषाच्या इज्जतीला कमीपणा येईल, असें कोणतेंही खाजगी अथवा राजकीय कृत्य आपल्या हातून घडणार नाहीं, अशी खबरदारी ठेव; आणि जेणें करून प्रजेमध्यें तुझ्या संबंधानें, राज्यकर्ता या नात्यानें, आपोआपच पूज्यबुद्धि व दरारा उत्पन्न होईल, इतकी चोख व नियमबद्ध अशी राज्यव्यवस्था ठेव; कारण प्रजेच्या अंतःकरणांत जर तुझ्यासंबंधीं पूज्यबुद्धि आणि दरारा असेल तरच तुझी थोरवी वाढेल, आणि तुझ्या हुकुमाची तारीफ व अंमल बजावणी होत राहील, हें लक्षांत ठेव.

(९) तूं, बुद्धिमान्, विद्वान् व धैर्यवान् अशीं माणसें शोधून काढण्याच्या कामीं यत्किंचितही हयगय करूं नकोस. हलक्या प्रतीच्या मनुष्यास एकदम थोर पदास चढवूं नकोस; कारण हलकट मनुष्य मोठ्यापदाला चढल्यावर तो स्वतःची पूर्वस्थिति विसरतो, आणि त्याच्या योग्यतेच्या माणसांच्याही तो नेहमीं डोळ्यांत सलत राहतो, हें विसरूं नकोस.

(१०) तूं, आपलें अगदीं अडलेंच असें झाल्याशिवाय कोणत्याही कामाला हात घालूं नकोस; त्याप्रमाणेंच आपल्या हातून तें काम शेवटपर्यंत नेऊन पोहोंचवितां येईल अशी खात्री असेल तरच त्या कामाला हात घालीत जा; अशा रीतीनें अमूक एक काम हातीं घेण्याचा तूं निश्चय केलास, ह्मणजे मात्र मग तो निश्चय तूं यत्किंचितही ढळूं देऊं नकोस, अथवा आपल्या हातीं घेतलेल्या कार्यांतून तिळमात्रही आपलें मन काढून घेऊं नकोस; राज्यकर्ता दुराग्रही असला तर एक वेळ पतकरतो, पण धरसोडपणानें अथवा नेभळेपणानें वागणारा असला तर तो मात्र बिलकुल पतकरत नाहीं; कारण आग्रही वर्तन एखाद्या वेळीं तरी बरोबर असण्याचा संभव असतो, पण धरसोडी वर्तनांत नेहमींच चूक असण्याची खात्री असते; शिवाय धरसोडीच्या वर्तनानें राज्यकर्त्याच्या मनाचा दुबळेपणा जितका मोठ्या प्रमाणानें बाहेर उघडकीस येतो, तितका दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें तो बाहेर व्यक्त होत नाहीं, हें तूं ध्यानांत ठेव.

बादशहा ग्यासुद्दीन बल्बन याच्या वरील उपदेशावरून, विचारसरणी व वागणूक यांवरून-जरी दिल्लीच्या आसपास होणारे बंडावे मोडण्यांत त्यानें एक लाख लोक मारिले होते, आपला कडक व कठोर बाणा कायम ठेवून कित्येक प्रसंगीं "जिकडे तिकडे रक्ताच्या नद्या वाहूं लागल्या, प्रत्येक गांवाजवळ प्रेतांचे प्रचंड ढीग जमा झाले, आणि त्यांच्या दुर्गंधीनें सर्व देश व्यापून गेला" इतका क्रूरपणा त्यानें केला होता तरी-एकंदरींत त्यावेळेच्या मानानें पाहतां तो मोठा नमुनेदार राज्यकर्ता असून त्याची कारकीर्द पुष्कळच नावाजण्यासारखी झाली, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यानें दिल्लीच्या आसपासच्या लुटारू व बंडखोर लोकांनां आपल्या लोखंडी हातानें साफ चिरडून टाकिलें. आसपासचीं रानें तोडवून त्यांमध्यें शेती व वसाहती करण्याची तजवीज केली. हिंदुस्थानांत आपलें राज्य चिरस्थायी करण्याचा योग्य मार्ग शोधून काढून त्याप्रमाणें वागण्यांत आपली पराकाष्ठा केली. थाटामाटाच्या स्वाऱ्या, भपकेबाज दरबार, आणि डामडौलांचा परिवार या साधनांनीं लोकांवर आपली छाप व दहशत बसविली, आणि साध्या व सहानभूतीच्या मार्गानें बंडावे व अव्यवस्था मोडून टाकणें परिणामावह होणार नाहीं; असें पाहून सक्तीचें

व साहसीकार्याचें अवलंबन करून, त्यानें आपला अंमल स्थिर केला. त्याचें आचरण कठोर होतें, शिस्त कडक होती, वागणूक करडी होती; त्याच्या सहवासास असणारे लोक सुद्धां त्याला नेहमीं वचकून वागत होते; तो कोणाशीं विशेष सलगी करीत नसे; कोणी केलेली त्यास पसंत नसे; तो तशा सलगीनें कोणासही आपणासमोर वागूं देत नसे, आणि सर्वांनाच त्याच्या समोर अथवा त्याच्याशीं वागतांना आपआपल्या योग्यतेप्रमाणें व अदबी प्रमाणेंच वागावें लागत असे. हा सुलतान तरुण असतां त्यास मद्य प्राशनाचा नाद असे परंतु राज्यकारभार हातीं आल्यापासून त्यानें हें व्यसन अजीबात सोडून दिलें, आणि आपल्या सतत चाळीस वर्षांच्या प्रधान व राज्यकर्ता या दोन्हीही कारकीर्दींत त्यानें एकाही अयोग्य अथवा अनीतिमान मनुष्याशीं सलगी केली नाहीं; अथवा त्याला आपणाजवळ थारा दिला नाहीं. तो रंकाचा राजा झाला होता, स्वतःच्या कर्तृत्वानें फकीराचा अमीर बनला होता, आणि गुलामगिरींतून वाढत वाढत तो सुलतान बनला होता. तो मूळचा एका तुर्क सरदाराचा मुलगा असून लहानपणींच मोंगल लोकांनीं त्यास त्याच्या घरांतून पळवून नेऊन एका व्यापाऱ्यास विकलें होतें. त्या व्यापाऱ्यानें बगदाद येथें या मुलास बसरा येथील एका व्यापाऱ्याला विकलें होतें. पुढें, हा मुलगा दिल्ली येथील सुलतान अल्तमश याच्याच घराण्यांत जन्मलेला आहे, असें त्या व्यापाऱ्यास कळल्यावरून तो त्यास घेऊन दिल्ली येथें आला, व त्यानें या मुलास विकत घेण्याबद्दल सुलतानास विनंति केली. परंतु बल्बन ठेंगू व कुरूप असल्यामुळें त्यास सुलतान विकत घेण्यास तयार नव्हता. तेव्हां, इतर गुलामाकडे पाहून बल्बन बादशहास ह्मणाला, महाराज, हे लोक आपण कां विकत घेतले आहेत? बादशहा ह्मणाला, ते माझ्या उपयोगीं पडतील असें मला वाटतें, ह्मणून मी त्यांना विकत घेतलें आहे. त्यावर बल्बन ह्मणाला, असें आहे तर मलाही आपण विकत घ्या, मीही आपल्या उपयोगीं पडेन. त्या नंतर बादशहानें त्यास विकत घेतलें, व प्रथम मिर्शा, नंतर शिकारी व नंतर सेनापति ह्मणून तो प्रसिद्धीस आला, आणि हिंदु लोकांच्या चळवळी व बंडें मोडून टाकण्यांत प्रमुखपणानें भाग घेऊन त्यानें दरबारांत आपलें पुष्कळच वर्चस्व स्थापन केलें. सुलताना रझिया हिच्या विरुद्ध झालेल्या कटांत सामील असल्याबद्दल त्यास कांहीं काळ प्रतिबंधांत रहावें लागलें; परंतु सुलतान बहरामच्या कारकीर्दींत त्याची मुक्तता होऊन त्यास हंसी व रेवारी प्रांताचा सुभेदार नेमण्यांत आलें. त्यावेळीं त्यानें मिरत प्रांतांत उद्भवलेलीं हिंदू लोकांचीं बंडें मोडून टाकिलीं, व त्या वेळेपासूनच तो विशेष प्रसिद्धीस येऊन त्याचा झपाट्यानें उत्कर्ष होत जाण्यास सुरवात झाली; ह्मणजे मोइझुद्दीन बहरामच्या कारकीर्दींत सुभेदार, अल्लाउद्दीन मसाउदच्या कारकीर्दींत मीर हजीब, नासिरुद्दीन महंमुदाच्या वेळीं

मुख्य प्रधान व वस्तुतःच राज्यकर्ता, आणि त्याच्या मृत्यूनंतर प्रत्यक्ष स्वतःच राज्यकर्ता सुलतान, असा त्याचा, कर्तृत्वशक्ति व किसमत या दोन गोष्टीं मुळें परमावधीचा उत्कर्ष झाला; पण अशा परंपरेनें स्वतः श्रेष्ठपदाच्या शिखरास पोहोंचला तरी तो केव्हांही स्वतःला विसरला नाहीं, अथवा आपल्या योग्यतेस व इभ्रतीस कमीपणा येईल असें वर्तन त्यानें केव्हांही केलें नाहीं. शिवाय तो विद्येचाही मोठा भोक्ता होता, आणि तो डामडौली असून सुद्धां जरी अनेक वेळां राज्याचा खर्च कमी करण्याकरितां कारभारांतील लहान लहान बाबींमध्येंही तो मन घालून प्रयत्न करीत असे, तरी सुद्धां, विद्याविषयक बाबतींत कंजुषपणा न करितां अनेक देशाच्या मोठमोठ्या विद्वान मंडळीस त्यानें आपल्या दरबारांत आश्रय दिला होता. त्याच्याप्रमाणेंच त्याचा लाडका मुलगा शहाजादा महमूद हाही मोठा हुषार व विद्येचा भोक्ता असून अमीर खुश्रू या नांवाचा एक विद्वान मनुष्य त्याच्या आश्रयास होता. या काळांत शिराज येथील शेख सादी या नांवाचा एक अतिशय प्रख्यात कवि विद्यमान होता,[१] त्याच्या कानावर बल्बन याची कीर्ति गेल्यानें त्याच्या

---

टीप १:-शेख सादी हा फारशी भाषेंतील एक अतिशय प्रसिद्ध व लोकोत्तर कवि होऊन गेला. तो शिराज येथें इ० सन ११८४ मध्यें जन्मास आला. या कवीनें तरुणपणीं हिंदु लोकांविरुद्ध व धर्मयुद्धांमध्यें ख्रिस्ती लोकांविरुद्ध युद्धें केलीं असून एके वेळीं तो अशाच एका युद्धांत कैद होऊन त्रिपोली येथील किल्ल्यांत बंदिवासांत पडला, व तेथील तट दुरुस्तीचें काम करीत खितपत त्यास त्या ठिकाणीं रहावें लागलें. परंतु तेथें असतांनाच एका मनुष्यानें त्याची बुद्धिमत्ता व हुषारी पाहून त्यास तेथून मुक्त केलें, व आपली मुलगी त्यास देऊन, आपला जांवई करून घेतलें. परंतु ही बाई फार फटकळ स्वभावाची होती, त्यामुळें तिच्यापासून शेख सादी यास अतिशय त्रास होऊं लागला, आणि "माझ्या पायांतील एक पारतंत्र्याची शृंखला निघाली, तों दुसरी तिच्याहून सुद्धां अधिक त्रासदायक अशी ही शृंखला माझ्या पायांत अडकली" असें तो नेहमीं ह्मणूं लागला. हा कवि प्रवासाचा मोठा शोकी असून त्यानें चौदा वेळां मक्केची यात्रा केली होती. तो प्रसिद्ध व परमपूज्य सुफी साधू अब्दुल कादिर जिलानी ह्याचा शिष्य होता. सादी यानें लिहिलेले "गुलिस्तान" व "बुस्तान" हे दोन उत्कृष्ट ग्रंथ अतिशय प्रसिद्ध असून त्यानें याशिवायही इतर लहानलहान कवनें व स्फूट पद्यें पुष्कळच रचिलेलीं आहेत. त्याच्या गुलिस्तान व बुस्तान या दोन्हींही ग्रंथांची आजतागायत विशेष योग्यता मानण्यांत येत असून त्याचीं इंग्रजींत व इतर अनेक भाषेंत भाषांतरें झालेलीं आहेत; हा मोठा ज्ञाता ह्मणून गणला गेला असून त्याचीं

मनांत हिंदुस्थानांत येऊन या सुलतानाची भेट घ्यावी असा फार विचार होता; परंतु तसा योग जुळून आला नाहीं; इ० सन १२८३ मध्यें चंगीझखानाचा वंशज तैमूरशहा यानें बल्बनच्या प्रदेशांवर स्वारी केली, त्यावेळीं, त्यानें आपल्या लाडक्या व सद्गुणी मुलास—ह्मणजे सुलतान महंमुद यास, आपल्या वयाच्या ८० व्या वर्षी, नाइलाजानें व मोठ्या कष्टानें, तिचा प्रतिकार करण्यास मुलतानाकडे पाठविलें. त्याप्रमाणें या शूर मुलानें इ० सन १२८५ मध्यें मोंगल लोकांशीं दिपालपूर येथें मोठें घनघोर युद्ध करून तैमूरशहाचा पूर्णपणें पराभव केला व त्यानें माघार घेतल्यावर त्याचा सारखा पाठलाग सुरू केला; परंतु महंमुद यास भान न राहून तो मुख्य सैन्यापासून, आपल्याबरोबरील थोड्याशा लोकांसह पुष्कळ दूरवर निघून गेला. ही संधी साधून मोंगल लोक एकदम मागें उलटले व उभयतांमध्यें एक चकमक झडून तींत महंमुद मारला गेला. ही बातमी बल्बन यास समजल्यावर त्यास भयंकर धक्का बसला व आजारी पडून पुढें लवकरच तो मृत्यु पावला. ( इ० सन १२८७ ) आणि त्यानंतर लवकरच इ० सन १२८९ मध्यें या घराण्याची समाप्ति झाली.

सुलतान बल्बन यानें, शहाजादा महंमुद याच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलास गादीवर बसवावें, अशी व्यवस्था केली होती, परंतु बल्बनच्या मृत्यूनंतर दरबारी मंडळींनीं सुलतानाचा दुसरा मुलगा, व बंगाल प्रांताचा सुभेदार बोगराखान याचा मुलगा कैकूबाद यास गादीवर बसविलें. सुलतान बल्बन जिवंत असतां त्यानें आपल्या या नातवास सतत सतरा वर्षे, मोठ्या बंदोबस्तानें ठेवून त्यास हरएक प्रकारचें शिक्षण दिलें होतें, व तो कोणत्याही व्यसनांत गुरफटून जाणार नाहीं अशाबद्दल अतिशय काळजी

---

कवनें विशेष बोधप्रद व दृष्टांतयुक्त आहेत; आणि त्याचा गुलिस्तान हा ग्रंथ तर उपदेश व व्यवहारज्ञान यांचें निव्वळ अमोघभांडार ह्मणून असून तो ग्रंथ छत्रपति शिवाजी महाराजांनींही अवलोकन केला होता, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. शिवाय या सर्व ग्रंथाचें भाषांतर पुढें सातारकर छत्रपति प्रतापसिंहानें आपल्या स्वतःकरितां तयार करविलें होतें, व त्यांत राजे लोकांच्या चालीरीतींविषयीं, ह्मणून जो एक भाग आहे तो त्यास फार आवडत असून, त्याच्या अगदीं मुखोद्गत झाला होता असें सांगतात. हा प्रसिद्ध कवि १२० एकशें वीस वर्षांचा होऊन इ० सन १३१३ मध्यें मृत्यु पावला.

**टीप २:**—दिपालपूर हें गांव पंजाब इलाख्यांत माँटगामरी जिल्ह्यांत एक तालूक्याचें ठिकाण असून तें बियास नदीच्या जुन्या कांठावर ओकारा शहरापासून १७ व पाकूपट्टण शहरापासून २८ मैलांवर ईशान्य दिशेस आहे.

घेतली होती; परंतु तो राज्यावर येऊन स्वतंत्र झाल्या बरोबर पूर्ण विषयी व व्यसनी बनला; बाटली व बायको या जोडी वांचून त्याला क्षणभरही चैन पडेनासें झालें. यमुना नदीच्या कांठीं विलासमंदिरांत तो रात्रंदिवस शराब आणि सुंदरी यांच्यांतच गर्क होऊन अमनचमन उडवीत राहिला, आणि याच जोडगोळीनें त्याचा अखेरीस कपाळमोक्ष उडविला. आपल्या मुलास सुविचाराच्या चार गोष्टी सांगण्याचा त्याचा बाप बोगराखान यानें प्रयत्न केला; स्वतः दिल्लीस येऊन त्याची कानउघडणी केली, व त्यामुळें तो तात्पुरता शुद्धीवरही आला; परंतु विलासाला चटावलेला, विषयांत व व्यसनांतच सदोदित रममाण होण्याला सवकलेला त्याचा देह व त्याचें मन त्यास सन्मार्गगामी राहूं देणें शक्य नव्हतें, त्यामुळें तो पुन्हां पूर्वीप्रमाणें पूर्ण दुराचारानें वागूं लागला. त्याचा सर्व देह व्यसनांत सारखा मुरत राहिल्यानें त्यास अर्धांगवायु झाला, आणि त्यानें स्वतःच बांधिलेल्या विलासमंदिरांत तो मरत पडला असतां जलालुद्दीन फिरोज खिलजी यानें त्यास ठार मारून, त्याच्या शरीराच्या तुकड्यांची मोठ बांधून ती खालीं यमुना नदींत भिरकावून दिली. ( इ० सन १२८८ ) त्याच्या मुलाचाही वध करून त्यानें गुलाम घराण्यांचा शेवट केला. राज्यपद बळकावून तो स्वतः दिल्लीच्या तख्तावर आरूढ झाला व यावेळेपासून गुलाम घराण्याऐवजीं खिलजी घराण्याचा अंमल सुरू झाला.

इ० सन १२०६ पासून इ० सन १२८८ पर्यंत गुलाम घराण्यांतील एकंदर आठ व्यक्तींनीं राज्य केलें. त्यांत एक स्त्री असून बाकी पुरुष गादीवर आले. यांतील बहराम मसाऊद आणि कैकूबाद यांची कारकीर्द फारच थोडी आहे; व बाकी मंडळीपैकीं कुतुबुद्दीन, अल्तमश, रेझिया, नासिरुद्दीन महंमूद व बल्बन हे सर्व कर्तृत्ववान् निपजलेले आहेत. याच वंशानें हिंदूंचीं पराक्रमी राज्यें नष्ट केलीं आहेत आणि हिंदुस्थानांत मुसलमानी राज्य दिल्ली येथें स्थिर करून जरी अल्पकाळच या घराण्यांत राजसत्ता नांदत होती तरी तेवढ्याच अवधींत त्यांनीं मुसलमानांचें महत्व हिंदुस्थानांत स्वपराक्रमानें स्थापित केलेलें आहे.

गुलाम वंशास नामशेष करून दिल्ली येथें खिलजी घराण्याची स्थापना करणारा जलालुद्दीन खिलजी, हा मलीक या नांवाच्या समारा प्रांताच्या सुभेदाराचा मुलगा असून व्यसनी कैकोबादच्या कारकीर्दींत तो अतिशय प्रबळ झाला, व अखेर त्याचा निकाल उडवून राज्यपदारूढ झाला. याच सुलतानाच्या कारकीर्दींत मुसलमानांचा दक्षिणेंत पहिल्यानें प्रवेश झाला आणि देवगिरी ऊर्फ दौलताबादकर रामदेवराव मुसलमानी वर्चस्वाच्या आधीन होऊन त्यानें अल्लाउद्दीन यास दंड देऊन दिल्लीपतीस दरसाल नियमीतपणें

खंडणी देण्याचेंही कबूल केलें. हा सुलतान गादीवर आला त्यावेळीं त्याचें वय सत्तर वर्षांचें होतें. त्यानें रक्तपात करून दिल्लीचें तख्त बळकाविलें, परंतु त्यानंतर त्यानें सरळ व सात्विक वृत्ति धारण केली. त्यानें आपले हात रक्तमलिन करून दिल्लीचें तख्त मिळविलें पण त्या तख्तावर आरूढ होण्याची आपणांत योग्यता नाहीं असें मानून तो त्यावर कधींही बसला नाहीं; व त्याच्याजवळही आपणाकरितां दुसरें स्थान तयार करून त्यावर बसला नाहीं, तर तो सरदार असतांना त्याची जी जागा नेमिलेली होती, त्याठिकाणींच तो नेहमीं मर दरबारांत उभा रहात असे. त्याप्रमाणेंच तो लोकांशीं दयाळूपणानें व परोपकार बुद्धीनें वागत असे. आपल्या पूर्वींच्या स्नेही सोबत्याशीं त्याचें वर्तन अतिशय प्रेमाचें व निष्कपटपणाचें असे, व मुत्सद्दी, योद्धे व विद्वान मंडळी यांच्यावर त्याची विशेषच मेहेर नजर असे; इतकेंच नाहीं तर प्रत्यक्ष बंडखोर व लुटारू लोकांसही तो कडक शासन करीत नसे; परंतु या त्याच्या शांतवृत्तीचा ते लोक फायदा घेत असत, व दरबारी मंडळीसही हा त्याचा फाजील सौम्य स्वभाव पसंत पडत नसे. त्याच्या कारकीर्दींत इ० सन १२९१ मध्यें उत्तर हिंदुस्थानांत मोठा दुष्काळ पडला व त्यांत अतिशय प्राणिसंहार झाला. त्यानंतर पुढील वर्षीं चंगीझखानाचा नातू उक्कायखान, हा आपणाबरोबर एक लाख सैन्य घेऊन पंजाब प्रांतावर चाल करून आला त्याचा जलालुद्दीन यानें पराभव केला; व त्यानंतर उभयतांमध्यें सख्य होऊन त्यानें उक्कायखान यास आपली मुलगी दिली; त्यावेळीं त्यानें आपणाबरोबरील तीन हजार मोंगल लोकांस दिल्लीस ठेविलें, या लोकांकरितां सुलतानानें दिल्ली शहरांत वेशीजवळ एक निराळी जागा नेमून दिली, त्यास "मोंगल पुरा" असें ह्मणतात.

सुलतान जलालुद्दीन यास अर्कलीखान, खानखानान व रुक्नुद्दीन असे तीन मुलगे होते व त्याचा भाऊ शहाबुद्दीन मसाऊद याचे अल्लाउद्दीन व आल्मसबेग हे दोन मुलगे—म्हणजे आपले पुतणे—त्यानें राज्यपदावर आल्यापासून आपणाजवळ बाळगिले होते; यांपैकीं त्याचा वडील मुलगा अर्कलीखान हा लायक व कर्तृत्ववान् असून त्यास सुलतानानें मुलतानच्या सुभेदारीवर नेमिलें होतें व तो तिकडे राहून त्या प्रदेशाचा कारभार पहात होता. दुसरा मुलगा खानखानान हा इ० सन १२९१ मध्यें मृत्यु पावला होता, व धाकटा रुक्नुद्दीन हा अज्ञान होता; त्याप्रमाणेंच त्याच्या उभयतां पुतण्यांपैकीं अल्लाउद्दीन हा मोठा शूर व कर्तृत्ववान् असून सुलतानाचें त्याच्यावर विशेष प्रेम होतें; त्यामुळें त्यानें अल्लाउद्दीन यास दक्षिणेवरील स्वारीवर जाण्याची मोठ्या कष्टानेंच परवानगी दिली होती. उलटपक्षीं अल्लाउद्दीन हा अतिशय कपटी, सदपटी व स्वार्थसाधु असून त्याच्या मनांत नेहमीं निरनिराळी

कारस्थानें घोळत होतीं; परंतु वरपांगीं साळसूदपणाचा आव आणून आपल्या काकाचें प्रेम संपादन करून, आपल्या खऱ्या स्वभावाचा त्यानें त्यास यत्किंचितसुद्धां संशय येऊं दिला नव्हता; त्यामुळें, अल्लाउद्दीन हा दक्षिण देशाच्या मोहिमींवर गेल्यापासून त्याच्या-संबंधीं कोणतीच वार्ता न कळल्यानें जलालुद्दीन हा अतिशय काळजींत होता. परंतु त्याच वेळीं अल्लाउद्दीन इकडे दक्षिणेंत दिग्विजय संपादन करून परत येत असतां, हा जलालुद्दीन याचा खून करून राजगादी मिळविण्याच्या विचारांत मग्न झालेला होता. इतक्यांत अल्लाउद्दीन विजयी होऊन परत येत आहे असें त्या सरळ, सुस्वभावी व प्रेमी सुलतानास समजलें; तेव्हां त्यास अतिशय आनंद झाला; व आपल्या या पुतण्यास भेटण्याविषयीं तो अतिशय उत्सुक होऊन गेला. अल्लाउद्दीन याच्या घातकी स्वभावाची व ढोंगी वर्तनाची त्याच्या दरबारांतील मंडळींना व सुलतानाची बायको मलीकीजहान हिला पूर्णपणें माहिती होती; त्यामुळें त्यांनीं "अल्लाउद्दीन हा घातकी मनुष्य असून त्याच्यावर विश्वास ठेवणें योग्य नाहीं. तो वरवर दाखवितो तसा अंतर्यामिं शुद्ध नाहीं, आणि तो तुमचा कोणत्या वेळीं काय घात करील याचाही बिलकुल नेम नाहीं" असें त्यास सांगून त्याच्यासंबंधीं सावध राहण्याविषयीं बजाविलें; परंतु त्याचा ह्या म्हणण्यावर विश्वास बसेना; इतक्यांत अल्लाउद्दीन यानें कांगावी कळवळ्याचें व बेगडी प्रेमाचें सुलतानास पाठविलेलें पत्र त्यास मिळालें; तेव्हां तर या भोळ्या मनुष्यास, अल्लाउद्दीनच्या शुद्ध हेतू बद्दल पूर्णपणें खात्री पटली, व त्यानें तें पत्र, त्याच्या शुद्ध हेतू विषयीं शंका घेणाऱ्या मंडळींना दाखवून उलट त्यांना आलेल्या संशयाचीच निवृत्ति करण्याचा प्रयत्न केला, व आपल्या पुतण्यास भेटण्याकरितां तो मोठ्या आनंदानें दिल्ली येथून निघून कुरा येथें येऊन दाखल झाला. (इ० सन १२९५) यावेळीं बादशहाचें वय ७६ वर्षांचें होतें; म्हणजे इतक्या म्हातारपणींही आपल्या पुतण्याच्या प्रेमानें वेडा होऊन त्यानें कष्टकारक प्रवास केला; आणि अल्लाउद्दीनाविषयीं त्याच्या मनांत कोणत्याही प्रकारचा विकल्प नसल्यामुळें त्यानें आपणाबरोबर थोडेंसेंच सैन्य घेतलें. पुढें अल्ला-उद्दीनाची व त्याची भेट झाली; तेव्हां आपणाविषयीं, बादशहास कोणत्याही प्रकारें संशय येऊं नये म्हणून, तो मोठ्या लीनतेनें त्याच्या पायां पडला. त्यावेळीं त्या भोळ्या व सात्त्विक वृद्ध सुलतानानें त्यास आपल्या अगदीं जवळ बसवून घेतलें; व मोठ्या प्रेमानें त्याच्या तोंडावरून हात फिरवीत त्यास म्हणाला, "मी तुला लहानपणापासून माझ्याजवळ ठेवून प्रत्यक्ष स्वतःच्या मुलापेक्षां सुद्धां, तुझ्यावर आजपर्यंत अधिक प्रेम करीत आलों, असें असून सुद्धां तूं माझ्यावर विश्वास ठेवीत नाहींस हें काय?" इतक्यांत अल्लाउद्दीन यानें लपवून ठेविलेल्या मारेकऱ्यांना खूण केली; त्याबरोबर त्यांनीं पुढें येऊन

बादशहाच्या पोटांत तरवारी खुपसल्या, व त्याचीं आंतडीं बाहेर काढिलीं. त्यावेळीं "अरे दुष्टा अल्लाउद्दिना" असें म्हणून त्यानें प्राण सोडिला! त्यावेळीं अल्लाउद्दीन यानें त्याचें शीर भाल्यास टोंचून सर्व सैन्यांत फिरविलें, व जमल्यास दिल्लीचें राज्य मिळवावें, अथवा तसें नच जमल्यास आपण स्वतंत्र राज्य स्थापन करावें, असा आपल्या मनाशीं विचार ठरवून तो दिल्लीकडे येण्यास निघाला. जलालुद्दीनाचा वडील मुलगा व राज्याचा हक्कदार वारस अर्कलीखान हा लायक व कर्तृत्ववान् होता, पण त्यास ह्या तरवारीवरील तख्तावर बसून आपला जीव धोक्यांत घालण्याची बिलकुल इच्छा नव्हती; म्हणून तो आपल्या ठिकाणीं स्वस्थ राहिला. तेव्हां राणीनें, दरबारी मंडळीच्या सल्ल्यानें आपला मुलगा रुक्नुद्दीन यास इब्राहिम हें नांव देऊन गादीवर बसविलें; व ती स्वतः राज्यकारभार चालवूं लागली. ही स्थिति अल्लाउद्दीन यास कळल्यावर, त्यास दिल्लीचें राज्य मिळण्याची आशा वाटूं लागली. दक्षिणेंतून आणिलेल्या लुटीची खैरात करून त्यानें आपला पक्ष प्रबळ केला; व छपन्न हजार स्वार, व साठ हजार पायदळ एवढ्या प्रचंड सैन्यासह तो दिल्लीवर चाल करून आला; तेव्हां राणी आपल्या मुलासह मुलतानकडे पळून गेली, आणि त्यामुळें अल्लाउद्दीन यास कोणत्याही प्रकारचा प्रतिकार न होतां इ० सन १२९६ च्या अखेरीस तो दिल्ली येथील बादशाही तख्तावर आरूढ झाला.

अल्लाउद्दीन यास त्याच्या विश्वासघातकी वर्तनाचा मोबदला कसा मिळाला? ईश्वरानें त्याच्या घातकी कृतीबद्दल त्याला काय शिक्षा केली? त्याच्या पापाचें प्रायश्चित्त त्याला अखेरीस कोणत्या प्रकारें भोगावें लागलें? त्याचें वरवरचें चरित्र पाहणारास व त्याच्या कारकीर्दींत त्यानें केलेले अनेक दिग्विजय लक्षांत घेणारास त्याच्या कृतीस योग्य प्रायश्चित परमेश्वरानें दिलें नाहीं, असें वाटेल; आणि प्रत्यक्ष त्याचा शेवट घातपातानें अथवा इतर प्रकारच्या ईश्वरी घातानें एकदम झाला नाहीं, यामुळें तसें वाटणें सयुक्तिकही दिसेल; पण वस्तुस्थिति अशी आहे कीं घातपातानें मनुष्याचा एकदम शेवट होतो, पण त्यामुळें हाल व मानसिक यातना कमी होतात; उलटपक्षीं पुष्कळ दिवस जगून मानसिक यातनांत बुडून झिजत झिजत मरण्यांत देहास व मनास अत्यंत कष्ट भोगावे लागतात. जीव जातां जात नाहीं; कष्ट होतां रहात नाहींत; आणि याच वेळीं आपल्या कृतीनें निर्माण केलेलीं भूतें त्याला रात्रंदिवस दिसूं लागून तीं कांहीं केल्या डोळ्यापुढून एकीकडे होत नाहींत. दुष्ट कृती, पापी मन, रक्तमलिन हात व भ्रष्ट शरीर यांनीं युक्त असलेला मानवी देहाचा घातकी पुतळा मरतांना शांतपणें कसा मरेल? तो दुःखांत, हालांत, मानसिक विवंचनेंत, व संसारिक त्रासांतच मेला पाहिजे. दगा, कोणाचा सगा नाहीं; कोणाचा झाला नाहीं, कोणाचा होणार नाहीं.

पापाचे झाडे दिल्याशिवाय सुटका नाहीं; कोणाची झाली नाहीं व कोणाची होणार नाही. आपल्या काकाचा घात करून अल्लाउद्दीन यानें राज्य मिळविलें, पण मृत मनुष्याचा देह झांकण्याकरितां त्याच्यावर टाकिलेल्या वस्त्राचा तुकडा सुद्धां त्याच्या मालकीचा नसतो, ही गोष्ट डोळ्यावर असुरी धुंदी असतांना मनुष्याच्या कशाची लक्षांत येते? मग-मग मरताना, हालांत व दुःखांत मरतांना, हा वेदांत सुचतो; पण वेळ निघून गेल्यावर त्याचा काय उपयोग? एक सत्कीर्ति अथवा अपकीर्ति एवढीच काय ती कायम राहते, व चांगला अथवा वाईट म्हणून त्याच्या मृत्यु नंतर तो ओळखला जातो.

अल्लाउद्दीनाच्या हयातींत त्यानें अनेक पराक्रम करून आपल्या राज्याची पुष्कळ भरभराट केली. मोंगल लोकांच्या अनेक स्वाऱ्या त्यानें मागें पिटाळून लाविल्या, पद्मिणी मिळविण्याच्या आशेनें, चितोडगडावर स्वारी करून इ० सन १३०४ मध्यें तो हस्तगत करून घेतला; गुजराथ व जयपूरच्या राज्याच्या हद्दींतील रतनभोरचा किल्ला हस्तगत केला; दक्षिणेंत दुसरी स्वारी करून दिग्विजय मिळविले व तिसरी स्वारी करून ( इ० सन १३१२ मध्यें ) महाराष्ट्र देश पूर्णपणें आपल्या अंमलाखालीं आणिला. या सर्व गोष्टीं वरून तो पराक्रमी व कर्तृत्ववान् होता यांत संशय नाहीं; पण त्याचा घातकी स्वभावही प्रत्येक प्रसंगीं दिसून आल्यावांचून रहात नाहीं. आपल्या काकाचा निकाल उडावल्यावर, आपला दूध भाऊ आलफखान याच्यामार्फत त्यानें आपल्या दोन्ही चुलत भावांचा निकाल उडविण्याचें कारस्थान केलें; व जीवास अपाय करणार नाहीं, असें वचन देऊनही, आलफखानानें अर्कलीखान व इब्राहिम यांचे अल्लाउद्दीनाच्या हुकुमाप्रमाणें डोळे काढून त्यांना अंध केलें; आणि हंसी येथील किल्ल्यांत त्या उभयतां दुर्दैवी राजपुत्रांनां बांदिवासांत ठेवलें; व त्याच ठिकाणीं त्यांचा पुढें लवकरच अंत झाला. त्याप्रमाणेंच त्यानें अनेक जुलमी कायदे केले; क्रूर कत्तली केल्या; राज्यपदारूढ होण्याच्या वेळीं त्याच्या उपयोगीं पडलेल्या लोकांचाच त्यानें निकाल उडविला; आणि त्याच्या सद्दीचा जोर त्यास प्रत्येक अंगिकृत कार्यांत यशस्वी करीत गेला; पण राज्याची भरभराट होणें, म्हणजे सुख होणें नव्हे; त्याच्या राज्याच्या भरभराटीबरोबर त्याच्या स्वतःच्या सुखाचा अपकर्ष होत गेला. त्याची

---

**टीप १**:-हंसी हें शहर पंजाबांत हिस्सार जिल्ह्यांत हल्लीं रेलवे स्टेशन व तालूक्याचें गांव असून तें हिस्सारच्या पूर्वेस पंधरा मैलांवर यमुना नदीच्या पश्चिम कालव्यावर वसलेलें आहे. पूर्वी हिंदू व मुसलमान राज्यकर्त्यांच्या काळांत हें शहर, विशेष महत्वाचें व राज्यकारभाराचें प्रमुख ठाणें म्हणून, गणिलें गेलें होतें. येथें शहरच्या उत्तर बाजूस भव्य किल्ला असून तो हल्लीं पडक्या स्थितींत आहे.

प्रत्यक्ष बायको मालिका जहान ही त्याची बिलकुल पर्वा करीत नाहींशी झाली. मलिक काफूरसारख्या कुटिल मंत्र्याच्या नादीं लागून त्यानें तिला व खिजरखान व शादीखान या दोन्ही आळशी व दुर्व्यसनी मुलांना प्रतिबंधांत ठेविलें; व त्याच्याच नादीं लागून आपला भाऊ आलफखान यासही ठार मारिलें. म्हणजे सर्व प्रकारच्या सुख होण्याला अत्यावश्यक साधनांपैकीं एकाचाही कमीपणा नसून सुद्धां अल्लाउद्दीनाला स्वतःच्या स्त्री अथवा मुलांपासून सुख झालें नाहीं शिवाय स्त्री घरांत अदबीनें राहून तिच्यापासून सुख न झाल्यामुळें जितकें दुःख होतें त्यापेक्षां तो बेपर्वा होऊन तिला प्रतिबंधांत ठेवावें लागल्यानें खात्रीनें अधिकच दुःख होतें. त्याप्रमाणेंच मुलगे दुर्गुणी निघावे हें एक दुःख, व त्यांच्याशीं वैमनस्य येऊन त्यांना बंदिवासांत ठेवणें भाग पडावें, हें महत् दुःख; अशा दुःखांतच दरबारांत अनेक भानगडी उत्पन्न झाल्या; अमीरउमरावांत असंतोष पसरला; गुजराथेंत बंड झालें; चितोरगड हातचा गेला; दक्षिणेंत देवगिरीकर रामदेवराव याचा जांवई हरपाळदेव यानें त्याच्या सत्तेविरुद्ध मोठा बंडावा उभा करून, तिकडील किल्लेदारास हांकलून देऊन तो स्वतंत्र होऊन राज्य करूं लागला; व घरांतील, दरबारांतील, राज्यांतील, बाहेरील, अनेक काळज्या व कांचण्या यांनीं कावून, त्रासून व संतापून त्याच स्थितींत आजारी होऊन तो पुढें लवकरच इ० सन १३१६ मध्यें मृत्यु पावला; व त्याच्या मागें त्याचा दिग्विजयी मुलगा मुबारिक हा गादीवर आला.

सुलतान मुबारिक, आणि अयोध्येच्या नबाबांतील वाजिद अल्लीशहा ( इ० सन १८४७ ते १८५६ ) हे उभयतांही सारखेच अतिशय दुर्व्यसनी व हलकट होते. मुबारिक हा नटव्यासारखा रुजून कसाचिणी बरोबर सरदार अमीरउमराव वगैरे मोठमोठ्या लोकांच्या घरीं नाचण्यास जात असे, आणि वाजिद अल्लीशहा हा मोहरममध्यें असभ्य सोंगें घेऊन, व गळ्यांत तबला अडकावून भररस्त्यानें नाचत फिरत असे. यांपैकीं मुबारिक याचा मलिक खुश्रू यानें खून केला, आणि लार्ड डलहौसीच्या कारकीर्दींत जनरल औट्रॅम यानें अयोध्येचें राज्य खालसा केल्याबद्दल जाहिरनामे प्रसिद्ध करून ता० ७ फेब्रुवारी इ० सन १८५६ रोजीं वाजिद अल्लीशहा यास लखनौच्या गादीवरून पदभ्रष्ट केलें; कंपनीच्या नांवानें राज्यसूत्रें आपल्या हातांत घेतलीं; व त्यानंतर पुढें ता० २१ सप्टेंबर इ० सन १८८७ रोजीं तो मृत्यु पावला. सुलतान मुबारिक यानें कित्येक चांगलीं कृत्यें केलीं. अल्लाउद्दीन यानें सतरा हजार लोकांस प्रतिबंधांत ठेविलें होतें, ते सर्व त्यानें सोडून दिले. जप्त केलेल्या जमिनी ज्याच्या त्यास परत केल्या. अल्लाउद्दीनच्या वेळचे कित्येक कर, व व्यापार आणि जिंदगी यांच्या बाबतींतील कित्येक निर्बंध त्यानें बंद केले; परंतु हलकट लोकांच्या नादानें त्यानें स्वतःचा व

राज्याचा नाश करून घेतला. तो नेहमीं खाणेंपिणें व ऐष आराम यांत मग्न राही. भर दरबारांत पाहिजे त्याची बेअदबी करी. आपल्या गुलामांना मोठमोठ्या अधिकारांची खैरात करी; आणि त्यांच्याच तंत्रानें नेहमीं तो वागत राही. या गुलामापैकीं हरुन या नांवाचा एक जातिभ्रष्ट गुजराथी वाढत वाढत मुबारिकचा मुख्य प्रधान झाला; व त्या वेळेपासून त्यानें आपणास मालिक खुश्रू अशी पदवी धारण केली. हा मनुष्य मोठा दुष्ट, नीच व अघोरकर्मी होता; त्यामुळें हा प्रधानपदावर आल्यावर दरबारांतील मुत्सद्दी व कर्तृत्ववान् लोकांनी आपली अब्रू बचावण्याकरितां देशत्याग केला. मालिक खुश्रू यानें आपला पक्ष प्रबळ करण्याकरितां गुजराथेंतून आपल्या जातीचे वीस हजार लोक आणून त्यांना मोठमोठे अधिकार दिले; आणि राजा व्यसनी व प्रधान दुष्ट असल्यामुळें सर्व राज्यभर अव्यवस्था व अंदाधुंदी माजून, सर्व प्रकारें गोंधळ उडून गेला. या सुलतानाच्या कारकीर्दींत इ० सन १३१८ मध्यें त्याचा सरदार ऐनउलमुल्क यानें दक्षिणेंत स्वारी करून देवगिरीकर हरपाळदेव याचा नाश केला, व सर्व दक्षिण प्रांत पूर्णपणें मुसलमानी अंमलाखालीं आणून, आणि तिकडे योग्य बंदोबस्त करून तो दिल्ली येथें परत आला. पुढें दिल्ली येथें व राज्यभर भयंकर बंडें माजलीं; व त्यांत पुष्कळच प्राणहानि झाली. सुलतान मुबारिक यानें खुश्रूच्या हातीं सर्व राज्यसूत्रें सोंपविलीं व त्या उभयतांनीं अनीतीचा कळस केला. अशाच स्थितींत खुश्रूनें मुबारिक यास ठार मारिलें, व आपण राज्याधिकारी बनला; तेव्हां फौजेस संतुष्ट करण्याकरितां त्यानें मुबलक द्रव्य वाटिलें; व नासिरुद्दीन असें नांव धारण करून तो गादीवर आला. आपल्या नांवानें खुत्या वाचवून नाणें पाडिलें; खिलजी घराण्यांतील सर्व मंडळींची कत्तल उडविली; आणि मग स्वतःस हिंदु समजून तो मुसलमानी धर्मविरूद्ध दुष्ट आचरणें करूं लागला. त्यानें देवलदेवीशीं विवाह केला. आपल्या हिंदु अनुयायां मार्फत दिल्ली येथील सर्व मशीदींत त्यानें मूर्ती स्थापन करविल्या. ते कुराणावर बसूं लागले; राजघराण्यांतील जनानखान्यांत त्यांनीं अतिशय घोर व अनन्वित कृत्यें केलीं; आणि त्यांतील स्त्रियांना व मोठमोठ्या सरदार मंडळींच्या कुटुंबांना खुश्रू यानें आपल्या अनुयायांच्या हवालीं केलें. अशा रीतीनें सतत पांच महिने हिंदु बंडवाल्यांच्या ताब्यांत दिल्ली राहून मुसलमानांवर भयंकर अत्याचाराचे व अंगावर शहारे आणण्यासारखे जुलम झाले. अशी अंदाधुंदी चालू असतां तुर्क अफगाणापैकीं तघ्लक घराण्यांतील पंजाबचा सुभेदार ग्यासुद्दीन (हा गुलाम घराण्यांतील सुलतान बल्बन याचा जाट स्त्रीच्या पोटीं जन्मलेला मुलगा होता असें व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो.) यानें दिल्लीवर स्वारी केली, (इ० सन १३२१) आणि मलीक खुश्रू यास ठार मारून व सर्व बंडखोरांचा नायनाट उडवून तो दिल्ली येथील तख्तावर आरूढ झाला.

दिल्ली शहरांत त्या वेळेपर्यंत अनेक राज्यक्रांत्या घडून आल्यामुळें ती जागा ग्यासुद्दीन यास अपयशाची वाटली; म्हणून त्यानें दिल्ली पासून पूर्वेस चार मैलांवर उच्च स्थानीं तघलखाबाद या नांवाची एक स्वतंत्र राजधानी स्थापन केली; तेथें एक लहानसा किल्ला बांधिला; व याच ठिकाणीं तो नेहमीं राहूं लागला. या नगरींचा भव्य कोट व तिच्यांतील उध्वस्त रस्ते अद्यापि दृग्गोचर होतात; आणि आतां जरी त्या ठिकाणीं लोकवस्ती नाहीं तरी तो किल्ला प्रत्यक्ष पाहिल्यास त्याबद्दल बरीच कल्पना करितां येते. या किल्ल्यांत जाण्याचे दरवाजे खालीं भुयारांत असून किल्ल्यांतून शहरांत येण्याचा रस्ता भुयारांतून होता; व किल्ल्यांतूनच बाहेरील बंड मोडण्याकरितां पाहिजे त्या ठिकाणीं सैन्य पाठविण्याचीही व्यवस्था केली होती. हा सुलतान मोठा सदाचरणी व नीतिमान असून त्यानें अनेक विद्वान लोकांच्या मदतीनें कायद्यांचें एकीकरण केलें, आणि राज्यकारभार चालविण्याच्या बाबतींत कित्येक नियम करून, व राज्यांतील कांहीं कर कमी करून, व व्यापार वाढवून आपल्या प्रजेची उन्नति करण्याचे प्रयत्न केले; वायव्येकडील सरहद्दीचा बंदोबस्त केला. तैलंगण प्रांत आपल्या अंमलाखालीं आणिला, लखनौती[1] येथील सुभेदार, व बल्बनचा मुलगा बोगराखान याचा नातू नासिरुद्दीन यांस आपल्या अंमलाखालीं आणिलें, व दुसरींही कित्येक बंडें मोडून त्यानें राज्यांत शांतता स्थापन केली. हिंदू लोकांस या सुलतानानें कोणत्याही प्रकारें त्रास दिला नाहीं; तथापि त्यांच्याविषयीं त्याला विशेष सहानभूतिही नव्हती; म्हणून त्यानें प्रजेवरील पुष्कळ कर जरी कमी केले होते, तरी हिंदू लोकांस त्यापासून कांहीं फायदा झाला नव्हता; उलट मुसलमानांपेक्षां हिंदूंवरच त्यानें जास्त कर बसविला होता, हा सुलतान तिरहुत प्रांत जिंकून परत आल्यावर त्याचा सन्मान करण्याकरितां त्याचा मुलगा जोना ऊर्फ उलुघखान यानें एक लांकडी मंडप मुद्दाम तयार करविला, व आपण स्वतः वडिलांस सामोरा जाऊन त्यास या मंडपांत घेऊन येऊन दरबार, मेजवानी वगैरेचा मोठा समारंभ केला. त्याप्रसंगीं हा मंडप एकाएकीं मोडून पडून त्याखालीं सुलतान, व त्याचा दुसरा लाडका मुलगा वगैरे पांच इसम सांपडून चिरडून मृत्यु पावले; परंतु उलुघखान त्यांत न सांपडतां सुरक्षित राहिला. यावरून राज्यप्राप्तिकरितां त्यानेंच हें कारस्थान करून आपल्या बापाचा व दुसऱ्या भावाचा निकाल उडविला, असें म्हणणें प्राप्त होतें. सुलतान ग्यासुद्दीनच्या मृत्युनंतर (इ० सन १३२१) उलुघखान हा उलुघबेग महंमद असें नांव धारण करून गादीवर बसला.

---

टीप १:–हें मोडकळीस आलेलें प्रसिद्ध शहर संयुक्त प्रांतांतील सहाराणपूर जिल्ह्यांत, कर्नाल सडकेवर, सहाराणपूरपासून सव्वीस मैलांवर असून तेथील किल्ला प्रेक्षणीय व उत्तम म्हणून गणला गेलेला होता.

सुलतान महंमद हा विद्वान व सदाचरणी होता, तो स्वतः उत्तम लेखक, वक्ता असून वैद्यक, तर्क व न्यायशास्त्रें त्यास उत्तम प्रकारें अवगत होतीं. तो उदार होता; धर्मनिष्ट व नियमित होता; शूर होता; पण तसाच अतिशय उतावळा, स्वेच्छाचारी, क्रूर, खुनशी व लहरीही होता; त्याची बुद्धि अलौकिक होती; कल्पना अचाट होत्या; पण टाळूच्या आंतील टीचभर मेंदूंत टोपलीभर विचार सारखे कोंबीत राहिल्यानें एकाही विचाराची पूर्ण वाढ होण्याला अवसर राहिला नाहीं; व भाराभर विचाराच्या चिंध्या राज्यभर उडत राहून त्याच्या राज्यकारभाराचा पूर्णपणें बोजवारा उडाला. त्याचें स्वतःचें हस्ताक्षर उत्तम होतें; तो स्वतः गणिती होता, फारशी कवितांची त्यास अतिशय आवड होती, व कैकोबादचा कारभारी शेख निजामउद्दीन याचा परम स्नेही असलेला प्रसिद्ध कवि अमीर खुश्रू हा त्याच्या आश्रयास होता. याच्या दिल्ली येथील कबरीवर "अदिम्-उल्-मिसल" (अद्वितीय पुरुष) असे शब्द लिहिलेले असून त्यास "तुति-इ-शक्कर-मकाल" (म्हणजे मधुर भाषणी पोपट) असें ह्मणत. हा कवि अतिशय प्रसिद्ध व प्रासादिक असून कर्णरायाची दुर्दैवी लावण्यसंपन्न मुलगी देवलदेवी हिजवर त्यानें अनेक सुंदर पद्यें तयार केलीं असून तीं अद्यापि प्रसिद्ध आहेत. हा प्रसिद्ध कवि इ० सन १३२४ मध्यें मृत्यु पावला. तोंपर्यंत तो या बादशहाच्याच आश्रयास असून त्याच्यावर त्याची पूर्ण मर्जी असे. महंमद हा स्वतः दारूस कधींही शिवत नव्हता, व जरी त्याच्या औदार्याचा फायदा बहुतेक मुसलमानांचाच होता, व हिंदूलोक कोरडे रहात होते तरी तो उदार असून विद्वानांचा परामर्ष घेणारा होता; पण प्रसंगीं क्रूरपणाची कमालही करून सोडीत होता. या सुलतानाच्या कारकीर्दींत इब्नभतूता या नांवाचा आफ्रिका खंडांतील तांजर्स येथील एक विद्वान तुर्क प्रवासी, आशिया खंडांत फिरत फिरत इ० सन १३४१ मध्यें दिल्ली येथें आला होता. त्यावेळीं सुलतान महंमूद तेथें नसल्यानें त्याच्या आईनें या परदेशी पाहुण्याची योग्य व्यवस्था ठेविली. नंतर सुलतान राजधानींत परत आल्यावर त्यानें या प्रवाशास आश्रय देऊन पुढें न्यायाधीशाचें काम दिलें. त्याच्यावर सुलतानाची विशेष मेहेरबानी होती; त्यामुळें त्यानें इब्नभतूताचें पंचावन हजार दिनाराचें कर्ज फेडिलें, व त्याची मुलगी दिल्ली येथें मृत्यु पावली, त्यावेळीं तिचा उत्तरविधी मोठ्या समारंभानें करविला; तथापि त्यास दिल्ली येथें राहणें न आवडून तो चीनच्या वकील मंडळाबरोबर चीनदेशांत व तेथून स्वदेशीं परत गेला. त्यानें आपलें प्रवास वृत्त लिहिलेलें असून त्यांत त्यानें या सुलतानाच्या राजधानीची निर्जन स्थिति, तेथील भव्य इमारती व शिल्पकलेचीं सुंदर कामें या संबंधीं बरेंच वर्णन केलेलें आहे; त्याप्रमाणें या सुलतानाचीं क्रूर कृत्यें त्यानें स्वतः पाहून त्यासंबंधी अंगावर कांटा उभा राहील अशीं उदाहरणें दिलीं आहेत. त्यानें मनुष्य वध

करण्यासाठीं हत्ती शिकवून तयार केले होते. ते बंडखोरांना पायांखालीं चिरडून मारीत असत; अथवा त्यांच्या दांतांस बांधिलेल्या तरवारींनीं त्यांचे तुकडे करून ते सोंडेनें वर हवेंत फेंकून देत असत. अशाच प्रकारानें त्यानें आपल्या भावाचा नाश केला; व त्याचा पुतण्या करशास्प यानें बंड केल्यामुळें त्यास पकडून त्यानें दिल्ली येथें आणिलें आणि त्यास तर जिवंत सोलून काढवून त्याचें मांस शिजवून तें त्यानें त्याच्या कुटुंबाकडे पाठवून दिलें. इ० सन ( १३३८ ) त्याप्रमाणेंच तो मनुष्यांची शिकार करीत असे व हिंसक प्राणी वगैरेच्या शिकारी करितां ज्याप्रमाणें रान घेरतात, त्याप्रमाणें एक प्रदेश घेरून त्यांतील माणसांची तो कत्तल उडवीत असे. दिल्ली ऐवजीं दौलताबाद राजधानी करण्यांत व सोन्या ऐवजीं तांब्याचे तुकडे चालू करण्यांत त्याचा फाजितवाडा उडाला आणि परकीय हल्ले, अंतस्थ बंडें, रयतेवरील करांच्या ओझ्यांची वृद्धि, तिजोरींत नाण्याची भयंकर टंचाई, फाजील औदार्य, निरनिराळ्या मोहिमांचे खर्च, तुर्कस्थान व इराण हे देश जिंकण्यासारख्या अनावर व असाध्य महत्वाकांक्षेचे प्रयत्न, त्याचें क्रूर, अनियंत्रित व मनसोक्त आचरण, राज्यांत पसरलेला असंतोष, अव्यवस्था व अंदाधुंदी–वगैरे कारणामुळें मुसलमानांचें नुकतेंच वाढीस लागत चाललेलें राज्य नष्ट होण्याच्या मार्गास लागलें. बंगाल व कर्नाटक प्रांत स्वतंत्र झाले; महाराष्ट्रांत बहामनी राज्य स्थापन झालें; आणि अशाच निरनिराळ्या विवंचनेंत व्यग्र असतां–सिंध प्रांतांतील बंडाचा धींमोड करीत असतां–तो आजारी पडून इ० सन १३५१ मध्यें ठठ्ठा येथें मृत्यु पावला. या राज्यकर्त्याच्या अचाट कल्पनेचा मासला म्हणून दौलताबादचा प्रचंड किल्ला हल्लींही साक्षीभूत होऊन राहिलेला आहे. दौलताबाद हें शहर औरंगाबादेच्या वायव्येस सहा मैलांवर आणि हैद्राबादेपासून २८ मैलांवर आहे. याठिकाणीं या सुलतानानें एक प्रचंड किल्ला बांधिला. या किल्ल्याला एक तिहेरी तट असून तो १८० फूट उंचीचा व गुळगुळीत असा, दगडांतून कापून काढिलेला आहे. त्याप्रमाणेंच या किल्ल्याच्या भोंवतीं तिहेरी खोल खंदक असून किल्ल्यांत जाण्याचा मार्ग वळणावळणाचा आहे; आणि हें कृत्य खरोखर अलौकिक व अचाट बुद्धिमत्तेचेंच द्योतक आहे. पण

---

**टीप १:**—ठठ्ठा हें तालुक्याचें गांव सिंधप्रांतांत कराची जिल्ह्यांत सिंधुनदाच्या पूर्व कांठाच्या पश्चिमेस सात मैलांवर, कराची पासून ६६, मीरपूर सकरोपासून २४ व नॉर्थ वेस्टर्न रेलवेच्या कराची व हैद्राबाद मधील जुंगशाही स्टेशनपासून सडकेनें १३ मैल आहे. हें शहर मकलीडोंगराच्या पायथ्याशीं वसलेलें असून येथील जुम्मामशीद व किल्ला पाहण्यासारखा आहे.

अचाट बुद्धिमत्ता प्रत्येक ठिकाणीं हेकेखोरपणानें चालवीत राहणें नेहमींच यशस्वी न होतां उलट नुकसानीस कारणीभूत होतें, आणि त्याप्रमाणेंच अखेरीस या सुलतानाच्या बाबतींतही तंतोतंत स्थिति घडून आली आहे. शिवाय परस्पर विरुद्ध असेंही वर्तन त्याच्या हातून अनेक वेळां घडलेलें आहे; आणि त्याच्या क्रूर वर्तनाला अगदीं विरोधी अशी दयाही त्यानें दाखविली आहे. उदाहरणार्थ, त्याच्या कृतीमुळें जेव्हां दिल्ली शहरांतील लोकांची दुर्दशा उडाली, दौलताबाद राजधानी करण्याच्या अट्टाहासांत ज्यावेळीं दिल्ली येथील नगरवासी जनांची अन्नानदशा झाली, त्यावेळीं त्यानें लोकांवरील अनेक कर माफ केले. शेतकरी लोकांना कर्जाऊ रकमा दिल्या. अन्नानदशा झालेल्या लोकांना सतत सहा महिने दिल्लींत फुकट शिधा वाटिला, आणि त्यांच्या दुःखाचें परिमार्जन करण्याचे अनेक प्रयत्न केले. थोडक्यांत ह्मणजे या सुलतानांत चांगल्या व वाईट स्वभावाचें परमावधीचें मिश्रण झालें होतें, असें ह्मणणें चुकीचें होणार नाहीं.

सुलतान महंमदाच्या मृत्युनंतर त्याचा चुलत भाऊ फिरोज तघलख हा गादीवर आला. हा राज्यकर्ता हिंदु आईपासून झालेला असून ती दीपालपूरचा राजा मलभट्टी, याची मुलगी होती; तथापि या सुलतानाच्या मनावर हिंदु धर्माचा कोणताही संस्कार झालेला नव्हता; उलट हिंदुधर्मावर त्याची विशेष वक्र दृष्टि होती. त्यानें अनेक मूर्ति असलेलीं देवालयें, त्यांतील ग्रंथ संग्रह, इतर उपकरणें, यांचा विध्वंस उडविला, आणि इतर अनेक प्रकारांनीं त्यानें हिंदुधर्माविषयीं त्याच्या मनांत असलेला द्वेष व्यक्त केला. राजरोस रीतीनें हिंदूंनी मूर्तिपूजा केलेली अथवा त्याप्रित्यर्थ समारंभ केलेले सुद्धां त्यास खपत नसत; त्यामुळें अशा एका ब्राह्मणास त्यानें पकडून मुसलमानी धर्माची दीक्षा देण्याचा प्रयत्न केला; परंतु त्या ब्राह्मणानें तें अमान्य केल्यावर आपणासमोर एक मोठा लांकडाचा ढीग रचवून, व त्या ब्राम्हणाचे हात पात बांधून त्यास वर ठेवून देऊन, व त्याच्या देवाच्या चित्राची फळीही त्याच्यावर ठेवून त्यानें त्या ढीगास आग लाविली, व त्या धर्मनिष्ट वृद्ध ब्राम्हणास जिवंत जाळून टाकिलें. या सुलतानाचा हिंदु प्रजेवर व त्यांतल्यात्यांत ब्राम्हण वर्गावर विशेष कटाक्ष होता; आणि ब्राम्हण हेच मूर्तिपूजेच्या खोलीचे संरक्षक आहेत, म्हणजे मूर्तिपूजा करण्यांत व तिची महती वाढविण्यांत ब्राम्हण हेच अग्रगण्य आहेत—असें त्याचें मत होतें; म्हणून ब्राम्हण वर्गावर, पूर्वीच्या सुलतानांच्या वेळीं माफ असलेला जिझिया कर त्यानें पुन्हां बसविला. तेव्हां त्यांनीं त्याबद्दल सुलतानाकडे अनेक तक्रारी केल्या; राजवाड्याशीं धरणें धरिलें; उपास तापास काढिले; अनेक प्रकारचे त्रागा केले, इतकेंच नव्हे तर कित्येक ब्राम्हणांनीं अग्नि प्रवेशही केला; पण सुलतानही तसाच हट्टास पेटून त्यानें त्यांच्या कोणत्याही त्र्याग्याकडे बिलकुल लक्ष दिलें

नाहीं. अखेरीस इतर जातीच्या लोकांनीं मध्यस्थी करून, ब्राम्हणाकरितां तो कर स्वतः दिला, तेव्हां ही भानगड एकदांची निकालास लागली.

तथापि एकंदरीनें पाहतां हा सुलतान विशेष सुस्वभावी, दयाळू व प्रजावत्सल होता, यांत कांहींही संशय नाहीं. याचा प्रधान मुकबुलखान हाही मोठा हुषार व कर्तृत्ववान् होता, व त्याच्या हुषारी मुळेंच राज्यांत सुव्यवस्था व सुसंपन्नता नांदत होती. तो मुळचा हिंदू असून तैलंगण प्रांतांतील एका उच्च कुळांत त्याचा जन्म झालेला होता; व पुढें त्यानें मुसलमानी धर्माचा स्वीकार केला होता. या वजिरावर फिरोजशहाची विशेष बहाल मर्जी असे; व सुलतान बाह्य प्रदेशीं स्वाऱ्यांवर गेल्यावेळीं त्याच्यावरच सर्व राज्यकारभार सोंपवीत असे. या वजिराच्या जनानखान्यांत अनेक देशाच्या मिळून दोन हजार स्त्रिया होत्या; व त्यास या सर्वांचा खर्च चालविण्याइतका भरपूर मोबदला शहाकडून मिळत असून शिवाय त्याच्या सर्व मुलां मुलींसही शहानें स्वतंत्रपणें दरसाल एक हजाराच्या नेमणुका करून दिल्या होत्या. हा वजीर इ० सन १३७१ मध्यें मृत्यु पावला; तेव्हां त्याच्या मुलास खानीजहान हा किताब देऊन शहानें त्यास वजीरीपदावर स्थापन केलें; परंतु तो त्याचा बाप मुकबुलखान याच्या सारखा कर्तृत्ववान्, व्यवहारदक्ष व अनुभवी नव्हता; आणि शहाजादा महंमद याच्याशीं त्याचें वांकडें होतें; त्यामुळें तो शहाचा विशेष लाडका आहे हें माहीत असूनही त्यानें, शहाजादा तुमचा प्राण घेण्यास टपला आहे असें शहाच्या मनांत भरवून उभयतांमध्यें विग्रह पाडण्याचा प्रयत्न केला; परंतु महंमदास या गोष्टीचा सुगावा लागल्याबरोबर तो शहास जाऊन भेटला, व त्यानें त्याची पूर्णपणें संशयनिवृत्ति केली. तेव्हां शहानें या अधिकप्रसंगी वजीरास शहाजाद्याच्या हवालीं केलें, ( इ० सन १३७३ ) व त्यानें लागलींच त्याचा निकाल उडविला; व या वेळेपासूनच फिरोजशहानें वृद्धावस्थेमुळें आपल्या या लाडक्या मुलाकडे राज्यकारभार सोंपविला.

सुलतान महंमद यानें बंगाल प्रांतावर दोन वेळां स्वाऱ्या केल्या; परंतु त्यांत यशप्राप्ति न झाल्यानें त्यानें त्या राजाशीं तह करून त्याचें, व दक्षिणेंतील राज्यांचें स्वातंत्र्य कबूल केलें; आणि आपलें राज्य वाढविण्याची हांव न बाळगितां असलेलें राज्य सुव्यवस्थित करण्याकडेसच त्यानें मनोभावानें लक्ष्य दिलें. त्यानें आपल्या कारकीर्दींत अनेक प्रजाहिताचीं कामें केलीं; व ४० मशीदी, ५० धरणें, ३० पाठशाळा, १०० धर्मशाळा, २०० शहरें, ५ प्रार्थना मंदिरें, १०० सार्वजनिक हमामखाने ऊर्फ स्नानगृहें, २० राजवाडे, १०० सार्वजनिक औषधालयें, १० मनोरे, १० मोठाल्या विहिरी, ३० तलाव, १५० पूल, ३ मोठाले कालवे व याशिवाय अनेक लहान लहान कालवे वगैरे लोको-

पयोगी कार्ये शेवटास नेली. या सुलतानास शेतकरी लोकांविषयीं अतिशय काळजा वाटत असे; म्हणून त्यानें त्यांच्याकडे येणें असलेल्या मागील बाक्या माफ करून त्यांचे सरकारांत असलेले कर्जरोखे फाडून टाकिले. ठिकठिकाणीं कालवे काढवून शेतकीस अवश्यक असलेल्या पाण्याचा मुबलक पुरवठा केला. त्यांना सरकारधारा कायमचा ठरवून दिला, व तो वसूल करितांना त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा जुलूम होणार नाहीं, अशी तजवीज केली. त्यानें बांधिलेल्या तीन प्रसिद्ध कालव्यांपैकीं, सतलज व घोगरा या नद्यांना यमुना नदीशीं जोडणारा कालवा, आणि सरस्वती नदीपासून सरहिंद व मनसूरपुरावरून कुगर नदीस जोडणारा कालवा, हे दोन कालवे हल्लीं चालु नाहींत; परंतु तिसरा हल्लींही चालू आहे; आणि तो म्हणजे, यमुना नदींतून काढिलेला कालवा असून तो पंजाबांतील कर्नोल या शहराजवळ फोडून पानिपतच्या युद्धभूमीच्या बाजूनें बिकानेर संस्थानच्या हद्दींतील वाळवंटाच्या प्रदेशांतून थेट हंसी, व दिल्लीनजीकच्या हिसार या शहरापर्यंत नेलेला आहे, व हा कालवा हल्लीं सुस्थितींत असून, इंग्रज सरकारानें तो दुरस्त व चालू ठेविलेला आहे. या कालव्यामुळें पुष्कळ पडीत जमिनींत शेतकीची लागवड झाली, व पुष्कळ जमिनी दुपिकी झाल्या, त्या योगानें व दिल्लीस आणि इतर ठिकाणीं मिळून एकंदर बाराशें बागा करून त्यांवर होणाऱ्या दरसाल एक लाख रुपयांच्या पैदासीनें व अनेक गांवें वसवून व शेतीची वृद्धि करून त्या योगानें त्यानें आपल्या राज्याचें उत्पन्न वाढविलें. थोडक्यांत म्हणजे आफीफ या नांवाच्या ग्रंथकर्त्यांच्या शद्बांत म्हणावयाचें म्हणजे या सुलतानाच्या कारकीर्दींत " प्रजा संतुष्ट झाली. तिच्याजवळ द्रव्याचा संचय झाला. लोकांच्या घरांत धान्य, इतर सामग्री व घोडे वगैरे वस्तूंची समृद्धि झाली; सोन्याचांदीचा संग्रह झाला, स्त्रियांच्या अंगावर डागडागिने दिसूं लागले; व पलंग वगैरे सामानांनीं लोकांचीं घरें सुशोभित होऊन गेलीं." शिवाय आपल्या प्रजेच्या सुखसमृद्धीकरितां ज्या अनेक गोष्टी केल्या त्या त्यानें स्वतःलिहून ठेविल्या आहेत. त्याचें थोडेंसें वर्णन स्वतंत्र भाषांतर न करितां मुसलमानी रियासतीवरून थोडाशा फेरफारानें या ठिकाणीं दिलें आहे. तो म्हणतोः–" मुसलमानांचा रक्तपात करावा, अगदीं क्षुल्लक अपराधाबद्दल सुद्धां त्यांना छिन्नविछिन्न करून त्यांचे हाल करावे, हात पाय तोडावे, नाक कान कापावे, गुन्हेगारांचे डोळे काढून त्यांचीं हाडें चुरावीं, अथवा त्यांस अग्नींत फेंकून, जिवंत सोलुन, गळफांस घालून, तरवारीनें तोडून किंवा सुळावर देऊन त्यांचा प्राणनाश करावा, असा प्रघात आजपर्यंत चालत आलेला आहे परंतु ज्या सर्वशक्तिमान परमेश्वरानें मला हा राज्याधिकार दिला, त्यानेंच अत्यंत कृपाळू होऊन असले दुष्ट प्रघात बंद करण्याची मला बुद्धि दिली आहे, आणि त्याप्रमाणेंच वर्तन

करण्याचा माझा पूर्ण निर्धार आहे; शिवाय मी आणखीं असेंही फर्माविंतों कीं, आजपर्यंत ज्या ज्या सत्ताधीशांनीं दिल्लीचे अधिपती असल्यावेळीं असलीं निष्ठुर कृत्यें करविलीं असतील, त्यांच्यावरील ईश्वरी कोप शमविण्यासाठीं सर्वांनीं आपल्या दैनिक आराधनेंत ईश्वराची प्रार्थना करावी. तसेंच लहान लहान व्यापाऱ्यांपासून सरकारी कामगार ज्या देणग्या, नजराणे, किंवा त्रासदायक व क्षुल्लक कर घेत असतात, ते त्यांनीं या पुढें घेऊं नयेत. शिवाय सरकारच्या पडीत जमिनीवर गोवारी (जनावरें चारणाऱ्या) लोकांपासून गुरचराई, फुलें, मासे, वगैरे विकणें कापूस पिंजणें किंवा स्वयंपाक करणें, या गोष्टींबद्दल हल्लीं सरकारांत येत असलेला वसूल, आणि दुकानदार व दारूवाले यांना परवाने घेण्यास लागणारा खर्च हे सर्व राज्यांत माफ करण्यांत आले आहेत. कारण या बाबतींतील सरकारी वसूल गोळा करण्यास नेमलेले अधिकारी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून रयतेस जो त्रास देतात, त्यापेक्षां या बाबतींवरील सरकारी वसूल अजीबात कमी झालेलाच फार चांगला. इतःपर, प्रसिद्ध झालेल्या नियमांबाहेरचा कोणताही नवीन कर रयतेवर बसविला जाऊं नये. युद्धांमध्यें लुटी वगैरे पासून जो ऐवज जमा होतो, त्याचे पांच हिस्से करून त्यांपैकीं चार सरकारांत घेण्याची व एक लष्करास वांटून देण्याची आजपर्यंत वहिवाट आहे; परंतु यापुढें चार हिस्से लष्करास वांटून देऊन फक्त एकच हिस्सा सरकारांत घेत जावा. नास्तिक मत धारण करणें, दुर्व्यसनाच्या संस्था चालविणें, लांचलुचपत स्वीकारणें, आणि सरकारी अधिकाऱ्यांनीं आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करणें, या अपराधांबद्दल गुन्हेगारास हद्दपार केलें जाईल. लोकांनीं माझें अनुकरण करावें म्हणून मीं उंचीं वस्त्रें व भारी किंमतीचे दागिने अंगावर घालण्याचें सोडून दिलें आहे. माझ्या पूर्वीच्या सत्ताधीशांनीं धर्मशाळा वगैरे जीं लोकोपयोगीं कामें केलीं आहेत त्या सर्वांची डागडुजी करून तसलीं आणखीं कामें करण्यांत व चालू ठेवण्यांत पैशाचा व्यय करणें, हें मी आपलें कर्तव्य समजतों. महंमद तघलख याच्या रागाच्या तावडींत जे जे लोक सांपडले त्यांच्या नातेवाईकांचा तपास करवून मीं त्यांना नेमणुका वगैरे करून दिल्या आहेत; आणि विद्वान व धर्मनिष्ठ मनुष्यांच्या देखत त्यांच्याकडून त्या सुलतानाच्या अपराधांची माफी लिहून घेऊन त्या कागदांवर सन्मान्य गृहस्थांच्या सह्या व मोर्तब करून ते पेटींत बंद करून ती त्या सुलतानाच्या कबरेंत पुरली आहे. मी नेहमीं विद्वान व सन्मान्य गृहस्थांकडून सुबोध ऐकत असतों, व त्या प्रमाणें वागण्याचा प्रयत्न करितों. लष्करांतील एखादा नोकर जखमा लागून किंवा वयानें नोकरी करण्यास नालायक झाल्यास, त्याचा भरपूर पगार त्यास जन्मभर चालू ठेवण्याचा मीं हुकूम दिला आहे. माझ्यावर आतां पर्यंत दोन वेळां विष प्रयोगाचा प्रयत्न करण्यांत आला; परंतु दोन्हीही वेळां तो निष्फळ

झाला आहे." वर लिहिल्याप्रमाणें त्यानें राज्यकारभाराचें नियमन करून, व प्रजेची स्थिति पाहण्याकरितां राज्यांत ठिकठिकाणीं फिरून प्रजा आबादीआबाद करण्याचे पुष्कळ प्रयत्न केले. हा सुलतान गादीवर आल्यावर त्यानें दिल्ली शहराजवळ फिरोजाबाद या नांवाचें एक शहर वसवून तेथें राहून तो राज्यकारभार करूं लागला. हें शहर हुमायून बादशहाच्या थडग्याजवळ असून तेथील राजवाड्यांचा अवशेष हल्लींही अस्तित्वांत आहे. या वाड्याच्या दक्षिण दरवाजाजवळ चक्रवर्ती अशोक याचा तिसऱ्या शतकांतील ४२ फूट उंचांचा एक विजयस्तंभ आहे. तो फिरोजशहानें यमुना नदीच्या तीरावरील खिजराबाद या ठिकाणाहून तेथें आणून उभारिला म्हणून त्यास "फिरोजशहाकीलाट" असें म्हणतात. या विजयस्तंभावर पाली भाषेंत सम्राट् अशोक यानें खोदविलेला एक शिलालेख आहे; व त्यावरून फिरोजशहाच्या राजधानीचें हें शहर हल्लींही नेमकें समजून येत आहे. त्याप्रमाणेंच दिल्ली येथें त्या काळांत शेख निजामुद्दीन अवलिया या नांवाचा एक साधु पुरुष होऊन गेला. त्याचा दिल्लीजवळ दर्गा असून तेथें हल्लीं एक खेडें गांव वसलेलें आहे; व या ठिकाणीं या अवलियाच्या सन्मानार्थ प्रतिवर्षीं मोठी यात्रा भरत असते. या ठिकाणीं असलेल्या मुख्य दर्ग्याच्या प्रवेशद्वारावर "इ० सन १३७८ हा सन असून तो फिरोजशहानें बांधिला आहे, व त्याच्याचजवळ एक पूर्वकाळचा जुना तलाव असून त्याचें पाणी या अवलियाच्या शापानें खारट झालें अशी आख्यायिका आहे.[1] त्याप्रमाणें या बादशहास मद्य प्राशनाचाही बराच नाद होता; तरी तो धर्मनिष्ठ

---

**टीप १:**–या अवलियाचा दर्गा दिल्ली येथील प्रसिद्ध व प्रेक्षणीय स्थानांपैकीं एक असून हा पुरुष इ० सन १३२१ च्या सुमारास होऊन गेला. तो मोठा साधु असल्याबद्दल त्याची कीर्ति असून तो प्रसिद्ध आणि साक्षात्कारी साधु गुंजसक्कर अवलिया याचा चेला होता; व ही गुरुपरंपरा अजमीर येथील अत्यंत वंद्य परमपूज्य सत्पुरुष प्रसिद्ध अवलिया मोईनुद्दीन चिस्ती, पर्यंत पोहोंचत होती. व शेख निजामुद्दीन अवलियावर लोकांची विशेष भक्ति बसण्यास तेंही एक कारण झालें होतें. हा अवलिया मोठा दानशूर असून त्याचा खर्च राजापेक्षांही जास्त असे; परंतु या अवलियाचें लोकांवर अतिशय वजन होतें; त्यामुळें अथवा अन्य कांहीं कारणामुळें ग्यासुद्दीन तघूलख बादशहास याचा फार मत्सर वाटूं लागला; व त्यानें या अवलियाचें प्रस्थ नाहींसें करण्याचा निश्चय केला. व त्याप्रमाणें तो स्वसैन्यानिशीं तिकडे जाण्यास निघाला. बादशहा स्वसैन्यानिशीं या अवलियावर चाल करून येत आहे, असें जेव्हां त्याच्या शिष्य मंडळीस समजलें तेव्हां त्यांनीं या अवलियास सांगितलें कीं, बादशहाची आपणावर गैरमर्जी झाली आहे,

असून त्यानें बांधिलेल्या चाळीस मशीदींत दिल्लीशहराच्या दक्षिणेस तुर्कमन गेटाजवळ असलेली "काळी मशीद" ही विशेष प्रेक्षणीय व प्रसिद्ध आहे; व शहातुर्कमन या नांवाच्या एका प्रसिद्ध अवलियाच्या नांवावरून ( मृत्यु १२४० ) तुर्कमन दरवाजा असें त्या दरवाज्यास ( गेट ) नांव पडलेलें आहे; व तेथें जवळच या अवलियाची कबर आहे. ही मशीद इ० सन १३८६ मध्यें फिरोजशहानें बांधली; बाहेरून ही इमारत दुमजली असावी असें दिसतें. परंतु तिचें जोतें मोठें असून प्रार्थनेची जागा त्यावर २८ फूट उंच आहे. व या मशीदीची एकंदर उंची ६६ फूट असून तिचें काम चौदाव्या शतकांतील शिल्पकलेचें दर्शक आहे. मि० स्टीफनयाच्या ह्मणण्याप्रमाणें "ह्या मशीदींच्या कमानीं व अर्ध गोलाकृति शिरोभाग ह्यांची रचना विलक्षण असून या इमारतींचे दगड अद्भुत प्रकारच्या चुन्यामध्यें बसविलेले आहेत, व ते मध्यें एक सुद्धां पाचर दिल्याशिवाय बसविलेले आहेत. यावरून चौदाव्या शतकांतील उत्कृष्ट कलाकौशल्याचा मासला दिसून येत आहे," आणि अरबी भाषेंतील सुरस गोष्टींत वर्णिलेल्या मशीदींच्या धर्तीवर ही बांधण्यांत आलेली आहे, असें बिशप हेबर यानें तिच्या संबंधीं उद्गार काढिले आहेत.

फिरोजशहा यानें इ० सन १३८७ मध्यें शहाजादा महंमद याच्या हवालीं राज्यकारभार सोंपविला; परंतु तो अनुभवी व विषयी असल्यामुळें राज्यांत लागलीच निरनिराळ्या भानगडी उपस्थित झाल्या; ह्मणून फिरोज यानें पुन्हां स्वतःच्या हातीं राज्यकारभार घेतला; व पुढें लवकरच तो मृत्यु पावला. ( इ० सन १३८८ ) दिल्ली येथें

---

तरी आपण दिल्ली मधून निघून जावें. त्यावेळीं त्या अवलियानें मोठ्या शांत व धिमेपणानें असें उत्तर दिलें कीं "दिल्ली दूर अस्थ;" ह्मणजे दिल्ली अद्यापि फार लांब आहे; आणि खरोखर असाच चमत्कार घडून आला कीं बादशहा अखेर दिल्लीस आलाच नाहीं; व दिल्लीस येण्यापूर्वींच, त्याचा मुलगा महंमद तघलख यानें लांकडी डेऱ्याचें कारस्थान करून आपल्या बापाचा प्राणनाश केला. भाविक व श्रद्धाळू लोक या अवलियाचा छळ करण्याच्या बुद्धीनें बादशहा येत होता ह्मणून त्यास असें प्रायश्चित्त मिळालें, असें ह्मणतात. उलटपक्षीं, हा साधू ठक लोकांचा पुढारी असून त्याच्या संमतीनें बादशहाचा प्राण नाश करण्यांत आला असें मि० स्लीमन ह्मणतो. यांपैकीं खरी गोष्ट कोणतीही असो परंतु या अवलिया विषयीं लोकांची पराकाष्ठेची भक्ति असून तो फारच पूज्य व वंद्य सत्पुरुष ह्मणून आजतागायत मानण्यांत येत आहे. हा साधु इ० सन १३२४ मध्यें सुमारें ९२ वर्षांचा होऊन मृत्यु पावला. याच्या कबरस्थानावर बांधिलेला दर्गा मोठा प्रेक्षणीय असून त्यास "निजामुद्दीन अवलियाचा दर्गा" असें ह्मणतात.

" हौजई-खास या नांवाचें एक ठिकाण आहे. त्या ठिकाणीं सुलतान अल्लाउद्दीन खिलजी याच्या वेळेपासूनचा एक तलाव होता त्याठिकाणीं, फिरोजशहानें इ० सन १३५४ मध्यें एक विद्यामंदिर बांधून त्यावर युतफ बिन फजल हुसेनी या नांवाच्या एका विद्वान मनुष्यास अध्यापक नेमिलें होतें; त्या मनुष्याच्या कबरीजवळच या प्रसिद्ध व प्रजादक्ष सुलतानाची कबर असून ती आजतागायत अस्तित्वांत आहे.

या सुलतानास गुलामासंबंधीं विशेष प्रेम वाटत असे; व आपल्या प्रांतिक अधिकाऱ्यांकडून येणाऱ्या वसुलापैकीं त्यांना कांहीं रक्कम माफ करून त्याऐवजीं इतर नजराण्याबरोबर गुलामांचाही तो नजराणा घेत असे. या गुलामानां निरनिराळ्या प्रकारचें शिक्षण देण्याची त्यानें व्यवस्था केली होती, व त्यांच्या, राजवाड्यांत, सैन्यांत व इतर महत्वाच्या जागांवरही तो नेमणुका करीत होता. या सुलतानाच्या वेळीं राजवाड्यांतील खास पाहऱ्यावर चाळीस हजार गुलाम असत व त्याच्या आश्रयास एकंदर एक लक्ष ऐशीं हजार गुलाम असून त्यांच्या व्यवथेचें एक स्वतंत्र खातेंच त्यानें निर्माण केलें होतें. या गुलामांतील बहुतेक गुलाम मूळचे हिंदू असून बाटलेले होते; व फिरोजशहाच्या मृत्यु नंतर जेव्हां बंडाळी माजली तेव्हां त्यांत या गुलामानींही भाग घेतला होता. शहाजादा महंमद हा विषयी असून त्याच्या हातीं राज्यकारभार असतां बंडवाल्यानीं दिल्ली येथून त्यास हांकलून दिलें होतें; त्यामुळें फिरोजशानें, आपल्या वयाच्या ९० व्या वर्षीं मृत्युपूर्वीं आपला दुसरा मुलगा फतेखान याचा मुलगा ग्यासुद्दीन यास आपला वारस नेमून गादीवर बसविण्याची व्यवस्था केली होती; त्याप्रमाणें फिरोजच्या मृत्युनंतर तो गादीवर आला; परंतु पांचच महिन्यांत तो ठार मारला जाऊन त्याचा चुलत भाऊ अबूबकर हा गादीवर आला; परंतु तोही दरबारी मंडळीच्या पसंतीस न उतरून त्यांनीं त्यास पदभ्रष्ट केलें, आणि विषयी शहाजादा महंमद यास त्यांनीं पुन्हां परत बोलावून आणून राज्यावर स्थापन केलें. (इ० सन १३९०) हा सुलतान विशेष कर्तृत्ववान् नसला तरी अगदींच नालायक नव्हता व विषयी होता तरी त्याच्या अंगीं शौर्यही वास करीत होतें. याच्या कारकीर्दींत मेवाडी रजपूत सैन्य दिल्लीवर चाल करून आलें त्यावेळीं त्यानें स्वतः त्या सैन्याबरोबर दोन हात करून त्यास परत पिटाळून लाविलें होतें; आणि हा शहा अधिक काळ जगता तर राज्यांतील अस्वस्थता त्यानें पूर्णपणें मोडून टाकिली असती, पण राज्यावर आल्यापासून चारच वर्षांत, इ० सन १३९४ मध्यें तो मृत्यु पावला, आणि पुन्हां राज्यभर पूर्वी प्रमाणें बंडाळी माजून, राज्यव्यवस्थेची घडी पूर्णपणें विस्कळित झाली. महंमदानंतर त्याचा मुलगा हुमायून ऊर्फ शिकंदरशहा व तो एकाएकीं लवकरच मृत्यु पावल्यामुळें त्याचा भाऊ

महंमूद हा गादीवर आला. यावेळीं राज्यभर माजलेल्या अंदाधुंदीचा फायदा घेऊन सर्वार ऊर्फ ख्वाजाजहान शर्की यानें जोनपूर येथें, सारंगखान या नांवाच्या सरदारानें पंजाबमध्यें, मुज्फरशहा यानें गुजराथमध्यें, दिलवरखान यानें माळव्यामध्यें, व मलीक-राजफिरूकी यानें खानदेशमध्यें आपापलीं स्वतंत्र राज्यें स्थापन केलीं. अशाच स्थितींत इकडे दिल्लीशहरांत सारखी अव्यवस्था, बंडाळी व युद्ध प्रसंग चालू होते. महंमूदशहास फिरोजशहाचा नातू नुसरतखान हा राज्य प्राप्ती करितां प्रतिस्पर्धी उत्पन्न झाला, आणि बऱ्याच वेळां युद्धप्रसंग झाल्यानंतर त्यास अखेरीस महंमूदशहाच्या इकूबालखान या नांवाच्या सरदारानें दिल्लीबाहेर हांकलून दिलें, इतक्यांत "मानवजातीचा शत्रू" ह्मणून ओळखल्या जाणाऱ्या प्रसिद्ध व पराक्रमी तैमूरलंग बादशहानें, आपल्या अगणित फौजेसह हिंदुस्थान देशावर स्वारी केली, व मोठ्या धडाक्यानें दिल्लीशहरावर चाल करून येऊन त्यानें तें शहर आपल्या हस्तगत करून घेतलें.

तैमूरलंग हा जातीनें तुर्क असून त्याचा पांचवा पूर्वज प्रसिद्ध चंगीझखानाचा मुलगा झगताईखान याचा वजीर होता; चंगीझखानाच्या मृत्युनंतर त्याच्या राज्याचे अनेक तुकडे झाले होते, अशावेळीं तैमूरलंगाचा बाप दहा हजार स्वारांचा मनसबदार असून तो काश प्रांताचा कारभार पहात असे. तैमूरलंग हा मध्य आशियांत समर्कंद शहरापासून चाळीस मैलांवर एका खेड्यांत इ० सन १३३५ मध्यें जन्मास आला. लहानपणापासूनच तो अतिशय धाडसी, शूर व महाबुद्धीमान असून बाराव्या वर्षापासून त्यानें लढाई करण्यास सुरवात केली, पुढें त्यानें झगताई मोंगल वंशांतील समर्कंद येथील सुलतान हुसेन याच्याजवळ नोकरी पतकरिली; व पुढें इ० सन १३६१ मध्यें त्याचें शौर्य व कर्तृत्व ओळखून हुसेननें त्यास मोठ्या अधिकारावर नेमिलें. त्यानंतर एका युद्धांत त्याच्या पायास गोळी लागून तो लंगडा झाला; ह्मणून त्यास "तैमूर लंगडा" असें ह्मणत; व पुढें तो मोठ्या पदवीस चढला तेव्हां त्याच्या नांवापुढील शेवटचें अक्षर जाऊन त्यास "तैमूरलंग" अशी संज्ञा प्राप्त झाली. अशा रीतीनें तैमूरलंग हा सुलतानाकरितां नेहमीं युद्धप्रसंग करून त्याच्या अतिशय उपयोगीं पडला; तेव्हां तैमूरवर त्याची विशेष मर्जी बसली, व त्याने आपली बहीण तुर्कान हिजबरोबर त्याचें लग्न करून दिलें; तथापि ही बाई पुढें लवकरच मृत्यु पावली; पुढें त्यानें स्वतंत्र होण्याच्या इच्छेनें हुसेनअली विरुद्ध एक मोठें बंड उभारिलें, आणि बल्क या शहराजवळ त्याचा पूर्ण पराभव करून मध्य आशियांतील तुर्कस्थानचा तो मालक बनला. तेव्हां तैमूरलंगाची मर्जी संपादन करण्याकरितां एका सरदारानें हुसेन यास ठार मारिलें; तथापि समर्कंद शहर त्याच्या हातीं यावेळीं आलें नाहीं; आणि

सतत तीन वर्षें हुसेनच्या सरदारांनीं त्यास दाद दिली नाहीं; त्याच्यावर निरनिराळीं अनेक संकटें कोसळलीं; व त्याच्या जवळील बहुतेक सर्व लोकही त्याला सोडून गेले; त्यास अंधार कोठडींतील कैद भोगावी लागली, व एकदां तर अमुदार्या नदींतून पोहून पार होऊन त्याला आपला जीव बचाविणें भाग पडलें; व अतिशय वनवास भोगावा लागला. तथापि संकटसमयीं आपलें धैर्य खचूं न देतां, अथवा आपला निश्चय डळमळूं न देतां तशा प्रसंगांतून निभावण्याची धडपड करीत राहण्याचा व ती यशस्वीपणें सिद्धीस नेण्याचा असाधारण गुण त्याच्याठायीं जन्मसिद्ध होता, व एका मुंगीचें उदाहरण आपल्या हृद्पटलावर पूर्णपणें खोदून ठेऊन त्यानें तो दृढ केला होता. तो म्हणतो, "एके वेळीं माझ्या शत्रूनें माझा पराभव केल्यानंतर मी जीवाच्या भीतीनें एका पडक्या घरांत जाऊन लपून बसलों; व आपल्या विपन्न स्थितीचा कांहीं काळ विसर पडावा म्हणून तेथून जवळच भिंतीवर एक मुंगी चढत होती, तिच्याकडे मी पहात राहिलों. ती मुंगी गव्हाचा एक दाणा तोंडांत धरून सारखी भिंतीवर चढत होती; परंतु तो दाणा जड असल्यामुळें भिंतीच्या शेवटास पोहोंचण्यापूर्वीं ती एकूणसत्तर वेळां खालीं पडली, व सत्तराव्या खेपेस तिचा प्रयत्न सिद्धीस गेला. हें त्या मुंगीचें कृत्य पाहून मला तात्काळ नवीन जोर उत्पन्न झाला, आणि मी लागलेंच पुढील उद्योगास प्रारंभ केला." याप्रमाणें अनेक संकटें सोसून त्यानें इ० सन १३६९ मध्यें समर्कंदचें राज्य मिळविलें; व आपल्या नांवाची द्वाही फिरवून तो तेथील राज्याधिकारी बनला. खोवारिसम प्रांताचा कारभारी हुसेन सोफी यानें तैमूरलंगाच्या वकीलास कैद करून ठेविलें होतें; म्हणून तैमूरनें त्या प्रांतावर स्वारी करून, व त्याच्याशीं पांच वेळां मोठमोठीं युद्धें करून त्याचा पूर्ण पराभव करून टाकिला; व तें शहर हस्तगत करून घेऊन, तेथील कारागीर व विद्वान लोकां-खेरीज बाकीच्या सर्व माणसांची त्यानें कत्तल उडविली व या दोन्ही प्रकारच्या लोकांस त्यानें आपल्या राज्यांतील कुश या शहरांत पाठवून, तो प्रदेश निर्जन करून टाकिला. तैमूरलंग याचें सर्व चरित्र मानवी जातीच्या कत्तलींनीं भरलेलें आहे, तथापि त्यानें आपल्या सर्व दिग्विजयी स्वाऱ्यांत कारागीर व विद्वान लोकांच्या केसासही धक्का लाविला नाहीं, व लागूं दिला नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

त्यानंतर त्यानें खोरासान प्रांतावर चाल केली. या प्रांताचे त्यावेळीं हिरात व सेब्सीवार असे दोन भाग असत, व त्या उभयतांवर निरनिराळे अधिकारी असत; त्यांपैकीं सेब्सीवार येथील सुभेदार तैमुरलंगास लागलाच शरण आला; परंतु हिरात येथील अधिकाऱ्यानें त्याच्याशीं युद्ध सुरू केलें; तेव्हां तैमुरनें त्यास पराभूत करून आपल्या वर्चस्वाच्या आधीन होणें भाग पाडिलें. इतक्यांत सेब्सीवार येथील

लोकांनीं बंड केलें तेव्हां तैमूरनें तात्काळ तें मोडून टाकून तेथील दोन हजार लोक कैद करून ठेविले; व पुष्कळ चिखल तयार करवून त्याचा एक थर प्रथम जमिनीवर दिला, व त्यावर विटाप्रमाणें तीं माणसें गाऱ्यांत रचून त्यावर पुन्हां दुसरा थर देवविला; व अशा रीतीनें त्या सर्वांना त्यानें ठार मारून टाकिलें. नंतर त्यानें इराण देश आपल्या हस्तगत करून घेतला. त्यावेळीं इस्पहान येथील लोकांनीं बंड केलें; तें तैमूरनें तात्काळ मोडून टाकिलें; व सत्तर हजार माणसांचीं डोकीं कापून त्यानें आपल्या छावणी समोर त्यांची रास घालविली. मग तो किप्तशाक प्रांतावर चाल करून गेला, आणि बाष्करिया येथील घनघोर युद्धांत तेथील राजाचा पूर्ण पराजय करून त्याच्या बहुतेक सर्व सैन्याचा नाश उडविला. (इ० सन १३९१ ता० १८ जून) नंतर त्यानें शिराज हें शहर हस्तगत करून घेऊन तो बगदाद शहरावर चाल करून आला; तेथील राज्यकर्ता अहंमद जलायर यास कैद केलें. तें शहर आपल्या ताब्यांत घेऊन व तेथें दोन महिने मुक्काम ठेवून दारूचें प्रस्थ कमी करण्याकरितां, तेथील सर्व दारू तैग्रीस नदींत ओतून टाकविली. तेथील विद्वान व कारागीर मंडळीस समर्कंद येथें पाठवून दिलें, आणि त्या शहरांतलि बाकी लोकांची त्यानें इतकी भयंकर कत्तल उडविली कीं अशा मानवी शीरांचे एकशेंवीस मनोरे झाले होते. तैमूरच्या संगतीं नेहमीं कुशल कारागीर ठेविलेले असत, व ते जिवंत मनुष्यांना चुन्यानें व विटांनीं, अथवा माती, व विटांनीं चिनून त्यांचा तट अथवा मनोरे बांधीत असत. त्यानंतर त्यानें आर्मीनिया व जार्जिया हे देश जिंकून किप्तशाकचा प्रदेश आपल्या पूर्णपणें ताब्यांत आणिला, व पुढें प्रदेश जिंकीत जिंकीत तो थेट मास्को शहरापर्यंत चाल करून गेला, व तिकडील देश जिंकण्याचें काम आपल्या सरदारावर सोंपवून तो समर्कंद येथें परत आला. (इ० सन १३९६) त्या प्रमाणेंच अफगाणिस्थानदेशही आपल्या ताब्यांत घेऊन त्या प्रदेशाचा कारभार पाहण्यास त्यानें आपला नातू पीरमहंमद जहांगीर यास काबूल येथें ठेविलें. व हिंदुस्थानावर स्वारी करण्याचा व तेथील संपत्ति मिळविण्याचा तो बेत करूं लागला. इतक्यांत हिंदुस्थान देशांत दिल्ली येथें माजलेल्या अंदाधुंदीची खबर त्यास त्याचा नातू पीरमहंमद यानें दिली. तेव्हां, इष्ट तेंच घडून आलें, म्हणून आनंदातिशयानें त्यानें हिंदुस्थानावर स्वारी करण्याचा निश्चय केला, व आपला हा बेत त्यानें आपल्या सल्लागार मंडळीपुढें मांडिला; परंतु त्या मंडळींत मतभेद झाला; व कांहींचें हिंदुस्थानावर स्वारी करावी असें, व कांहींचें करूं नये असें मत पडलें; तथापि खुद्द तैमूरची इच्छा हिंदुस्थानावर स्वारी करावी अशी असून त्याचा त्याबद्दल निश्चय झाला होता, म्हणून त्यानें स्वारी करण्याचा बेत नक्की करून तो इ० सन १३९८ त्या

मार्च महिन्यामध्यें समर्कंद येथून निघून मोठ्या थडाक्यानें कूच करीत हिंदुस्थानाच्या रोखानें पुढें आला. मध्यंतरीं इ० सन १३९७ मध्यें त्याचा नातू पीरमहंमद यानें होड्यांचा पूल बांधून सिंधुनद उतरून "उंच" ( Uch ) हें ठिकाण आपल्या हस्तगत करून घेतलें, व तो थेट मुलतानावर चाल करून आला. यावेळीं सारंगखान यानें पंजाबांतील शहाबुद्दीन घोरी यास ठार मारणाऱ्या "गकर" जातीच्या रानटी लोकांना मागें हटवून नुकतेंच महंमूदशहाच्या कारकीर्दींत पंजाबामध्यें स्वतंत्र राज्य स्थापन केलें होतें. त्यानें पीरमहंमद याचा प्रतिकार करण्याचा मोठ्या नेटानें प्रयत्न केला, व सतत सहा महिने मुलतानचा किल्ला लढविला; परंतु किल्ल्यांतील धान्यसामुग्री संपल्यामुळें त्यास तो किल्ला अखेरीस पीरमहंमद याच्या हवालीं करावा लागला. तथापि त्यास त्या ठिकाणीं दाण्याचाऱ्याची अतिशय टंचाई आली, त्यावेळीं त्यानें आपला आजा तैमूर यास आपल्या मदतीस तावडतोब येण्याविषयीं कळविलें; त्याप्रमाणें तो समर्कंद येथून अटक येथें येऊन सिंधूनद उतरून अलीकडे आला, आणि चिनाब नदी रावी नदीस ज्याठिकाणीं मिळते त्या संगमावर असलेल्या तुलंबा या गावीं येऊन व तें गांव व तेथील किल्ला हस्तगत करून घेऊन तेथील सर्व माणसांची त्यानें कत्तल उडविली; व तेथून तो शहानवाझ[२] या गांवीं गेला. तेथें त्याच्या सैन्यास पुरून उरण्याइतकें धान्य त्यास मिळालें; तेव्हां त्यानें आपणास पाहिजे होतें तेवढें घेऊन बाकी राहिलेलें जाळून टाकिलें. नंतर तो बियास नदी उतरून अलीकडे आला. त्याचा नातु पीरमहंमद यास त्यानें अगोदरच तीस हजार सैन्य, त्याच्या मदतीकरितां मुलतान येथें पाठविलें होतें, व मागाहून थोड्याच दिवसांनीं तो स्वतःच आपल्या नातवास जाऊन मिळाला. नंतर ते उभयतां आपल्या सैन्यासह भाटनीर शहरावर चाल करून आले. तेथील राजानें तैमूरच्या सैन्याबरोबर आपल्या लहानशा फौजेसह टक्कर दिली; परंतु तैमूरच्या सेनासागरापुढें त्याचा निभाव लागला नाहीं; तेव्हां आपल्यामागें आपल्या स्त्रियांची अब्रू

---

टीप १:–पंजाब इलाख्याच्या हद्दींत पंजाब व राजपुताना यामध्यें भावलपूर या नांवाचें एक संस्थान आहे. त्या संस्थानांत, अहंमदपूर या शहराजवळ, रावी नदी सतलज नदीस ज्याठिकाणीं मिळते, त्यानजीक 'उच' हें पुरातन शहर आहे; येथून मुलतान नैरृत्य दिशेस सत्तर मैलांवर रावी नदीच्या तीरीं आहे.

टीप २:-शहानवाझ हें ठिकाण तुलंबाच्या पुढें, मुलतान जिल्ह्यास लागून असलेल्या मांटगॉमरी जिल्ह्यांत, मुलतानाच्या रस्त्यावर आहे. व तेथून बियास नदी ओलांडून मुलतानाकडे जाण्याचा मार्ग आहे.

मालिन होऊं नये म्हणून त्यानें व त्याच्या सरदारांनीं त्यांना एका वाड्यांत कोंडून त्यास आग लावून त्यांचा निकाल उडविला; व सर्व जण उदार होऊन शत्रूवर तुटून पडले; व त्याच्या सैन्याचा पुष्कळ नाश उडवून ते सर्व धारातीर्थी पतन पावले. तैमूरनें या शहरांतील सर्व माणसांची कत्तल उडविली; व त्या शहरास आग लावून तें जमीन-दोस्त करून टाकिलें. त्यानंतर मार्ग क्रमीत असतां सरस्वती, फत्याबाद व महाराजपूर या शहरांचीही त्यानें अशीच राखरांगोळी उडविली; व तो तसाच चाल करीत डिसेंबर महिन्यांत पानिपतवरून दिल्लीकडे येऊं लागला. पानिपत येथें त्यास कोणींही अडविलें नाहीं; उलट त्याच्या भीतीनें लोक रानांत पळून गेले; व तो थेट आपल्या असंख्य सेनासागरासह दिल्लीवर चाल करून आला. त्यानंतर दिल्लीजवळ तळ देऊन आपणा बरोबर फक्त सातशें स्वार घेऊन तो दिल्लीचा बंदोबस्त, व्यवस्था व तटबंदी पाहण्यास पुढें आला. त्यावेळीं महंमूदशहा व त्याचा वजीर मल्लू इक्बलखान हे तैमूरचें सैन्य थोडें आहे असें पाहून आपणाबरोबर पांच हजार स्वार व सत्तावीस हत्ती घेऊन त्याच्याशीं लढण्यास आले. बादशाही सैन्यांतील हत्ती पाहून तैमूरच्या सैन्यास भीति वाटली; परंतु तैमूरनें, आपला प्रसंगविशेषीं पराभव झाल्यास उपयोगीं पडणाऱ्या आवश्यक तजवीजी करून व आपल्या लोकांस धीर देऊन बादशाही सैन्याबरोबर मोठ्या जोरानें युद्ध केलें; व त्यास पराभूत करून मागें हटवून सुमारें एक लाख लोक पाडाव करून आपल्या छावणींत गुलाम ह्मणून पाठवून दिले. इतक्यांत तैमूरच्या सैन्यावर एका बादशाही पलटणीनें हल्ला केला, व त्यास अडचणींत गांठून घाबरविलें. तें पाहून या गुलामांना आनंद होऊन तो त्यांनीं उघडपणें व्यक्त केला; त्यामुळें तैमूरनें संतापून "जे कैदी पंधरा वर्षांपेक्षां अधिक वयाचे असतील त्यांचीं एकदम डोकीं उडवावीं," असा हुकूम केला. त्याप्रमाणें हिंदू व मुसलमान मिळून सुमारें एक लाख मनुष्यांची तावडतोब निर्दयपणानें कत्तल उडविण्यांत आली. त्यानंतर यमुना नदी उतरून तैमूर यानें फिरोजाबादच्या मैदानांत तळ दिला. त्यावेळीं महंमूदशहा व मल्लू यांनीं पुन्हां एकवार तैमूरच्या सैन्याशीं युद्धप्रसंग केला. तैमूरही युद्धास तयार होतांच त्यानें युद्ध सुरू करण्यापूर्वीं ईश्वराची मनोभावानें प्रार्थना केली, व ईश्वरानें आपली विनंति मान्य केली असें दाखवून रणवाद्यें वाजवून व आपल्या सैन्यास धीर देऊन तो बादशाही सैन्याशीं युद्ध करण्यास पुढें आला व उभयतांमध्यें युद्धासच सुरवात झाली. यावेळीं बादशाही सैन्याचा सर्व भरंवसा हत्तीवर होता; परंतु तैमूरच्या सैन्यानें पहिल्या धडाक्यासरशीं हत्तीवरील महातांनां उडविलें. तेव्हां ते सैरावैरा धांवू लागून बादशाही सैन्यांत एकच गोंधळ उडून गेला. इतक्यांत तैमूरच्या सैन्यानें मोठ्या निकराचा हल्ला

करून बादशाही सैन्याचा पूर्णपणें मोड केला; ( ता० १७ दिजंबर ) व त्याचा पाठलाग करीत तो वेशीजवळ येऊन तेथें त्यानें आपल्या सैन्यासह तळ दिला. महंमुदशहा अतिशय घाबरून गुजराथेंत पळाला; परंतु गुजराथचा सुलतान मुजफरशहा ( इ० सन १३९६ ते इ० सन १४११ ) यानें त्यास आश्रय न दिल्यामुळें तो तथून माळवा प्रांताचा सुलतान दिलवरखान घोरी ( इ० सन १३८७ ते इ० सन १४०५ ) याच्या आश्रयास गेला, व दिलवरखानानें त्याचा योग्य सन्मान करून त्यास तीन वर्षें आपणाजवळ आपली राजधानी मांडवगड येथें ठेवून घेतलें. त्याप्रमाणेंच तैमूरच्या भीतीनें वजीर मल्लूइकबालखान हाही आपलीं बायकामुलें टाकून दिल्लींतून पळून गेला. तेव्हां बाकी सरदार मंडळी तैमूर यास शरण येऊन त्यांनीं त्याचें स्वामित्व मान्य केलें. नंतर तैमूरनें दिल्लीचें बादशाही पद स्वीकारून आपल्या नांवाची सर्व शहरभर द्वाही फिरवून स्वतःच्या नांवानें खुत्बा वाचविला; व शहरच्या लोकांपाशीं मुचलक खंडणी मागितली; परंतु

---

टीप १:—मांडवगड हें पुरातन ओसाड शहर हल्लीं धार संस्थानांत असून सर्व मध्यहिंदुस्थानांत, येथील किल्ल्या इतका पुरातन व मजबूत किल्ला दुसरा नाहीं. हें ठिकाण नर्मदानदीच्या पूर्वकांठावर, उत्तरेस पंधरा मैलांवर, व महूपासून तीस, धारपासून वीस व इंदूर पासून अडतीस मैलांवर आहे. हें निर्जन शहर समुद्र सपाटीपासून १९४४ फूट उंचीवर असून त्या शहराची व्याप्ति आठ मैलांची आहे; व तें ठिकाण विंध्यपर्वताच्या ओळीस लागून आहे. माळवा प्रांताच्या मुसलमान सुलतानांची राजधानी या ठिकाणीं असून, तेथें पूर्ववैभवाचे अवशेष आजतागायत अस्तित्वांत आहेत. त्यांत दिलवरखान सुलतानाचा मुलगा हुशंगशहा घोरी ( इ० सन १४०५ ते इ० सन १४३२ ) यानें बांधिलेली संगमरवरी दगडाची जुम्मामशीद, व सुलतान बाजबहादूर ( इ० सन १५५४ ते इ० सन १५६४ ) यानें बांधिलेला राजवाडा फार प्रेक्षणीय आहे. हुशंगशहा यानेंच मांडवगडाचा किल्ला उत्कृष्टरीतीनें बांधून मजबूत केला, व हल्लीं मध्यप्रांतांत मोडत असलेलें भोपाळजवळील नर्मदातीरचें हुसंगाबाद हें जिल्ह्याचें, व कमीशनरीचें शहर त्यानेंच वसाविलें. हुशंगशहा हा माळव्यांत अतिशय लौकिकवान् व फार प्रिय असून त्यानें हिंदू लोकांना कधींही दुखविलें नाहीं, अथवा त्यांच्या देवळास कधींही धक्का लाविला नाहीं. व सर्वांना ममतेनें व निःपक्षपातानें वागविलें. याबद्दल माळव्यांतील लोकांत आजतागायत त्याची आठवण निघते. या प्रजावत्सल, निःपक्षपाती, परंतु दुर्दैवी शहाचा इ० सन १४२८ मध्यें दक्षिणेंतील बहामनी राज्याचा सुलतान अहंमदशहा वल्ली ( इ० सन १४२२ ते इ० सन १४३५ ) यानें पराभव केला; व तेव्हांपासून तो विपन्नावस्थेंत व विपत्तींत येऊन त्याचा इ० सन १४३२ मध्यें अखेरीस अंत झाला!

खंडणीची रक्कम अतिशय असल्यामुळें नगरवासी जन ती देण्यास तयार होईनात; असें पाहून तैमरच्या सरदारांनीं सतत पांच दिवस खंडणी उकळण्याकरितां शहरांत भयंकर धुमाकूळ माजविला, परंतु त्याची तैमूरलंगाला खबरही लागली नव्हती; व तो नगराबाहेर विजयोत्सवांत व आनंदांतच गर्क होऊन राहिलेला होता. परंतु त्याच्या सैन्यानें सर्व शहरभर चालविलेला प्रळय नगरवासी जनांना असह्य होऊन त्यांनीं आपल्या बायका मुलांना ठार मारून व आपलीं घरें पेटवून देऊन ते निर्वाणीच्या निकरानें तैमूरच्या सैन्याशीं दोन हात करण्यास पुढें सरसावले. तेव्हां शहरांतील आगींचे व ज्वाळांचे लोळ त्याच्या दृष्टीस पडून त्यास शहरांतील सर्व हकीकत समजली. इकडे तैमूरचें सैन्य तयार होतेंच, व तिकडे शहरांतील लोकही आपल्या सर्वस्वाची होळी करून त्या सैन्याशीं दोन हात करण्यास पुढें आलेले होतेच; ( ता० २६ दिजंबर ) त्यामुळें सर्व शहरभर कापाकापी व हाणाहाणी याशिवाय दुसरें कांहीं दिसेना; आणि भयंकर रक्तपात होऊन कांहीं रस्ते तर प्रेतांनीं इतके भरून गेले कीं, त्यांत पाऊल ठेवण्यासही जागा मिळेना. या प्रसंगीं तैमूरच्या सैन्यानें किती लूट गोळा केली याचा तर अंतच नाहीं. अशारीतीनें, सय्यदांचा व उलमांचा तेवढा भाग शिल्लक राहून व विद्वान् व कारागीर लोक तेवढे बचावून बाकी सर्व दिल्ली शहर ओस पडलें. तैमूर पंधरा दिवस दिल्लीस राहिला, आणि परत जातांना ( ता० १ ज्यानेवारी ) १३९९ ) स्वतःच्या वांटणीस आलेला लुटीचा हिस्सा, १२० हत्ती, १२ गेंडे आणि फिरोज तघलख बादशहानें महाप्रयासानें मिळविलेले अनेक चमत्कारिक प्राणी त्यानें आपणाबरोबर नेले. दिल्लीस असतांना त्यानें फिरोजशहानें बांधिलेली अत्युत्तम मशीद, व तिच्या भिंतीवरील त्याच्या कारकीर्दीचें लिहिलेलें वर्णन, वगैरे कलाकौशल्य पाहून त्यास अतिशय आश्चर्य वाटलें; आणि तसें काम आपल्या राज्यांत करण्याकरितां दिल्ली येथील पकडलेल्या कारागिरांना तो आपणाबरोबर स्वदेशीं घेऊन गेला. परत जातांना त्यानें दिल्लीपासून चाळीस मैलांवर असलेल्या मिरत या शहरावर कांहीं सैन्य पाठविलें; परंतु तेथील सैन्यानें तैमूरच्या सैन्याची थट्टा केली, त्यामुळें चिडून तो स्वतः मिरत शहरावर चाल करून गेला; आणि त्यानें शिडया लावून येथील किल्ला हस्तगत करून घेऊन त्या शहराचा विध्वंस केला. नंतर तो हरिद्वार येथें गेला. त्याठिकाणीं गंगानदी गो-मुखांतून बाहेर पडते असें त्यास कळलें; व त्या ठिकाणच्याही "काफर" हिंदु लोकांना, त्यांच्या धार्मिक समजुतीबद्दल शिक्षा करण्याकरितां त्यानें हजारों लोकांस ठार मारिलें; आणि मसूरीखालील शिवालिक पहाडांतून तिकडील नगरकोट व जम्मू हीं शहरें लुटून परत करून, मुलतान, लाहोर व दीपालपूर या प्रांतांचा बंदोबस्त करण्याकरितां

व तेथील कारभार पाहण्याकरितां खिजरखान सय्यद या नांवाच्या सरदारास कांहीं सैन्यासह मागें ठेवून व त्यास तिकडे रवाना करून तो हिमालयाच्या बर्फमय खिंडींतून इ० सन १३९९ च्या मार्च महिन्यांत पलीकडे होऊन काबूलच्या मार्गानें स्वदेशीं समर्कंद येथें परत गेला.

त्यानंतर लवकरच इराणांत दंगे उद्भवले, ह्मणून तैमूर हा समर्कंद येथून तिकडे गेला, आणि सर्व इराण देश हैराण करून व त्या देशांत नेहमींप्रमाणें प्रळय उडवून तो सीरीया देशावर चाल करून गेला. यावेळीं सीरिया प्रांत ईजिप्तच्या सुलतानच्या ताब्यांत होता; त्यामुळें तैमूरच्या ह्या स्वारीचा प्रतिकार करण्याकरितां सुलतान फिरोज हा तिकडे चाल करून आला, व उभयतांमध्यें हेल्प येथें एक जंगी लढाई होऊन तींत तैमूर विजयी झाला; ( इ० सन १४०० ) व त्यानें तैमूरचें श्रेष्ठत्व मान्य केलें. नंतर त्यानें दमास्कस, आलेप्पो, बूर्स, आखाबाद, इस्पहान वगैरे शहरांची धूळधाण उडविली. यावेळीं बगदाद येथील लोकांनीं पुन्हां बंड करून ते तैमूरलंगावर उलटले ह्मणून त्यानें तें शहर जिंकून घेऊन तेथील लोकांची कत्तल उडवून नव्वद हजार मुंडक्यांचा एक मनोरा उभारिला व तें शहर नामशेष करून टाकिलें.

यावेळीं, ऑटोमन तुर्कीतील बायजीद हा बादशहा असून तो युरोपखंड जिंकण्याच्या खटपटींत होता, व त्याचा सर्व युरोपभर दरारा असून, स्वारी व हल्ला करण्याच्या त्याच्या विशेष चपलते वरून, त्यास युरोपखंडांत विद्युत्वीर असें नाव पडलें होतें. तैमूरलंगानें आशिया मायनर मधील शीवास ह्या शहराची धूळधाण उडविली; व बायजीदचा मुलगा ओतोघ्रल यास त्यानें पकडून, कांहीं दिवस प्रतिबंधांत ठेवून नंतर ठार मारिलें. या आणि तैमूरलंगानें बायजीदकडे पाठविलेल्या वकिलांना त्यानें प्रतिबंधांत ठेविलें या कारणामुळें त्या उभयतांमध्यें प्रखर वैर माजलें; तेव्हां टॉरस पर्वत ओलांडून मोठ्या झपाट्यानें तैमूर हा बायजीदवर चाल करून आला. अंगोरा येथें त्याच्या सैन्याचा पूर्णपणें पराभव करून त्यास पकडून ठार मारिलें व त्याचें राज्य जिंकून घेतलें. ( इ० सन १४०३ ) त्यानंतर चीन देश आपल्या सत्तेखालीं आणावा, या विचारानें तो तिकडे जाण्यास निघाला, परंतु मार्गांतच झगझार्तीस नदीच्या कांठीं समर्कंद पासून तीनशें मैलांवर असलेल्या उत्रार ऊर्फ ओमार या ठिकाणीं तो ज्वर येऊन आपल्या वयाच्या सत्तराव्या वर्षीं इ० सन १४०५ मध्यें ( ता० १९ फेब्रुवारी ) मृत्यु पावला, व त्यामुळें चीन देशावरील तैमूरच्या धाडीची भावी आपत्ति नष्ट होऊन तो देश त्यावेळीं सुरक्षित राहिला.

तैमूर हा जगांत एक महाबलाढ्य, व पराक्रमी पुरुष निर्माण होऊन गेला व चंगीझ तैमूर यांच्या सारखे पराक्रमी पुरुषही जगांत क्वचितच निर्माण झाले यांत

तिळमात्र संशय नाहीं. पण त्याबरोबरच इतके क्रूर पुरुषही क्वचितच निपजले, यांतही संदेह नाहीं. तैमूरला चंगीझखानाबद्दल विशेष पूज्य बुद्धि वाटत होती; त्याच्याप्रमाणेंच सर्व जग पालथें घालण्याची तैमूरला हाव होती. त्यानें झगताई मुकुटासह एकंदर सत्तावीस मुगट हस्तगत केले होते; मोठमोठ्या चाळीस स्वाऱ्या केल्या होत्या, अनेक देश व राज्यें पादाक्रांत केलीं होतीं. अनेक शहरें व प्रदेश निर्जन करून टाकिले होते, अनेक कत्तली व जाळपोळी उडविल्या होत्या. चीन देशावर तो स्वतः स्वारी करण्याकरितां निघून पुढें मार्ग क्रमीत चाललाच होता आणि बायजीदला युरोपखंड पादाक्रांत करण्यांस जर त्यानें मदत केली असती, अथवा अधिक काळ जगून जर स्वतः त्यानेंच तिकडे स्वारी केली असती तर युरोपखंडावर मोठाच खडतर प्रसंग येऊन कोसळला असता. परंतु तैमूरच्या मृत्यूनें, "जगांतील मानव जातीचा एक महा बलाढ्य असा शत्रु" नष्ट होऊन त्याच्या भयंकर त्रासापासून जगाची पूर्णपणें व कायमची मुक्तता झाली !

तैमूरलंग बादशहाची शिस्त व दहशत जबरदस्त होती; व त्याचें वैभव—सत्तावीस राज्यकर्त्यांनां पालथें घालून त्यांचे मुकूट हिरावून आणणाऱ्या या अलौकिक बादहाचें वैभव—हीं त्याच्या ऐश्वर्यास अनुरूप असेंच असामान्य होतें. तैमूर यानें इ० सन १४०२ मध्यें स्पेन देशांत आपला एक वकील पाठविला होता; तो परत येत असतां, स्पेन देशाचा राजा पहिला जॉन याचा क्लॅव्हिगो या नांवाचा एक वकील, त्या देशांतून त्याच्याबरोबर येण्यास निघाला, (इ० सन १४०३ मे) व तेथून कॉन्स्टांटिनोपल येथें जाऊन तेथील बादशहास भेटून त्रिबिझोंद, अर्जरूम, तेहरान व मर्व्ह या शहरावरून तो इ० सन १४०४ च्या आगष्ट महिन्यांत समर्कंद येथें येऊन पोहोंचला. मार्गांत त्रिबिझोंद येथून तैमूरच्या राज्याची हद्द सुरू झाली; परंतु तैमूरचा वकील त्याच्या बरोबर असल्यानें त्यास प्रवासांत कोणत्याही प्रकारें त्रास झाला नाहीं. तैमूरनें त्याच्या प्रवासाकरितां ठिकठिकाणीं टप्याचे घोडे व पाहुणचाराची योग्य व्यवस्था ठेविली होती. तथापि इराणांतून भर रखरखीत उन्हांत प्रवास करावा लागल्यामुळें, उन्हानें, तहानेनें व प्रवासासारख्या दगदगीनें त्याच्या बरोबरील परिवारापैकीं पुष्कळ लोक मृत्यु पावले. रात्रंदिवस प्रवास करून दोन दिवसांत सव्वाशें मैल जाण्यांत दोन घोडे मेले तरी हरकत नाहीं, पण त्याच प्रवासाला तीन दिवस लागलेले तैमूर यास बिलकुल खपत नसे. सर्व रस्तेभर ठिकठिकाणीं मैलाचे खांब रोंविलेले असत. राज्यांतील सर्व लष्करी कामगारांनीं प्रवासांत दररोज निदान साठ मैल तरी चाललेंच पाहिजे, अशी त्याची सक्त ताकीद असे; आणि त्याचा स्वभाव व घोर शिक्षा यासंबंधीं प्रत्येकास भयंकर दहशत वाटत असल्यामुळें त्याच्या

प्रत्येक शब्दाची, इच्छेची व आज्ञेची तात्काळ तंतोतंत अंमलबजावणी होत असे. अर्थात मार्गांत या सरकारी पाहुण्याच्या पाहुणचाराची चंगळ उडत उडत तो समर्कंद येथें येऊन पोहोंचला; व तेथेंही त्याची उत्तम बरदास्त ठेवण्यांत आली. त्यानंतर आठ दिवसांनीं तैमूरनें या वकीलाची भरदरबारांत भेट घेतली; व त्याला अनेक मेजवान्या दिल्या. तैमूरलंगाच्या वेळेस स्त्रियांना पडद्यांत ठेवण्याची चाल नव्हती; व सार्वजनिक समारंभांत पुरुषांबरोबर बायकाही मोठमोठ्या शामियान्यांमध्यें उघड्या येऊन बसत असत, अथवा लग्नकार्य वगैरे खासगी समारंभांत उघडपणें बाहेर येऊन देखरेख व व्यवस्था करीत असत; त्यामुळें या मेजवान्याच्या समारंभामध्यें तैमूरच्या बायका उघडपणें बाहेर आलेल्या त्या वकीलाला पाहण्यास सांपडल्या व त्यांचें वर्णन त्यास आपल्या प्रवासवृत्तामध्यें देतां आलें. शिवाय याच वेळीं तैमूरच्या सहा नातवांचा लग्नसमारंभही चालू होता; मेजवान्याकरितां सोन्याचीं मेजें मांडलेली असून त्यांवर रत्नजडित ताटें व पेले मांडिलेले होते. या समारंभाकरितां नाना प्रकारचे रेशमी तंबू उभारिलेले होते; व त्यांत अनेक खोल्या काढिलेल्या असून त्यांची रचना किल्ल्यासारखी केलेली होती. या समारंभासाठीं दूरदूरचे पाहुणें आलेले असून त्यांत युरोपखंडांतील राजाचेही वकील आलेले होते; व त्या सर्वांचा अतिशय थाटानें पाहुणचार करण्यांत येत असून त्यांची अत्युत्कृष्ट बरदास्त ठेवण्यांत आली होती; व एकदां हत्ती, घोडे यांच्या खेळाचा एक मोठा समारंभ करण्यांत आला; त्यावेळीं पाहुणे वगैरे मंडळी करितां खेळाच्या ठिकाणीं चौदा पंधरा हजार तंबू लावण्यांत आले होते. या सर्व लग्नसमारंभावर, तैमूरची पट्टराणी आपल्या अत्यंत मौल्यवान व ऐश्वर्यसंपन्न पेहरावानिशीं स्वतः देखरेख ठेवीत होती. तिचा झगा उचलून धरण्यास तिच्या पाठीमागें पंधरा दासी, हजर असून तिच्या डोक्यावरील मुकुट सांवरून धरण्यास तीन दासी तत्पर असत. तिच्या डोक्यावरील मुकुट रत्नजडित असून तो अत्यंत मौल्यवान होता. तिचे काळे कुळकुळीत केश खांद्यावरून खालीं लोळत होते; तिच्याबरोबर तिची सेवा करण्याकरितां तीनशें दासी हजर होत्या, आणि इतर राण्यांचाही इतमाम पट्टराणी सारखाच होता. या समारंभांतील स्वयंपाकाच्या लांकडांकरितां मोठमोठीं अरण्यें तोडून त्यांचे पर्वतप्राय ढीग केलेले होते. त्याप्रमाणेंच अन्नाचे व मांसांचे ही तसेच ढीग पडलेले होते; दारूची टाकी भरून ती वहात होती; वधुवरांच्या मस्तकावर हिरे माणकांचा सारखा वर्षाव होत होता; आणि सतत दोन महिनें हा समारंभ चालला असून त्या अवधींत नेहमीची शिस्त बंद ठेवून लोकांना मनमुराद चैन करण्याचा हुकूम देण्यांत आला होता; हा वकील अजमासें वीस महिनें तैमूरचा पाहुणचार घेऊन, (इ० सन १४०४ च्या आगष्ट महिन्यांत) त्याच्या ऐश्वर्यानें

अतिशय थक्क होऊन आश्चर्य करीत तो इ० सन १४०६ च्या मार्च महिन्यांत समर्कंद येथून स्पेन देशांत परत गेला.

तैमूर हा विद्वान् व कारागीर मंडळीच्या केंसासही धक्का लावीत नव्हता; आणि बगदाद् व दमास्कस येथील विद्यालयांचा त्यानें विध्वंस केला होता; तरी समर्कंद् येथें त्यानें विद्यालयें स्थापन केलीं होतीं; त्याची लष्करी शिस्त अतिशय कडक होती. युद्धसामुग्री व युद्धव्यवस्था तो नेहमीं स्वतःच करीत होता. त्याची लष्करी व दरबारी टापटीप कित्ता घेण्यासारखी होती. त्याच्या सैन्याला, राज्यभर व त्याची धाड त्याच्या ज्या प्रदेशावर गेली,—इतकेंच नव्हे तर त्याच्या भयंकर क्रूर स्वभावाची ज्या ज्या ठिकाणीं माहिती झाली, त्या प्रदेशभर त्याची अतिशय दहशत वाटत होती; आणि हिंदुस्थान देशांतही त्या दहशतीचा असा परिणाम झाला होता कीं, तो हिंदुस्थानांतून गेल्यावरही जिवंत असेपर्यंत त्याच्या नांवानें खुत्बा वाचीत असत; तैमूरची आपल्या मुलांमाणसांवर जरी अतिशय प्रीति होती तरी त्यांना सुद्धां त्याची अतिशय दहशत वाटत होती; आणि तो संतापला ह्मणजे प्रत्यक्ष आपल्या मुलांनां सुद्धां कडक शिक्षा करीत असे; व गुलामाप्रमाणें वागवीत असे. तो स्वतः मुसलमान असूनही त्यानें राजकीय बाबतींत मुसलमानांना अथवा मुसलमानी धर्माला महत्व दिलें नाहीं, व कत्तली उडवितांना त्यानें मुसलमानांना वगळिलें नाहीं. हिंदू असो, मुसलमान असो अथवा ख्रिस्ती असो, त्याच्या तावडींत जो सांपडेल त्याचा तो साफ निकाल करून टाकित असे; त्यास बुद्धिबळें खेळण्याचा विशेष नाद होता; व तो नास्तिक नसून त्यानें स्वतः कित्येक मशीदी बांधिल्या होत्या. त्याप्रमाणेंच विद्वान लोकांचाही तो परामर्ष घेत होता; तो स्वतः शियापंथी असून पैगंबराच्या वंशांतील प्रसिद्ध विद्वान पुरुष अमीर सय्यद बेरेका हा त्याचा गुरू होता; व त्या उभयतांमध्यें अखेरपर्यंत अकृत्रिम स्नेह होता. त्याप्रमाणेंच त्या काळांतील प्रसिद्ध व स्पष्ट वक्ते, अशा दोन्ही फारशी कवींपैकीं हाफीज याच्या संबंधीं तैमूरलंगास आदर वाटत असून त्यानें या कवीचा एकदां सन्मान करून त्यास बक्षीस दिलें होतें; व दुसरा प्रसिद्ध व विद्वान कवी कर्मांणी हा तर खुद्द त्याच्याच आश्रयाला होता. हा कवि स्पष्टवक्ता असून निस्पृह होता व तैमूर यास आवडो अथवा न आवडो, आपलें स्पष्ट मत, तो प्रसंगीं तैमूरपुढें मांडीत होता; व तैमूरही त्याबद्दल विषाद न मानितां त्याच्यावर नेहमीं कृपादृष्टी ठेवीत होता. एकदां तैमूर अंघोळ करून वस्त्रानें अंग पुशीत असतां कर्मांणीस त्यानें विचारिलें कीं, "मला विकलें तर माझी किंमत काय येईल ?" त्यावर कर्मांणी ह्मणाला, "येईल सुमारें पंचवीस अस्पर्स; "कां बरें ! तितकी तर माझ्या अंगावरील ह्या वस्त्राचीच किंमत होईल" असें तैमूर ह्मणाला;

त्यावर ह्या निर्भीड व निस्पृह कवीनें तैमूर यास लागलींच असें स्पष्ट उत्तर दिलें कीं, " मी तरी त्या वस्त्राचीच ती किंमत सांगितली; तुमची स्वतःची किंमत तर कवडी इतकीही नाहीं, "

तैमूर हा ३६ वर्षें राज्य करून आपल्या वयाच्या ७१ व्या वर्षी, इ० सन १४०५ मध्ये मृत्यु पावला. त्यावेळीं त्यास मुलगे व नातू मिळून छत्तीस व सतरा नाती होत्या. तैमूरच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा शहारुख मिर्झा हा त्याच्या विस्तृत व अवजड राज्याचा मालक झाला, परंतु तैमूरचें वैभव व ऐश्वर्य त्याच्या बरोबरच लयास गेलें; आणि त्याच्या मागें राज्यास ओहोटी लागून शंभर वर्षांच्या आंतच समर्कंद् येथील त्याच्या वंशाचा नाश झाला; तथापि तैमूरचा सहावा वंशज " बाबर " हा अतिशय कर्तृत्ववान् निपजून त्यानें तैमूरच्या मृत्यूनंतर सव्वाशें वर्षांच्या आंतच हिंदुस्थानांत, भावी काळांत अत्यंत बलाढ्य व वैभवसंपन्न बनलेल्या, मोंगली साम्राज्याची स्थापना केली.

तैमूरनें आपल्या वंशजांस बोध करण्याकरितां राज्यव्यवस्थेचे बारा नियम आपल्या राजनीति ग्रंथांत लिहून ठेविले आहेत, व त्यांवरूनच त्याची विलक्षण बुद्धिमत्ता व राजकीय कौशल्य दिसून येत असून ते नियम मननीयही आहेत; ते खालीं लिहिल्याप्रमाणें:—

" नाना प्रकारचीं मोठमोठीं दुःखें सोसून, संकटें भोगून व अनेक युद्धें करून परमेश्वरप्रसादें करून मीं जें राज्य स्थापन केलें आहे, व वाढविलें आहे, तें माझ्या मृत्यूनंतर माझ्या वंशजांचे हातीं जाणार आहे. तें त्यांना उत्तम प्रकारें चालवितां यावें म्हणून हें महत्कृत्य तडीस नेतांना मी कसा वागलों हें थोडक्यांत सांगतों; तें लक्षांत ठेवून त्याप्रमाणें त्यांनीं वागावें.

१ ह्या जगामध्यें मीं सर्वशक्तिमान परमेश्वराची भक्ति वाढविली; महंमद् पैगंबराच्या धर्माचा प्रसार केला, आणि नेहमीं सर्व ठिकाणीं मी त्या धर्मास आश्रय देत गेलों.

२ बारा जातींचे लोक हातांशीं धरून मीं राज्यें काबीज केलीं व चालविलीं, आणि माझ्या वैभवरूपी इमारतींचे ते जसे कांहीं आधारस्तंभच आहेत असें समजून मी त्यांच्याशीं नेहमीं अगदीं मिळूनमिसळून वागत गेलों.

३ मसलतीनें, विचारानें, सावधगिरीनें आणि दक्षतेनें मी शत्रूंचीं सैन्यें धुडकावून लावून त्यांना पादाक्रांत करून टाकिलें; देशकालवर्तमान पाहून कधीं औदार्यानें, कधीं शांतवृत्तीनें तर कधीं हिकमतीनें मीं आपल्या राज्याचें काम चालविलें, आणि मी माझ्या मित्रांशीं व शत्रूंशींही मोठ्या सभ्य रीतीनें वागत गेलों.

४ व्यवस्थेनें व टापटिपीनें मी आपल्या राज्याचा असा बंदोबस्त ठेविला कीं, अमीर, वजीर, शिपाई आणि प्रजा, मला वचकत असत, व कोणीही कधींसुद्धां माझ्या मर्यादेचें उल्लंघन करीत नसत.

५ माझे अमीर आणि शिपाई यांना मी योग्य प्रसंगीं बक्षिसें देऊन खुष करीत असे; आणि त्यांना माझ्याबरोबर खान्यासही बोलावीत असे; त्यामुळें ते समरभूमीवर शत्रूशीं युद्धकरितांना आपल्या जिवाकडेही पहात नसत; मी त्यांना सोन्यारुप्याचे दागिनेही पुष्कळ वेळां बक्षीस देत असे; त्यांना कवाईत शिकविण्याची मी तजवीज ठेविली होती; त्यांना जीं जीं दुःखें व संकटें प्राप्त होत तीं तीं मी स्वतः आपण होऊन त्यांच्याबरोबर भोगीत असे; त्यामुळें त्यांना अधिक उत्तेजन येऊन ते दृढनिश्चयानें लढत. माझे सर्व सरदार एकचित्त असत, आणि युद्धाच्या कामांत ते पूर्ण निष्णात असत. इतक्या गोष्टींच्या साह्यानें मीं सत्तावीस राजे जिंकून त्यांचीं राज्यें ताब्यांत घेतलीं.

मी राज्यासंबंधीं काम पाहूं लागलों म्हणजे स्वसंरक्षण व सुख, ह्याविषयींचे विचार अगदीं एकीकडे ठेवीत असे. मला बारावें वर्ष लागलें तेव्हांपासून मी अनेक देश फिरलों, संकटें सोशिलीं, साहसें केलीं, आणि शत्रूंचीं सैन्यें धुडकावून लाविलीं. माझ्या सैन्यांत कित्येक वेळां बंडें झालीं तीं मीं मोडिलीं; त्याप्रसंगीं माझी पुष्कळ अवज्ञा होत असे; त्यामुळें तशी अवज्ञा सोसणें माझ्या अंगवळणीं पडलें होतें. अशा बेफाम लोकांशीं गांठ पडली म्हणजे, कालदेशानुरूप मी शौर्यानें किंवा कपटानें त्यांची खोड मोडीत असे, आणि त्यांच्यावर आपलें श्रेष्ठत्व स्थापन करीत असे.

६ मी न्याय निःपक्षपातानें करीत असे. त्यामुळें सर्व प्रजा माझ्यावर अतिशय लोभ करीत असे. मी अपराध्यावरही कधीं कधीं दया करीत असे; तथापि त्यास योग्य शिक्षा दिल्यावांचून फारसा रहात नसे. मी लोकांशीं उदारपणानें वागत असे, म्हणून मी त्यांस आवडत असे. माझ्या नोकरांनीं चांगलें काम केलें म्हणजे मी त्यांना बक्षिसें देत असे, म्हणून ते माझी मर्जी संपादून राहण्याचा प्रयत्न करीत; आणि प्रजेनें यत्किंचितही मर्यादोल्लंघन केलें तर मी तिला तात्काल शिक्षा करी, म्हणून ती मला थरथरां कांपत असे. अशा रीतीनें सैन्य आणि प्रजा हीं उभयतां कधींही एकचित्त होऊं नये अशी मी तजवीज ठेविली होती. दीन अनाथांची मी अतिशय कींव करीत असे, आणि आपल्या शिपायांना इनामें देत असे.

जुलमी लोक गरीबांना गांजीत असले तर त्यांना मी आधीं त्यांच्या जाचांतून सोडवीत असे; त्याप्रमाणेंच कोणाच्या जिंदगीवर अथवा जीवावर मी जुलूम होऊं दिला नाहीं, आणि अपराध एकाचा व शिक्षा दुसऱ्याला असेंही मीं कधीं होऊं दिलें नाहीं.

ज्यांनीं मला त्रास दिला होता, व जे लढाईमध्यें प्रत्यक्ष माझ्या अंगावर तुटून पडले होते ते जेव्हां दांतीं तृण धरून मला शरण आले, तेव्हां त्यांच्या अपराधाची क्षमा करून मीं त्यांना दयाळूपणानें आश्रय दिला; त्यांनीं मला दिलेला त्रास मी विसरून गेलों, इतकेंच नाहीं तर त्यांना देणग्या वगैरे देऊन मीं त्यांचा बहुमान केला, त्यामुळें माझ्याविषयीं त्यांच्या मनांत तिळमात्र देखील वैरभाव शिल्लक राहिला नाहीं.

७ महंमद पैगंबराचे वंशज, धर्मशास्त्रवेत्ते, विद्वान आणि ग्रंथकार यांच्यावर माझी अतिशय भक्ति असे, व त्यांचा मी अतिशय मान ठेवीत असे; त्याप्रमाणेंच शूर लोकांवर माझी अतिशय प्रीति असे; कारण शूर पुरुष ईश्वरास सुद्धां प्रिय असतो हें मला ठाऊक आहे. मी नेहमीं चांगल्या विद्वान मंडळींच्या सहवासांत रहात असे; मी गरीबास आश्रय देत असे, आणि त्यांच्यावर मीं कधींही जुलूम केला नाहीं. दुष्ट लोकांस मीं आपल्या दरबारांत कधींही येऊं दिलें नाहीं, व त्यांची मसलतही कधीं ऐकिली नाहीं.

८ मी निश्चयानें वागत असे; एकदां एखादें काम हातीं घेतलें म्हणजे माझें सगळें लक्ष त्या कामाकडे असे; आणि तें शेवटास नेल्याखेरीज मी त्याचा पिच्छा सोडीत नसे; मी आपल्या बोलण्याप्रमाणें वागत असे. सर्वशक्तिमान परमेश्वरानें मला कडकपणानें वागवूं नये, म्हणून मी कोणास कधींही कडकपणानें वागविलें नाहीं.

आदामाच्या वेळेपासून महंमद पैगंबरापर्यंत, व महंमद पैगंबरापासून ह्या काळापर्यंत कोणकोणते कायदे झाले त्याचा शोध मी विद्वान लोकांपाशीं करीत असे; प्राचीन काळचे वेगवेगळाले कायदे ताडून पाहून त्यांत जे चांगले वाटले ते मी पसंत केले आहेत. राज्यें बुडण्यास पूर्वीं कोणकोणतीं कारणें झालीं, याविषयींही मीं पुष्कळ शोध केला; त्यावरून मला असें समजून आलें आहे कीं, क्रूरपणा व जुलूम ह्या दोन गोष्टी अत्यंत कल्याणविघातक आहेत; म्हणून त्यांच्यापासून नेहमीं दूर राहणें फायदेशीर आहे.

९ माझ्या प्रजेची सर्व स्थिति मला माहीत होती. माझ्या प्रजेमध्यें जे मोठे होते, त्यांना मी आपले भाऊ मानीत असे, आणि जे गरीब होते, त्यांना मी आपलीं मुलें लेखीत असे. प्रत्येक प्रांताच्या व शहराच्या लोकांचे स्वभाव प्रथम समजून घेऊन, त्यांच्यावर अंमल करण्यास योग्य असा सुभेदार मी नेमीत असे; प्रत्येक प्रांतांत व मोठ्या शहरांत माझा एक एक इमानी अखबर-नवीस नेमिलेला असे; तो मला तिकडील सर्व हकीकत हरहमेष लिहून पाठवीत असे, आणि त्याच्यामार्फत ज्याचा अपराध माझ्या कानावर येई, त्यास मी योग्य शिक्षा करीत असे.

१० ज्यानें माझी चाकरी एकनिष्टपणें केली, त्यास मी कधींही विसरलों नाहीं; इतकेंच नव्हें तर त्याच्याशीं मी नेहमीं मोठ्या ममताळूपणानें व औदार्यानें वागल्याशिवाय राहिलों नाहीं; माझा शत्रू पराभव व पश्चात्ताप पावून मजसमोर येण्यास जर शरमूं लागला, आणि लज्जेनें तोंड चुकवूं लागला, तर त्याचे सर्व अपराध पोटांत घालून त्याजवर ममता केल्याशिवाय मी कधींही राहिलों नाहीं. शेख बहिराम म्हणुन माझा एक सरदार होता; तो आणिबाणीच्यावेळीं मला सोडून शत्रूस मिळाला, आणि माझ्याबरोबरच युद्ध करूं लागला; परंतु माझें अन्न त्यानें खाल्लें होतें, त्या अन्नानें त्यास शुद्धीवर आणिलें; तो फार लज्जित होऊन माझ्याकडे परत आला, तेव्हां त्याच्या अपराधाची मी त्यास क्षमा केली आणि तो मोठ्या संभावित कुळांतील व शूर असल्यानें मी त्यास मोठ्या पदवीसही चढविलें.

११ मला एवढें वैभव प्राप्त झालें तरी मी आपल्या सोयऱ्याधायऱ्यांना व इष्टमित्रांना विसरलों नाहीं; तर त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें द्यावयाचें तें देऊन त्यांचा सांभाळ केला. मी माझ्या आप्तवर्गांपैकीं कोणासही कधीं जिवें मारण्याचा अथवा प्रतिबंधांत ठेवण्याचा हुकूम दिला नाहीं!

जो मनुष्य मला जसा वाटे, त्याच्याशीं मी तसा वागत असे. मी गरीबी भोगिली, श्रीमंतीचा अनुभव घेतला, आणि मला पुष्कळ दिवस नाना प्रकारच्या स्थितींत कंठावे लागले; त्यामुळें मला पुष्कळ अनुभव प्राप्त झाला आणि त्या धोरणानें मी काळ, वेळ, व प्रसंग पाहून शत्रु मित्राशीं विचारानें आणि सावधगिरीनें वागत गेलों.

१२ खरा योद्धा, मग तो कोणत्याहीं पक्षाचा असो, त्यास मी अतिशय मान देत असे, कारण आपल्या जीवाची आशा न बाळगतां तो रणक्षेत्रांत युद्ध करितो, हें कांहीं सामान्य कर्म नाहीं.

माझ्या शत्रूपक्षाकडील एखाद्या सरदारानें आपल्या धन्याच्या फायद्याकरितां माझ्याशीं निकरानें पुष्कळ काळ युद्ध केल्यामुळें त्याच्या हातून माझ्या सैन्य वगैरेचा जरी अतिशय नाश झाला असला आणि तो अखेरीस निरुपायानें माझ्या स्वाधीन झाला असला तरी मी त्याचा विशेष सन्मान करून त्यास आपला मोठा दोस्त समजत असे; त्याप्रमाणेंच आणीबाणीच्या प्रसंगीं आपल्या धन्याचा विश्वासघात करून जर मला मिळण्याकरितां माझ्याकडे एखादा सरदार आला, तर मी त्याचें नुसते. तोंड सुद्धां कधींही पहात नसे.

तक्तमानिषखानाशीं मी युद्ध करीत असतां त्याचे कांहीं सरदार मला येऊन मिळण्यास तयार होते, आणि त्याबद्दल त्यांचीं तशीं पत्रें देखील मला आलीं होतीं; परंतु त्या निमकहराम सरदारांचा मी अगदीं धिक्कार केला; कारण मी आपल्या मनालाच विचारूं लागलों कीं, जे लोक आपल्या पहिल्या धन्याशीं निमकहरामीपणा करावयास चुकले नाहींत, ते दुसऱ्या धन्यांशीं तरी इमानानें वागतील, असें कशावरून समजावें ?

मला आजपर्यंतच्या अनुभवानें असें समजून आलें आहे कीं, ज्या राज्याचा पाया नीति व धर्म या गोष्टींवर बळकट केलेला नसतो, व ज्यास कायदेकानूंची दृढ मजबुती नसते त्या राज्यांतील व्यवस्था व वैभव हीं लवकर धुळीस मिळून जाऊन त्या राज्याचा नाश होतो; ह्मणून मी आपलें राज्य नीति व धर्म ह्या पायावर बळकट स्थापन केलें आहे. आणि त्यास कायद्याची उत्तम मजबुती केली आहे.

तैमूरच्या ह्या बारा सूक्तांमध्यें त्यानें कित्येक ठिकाणीं स्वतःच्या उदार स्वभावाविषयीं पुष्कळच स्तुतिपर वर्णन केलेलें आहे. परंतु वास्तवीक पाहतां तें त्याच्या कृतिशीं पूर्ण विसंगत आहे. त्यानें जीं अनेक क्रूर कृत्यें केलीं, कत्तली उडविल्या, अग्नि आणि तरवार यांनीं प्रळय करून सोडिला, त्याच्या संबंधीं तर एक शब्दही त्यानें या सूक्तांमध्यें कोठेंही नमूद केला नाहीं; ह्मणजे दुष्ट व क्रूर मनुष्याला आपल्या कृतीचें हिडिस स्वरूप दिसत असतें. त्यास आपल्या अशा कृत्यांचा अभिमान वाटत नसतो, इतकेंच नाहीं तर आपल्या अशा कृत्यांचा डांगोरा जगभर न पिटविला जावा, अशी त्याची इच्छा असते, व त्या कृत्यांवर सारवण घालण्याचाच तो नेहमीं प्रयत्न करीत असतो, ही गोष्ट यावरून सिद्ध होते.

तथापि वरील सूक्तांवरून, आणि स्पेनचा वकील क्लेव्हीगो याच्या वर्णनावरून तैमूर हा मोठा बुद्धिमान, धोरणी, काटक, हाल आपत्तींत मुरलेला, अनुभवी; कर्तृत्ववान् व करडा राज्यकर्ता असून त्याची शिस्त, व्यवस्था व ठापटीप हीं नमुनेदार होतीं, असेंच निदर्शनास येतें; आणि त्या काळांतील युरोपांत सुधारणेचें अग्रस्थान

म्हणून असलेल्या स्पेनच्या बलाढ्य राज्याशीं व त्यांतील लोकांशीं तुलना केली असतां, तैमूरलंगाचा दरबार, सुधारणा, शिस्त व टापटीप या बाबतींत स्पेनच्या दरबाराच्याच तोडीचा होता; रानटी नव्हता; व त्यांचें दरबारी मंडळही बुद्धिवैभवानें स्पेनच्या राज्याच्या तोडीचें होतें, अडाणी नव्हतें; इतकेंच नाहीं, तर तैमूरच्या दरबारचें वैभव, व त्याची अमर्याद ऐश्वर्यसंपन्नता पाहून स्पेनचा वकील अतिशय आश्चर्यचकित झाला होता, कारण असें ऐश्वर्य स्पेनच्या राज्यकर्त्याला त्याच्या स्वप्नांत सुद्धां कधीं पहावयासही मिळालें नव्हतें. मग भोगावयास मिळणें तर लांबच—असेंच त्या वकीलानें आपल्या प्रवास वृत्तांत दिलेल्या वर्णनावरून सिद्ध होतें. थोडक्यांत म्हणजे, तैमूर क्रूर होता, पण रानटी नव्हता; निर्दय होता पण अडाणी नव्हता; मानवी जातीचा शत्रू होता पण जंगली नव्हता; कडक होता पण सुधारलेला होता; कठोर होता पण व्यवस्थित होता; मनाचा कोंवळा नव्हता, पण करारी व कर्तबगार होता. राजधोरणी व राजकारणी होता. कत्तली उडवीत होता, पण बेसुमार शिस्तीचा होता; बेहद्द अंमलबजावणी करणारा होता. कालचक्र आपला जबडा उघडून, हरघडीला उभ्या आडव्या अंगानें त्याला खाऊन टाकण्यासाठीं धडपडत असतां, कधीं त्याला बगल देऊन तर कधीं त्याला बेगुमानपणानें अंगावर घेऊन,—व नाशिबाच्या हारजीतचे खेळ त्याच्याबरोबर बेगुमानपणानें खेळून—तैमूर श्रेष्ठपदास चढलेला होता. करणीच्या कर्तृत्वानें, तो बादशहा, बनला होता; आणि हाल अपेष्टा, दुःख, वनवास, व संकटें यांना सारखें तोंड देऊन आपल्या अंगिकृत कार्यांत यश मिळवीत मिळवीत, पश्चिमेस इराण व आशियामायनरवरून मास्कोपर्यंतच्या, दक्षिणेस हिंदुस्थान देशापर्यंतच्या व पूर्वेस थेट चीन देशाच्या सरहद्दीपर्यंतच्या व्यापक प्रदेशाचा तो बादशहा बनला होता. अर्थात् अशा अलौकिक कर्तृत्वाचा मनुष्य क्रूर असला तरी रानटी असणें शक्य नाहीं, आणि त्यास रानटी म्हणणेंही न्यायाचें ठरणार नाहीं, इतकेंच नव्हे तर—त्याचीं क्रूरकृत्यें, व कठोर आचरण लक्ष्यांत घेऊनही—तो जगांत एक असामान्य पुरुष निर्माण होऊन गेला असें म्हणणें वस्तुस्थितीस सोडून होणार नाहीं. शिवाय ही महत्वाची गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, ( मुसलमानी रियासत पान ४०३-४ पहा ) "आशिया खंडांतील लोकांविषयीं जी माहिती उपलब्ध आहे, ती बहुतेक मुसलमानांनीं व पाश्चात्यांनीं लिहिलेली असून तेथील लोकांविषयीं त्यांनीं पदोपदीं अनादर व्यक्त केला आहे. आशियांतील लोक अज्ञानांधःकारांत निमग्न आहेत, राष्ट्राची सुधारणा म्हणजे काय, व एकंदर जनहित कशांत आहे हें त्यांस कधींच कळलें नाहीं. तैमूरलंगासारखे पुरुष मानव जातीचे शत्रु होत, अशा प्रकारचे उद्गार आपण वारंवार ऐकितों. पण हीं मतें देतांना बाराव्या शतकांतील लोकांच्या गुणदोषांचें निरीक्षण आपण

एकोणीसाव्या शतकांतील अत्यंत विभिन्न तुलना दृष्टीनें करितों, हें विसरतां कामा नये. तैमूरलंग कितीही दुष्ट असला, तरी त्याच्या वेळच्या पाश्चात्य पुरुषांशीं त्याची तुलना केली असतां, ती खचित शोभण्यासारखी आहे. त्याची दरबारची टापटीप, त्याचे राज्यकारभार चालविण्याचे नियम व त्याचा दरारा, ह्या गोष्टी पाहूं गेलें असतां, त्यांत शहाणपणा, व जनहितेच्छा नाहीं, असें ह्मणतां येत नाहीं. त्याचें खरें वैभव पहावयाचें असेल तर प्राच्येतिहासकाराचेच ग्रंथ वाचले पाहिजेत. युरोपांतील अज्ञानरूपी महा निद्रेंतून युरोपिय राष्ट्रास जागें करण्यास मूळारंभीं चंगीझखान व तैमूर यांच्याच स्वाऱ्या कारण झाल्या आहेत. ह्यानीं स्वाऱ्या करून जीवितादि सर्वस्वाचा विध्वंस केल्यामुळें, युरोपियन् लोक दचकून जागे झाले आणि स्वातंत्र्य, स्वराज्यभक्ति वगैरे पुढें कालांतरानें विकास पावलेल्या गुणसमुदायाची त्यांच्या ठिकाणीं प्रारंभीं प्रेरणा झाली. तैमूरचा नातू उलूघबेग यानें इ०सन १४३७ त समर्कंद् येथें एक ज्योतिषशाला व वेधग्रह स्थापिलें. एवढें अवाढव्य काम सर्व भूतलावर दुसरें कोठेंही नाहीं. प्रसिद्ध टायकोब्राही ह्यानें अशीच वेध शाळा डेन्मार्कांत स्थापिली. तेव्हां उलूघबेगाची ज्योतिषशाळा स्थापन होऊन १४० वर्षें झालीं होतीं. ग्रीक लोकांच्या वेळेस अलेक्झॅंड्रिया येथें गणितादि शास्त्रांचा उत्कर्ष झाला. त्यानंतर बगदाद, कोर्डोव्हा, सेव्हिल, तांजर्स आणि समर्कंद हीं ठिकाणें एकामागून एक विद्यासंपन्न होत गेलीं. टायकोब्राही जन्मास येण्यापूर्वीं ती विद्या पाश्चात्यांस लाभली नव्हती. मुसलमान लोकांत जे पुरुष विद्येनें लौकिकास चढले, त्यांतील उलूघबेग हा शेवटचा होय. ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासाकरितां त्यानें अवाढव्य उपकरणें तयार केलीं. आणि त्यांच्या मदतीनें ग्रह व नक्षत्रें ह्यांच्या गतीचे वेध घेऊन ते प्रसिद्ध केले. उलूघबेगची वेधशाळा तीन मजल्यांची होती. समर्कंद् शहरांतील इमारती व कलाकौशल्याचीं कामें तैमूरच्या वेळेत सर्व पृथ्वींत अग्रगण्य असून तें शहर फार नावाजलेलें होतें. पृथ्वीच्या सर्व भागांतून तैमूरनें कारागीर आणविले होते. ज्योतिषशास्त्र, गणित, काव्य व त्या काळाला अनुरूप अशीं इतर विद्यांगें ह्यांची तेथें चांगलीच भरभराट होती. या गोष्टी मनांत धरून मग तैमूरसारख्या पुरुषांविषयीं योग्य तें मत द्यावयास पाहिजे." अर्थात, पूर्वग्रहानें दूषित होऊन दिलेल्या मताला कांहींही किंमत नाहीं हें उघड आहे.

तैमूर हिंदुस्थानांतून परत गेल्यावर दोन महिने दिल्ली शहरांत अंदाधुंदी व त्यांतच दुष्काळ व अनेक रोगांच्या सांथी उद्भवून अखेरीस माजी वजीर मल्लूइक्बलखान यानें बऱ्याच रक्तपातानंतर पुन्हां कांहींशी स्थिरस्थावर केली. आणि माळव्यांतून बादशहा महंमूद यास बोलावून आणविलें. परंतु मल्लू यानें सर्व सत्ता आपल्या हातीं ठेविल्यामुळें तशा स्थितींत राज्यपदाचा उपभोग घेत राहणें महंमूद यास न आवडून

तो कनोज येथें जाऊन तिकडील प्रदेशाचा कारभार पाहूं लागला. तैमूरचा नातु पीरमहंमद जहांगीर यानें पंजाबचा नुकताच स्वतंत्र झालेला सरदार सारंगखान याचा पराभव करून मुलतान घेतल्यानंतर महंमूद बादशहाचा सरदार खिजरखान सय्यद यानें तैमूरची मर्जी संपादन केल्यामुळें त्यास मुलतानची सुभेदारी मिळाली होती. तो यावेळीं प्रबळ झाला असून त्याच्याबरोबर इकबलखानानें युद्ध सुरू केलें; परंतु त्यांत तो स्वतःच मारला जाऊन दिल्लींतील अधिकारी दौलतखान लोदी यानें बादशहा महंमूद यास पुन्हां परत आणून गादीवर बसविलें; ( इ० सन १४०५ ) परंतु त्याच्याशींही खिजरखानानें अधिकारप्राप्तीकरितां सारखें युद्ध सुरू ठेविलें होतें. अशाच स्थितींत हा दुर्दैवी सुलतान आजारी पडून मृत्यु पावला. ( इ० सन १४१२ ) त्यानें एकंदर वीस वर्षें राज्यकारभार केला; परंतु अंतस्थ बंडें, तैमूरची स्वारी, स्वतःची दोन वेळां पदभ्रष्टता, निरनिराळे प्रांतिक अधिकारी स्वतंत्र व शिरजोर होऊन त्यामुळें स्वतःच्या राज्याची व स्वतःची झालेली विपन्नावस्था, शारीरिक व मानसिक कष्टमय स्थिति, स्वतःच्या जीवाची असुरक्षितता, दगाबाज व स्वार्थी सरदार केव्हां विश्वासघात करून कोणता भयंकर प्रसंग आपणावर आणून गुजरावितील ही निरंतरची धास्ती,–डळमळीत तख्तासह केव्हां नामशेष होईल ही भीति या कारणामुळें राज्यावर आल्या वेळेपासून सारखें दुःख भोगीत, अखेरही कष्टांत व विवंचनेंतच या तघलख घराण्यांतील शेवटच्या बादशहाचा मृत्यु झाला, व त्याच्या बरोबरच त्याचें घराणेंही नष्ट होऊन गेलें.

महंमूद तघलख मृत्यु पावल्यानंतर दौलतखानानें दिल्ली येथील तख्त बळकाविलें; परंतु तैमूरच्या तर्फेनें खिजरखान सय्यद यानें त्याच्याशीं अनेक वेळां युद्धप्रसंग करून अखेरीस इ० सन १४१६ मध्यें त्यास पदभ्रष्ट केलें. तैमूरच्या नांवानें तो राज्यकारभार करूं लागला; व स्वतः राजचिन्हें धारण न करितां त्याच्याच नांवानें नाणीं पाडवून खुत्बा वाचविला; इतकेंच नव्हे तर तैमूर मृत्यु पावल्यावरही त्याचा राज्यावर आलेला मुलगा शहारुखमिर्झा याच्याकडेसही तो कधीं कधीं समर्कंद येथें खंडणी पाठवीत होता. हा सुलतान सुस्वभावी, उदार व नीतिमान होता. तो सात वर्षें शांततेनें कारभार करून इ० सन १४२७ मध्यें मृत्यु पावला, व त्याचा मुलगा मुबारिक हा गादीवर आला. तोही स्वभावानें उत्तम असून न्यायी, दयाळू, शांतताप्रिय व राज्य चालविण्यास लायक होता. त्यानें आठ वर्षें राज्य केलें. त्याचा वजीर सरूरउलमुल्क या नांवाचा एक मनुष्य असून त्याच्यावर मुबारिकची कांहीं कारणामुळें इतराजी झाली; तेव्हां त्यानें या अपमानानें चिडून जाऊन मुबारिक मशीदींत प्रार्थना करीत असतां त्यास मारेकरी घालून ठार मारिलें. ( इ० सन १४३५ ) आणि त्याचा मुलगा महंमद यास गादीवर बसवून, तो स्वतः

आपल्या हातीं सर्व कारभार ठेवून राज्य चालवूं लागला; व लवकरच आपल्या पक्षाच्या लोकांची दरबारांत भरती करून पूर्वींच्या मंडळीस त्यानें दरबारांतून काढून टाकिलें; परंतु त्यामुळें राज्यांत अनेक भानगडी उत्पन्न झाल्या. सुलतानाचें व वजीराचें वांकडें आलें, आणि त्यानें वजीर सरूरउलमुल्क यास ठार मारवून शांतता स्थापित केली; परंतु तो विषयी असल्यामुळें राज्याचा बंदोबस्त त्यास ठेवितां आला नाहीं; आणि सरहिंद येथील प्रबळ सुभेदार बहिलोललोदी यानें दिल्लीचें राज्य मिळविण्याकरितां प्रयत्न चालविले, इतक्यांत महंमद आजारी पडून मृत्यु पावला, ( इ० सन १४४५ ) व त्याचा मुलगा अल्लाउद्दीन सय्यद हा गादीवर आला. या सुलतानाच्या कारकीर्दींत बादशाही सत्ता अतिशय संपुष्टांत-येऊन, तो स्वतःही दुर्बळ व कर्तृत्वहीन असल्यामुळें ती नामशेष होण्याचा रंग दिसूं लागला. अल्लाउद्दीन यानें स्वतः रोहिलखंडाच्या अग्नेय दिशेस असलेलें बदाऊन या नांवाचें एक शहर वसाविलें. तें शहर त्याच्या विशेष आवडीचें होतें, व राज्याची फिकीर न करितां तो त्या ठिकाणीं राहून ऐषआरामांत कालक्रमणा करीत होता. त्याचा वजीर हमीद यास त्यानें राजधानी सोडावी व अशा रीतीनें बदाऊन येथें जाऊन रहावें हें पसंत नव्हतें. अखेरीस या उभयतांमध्यें वैरभाव उत्पन्न होऊन हमीद यानें बहिलोल यास आपल्या मदतीस बोलाविलें; परंतु त्यानें कावा करून, मी वजीर हमीद याचें पारिपत्य करण्यास दिल्लीस जात आहे, असें अल्लाउद्दीन यास कळविलें व त्याप्रमाणें तो स्वसैन्यानिशीं दिल्लीस आला; तेव्हां अल्लाउद्दीन यानें स्वखुषीनें बहिलोलच्या हवालीं सर्व राज्य करून तो स्वस्थपणानें बदाऊन येथें राहण्यास कबूल झाला, आणि त्याप्रमाणें बहिलोल लोदी याच्या हातीं सर्व राज्य येऊन तो दिल्ली येथें राज्य करूं लागला; ( इ० सन १४५० ) त्यानंतर अल्लाउद्दीन हा बदाऊन येथें जाऊन राहिला, आणि त्याठिकाणीं अजमासें अठ्ठावीस वर्षें कालक्रमणा करून तो इ० सन १४७८ मध्यें मृत्यु पावला.

बहिलोल लोदी याचा आजा पूर्वीं मुलतान येथें सुभेदार होता. लोदी हें अफगाण जातीचें एक घराणें असून त्यांचा पूर्वापार धंदा व्यापाराचा होता; व फिरोज तघलखच्या वेळेस, त्यानें आश्रय दिल्यामुळें तें विशेष योग्यतेस चढलें होतें; तथापि सय्यद घराण्याच्या कारकीर्दींत त्यांचा अतिशय छळ झाल्यामुळें बहिलोल यानें पंजाब प्रांत हस्तगत करून घेऊन तो तिकडे स्वतंत्र झाला होता; व स्वतःच्या कर्तृत्वानें अखेरीस त्यानें राज्यपदही मिळविलें होतें. त्यानें—गादीवर आल्यावर वजीर हमीद यास कामावरून दूर केलें. हा राज्यकर्ता शूर, उदार, व सुस्वभावी, होता. त्यानें जोनपूरचें शर्की राज्य बुडवून आपल्या राज्यास जोडिलें; व पंजाब प्रांत तर पूर्वीपासूनच त्याच्या ताब्यांत होता; त्यामुळें पंजाबापासून बंगालपर्यंतचें बहुतेक सर्व उत्तर हिंदुस्थान त्याच्या अंमला-

खालीं आलें. तथापि इ० सन ११८८ मध्यें फिरोज तघलख मृत्यु पावल्या वेळेपासून राज्यव्यवस्थेची जी घडी विघडली ती दिल्ली येथें मोंगली साम्राज्य स्थापन होऊन स्थिरस्थावर होईपर्यंत तशीच कायम होती. त्यामुळें लोदी घराण्याच्या काळांतही राज्यांत कोणतेंच बंधन न राहतां राज्यकर्त्या व्यक्तीच्या बलाबलावरच काय तो कारभार चालत होता; आणि बलिष्ट व शिरजोर मंडळींच्या तोंडावर विशिष्ट सवलतींचे, व विशेष मेहेरबानींचे तुकडे टाकून त्यांचीं तोंडें बंद करून राज्यकारभाराची "ढकलगाडी" पुढें नेण्यांत येत होती. सर्व राज्यभर अफगाण लोकांचा विशेष भरणा होऊन ते बलिष्ट व शिरजोर झाल्यामुळें, दरबारांत इतर सर्व लोक उभे राहिलेले असतांनाही अफगाण सरदारांनांच मात्र खालीं बसण्याची सवलत देण्यांत आली होती; आणि ती दिल्याशिवाय बहिलोल यास गत्यंतरच नव्हतें. त्यामुळें साम व दाम या प्रकारांनीं अफगाण लोकांचा, व दंड आणि भेद या प्रकारांनीं आपल्या बाह्यशत्रूंचा त्यानें बंदोबस्त केला; व सतत अडतीस वर्षें राज्य करून तो इ० सन १४८८ मध्यें मृत्यु पावला. त्यास एकंदर नऊ मुलगे होते; त्यांपैकीं निजामखान-शिकंदर-हा हिंदू आई पासून झालेला मुलगा होता. बहिलोल यानें एका सोनाराच्या लावण्यसंपन्न मुलीशीं लग्न केलें होतें; व तिच्यापासून त्याला हा मुलगा झालेला असून त्या उभयतांवरही त्याचें अतिशय प्रेम होतें; त्यामुळें आपल्या वडील नातवाचा हक्क बाजूस सारून त्यानें आपल्या या मुलासच आपल्यामागें राज्य मिळावें असें ठरविलें होतें. त्याप्रमाणें, अधिकार प्राप्तिकरितां कांहीं काळ युद्ध-कलह होऊन अखेरीस निजामखान गादीवर आला; व शिकंदर हें नांव धारण करून तो राज्य करूं लागला. हा राज्यकर्ता मोठा शूर, न्यायी, दयाळू व परोपकारी होता. त्यानें बुंदेलखंड व उत्तर माळवा प्रांतावर अनेक मोहिमा करून धोलपूर, चंदेरी, ग्वाल्हेर वगैरे हिंदू राज्यें नष्ट केलीं. बहार प्रांत जिंकिला, आणि आपल्या राज्याचा उत्तर हिंदुस्थानभर विस्तार करून राज्यांत पुष्कळच प्रमाणानें शांतता स्थापन केली. लोकांच्या संरक्षणाकरितां स्वतंत्र व्यवस्था करून घोड्याचें टपाल सुरूं केलें व नवे रस्ते बांधून दळणवळणाचीं साधनें तयार केलीं. शिवाय तो स्वत विद्वान्, कवि व कायदेपंडित असून न्याय देण्यांत तर त्याचें चातुर्य अतिशय विलक्षण होतें; तथापि तो मोठा धर्माभिमानी, व दुराग्रही होता. त्याचा जन्म हिंदू आईपासून झाला असूनसुद्धां हिंदू धर्माचा त्याच्यावर कोणत्याही प्रकारें यत्किंचितही इष्ट परिणाम न होतां, उलट हिंदुधर्म व हिंदू लोक यांच्यावर त्याचा विशेष कटाक्ष होता. त्यानें हिंदूंच्या अनेक देवालयांचा विध्वंस करून त्यांच्या जागीं मशीदी बांधिल्या. त्यांच्या यात्रा बंद करून, सण पर्वणीच्या दिवशीं नदी तीर्थांच्या पवित्र ठिकाणीं स्नानें करण्याची त्यानें मनाई केली, आणि खुद्द

त्याच्याच जातीच्या व धर्माच्या मुसलमानसाधूंनीं त्याच्या या दुष्ट व द्वेशी कृत्याबद्दल जरी त्याचा निषेध केला तरी त्यानें त्यासंबंधीं कोणतीही गोष्ट विचारांत न घेतां, हाच हुकूम कायम ठेविला.

धर्माच्या बाबतींत सुलतान शिकंदर हा किती आग्रही व कोत्या मनाचा होता हें पुढील गोष्टीवरूनच आपोआप सिद्ध होतें; ती गोष्ट अशी कीं:—लखनौ शहराजवळ एके गांवीं बुद्ध, ऊर्फ बुद्धन या नांवाचा एक ब्राह्मण रहात असे; तो मोठा धर्माभिमानी व कर्मठ होता. एके दिवशीं एका मुसलमानानें त्याच्या तोंडावर हिंदुधर्माची अतिशय निंदा केली; तेव्हां त्या ब्राह्मणानें त्यास शांतपणानें उत्तर दिलें कीं "बाबारे, धर्म तेथून सगळे सारखे; कोणीही मनुष्य आपल्या धर्माप्रमाणें चालला ह्मणजे देव त्याला पावतो;" त्या मुसलमानास ब्राह्मणाचें हें ह्मणणें मान्य व सहन झालें नाहीं. परंतु ब्राह्मणानें आपलें म्हणणें उत्तम रीतीनें सिद्ध करून दाखविल्यामुळें त्यास पुढें कांहींही बोलतां आलें नाहीं; तथापि त्या गोष्टीचा अतिशय गवगवा होऊन लखनौ शहरांत पुष्कळ काजी जमून त्यांनीं या बाबतीसंबंधीं वादविवाद केला, परंतु त्यांचीं मतें भिन्न भिन्न पडूं लागलीं; तेव्हां तेथील सुभेदारानें ती सर्व मंडळी बादशहाची स्वारी संभेळ मुक्कामीं होती, त्याठिकाणीं पाठविली. त्याठिकाणीं शिकंदरनें एक मोठा दरबार भरविला, व नऊ विद्वान् मौलवी कडून त्याच्याशीं पुष्कळ वाद करविला; तथापि तो ब्राह्मण आपलें ह्मणणें कांहीं केल्या सोडिना; तेव्हां "तूं मुसलमान हो नाहीं तर तुला ठार मारितों" असें त्यास बजाविण्यांत आलें; परंतु त्या ब्राह्मणानें, मरण्यास तयार होऊन, मुसलमान होण्याचें नाकारिलें; तेव्हां शिकंदरनें त्याचा लागलाच शिरच्छेद करून टाकविला. हा राज्यकर्ता हिंदू आईपासून झालेला असून—आणि तो स्वतः अतिशय न्यायी, दयाळू, शहाणा, विद्वान्, परोपकारी, प्रजाहितेच्छु, कवि व कायदेपंडित असूनसुद्धां धार्मिक सहिष्णुत्व त्याच्या ठायीं बिलकूल वसत नव्हतें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

तथापि हा बादशहा अतिशय न्यायी, व न्यायकुशल असून त्याच्या न्यायचातुर्याच्या अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत; त्यांपैकीं, एक गोष्ट अशी आहे कीं, एकदां दोघे

---

टीप १:—संभळ हें शहर, शहाजहान बादशहाचा मुलगा शहाजादा मुरादबक्ष याच्या नांवानें इ० सन १६२५ मध्यें रस्तुमखान यानें वसविलेल्या प्रसिद्ध मुरादाबाद या शहरापासून, अलीगड रस्त्यावर तेथून तेवीस मैलांवर व सोत नदीच्या पश्चिमेस चार मैलांवर आहे. याठिकाणीं उत्तम साखर तयार करण्यांत येत असून जुन्या शहराचे अवशेष आजतागायत तेथें दृष्टोत्पत्तीस येत आहेत.

भाऊ शिपाईगिरीच्या नोकरीवर देशांतरास गेले होते. तिकडे एका किल्याच्या वेढ्यांतील लुटींत त्या दोघांना भिन्न भिन्न आकाराचा एक एक हिरा मिळाला. पुढें त्या उभयतां भावांपैकीं, एक जण परत दिल्ली येथें येण्यास निघाला, तेव्हां दुसऱ्या भावानें आपला हिरा त्याच्याजवळ देऊन, " हा तूं आपल्या बरोबर नेऊन घरीं माझ्या बायकोजवळ दे, " असें सांगितलें. पुढें लढाई संपल्यावर दुसरा भाऊ घरीं आल्यावर आपल्या बायकोजवळ हिऱ्या संबंधीं तपास करूं लागला; परंतु तिला या संबंधीं कांहींच माहीत नसल्यामुळें, तिनें मीं तो हिरा नुसता डोळ्यानीं पाहिला सुद्धां नाहीं, असें सांगितलें; तेव्हां त्यानें यासंबंधीं आपल्या भावास विचारिलें; परंतु त्यानें शपथ वाहून, मीं हिरा तुझ्या बायकोस दिला, असें सांगून त्याबद्दल साक्षीदारही त्याच्या पुढें आणून उभे केले, व त्यांनींही, हिरा तिला दिल्याचें सांगितलें. अखेर हा कज्जा न्यायाधीशाकडे गेला; व त्यानेंही साक्षीपुरावा घेऊन त्या बायकोस लबाड ठरवून तो हिरा तूं आपल्या नवऱ्यास दिला पाहिजेस, असा हुकूम केला. तेव्हां ती बाई लाचार होऊन शिकंदर बादशहाकडे गेली. व त्याला सर्व हकीकत सांगून न्याय देण्यबद्दल विनंति केली. तेव्हां त्यानें त्या उभयतां भावांस व साक्षीदारांस बोलावून आणवून स्वतः विचारपूस केली. त्यांत साक्षीदारांना विचारितां, विचारितां, त्यांनीं, त्या हिऱ्याचा आकार हल्लींसुद्धां आह्मांस डोळयापुढें दिसत आहे, असें सांगितलें. तेव्हां त्यानें त्यावर कांहींही न विचारितां त्या सगळ्यांना निरनिराळया ठिकाणीं नेऊन बसविलें; आणि प्रत्येकाच्या हातांत थोडें थोडें मेण देऊन, " जो हिरा इतका पूर्णपणें तुह्माला हल्लींसुद्धां डोळ्यापुढें दिसत असल्याचें तुह्मीं सांगितलें त्याच्या आकाराप्रमाणें ह्या मेणाचा आकार करून मला दाखवा" असें त्यांना सांगितलें. त्याप्रमाणें त्या सर्वांनीं आपआपल्या आकृति तयार केल्यावर त्या परस्पर ताडून पाहतां दोघां भावांच्या मेणाची आकृति सारखी मिळाली; परंतु बाकी सर्वांनीं केलेल्या आकृति निरनिराळ्या असल्याचें निदर्शनास आलें; त्यावरून बादशहानें लागलेंच अनुमान काढिलें कीं, तो हिरा दोघां भावांखेरीज तिसऱ्या कोणींही मनुष्यानें पाहिलेला नाहीं. बायको निरपराधी आहे, व साक्षीदार बनावट आहेत; तेव्हां लागलेंच जरब भरून दंडनीतीचें अवलंबन करितांच, बादशहाचें अनुमान तंतोतंत खरें होतें, असें निदर्शनास आलें, व गुन्हेगार भावानें बादशहा समोर हिरा रुजू करून तो दुसऱ्या भावास परत देण्यांत आला. या गोष्टीवरून ह्या बादशहाचें न्यायचातुर्य कितीं अलौकिक होतें, याची सहज कल्पना करितां येते.

हा बादशहा दिल्ली येथें न राहतां आग्रा येथें रहात असे; दिल्ली सोडून आग्रा येथें जाऊन राहणारा हाच पहिला सुलतान असून याच्याच कारकीर्दींत उत्तर

हिंदुस्थानांत एक भयंकर धरणीकंप होऊन ( ता० ५ जुलई १५०५ ) आग्रा व इतर पुष्कळ शहरांचा व जीवांचा अतिशय नाश झाला. आग्रा शहरापासून जवळच शिकंद्रा ह्मणून एक गांव आहे, ( या ठिकाणीं अकबराची सुंदर कबर आहे. ) तें गांव शिकंदर लोदी यानें वसविलें असून तेथें एक भव्य बारदारी त्यानें बांधिलेली अद्याप अस्तित्वांत आहे. एकंदरींत पाहतां शिकंदर बादशहा हा धार्मिक बाबत सोडून दिल्यास विशेष चांगला बादशाहा होऊन गेला, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या बादशहानें शांतपणानें व दक्षतेनें अडतीस वर्षें राज्यकारभार करून तो इ० सन १५१७ मध्यें मृत्यु पावला व त्याचा मुलगा इब्राहिम हा गादीवर आला. त्यानें गादीवर आल्याबरोबर अफगाण सरदारांचें दरबारांत माजलेलें प्रस्थ मोडून टाकण्याचा प्रयत्न केला, आणि कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करितां, दरबारांत, अफगाण लोकांप्रमाणेंच इतर लोकांनाही मान मिळावा, ह्मणून त्यानें हुकूम फर्माविला; परंतु त्यामुळें अफगाण लोक चिडले गेले, आणि त्याच्या विरुद्ध बंडें होण्यास सुरवात झाली; त्यांत इब्राहिमचा भाऊ जलालखान हा सामील झाला, व त्यानें जोनपूर येथें स्वतंत्र राज्य स्थापन केलें; परंतु इब्राहिम यानें त्याच्याशीं युद्ध करून त्यास ठार मारिलें; तेव्हां जलालखानाचा स्नेही व कुरा प्रांताचा सुभेदार इस्माईलखान हा इब्राहिमशीं युद्ध करण्यास आला, परंतु त्याचाही इब्राहिम यानें पराभव करून टाकिला; तथापि त्याच्या विरुद्ध चोहोंकडे कारस्थानें सुरू होण्यास प्रारंभ झाला होता. त्यानें आपल्या जलालखान या एका भावाचा त्याच्याशीं युद्ध करून निकाल उडविला होता, पण त्याचा दुसरा भाऊ अल्लाउद्दीन हा त्याच्यावर नाराज होऊन काबूलचा राजा बाबर याच्या आश्रयास जाऊन राहिला होता; व त्यानें बाबर यास घरभेदीपणा करून दिल्ली येथील राज्याची खरी स्थिति निवेदन करून इब्राहिम विरुद्ध कारस्थान उभारिलें होतें. बहार प्रांताचा सुभेदार बहादूरखान हा स्वतंत्र होऊन इब्राहिमशीं सारखा युद्ध प्रसंग करीत होता, व त्यानें बादशाही सैन्याचा कित्येक वेळां पराभवही केला होता; आणि पूर्वीं इब्राहिमचा दोस्त असलेला पंजाबचा सुभेदार दौलतखान लोदी याच्याशीं यावेळीं इब्राहिमचें वैर असल्यामुळें त्यानें बाबरशीं पत्रव्यवहार करून त्यास हिंदुस्थानावर स्वारी करण्यास प्रोत्साहन दिलें होतें; त्याप्रमाणें बाबर यानें हिंदुस्थानावर पांचव्यानें स्वारी करून प्रसिद्ध पानिपतच्या प्राचीन रणभूमीवर इब्राहिमचा पराभव करून व त्यास ठार मारून, ( ता० २१ एप्रील इ० सन १५२६ ) हिंदुस्थानांत दिल्ली येथें भावी बलाढ्य व वैभवसंपन्न मोंगल राष्ट्राची स्थापना केली. दिल्ली येथील मशीदींत ता० २७ एप्रील रोजीं बादशहा बाबर याच्या नांवानें खुत्बा वाचण्यांत नेऊन या

वेळेपासून हिंदुस्थानांत नवें राजकीय मन्वंतर सुरू झालें आणि औरंगझेबच्या काळाच्या अखेरीपर्यंत या प्रचंड बादशाहाचा हिंदुस्थानभर जयजयकार होत राहिला.

गझनीच्या महंमुदापासून—म्हणजे इ० सन १००१ मध्यें त्यानें हिंदुस्थानावर केलेल्या पहिल्या स्वारीपासून, इ० सन १५२६ मध्यें लोदी घराण्याचा शेवट होईपर्यंत जो पांचशें पंचवीस वर्षांचा काळ गेला, त्यापैकीं पहिल्या दोनशें वर्षांमध्यें हिंदुस्थानांत स्थाईक होऊन आपलें राज्यस्थापन करण्याकडे मुसलमानांचें लक्ष्य वेधलें नसून पंजाबाच्या अलीकडे त्यांचा अंमल कायमचा स्थापन झाला नव्हता असें म्हणण्यास हरकत नाहीं; तथापि, घोरी घराण्याच्या काळापासून ही स्थिति पालटली; व या वंशानेंच प्रथमतःहिंदुस्थानांत राज्य स्थापन करून गुलाम वंशाच्या अखेरीच्या काळापर्यंत मुसलमानांनीं नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेशांत आपली सत्ता स्थिर व कायम केली, आणि अल्लाउद्दीन खिलजीच्या कारकीर्दींत कृष्णा नदीच्या दक्षिणेकडील प्रदेशाशिवाय बहुतेक हिंदुस्थान मुसलमानांच्या ताब्यांत गेलें. त्यावेळेपासून महंमद तवलखापर्यंत मुसलमानांची सत्ता विभागलेली नव्हती. परंतु महंमुदाच्या कारकीर्दीपासून स्वतंत्र मुसलमानी राज्यें स्थापन होण्यास प्रारंभ होऊन सत्तेची ठिकठिकाणीं विभागणी झाली. आणि फिरोजच्या मृत्युनंतर जी अंदाधुंदी माजली त्यांत तैमूरच्या स्वारीची भर पडून, व त्यानंतर—सारखे युद्धकलह व बंडें सुरू राहून, अखेरीस लोदी वंश नष्ट करून बाबर यानें मोंगल राष्ट्र स्थापन केलें. या काळापर्यंतच्या स्थितीचा, गोपटेकृत इतिहासांत लिहिल्याप्रमाणें, थोडक्यांत सामान्य विचार करावयाचा म्हणजे अल्लाउद्दीनापासून पुढें दोनशें वर्षांचा काळ महत्वाचा आहे. ह्या काळांत उत्तर हिंदुस्थानांत रजपूत व मुसलमान ह्यांचे झगडे अव्याहत चालू होते; तसेंच दक्षिणेंत बहामनी राज्याचे विजयानगरच्या हिंदू राजाशीं झगडे सुरू होते; त्यामुळें मुसलमान राज्यकर्त्यांना आपल्या प्रजेचें हिताहित पाहण्यास फारसा अवकाश मिळाला नाहीं. मुसलमानांनीं आपल्या राज्यांत आपले कायदे व आचारविचार सुरू केले, तथापि हिंदू धर्मावर त्यांचा म्हणण्यासारखा परिणाम झाला नाहीं. त्यावेळच्या मुसलमानीराज्यांत पुष्कळ हिंदू लोकांस जागा मिळत असत, व जमाबंदी व हिशोबी खात्यांत त्यांना मोठ्या हुद्याच्या कामावर नेमीत असत. त्याकाळांत कलाकौशल्य विशेष भरभराटींत नव्हतें. सरकारच्या उपयोगाकरितां घोड्यावरून व पायचालीनें टपालाची व्यवस्था ठेविलेली असे. फारशी व अरबी भाषा शिकविण्याच्या पाठशाळा असत; ह्या पलीकडे लोकशिक्षणाकडे राज्यकर्त्यांनीं मुळींच लक्ष दिलें नाहीं." तथापि राजाश्रय नसूनसुद्धां या काळांत हिंदू लोकांनीं संस्कृत व निरनिराळ्या प्राकृत भाषांमध्यें अनेक ग्रंथ निर्माण करून हिंदू संस्कृतीचा, व वाङमयाचा अतिशय उत्कर्ष केला ही गोष्ट

लक्षांत ठेवण्यासारखी आहे. "प्रांताच्या सुभेदारांचें वर्तन अरेरावीपणाचें व अनियंत्रित असे. देशांतील व्यापार बहुतेक हिंदूंच्याच ताब्यांत होता. राज्याचा विस्तार होणें, व लवकरच त्याचा लय होणें ह्या दोन प्रकारांची आवृत्ति वारंवार झालेली दिसून येते.¹ अल्लाउद्दीनाचें विस्तृत राज्य महंमूद तघलखाच्या वेळेस विस्कळीत झालें. इ० सन १३४७ त दक्षिणेंत बहामनी राज्याची स्थापना झाली; व पुढें हळु हळु काश्मीर, सिंध, बंगाल, गुजराथ, माळवा, खानदेश इत्यादि ठिकाणीं स्वतंत्र मुसलमानी राज्यें स्थापन झालीं. तीं पुन्हां एकछत्री अंमलाखालीं आणण्याचें काम पुढें मोंगल वंशांतील पराक्रमी बादशहा अकबर ह्यानें केलें. त्याच क्रमाची आवृत्ति पुढें औरंगझेब बादशहाच्या मृत्युनंतर होऊन नवीन राज्यें अस्तित्वांत आलीं. राज्यक्रांत्या, लढाया, कत्तली इत्यादिकांचा संपर्क राजधानी अगर दुसरीं मोठालीं शहरें यापलीकडे आंतल्या प्रदेशास फारसा पोंचत नसे. एकंदर देशांतील सामान्य जनसमूह, राज्यावर कोण आला व कोण गेला याची पर्वा न करितां आपापल्या व्यवसायांत सदा निमग्न असे. कालांतरानें हिंदु व मुसलमान हे दोघेही स्नेहभावानें एके ठिकाणीं राहूं लागले, व एकमेकांची जरूर एकमेकांस भासूं लागली.. खेड्यापाड्यांतून गांवपंचाइतीची पद्धत चालू होती," आणि तिचीं पाळेंमुळें अतिशय खोल गेलेलीं असून प्रत्येक गांव सरकारचें देणें दिल्यावर आपापल्यापरीनें अगदीं स्वतंत्र होता.

तथापि जगाच्या इतिहासांत ह्या वरील पांचशें वर्षांचें महत्व मोठें आहे. ख्रिस्ती व मुसलमान या दोन धर्मांच्या लोकांमध्यें आशियामायनर प्रांतांत अनेक भयंकर युद्धें होऊन, आशिया व युरोप या दोन खंडांची एकमेकांस ओळख झाली. व्यापारास चलन मिळून पूर्वेकडील माल युरोपांत जाऊं लागला. मुसलमानांनीं रोमन बादशाहीचा विध्वंस

---

टीप १:-" Gibbon sums up the history of Asiatic dynasties as one unceasing round of valour, greatness, discord and decay."

—LANE-POOLE.

गिबन म्हणतोः—"आशियांतील राजवंशाचा इतिहास थोडक्यांत सांगावयाचा म्हणजे, एखाद्या घराण्यानें स्वपराक्रमानें श्रेष्ठपदास चढणें, पुढें आपसांत कलह होऊन त्यास उतरती कळा लागणें, व शेवटीं त्याचा नाश होणें, अशा घडामोडींचें तें अव्याहत फिरत राहणारें चक्र आहे.

—लेन-पूल.

करून युरोपांत आपलें राज्य स्थापन केल्यानंतर पाऊणशें वर्षांनीं बाबर यानें हिंदुस्थानांत प्रवेश केला. त्यापूर्वीं थोडे दिवस पोर्तुगीज लोक प्रथमतः हिंदुस्थानांत आले. तसेंच युरोपांतील अनेक प्रवासी लोक इकडे येऊन इकडची हकीकत तिकडे नेऊं लागले. अशा प्रकारचीं प्रवासवृत्तें आज उपलब्ध असून तीं फारच मनोरंजक आहेत.

"वरील पांचशें वर्षांत युरोपांतील लोक अज्ञानांधकारांतून जागे होऊन ज्ञानार्जनानें सुसंस्कृत होऊं लागले. छापण्याची कला त्यांस सांपडली. तसेंच नौकानयन शास्त्रांत त्यांची प्रगति होऊन पूर्वीं त्यांस माहीत नसलेले नवीन प्रदेश शोधून काढून त्या ठिकाणीं त्यांनीं आपली सत्ता स्थापिली, व क्रमाक्रमानें आपली सुधारणा केली. ह्याचा परिणाम कालांतरानें असा झाला कीं, युरोपियन लोकांस इतर लोकांवर प्रभुत्व मिळालें परंतु हिंदु लोक मात्र कालचक्राच्या फेऱ्यांत सांपडल्यामुळें आपल्या स्वातंत्र्यास बहुतेक मुकले." आणि आजतागायत त्याच स्थितींत ते अस्तित्वांत राहिलेले आहेत.

बादशहा बाबर यानें हिंदुस्थानांत इ० सन १५२६ मध्यें आपलें मोंगली राज्य स्थापन केलें; आणि याच वेळेपासून हिंदुस्थानचा पूर्वींचा इतिहासक्रम बदलला जाऊन पूर्णपणें नवें मन्वंतर सुरू झालें; हुमायूनानंतर अकबर, जहांगीर व शहाजहान यांनीं त्या राज्याची वृद्धि करून व तें मोंगल साम्राज्य बनवून त्याची सर्व जगांतील एक वैभव संपन्न साम्राज्य ह्मणून दिगंत कीर्ति पसराविली व या मोंगल साम्राज्याच्या काळांत सर्व जगांत त्याच्या तोडीचें दुसरें एकही वैभवसंपन्न साम्राज्य नव्हतें इतक्या परमावधी पर्यंत त्या साम्राज्याचा उत्कर्ष झाला.

# परिच्छेद दुसरा.

## हिंदुस्थानातील मोंगल साम्राज्य.

जहिरुद्दीन महंमद बाबर हा तैमूरलंगाचा सहावा वंशज असून आईकडून तो चंगीझखानाच्या वंशांतील होता. तैमूरनंतर त्याचा मुलगा शहारूखमिर्झा व त्यानंतर त्याचा विद्वान् मुलगा उलूघबेग हा गादीवर आला; परंतु त्याचा मुलगा अबदुल्लतीफ यानें त्यास ठार मारून राज्यपद बळकविलें; तथापि दोन वर्षांतच तो पदभ्रष्ट होऊन अबदुल्ल मिर्झा व त्याच्यानंतर अबूसईदमिर्झा हा गादीवर आला. हाच बाबर याचा आजा होय. त्याला एकंदर अकरा मुलगे होते. त्यांपैकीं त्याचा चौथा मुलगा उमर शेखमिर्झा हा बाबर याचा बाप होय. अबूसईद याच्या मृत्युनंतर त्याचें विस्तृत राज्य त्याच्या सर्व मुलांनीं वाटून घेतलें. त्यांत बाबरच्या बापास पहिल्यानें काबूलचें राज्य मिळालें होतें; परंतु तें त्याच्याकडून जाऊन त्यास सिरदार्या नदीच्या उगमापाशीं कवि व विद्वज्जन यांचें माहेरघर ह्मणून प्रसिद्ध असलेल्या फरगाना ऊर्फ खोकंद व अंदिजान, या संयुक्तप्रांताचें राज्य मिळालें, व त्याचा एक भाऊ उलूघबेग यास काबूलचें व सर्वांत वडील भाऊ अहंमदमिर्झा यास, व तो इ० सन १४९४ मध्यें मृत्यु पावल्यावर दुसरा भाऊ महंमदमिर्झा यास समर्कंदचें राज्य मिळालें. बाबरच्या आईचें नांव कुतुकल-निगार-खानम् असें असून ती यूनसखान या नांवाच्या एका सरदाराची मुलगी व महंमूदखान या सरदाराची बहीण होती. हीं दोन्हीं अपत्यें यूनसखानास ईसान दौलत बेगम या बाईपासून झालेलीं होतीं; व ही बाबरची आजी त्याच्याच जवळ पुढें रहात होती. चंगीझचा झगताईखान या नांवाचा एक मुलगा होता. त्याचा यूनजखान हा वंशज असल्यानें बाबर हा आईकडून चंगीझचा वंशज होता. बाबर हा अंदिजान येथें इ० सन १४८३ मध्यें (ता० १४ फेब्रुआरी) जन्मास आला; या समारंभास त्याचा सत्तर वर्षांचा वृद्ध आजा यूनसखान हाही मुद्दाम आलेला होता. त्यास "जहिरुद्दीनमहंमद" हें अरबी नांव नीट उच्चारतां येईना ह्मणून त्यानें त्यास "बाबर" हें नांव दिलें, व त्याच नांवानें त्यावेळेपासून त्यास ओळखण्यांत येतें. बाबरचा बाप उमरशेखमिर्झा हा विद्वान् असून तो विद्वानांचा व कवींचा आश्रयदाता होता. तो ता० ९ जून सन १४९४ या दिवशीं (सोमवार, ता० ४ रमझान हिजरी सन ८९० ) अंदिजान येथें कबूतराकरितां बांधिलेल्या

घरावरून अकस्मात् धाडदिशीं खालीं पडून मृत्यु पावला; व बाबर हा त्याच्या जागीं राज्यपदावर आला, यावेळीं त्याचें वय बारा वर्षांचें होतें, व त्याची हुषार व कर्तृत्ववान् आई व आजी यांच्या शिक्षणानें तो तयार व तरबेज झाला होता; इतक्या लहान वयांत बाबर राज्याचा अधिकारी झाल्यावर त्याचें राज्य बळकाविण्याकरितां त्याचा समर्कंद् येथील चुलता महंमदमिर्झा यानें त्याच्यावर स्वारी केली; परंतु अंदिजानवर येतांना मार्गांत एक नदी लागते; तीवरील पूल, महंमदचे लोक त्याच्यावरून पलीकडे जात असतां अकस्मात् कोसळल्यामुळें हा अपशकून समजून तो माघारां परतला; व तितक्यांतच एक भयंकर सांथ उद्भवून त्याचे पुष्कळ घोडेही मृत्युमुखीं पडले. तेव्हां नाइलाजानें त्यानें बाबरशीं सख्य करून तो समर्कंद येथें परत गेला; व लवकरच मृत्यु पावला. ( इ० सन १४९५ ) त्याचा दुसरा भाऊ महंमूद हा गादीवर आला; तेव्हां समर्कंदचें राज्य आपल्या हस्तगत करून घेण्याकरितां बाबरनें तिकडे स्वारी केली, व समर्कंद् हस्तगत करून घेऊन त्यानें तेथें आपणास राज्याभिषेक करवून घेतला; परंतु तें शहर हस्तगत झाल्यावर त्यानें आपल्या सैन्यास व सरदारांना त्या

---

टीप १:—अशाच रीतीनें त्याचा नातू हुमायून हा तोल जाऊन गच्चीवरून खालीं पडून मृत्यु पावला. हा चमत्कारिक योगायोग लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे.

बाबरचा बाप उमरशेखमिर्झा हा त्याच्याच राज्यांतील अंदिजानप्रमाणेंच असलेल्या दुसऱ्या मोठ्या अक्शी या गांवीं डोंगरावरून घसरून मृत्यु पावला, असाही उल्लेख आढळतो; व तो खरा मानिल्यास त्याचा चौथा वंशज जहांगीर याच्या मृत्युचा चमत्कारिक योगायोग डोळ्यापुढें उभा राहतो. तो असा कीः-जहांगीर हा काश्मीर मधून परत येत असतां अनेक विवंचना व आजारीपणा यांमुळें व्यग्रचित्त झालेला होता. अशा स्थितींत मनाच्या करमणुकीकरितां त्यास शिकार करण्याची इच्छा होऊन तो एका डोंगराच्या पायथ्याशीं शिकारी करण्यांत गर्क झाला. इतक्यांत त्याच्या मंडळींपैकीं एक शिकारी डोंगरावरून खालीं घसरून त्याच्या समोर धाडकन् आपटून तात्काळ मृत्यु पावला; परंतु या क्षुल्लक गोष्टीचा जहांगीरच्या दुर्बल मनावर विलक्षण परिणाम होऊन गेला. " प्रत्यक्ष मृत्युच त्या मनुष्याच्या रूपानें मला नेण्यासाठीं आला " असें त्याच्या मनानें घेतलें, आणि त्या धास्तींतच संगत जाऊन, दमा व खोकला अतिशय वाढत जाऊन तो मार्गांतच ता० २८ आक्टोबर इ० सन १६२७ रोजीं मृत्यु पावला, आणि सहाव्या दिवशीं त्याचें शव लाहोर येथें येऊन पोहोंचलें.

शहरांत लूटालूट करण्याची परवानगी दिली नाहीं; ह्मणून त्याचें पुष्कळ सरदार व सैन्य नाखूष होऊन त्यास सोडून गेलें. अशाच स्थितींत तोही अतिशय आजारी पडला, व एकदां तर त्याची वाचाही बंद झाली होती. ही संधी साधून त्याचा भाऊ जहांगीरमिर्झा यानें अंदिजानवर चाल केली; तेव्हां बाबर थोडासा बरा झाल्यावर लागलाच समर्कंद सोडून तिकडे जाण्यास निघाला; इतक्यांत इकडे जहांगीर यानें बाबरच्या सैन्यास वश करून घेऊन व बाबर मेला अशी खोटी कंडी पिकवून त्याचें राज्य हस्तगत करून घेतलें; त्यामुळें समर्कंदचें राज्यही हातचें गेलें, व फरगाण प्रांताचें राज्यही हातचें गेलें, अशी स्थिति होऊन बाबर यास वनवास भोगणें प्राप्त झालें. अशा स्थितींत, तो आपल्या आत्मचरित्रांत ह्मणतो, "माझा धीर सर्वस्वीं खचून गेला; माझी सर्व बाजूनें निराशा झाली; आणि मी एकसारखा रडूं लागलों." अशा संकटप्रद स्थितींत त्याची थोर, व मार्गदर्शक माता आणि त्याची आजी त्याला खोकंद येथें येऊन भेटल्या व त्यांनीं बाबरमध्यें नवजीवन उत्पन्न केलें; आणि त्यानें सैन्य जमवून अंदिजान व अक्शी हीं दोन्हीं शहरें पुन्हां जहांगीरकडून आपल्या हस्तगत करून घेतलीं. ( जून इ० सन १४९९ ) परंतु पुन्हा लवकरच त्याचा भाऊ जहांगीर हा त्यास्यावर चाल करून आला, तेव्हां बाबर यानें त्यास अक्शी हें ठिकाण परत देऊन त्याच्याशीं सख्य केलें; ( इ० सन १५०० ) व उभयतांनीं समर्कंदचें राज्य मिळवावें, बाबरनें तेथें राज्य करावें, व फरगाना प्रांत जहांगीर यास बाबरनें द्यावा, असें ठरून बाबर आपल्या भावासह तिकडे जाण्याच्या उद्योगास लागला. इतक्यांत त्यास तिकडील बोलावणेंही मिळालें तेव्हां तो आपल्या भावासह पुन्हां तिकडे जाण्यास निघाला; ( जून इ० सन १५०० ) व त्यानें समर्कंद येथें पोहोंचून एक दिवस अचानक आपला सर्वांचा शहरांत प्रवेश करून घेतला; परंतु चंगीझचा नातू शयबान याचा वंशज शयबानखान यानें बाबरचा पराभव करून त्यास आपला जीव घेऊन पळून जाणें भाग पाडिलें. तेव्हां तो आपल्या आईआजीसह ताशकंद येथें आपल्या मामाच्या आश्रयास येऊन राहिला, परंतु तेंही शहर शयबानीखानानें हस्तगत केल्यानंतर तो आपल्या भावासह पुन्हा अक्शी येथील युद्धांत पराभूत होऊन पूर्वीप्रमाणें अतिशय निराश झाला व भावी चरित्र क्रमाचे निरनिराळे विचार त्याच्या मनांत घोळूं लागले. इक्यांत काबूल येथील घोटाळा त्याच्या कानावर आला. त्याचा काका उलूघबेग हा इ० सन १५०१ मध्यें मृत्यु पावल्यावर त्याचा अल्पवयी मुलगा गादीवर आला. ही संधी साधून त्याच्या प्रधानानें सर्व राज्यकारभार बळकाविला; परंतु लवकरच तो अप्रिय होऊन मारला गेला, व राज्यभर अंदाधुंदी माजली. ही हकीकत बाबर यास कळल्यावर त्यानें तावडतोब सैन्य जमवून काबूलवर

स्वारी केली, आणि तें राज्य इराणी लोकांच्या मदतीनें त्यानें आपल्या हस्तगत करून घेतलें. ( इ० सन १५०४ आक्टोबर ) व नंतर लवकरच त्यानें गज्नी शहरही आपल्या ताब्यांत घेतलें. याच वेळेच्या सुमारास त्याची आई व आजी मृत्यु पावल्या. या उभयतांही स्त्रिया मोठ्या अलौकिक कर्तृत्वाच्या व योग्यतेच्या असून त्यांच्याच उपदेशानें बाबर यास महत्पद प्राप्त झालें होतें; आणि छत्रपति शिवाजीची आई जिजाबाई हिच्या प्रमाणेंच या उभयतां थोर स्त्रिया बाबर याचा उत्कर्ष करण्यास कारणीभूत झाल्या होत्या. त्यांनीं स्वतः बाबरबरोबर अतिशय वनवास भोगिले होते; अतिशय कष्ट सोशिले होते, परंतु त्यांनीं आपली उदात्त व प्रशंसनीय सहनशीलता, व धैर्य कायम ठेऊन आपत्तीच्या प्रसंगीं बाबर यास, हिंमत व उत्तेजन देऊन, व त्यास आपली हताशवृत्ति टाकून देऊन आपलें अंगिकृत कार्य काटकपणानें करीत राहण्यास उद्युक्त करून, त्याला भावी श्रेष्ठपणा प्राप्त होण्यास त्या उभयतांच प्रमुखत्वानें कारणीभूत झाल्या होत्या. बाबर आपल्या आईला व आजीला अतिशय मान देत असे, पूज्य समजत असे; व त्यांची योग्यताही तो पूर्णपणें जाणीत असे. त्यानें आपल्या "वाकियाती बाबरी" या नांवाच्या आत्मचरित्रांत आपल्या आई व आजीविषयीं उल्लेख केलेला आहे. तो म्हणतो, "माझी आई बहुतेक स्वाऱ्यांत व युद्धांत माझ्याबरोबर येत असे;" आणि आपल्या आजीविषयीं तो म्हणतो कीं :—"माझ्या आजीइतकें शहाणपण व अक्कल इतर स्त्रियांत क्वचितूच आढळेल; ती मोठी धोरणी असून पुढें काय घडून येईल याचें ती सहज अनुमान करीत असे. तिच्याच प्रोत्साहनामुळें मीं अनेक मोठमोठीं कामें हातीं घेतलीं." त्याप्रमाणेंच ही स्त्री किती पाणीदार, शूर व धाडशी होती, याचाहि त्यानें उल्लेख केला आहे. तो म्हणतोः—एकदां माझा आजा यूनसखान यास व माझी आजी इसानदौलतबेगम हिला, माझ्या आजाचा शत्रु जमालखान यानें पकडलें; आणि माझ्या आजीला एका सरदाराच्या हवालीं केलें. पुढें तो सरदार तिच्याकडे आल्याबरोबर तिनें खोलीचें दार बंद करून घेतलें, व आपल्या बाया मंडळींकडून त्याचा जागच्याजागीं खून करविला. ही हकीकत जमालखानास कळल्यावर त्याला तिचा अतिशय राग आला, आणि त्यानें तिला असें करण्याचें कारण काय म्हणून विचारिलें. त्याबरोबर त्या बाईनें त्याला ताडकन् उत्तर दिलें कीं, "मी यूसनखानाची बायको असतां तूं मला दुसऱ्यालाच देऊन टाकिलेंस, म्हणून मीं त्याचा प्राण घेतला; तुझी इच्छा असेल तर माझा जीव घे; मी तयार आहे." भ्रष्ट विचार, पापी मन व अन्यायी कृति करणारा मनुष्य अशा उज्वल व प्रखर पातिव्रत्याच्या तेजापुढें कसा टिकाव धरणार? त्यानें त्या निर्धारी बाईचे हे खडे बोल ऐकून तिची लागलीच निमूटपणें

आपल्या नवऱ्याकडे रवानगी केली. यावरून या बाईचा करारी स्वभाव व कर्तृत्व निदर्शनास येतें; आणि तिच्याच प्रोत्साहनानें बाबरनें अनेक मोठमोठीं कामें हातीं घेऊन शेवटीं तो वैभवास चढला, हें उघड होतें.

बाबर काबूल येथें राज्य करूं लागल्यावर, लवकरच इराणचा राज्यकर्ता शहा इस्माईलसुफी यानें बाबरचा प्रतिस्पर्धी युझबेग सरदार शयबानीखान याच्याशीं युद्ध करून त्यास ठार मारिलें. तेव्हां ही संधी साधून बाबरनें पुन्हा समर्कंदवर स्वारी केली. शहाच्या मदतीनें समर्कंदचें राज्य मिळविलें, आणि पुन्हा एकदां तो सर्व मध्य आशियाचा बादशहा बनला. ( इ० सन १५११ आक्टोबर ) तथापि शयबानीखानाच्या सरदारांनीं त्याचा पुन्हा लवकरच पराजय केला, तेव्हां त्यास समर्कंद सोडणें भाग पडलें. त्यानंतर बराच त्रास भोगीत तो पुन्हा काबूल येथें परत आला, ( इ० सन १५१४ ) व हिंदुस्थानांत राज्य स्थापन करीपर्यंत तो तेथेंच राज्य करीत राहिला. समर्कंदचें राज्य मिळवून आपण तैमूरप्रमाणें सर्व मध्य आशियाचा बादशहा व्हावें, अशी बाबर याची अतिशय इच्छा होती. त्याप्रमाणें त्यानें तीन वेळां समर्कंद शहर मिळविलें, व तिन्हीही वेळां तें त्याच्या हातून नाहींसें झालें. त्यानंतर त्यानें स्वतः पुन्हा समर्कंदवर कधींही स्वारी केली नाहीं; तथापि हिंदुस्थानचें राज्य त्यास मिळाल्यावर त्यानें आपला मुलगा हुमायून याच्यामार्फत तें राज्य काबीज करण्याचा प्रयत्न केला होता; परंतु तोही निष्फळ झाल्यानंतर बाबर यानें तो नाद पूर्णपणें सोडून दिला, व हिंदुस्थानांतच मोंगल बादशाहीची स्थापना करून तो इकडेसच स्थाईक झाला.

हिंदुस्थानासारखा धनसंपन्न व समृद्ध देश, बाबर यानें इ० सन १५०४ मध्यें काबूलचें राज्य हस्तगत करून घेतलें त्या वेळेपासूनच, त्याच्या दृष्टिपथांत होता; आणि, काबूल येथें धान्यसामग्रीची हिंदुस्थानदेशासारखी समृद्धि नसल्यानें, त्यानें चार महिन्याच्या आंतच हिंदुस्थानदेशाकडे सिंधू नदीपर्यंत एक स्वारी करून व लूट मिळवून तो परत गेला होता. त्यानंतर निरनिराळ्या आपत्ति, वनवास, समर्कंद काबीज करण्याच्या अट्टाहासांत झालेली फसगत वगैरे कारणामुळें, इ० सन १५१४ मध्यें काबूल येथील राज्यावर स्थानापन्न होऊन तिकडे स्थिरस्थावर करीपर्यंत त्यास हिंदुस्थानाकडे पाहण्यास सवड सांपडली नाहीं. पुढें इ० सन १५१९ मध्यें दोन व इ० सन १५२० मध्यें एक अशा पहिल्या दोन वर्षांत त्यानें लागोपाठ हिंदुस्थानावर तीन स्वाऱ्या केल्या. त्यानंतर दिल्लीचा बादशहा इब्राहिम लोदी व पंजाबचा सुभेदार दौलतखान लोदी या उभयतांचें वैर आल्यानें दौलतखानानें बाबरची मदत मागितली. त्याप्रमाणें सुलतान इब्राहिम याचा रुसून बाबरच्याजवळ येऊन राहिलेला भाऊ अल्लाउद्दीन याच्यासह तो इ० सन

१५२४ मध्यें हिंदुस्थानांत आला, इब्राहिमच्या सैन्यांशीं पंजाबमध्यें युद्ध करून व त्या सैन्याचा पराभव करून त्यानें तो प्रांत आपल्या हस्तगत करून घेतला, आणि हिंदुस्थानांतील अंदाधुंदीचा फायदा घेऊन आपण दिल्ली येथील तख्त हस्तगत करून घ्यावें, या इच्छेनें तो पुढील तजवीज करूं लागला; परंतु दौलतखान लोदी याची इच्छा आपण स्वतःच दिल्लीचें राज्य मिळवावें, अशी होती, व त्याच इच्छेनें त्यानें आपणास मदत करण्याकरितां बाबर यास बोलाविलें होतें. त्यामुळें आपणाला एकीकडे सारून बाबर हाच दिल्लीचें राज्य मिळविण्याच्या विचारांत आहे, ही गोष्ट दौलतखान यास आवडली नाहीं; तथापि बाबरबरोबर युद्ध करण्याचें त्यास सामर्थ्य नसल्यामुळें तो त्याचा पक्ष सोडून डोंगरी मुलुखांत पळून गेला. तेव्हां बाबर यास आपला पुढील बेत तात्पुरता रहीत करावा लागला. त्यानें सुलतान इब्राहिम याचा भाऊ अल्लाउद्दीन यास पंजाबमध्यें बंदोबस्तास ठेविलें, व ठिकठिकाणीं आपलीं ठाणीं बसवून तो काबूल येथें परत गेला. पुढें अल्लाउद्दीन व इब्राहिम या उभयतां बंधूंचें आपसांत युद्ध होऊन त्यांत प्रारंभीं अल्लाउद्दीन यास जय मिळाला. परंतु तो बेसावध आहे असें पाहून इब्राहिमनें त्याच्यावर हल्ला करून त्याचा पूर्ण पराभव केला; व त्यास आपला जीव जगविण्याकरितां पंजाबमध्यें परत पळून जाणें भाग पाडिलें. ही हकीकत बाबर यास कळल्याबरोबर तो आपल्या सैन्यासह मोठ्या त्वरेनें सिंधूनद उतरून अलीकडे आला. तो म्हणतोः—" जेव्हां मी हिंदुस्थानावर पांचव्यानें स्वारी करून सुलतान इब्राहिम याचा नाश केला, व तेथील राज्य जिंकिलें, त्यावेळीं माझे नोकर, व्यापारी आणि मोदीखाना व माझ्या बरोबर छावणींत असलेल्या माझ्या सर्व इष्टमित्रांचा लवाजमा, मिळून एकंदर बारा हजार लोक माझ्याबरोबर होते. " बाबरचें हें सैन्य, सुलतान इब्राहिमच्या एक लाख सैन्याशीं तुलना करितां संख्येनें पुष्कळच कमी होतें. पण सुलतानाच्या सैन्यासारखें तें बेशिस्त, बिन शिकलेलें किंवा अव्यवस्थित नसून, शिस्तीचें, शिकलेलें व व्यवस्थित होतें; व त्यांची शस्त्रसामुग्रीही चांगली होती. शिवाय त्याच्याबरोबर सातशें तोफांचे गाडे असून उस्ताद् अली–कुली या नांवाचा एक शूर सरदार त्याचा तोफखाना–कामगार होता. बाबर म्हणतोः—" मी निश्चयाच्या रिकीबींत पाय ठेविला, ईश्वरावरील विश्वास हा लगाम हातीं घेतला; आणि दिल्लीचें तख्त व हिंदुस्थानचें राज्य मिळविण्याकरितां निघालों. त्यावेळीं दिल्लीच्या सुलतानाचें पायदळ सैन्य एक लाख असून, एक हजाराहून अधिक हत्ती होते, असें म्हणतात." तैमूरच्या सैन्याप्रमाणेंच बाबरच्या सैन्यानेंही युद्धांत हत्तींचा उपयोग करीत असल्याचें पूर्वी कधींही पाहिलें नव्हतें. तथापि बाबरचें सैन्य व्यवस्थित असल्यानें, या संबंधीं फारशी फिकीर न बाळगितां त्यानें आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें युद्धाच्या

प्रारंभीं सैन्यरचना केली. तोफांच्या सातशें गाड्या अर्धचंद्राकृति वर्तुळांत कातड्याच्या दोरड्यांनीं ओळीनें जखडून बांधून त्यांच्या आश्रयानें मागें आपलें सैन्य सज्ज ठेविलें आणि युद्ध सुरू झाल्यावर अर्ध वर्तुळांच्या दोन्ही बाजूंचा तोफखाना व त्यामागील सैन्य हळु हळु पुढें सरकत राहून, तें वर्तूळ पूर्णचंद्राकृति करून त्यांत शत्रुसैन्यास घेरावयाचें, व त्याचा निकाल उडवावयाचा, अशी मसलत ठरवून त्याप्रमाणें त्यानें युद्धास सुरवात केली. इकडे इब्राहिम हाही आपल्या पुष्कळ सैन्यासह बाबरबरोबर युद्ध करण्यास पुढें आला, आणि पानिपत येथील प्राचीन व प्रसिद्ध रणभूमीवर ता० २१एप्रील ( इ० सन १५२६ ) रोजीं सकाळीं उभयतां मधील युद्धास प्रारंभ झाला. या युद्धांत, इब्राहिमच्या सैन्यांत अव्यवस्था होती तरी, त्यानें व त्याच्या सैन्यानें बाबरच्या सैन्याबरोबर मोठ्या चिकाटीनें टक्कर दिली. तथापि बाबरच्या तोफखान्यानें इब्राहिमच्या सैन्याचा पुष्कळ नाश केला, आणि दोन प्रहर पर्यंत भयंकर युद्धसंग्राम होऊन इब्राहिमचे पंधरा हजार लोक ठार झाले, व तो स्वतःही मारला जाऊन त्याचें शीर कापून बाबर पुढें आणण्यांत आलें. त्याबरोबर युद्धाचा निकाल लागला; व बाबर यास पूर्ण विजय मिळून तो दिल्लीयेथील तख्ताचा मालक बनला. बाबर म्हणतो:-" अत्यंत श्रेष्ठ अशा परमेश्वरानें, मीं आजपर्यंत ज्या हालअपेष्टा भोगिल्या त्या फुकट जाऊं न देतां, या युद्धांत माझ्या प्रबळ शत्रूचा माझ्याकडून पराभव करवून मला यशस्वी केलें, आणि हा धनसंपन्न देश जिंकवून मला त्याचें धनी बनविलें." या युद्धांत बाबरचा प्रिय मुलगा हुमायून ( जन्म इ० सन १५०५ ) हा त्याच्याबरोबर असून त्याचा हा पहिलाच युद्ध प्रसंग होता. युद्धांत विजय प्राप्त झाल्यावर बाबर यानें त्यास आग्रा शहरावर पाठवून तें काबीज करविलें, व आपल्या सैन्याची एक तुकडी दिल्ली येथें पाठवून तें शहरही त्यानें आपल्या हस्तगत करून घेतलें, आणि विजयानंदांत दिल्ली शहरांत प्रवेश करून ता० २७ रोजीं ( एप्रील इ० सन १५२६ ) दिल्लींतील मशीदींत बाबरच्या नांवानें खुत्बा वाचण्यांत आला; यावेळीं त्यानें दिल्लीचा खजीना उघडून इतकी अवर्णनीय खैरात वाटली कीं त्यावरून त्यास " कलंदर " ( उधळ्याफकीर ) अशी संज्ञा प्राप्त झाली.

तैमूरच्या लोकांप्रमाणेंच बाबरच्या बरोबरील मंडळीसही स्वदेशास परत जाण्याची उत्कट इच्छा होती, आणि त्यांनीं तसा बाबरजवळ आग्रहही धरिला होता. परंतु बाबरची इच्छा हिंदुस्थानांतच स्थाईक व्हावें अशी होती. त्यामुळें " ज्याला काबूल येथें परत जावयाचें असेल त्यानें खुशाल जावें; मी येथेंच राहणार; " असें निश्चयात्मक रीतीनें त्यानें त्या मंडळीस सांगितलें; तेव्हां त्याच्या निग्रही स्वभावाची माहिती असल्यानें त्यांनीं परत जाण्याचा नाद सोडिला, व ते पूर्णपणें बाबरला चिकटून राहिले. बाबर हा

पुढील व्यवस्था व बंदोबस्त करण्याच्या उद्योगास लागला; परंतु त्यास अनेक शत्रु उत्पन्न झाल्यामुळें स्वस्थता प्राप्त झाली नाहीं. यावेळीं मेवाडचा महापराक्रमी राणा संग हा चितोरगड येथें राज्य करीत होता; व तो अतिशय शूर, महत्वाकांक्षी, दीर्घोद्योगी व पराक्रमी असून स्वतःच दिल्लीचें तख्त काबीज करण्यास झटत होता. त्यानें दिल्लीचा सुलतान इब्राहिम लोदी याचा अनेक वेळां पराभव केला होता. त्याच्याशीं युद्ध करितांना एका लढाईंत त्याचा एक हात तुटला होता; दुसरींत पायानें पंगू झाला होता. भावावरील युद्धांत त्याचा एक डोळा गेलेला होता; त्याच्या शरीरावर युद्धांतील जखमांच्या लहान मोठ्या ऐशीं खुणा होत्या; माळवा येथील मुसलमानी सैन्याचाही त्यानें पराभव करून मुसलमानी सैन्यावर सतत अठरावेळां विजय मिळविले होते. सर्व रजपूत राजांपासून कारभार घेऊन त्यानें आपलें वर्चस्व परमावधीस नेलें होतें आणि खुद्द बाबर हाही या पराक्रमी वीर पुरुषास पूर्णपणें ओळखून होता. त्याचा संग राण्याबरोबर काबूलहून हिंदुस्थानवर स्वारी करण्यास येण्यापूर्वींच पत्रव्यवहार झाला होता; व संग राण्यानें बाबर यास मदत देण्याचेंही कबूल केलें होतें. तैमूरप्रमाणेंच बाबर हाही हिंदुस्थानावर स्वारी करून परत जाईल असें त्यास वाटत होतें; व म्हणूनच त्यानें बाबर यास मदत देण्याचें कबूल केलें होतें; परंतु बाबर यानें दिल्ली येथील बादशाही तख्त मिळवून तो इकडेच कायमचा स्थाईक होत आहे, ही गोष्ट त्यास पसंत पडली नाहीं; आणि तें आपल्या सत्तेस अतिशय बाधक आहे, असें त्यास वाटून बाबरची सत्ता स्थिर होण्यापूर्वींच त्याचा पाडाव करण्याची त्यानें तयारी केली, व अनेक रजपूत राज्यकर्त्यांचा जमाव आपल्या मदतीस घेऊन, यियाना नदी ओलांडून तो दिल्लीच्या रोखानें पुढें आला. बाबर यास राणा संग व रजपूत लोकांचें शौर्य ऐकून माहीत असल्यानें, त्यास ही हकीकत समजल्यावर अतिशय भीति उत्पन्न झाली. तथापि तो तसाच दिल्ली येथून निघून आग्रा शहराच्या नैऋत्येस बावीस मैलांवर असलेल्या शिक्री या गांवीं येऊन तळ देऊन राहिला. शिवाय त्याचा ज्योतिष, मुहूर्त व शकुन यांवर अतिशय भरंवसा असे; आणि कोणतेंही कृत्य करितांना तो अगोदर मुहूर्त वगैरे पहात असे. त्यामुळें, यावेळीं काबूलहून आलेल्या आपणाबरोबरील एका ज्योतिषानें त्यास जेव्हां "या युद्धांत तुझा पराभव होणार" असें सांगितलें, तेव्हां तर तो अगदींच गांगरून गेल्यासारखा झाला. शिवाय त्यानें रजपूत सैन्यावर पाठविलेल्या अनेक तुकड्यांचाही सारखा पराभव होत होता; त्यामुळें तो अतिशय खिन्न झाला; आणि आपण, कुराणाच्या आज्ञेविरुद्ध दारू पितों, या पापाचें हें प्रायश्चित आहे कीं काय, असें त्याच्या मनांत येऊन, त्यानें "इतःपर दारू पिणार नाहीं" अशी शपथ घेतली. आपणाजवळील सर्व दारू ओतून

देऊन मद्यपात्रें फोडून टाकिलीं; एक भिक्षागृह स्थापन केलें; मुसलमानांकडून घेण्यांत येत असलेला शिक्याचा कर माफ केला; आपल्या लोकांस प्रोत्साहन दिलें; आणि युद्धाची नीट तयारी करून तो भावी प्रसंगास तोंड देण्यास उद्युक्त झाला. संगराण्यानें बाबरवर एकदम हल्ला केला असता तर त्यासच जय मिळाला असता; पण त्यानें तसें न केल्यामुळें बाबर यास आपली तयारी करण्यास सवड मिळाली. अशा रीतीनें उभयतांची सेना तळ देऊन राहिल्यावर, आणि मध्यंतरीं चाललेली तहाची वाटाघाट निष्फळ झाल्यावर अखेरीस ता० १६ मार्च इ० सन १५२७ रोजीं सकाळीं उभयतां-मधील घनघोर युद्धास प्रारंभ झाला. यावेळींही बाबर यानें आपल्या फौजेची रचना पानिपतप्रमाणेंच करून रजपूत सैन्यास घेरिलें; तोफखान्यानें त्यांचा संहार उडविला; आणि भयंकर प्राणहानि होऊन बाबर हा पूर्णपणें विजयी झाला. या युद्धांत अनेक पराक्रमी रजपूत सरदार मारले गेले. राणा संग यासही मेवाडच्या डोंगरांत पळून जाणें भाग पडलें; व अशाच वनवासांत तो इ० सन १५३० मध्यें मृत्यु पावला. अशा रीतीनें, पानिपत येथील युद्धांत अफगाण व शिक्री येथील युद्धांत रजपूत, या उभयतां बलाढ्य प्रतिस्पर्ध्यांचा निकाल उडविल्यानंतर बाबरचें दिल्ली येथें अर्थातच पूर्णपणें वर्चस्व स्थापन झालें; त्यानंतर त्यानें संगराण्याचा स्नेही, माळवा व बुंदेलखंड याच्या सरहद्दीवरील चंदेरी येथील सरदार मेदिनीराय याच्यावर स्वारी केली. या ठिकाणींही रजपूत सैन्य त्याच्याशीं मोठ्या निकरानें लढलें, व अखेरीस आपल्याच हातानें आपल्या बायका मुलांचा नाश करून ते समरभूमीवर पतन पावल्यावरच किल्ला बाबरच्या हातांत आला. ( इ० स० १५२८ ) त्यानंतर इब्राहिम लोदीचा भाऊ महंमूद हा अफगाण असल्यानें त्यानें बाबरबरोबर युद्धाची तयारी केली, व बिहार प्रांत काबीज करून तो काशीपर्यंत चाल करून आला; परंतु त्याचा तो प्रयत्न निष्फळ झाल्यावर तो बंगालचा सुलतान नसरतशहा यास जाऊन मिळाला, तथापि त्या उभयतांचाही बाबर यानें पूर्ण पराभव केला, व बिहार प्रांत आपल्या राज्यास जोडून ( इ० सन १५२९ ) तो आग्रा येथें परत आला.

तथापि हा बिहार प्रांत लवकरच मोंगलबादशाहींतून नाहींसा झाला; व महंमदशहा लोहानीयां नांवाच्या एका शूर पुरुषानें तो ताब्यांत घेऊन तो तिकडेसच स्वतंत्रपणें कारभार पाहूं लागला. याच ठिकाणीं " बाबर बादशहाच्या नांवानें " पुष्कळ प्रदेश हस्तगत करून घेणारा आणि बाबरचा मुलगा हुमायून यास पुढें अत्यंत भयंकर प्रतिस्पर्धी होऊन त्यास पदभ्रष्ट करणारा फरीदखान ऊर्फ शीरशहा हा उदयास आला. या शीरशहाचा आजा इब्राहिमखानसूर हा जोनपूरचा सुभेदार जमालखान याच्या

जवळ नोकरींत असून पुढें त्याचा मुलगा हसनखान यास तेथेंच पांचशें स्वारांची असामी मिळाली होती. त्यास औरस दोन व राखांच्या पोटचे सहा असे आठ मुलगे होते. त्यांपैकीं वडील औरस मुलगा फरीदखान हा बापाचा सर्व कारभार पहात असे, परंतु हसनखानानें आपल्या एका राखेच्या नादीं लागून तिच्या पोटीं झालेल्या सुलेमान या नांवाच्या मुलाला आपला सर्व कारभार सोंपविल्यामुळें फरीदखान रागाऊन आग्रा येथें आला व त्यानें दौलतखान लोदीच्या पदरीं नोकरी धरिली. परंतु पुढें इब्राहिम लोदी मारला जाऊन बाबर हा दिल्लीपति झाल्यावर तो बहार प्रांताचा सरदार महंमदशहा लोहानी याच्या पदरीं नोकरीस राहिला. या ठिकाणीं असतां त्यानें एकदां शिकारींत तरवारीच्या एकाच फटक्यासरशीं एका वाघाचें डोकें जमिनीवर पाडिलें, ह्मणून त्यास "शीरखाना" अथवा "शीरशहा" हें नांव मिळालें व या वेळेपासून त्याचें फरीदखान हें खरें नांव मागें पडून शीरशहा या नांवानें तो ओळखला जाऊं लागला. पुढें त्याचें व महंमदशहाचें वांकडें आल्यावर त्यानें स्वतंत्रपणें सैन्य जमवून "बाबर बादशहाच्या नांवानें पुष्कळ प्रदेश आपल्या हस्तगत करून घेतला; आणि हळु हळु आपलें महत्व वाढवीत नेण्यास त्यानें सुरवात केली. बाबर हा हिंदुस्थानांत राज्याधिकारी झाल्यावेळे-पासून मोंगल लोकांविषयीं अफगाण लोकांच्या मनांत अतिशय वैषम्य उत्पन्न झालेलें होतें. त्यामुळें बाबरच्या वेळेपासूनच मोंगल लोकांविरुद्ध, हिंदुस्थानांत पुन्हां अफगाण वंशाची बादशाहत स्थापन करावी, ह्मणून अफगाण लोकांची सारखी खटपट सुरू होती; आणि शीरशहा हा अतिशय शूर व महत्वाकांक्षी असल्यानें त्याच्याही मनांत यावेळीं तोच विचार घोळत होता. त्यानंतर दिल्ली येथील राजकीय परिस्थिति पाहण्यास तो मुद्दाम तिकडे गेला होता. त्यावेळींच त्याची तेजस्विता बाबरच्या नजरेस आली, व त्याच्याविषयीं बाबरच्या मनांत वैषम्यही उत्पन्न झालें. तो एकदां बाबरच्या तंबूंत खाना खात असतां त्याला लवकर सुरी मिळाली नाहीं, त्याबरोबर त्यानें आपल्या कमरेचा जंबिया काढून त्यानें त्याच्याकडूनच सुरीचें काम भागवून घेतलें. हें पाहून बाबर मनांत चरकला; परंतु तसें फारसें वर न दाखवितां "असल्या क्षुल्लक गोष्टींत या सरदाराचा असा अपमान करूं नका. दैवयोगानें एखाद्या दिवशीं त्यास श्रेष्ठपद प्राप्त होईल" असें ह्मणून त्यानें ती वेळ निभावून नेली. तथापि शीरशहानें बाबरच्या मनांत आपणाविषयीं वैषम्य उत्पन्न झालें ही गोष्ट तात्काळ ताडिली, आणि आतां येथें राहणें धोक्याचें आहे, असें समजून तो लागलाच बिहार प्रांतांत परत निघून गेला; व लवकरच मिर्झापूरपासून वीस मैलांवर असलेला चुनारगडचा मजबूत व प्रसिद्ध किल्ला आपल्या हस्तगत करून घेऊन तो त्या प्रदेशांत बलाढ्य होऊन गेला.

तथापि बाबर हा पुढें लवकरच आजारी पडल्यानें त्यास शीरशहाचा कोणत्याही प्रकारें बंदोबस्त करितां आला नाहीं आणि त्याच्या मृत्युनंतर त्याच शीरशहानें हुमायुनास पदभ्रष्ट करून हिंदुस्थानांत पुन्हा अफगाण बादशाहीची स्थापना केली; व पुढें कांहीं काळपर्यंत अफगाण वंशानें पुन्हा हिंदुस्थानांत राज्य केलें.

हिंदुस्थानांत स्वस्थता झाल्यावर बाबर यानें काबूल येथून आपला जनानखाना व इतर नातेवाईक मंडळी आग्रा येथें आणिली. बाबर यास पुष्कळ बायका होत्या; त्यांत, हिरातचा सुलतान हुसेनमिर्झा याच्या घराण्यांतील महामबेगम या नांवाची मुलगी, ही एक असून या बाईवर त्याचें अतिशय प्रेम होतें; याच बाईच्या पोटीं त्यास हुमायुन व तीन मुली झाल्या; याशिवाय त्यास कामरान, हिंदाल, व मिर्झाअस्करी असे तीन मुलगे भिन्न भिन्न राण्यांपासून झालेले होते. त्याचें सर्व मुलांमुलींवर विशेष प्रेम असून तो स्वतः संकटें सोसलेला व आपत्तींत मुरलेला, असल्यानें त्याचा मूळचाच स्वभाव अधिक परोपकारी व प्रेमळ बनलेला होता; आणि त्यांतल्यात्यांत हुमायूनवर तर, त्याच्या वरून स्वतःचा जीव ओवाळून टाकण्याइतकें त्याचें अगाध प्रेम होतें. संगराण्याचा पाडाव केल्यानंतर त्यानें शहाजादा हुमायून यास बदकशान प्रांताच्या सुभ्यावर नेमून त्याची तिकडे रवानगी केली होती; आणि आपल्या परिवारांतील ज्या लोकांना स्वदेशीं परत जाण्याची इच्छा होती, त्यांनाही त्याच्याच बरोबर रवाना करून देऊन शक्य असल्यास समर्कंदचें राज्य हस्तगत करून घेण्यासही त्यास त्यानें बजाविलें होतें. हुमायून तिकडे गेल्यावर सारखा प्रवास, त्रास व युद्धें यामुळें बाबर क्षीण होत चालला होता. इतक्यांत समर्कंद काबीज होण्याची आशा न दिसल्यानें तो बदकशान येथून बाबर यास भेटण्यास परत आला; परंतु त्यानें त्याबद्दलची खबर अगोदर दिली नव्हती; बाबर ह्मणतो " मी हुमायूनच्या आईशीं बोलत बसलों असतां तेथें हुमायून एकदम येऊन दाखल झाला. त्याबरोबर आह्मां उभयतांना जो आनंद झाला, त्याचें वर्णन करितां येत नाहीं. त्याच्या आगमनाबद्दल मी अनेक मेजवान्या दिल्या, आणि हुमायूनला अतिशय आदर व ममता दाखविली. हुमायूनचें संभाषण अतिशय मधूर व मोहक होतें, आणि उत्कृष्ट गृहस्थास योग्य असेंच त्याचें वर्तनही होतें, " त्यानंतर कांहीं दिवसांनीं हुमायून हा संभळ येथें एकाएकीं अतिशय आजारी झाला; तेव्हां त्यास गलबतांतून आग्रा येथें आणण्यांत आलें, व तो बरा व्हावा ह्मणून निरनिराळे अनेक उपचार करण्यास सुरवात झाली; परंतु कोणत्याही औषधानें उतार न पडतां त्याचें दुखणें सारखें विकोपास गेलें, व त्याची जगण्याची आतां आशा नाहीं, असें वैद्यांनीं बाबर यास सांगितलें; तेव्हां त्याला अत्यंत दुःख झालें, आणि त्यानें

आपलें आयुष्य दुसऱ्यास अर्पण करितां येतें अशा भावनेनें एक तोडगा केला. तो असा कीं, त्यानें हुमायूनच्या बिछान्याजवळ एकाग्रचित्तानें ईश्वराची करुणा भाकून आपलें आयुष्य निर्धारपूर्वक त्यास दिल्याचा संकल्प केला. त्याच्या बिछान्याभोंवतीं तीन वेळां फिरला, आणि पुन्हां गुढघे टेकून तो थोडा वेळ ईश्वराचें ध्यान करीत बसला; इतक्यांत, परमेश्वराला आपली विनंति मान्य झाली, अशी त्यास स्फूर्ति होऊन तो "फत्ते" "फत्ते" म्हणून ओरडला; आणि चमत्कार हा कीं, याच वेळेपासून हुमायूनच्या दुखण्यास उतार पडत जाऊन तो लवकरच पूर्ण बरा झाला; आणि बाबर दिवसेंदिवस खंगत जाऊन इ० सन १५३० मध्यें, (ता० २६ दिजंबर) आपल्या वयाच्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी आग्रा येथें मृत्यु पावला; व त्याच्या इच्छेप्रमाणें काबूल नजीकच्या एका सृष्टिसौंदर्यसंपन्न टेंकडीच्या पायथ्याशीं एका ओढ्याच्या कांठीं त्यास दफन करण्यांत आलें. या ठिकाणीं पुढें शहाजहान बादशहानें इ० सन १६४० मध्यें एक सुंदर कबर बांधिली; ती अद्यापि अस्तित्वांत असून काबूलचे लोक तेथें हवा खाण्यास व नवस करण्यास जात असतात.

बाबर यानें हिंदुस्थानांत जरी थोडीं वर्षे राज्य केलें तरी त्यावरून सुद्धां त्याचें कर्तृत्व व योग्यता हीं निदर्शनास येतात. बाबर यास, तो काबूल येथें राज्य करीत असल्या वेळेपासूनच मद्यपानाचें अतिशय व्यसन होतें; व तें लहानपणापासूनच त्यास जडलेलें होतें; आणि काबूल शहराबाहेर एका सुंदर व सृष्टिसौंदर्यसंपन्न टेंकडीवर फुलफळफळावळीचा एक मनोहर बाग तयार करून त्यांत त्यानें आपल्या करमणुकीसाठीं एक मद्य मंदिर बांधिलें होतें. या ठिकाणीं मदिरा देवीची मनसोक्त आराधना करण्याकरितां तो आपल्या स्नेही सवंगड्यांसह मधून मधून जात असे; आणि दारू-पोई तुडुंब भरून काढून दारूची लयलूट उडविण्यांत येत असे; इतकेंच नाहीं तर मद्य व मोहिनी, या संबंधींच्या त्याच्या आसक्तिविषयींही त्या मद्य मंदिरांत तसा एक लेखही लिहून ठेवण्यांत आलेला असे. हें दारूचें व्यसन, तो इकडे हिंदुस्थानांत आल्यावरही, शिक्री येथील युद्धापर्यंत, कायम होतें; परंतु त्यानंतर त्यानें मद्यास कधींही स्पर्श केला नाहीं; तथापि त्यानें या बाबतींत कोणावरही कधीं सुद्धां सक्ति केली नाहीं, व दारूच्या व्यसनामुळें त्याचें कोणतेंही काम बिघडलें असें कधींही झालें नाहीं. तो स्वतः दयाळू होता; पण प्रसंगविशेषीं पुष्कळच कठोर वृत्ति धारण करीत असे; आणि अफगाण सरहद्दीवरील बंडाच्या वेळीं, व त्याजवर इब्राहिम लोदीच्या आईनें विष प्रयोग करविला त्यावेळीं त्यानें विशेषच कठोर उपाय योजिले होते; शिवाय तो न्यायी असल्या-बद्दल त्याची ख्याति होती. यासंबंधीं एक अशी गोष्ट उपलब्ध आहे कीं, तो फरगाणा व अंदिजान प्रांतांवर राज्य करीत असतां एकदां खुत्ता येथील एक कारवान मौल्यवान व्यापारी

जिन्नस उंटावर लादून अंदिजानच्या टेंकडया ओलांडून पलीकडे जात असतां त्याच्यावर वीज पडून तो मार्गांतच मृत्यु पावला. तेव्हां बाबर यानें त्याचा सर्व माल जप्त करून आपल्या ताब्यांत ठेविला आणि खुत्ता येथें या अपघाताची बातमी देऊन, मयताच्या वारसांचा तपास करून त्यांस घेऊन येण्याबद्दल त्यानें तिकडे मुद्दाम माणसें रवाना केलीं. पुढें दोन वर्षांनीं मयताचे वारस त्याच्याकडे येऊन हजर झाले. तेव्हां बाबर यानें त्यांचें योग्य आदरातिथ्य करून तो सर्व माल त्यांच्या हवालीं केला. तेव्हां ते खूष होऊन बाबर यास कांहीं नजराणा देऊं लागले. परंतु त्यानें तो घेण्याचें साफ नाकारिलें; इतकेंच नाहीं तर तो सर्व माल जंगलांतून गोळा करून आणण्याला जी मजूरी द्यावी लागली, तीहि घेण्याचें बाबर यानें साफ नाकारिलें. यावरूनच त्याचा न्यायी स्वभाव व निर्लोभी वर्तन व्यक्त होतें. त्याप्रमाणेंच तो स्वतःच्या शरीरापेक्षां सुद्धां आपल्या सैन्याची अधिक काळजी घेत असे; आणि स्वतः सुखांत न राहतां त्यांच्या बरोबर हाल व कष्ट सोसण्यास तयार असे. तो स्वतः अतिशय काटक होता. त्याचे कित्येक सबंध दिवसरात्र घोडयावर जात होते. कित्येक वेळां ऐशीं ऐशीं मैलांची मजल सुद्धां तो घोडयावरून करीत होता. तो पटाईत पोहणारा होता. समर्कंदपासून गंगानदी पर्यंतच्या सर्व नद्या तो पोहून आलेला होता, आणि बाकी राहिलेली एकटीच गंगानदी—बाबर म्हणतो, "तिचे हात मी मोजले, ते तेहतीस होते"—तेहतीस हात पोहून, इ० सन १५२९ मध्यें तो पलीकडे गेला होता. "विजय संपादन करावे," आणि "राज्यवृद्धि करावी" हें त्याचें ध्येय होतें, आणि "मृत्यु नंतर आपल्या कीर्तीस कलंक लागेल असें वर्तन शहाण्या मनुष्यानें कधींही करूं नये" या उदात्त तत्वाचा उल्लेख करून तें त्यानें अहर्निश आपल्या हृदयांत बाळगून ठेविलें होतें व आचरणांत आणिलें होतें. "आळसानें व ऐषआरामानें राज्य टिकत नाहीं" असा त्यानें हुमायून यास, तो बदकशानयेथें असतांना उपदेश करून "कसाही प्रसंग आला तरी न डगमगतां, हिंमत कायम ठेवून त्यांतूनच तूं आपला भावी मार्ग काढीत जा," असें त्यास बजाविलें होतें; आणि "तूं तिकडे इतक्या लांब एकटा असल्याबद्दल उदासीनता धारण करूं नकोस. दररोज दोन वेळां नियमानें दरबार भरवून आपल्या सर्व सरदार मंडळींच्या भेटी घेत जा. आपल्या सल्लागार मंडळींची मसलत ऐकून घेऊन तदनुसार आपला वर्तनक्रम ठेवीत जा; आणि त्याप्रमाणेंच आपल्या फौजेचाही नीट बंदोबस्त ठेव" अशी त्यास सूचना केली होती; (ता० १३ नोव्हेंबर १५२८) शिवाय बाबर यास हिंदुस्थानांतील राजकीय व धार्मिक परिस्थिति पूर्णपणें अवगत असून हिंदुस्थानांत आपलें राज्य चिरस्थाई व्हावें, अशी त्याची इच्छा होती; आणि हुमायून यास तो आपल्या मागें राज्याधिकारी झाल्यावर त्यानें कसें वागावें

याबद्दल त्यास बाबरनें अत्यंत मौल्यवान उपदेश केला होता तो येणें प्रमाणें :–" जहीरुद्दीन

---

टीप १:—हा विश्वासनीय अस्सल फारशी भाषेंतील लेख आजपर्यंत अज्ञात स्थितींत असून तो नुकताच भोपाळ स्टेट लायब्ररींत मौलाना अरीफ हुसेन हासवी यास सांपडला आहे; आणि तो अलीकडेसच पहिल्यानें प्रसिद्ध झालेला असून, वर दिल्याप्रमाणें त्याचें भाषांतर आहे; आणि तें याठिकाणीं ता० १७ माहे आगष्ट इ० सन १९२० मंगळवारच्या " केसरी " पत्रांतून ( पान २ कॉलम ५ विषयानुक्रम तीन " गोवध बंद करण्याविषयीं बाबरचा उपदेश " पहा. ) ग्रंथित करण्यांत आलेलें आहे; त्याप्रमाणेंच " सेंट्रल हिंदू कॉलेज मॅगझिन् " व्हॉल्युम २० अंक ८ ता० १ आगष्ट १९२० मध्यें यासंबंधीं इंग्रजींत खालीलप्रमाणें उल्लेख केला आहे, तोः–

Moulana Arif Hosai Hasvi has succeeded in securing an authentic copy of the order from the Bhopal State Library and the following is an English rendering of the same:—

Zhiruddin Babar Ghazi (addressed) to Prince: " The confidential testament of Emperor Nairuddin Humayun (May God grant him long life) written for strengthening Empire, O son, Indian Empire is composed of diverse religions, (all) praise be to God Who has conferred its sovereignty upon thee. You should wipe the tablet of thy mind clear of all religious prejudices and deal justice in accourdance with each (different) Faith. Especially avoid cow-slaughter as that is the way to win the hearts of Indians, and subjects of this country should be bound to the sovereign by royal obligations, and do not spoil temples or places of worship, belonging to any community, which may be subject to sovereign control.

Adopt a way of administering justice that sovereign and subjects may be mutually happy, To propagate

बाबर गझनी यानें शहाजादा नासिरुद्दीन हुमायून यास साम्राज्याच्या मजबुतीकरितां सूचना देण्यासाठीं खाजगी पत्र लिहिलें आहे तें असें:—" पुत्रा, ज्या परमेश्वरानें तुला हें साम्राज्य दिलें, त्याला प्रणाम असो. या हिंदी साम्राज्यांत बहुविध धर्म अस्तित्वांत आहेत; याकरितां तूं आपलें मनःपटल धार्मिक पूर्वग्रहांपासून अलिप्त राखून भिन्न भिन्न धर्मांच्या लोकांना त्यांच्या धर्मांच्या अनुरोधानें इनसाफ देत जा; हिंदु लोकांचीं अंतःकरणें आकर्षून घेण्याचा तो एकच मार्ग असल्यामुळें, आणि प्रजाजनांच्या मनांत बादशाही सिंहासनाविषयीं प्रेम रहावें ह्मणून तुझ्या ताब्यांतील प्रजेचीं जीं कांहीं मंदिरें किंवा पूजास्थानें असतील त्यांच्या वाटेस जाऊं नको; आणि मुख्यतः गोवध करण्याचें टाळ. राजा व प्रजा या उभयतांनाही सुख होईल अशा रीतीनें न्याय-मनसुबा कर; प्रेमरूपी तरवारीनें इस्लामी धर्माचा प्रसार करणें हें बळजबरीच्या तरवारीनें, तें कार्य करण्यापेक्षां, अनेक पटीनें चांगलें आहे."

" शिया व सुनी यांतील भेदांकडे कानाडोळा कर; नाहींतर मुसलमानी धर्मांत फूट पडल्याचें शत्रूच्या नजरेस येईल. ज्याप्रमाणें चार मूळतत्वें योग्य प्रमाणांत असलीं ह्मणजे शरीरास रोगाची पीडा होत नाहीं. त्याचप्रमाणें साम्राज्यांतील चारही वर्ग योग्य मर्यादेंत असले ह्मणजे साम्राज्याला कोणत्याही रोगाची बाधा होणार नाहीं. राजकारणाच्या बाबींत दाखल्याकरितां अमीर-ई-तैमूर साहिबगिराण यांच्या प्रसिद्ध कृत्यांकडे नजर दे." ता० १ जमादिलावल ९३५ हिजरी." ( सन १५२९ ) यावरून या राज्यकर्त्यास, हिंदुस्थानांतील आपल्या " साम्राज्याच्या मजबुतीकरितां " राज्यकर्त्यांनें कोणत्या गोष्टी पूर्णपणें लक्ष्यांत ठेवून त्याप्रमाणें वागलें पाहिजे, हें तंतोतंत कळून चुकलें होतें हें उघड होतें. या गोष्टी लक्ष्यांत ठेवून मोंगल बादशहा आचरण करीत होते, तों

---

Islam with the sword of kindness is better by far than doing so with the sword of tyranny. Overlook controversies between Sunnis and Shias, otherwise a weakness in Islam is discovered. Let the ordering of subjects of various temperaments be according to the four elements so that the body of the Empire be immuue from different maladies and keep in view the achievements of Amir-I-Timur Sahibgiran as examples in the matters of the State for guidance.

पर्यंत त्यांच्या साम्राज्याची मजबुती कायम राहिली; परंतु या सर्व गोष्टी माहीत असूनही हट्टानें व अट्टाहासानें वागणाऱ्या अवरंगझेबाची विध्वंसक राज्यपद्धती सुरू झाल्या बरोबर मोंगल बादशाहीचा झपाट्यानें ऱ्हास होण्यास प्रारंभ होऊन ती अखेरीस नामशेष झाली.

बादशहा बाबर यानें दिल्ली जिंकून जरी तेथें आपलें राज्य स्थापन केलें तरी त्याठिकाणीं त्यानें आपली राजधानी केली नाहीं. तो नेहमीं—दिल्लीजवळ पूर्वेस १४४ मैलांवर यमुना नदीच्या कांठीं असलेल्या—आग्रा या शहरीं रहात असे, व आपल्या थोड्याच वर्षांच्या वास्तव्यांत त्यानें तें शहर पुष्कळ शोभायमान केलें होतें. हा बादशहा मोठा विद्वान् असून त्यानें कायदे व साहित्य इत्यादि विषयांवर ग्रंथ लिहिलेले आहेत. शिवाय तो स्वतः कवि असून त्याच्या अनेक कविता प्रसिद्ध आहेत. त्यास अरबी, फारशी, तुर्की व हिंदी या भाषा अवगत होत्या, आणि तो मोठा कल्पक असून त्यानें स्वतः एक तुर्क लिपि तयार करून प्रसिद्ध केली होती. या लिपीस " बाबर लिपि " असें ह्मणतात; याच लिपीमध्यें त्यानें आपलें " वाकियातीबाबरी " हें आत्मचरित्र, आपल्या कविता व इतर ग्रंथ लिहिलेले आहेत; आणि त्यांतील बाबरच्या आत्मचरित्राची योग्यता तर अवर्णनीय अशीच आहे. या चरित्रांत त्यानें जें सत्य तेंच लिहिलेलें असून खुद्द बाबरच या बाबतींत ह्मणतो कीं, "...स्वतःची प्रौढी मिरवावी अशी माझी चिलकूल इच्छा नाहीं. आजपर्यंत ज्या ज्या गोष्टी घडल्या त्या त्या मी जशाच्या तशाच लिहून ठेविल्या असून त्यांत एक अक्षरसुद्धां मीं सत्याला सोडून लिहिलेलें नाहीं, आणि प्रत्यक्ष बाप असो, किंवा भाऊ असो, कोणाचीही भीडमुर्वत न धरितां जें सत्य तेंच मी लिहिल्याशिवाय कधींही राहिलों नाहीं. त्याप्रमाणेंच स्नेही असो किंवा शत्रु असो, त्याचेही गुणावगुण अत्यंत निःपक्षपातानें मी लिहिल्याशिवाय राहिलों नाहीं. ह्मणून माझ्या स्पष्ट लिहिण्याचा माझें आत्मचरित्र वाचणाऱ्या वाचकांनीं राग मानूं नये." अर्थात् स्वतःतील दुर्गुणांचीही झांकाझांक न करितां सत्य तेंच या आत्मचरित्रांत लिहिलेलें असल्यामुळें, एच. बिव्हरीजच्या शद्बांत ह्मणावयाचें ह्मणजे हा ग्रंथ सर्वकाळीं ज्यांचें महत्व अबाधित राहतें अशा अमूल्य ग्रंथांपैकीं एक आहे; आणि त्याची योग्यता सेंट ऑगस्टाईन किंवा रुसो ह्यांचीं आत्मचरित्रें, किंवा गिबन् आणि न्यूटन् ह्यांचे चरित्र लेख, यांच्याबरोबरीची आहे; आणि आशिया खंडांतील वाङ्मयामध्यें तर असा ग्रंथ बहुनेक हा एवढाच आहे."[1] त्याप्रमाणेंच " मोंगल असून दयावंत, मुसलमान असून

---

टीप १:—"His autobiography is one of those priceless records which are for all time, and is fit to rank

परधर्मीयांशीं ममतेनें वागणारा, शूर, उदार, गरिबांचा कनवाळू, मातृभक्त पुत्र, अपत्य-स्नेहयुक्त पिता, असा बाबर बादशहा, हा पौर्वात्य व पाश्चात्य देशांत थोरपणाला आवश्यक मानिलेल्या गुणांनीं संपन्न होता; " ( अँड्र्यू ) आणि " बाबरच्या घराण्याची राजसत्ता आणि वैभव हीं लयास गेलीं तरी कालाच्या वक्रदृष्टीस न जुमानितां, उलट मोठ्या गर्वानें, " हा पहा मी जशाचा तसाच कायम आहे " असें ह्मणून बाबरचें आत्म-चरित्र हा ग्रंथ कालाचाच उपहास करीत आहे. "[1] अर्थात् या श्रेष्ठ पुरुषाची व त्याच्या चरित्राची महान् थोरवी आहे, त्यांत कांहींही संशय नसून त्याच्या चरित्राचा समारोप अर्स्किनच्या शद्बांत याठिकाणीं केला आहे.[2] तो ह्मणतो:-" बाबर हा, आशि-यांतील इतर राजपुरुषांहून भिन्न होता; हाच त्याचा लक्ष्यांत ठेवण्यासारखा विशेष गुण आहे. मानवी प्राण्यांत नैसर्गिक ह्मणून ज्या गोष्टी असणें आवश्यक आहे, त्या सर्व त्याच्याठायीं वसत होत्या. तो मोठा चलाख, मायाळू व साधा असून श्रेष्ठ पदाला पोहोंचल्यावरही या गुणाचा त्याच्याठायीं कमीपणा झाला नाहीं. तो इतर राज्यकर्त्यां-सारखा डामडौली नव्हता. थाटामाटाच्या नियमांनीं जखडलेला नव्हता. बेगडी चांगुल-पणाचें प्रदर्शनही करणारा नव्हता आणि कल्पकता व बहुगुणसंपन्नता, यांत तर त्याची बरोबरी करणारे पुष्कळच कमी राज्यकर्ते आढळून येतील. अकबरानें दूरवर दृष्टी देऊन उदार राज्यपद्धतीची सुरवात केली, त्यामुळें, राज्यकर्त्यांत अकबरास प्रमुख मान मिळत आहे; अवरंगझेबानें कापट्य नीतीचें अवलंबन केल्यानें, त्याबाबतींत त्याची विशेष कीर्ति झालेली आहे; चंगीझखान व तैमूरलंग या उभयतांनीं बाबरच्या मानानें शेंकडोंपट अधिक प्रदेश आपल्या हस्तगत करून घेतला; ह्मणून त्यांचीं नांवें चिरस्मरणीय

---

with the confessions of St. Augustine and Rousseau, and the memoirs of Gibbon and Newton. In Asia it stands almost alone."

CALCUTTA REVIEW, 1897.

टीप १:—" The pomp and power of Babar's dynasty are gone; the record of his life—the Littera Scripta, that mocks at time—remains unaltered and imperishable."

—S. LANE-POOLE.

टीप २:-Erskine's "History of Babar & Humayun" हें पुस्तक पहा.

झाली आहेत, परंतु मनाचा उत्साह, विपत्ति अथवा भाग्योदय ह्या दोन्हींही स्थितींत आपलें धैर्य कायम ठेवून आनंदी व शांतवृत्ति धारण करण्याचा निग्रह, राजपुरुषाच्या ठायीं सहसा न आढळून येणारा मनमिळाऊपणा, धैर्य, विद्याभिरुची आणि तिजमध्यें त्यानें मिळविलेलें प्राविण्य इत्यादि सद्गुणांमुळें बाबरहून अधिक श्रेष्ठ ह्मणतां येईल असा दुसरा राज्यकर्ता आढळून येत नाहीं." ह्मणून बाबर यासच त्यामध्यें अग्रस्थान दिलें पाहिजे; आणि शौर्य, पराक्रम, विद्वत्ता, रसिकता, कल्पकता, धूर्तता, काटकपणा, महत्वाकांक्षा, दयालुत्व व दातृत्व वगैरे अनेक सद्गुणांमुळेंच भाग्योदय होण्यास पात्र असून स्वतःच्या कर्तबगारीवर तो श्रेष्ठ पदास पोंचला होता, असें ह्मटलें पाहिजे हें उघड आहे.

बादशहा बाबर याच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा नासिरुद्दीन महंमद हुमायून हा गादीवर आला; त्यास कामरान, हिंदाल व मिर्झाअस्करी असे तीन भाऊ होते. हुमायूनचें चरित्र वाचतांना खालील एक अतिशय महत्वाची गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे. छत्रपति शिवाजी महाराजाचा मुलगा संभाजी महाराज, हा त्या थोर व उज्वल विभूतीचा पुत्र असल्यानें त्या श्रेष्ठ विभूतीच्या दिव्य तेजापुढें, संभाजीची कर्तबगारी झांकली जाऊन तो असत्या नसत्या दुर्गुणांचा मूर्तिमंत पुतळा दिसूं लागला; तथापि मुलगा छत्रपति शाहू व भाऊ छत्रपति राजाराम हे संभाजी महाराजाइतके धडाडीचे व कर्तृत्ववान् नसल्यामुळें संभाजीचें कर्तृत्व व तेज कांहीं प्रमाणांत तरी लौकिकदृष्ट्या कायम राहिलें; परंतु हुमायूनाचा बाप बाबर व हुमायूनाचा मुलगा अकबर हे—ह्मणजे त्याचा बाप व त्याचा मुलगा हे उभयतांही त्याच्याहून पुष्कळच अधिक श्रेष्ठ व कर्तृत्ववान् निपजल्यानें त्यांच्या जोड यशस्वी वृक्षांच्या अंधेरी गर्द छायेंत हुमायून व त्याचें कर्तृत्व हीं पार झांकलीं गेलीं; तथापि त्याच्या चरित्राचें सूक्ष्मपणें अवलोकन केल्यास तो कर्तव्यशून्य व निव्वळ "बडे बापका बेटा" ही नव्हता, अथवा "बडे बेटेका बाप" ही नव्हता. असेंच दृष्टोत्पत्तीस येतें. त्याच्यांत पुष्कळच कर्तबगारी होती. तो उतावळा होता, पण त्याच्यांत फसवेगिरी नव्हती; दिलेला शब्द तो तंतोतंत पाळणारा होता. तो स्वतः उत्तम गणिति होता; इतरही कित्येक शास्त्रें त्यास अवगत होतीं. तो स्वतः कवि नव्हता—आणि बाबरच्या म्हणण्याप्रमाणें त्याला कवनाच्या दोन ओळीसुद्धां धड तयार करितां येत नव्हत्या—तरी तो कवितेचा मोठा भोक्ता होता. त्यानें अनेक कवींस आपल्या पदरीं आश्रय दिला होता, आणि त्याला तुर्की व फारशी भाषा चांगल्या अवगत असून ज्योतिषशास्त्राचाही त्याला विशेष नाद होता. तो फाजील दयाळू होता, पण या सद्गुणाच्या अतिरेकाचे परिणामही भोगण्याची त्याची तयारी होती. "तूं आपल्या भावांना ममतेनें वागीव; त्यांना ठार मारूं नकोस" हें पितृवचन—आपल्या पूज्य

पित्याची ही शेवटची पवित्र आज्ञा-त्यानें तंतोतंत पाळून,-आणि विश्वासघातकी, क्रूर, कपटी, नालायक व दगाबाज भावांनीं केलेला छळ शांतपणानें सोशीत राहून व आपलें सर्व आयुष्य विपत्तींत घालवून---त्यानें पितृऋणाची फेड केली; आणि आपल्या बापानें-( बाबरानें ) आपला जीव जगावा म्हणून ज्याप्रमाणें स्वतःचा जीव ओंवाळून टाकिला, त्याप्रमाणेंच हुमायून यानें आपल्या भावांच्या कठोर करणीमुळें जिवंतपणीं सतत कष्ट, संकटें व आपत्ति भोगून स्वतःचा देह बाबरच्या शद्बावरून ओंवाळून टाकून तोडीसतोड असें उदात्त आचरण केलें. मुसलमानी राज्यकर्त्यांत अशीं उदाहरणें क्वचितूच आढळतील. म्हणून आपल्या अपराधी अथवा निरपराधी भावांचा व राजघराण्यांतील इतर पुरुषांचा निकाल उडविणाऱ्या अनेक राज्यकर्त्यांच्या कृती लक्षांत घेऊन हुमायूनचें चरित्र व त्याचें कर्तृत्व यासंबंधीं मनन केल्यास हुमायून हाही श्रेष्ठ राज्यकर्ता होता; आणि बाबरसारख्या श्रेष्ठ पुरुषास साजेल असाच मुलगा, व अकबरासारख्या महाथोर पुरुषाला शोभेल असाच पिता होता, असें खात्रीनें निदर्शनास आल्याशिवाय राहणार नाहीं.

हुमायून यानें आपल्या वडिलांच्या आज्ञेप्रमाणें गादीवर आल्यावर कामरान यास पंजाब व काबूल हे दोन प्रांत स्वतंत्रपणें तोडून दिले; हिंदाल यास अंतर्वेदींतील संभळ प्रांताचा कारभार दिला, आणि अस्करी यास दिल्लीच्या दक्षिणेकडील मेवाड प्रांताचा कारभार सांगितला. हुमायून यानें बाबरप्रमाणें आग्रा येथें न राहतां दिल्ली येथें राहण्याचें ठरवून ती आपल्या राज्याची राजधानी केली; आणि इंद्रप्रस्थाच्या प्राचीन रणभूमीवर त्यानें एक किल्ला बांधिला; त्यास अद्यापि "पुराणा किल्ला" हें नांव चालत आहे; हुमायून हा गादीवर आल्यावर फारच थोड्या काळांत निरनिराळ्या बाजूंनीं त्याच्यावर राजकीय संकटें येण्याचा सुमार दिसूं लागला; आणि अगदीं पहिल्यानें त्यास अफगाण सरदारांबरोबरच झगडण्याचा प्रसंग आला. त्यानें पहिल्यानें बुंदेलखंडांतील कलिंजरचा किल्ला घेऊन तेथील अफगाण सरदारांचें बंड मोडून टाकिलें; नंतर जोनपुरावर जाऊन महंमूद लोदीचा पराभव केला, व चुनारगड येथें शीरशहावर चाल

---

टीप १:-जोनपूर हें ठिकाण बनारसच्या उत्तरेस सुमारें चाळीस मैलांवर गोमती नदीच्या कांठीं आहे. या शहराचें मूळ नांव राठगड असें असून समोरच्या तीरावर जाफराबाद या नांवाचें दुसरें शहर आहे. जोनपूर हें शहर इ० सन १३५१ मध्यें फिरोजतघलख यानें वसविलें. याठिकाणीं अनेक प्रेक्षणीय इमारती असून त्यांत, फिरोज किल्ला, अटालामशीद, लालदरवाजा, जामीमशीद, आणि गोमती नदीवरील सुंदर पूल वगैरे स्थळें विशेष प्रसिद्ध आहेत. याठिकाणीं निरनिराळीं अत्तरें तयार होत

करून जाऊन त्यानें तेथील किल्ल्यास वेढा घातला; तेव्हां शीरशहा यानें सतत चार महिने तो किल्ला लढविला; परंतु अखेरीस हुमायूनपुढें आपला निभाव लागणार नाहीं असें पाहून तो आपला मुलगा जलालखान यासह त्यास शरण आला. तेव्हां आपल्या नेहमींच्या दयाळू स्वभावाप्रमाणें त्यानें चुनारगडचा किल्ला शीरशहाच्याच ताब्यांत ठेविला. व त्याचा मुलगा जलालखान यास आपल्या नोकरींत ठेवून त्यास एका सैन्याचें आधिपत्य दिलें. वास्तविक शीरशहासारख्या आपल्या बलिष्ठ शत्रूस त्यानें क्षमा केली एवढ्या पुरतें हुमायूनचें कृत्य दयाळूपणाचें ह्मणतां येईल पण त्याला तशाच बलिष्ट स्थितींत कायम ठेवून, चुनारगडसारखा बळकट किल्ला पुन्हा त्याच्याच ताब्यांत ठेवून आणि त्याच्या मुलाला बादशाही सैन्यांत सेनापतीची जागा देऊन, त्याला अधिक बलिष्ट बनविण्यांत हुमायूननें आपल्या सद्गुणाचा अतिरेक केला. राजकीयदृष्ट्या अयोग्य, व असमर्थनीय घोडचूक केली आणि तिचेच भयंकर परिणाम त्यास पुढें लवकरच भोगणें प्राप्त झालें.

यावेळीं गुजराथमध्यें बहादूरशहा ( इ० सन १५२६-१५३६ ) या नांवाचा स्वतंत्र राजा राज्य करीत होता. त्यानें माळव्याचा सुलतान महंमूदशहा यानें त्याच्या विरुद्ध खटपटी केल्यामुळें, माळवा प्रांतावर स्वारी करून व त्यास नामशेष करून माळवा प्रांतही आपल्या राज्यांत सामील केला होता, व अशा रीतीनें तो अतिशय बलाढ्य होत चालला होता; त्यानें यावेळीं हुमायूनविरुद्ध कारस्थानें केल्यामुळें, हुमायून हा त्याच्यावर गुजराथेंत चाल करून गेला व बहादूरशहाचा पराभव करून बहुतेक सर्व गुजराथ प्रांत व चंपानेरचा किल्ला त्यानें आपल्या हस्तगत करून घेतला; तेव्हां बहादूरशहा दीवकडे पळून गेला, व गुजराथ आणि माळवा हे दोन सधन प्रांत हुमायूनच्या हातांत आले; परंतु त्याच्या नेहमींच्या आळशी, अनिश्चित व बेफिकीर स्वभावाप्रमाणें त्यावेळीं पुन्हांही त्याच्या हातून चुकीचें वर्तन घडलें; वास्तविकरीत्या आपल्या हातीं आलेल्या या अतिशय महत्वाच्या प्रदेशाची सुव्यवस्था त्यानें स्वतःच करावयास पाहिजे होती, आणि तशी व्यवस्था व बंदोबस्त त्यानें केला असता तर त्यामुळें त्याला प्रसंगीं अतिशय उपयोग व फायदा झाला असता; परंतु आपला भाऊ अस्करी याजवर तिकडील बंदोबस्ताची कामगिरी सोंपवून तो आग्रा येथें परत आला. ( इ० सन १५३६ ) इकडे अस्करी हा काळ, वेळ, प्रसंग न पाहतां अहंमदाबादेस चैन करीत राहिला;

---

असून पूर्वी त्याठिकाणीं पुष्कळ कागद देशी पद्धतीनें तयार होत असे. जोनपूर हें शहर शर्की या नांवाच्या एका स्वतंत्र मुसलमानी राजघराण्याची इ० सन १४९३ पर्यंत राजधानी होती; त्याप्रमाणेंच जाफराबाद हें उत्तम ह्मशीकरितां प्रसिद्ध आहे.

त्याचा फायदा बहादूरशहानें पूर्णपणें घेतला. त्यानें आपल्या फौजेची जमवाजमव केली, आणि बादशाही सैन्याचा पराजय करून नऊ महिन्यांतच आपलें गेलेलें राज्य पुन्हां परत मिळविलें, व त्यामुळें हुमायूनाचा सर्व खटाटोप व्यर्थ होऊन गेला.

अशा स्थितींत, आग्रा येथें असतांनाच त्यास शीरशहाचें बंड व बहादूरशहानें गुजराथ व माळवा प्रांताचा पुन्हा मिळविलेला ताबा, या संबंधींची बातमी समजली; परंतु त्यानंतरही तडकाफडकीं कोणताच निश्चय न करितां एक वर्ष त्यानें विचारांत घालविलें, व नंतर गुजराथेंत न जातां प्रथम शीरशहावर जाण्याचें ठरवून तो चुनारगड किल्ल्यावर चाल करून गेला; परंतु त्याच्या येण्याच्या पूर्वींच शीरशहानें रोटसगडचा मजबूत किल्ला धाडसानें पण विश्वासघातानें मिळवून तेथें त्यानें आपलीं बायकामुलें, खजिना व दारूगोळा वगैरे ठेविला, आणि बिहार प्रांतांतून बंगाल प्रांतांत जाण्यास मध्यें लागत असलेली राजमहाला-च्या डोंगराची खिंड ओलांडून हुमायूननें आपणावर चाल करून यावें, म्हणजे दळणवळणाचा मार्ग बंद करून त्यास लांबच्या पल्ल्यावर गांठून त्याचा निकाल उडविण्यास आपणास सोईचें होईल, अशा दूरदर्शी विचारानें आपला धाकटा मुलगा जलालखान यास त्या खिंडीच्या तोंडाशीं ठेवून तो हुमायून यास हुलकावणी दाखवीत व मार्गातील प्रदेश उजाड करीत बंगाल प्रांतांत उतरला; आणि पूर्वी बंगालची राजधानी असलेलें गौड हें शहर हस्तगत करून घेऊन, तो हुमायूनच्या हालचालींचें बारिक रीतीनें निरीक्षण करीत राहिला. परंतु शीरशहाचा कावा हुमायूनच्या लक्षांत आला नाहीं; त्याबद्दल त्याला तिळमात्रही संशय आला नाहीं, आणि रोहटसगड येथील किल्लेदार हरीकृष्ण, याच्या प्रमाणेंच त्याचीही फसगत होऊन, त्याचें अतिशय नुकसान झालें.

---

**टीप १:**—रोहटसगड हा डोंगरी किल्ला बिहार प्रांतांतील सासीराम ( Sasseram ) या शहरापासून दक्षिणेस तीस मैलांवर कोयल नदी ज्याठिकाणीं शोणभद्रनदास मिळते, तेथून जवळच आहे. सोलार घराण्यांतील हिंदू राजा हरिश्चंद्र याचा मुलगा रोहिताश्व ( अथवा रोहिदास ) याच्या नांवावरून या ठिकाणास रोहिताश्वगड हें नांव पडलें, व पुढें रोहटसगड हा त्याचा अपभ्रंश झाला. या ठिकाणीं रोहिदासाचें एक मंदीर होतें; तें पुढें अवरंगझेबानें मोडून टाकिलें. पूर्वकाळीं हा किल्ला फारच मजबूत भव्य, व मोठा असल्याची त्याची ख्याति होती. या किल्ल्यानें पूर्वपश्चिम चार मैल आणि उत्तरदक्षिण पांच मैल जागा व्यापिली असून त्याचा एकंदर घेर अजमासें अठ्ठावीस मैलांचा आहे. त्यांतील बहुतेक जागा पूर्ण खडकाळ असून बाकी तांबड्या जमीनीची आहे. या किल्यांत वर जाण्याला एकंदर ८३ रस्ते असून त्यापैकीं

हुमायूनपासून स्वतःचें संरक्षण करून घेण्याला, व चुनारगडहून पुष्कळच पटीनें अधिक सुरक्षित असलेला रोटसगडाचा तेथून जवळच असलेला किल्ला आपल्या ताब्यांत घेण्याची शीरशहा यास स्वाभाविकरीत्याच आवश्यकता भासली; तथापि तो किल्ला सहज हस्तगत होणें शक्य नव्हतें. ह्मणून त्यानें तेथील किल्लेदार हरीकृष्ण, यास आपलीं बायकामुलें रोटसगडच्या किल्यांत ठेवण्याची परवानगी देण्याबद्दल विनंति केली, व त्यानेंही शीरशहावरील प्रसंग जाणून त्यास तशी परवानगी दिली; पण या उपकाराचा बद्दला त्यानें अपकारानें फेडिला; विश्वासघात केला. पालख्यांतून हत्यारबंद शिपाई पाठवून त्यानें किल्ला ताब्यांत घेतला; हरीकृष्णास हांकलून लाविलें, आणि तो किल्ला त्यानें दग्यानें बळकाविला. पण या विश्वासघातकी स्वभावाचें व कृतीचें त्यास कोणतें फळ मिळालें? हुमायूनचे उपकार विसरून शीरशहा त्याच्यावर उलटला. हरीकृष्णाचे उपकार अपकारानें फेडून दुसऱ्यांदा विश्वासघात केला; हा " इजा " व " बिजा " प्रसंग झाला. रायसीन येथें त्यानें पुढें केलेलें वर्तन हा विश्वासघाताचा " तिजा " प्रसंग झाला; त्यामुळें त्याचा विश्वासघात जगजाहीर झाला; मारवाडचा राजा मालदेव यास, आपसांत फूट पाडण्याच्या उद्देशानें कपटानें बनावट पत्र पाठविल्यानंतर " मूठभर दाणे मिळविण्याच्या नादांत सर्व राज्य हातांतून जाण्याचा प्रसंग आला. " आणि त्याच विश्वासघातकी बुद्धीनें त्याचा विनाशकाल नजीक ओढून आणून कालिंजर येथील किल्ल्यांत त्याच्या प्राणाचा बळी घेतला! दगा कोणाचा सगा नाहीं, कधीं झाला नाहीं, कधीं होणार नाहीं, हेंच सत्य, त्रिवार सत्य, अखंड सत्य आहे, यांत बिलकूल संदेह नाहीं. उलटपक्षीं बादशहा हुमायून याच्याविषयीं ह्मणावयाचें ह्मणजे "ऐश्वर्यापेक्षां विपत्तिचें ओझें त्याला अधिक चांगल्या रीतीनें सहन करितां येत असे. इतका जरी तो शांतपणानें व चिकाटीनें निरनिराळ्या आपत्तींशीं सारखा झगडून अधिक शोभायमान दिसत होता, तरी त्याच्या सद्गुणांचा अतिरेक होऊन व तोच दुर्गुण होऊन त्याचें सर्व तारुण्य दुःखांत, कष्टांत, वनवासांत, विवंचनेंत कंठण्याचें त्याच्या नशिबीं आलें, आणि देशोधडीस लागून कालचक्राच्या चरकांत—स्वतःच्या दुर्गुणामुळें नव्हे—सद्गुणाच्या

---

चार प्रमुख आहेत. त्यांना घाट व बाकीच्यांना घाटी ह्मणत. या ठिकाणीं राजा मानसिंग यानें बांधिलेलीं दोन देवालयें अस्तित्वांत असून, तेथें जवळच एक मशीद आहे ती अवरंगझेबानें बांधिली आहे असें ह्मणतात. त्याप्रमाणेंच किल्ल्यांत राजवाडा व " बारद्वारी " या नांवाचें एक ठिकाण असून त्याठिकाणीं सरकारी कामकाज करीत असत. हा किल्ला हल्लीं मोडकळीस आलेला असून त्याचे अवशेष आजतागायत अस्तित्वांत आहेत.

अतिरेकामुळें तोच दुर्गुण होऊन—कालचक्राच्या जात्यांत तो भरडून निघाला. या त्याच्या दैवदुर्विलासाचें कोणासही दुःख वाटून त्याच्याविषयीं विशेष आदर व कळवळा उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं. तो पराक्रमी बाबर याचा महान पितृभक्त पुत्र होता. ह्मणूनच या संकटांतून यशस्वीपणानें बाहेर तरी आला. त्याची उज्वल पितृभक्ती सर्व आपत्तींत त्यास मार्गदर्शक झाली, आणि आपत्तिचे खडतर अनुभव घेत घेत आपलें भावी आयुष्य क्रमीत असतां त्याच पितृभक्तीच्या दिव्यतेजानें साह्यकारी व मार्गदर्शक होऊन आपत्तीच्या कंटकमय प्रवासांतून सुरक्षित व यशस्वीपणें बाहेर राजमार्गावर आणून त्यास पुन्हां आपलें पूर्ववैभव प्राप्त करून दिलें, आणि पूर्वीप्रमाणें " हिंदुस्थानचा बादशहा " बनविलें.

वर लिहिल्याप्रमाणें हुमायून हा राजमहालच्या खिंडींतून पलीकडे गेल्यावर गौडजवळ तळ देऊन राहिला असतानांच त्याचा दगलबाज भाऊ हिंदाल हा त्याला विचारल्याशिवाय आग्रा येथें निघून गेला. त्याचें अनुकरण करून हुमायूनचें इतरही बरेंच सैन्य त्यास सोडून गेलें. हिंदाल आग्रा येथें गेल्यावरही स्वस्थ न बसतां हुमायून संकटांत असलेला पाहून, तो स्वतःच आपणास बादशहा ह्मणवून घेऊं लागला; अगाऊ ठरविल्याप्रमाणें पावसाळा सुरू झाल्यानंतर शीरशहानें हुमायूनचें दळणवळण बंद पाडिलें. चुनारगडाचा किल्ला हस्तगत करून घेतला. परत फिरणाऱ्या हुमायूनवर हल्ला करून त्याचा पूर्ण पराभव करून टाकिला, रोटसगडचा किल्ला हरीकृष्णास फसवून आपल्या ताब्यांत घेऊन तेथें सैन्यसामुग्री भरून घेतली. आपल्या बायकामुलांस त्याठिकाणीं ठेविलें. हुमायूनशीं जोराची धडाडी देऊन त्यास नामोहरम करण्याची त्यानें मोठी जय्यत तयारी केली. बक्सार नजीक तो बेसावध असतां त्या संधीचा फायदा घेऊन त्याच्या सैन्यावर हल्ला करून, तो गंगानदीवर बांधीत असलेला होड्यांचा पूल पूर्ण होण्याच्या आधींच त्याचा पूर्ण पराजय करून टाकिला व प्रत्यक्ष त्यालाही आपला जीव जगविण्याकरितां तेथून पळून जाणें भाग पाडिलें. ही वेळ मोठी आणीबाणीची होती, आणि खुद्द त्याच्यावरच दुष्मानाच्या हातीं पडण्याचा घोर प्रसंग आला होता; परंतु निव्वळ नशीबानें खैर केली ह्मणूनच तो एकाच वेळीं आलेल्या या, व पाण्यापासून अपमृत्यूच्या या, अशा दोन्हीं संकटांतून निभावला. ( मे इ० सन १५३९ ) बक्सार येथें त्याचें बाबरच्या वेळेपासूनचें शूर व कसलेलें बहुतेक सर्व सैन्य शत्रु व पाणी यांनीं नाहींसें केलें; आणि नाइलाज होऊन गंगानदी उतरून पलीकडे पोहून जाण्यासाठीं हुमायूननें जीवाच्या भीतीनें आपल्या राणीस मागें टाकून आपला घोडा नदींत घातला. पण गंगानदीच्या विशाल पात्रांत घोडा कसाचा टिकतो, व कसचा नदी पोहून जातो ? घोडा नदींतच

बुडून मेला, आणि हुमायूनवरही तोच प्रसंग येऊन ठेपला होता. इतक्यांत एका पखालजीनें बादशहा बुडतो असें पाहून नदींत उडी टाकिली, आणि त्यास आपल्या हवेनें फुगविलेल्या पखालीवर बसवून सांभाळून पलीकडे नेलें; ह्मणूनच तो या प्रसंगांतून वांचला. नंतर तो तडक आग्रा येथें येऊन पोहोंचला. हुमायूनची राणी शीरशहाच्या हातीं सांपडली परंतु यावेळीं, विश्वासघात अथवा फसवेगिरी न करितां त्यानें थोर पुरुषास साजेल असेंच वर्तन केलें, व योग्य इतमाम बरोबर देऊन तिची हुमायूनकडे आग्रा येथें मोठ्या सन्मानानें रवानगी करून दिली.

मोंगल घराणें हें हिंदुस्थानांत परकीय असून त्यांच्या चालीरीतीही परदेशीय होत्या. हिंदुस्थानांतील हिंदू अथवा अफगाण लोकांवर भरंवसा ठेवणें धोक्याचें असल्यामुळें नेहमीं ताज्या रक्ताचे तरुणबांड स्वभूमींतून आणून राज्याची बळकटी कायम ठेविली जात होती; व आपल्या जातीच्या आणि आपल्या धर्माच्या हिंदुस्थानांतील बादशहाच्या हाताखालीं नोकरी करण्याकरितां जे बळकट व जोमदार तरुण हिंदुस्थानांत येत असत त्यांतूनच मुख्यत्वेंकरून लष्करी आणि दिवाणी खात्यांतील मुख्य मुख्य अधिकारी निवडले जात असत. बाबरच्या वेळेस असेंच आपल्या जिल्ह्याचें व जन्मभूमींतील कसलेलें शूर सैन्य बादशाही नोकरींत होतें; परंतु या सैन्याचा बक्सार येथील आपत्तीनें विध्वंस झाला होता. अफगाणिस्थान व पंजाब हे दोन्हीं प्रांत हुमायून यानें कामरान यास दिल्यामुळें बादशाही सैन्याचें सामर्थ्य कायम ठेवण्याचा मार्ग व साधन पूर्णपणें नष्ट होऊन गेलेलें होतें. उलट त्याचा घातकी व स्वार्थी भाऊ कामरान याच्या हातीं तें साधन जाऊन तो प्रबळ झाला होता, आणि सर्व बाजूंनींच हुमायूनची स्थिति संकटप्रद झालेली होती. त्याच्या जवळ सैन्याचा अभाव होता. बक्सार येथील विध्वंसकारक आपत्तीनें त्याच्या इभ्रतीस धक्का पोहोंचला होता. त्याच्या पैकीं अस्करीचें मन त्याच्या विषयीं शुद्ध नव्हतें. हिंदाल तर आपणास "बादशहा" ह्मणवून घेऊं लागला, इतका त्याच्याविरुद्ध झालेला होता. कामरान काबुलहून त्याच्यावर चाल करून येण्यास निघाला होता. शीरशहानें हुमायूनला बक्सार येथून पळवून लाविल्यावर स्वतः बादशाहीपद धारण केलें होतें. ( इ० सन १५३९ ) मोंगल व अफगाण यांच्या मधील द्वेषबुद्धिमुळें शीरशहाला फायदेशीर स्थिति प्राप्त झालेली होती. मोंगलांनीं हिंदुस्थानांत बादशाहीपद मिळविलें ही गोष्ट अफगाण लोकांच्या मनांत पूर्णपणें डांचत असून मोंगलबादशाही नाहींशी करून पुन्हा अफगाण घराण्याकडे हिंदुस्थानची बादशाही आणण्याचा "हुमायून-बरोबरील युद्ध" हा प्रयत्न होता. मोंगलांविषयीं असलेल्या वैरभावाची शीरशहास जबर दस्त मदत झाली होती; आणि घरांतील दिवाणेदोस्त—भायात, आणि बाहेरचे दमदार

दुष्मन हे एकाच वेळीं या दुर्दैवी व फाजील दयाळू हुमायून वर उलटून त्यास अत्यंत विपन्नावस्था प्राप्त झाली होती. अशावेळीं हाडामासांत मुरलेला आपल्या भावांचा बेइमानीपणा बाहेर फुटून निघूं नये, ह्मणून हुमायूननें त्यांच्याशीं सलोखा केला.–या तीन्हीं भावांच्या साडेतीन हाताच्या देहभर पसरून त्यांत न मावल्यामुळें ऊत येऊन बाहेर पडत असलेला बेहमानपणा, दगाबाजी, फरुवेगिरी व विश्वासघात यांची गळचेपी करण्याकरितां, प्रेमाचा चालचलाऊ जाडपत्रा त्यांच्या अंगाभोंवतीं मढवून त्यांच्याशीं तात्पुरतें सख्य व ऐक्य केलें आणि कशीबशी भाडोत्री सैन्याची जमवाजमव करून तो शीरशहावर चाल करून निघाला; व गंगेवर होड्यांचा पूल बांधून पलीकडे येऊन दाखल झाला. तेव्हां इकडे शीरशहाही बंगालमधून तयारीनिशीं हुमायूनवर चाल करून आला; व कनोजनजीक या उभय सैन्यांची गांठ पडली; परंतु युद्धास सुरवात होते न होते तोंच हुमायूनचें सैन्य त्यास सोडून पळून गेलें, आणि सहजासहजींच शीरशहास विजयप्राप्ति होऊन हुमायूनवर पुन्हा शत्रूच्या हस्तगत होण्याचा प्रसंग येऊन ठेपला. परंतु त्याचा घोडा जखमी झाल्यावर त्याच्या एका इमानी नोकरानें त्याला मोठ्या लगबगीनें एका हत्तीवर बसवून नदीपार केल्यानें त्याचा जीव शत्रूच्या तडाक्यांतून बचावला. पण पलीकडील दरड उंच असल्यामुळें तो नदींत बुडण्याच्या बेतांत आला होता; परंतु याहीवेळीं त्याच्या नशीबानें खैर केली. बादशहा संकटांत पडलेला पाहून कांठावर उभे असलेल्या दोन शिपायांनीं आपल्या डोक्यावरील पागोटीं एकापुढें एक गांठवून खालीं सोडिलीं, व त्यांच्या आधारानें बादशहा जगून सुरक्षितपणें वर आला. एकाच वर्षांत लागोपाठ दोनदां गंगानदीवरच पराभूत होण्याचा, व दुसऱ्याखेपेसहि गंगानदींतच बुडून मरण्याचा हुमायूनला अगदीं एक सारखाच प्रसंग आला होता. हा योगायोगही चमत्कारिक, लक्षांत ठेवण्यासारखा–इतकेंच नाहीं तर कादंबरींत शोभण्यासारखा–आहे. त्यानंतर तो आपल्या हिंदाल व अस्करी या भावांसह मोठ्या त्वरेनें आग्रा येथें आला. व तेथून आपलें जडजवाहीर वगैरे बरोबर घेऊन तो पंजाबकडे पळून गेला, आणि अशा रीतीनें मोंगल घराण्यांकडून हिंदुस्थानची बादशाही पुन्हा अफगाण घराण्याकडे जाऊन शीरशहा सूर हा त्या घराण्याचा पहिला बादशहा बनला.

शीरशहा याचे पूर्वज मूळ घोर प्रांतांतील असून, नंतर त्याचा आजा इब्राहिमखान सूर हा पेशावर प्रांतांतील रोह या नांवाच्या शहरीं वास्तव्य करण्यास आलेला होता. "सूर" हें घोर प्रांतांतील एका अफगाण घराण्याचें जातिदर्शक नांव आहे; ह्मणून या घराण्यास "अफगाण घराणें" "अफगाण सूर घराणें" अथवा नुसतें "सूर घराणें" असें ह्मणतात. या घराण्यांतील नुकताच दिल्ली येथें बादशहा झालेला शीरशहा हा

बिहार प्रांतांतील सासिराम येथील मूळचा राहणारा होता, व स्वतःमधील कर्तृत्व व पराक्रम यांच्या जोरावर आपलें वर्चस्व वाढवीत वाढवीत-तो आतां बादशहा बनला होता. त्यानें गादीवर आल्यावर रोटसगडचा किल्ला पुन्हा नव्यानें बांधून तेथें खवासखान या नांवाच्या सरदारास ठेवून उत्तम बंदोबस्त केला. बंगाल प्रांतांतील त्याचा सरदार खिजरखान यानें केलेलें बंड मोडून त्या प्रांतांची सुव्यवस्था केली. ग्वाल्हेर व रतनभोर हस्तगत करून घेतलें ( इ० सन १५४२ व माळवा प्रांत हस्तगत करून घेण्याकरितां त्यानें तिकडे स्वारी केली. त्यावेळीं मार्गांत त्यास असें समजलें कीं, रायसीन येथील ठाकूर प्राणमल्ल यानें कित्येक मुसलमान स्त्रियांना पकडून आपल्या जनानखान्यांत आणून ठेविलें आहे. त्यावरून त्यानें प्राणमल्ल याला आपल्या भेटीस बोलाविलें; परंतु त्यानें स्वतः न येतां सहाशें हत्ती त्यास नजर ह्मणून पाठवून दिले यामुळें शीरशहास राग येऊन त्यानें प्राणमल्लवर स्वारी केली. तेव्हां प्राणमल्ल यानें सतत सहा महिनें मोठ्या हिंमतीनें व पराक्रमानें शीरशहाबरोबर युद्धप्रसंग करीत किल्ला लढविला; परंतु अखेरीस निभाव लागत नाहीं, असें पाहून त्यानें किल्ला शीरशहाच्या स्वाधीन करण्याचें ठरविलें, व कोणाचीही संपत्ति अथवा हत्यारें हिरावून घेणार नाहीं, किंवा कोणाही बायकामुलांस धक्का लावणार नाहीं, असें शीरशहाजवळून वचन घेऊन तो त्याच्या भेटीस गेला; परंतु शीरशहाजवळील एका साधूनें "काफरास दिलेलें वचन पार पाडण्याची अवश्यकता नाहीं" असें सांगितल्यावरून शीरशहानें विश्वासघात करून स्वाधीन झालेल्या निरपराधी लोकांची कत्तल करविली. तेव्हां हाच प्रसंग आपणावरही येणार असें जाणून जीवावर उदार होऊन प्राणमल्ल यानें आपली प्रिय राणी रत्नावली हिचा शिरच्छेद केला, व त्याच्या इतर सरदार मंडळींनींही त्याचेंच अनुकरण केलें;

---

**टीप १**:-सासिराम ( Sasseram ) ऊर्फ साहस्राम हें ठिकाण बिहार प्रांतांत आऱ्हा या शहरापासून ७२ मैलांवर, व बक्सार येथून ५७ मैलांवर आहे. या ठिकाणीं शीरशहाची सुंदर कबर असून "चंदन-शाहीद" "Chandan Shahid" या नांवाची एक त्यानें बांधिलेली भव्य मशीद गांवाच्याजवळ पूर्वेस एका उंच टेंकडीवर अजून सुस्थितींत आहे; आणि तिच्या सभोंवती एक मैल परिघाचा पाण्याचा खंदक असून या इमारतीचें सर्व काम अफगाण पद्धतीचें, मोठें सुंदर व विषेश प्रेक्षणीय आहे.

**टीप २**:-रायसीन हें ठिकाण प्रसिद्ध सांची येथील स्तूपापासून दहा मैलांवर व हुशंगाबादेपासून पन्नास मैलांवर भोपाळ संस्थानांत पूर्व बाजूस असून त्याठिकाणीं पूर्वीचा एक किल्ला आजतागायत जीर्ण स्थितींत अस्तित्वांत आहे.

व अफगाण लोकांशीं तशाच निराशाजनक स्थितींत लढून प्राणमल्लासह ते सर्व एकवटून मृत्यु पावले. तथापि प्राणमल्लाची मुलगी व त्याचे तीन मुलगे शीरशहाच्या हातीं सांपडले. यावेळीं त्यानें विश्वासघातानंतर घोर–महाघोर अत्याचार केला. त्याच्या दीन मुलीस त्यानें गाणारणीचा धंदा शिकाविला, आणि तीन्हीं मुलांचें पुरुषत्व हरण करून आपल्या नांवास काळोखी लावून घेतली ! त्यानंतर तो मारवाडांत गेला; तेव्हां तेथील शूर राजा मालदेव यानें त्याचा मोठ्या जोरानें प्रतिकार चालविला; तेव्हां शीरशहानें आपसांत फूट पाडण्याकरितां एक बनावट पत्र मालदेवास पाठविलें. त्यामुळें तो फसून भीतीनें त्याचा सरदार कुंच याचें न ऐकतां समरभूमि सोडून गेला. तथापि कुंभानें मर्दपणानें लढून " मूठभर दाणे मिळविण्याच्या धडपडींत सर्व राज्य हातांतून जाण्याचा " त्याच्यावर प्रसंग आणिला; परंतु ऐनवेळीं शीरशहास नवीन कुमक आल्यामुळें तो प्रसंग निभावून त्याला यशप्राप्ति झाली. त्यानंतर चितोडगडवर स्वारी करून तो रतनभोर येथें गेला, आणि त्याठिकाणीं आपला वडील मुलगा अदिलखान यास ठेवून बांदा शहरापासून तेहतीस मैलांवर असलेल्या प्रसिद्ध कालिंजरच्या किल्ल्यास त्यानें वेढा घातला. हा किल्ला मोठा मजबूत असून शीरशहानें रायसीन येथें केलेला विश्वासघात तेथील लोकांना पूर्णपणें कळलेला होता. त्यामुळें शस्त्रानें कापून मरूं पण शद्धानें फसून मरणार नाहीं, अशा निश्चयानें कालिंजरचा राजा स्वसैन्यानिशीं शत्रूशीं टक्कर देत राहिला होता, आणि इकडे शीरशहाही आपल्या जोरदार सैन्यासह किल्ला हस्तगत करून घेण्याकरितां मोठ्या अट्टाहासानें त्या शत्रूसैन्याशीं झगडत राहिला होता. इतक्यांत किल्ल्यांतील तोफेचा एक गोळा एकाएकीं शीरशहाच्या दारूखान्यांत येऊन पडला त्याबरोबर त्याचा दारूखाना एकदम जोरानें उडून त्यांत त्याच्या सैन्याचा अतिशय प्राण संहार झाला, व शीरशहाही भयंकर जखमी होऊन शेवटच्या मार्गास लागला. तथापि त्याचा प्राण घुटमळत राहिला आणि सायंकाळीं किल्ला ताब्यांत आला ( तारीख २२ मे. इ० सन १५४५ ) असें कळल्यावर त्यानें मोठ्या समाधानानें आपला प्राण सोडिला ! शीरशहानें पांच वर्षें ( इ० सन १५४० ते १५४५ ) राज्य केलें. त्याच्या मृत्युनंतर कालिंजर येथील किल्ल्यांतच त्याचा धाकटा मुलगा जलालखान यास शीरशहाच्या सरदार मंडळींनीं राज्याभिषेक केला व त्यानें सलीमशहा हा किताब धारण करून तो राज्यकारभार करूं लागला.

शीरशहा हा अतिशय शूर, पराक्रमी व कर्तबगार बादशहा होऊन गेला यांत संदेह नाहीं. तो धर्मद्वेषी नव्हता. बंगाल प्रांतांत तो पुष्कळ काळपर्यंत कारभार करीत होता; आणि त्या प्रांतांतील बहुतेक प्रजा हिंदू असूनही त्यानें धर्माच्या नांवाखालीं तेथील प्रजेवर केव्हांही अत्याचार अथवा जुलूम केले नव्हते. त्याच्या पांचवर्षांच्या

कारकीर्दींतील पुष्कळ काळ युद्धांत गेला होता, तरी त्यांतल्यात्यांत मिळालेल्या अवधींत त्यानें प्रजाहिताचीं कित्येक कामें केलीं होतीं. बंगाल प्रांतांत सोनारगांव या ठिकाणापासून ह्मणजे येथून जवळच दोन मैलांवर ब्रह्मपुत्रानद आहे तेथून–तो थेट सिंधूनदापर्यंत दोन हजार मैलांच्या रस्त्यावर त्यानें दर दोन मैलांस एक विहीर व एक धर्मशाळा बांधून व ठिकठिकाणीं अन्नछत्रें घालून प्रवासी लोकांची सोय केली होती. त्याप्रमाणेंच अनेक मशीदी बांधून, व रस्त्यांवर दुतर्फा झाडें लावून टपालघरें बांधिलीं होतीं. घोड्यांचीं टपालें सुरू केलीं होतीं; सर्व राज्यभर एकाच पद्धतीचीं वजनें व मापें सुरू केलीं होतीं; "रुपया" हें चांदीचें नाणें त्यानेंच प्रथम व्यवहारांत आणिलें होतें, व दिल्ली सभोंवतीं एक मोठा भव्य तट बांधिला होता; या तटाचा "लाल दरवाजा" या नांवाचा अवशेष आजतागायत दिल्ली येथें अस्तित्वांत आहे.

वरील विवेचनावरून शीरशहा प्रजादक्ष होता हें उघड होतें. त्याच्या हातून रायसीनसारखें दुसरें क्रूर व घोर कृत्य घडलें नाहीं; व या त्याच्या कृत्याचें केव्हांही समर्थन करितां येणार नाहीं. इतकेंच नाहीं तर असें पुरुषत्व भंग केल्याचें, घोर व अत्यंत अक्षम्य अत्याचाराचें हिंदुस्थानांतील इतिहासांत दुसरें उदाहरण आढळून येत नाहीं. खून करणें, डोळे काढणें, हाल हाल करून ठार मारणे वगैरे अनेक प्रकारच्या अत्याचारांची हिंदुस्थानच्या इतिहासांत सारखी पुनरावृत्ति झालेली पाहण्यांत येते, पण पुरुषत्व हरण करण्याचा महाघोर अत्याचार केल्याचें मात्र इतिहासांत दुसरें उदाहरण दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. त्याला विश्वासघात करण्याची गोडी लागली व पहिला विश्वासघात पचनी पडून तो फायदेशीर झाल्यावर ती वाढत गेली. परंतु याच विश्वासघाताच्या गोळीनें आणि प्राणमल्लाच्या प्राणानें कालिंजर येथें त्याचीं आंतडीं बाहेर काढून त्याचा प्राणनाश केला. तो पराक्रमी होता, पण त्या पराक्रमाला नैतिकबळाचा बिलकूल आधार नव्हता. तो शूर होता पण विश्वासघातानें त्याच्या शौर्यास कीड लागली होती, आणि तो कर्तृत्ववान् होता तरी त्याचें कर्तृत्व रायसीनच्या घोर कृत्यानें मलिन झालेलें होतें. तथापि हुमायून व प्राणमल्ल हे उभयतांही त्याचे शत्रू होते, आणि रायसीन येथील प्राणमल्लापेक्षां मोंगल बादशहा हुमायून हाच त्याचा अधिक प्रबळ व महत्वाचा शत्रू

---

**टीप १:**—सोनारगांव हें ठिकाण प्राचीन काळीं पूर्व बंगाल प्रांताची राजधानी ह्मणून होतें. ह्या ठिकाणीं पूर्वी राजधानी असतां विशेष जोराचा व्यापार चालत असे; व तेथें अतिशय सुबक व सुंदर मलमल तयार होत असे. हल्लीं हें गांव खेडेंवजा असून यास "पैनाम" या नांवानें विशेषतः ओळखतात.

होता. मग असें असूनही तो हुमायूनच्या राणीच्या बाबतींत थोरपणाचें वर्तन करितो व प्राणमल्लाच्या मुलांच्या बाबतींत घोर अत्याचार करितो हें कसें ? प्राणमल्ल हा हिंदू होता, ह्मणून "काफराला दिलेलें वचन" मोडून त्याच्याशीं शीरशहानें विश्वासघाताचें वर्तन केलें, तें क्षम्य आहे असें कदाचित गृहीत धरून त्याच्या त्या कृत्याचें थोडेंसें समर्थन करितां येईल, पण त्यानें प्राणमल्लाच्या मुलामुलींच्या बाबतींत जो अनन्वित प्रकार केला तो कां ? याचें कारण मूळ प्राणमल्ल हाच आहे. त्यानें पुष्कळ मुसलमान स्त्रियांना पकडून आपल्या जनानखान्यांत ठेविलें. ही गोष्ट ऐकून शीरशहाची कडवी धार्मिकवृत्ति सतेज झाली. प्राणमल्ल बोलाविल्याप्रमाणें न आल्यानें त्या ऐकीव गोष्टींत सत्य असल्याची त्याची खात्री झाली, व तो चीडीस पडला. पुढें प्राणमल्लानें सहा महिनें त्यास दाद न दिल्यामुळें त्याची सूड घेण्याची भावना परमावधीस गेली व प्राणमल्ल मृत्यु पावला तरी "त्याचीं मुलें" ह्मणूनच शीरशहानें त्या निरुपद्रवी अर्भकांवर आपला घोर सूड उगवून मनाचें समाधान करून घेतलें. कसेंही असो ! एवढें मात्र खरें कीं, त्यानें विश्वासघातानें कत्तल उडाविण्यांत रायसीन येथें अन्याय केला, आणि त्याच्या मुलांवर अतिशय घोर रीतीनें सूड उगाविण्यांत—कीं, जें कृत्य प्रत्यक्ष त्याच्याच रायसीन येथें असलेल्या मुसलमान शिपायांसही घोर वाटलें तें कृत्य करण्यांत तर त्यानें निव्वळ माणुसकीस न शोभेल असेंच वर्तन केलें.—त्यामुळें त्यानें अनेक सत्कृत्यें करून मिळविलेल्या कीर्तीला बराच कमीपणा आला, असें मोठ्या दिलगिरीनें ह्मणणें भाग आहे.

अल्लाउद्दीन खिलजी, शीरशहा, अवरंगझेब वगैरे अनेक राज्यकर्त्यांचीं विश्वासघाताचीं उदाहरणें इतिहासांत आहेत. आणि अशा राज्यकर्त्यांना पुष्कळ वेळां त्यांच्या दुष्टकृतींचें योग्य शासन परमेश्वरानें दिलें नाहीं असा त्यांची भरभराट व सद्दीचा जोर पाहून संशय उत्पन्न होतो. पण बारीक रीतीनें पाहिल्यास, प्रत्येकास मग तो राजा असो वा रंक असो, त्याच्या दुष्ट कृतीचें प्रायश्चित सौम्य अथवा उग्र स्वरूपांत, आणि लवकर अथवा उशीरां पण मिळालें आहे, असें आढळून येईल, इतकेंच नाहीं तर कित्येकदां तें पिढ्यानुपिढ्या भोगावें लागल्याचें निदर्शनास येईल.[1]

---

**टीप १:**—अशाच प्रकारची पण याहूनही विलक्षण, व विचारांत घेण्यासारखी खालील गोष्ट खानदेश जिल्ह्यांत घडलेली आहे; ("The Khandesh Bhil Corps" By Mr. A. H. A. Simcox, I. C. S. हें पुस्तक पान २४३ ते २४६ पहा.) ती अशी कीं:-इ० सन १८५७ मध्यें उत्तरहिंदुस्थानांत जेव्हां शिपायांचें

शीरशहाच्या मृत्यूनंतर त्याचा विषेश शूर सद्गुणी व तडफीचा परंतु संशयी व विश्वासघातकी धाकटा मुलगा सलीमशहा हा गादीवर आला. हा राज्यकर्ता किती

---

बंड झालें तेव्हां इकडे खानदेशांतही त्याची लहानशी आवृत्ति निघाली. खानदेशच्या ( आतां पश्चिम खानदेशच्या ) व होळकराच्या राज्याच्या सरहद्दीवर मुंबई–आग्रा सडकेवर शेंधवा या नांवाचा एक घाट असून त्याच्या अलीकडेस पळासनेर व सांगवी हीं गांवें ब्रिटिश हद्दींतील आहेत, आणि घाटाखालीं सेंधवा गांव व किल्ला होळकर हद्दींतलि आहेत. शेंधवाच्या घाटांत सांगवी येथें एक कायमचा रखवालदार ठेविलेला असून त्याच्या घराण्याकडेसच वंशपरंपरेनें घाटाच्या रखवालीचें काम असे. यावेळीं या घाटाचा रखवालदार खाजा नाईक ( भील ) या नांवाचा मनुष्य होता, व त्याला त्याबद्दल इंग्रज सरकाराकडून वेतन मिळत होतें. परंतु त्याच्या रखवालींत रस्तालुटींचे गुन्हे होऊं लागल्यामुळें त्यावेळचा खानदेशचा कलेक्टर मि. मॅन्सफील्ड यानें तात्पुरतें कामावरून दूर केलें होतें. नंतर खाजानाईकानें दोन तीन हजार लोक–भिल्ल, अरब, मकराणी वगैरे जमविले; लूटमारीचा धंदा सुरू केला; व दोनतीनदां सरकारी खजिनाही त्यानें लुटून घेतला. त्यामुळें खाजा नाईकाचा बंदोबस्त करण्यासाठीं मेजर हेसलवुड, ऍटकीन्स व बर्च या इंग्रज अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं एक पलटण पाठविण्यांत आली; तिनें "अंबापाणी" याठिकाणीं या टोळीवर हल्ला केला व तिची धूळधाण उडविली. खाजा नाईकाच्या दारूच्या गंजावर नेमचंद डागलेल्या तोफेंतील गोळ्यानें दारूला आग लागून उडालेल्या भडाक्यामुळें त्याच्या टोळींतील पंधराशें मनुष्यें जागच्याजागीं ठार झालीं, आणि जिवंत पकडलेल्या दीडशें लोकांना दुसऱ्या दिवशीं गोळ्या घालून ठार मारण्यांत आलें. परंतु खाजा नाईक त्यांत हस्तगत झाला नव्हता.

इकडे खाजा नाईक आणि भीमा नाईक ( भीमा नाईकानें इ० स० १८६७ पर्यंत सरकारास व रयतेस त्रास दिला; नंतर तो इग्रंज सरकारच्या स्वाधीन झाला, व त्यास काळेपाण्यावर पाठविण्यांत आलें ) व इतर दोन तीन पुढारी गोई नदीवर तळ देऊन राहिले होते. त्यावेळीं खाजा नाईकाचा जुना नोकर रोहिद्दीन मकराणी हा त्याच्या बरोबर नसून स्वदेशांत गेलेला होता, व तो तिकडून त्याटोळींतील इतर दहा मकराण्यासह नंदुरबार येथें परतला होता. नंदुरबार येथील फौजदाराला रोहिद्दिन वगैरे लोक तेथें आल्याचें कळल्यावर त्यानें त्या लोकांना ले० प्रोचिन अ० सु० पोलीस यांजकडे जामा देऊन पाठविलें व ते तेथें हजर झाल्यावर "खाजा नाईकास पकडा आम्ही तुम्हांस दोन हजार रुपये इनाम देऊं" असें त्यांना सांगण्यांत आलें. (खाजा नाईकाला पकडण्याबद्दल

सुस्वभावी व सरळ होता, हें तो गादीवर आल्यावर प्रथमदर्शनींच निदर्शनास आलें; व त्या नंतर त्याचा संशयी व विश्वासघातकी स्वभावही लागलाच दृष्टो-

दोन हजारांचें इनाम देण्यांत येईल असें जाहीर करण्यांत आलें होतें.) रोहिद्दीन यानें ती गोष्ट कबूल केली, व मळा पोलीस लोकांकडून मदत मिळण्याचा व मला कोणीही अडथळा करूं नये अशा आशयाचा हुकूम व्हावा, अशी त्यानें ले० प्रोबीन यांस विनंति केली. ती मान्य करण्यांत येऊन तो नंतर नंदुरबार येथें परत आला. तेथील फौज-दारास भेटून त्यानें ही सर्व हकीकत त्याला सांगितली, आणि गोईनदीवर टेंकड्यांत जेथें खाजा नाईक तळ देऊन राहिला होता त्याठिकाणीं गेला. रोहिद्दीन तिकडे पोहोंचल्या-वर खाजा नाईकाच्या टोळीच्या लोकांपैकीं एकानें त्याला पकडलें व खाजा नाईकास तशी वर्दी दिली. त्यावर खाजा नाईकानें, "त्याचीं सर्व हत्यारें काढून घेऊन त्यास माझ्या समोर आणा" असें सांगितलें; त्याप्रमाणें त्यास निःशस्त्र करून खाजा नाईकापुढें उभें करण्यांत आलें; तेव्हां खाजा नाईक त्यास ह्मणालाः—"रोहिद्दीन, तूं माझा जुना नोकर आहेस; परंतु तूं इंग्रजांना भेटलेला आहेस व मळा ठार मारण्याकरितां आला आहेस. सरकार तुला दोन हजाराचें बक्षीस देऊं ह्मणत आहे, पण मी ह्मणतों, तूं माझ्याजवळून पांच हजार रुपये घे आणि आपल्या देशाला परत जा." रोहिद्दीन ह्मणालाः—"राजा, मी तुझें अन्न खाल्लें आहे. मी तुझा असा विश्वासघात कधींही करणार नाहीं. मी तुझ्या नौकरींत इमानानें राहीन." नंतर खाजा नाईक ह्मणाला, "शपथ घे;" त्याप्रमाणें रोहिद्दीननें आपल्या हातांत कुराण घेऊन शपथ घेतली, नंतर खाजा नाईक ह्मणाला, "बेल हातांत घेऊन शपथ घे;" तेव्हां त्यानें बेल व कुराण आपल्या हातांत घेतलें, आणि ह्मणाला, "मी तुझा कधींही विश्वासघात करणार नाहीं." त्यावर भिमा नाईक खाजा नाईकास ह्मणाला, "खाजा नाईक, हा मकराणी लबाड आहे; हा तुझा विश्वासघात करील, याचा भरंवसा धरूं नकोस. परंतु रोहिद्दिननें पुष्कळ शफथा घेतल्यामुळें त्यास खाजा नाईकानें नोकरींत ठेवून घेतलें, व त्यास एक बोकड व गव्हाचें पीठ देऊन "जा आणि खा" असें सांगितलें. अशा रीतीनें रोहिद्दीन हा खाजा नाईकाजवळ नोकरींत राहिला. खाजा नाईक हा धार्मिक प्रवृत्तीचा मनुष्य होता. तो नेहमीं देवाची पूजा करण्यात जात असे. त्याच्याजवळ एक जादूचा तोडगा असून तो त्याच्या डोक्यांतील केंसांत बांधलेला असे, व त्यामुळें त्याला बंदुकीच्या गोळीनें अथवा तरवारीच्या घावानें जखम होत नसे, असा समज होता. पुढें एक दिवस खाजा नाईक हा नेहमींप्रमाणें तो जादूचा तोडगा व आपले सर्व कपडे गोई नदीच्या कांठावर ठेवून स्नानाकरितां नदींत उतरला; परंतु त्याचवेळीं रोहिद्दीन यानें गुप्तपणानें एका मकराणी मनुष्यास आपली बंदूक भरून नदी जवळील एका

त्तीस आला. वास्तवीक तो शीरशहाचा धाकटा मुलगा असल्यानें त्याचा वडील भाऊ अदिलखान याचाच राज्यावर अधिक हक्क पोंचत होता, आणि खुद्द

---

नाल्यांत बसवून ठेविलें होतें. इकडे नेहमींप्रमाणें खाजानाईक हा स्नान करून सूर्याकडे पहात त्याची आराधना करण्यांत मग्न झाला आहे तोंच त्या नाल्यांतील मकराण्यानें त्याच्यावर आपल्या बंदुकींतील गोळी सोडिली. ती खाजानाईकाच्या पाठींत लागली. त्याबरोबर तो मोठ्यानें ओरडला. त्याचे सर्व भिल्ल त्याच्याजवळ पळत गेले, आणि खाजानाईक त्यांना ह्मणाला, "माझा मुलगा पोलाद्सिंग याची काळजी घ्या;" व तो धाडकन् जमिनीवर पडला. इतक्यांत त्याची बहीण तेथें धांवत आली, व खाजानाईकाची ही स्थिति पाहून आक्रोश करीत ती त्याच्या अंगावर पडली. त्यावेळीं तेथें अगाऊच हजर असलेल्या रोहिद्दिन यानें आपली तरवार उपसली, व तो खाजानाईकाचें डोकें कापूं लागला. परंतु त्याची बहीण रोहिद्दिनला अडथळा करूं लागली; ह्मणून त्यानें पहिल्यानें तिचे तुकडे केले आणि नंतर खाजा नाईकाचें डोकें कापून तें, व त्याचा मुलगा पोलाद्सिंग यास बरोबर घेऊन तो धरणगांव येथें आला, व त्यानें ले० प्रोबीनची भेट घेऊन त्यास ही सर्व हकीकत जाहीर केली. रोहिद्दीनच्या या कृत्याबद्दल प्रोबिन यास फार राग आला, व "खाजा नाईकाचें डोकें मारण्याचा तुला केव्हां हुकूम दिला होता" असें त्यानें रोहिद्दिनास विचारिलें; त्यावेळीं धरणगांव येथें कलेक्टर व इतर पांच चार इंग्रज अधिकारी होते. त्यांनीं खाजा नाईकाचें डोकें धरणगांव (हें गांव व रेल्वे स्टेशन सुरत-जळगांव रेल्वेलाईनवर, जळगांव पासून अजमासें बारा कोसांवर एरंडोल तालुक्यांत आहे.) येथील शाळेजवळ एका लिंबाच्या झाडाला टांगवून ठेवविलें असून तें पुष्कळ लोकांनीं पाहिलें होतें. कलेक्टरानें पोलाद्सिंगास विचारिलें कीं, "हें डोकें कोणाचें आहे?" त्यावर पोलाद्सिंगानें उत्तर दिलें कीं, "हें डोकें माझ्या बापाचें आहे." पोलाद्सिंग हा त्यावेळीं चौदा पंधरा वर्षांचा असावा परंतु त्याला यावेळीं फार राग आलेला होता. तो ह्मणाला, "या रोहिद्दिनने माझ्या बापाचें अन्न खाऊन त्याच्याशीं निमकहरामी केली. त्यानें आपल्या हातीं कुराण व बेल घेऊन शपथ घेतली, आणि त्यानें आपल्या या शपथेचा भंग केला, याबद्दल ईश्वर त्याचा सूड घेतल्याशिवाय कधींही राहणार नाहीं." त्यावर कलेक्टरनें पोलाद्सिंगास सांगितलें कीं, "तूं कांहीं काळजी करूं नकोस. सरकार तुला आईबापाच्या ठिकाणीं होईल." नंतर खाजा नाईकाचें डोकें झाडावरून काढून घेऊन पुरून टाकण्यांत आलें. रोहिद्दिन यास कबूल केल्याप्रमाणें दोन हजार रुपयांचें बक्षीस देऊन त्यास पोलीसखात्यांत जमादाराची जागा देण्यांत आली, व त्यास नंदुरबार येथें नेमण्यांत आलें; त्याप्रमाणें तो तेथें गेल्यावर फक्त तीनच महिनें काय ती त्यानें नोकरी केली; आणि एकाएकीं त्याच्या तोंडांत व सर्वांगावर किडे पडून तो मृत्यु पावला!

शीरशहा याचीही तशीच इच्छा होती; परंतु सलीमशहा हा विशेष लोकप्रिय असल्यानें सरदार मंडळांनीं त्यास राज्यपद दिलें होतें; तथापि आपल्या वडील भावास एकीकडे करून आपण राज्यपदारूढ रहावें अशी त्याची इच्छा नव्हती; ह्मणून त्यानें आग्रा येथें गेल्यावर आपला वडील भाऊ अदिलखान यास बोलावून घेऊन, त्यास राज्यपद स्वीकारण्याविषयीं विनंती केली; तथापि सरदार मंडळी आपणास अनुकूल नाहींत असें पाहून त्यानें स्वखुषीनें राज्यावरील आपला हक्क सोडिला; तेव्हां सलीमशहानें आपला विश्वासू सल्लागार व मुख्य सेनापती खवासखान याच्या अनुमतीनें त्यास बियाना येथें जहागीर दिली, व त्याप्रमाणें तो तेथें जाऊन स्वस्थपणानें आपल्या जहागिरीचा उपभोग घेऊं लागला; परंतु दोनच महिन्यांत सलीमशहाच्या मनांत आपल्या वडील भावाविषयीं विकल्प उत्पन्न झाला, आणि त्यानें अदिलखानास बियाना येथें आपल्या सरदारांकडून पकडवून त्यास सोन्याच्या बेड्या घालून आग्रा येथें आणिलें, परंतु खवासखानास सलीमशहानें आपल्या भावाशीं केलेलें हें विश्वासघाताचें वर्तन आवडलें नाहीं;

---

**विशेष खुलासाः**—सेंधवा ऊर्फ "ग्वालनघाट" हा सातपुड्यांत असून त्यालाच हल्लीं "सेंधवाघाट" असें ह्मणतात; येथून सेंधव्याचा किल्ला दहा मैलांवर असून या घाटाची लांबी बोरगडपर्यंत दोन मैल आहे. ग्वालनघाटाच्या चौकीपासून अर्ध्या मैलावर बिजासनी देवीचें एक रम्य स्थान असून तेथें एक मोठें उत्तम तळें आहे. या ठिकाणीं दर रामनवमीस मोठी यात्रा भरते व तिला खानदेशांतून व होळकरशाहींतून पुष्कळ लोक जातात. या सेंधवाघाटाच्या माथ्यावर बोरगड ऊर्फ भवरगड या नांवाचा मराठ्यांच्या धर्तीचा एक किल्ला असून तो खाजा नाईकाच्या हालचालीवर देखरेख ठेवण्यासाठीं त्यावेळीं बांधिला होता. खाजा नाईकाच्या मृत्युनंतरही तेथें पूर्वीं होळकरशाहीचे दहा स्वार रहात असत. हल्लीं त्या ठिकाणीं चार चौकीदार राहतात. हा किल्ला होळकर हद्दींत असून तो सांप्रत मोडकळीस आला आहे. खानदेश व सेंधवा यांच्यामधील हद्दीची व्यवस्था इ० सन १८७८ मध्यें निश्चित करण्यांत आली.

**१ टीपः**—बियाना हें शहर राजपुतान्यांत भरतपूर संस्थानांत महू—आग्रा सडकेवर आग्रा शहराच्या नैऋत्य दिशेस पन्नास मैलांवर आहे. हें शहर विशेष प्राचीन असून येथील किल्ल्याची पूर्वीं हिंदुस्थानांतील विशेष मजबूत किल्ल्यांमध्यें गणना होती. या किल्ल्यामध्यें "भीमलाट" या नांवाचा एक विशेष भव्य दगडी खांब असून तो आसपासच्या प्रदेशांत पुष्कळ लांब पर्यंत दृग्गोचर होतो. मुसलमान लोक बियाना शहरास विशेष पवित्र मानितात. येथील किल्ल्यांतील व इतर मोठमोठ्या इमारती, मशीदी वगैरेचे अवशेष आजतागायत दृग्गोचर होत आहेत.

ह्मणून शीरशहापासून सूर घराण्याच्या नोकरींत असलेल्या या वृद्ध सरदारानें राजरोस आदिलखानाचा पक्ष घेऊन तो त्यास जाऊन मिळाला, व उभयतां भावांमध्यें युद्ध झालें. त्यांत सलीमशहास जय मिळाला. आदिलखान पाटणा शहराकडे पळून जाऊन नंतर बेपत्ता झाला. खवासखानास संभळचा सुभेदार ताजखान यानें ठार मारिलें, आणि अशा रीतीनें सलीमशहा निर्वेध बनून राज्य करूं लागला. त्यानें शीरशहानें बांधिलेल्या टपालकचेऱ्यांच्या दरम्यान एक एक अधिक टपालकचेरी बांधिली. रस्त्यांवर विशेष बंदोबस्ताची तजवीज केली, आणि इतर अनेक लोकोपयोगीं कामें करून शांतपणानें राज्यकारभार चालविला. त्याची तडफ विलक्षण होती. एकदां त्यानें आपल्या जखमेस जळवा लाविल्या असतांनाच काबूलच्या शहानें पंजाबवर स्वारी केल्याची बातमी आली. त्याबरोबर क्षणार्धांत आपलें दुःख विसरून तो ताडकन् उठून त्या स्वारीचा प्रतिकार करण्याच्या तयारीस लागला. तोफा ओढणारे बैल रानांत चरण्यास गेले होते, त्यांच्या परत येण्याचीही वाट न पाहतां माणसांकडून तोफखाना ओढवित चालविला, आणि मोठ्या तांतडीनें ताबडतोब सैन्य जमवून त्यांसह तो सायंकाळ होण्याच्या आंतच कूच करून बराच लांब निघून गेला. या बादशहानें बांधिलेला सलीमगड हा किल्ला आजतागायत दिल्ली येथें अस्तित्वांत आहे. शीरशहा यानें दिल्ली येथील किल्ल्यांत शेरमंदल या नांवाचा बांधिलेला राजवाडा जसा आजतागायत प्रसिद्ध आहे त्याप्रमाणेंच त्याचा मुलगा सलीमशहा यानें बांधिलेला हा सलीमगडचा किल्लाही प्रसिद्ध आहे. हा किल्ला शहाजहान बादशहाचा राजवाडा आणि यमुनेचा पूल यांच्या दरम्यान असून तो नदीच्या प्रवाहांत असल्यानें एखाद्या बेटाप्रमाणें दिसतो. या किल्ल्याची रचना विशेष कौशल्याची नाहीं. परंतु तो विशेष मजबूत व भव्य आहे. हुमायून बादशहा पुढें पुन्हा राज्यपदावर आल्यानंतर त्यानें त्या किल्ल्याचें, आपल्या शत्रूच्या मुलाचें नांव बदलून त्यास " नहरगड " ( पाण–किल्ला ) असें यथार्थ नांव दिलें, येथून नदी ओलांडून येण्यास सुलभ पडावें ह्मणून पुढें बादशहा जहांगीर यानें एक पांच कमानीचा पूल बांधिला तो हल्लीं अस्तित्वांत आहे. हा किल्ला लंडनमधील " टॉवर ऑफ् लंडन " अथवा पारीस येथील " बॅस्टिली " किल्ल्याप्रमाणें उग्र व भयंकर असून अनेक राजपुरुष, व राजकारणी पुरुष यांचें हें पूर्वकाळांतील बंदिवासाचें स्थान आहे. याच ठिकाणीं शहाजादा मुराद हा मद्यपानानें बेशुद्ध असतां हत्तीवर बसवून आणून टाकण्यांत आला. याच ठिकाणीं शहाजादा दारा याचा धाकटा मुलगा शेखो यास त्याचें अवरंगजेबाच्या मुलीशीं लग्न झाल्यानंतर, प्रतिबंधांत ठेवण्यांत आलें. याच ठिकाणीं अवरंगजेबाचा वडील मुलगा महंमद सुलतान यास पंधरा वर्षें बंदिवास भोगावा लागला; आणि याच ठिकाणीं अनेक सरदार, मुत्सदी व राजकारणी पुरुष कारागृहवासाचें दुःख भोगीत अखेरीस मृत्युपंथास गेले! सलीमशहानें नऊ वर्षें

राज्य केलें, व बरेच दिवस आजारी राहून तो इ० सन १५५३ मध्यें मृत्यू पावला. त्यास त्याचा भाऊ निजामखान याची मुलगी नामें बिबिबाई हिच्या पोटीं फिरोज या नांवाचा एक मुलगा झाला होता, आणि त्यासच आपणांमागें राज्यपद मिळावें अशी सलीमची इच्छा होती; परंतु बिबीबाई हिचा भाऊ मुबारिझखान हा आपल्या मुलाचा घात करून राज्यपद बळकावील अशी त्याला अतिशय भीति होती; व तो अतिशय हलकट, मूर्ख, बदसल्लागारांनीं घेरलेला व व्यसनी असल्यामुळें राज्यप्राप्तिकरितां वाटेल तें क्रूर कृत्य करील अशी त्याची खात्री होती. म्हणून त्यास ठार मारून आपल्या मुलाच्या राज्यप्राप्तीच्या मार्गांतील कांटा काढून टाकण्याचा त्याचा विचार होता; परंतु बिबीबाईच्या इच्छेकरितां त्यानें तो बेत रहित केला होता; तथापि पुढें त्याचाच अंदाज खरा ठरला. मुबारिझखानानें बिबिबाईच्या हातून तिचा अज्ञान दुर्दैवी मुलगा फिरोज यास ओढून आणून ठार मारिलें आणि महंमदशहा अदीली हें नांव धारण करून तो राज्यावर आला. परंतु हा शहा मूळपासूनच व्यसनी असल्यामुळें तो नेहमीं आपल्या हलकट परिवारांत व व्यसनांत निमग्न असे; व निरनिराळ्या अश्लील विलासांत संपत्तीचा मनमुराद विनियोग करीत असे. त्यामुळें तिजोरी कोरडी पडून राज्यभर अव्यवस्था माजली, व दंगेधोपे सुरू झाले, तथापि त्याच्या सुदैवानें त्याला एका पराक्रमी, शूर, कर्तृत्ववान् व इमानी अशा हिंदू प्रधानाचा अतिशय उपयोग झाला, आणि जरी अखेरीस महंमदशहा आदिलीचा बोजवारा उडून तो बंगालचा राज्यकर्ता महंमदशहा याच्या मुलाकडून ठार मारला गेला तरी, या हिंदू प्रधानानें तो जीवंत होता तोंपर्यंत त्याचा पक्ष सांवरून धरून तो प्रबळ करण्यांत आपली पराकाष्ठा केली, आपला देहही त्याच्या धन्याच्या उत्कर्षाकरितां "कुर्बान" केला; व प्रत्यक्ष कृतीनें त्यानें ही गोष्ट जगाच्या निदर्शनास आणून दिली.

या हिंदू प्रधानाचें नांव हिमू हें होय. तो मूळ व्यापारी असून सलीमशहाच्या कारकीर्दींत त्यास "बाजार दरोगा" नेमण्यांत आलें होतें; व महंमद यानें त्यास गादीवर आल्यावर मुख्य प्रधानाच्या जागीं नेमिलें होतें. तथापि त्यामुळें अफगाण सरदारांनां आपली मानहानि झाली असें वाटलें, व ते सर्व शहाच्या विरुद्ध झाले. महंमदशहाचा मेहुणा इब्राहिमखान यानें शहाविरुद्ध बंड करून दिल्लीचें राज्य बळकाविलें, तेव्हां महंमदशहा हिमूसह चुनारगड येथें पळून गेला, व तिकडील प्रदेशांत तो राज्य करूं लागला; व हिमु यानें त्या ठिकाणीं शहाच्या सैन्याची उत्तम तयारी करून इब्राहिमच्या सैन्याशीं युद्ध करण्याची तजवीज केली. इतक्यांत पंजाबचा सुभेदार महंमदशहाचा दुसरा मेहुणा अहंमदखान हा तिकडून दिल्लीवर चाल करून आला. इब्राहिमचा पराभव करून त्यास काल्पीशहराकडे पळून जाणें भाग पाडिलें, व अफगाण सरदारांच्या मदतीनें शिकंदरशहा हें नांव धारण करून तो राज्यारूढ झाला. (इ० सन १५५४) परंतु या वेळीं अफगाण लोकांतील

कलह विकोपास गेले होते. आणि दिल्लींत पूर्ण अंदाधुंदी माजली होती. इतक्यांत हुमायून परत हिंदुस्थानांत येत असल्याचें त्यास समजलें; तेव्हां त्यानें तातारखान या सरदारास त्याच्यावर पंजाबमध्यें पाठविलें; व त्या सरदाराचा सरहिंद नजीक पराभव झाल्यामुळें शिकंदरशहा स्वतः तिकडे आपणाबरोबर ऐशीं हजार सैन्य व तोफखाना घेऊन चाल करून गेला, परंतु त्याचाही पराभव होऊन तो आपला जीव बचावून पंजाबच्या डोंगरी प्रदेशांत पळून गेला, व आपलें नष्ट झालेलें महत्व पुन्हां प्राप्त करून घेण्याकरितां कित्येक निष्फळ प्रयत्न केल्यानंतर तो अकबरास शरण गेला व बंगालमध्यें राहिल्यावर तशाच कष्टदायक स्थितींत पुढें लवकरच मृत्यू पावला !

इब्राहिमखान काल्पी येथें पळून गेल्यानंतर हिमूनें त्याच्यावर चाल करून जाऊन त्याचा पराभव केला व त्यास बियाना येथील किल्ल्यांत कोंडून टाकिलें. इतक्यांत सुलतान महंमदशहा यानें बंगालमधून महंमदशहाआदिलीवर स्वारी केली. तेव्हां त्यानें हिमूस तावडतोब बोलावून घेतलें. हिमूनें बंगालकर महंमदशहावर बुंदेलखंडांत हल्ला करून त्यास ठार मारिलें. इब्राहिमखान व हिमू यांचा पुढें अकबराच्या कारकीर्दीत वध झाला आणि त्यानंतर महंमदशहा अदीलीचा पक्ष निर्बळ होऊन त्यालाही बंगालचा सुलतान महंमदशहा याच्या मुलानें ठार मारिलें, व आपसांतील यादवीमुळें अफगाणराज्य नष्ट होऊन गेलें. इब्राहिम लोदीच्या वेळीं अफगाण सरदारांतील पक्षभेदामुळें जी घोटाळ्याची राजकीय परिस्थिति उत्पन्न झाली तिचा पूर्ण फायदा बाबर यास मिळाला, आणि त्यानें हिंदुस्थानांत येऊन मोंगली राज्याची स्थापना केली; ( इ० सन १५२६ ) तीच तंतोतंत परिस्थिति पुन्हां तीस वर्षांतच उत्पन्न झाली; आणि सूर अफगाण सरदारांतील वैमनस्यें विकोपास जाऊन त्याचा पूर्ण फायदा हुमायून यास मिळाला, आणि त्यानें हिंदुस्थानांत येऊन आपलें राज्य परत मिळवून तो पुन्हा दिल्ली येथें बादशाहीपदावर स्थानापन्न झाला. अकबराच्या कारकीर्दीत अफगाण घराणें त्यानें नामशेष केलें, व त्यानंतर अफगाणलोकांस एवढें राजकीय महत्व पुढें केव्हांही प्राप्त झालें नाहीं.

बाबर बादशहाच्या कारकीर्दीपासून काबूल हा प्रांत पंजाबप्रमाणेंच मोंगली अमलाखालील एक सुभा ह्मणून असून हे दोन्हीही महत्वाचे व हिंदुस्थानच्या लगत व सरहद्दीचे प्रांत हुमायून यानें राज्यावर आल्यावर कामरान यास स्वतंत्रपणें तोडून दिले होते. काबूलप्रांत अशा रीतीनें स्वतंत्र रहावा ही गोष्ट हुमायून यास केव्हांही भीतिप्रदच होती व त्यामुळें मोंगली सैन्यांत नेहमीं ताज्या दमाच्या स्वदेशांतील लोकांची भरती करणेंही त्यास अशक्य झालें होतें. तथापि बादशाही फौजेच्या सामर्थ्यास लागणाऱ्या क्षयाचें भयंकर नुकसान सोसूनही हुमायून यानें " वडिलांची आज्ञा " शिरसामान्य केली होती. आपला भाऊ कामरान हा आपणास या संकटप्रसंगीं मदत करील अशी हुमायून यास फार आशा वाटली होती; ह्मणून तो पंजाब-

मध्यें गेला, परंतु कामरान यानें त्यास पूर्ण दगा दिला; शीरशहा हुमायूनच्या पाठीस लागलाच होता. त्याच्याशीं कामराननें सख्य करून त्यास पंजाब प्रांत देऊन त्यानें काबूलचा रस्ता धरिला. तेव्हां बिचारा हुमायून सिंधप्रांताकडे वळला व त्यानें भक्करच्या किल्ल्यास वेढा दिला; परंतु याच वेळीं हुमायूनचा दुबळा स्वभाव व्यक्त झाला; त्याच्या हातांतून राज्यपद नाहींसें झालेलें होतें; त्याचे तिन्हीं दगलबाज भाऊ त्याच्याशीं विरुद्ध होते; आपणास कोठेंतरी थारा मिळावा ह्मणून तो भटकत फिरत होता. अशा वेळीं आपली धोक्याची परिस्थिति ओळखून त्याप्रमाणें तडकाफडकीचे व तांतडीचे इलाज योजावयाचे सोडून तो विषयाच्या आधीन झाला. राज्य परत मिळविण्याकरितां झगडत राहण्याऐवजीं एका सुंदर स्त्रीशीं विवाह करण्याकरितां रागावून बसला व काळ वेळ प्रसंग न पाहतां त्या स्त्रीशीं विवाह केल्यानंतरच त्यानें पुन्हां आश्रयाकरितां भटकत फिरण्याची सुरवात केली; हुमायून हा भक्कर येथें असतांना त्यास हिंदाल आपल्या विरुद्ध आहे असा संशय आल्यावरून तो हिंदालच्या मुक्कामावर पात्र या गांवीं त्याला भेटण्यास गेला; परंतु त्यावेळीं हिंदाल हा तेथें नसून कोठें बाहेर गेला होता; तथापि त्याची आई दिलदार बेगम व बहीण गुलबदन यांनीं हुमायूनाचा आदरसत्कार करून त्याला मेजवानी दिली. यावेळीं इराणांतील प्रसिद्ध साधू अहमद जाम याच्या कुळांतील साधुपुरुष व हिंदालचा गुरू शेख अलीअकबर जामी हा आपली सुंदर मुलगी हमीदा ऊर्फ हमीदाबानू हिच्यासह हिंदालच्या छावणींत होता. ही मुलगी यावेळीं चौदा वर्षांची असून हुमायून यानें तिला पाहिल्याबरोबर आपणावरील प्रसंग विसरून त्याच्या मनांत प्रेमाचा प्रखर उद्भव झाला; आणि त्यानें "ही कोण" ह्मणून तपास केला व त्यास "ही मुलगी शेख अलीअकबर जामी याची आहे" असें कळल्यावर "तर मग ती आपल्यांतीलच आहे" असें ह्मणून त्यानें आपली सावत्र आई दिलदार-बेगम हीस "या मुलीशीं माझें लग्न जुळवून द्या" ह्मणून विनंति केली; परंतु हमीदाचें लग्न अगोदरच दुसरीकडे ठरलें होतें. शिवाय हिंदाल परत आल्यावर त्यास ही गोष्ट कळली; परंतु तोही या लग्नाच्या बाबतींत विरुद्ध होता; त्यामुळें त्यानें हुमायून यास स्पष्ट सांगितलें कीं, "हमीदा ही मला बहिणीच्या ठिकाणीं असून तुमच्यासारख्या बादशहास ती शोभत नाहीं, शिवाय तुह्मी माझ्या येथें आलां आहांत ते मला भेटण्याकरितां आलेले आहांत, लग्नाकरितां आलेलां नाहींत" हिंदालचें हें भाषण ऐकून हुमायून यास अतिशय वाईट वाटलें व तो रागानें व निराशेनें हिंदालचा तळ सोडून निघून गेला; तेव्हां हिंदालची आई दिलदार बेगम हिनें त्याची समजुत करून व लग्न जुळवून देण्याचें कबूल करून त्यास आपल्या तळावर

---

१ भक्कर हा गांव नार्थ वेस्टर्न रेलवेवर एक रेलवे स्टेशन ह्मणून असून तो सिंधूनदाच्या पश्चिम किनाऱ्यावर डेराइस्माईलखान या प्रसिद्ध शहरापासून अजमासें ३० मैलांवर आहे.

परत आणिलें, आणि दुसऱ्याच दिवशीं ( सप्टेंबर इ० सन १५४१ ) हमीदाशीं त्याचें लग्न होऊन हुमायून पुढील उद्योगास लागला.

हिंदाल यानें हुमायूनास या संकटप्रसंगीं साह्य केलें नाहीं, आणि कामरानप्रमाणेंच याही भावासंबंधीं त्याची निराशा झाली. तेव्हां सिंधप्रांताचा कारभारी हुसेनअर्घुन हा आपणास मदत करील या आशेनें तो तिकडे वळला, पण त्यानेंही त्यास आश्रय न देतां सिंधप्रांतांतून घालवून दिलें; तेव्हां तो अतिशय हाल सोशीत मारवाडचा राजा मालदेव याचा आश्रय मिळविण्याकरितां जोधपूर येथें गेला. परंतु मालदेवानें त्यास शत्रूप्रमाणें वागवून पकडण्याचा विचार केला, तेव्हां तो तसाच अतिशय हाल व मनुष्यहानी सोशीत पुन्हां सिंधप्रांतांत आला. मालदेवानें हुमायूनचा पाठलाग करण्यास आपल्या सैन्याची एक तुकडी पाठविली होती; व तिनें त्यास आडविलेंही होतें; परंतु हुमायूनची विपन्नावस्था पाहून तिनें त्यास पुढें जाऊं दिलें. यावेळीं मार्गांत त्याचे भयंकर हाल झाले आणि अखेरीस आपल्या परिवारासह तो कसातरी उमरकोट[1] येथें सुरक्षितपणें येऊन पोहोंचला. या प्रवासांत त्याचा जनानखाना बरोबर असून त्याची बायको हमीदा हिचे प्रसूतीचे दिवस भरत आले होते. यावेळीं राणाप्रसाद या नांवाचा तेथें एक किल्लेदार होता; त्यानें हुमायून यास आश्रय देऊन त्याची सुव्यवस्था ठेविली. या ठिकाणीं हमीदाराणी प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. तोच प्रसिद्ध अकबर हा होय. ( ता० १४ आक्टोबर इ० सन १५४२ ) या पुत्रजन्माच्या आनंददायक प्रसंगीं त्याच्याजवळ बक्षीस देण्यास कांहींही नव्हतें; ह्मणून आपणाजवळील कस्तुरीची डबी उघडून, ती त्यानें लोकांस वाटिली. आणि "या कस्तुरीच्या वासाप्रमाणेंच माझ्या या मुलाची कीर्ति जगभर पसरो " असे उद्गार काढिले; आणि हे त्याचे उद्गार पुढें तंतोतंत खरे ठरले. या ठिकाणीं असतांना त्यास राणाप्रसाद यानें सैन्याची मदत दिली व इतरही कित्येक हिंदू राजांची मदत मिळवून त्यानें हुसेन अर्घूनकडून सिंधप्रांत हस्तगत करून घेण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांत त्यास यश आलें नाहीं. इतक्यांतच त्याच्याबरोबरील कांहीं लोकांनीं उद्दामपणा करून राणाप्रसाद याचा

---

१ उमरकोट हें ठिकाण सिंधप्रांतांत थर आणि पारकर, अथवा मीरपूरखास या जिल्ह्यांत दक्षिणेस कच्छच्या रणास लागून सिंध हैद्राबादपासून ११९ मैलांवर आहे. हें गांव पूर्वीं जिल्ह्याचें ठिकाण होतें. हल्लीं हें तालुक्याचें ठिकाण असून तेथें मुखत्यारकार ( मामलेदार ) अथवा तहशिलदार रहातो. सिंधप्रांत इंग्रजांच्या ताब्यांत येण्यापूर्वीं येथील किल्ला सिंधप्रांताच्या अमीराच्या-तालपूरमीरच्या-ताब्यांत होता. सिंधहैद्राबादपासून टंडो-अलियार व मीरपूरखास शहरावरून थेट उमरकोट पर्यंत-११९ मैल पक्की सडक बांधिलेली आहे. येथें पाणी अतिशय खोल असून हा प्रदेश रूक्ष व रखरखीत आहे.

अपमान केला. त्यामुळें हुमायूनच्या मदतीस आलेले हिंदू राजे त्याला सोडून गेले. राणाप्रसादचें मनही त्याच्याविषयीं कलुषित झालें; आणि अखेरीस त्यास हिंदुस्थानांतील राज्याची आशा सोडून कंदाहारकडे जाणें भाग पडलें. तथापि राणाप्रसाद हा मालदेवाच्या मानानें अतिशय सज्जन होता असेंच ह्मटलें पाहिजे. कारण त्याचा मोंगल लोकांनीं अपमान केला असूनही हुमायूनाचा नाश अथवा नुकसान करण्याचें त्यानें मनांत आणिलें नाहीं; इतकेंच नाहीं तर जरी त्याचें मन हुमायून विषयीं कलुषीत झालें होतें, व तो येथून जाईल तर बरें असें त्यास वाटूं लागलें होतें तरी त्यानें हुमायूनाला "जा" असें केव्हांही तोंडून सांगितलें नाहीं; व त्याच्या मार्गांत मुद्दाम अडथळेही आणिले नाहींत. उलट त्यास कंदाहारकडे जाण्याच्या बाबतींत त्यानें मदतच केली. ही गोष्ट राणाप्रसाद यास भूषणास्पद आहे यांत संशय नाहीं.

हुमायून हिंदुस्थानांतून कंदाहार प्रांताकडे वळला त्यावेळीं त्याचा तिसरा भाऊ अस्करी हा कामरानच्या तर्फेनें तेथील कारभार पहात होता. कामरान आपल्या विरुद्ध आहे, हिंदालनें आपणास मदत दिली नाहीं तथापि निदान अस्करी हा तरी यावेळीं आपल्या उपयोगीं पडेल अशी त्यास आशा होती; पण हुमायून हा समर्कंदजवळ अजमासें शंभर मैलांवर आला न आला तोंच अस्करी हा आपल्या सैन्यासह त्याच्यावर चाल करून आला. तेव्हां अकबरास मागें टाकून तो तसाच इराणांत पळाला. अकबर अस्करीच्या हातीं लागला; व हुमायून तेथील शहाचा, हिंदुस्थानचें राज्य परत मिळविण्याच्या बाबतींत मदत मिळविण्याच्या प्रयत्नास लागला. हिंदुस्थानांत शियापंथ सुरू करण्याचें नाइलाजानें कबूल करून, व शहास कंदाहार प्रांत मिळवून देण्याचें अभिवचन देऊन त्यानें शहाची मदत मिळविली. त्याचा मुलगा मिर्झामुराद यास बरोबर घेऊन त्यानें कंदाहार हस्तगत करून घेऊन मुरादच्या ताब्यांत दिलें. अस्करीस अटकेंत ठेविलें, व तो काबूलकडे जाण्यास निघाला. इतक्यांत मुराद मृत्यू पावल्यानें तो परत आला. कंदाहार आपल्या ताब्यांत घेऊन तेथें उत्तम बंदोबस्त केला. बहिरामखानास काबूल येथें पाठवून कामरानाशीं समेट करण्याचा प्रयत्न केला; व तो निष्फळ झाल्यानंतर तो काबूलवर चाल करून गेला. रस्त्यांत यावेळीं गझ्नी येथील सुभ्याचें काम पहात असलेला त्याचा भाऊ हिंदाल हा त्यास येऊन मिळाला. हुमायून हा काबूलवर चाल करून येत आहे असें पाहून कामरान सिंधप्रांतांत पळाला. इकडे हुमायूननें काबूल आपल्या हातीं घेतलें. (इ० सन १५४५ आक्टोबर) या ठिकाणीं त्याचा मुलगा अकबर हा पुन्हां सुरक्षितपणें त्याच्या हातीं आला. कामरान सिंधप्रांताकडे पळाल्यावर हिंदालनें त्याचा पाठलाग केला. शिवाय सिंधप्रांतांत त्यास थारा न मिळाल्यामुळें तो पुन्हा काबूलकडे परत वळला; आणि हुमायून बदकशानप्रांतावर स्वारी करून गेला आहे असें पाहून त्यानें काबूलवर हल्ला करून तें

शहर आपल्या ताब्यांत घेतलें; आणि यावेळींही अकबर पुन्हा त्याच्या हातीं आला. हुमायूनास ही बातमी कळल्यावर तो ताबडतोब काबूल येथें आला; आणि त्यानें काबूलच्या किल्ल्यास वेढा घातला. यावेळींही पुन्हा अकबरावर प्राणसंकट ओढवलें होतें. पहिल्यावेळीं तो चौदा महिन्याचा होता. आणि यावेळीं त्याचें वय तीन वर्षांचें होतें. हुमायून यानें काबूलच्या किल्ल्यास वेढा दिल्यानंतर कामरान यानें अकबरास तोफेचा गोळा लागून ठार मरावा म्हणून त्यास मुद्दाम तटावर नेऊन बसविलें होतें; परंतु त्याला ईश्वर तारणारा असल्यामुळें या प्रसंगांतूनही तो सुरक्षितपणें बचावून लहानाचा मोठा झाला. अखेरीस हुमायूननें काबूल हस्तगत करून घेतलें; व अकबरही सुरक्षित त्याच्या हातीं मिळाला. इकडे कामरान पळून बदकशानप्रांतांत गेला; व त्यानें तो प्रांत हस्तगत करून घेतला, तेव्हां हुमायून तिकडे चाल करून गेला. कामरानच्या फौजेचा पराभव करून त्यास कैद केलें; व बदकशानप्रांत आपल्या ताब्यांत घेतला. अशा रीतीनें कामरान त्याच्या हस्तगत झाला तरी मागील कोणत्याही गोष्टी मनांत न आणितां हुमायूननें त्याला अतिशय प्रेमानें व ममतेनें वागविलें. याचवेळीं हिंदाल व अस्करी हेही हुमायूनला येऊन मिळाले. तेव्हां त्यानें, कामरान प्रमाणेंच, त्याचेही अपराध क्षमा करून त्यांनाही मोठ्या प्रेमानें व उदारपणानें वागविलें. तथापि यावेळीं मात्र तो सावध राहिला. हा त्यानें शहाणपणा केला. वास्तवीक हुमायूनच्या नेहमींच्या ढिल्या, व बेफिकीरी स्वभावाप्रमाणें, व फाजील दयालुत्व व सौजन्य यांस अनुसरून म्हणावयाचें म्हणजे यावेळींही तो पूर्वीप्रमाणेंच बेसावध व आपल्या भावांच्या विश्वासावर विसंबून बेफिकीर रहावयास पाहिजे होता. पण त्याला पुन्हां लवकरच चांगले दिवस यावयाचे होते, म्हणूनच त्याच्या सुदैवानें यावेळीं त्यास सावधपणानें व तयारीनें वागण्याची सुबुद्धि झाली, असेंच म्हटलें पाहिजे. कारण विश्वासघात व दगाबाजी यांतच नेहमीं रममाण होणाऱ्या मनुष्याला आपल्या कर्तव्याची काय जाणीव असणार ? लौकिक बंधनें, व कौटुंबिक प्रेम यांची त्याला काय किंमत वाटणार ? हुमायूनचा प्रेमीजीव वेडा, आणि पितृवचन वज्रलेप मानून त्याप्रमाणें वागण्याचा निर्धार करडा यामुळें या दगाबाज भावांना आंजारून गोंजारून त्यांना आपल्या पक्षास चिकटून ठेवण्याची तो पराकाष्ठा करीत होता; पण तेच त्याचे भाऊ त्याची " तिरडी " करण्यास टपलेले होते. हाच हुमायून तें उघड्या डोळ्यांनीं पाहून त्यांना प्रेमानेंच वागवीत होता. थोडक्यांत म्हणजे सद्गुणाचा अतिरेक करणारा हुमायून याला अधिक दोषी ठरवावें, का त्याच्या या अतिरेकी सद्गुणाचा निर्दयपणानें फायदा घेणाऱ्या त्याच्या बंधुत्रयांना अधिक दोषी ठरवावें याचा ज्याचा त्यानें आपल्या मनाशींच विचार करावा.

तथापि त्यांतल्यात्यांत हिंदाल हा यावेळीं हुमायूनच्या पक्षांत होता; आणि जरी त्यानें हुमायून यास हिंदुस्थानांत फारसें साह्य केलें नव्हतें, तरी हुमायून काबूलवर चाल

करून गेल्या वेळेपासून त्यानें हुमायूनच्या पक्षास मिळून व त्यालाच आज पांच सहा वर्षें चिकटून राहून उत्तम प्रकारें साह्य केलें होतें. कामरान व अस्करी यांच्या मानानें हिंदाल-कडून त्यास पुढील काळांत छळ अथवा त्रास सोसावा लागला नव्हता. हुमायून यानें आपल्या भावाशीं सख्य केल्यानंतर कांहीं काळ कामरान व अस्करी हे त्याच्याशीं प्रेमानें वागले; परंतु लवकरच त्या उभयतांनीं बंड करून काबूल हस्तगत करून घेतलें. तथापि यावेळीं हुमायून हा पूर्ण सावध असल्यामुळें त्यानें तात्काळ तें शहर परत घेतलें. तेव्हां कामरान सलीमशहा सूर याचा आश्रय मिळविण्याच्या इच्छेनें पुन्हां पंजाब प्रांताकडे पळून गेला. इतकें झालें तरी हुमायून यानें त्यास परत येण्याविषयीं प्रेमाचीं पत्रें लिहिलीं व आपणाजवळ येऊन राहण्याविषयीं त्यास कळविलें; परंतु हुमायूनचें ह्मणणें त्यास मान्य न होतां तो तसाच पुढें मार्ग क्रमून जाऊं लागला, तेव्हां हुमायूननें आपला भाऊ हिंदाल यास त्याच्यावर पाठविलें. परंतु हिंदाल त्याचा पाठलाग करीत असतां कामरानच्या अफगाण सरदारांनीं त्यास ठार मारिलें. ( नोव्हेंबर १५५१ ) नंतर कामरान सलीमशहाचा आश्रय मिळविण्याकरितां पुढें गेला. परंतु शहानें त्यास आश्रय न दिल्यामुळें तो सिंधूनदाच्या आस-मंतांत असलेल्या गक्कर या नांवाच्या रानटी लोकांमध्यें—ह्मणजे शिहाबुद्दीन घोरी याचा ज्या गक्कर जातीच्या लोकांनीं खून केला त्या लोकांमध्यें—भटकत फिरत असतां गक्कर सरदारांनीं त्यास पकडून हुमायूनच्या स्वाधीन केलें. ( इ० सन १५५२ ) यावेळीं हुमायूनच्या सर-दार मंडळींनीं त्यास ठार मारण्याविषयीं हुमायून यास विनंति केली; सतत तेवीस वर्षें बेइमान व बेगुमानपणानें असुरी धुंदींत दगा व विश्वासघात करीत राहिलेल्या या भावाच्या रूपानें उत्पन्न झालेल्या शूर व धीट पण कपटी व काळजावर घाव घालणाऱ्या शत्रूस नेस्तना-बूद करावें ह्मणून त्याच्या सरदारांनीं आग्रह धरिला. पण याही वेळीं हुमायूनचें दयार्द्र अंतःकरण कळवळलें; त्यानें आपल्या सरदारांची ही सल्ला नापसंत केली, आणि त्याला पुन्हां आपणाविरुद्ध खटपटी करण्यास अडथळा करण्याच्या इराद्यानें—व सतत तेवीस वर्षांच्या अनुभवामुळें त्याच्यावरील विश्वास साफ उडाल्यानें—त्यानें नाइलाजानेंच कामरानचे डोळे काढविले. ( इ० सन १५५३ ) तथापि त्याबद्दलही त्यास अतिशय वाईट वाटलें. पुढें एके प्रसंगीं तो कामरानच्या भेटीस गेला असतां कामरानची ती हताश व कष्टदायक स्थिति पाहून त्यास दुःखानें भडभडून आलें व तो त्याच्याजवळ बसून पुष्कळ रडला ! यावेळीं कामरान यासही आपल्या कृतकर्मांचा अतिशय पश्चात्ताप झाला व त्यानें हुमायूनची माफी मागितली. कामरान दुष्ट होता, पण त्याला मिळालेली बायको फार सुस्वभावी व सुशील होती. या कपटी, क्रूर व दुष्ट मनुष्यावर कोणीही भरंवसा ठेवीत नसे, पण त्याची साध्वी स्त्री मात्र त्याच्या शब्दावर नेहमीं भरंवसा ठेवून वागत असे. या घातकी मनुष्याच्या सह-वासानें आपल्या मुलीला सुख लागणार नाहीं, ह्मणून तिचा बाप तिला आपल्या घरीं बोला-

वीत असतांही तिकडे न जातां अखेरपर्यंत तिनें नवऱ्याला सोडिलें नाहीं. पुढें हुमायूनच्या परवानगीनें कामरान हा मक्केस जात असतां रस्त्यांतच सिंधप्रांतांत मृत्यु पावला. (१५५३) त्याप्रमाणेंच मिर्झाअस्करीस हुमायूननें हद्दपार केल्यानंतर तोही मक्केस जाऊन इ० सन १५५८ मध्यें मृत्यु पावला. अशा रीतीनें हिंदाल, कामरान व अस्करी यांचा क्रमाक्रमानें निकाल लागला. हिंदालच्या मृत्यूनें हुमायुनास अतिशय दुःख झालें व हिंदालची मुलगी राझिया हिचा त्यानें आपला मुलगा अकबर याच्याशीं विवाह करून देऊन हिंदालची सर्व संपात्तिही तिच्या हवालीं केली व नंतर गझ्नीचा कारभार अकबर यावर सोंपवून काबूल येथें येऊन तो तेथें राज्य करूं लागला; ( इ० सन १५५४. )

त्यानंतर हुमायूनास शांतता व स्वस्थता यांचा लाभ झाला, आणि हिंदुस्थानांतील आपलें गेलेलें राज्य परत मिळविण्याचा साधकबाधकरीत्या विचार करण्यास त्यास अवसर सांपडला. सुदैवानें याचवेळीं दिल्ली येथें अंदाधुंदी माजली होती. अफगाण सरदारांत आपसांत फाटाफूट व बेबनांव झालेला होता, आणि प्रजाही त्रस्त होऊन अफगाण लोकांविषयीं सर्वत्र असंतोष पसरला होता. ही स्थिति आग्रा व दिल्ली येथील हुमायूनच्या हितचिंतक मंडळींनीं त्याला काबूल येथें कळवून हिंदुस्थानांत ताबडतोब निघून येण्याविषयीं कळविलें; परंतु तो शूर होता तरी धाडसी नव्हता; एकदम धडाडीनें अथवा तडकाफडकीनें आपला बेत कायम करून ताडकन् त्या कामास सुरवात करण्याची तडफ अथवा धमक आणि तें सिद्धीस नेईपर्यंत सारख्या चिकाटीनें व अट्टाहासानें झगडत राहण्याचें धैर्य अथवा धडाडी यांचा त्याच्या ठिकाणीं अभाव होता. "करूं का नको करूं!" अशा अनिश्चित प्रवृत्तीचें त्याचें दुर्बल मन होतें. अफूच्या व्यसनानें त्याचा स्वभाव थंडा बनला होता. शीरशहावर चालून जावें का गुजराथच्या बहादूरशहावर चालून जावें या विचारांत त्यानें आग्रा येथें एक वर्ष फुकट घालविण्याइतकें त्याचें मन दुबळें होतें. पदभ्रष्ट झाल्यावर स्वतःच्या सुरक्षिततेचें व राज्य परत मिळविण्याचें कार्य सोडून सुंदर स्त्रीच्या मोहानें त्यानें आपला कांहीं अमोल्य वेळ व्यर्थ घालविला होता. कामरानचा पहिल्या तडाक्यास निकाल उडवून आपला मार्ग मोकळा करून घेण्याचें सोडून सतत सात वर्षें या क्षुल्लक उद्योगांत त्यानें व्यर्थ घालविलीं, इतका त्याचा स्वभाव अळणी होता; आणि आतां ही सुसंधी पुन्हा प्राप्त झाली असूनही "हिंदुस्थानांत जाऊं का नको" याच विचारांत तो आपला महत्वाचा वेळ दवडीत राहिला होता; तथापि अखेर आपला शकून पाहून अनुकूल उत्तर मिळाल्यावर तो आपणाबरोबर कसलेलें पंधरा हजार सैन्य घेऊन निघाला. ( इ० सन १५५४ डिसेंबर ) मार्गांत त्याचा मुलगा अकबर व वजीर बहिरामखान हेही त्यास पेशावर येथें येऊन मिळाले व तो

सर्वांसह पुढें येण्यास निघाला. पंजाबमधील रोहटक व लाहोर हे दोन्ही किल्ले प्रतिकाराशिवाय त्याच्या स्वाधीन झाले. हुमायून हिंदुस्थानांत आल्याचें कळल्यावर शिकंदरशहानें आपला सरदार तार्तारखान यास सैन्य देऊन त्याच्यावर रवाना केलें; परंतु या सैन्याचा हुमायूननें पराभव केला. तेव्हां आपणाबरोबर जंगी सैन्य व तोफखाना घेऊन तो स्वतः हुमायूनवर चाल करून गेला व उभयतांच्या सैन्यामध्यें निकराचें युद्ध होऊन त्यांत हुमायून विजयी झाला. शिकंदरशहा पळून गेला ( ता० १८ जून १५५५. ) आणि हुमायून हा दिल्ली येथें येऊन ( जुलई १५५५ ) पुन्हां हिंदुस्थानचा बादशहा बनला.

परंतु अतिशय वनवास व आपत्ति कंठिल्यानंतर मोठ्या कष्टानें प्राप्त झालेल्या बादशाही वैभवाचा उपभोग घेण्यास तो फार काळ जिवंत राहिला नाहीं; हुमायून यानें दिल्ली येथें जो " पुराणा किल्ला " बांधिला त्यास त्यानें पुढें " दीनपन्हा " असें नांव दिलें. पुढें हुमायूनच्या पदभ्रष्टतेनंतर हा किल्ला शीरशहाच्या ताब्यांत आल्यावर त्यानें त्यास " शेरगड " अथवा " शहागड " असें नांव दिलें. हा किल्ला हुमायून यानें इ० सन १५३३ मध्यें बांधण्यास सुरवात केली. नंतर सात वर्षांनीं इ० सन १५४० मध्यें शीरशहानें त्यास उत्तम एक मैल घेराची तटबंदी केली. या किल्ल्यांत " किल्ला कोना मशीद " व शीरशहानें बांधिलेला " शेरमंदल " या नांवाचा सुंदर राजवाडा अशा दोन प्रेक्षणीय इमारती आहेत; यांपैकीं " किल्लाकोना मशीद " ही इमारत तांबूस व संगमरवरी दगडांची असून तिचें बांधकाम अतिशय कुशलतेचें व अतिशय निष्णात शिल्पकतेचें आहे; व या मशीदींतील प्रार्थनामंदिराचा मनोरा अतिशय उंच आहे. या अत्युच्च मनोऱ्यावरूनच सर्वांना प्रार्थनेस येण्याबद्दल मोठ्यानें ओरडून पाचारण करण्यांत येत असे. या मशीदीजवळच असलेल्या " शेरमंदल " या राजवाड्यांत हुमायून बादशहा रहात असे; आणि प्रार्थनेच्या पूर्वी पुकारणीचा शब्द होण्याची वेळ झाल्याबरोबर तो या मशीदींत प्रार्थना करण्यास जात असे. त्याप्रमाणें तो या राजवाड्यांतील पुस्तकालयाच्या गच्चीवर बसला असतां मशीदींतील प्रार्थनेची वेळ झाली, असें समजून खालीं येऊं लागला. इतक्यांत जिन्याच्या पायरीवरच त्यानें

---

२ टीपः—रोहटक ( Rohtak ) हें पंजाबांतील एका जिल्ह्याचें मुख्य ठिकाण असून तें दिल्लीच्या उत्तरेस अजमासें पंचेचाळीस मैलांवर आहे. येथें प्राचीन शहराची जी जागा आहे त्यास खोकराकोट हें नांव असून ती हल्लींच्या गांवानजीकच उत्तरेस आहे. या ठिकाणीं जरीचीं उत्तम पागोटीं तयार होतात. येथून जवळच कालानूर, याठिकाणीं उत्तम खोगीर व त्यासंबंधीं सामान व झज्जर येथें मातीचीं अतिशय सुंदर भांडीं ( खुजे, सुरया वगैरे ) तयार करण्यांत येतात. रोहटक येथील किल्ला राजा तोडरमल्ल यानें शीरशहाच्या हुकुमानें बांधिला होता.

मशीदींतील प्रार्थनेच्या सुरवातीस होणाऱ्या पुकारणीचा शब्द ऐकिला. याबरोबर तेथेंच गुडघे टेंकून त्यानें नमाज पढण्यास सुरवात केली; व तो पुरा झाल्यावर काठी टेंकीत वर उठून उभा राहणार तोंच त्याच्या हातांतील काठीचें खालील टोंक आरसपानी गुळगुळीत पायरीवरून निसटलें, त्यासरशीं त्याचा तोल जाऊन तो धाडदिशीं खालील चौकांत आपटला. ( ता० २१ जानेवारी इ० सन १५५६ ) आणि जखमी होऊन पुढें चारच दिवसांनीं आपल्या वयाच्या एक्कावनाव्या वर्षीं ता० २५ रोजीं तो मृत्यु पावला. यावेळीं त्याचा मुलगा अकबर हा दिल्ली येथें त्याच्या जवळ नसून तो बहिरामखानासह पंजाबमध्यें होता. ह्मणून हुमायूनचा दिल्ली येथील विश्वासू सरदार तार्दीबेग यानें दिल्ली येथें उत्तम बंदोबस्त ठेवून हुमायूनच्या मृत्यूची बातमी कांहींवेळ गुप्त ठेविली, आणि अकबरास ही खबर तावडतोब पंजाबमध्यें पोहोंचविली. त्याबरोबर तिकडेच बहिरामखानानें लागलींच अकबर यास "बादशहा" ह्मणून जाहीर करून त्याच्या नांवाची द्वाही फिरविली.

बादशहा हुमायून हा वर्तनानें साधा, रुतीनें सरळ, मनानें प्रेमी व अंतःकरणानें दयाळू होता. त्याच्या अंगीं बाबरचा करारी स्वभाव व तडफ नसल्यामुळें त्याला अतिशय कष्ट सोसावे लागले होते, आणि त्यांतच त्याच्यांतील सद्गुणाच्या अतिरेकाची भर पडल्यामुळें ही कष्टपरंपरा वृद्धिंगत झाली होती. हुमायूनचा विश्वासू, व त्याचें पिण्याचें पाणी संभाळणारा एकनिष्ठ सेवक जौहर यानें या दुर्दैवी व वनवासी राजपुरुषाचें चरित्र लिहिलें आहे. त्यावरून हुमायूनच्या गुणावगुणांचें योग्य ज्ञान होतें; व असें दिसतें कीं, तो वर्तनानें साधा व अंतःकरणानें दयाळू असून, आपल्या कुटुंबावर व परिवारावर त्याची अतिशय ममता असे. त्याप्रमाणेंच खर्च करण्यांत व बक्षीसें देण्यांतही तो उदार असे.— थोडक्यांत ह्मणजे तो जर आपल्या अंगीं वसत असलेले सद्गुण योग्य मर्यादेंत ठेविता तर त्याच्यावर आल्या तितक्या आपत्ति खात्रीनें ओढवल्या नसत्या, व त्याचा स्वभाव अनिश्चित नसता तर त्याची तारांबळ उडून त्यास इतकी विपन्नावस्थाही भोगावी लागली नसती. असें मानण्यास हरकत नाहीं.

बादशहा बाबर यानें मेवाडचा पराक्रमी राणा संग याचा शिक्री येथील युद्धांत पराभव केल्यानंतर तो इ० सन १५३० मध्यें अज्ञातवासांत मृत्यू पावला. "मला शरण आला ह्मणजे मग तो जरी माझा प्रत्यक्ष शत्रूही असला तरी सुद्धां मी त्याला आपल्या कुटुंबांतील माणसांप्रमाणें वागवितों" असें बाबर आपल्या आत्मचरित्रांत ह्मणत असून त्याप्रमाणेंच तो वागतही होता आणि त्याचा बलाढय शत्रू "राणासंग यानें एवढा लौकिक मिळविला तो त्यानें केवळ स्वपराक्रमानेंच मिळविला आहे" असें त्याचें मत असून, संगराणा व त्याचे वंशज यांच्याबद्दल बाबरच्या मनांत विशेष पूज्य बुद्धि वसत होती आणि पितृभक्त हुमायून हाही या घराण्याबद्दल तसाच आदरभाव बाळगीत होता.

संगराण्यानंतर त्याचा मुलगा रत्नसिंह हा गादीवर आला परंतु पांचच वर्षांत बुंदि येथील राजाबरोबरील द्वंद्वयुद्धांत तो मृत्यू पावल्यामुळें त्याचा भाऊ विक्रमाजीत हा गादीवर आला. तो मोठा धाडशी होता; परंतु राज्य चालविण्याचें शहाणपण त्याच्या अंगीं नव्हतें; त्यामुळें राज्यांत अव्यवस्था झाली. तेव्हां माळवा व गुजराथप्रांताचा राज्यकर्ता बहादूरशहा यानें चितोडवर आपल्या सैन्यानिशीं स्वारी केली. इकडे चितोडच्या राण्याबद्दल सर्व रजपूत मंडळीमध्यें विशेष आदरभाव वसत असल्यामुळें अनेक सरदार मंडळी चितोडच्या संरक्षणाकरितां धांवून आली व मोठा निकराचा रणसंग्राम सुरू झाला, परंतु बहादूरशहाचा तोफखाना मोठा जोरदार असून त्यावर कसलेले पोर्तुगीज अधिकारी होते; आणि त्याचें सैन्यही कवाईत शिकलेलें होतें; त्यामुळें रजपुतांचा जोराचा प्रतिकार असूनही बहादूरशहाच्या सैन्यानें किल्ल्यास सुरुंग लावून तो तडाक्यानें उडवून दिला. तेव्हां सर्व रजपुतांनीं आपल्या स्त्रियांनां दारूच्या भडक्यांत उडवून देऊन ते शत्रूवर तुटून पडले; व "जोहार" करून धारातीर्थीं कटून मृत्यू पावले. त्यांत विक्रमाजीत व महाराणी कर्णावती हिच्या पोटीं राणासंग यास झालेला अज्ञान मुलगा उदयसिंग यास दरबारच्या मंडळींनीं दूर निर्भय ठिकाणीं गुप्तपणें पाठवून दिल्यामुळें ते उभयतां बचावले, परंतु राणी कर्णावती ही या "जोहार" मध्यें मरून गेली. तथापि मृत्यूपूर्वीं तिनें हुमायून बादशहास असा निरोप पाठविला कीं, आपण माझे "राखीबंदभाई" "Rakhiband Bhai-Bracelet-bound Brother"—अहांत; अशा प्रसंगीं साह्य करून आमच्या अब्रूचें संरक्षण करा." अशी राखी रजपूत स्त्रीकडून पाठविण्यांत आली, ह्मणजे ती स्वीकारून त्या स्त्रीचें बंधुत्व मान्य करणें, आणि तिला आपली मानिलेली बहीण समजून तात्काळ तिच्या मदतीस धांवून जाणें, हें आपलें कर्तव्य आहे, असें समजण्याचा राजपुतान्यांत प्रघात आहे. ही राखी हुमायून हा बंगाल प्रांतामध्यें असतांना त्यास तिकडे मिळाली. त्याबरोबर त्यानें मी तुमचा "राखीबंद" भाई झालों, असा लागलीच उलट निरोप पाठविला, आणि बंगालप्रांत हस्तगत करण्याचें काम तसेंच अर्धवट सोडून देऊन तो तावडतोब चितोड येथें आला; चितोडहून बहादूरशहास हांकलून दिलें; मांडू हें शहर हल्ला करून हस्तगत करून घेतलें. राणा विक्रमाजीत यास बोलावून घेतलें, आणि त्याच्या शत्रूच्या किल्ल्यांतच त्यास रजपूत पद्धतीप्रमाणें राज्याभिषेक करून, एक मौल्यवान् तरवार बक्षीस दिली; व राणी कर्णावतीसंबंधीं आपलें कर्तव्य बजावून तो परत गेला.

हुमायून हा पूर्ण विचार केल्याशिवाय उतावळीनें पुष्कळ वेळां वागत असे पण त्याबरोबरच दिलेला शब्दही तो तंतोतंत पाळून अमलांत आणीत असे. शीरशहानें बक्सार-

नजीक हुमायूनच्या सेनेचा विध्वंस उडविल्यानंतर तो आपला जीव बचावण्याकरितां गंगानदींतून पलीकडे जातांना त्याचा घोडा बुडून मरून तो स्वतःही त्याच पंथास लागला असतां त्यास एका पखालजीनें आपल्या हवेनें फुगविलेल्या पखालीवर बसवून सांवरून सुरक्षितपणें पलीकडे नेलें. हुमायून हा स्वभावतःच विशेष दयाळू व उदार होता, आणि यावेळीं तर त्या भिस्त्यानें त्याचा प्रत्यक्ष प्राणच वांचविला होता. त्यामुळें या प्राणदात्या पखालजीच्या ऋणांतून अंशतः तरी मुक्त होण्याच्या इच्छेनें त्यानें "तुला काय पाहिजे" ह्मणून त्यास विचारिलें. त्यावर भिस्त्यानें "मला अर्धा दिवस बादशाही तख्त पाहिजे" ह्मणून हुमायून यास सांगितलें. त्याबरोबर हुमायूननें कांहींही विचार न करितां त्यास लागलींच तसें वचन दिलें व तें बरोबर अमलांत आणिलें. परंतु भिस्तीच तो; त्यानें आपल्या औट घटकेच्या बादशाहींत आपल्या अल्प ज्ञानाप्रमाणें आपणास व आपल्या नातलग मंडळीस सढळ हातानें इनामें करून घेतलीं, आणि अर्ध्या दिवसाच्या मुदतीनंतर तो भिस्ती झाल्यावरही हुमायून बादशहानें तीं इनामें ज्यांच्या त्यांच्याकडेसच कायम ठेवून तो आपल्या वचनांतून मुक्त झाला.

हुमायून बादशहाची कबर दिल्ली येथें, त्यानें बांधिलेल्या "पुराणा किल्ला"—अथवा "दीनपन्हा किल्ला" याठिकाणापासून, अजमासें एक मैलावर आहे. या कबरींत शिरतांना दुसऱ्या द्वाराजवळ एक लेख लिहिलेला आहे त्यावरून असें कळतें कीं, ही इमारत त्याची प्रेमी राणी व अकबराची माता हमीदा बानू हिनें आपल्या पतीच्या स्मरणार्थ अकबराच्या कारकीर्दींत बांधिली. ही इमारत बांधण्याचें काम सोळा वर्षें चालू असून त्यास पंधरा लक्ष रुपये खर्च आला. ही इमारत चौकोनी असून तिच्या चारी बाजूस अष्टकोनाकृती कोंपरे आहेत व तिचा गाभारा अष्टकोनी असून त्यावर एक अर्धगोलाकृति घुमट आहे; शिवाय हिची आंखणी अतिशय उत्तम असून याच इमारतीच्या नमुन्यावर ताजमहाल ही इमारत बांधिलेली आहे व हीच इमारत मोंगलबादशाहींतील शिल्पशास्त्राचा अगदीं प्रारंभींचा नमुना ह्मणून अस्तित्वांत आहे. ही इमारत अतिशय भव्य असून, त्यांतील साधेपणाही मनोहर व प्रेक्षणीय आहे. शिकंदर येथील अकबराची कबर अथवा शहादरा येथील जहांगीरची कबर यांहूनही येथील साधेपणा अधीक मोहक आहे. या इमारतीमध्यें जागोजाग संगमरवरी दगडांचें काम केलेलें आहे व ही इमारत प्रशस्त व भरभक्कम असून दुरूनही विशेष सुंदर व प्रेक्षणीय दिसत आहे. हुमायून यास हाजी बेगम या नांवाची दुसरी एक राणी होती व अकबराशिवाय हकीम या नांवाचा एक मुलगा होता, तो या बाईपासूनच झाला असावा. त्याप्रमाणेंच दिल्ली येथें "लाल बंगला" या नांवाच्या इमारतींत "हुमायूनच्या राणीची" कबर आहे. तीही याच बाईची

असावी. येथून जवळच "अरबकी सराई" या नांवाचें एक लहानसें गांव असून त्याचे दोन दरवाजे मोठे प्रेक्षणीय आहेत. हें शहर हुमायून बादशहाच्या पत्नीनें, बहुधा हमीदाबानू हिनें वसविलेलें असून येथें अरब लोक रहात असत त्यावरून या गांवास "अरबकी सराई" हें नांव पडलेलें आहे व या ठिकाणापासून हुमायूनची कबर अगदींच जवळ आहे. हुमायूनची दुसरी राणी व अकबराची माता हमीदाबानू ही सत्याहत्तर वर्षांची होऊन व नातूपणतू पाहून इ० सन १६०४ मध्यें (ता० २९ आगष्ट) मृत्यू पावली. ह्या बाईची कबरही हुमायूनाच्या शेजारींच असून, राजघराण्यांतील इतरही कित्येकांच्या कबरी त्याठिकाणीं आहेत. या दोन राण्याशिवाय हुमायून यास एक तिसरीही रजपूत राणी होती असा उल्लेख आढळतो. जयपूर अथवा अंबर येथें पृथुराजाचा पुत्र बिहारीमल्ल हा राज्य करीत असतां बाबर बादशहानें हिंदुस्थानांत आपल्या मोंगल बादशाहीची स्थापना केली. तेव्हां बिहारीमल्लही संगराण्याप्रमाणेंच बाबरशीं युद्धप्रसंग करण्याच्या विचारांत होता; परंतु अंबरच्या राज्याचा प्रदेश दिल्लीपासून जवळ असल्यानें त्यानें तो बेत रहीत करून बाबरचें वर्चस्व मान्य केलें. त्याला खंडणी दिली आणि आपली नात व अकबराच्या कारकीर्दींत विशेष वैभवास चढलेला राजा मानसिंह याची बहीण त्यानें हुमायून यास दिली. अशा रीतीनें मुसलमानाशीं शरीरसंबंध घडवून आणणारा हाच पहिला राज्यकर्ता असून हुमायून पुढें गादीवर आल्यावर त्यानें बिहारीमल्लास "अंबरचा महाराज" ही पदवी दिली होती; तथापि हुमायूनाचा एवढा परिवार असूनही अखेरच्यावेळीं त्याच्याजवळ कोणी नव्हतें. तो इ० सन १५५४ च्या दिजंबरमध्यें काबूलहून निघून हिंदुस्थानांत आला, त्यावेळीं त्याचा वडील मुलगा अकबर हाच काय तो एकटा त्याच्या बरोबर होता; व तोही हुमायूनच्या मृत्यूसमयीं पंजाबमध्यें होता; पुढें इ० सन १५५७ मध्यें, अकबरानें सरहद्दीवर शिकंदरशहावरील स्वारीवर असतां, आपली माता हमीदाबानू हिला व इतर बायकांस हिंदुस्थानांत आणिलें. सारांश, अनेक प्रकारच्या वनवासांतील दुःखदायक आपत्ति सोसून अतिशय कष्ट सायासानें मिळविलेल्या राज्याचा उपभोग घेण्यास तर तो फार काळ जगला नाहींच, पण एकाएकीं अपघातानें मृत्यू येऊन अशा या अखेरच्या वेळींही त्याचीं बायकामुलें—आणि त्याची प्रेमी व पतिनिष्ठ राणी हमीदा व त्याचा जीव कीं प्राण असलेला बाल—अकबर—यापैकीं कोणासही निदान नेत्रानें पाहून त्याबद्दल शेवटचें समाधान मानण्याचें भाग्यही त्यास लाभलें नाहीं. या त्याच्या दैवदुर्विलासाच्या खडतर व खाष्ट खेळाबद्दल—नशिबाच्या नष्टचर्याबद्दल—काळापुढें हताश झालेल्या हुमायूनबद्दल कोणासही अत्यंत खेद वाटून त्याच्याविषयीं कींव व कळवळा उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं.

हुमायूनविषयीं मि० आर्स्किन हा आपल्या पुस्तकांत असें ह्मणतो कीं, "हुमायूनाची बुद्धि तीव्र होती, आणि अनिश्चित स्वभाव, धरसोडी वर्तन व विचारशून्य वागणूक हे

त्याच्या अंगीं दोष व औदार्य, ममताळूपणा आणि सौजन्य हे गुण स्वभावतःच त्याच्याठायीं वसत होते; परंतु हळुहळू औदार्याच्या ठिकाणीं उथळेपणा आणि सौजन्याच्या ठिकाणीं दुर्बलता त्याच्या अंगांत येत जाऊन त्यामुळें अखेरपर्यंत खुषमस्करे व तोंडपुजे लोकांचा जमाव त्याच्या भोंवतीं गोळा झालेला होता. त्यास विद्येची अभिरुची होती. तो विद्वानांस उत्तम आश्रय देत होता; त्याच्या आश्रयास कित्येक ज्योतिषी व इतिहासकार होते. वनवासांत सुद्धां त्यानें आपणाबरोबर पुस्तकाचे भारे बाळगिले होते. तो व त्याचा भाऊ हिंदाल हे स्वतः कविता करीत होते. गणित व ज्योतिष या शास्त्राचा हुमायूननें बराच अभ्यास केलेला होता. एक वेधशाळा स्थापन करण्याचा त्याचा विचार होता. मुसलमानी धर्मावर त्याची अढळ श्रद्धा होती, आणि मंत्रतंत्र व शकून यांवरही त्याचा अतिशय विश्वास होता; परंतु कोणत्याही सद्गुणाचा अतिरेक झाला ह्मणजे तोही दोष ठरतो असा नियम आहे; त्याप्रमाणें त्याचा प्रत्येक अतिरेकी सद्गुण दोष बनला व त्यामुळेंच त्याच्यावर नानाप्रकारच्या दुःखदायक आपत्ती कोसळल्या." ही गोष्ट अगदीं खरी आहे; परंतु दुर्गुणांचा अतिरेक होण्यापेक्षां सद्गुणांचा अतिरेक झाला तर तो क्षम्य आहे; इतकेंच नव्हे तर तो स्वतः यातना भोगीत असतांही अभिमानास्पद असाच ठरणारा व वाटणारा आहे; आणि अतिरेक झाला तरी तो दुर्गुणाचा नव्हे—सद्गुणाचा, हें लक्षांत ठेवणें अवश्यक आहे. हाल, आपत्ती, कष्टसायास, आयासउपवास, त्रास वनवास भोगावे लागले तरी अखेरीस सद्गुणांचा विजय हा झालाच पाहिजे, असा ईश्वरी सिद्धांत आहे; देवाच्या घरचें सत्य आहे, परमेश्वराचा न्याय आहे. "या हातानें कर, या हातानें भर" असा ईश्वरी ठोकताळा आहे, ह्मणून—आणि ह्मणूनच हुमायूनचें चरित्र—त्याची पदभ्रष्टता, त्याचा वनवास, त्याचें पुन्हां राज्यारोहण व त्याची वैभवसंपन्न स्थिति—या दृष्टीनें अत्यंत उपदेशपर व महत्वाचें आहे, असेंच ह्मणणें भाग आहे.

हुमायूनच्या मृत्यूनंतर अकबर हा गादीवर आला. यावेळीं त्याचें वय तेरा वर्षें तीन महिन्याचें होतें. मोंगल बादशहांमध्यें अकबर बादशहास श्रेष्ठ असें समजतात; परंतु हुमायून यानें त्याच्याकरितां चार निरनिराळे शिक्षक नेमिले असूनही तो कांहींही शिकला नाहीं व अखेरपर्यंत निर्विद्यच राहिला, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे; तथापि तो गादीवर आल्यानंतर त्यानें अब्दुल्लतीफ या नांवाचा एक शिक्षक ठेविला होता. कामरानबरोबरील युद्धानंतर हुमायूनकडे काबूलचें राज्य आल्यावर त्यानें अकबराकडे गज्नी येथील कारभार सोंपविला होता व आपला सरदार बहिरामखान यास त्याला सर्व प्रकारचें योग्य शिक्षण देण्याकरितां त्याच्याजवळ ठेविलें होतें. त्यानंतरही बहिरामखानाच्या सल्ल्यानें हुमायून मृत्यु पावला त्यावेळीं सहा महिने तो पंजाब प्रांताचा कारभार पहात होता व अशा रीतीनें अगदीं अल्पवयांतच त्यास राज्यकारभाराचा थोडासा अनुभव मिळाला होता. अकबर गादीवर आला

तेव्हां दिल्ली व आग्रा या शहरांच्या पलीकडे त्याच्या राज्याचा विस्तार नव्हता, आणि त्यास अनेक शत्रू असून ते मोंगल राज्याविरुद्ध खटपट करीत होते. अशा वेळीं त्यास बहिरामखानाचा पहिल्यानें पुष्कळ उपयोग झाला व नंतर स्वतःच्या कर्तृत्वानें त्यानें मोंगल बादशाही स्थिर करून तिला वैभवसंपन्न केलें.

अकबर लहान असतां त्याचा काका कामरान याच्या कठोर करणीमुळें त्याला पुष्कळ हाल सोसावे लागले; प्रतिबंध भोगावा लागला; त्याच्या जिवावर अनेक प्राणसंकटें ओढवलीं, आणि हुमायूनच्या वनवासामुळें पितृमातृसुखास तो बालपणीं आंचवून त्याच्या शिक्षणाची हेळसांड झाली. पुढें हुमायूनानें स्थिर झाल्यावर अकबराला शिक्षण देण्याचा प्रयत्न केला; परंतु सुरवातीसच तो जो लपून बसला तो कांहीं केल्या सांपडेना. पुढें शिक्षकही युवराजसाहेबांचा कल पाहून त्याच्याबरोबर कबुतरें उडविण्यांत आपला काळ घालवूं लागले. लहानपणीं त्याचें संगोपन बाबरची बहीण खानोजेदाबेगम हिनें केलें व तो दहा वर्षांचा झाला न झाला तोंच हुमायूनानें त्यास आपला हुशार, शूर व मुत्सद्दी सरदार बहिरामखान याच्या ताब्यांत सोंपवून त्याची अकबरास सर्व प्रकारचें शिक्षण देण्याच्या कामावर योजना केली. पुढें हुमायून मृत्यु पावल्यावरही तोच अकबराच्या नांवानें राज्यकारभार चालवूं लागला. यावेळीं मोंगली राज्याची झालेली भयप्रद व आकुंचित स्थिति लक्षांत घेतां बहिरामखानासारखा शूर, स्वामिभक्त व करडा सरदार अकबराजवळ नसता तर त्याच्या शत्रूपासून त्याला आपली गादी संभाळणेंही अतिशय जड गेलें असतें, इतकेंच नाहीं तर हुमायूनाप्रमाणेंच त्याच्यावर कदाचित् पदभ्रष्टतेचाही प्रसंग आला असता; परंतु या सरदाराच्या अलौकिक कर्तृत्वामुळेंच मोंगल राज्यासभोंवतीं जमलेले अशुभसूचक काळे ढग पार वितळून जाऊन तें राज्य यावेळीं आपत्तींतून मुक्त झालें, व भावी काळांत अकबरानें स्वतःच्या कर्तृत्वानें त्याचा विस्तार करून प्रचंड मोंगल बादशाहीची उभारणी केली.

अकबर गादीवर आला तेव्हां सूरवंशी शत्रूंचा बंदोबस्त झाला नव्हता, ह्मणून त्यानें पहिल्यानें पंजाबमध्यें शिकंदरशहावर आपला सरदार व गुलबदन हिचा नवरा खिजरख्वाजा यास पाठविलें; परंतु शहानें त्याचा पराभव केल्यामुळें अकबरानें स्वतः तिकडे स्वारी केली; शिकंदरशहाचा-दिल्लीपासून १६६ मैलांवर यमुना व सतलज या नद्यांच्या मध्यावर, घगरनदीच्या पूर्वेस तीन मैलांवर-अंबाला येथें पराभव करून त्यास समरभूमींतून पळून जाणें भाग पाडिलें. तो शिवालिक पहाडांतील मानकोट येथील किल्ल्याच्या आश्रयास गेल्यावर त्या किल्ल्यास वेढा घालून तो काबीज केला, आणि सतत सहा महिनें शिकंदरानें तेथें टिकाव धरल्यानंतर तो नाइलाजानें अकबरास शरण आला. ( इ० सन १५५७ मे ) तेव्हां अकबरानें त्यास क्षमा करून त्याच्या मुलास आपल्या नोकरींत ठेविलें, आणि

त्यास बंगाल प्रांतांत राहण्याची परवानगी दिली; व पुढें लवकरच तो मृत्यू पावून अकबराचा हा एक शत्रू नाहींसा झाला. त्यानंतर पूर्वेकडील प्रदेशांत महंमदशहा अदीली व त्याचा प्रधान हिमू हे आपल्या जंगी सैन्यानिशीं अकबराशीं झगडण्यास तयार झालेले होते; अकबर हा पंजाबमध्यें जालंदर येथें असतांनाच इकडे ते पूर्वेकडून प्रदेश काबीज करीत करीत एकसारखे मोठ्या जोरानें पुढें येत होते. त्यांचा सरदार शादीखान यानें अकबराचा सरदार खानजमान याचा पराभव केला होता. दिल्लीचा अधिकारी तार्दिबेग याचा मिरत येथें पराभव करून त्यास पळवून लाविलें होतें. आग्रा शहर ताब्यांत घेतलें होतें; आणि हिमू यानें तर "विक्रमाजित" हें नांव धारण करून दिल्ली येथें आपलें राज्य सुरूं केलें होतें. अकबरास ही बातमी जालंदर येथें समजली. त्याचे पराभूत झालेले सर्व सरदार तेथें गेल्यावर या भयंकर अरिष्टाची त्याला पूर्ण कल्पना झाली; व या आणीबाणीच्या प्रसंगीं कसें वागावें, व काय करावें, याचा विचार करण्याकरितां त्यानें आपल्या सर्व सरदार मंडळीस एकत्र जमविलें. तेव्हां त्यांपैकीं बहुतेकांचें मत "तूर्त युद्ध न करतां काबूल येथें निघून जावें" असें पडलें; परंतु बहिरामखानानें आपलें असें स्पष्टमत दिलें, कीं, या प्रसंगीं माघार घेणें धोक्याचें आहे. एकवार शत्रू बळावला म्हणजे त्याला मोडून काढणें दुरापास्त होईल, म्हणून याच वेळीं हिमूबरोबर युद्ध करून एकदांच कायतो सोक्षमोक्ष करून घेतला पाहिजे." अकबरास बहिरामाची सल्ला पसंत पडली, व त्यानें त्याप्रमाणें दिल्लीकडे चाल करून जाण्याची तयारी केली. परंतु यावेळीं अकबराच्या सरदारांत ऐक्य, उत्साह अथवा शिस्त नव्हती, व अकबर लहान असल्यामुळें त्यास फारसें कोणी जुमानीत नसून बादशाही सैन्यावर त्याचा दरारा बसला नव्हता. परंतु हिमूसारख्या प्रबळ प्रतिस्पर्ध्याशीं—टक्कर मारितांना ही स्वेच्छाचारी व बेशिस्त वागणूक नाशकारक ठरणारी होती ही गोष्ट बहिराम यानें पूर्णपणें ताडिली; आणि बादशाही सैन्यावर योग्य दरारा बसविण्याकरितां अकबराच्या गैरहजरींत त्याच्या संमतीशिवाय, हुमायूनाच्या वेळेपासूनचा इमानी सरदार तार्दिबेग यास, परवानगीशिवाय दिल्ली सोडून आल्याबद्दल ठार मारिलें. त्याबरोबर, त्यानें अनुमान बांधिल्याप्रमाणें सर्व सैन्यांत व सरदारांत अकबराबद्दल, व विशेषतः बहिराम हाच सर्वस्वीं सूत्रचालक असल्यामुळें त्याच्या बद्दल, एकदम दरारा उत्पन्न झाला, व पुढील व्यवस्था सुरळीतपणें चालूं झाली. अकबर परत आल्यावर बहिराम यानें त्यास ही सर्व हकीकत कळविली, तेव्हां त्यानें नाखुषीनें बहिरामाच्या या कृत्यास आपली संमति दिली; परंतु तार्दिबेग हा अतिशय इमानी असून हुमायूनाच्या वेळेपासूनचा जुना नोकर होता, आणि हुमायून मृत्यू पावला तेव्हां त्यानेंच ती बातमी गुप्त ठेवून दिल्ली शहरांत उत्तम बंदोबस्त राखून अकबरास ही बातमी ताबड-

तोब पंजाबमध्यें पाठविली होती, व त्याच्या इमानीपणामुळेंच अकबरास कोणत्याही मानगडीशिवाय राज्यपदावर आरूढ होतां आलें होतें, ही गोष्ट अकबर याच्या पूर्णपणें लक्षांत असल्यानें त्याला तार्दिबेगच्या मृत्यूबद्दल अतिशय वाईट वाटलें, तथापि झाली गोष्ट परत येत नसल्यानें तो या बाबतींत नाइलाजानें बहिरामाच्या इच्छेच्या आधीन झाला. नंतर अकबर हा आपल्या सैन्यासह दिल्लीच्या रोंखानें पुढें चाल करून आला, तेव्हां हिमूही त्याच्याशीं युद्ध करण्याकरितां पुढें आला, व उभयतांचा पानिपतच्या प्रख्यात समरभूमीवर मुकाबला झाला. युद्धास तोंड लागण्यापूर्वीच बहिरामानें हिमूचा, मुख्य सैन्यापासून पुढें आलेला तोफखाना छापा घालून कब्ज करून घेतला; त्यामुळें युद्धास तोंड लागण्यापूर्वींच हिमूच्या युद्धशक्तीची एक प्रमुख व प्रवाही नाडी तुटली जाऊन तो निःशक्त बनला. तथापि धैर्य न खचूं देतां त्यानें तसाच युद्धसंग्राम सुरूं केला, आणि आपल्या " हवा " या नांवाच्या हत्तीवर बसून तो समरभूमींत आपल्या सैन्यास प्रोत्साहन देत फिरत राहिला. इतक्यांत त्याच्या डोळ्यास तीर लागून तो जखमी होऊन त्याच्या सैन्यास दिसेनासा झाला. तेव्हां हिमू मेला असें समजून त्याचें सैन्य कच घेऊन समरभूमी सोडून पळून गेलें. हिमू हा आपल्या सैन्याच्या पिछाडीस जात असतां पकडला गेला; व त्यास अकबरापुढें हजर करण्यांत आलें; ( ता० ५ नोव्हेंबर इ० सन १५५६ ) त्यावेळीं त्यास आपण स्वहस्तानें ठार मारून " गाजी " हें नांव मिळवावें ह्मणून बहिरामानें अकबर यास पुष्कळ आग्रह केला; परंतु त्यानें बहिरामाची विनंति मान्य केली नाहीं इतकेंच नव्हे तर हिमूची ही स्थिति पाहून त्याच्या डोळ्यास आंसवें आलीं; हें पाहून बहिरामानें स्वतः पुढें येऊन त्याचा शिरच्छेद केला. अशा रीतीनें शिकंदरशहा सूर व त्यानंतर हिमू या दोन प्रबळ शत्रूंचा निकाल लागला. महंमदशहा अदीली हा हिमूच्या मृत्यूनंतर पूर्ण निर्बल बनला, आणि पुढें लवकरच बंगालचा सुलतान महंमदशहा सूर याच्या मुलानें त्यास युद्धांत गांठून ठार मारिलें व या तिसऱ्याही प्रबळ शत्रूच्या त्रासांतून अकबर मुक्त झाला; व त्याची राजकीय स्थिति पुष्कळच स्थिरावून तो आपल्या राज्यवृद्धीच्या पुढील उद्योगास लागला.

बहिरामखान हा मोठा स्वामिभक्त, शूर व करडा सरदार असून मोठा राजनीतिकुशल व मुत्सद्दी पुरुष होता. हुमायूनाच्या वनवासांत तो त्याच्या अतिशय उपयोगीं पडला होता. हुमायूनाचे अनेक सरदार व इतर मंडळी त्यास आपत्कालीं सोडून गेली होती तरी त्यावेळीं सुद्धां हुमायूनालाच चिकटून राहून त्याच्याबरोबर अनेक हाल-आपत्ती व संकटें सोसून त्यानें आपलें इमान कायम ठेवून हुमायूनाचा पक्ष प्रबळ व यशस्वी करण्याची शिकस्त केली होती आणि अकबरास लहानपणापासून शिक्षण देऊन व त्याच्या अफगाण शत्रूंना नेस्तनाबूद करून अकबराचें महत्त्व व वर्चस्व स्थापन करण्यांत त्यानें अश्रांत परिश्रम घेतले

होते; परंतु तो निष्टुर, एककल्ली व खुनशी होता; आणि हुमायूनाच्या काळापासून दुसऱ्यांना हुकूम करण्यांत तो चटावलेला असल्यानें दुसऱ्याचे हुकूम मान्य करण्याची आणि स्वतःहून दुसऱ्याचें महत्त्व अधीक असल्याचें कबूल करण्याची वेळ आल्याबरोबर त्याच्या इमानाची इमारत हळूहळू ढांसळण्यास सुरवात झाली, आणि त्याच्या हातांतून सर्व राज्याचा कारभार गेल्याबरोबर ती एकदम धडाडून खालीं आली. बहिरामाच्या या स्वभावामुळें त्याला अनेक शत्रू उत्पन्न झाले. त्याच्या विरुद्ध अनेक खटपटी सुरू झाल्या; त्याच्याबद्दल अकबराकडे सारख्या कागाळ्या जाऊं लागल्या. पुष्कळवेळां अकबर हा बहिराम यास न विचारितांच स्वतःच्या इच्छेप्रमाणें वागूं लागल्यामुळें बहिरामचें मन त्याच्याविषयीं कलुषित झालें; उलटपक्षीं बहिरामचें स्वेच्छाचारी, अन्यायी व डोईजड वर्तन अकबरास दुःसह वाटूं लागून त्याचेंही मन बहिरामाविषयीं कलुषित झालें होतें; व त्यांत त्याच्या विरुद्ध असलेल्या शत्रूंनीं भर घातल्यामुळें उभयतांमध्यें द्वेषभाव वाढत चालला होता आणि कसें तरी करून बहिरामाच्या लोखंडी मुठींतून आपण पूर्णपणें स्वतंत्र होऊन राज्यकारभार चालवावा असा त्याचा निश्चय झाला होता. त्याप्रमाणें बहिरामासह तो एके दिवशीं शिकारीस गेला असतां आई आजारी असल्याचें निमित्त करून दिल्ली येथें परत आला. स्वतःच्या हातांत राज्यसूत्रें घेतल्याबद्दल जाहीरनामा काढिला. बहिराम यास तसें कळवून मक्केस जाऊन रहावयाचें असल्यास तुमच्या खर्चाचा उत्तम बंदोबस्त करून देऊं असेंही त्यांतच दिग्दर्शित केलें, आणि तो स्वतः कारभार पाहूं लागला. बहिराम यास अकबरच्या कृत्याचा राग आला; परंतु एकंदर परिस्थिति लक्षांत घेऊन त्यानें नाइलाजानें आपला अधिकार सोडिला व मक्केस जाण्याच्या इच्छेनें तो राजपुन्यांत नागोरपर्यंत गेला; परंतु त्यानंतर त्याची बुद्धि फिरली व त्यानें अकबराविरुद्ध बंड केलें. ( इ० सन १५५९ ) परंतु अकबराच्या सैन्यानें त्याचा मच्छीवाडा येथें पराभव केल्यानंतर कांहीं काळ रानावनांत भटकल्यावर त्यानें अकबराची क्षमा मागण्याकरितां त्याच्याकडे आपल्या तर्फे कांहीं माणसें पाठविलीं. तेव्हां अकबरानें त्याचा योग्य सन्मान करून त्यास दरबारांत आणविलें. त्याचा बहुमान केला. त्यानें आपल्या घराण्यावर केलेल्या उपकारांबद्दल कृतज्ञ बुद्धि दाखविली. त्यास चंदेरी व काल्पी प्रांतांची सुभेदारी देतां

---

१ टीपः—मच्छीवाडा हें ठिकाण प्राचीनकाळीं हिंदु राजांनीं वसविलेलें असून तें पंजाबांत सतलज नदीच्या दक्षिण कांठावर लुधियाना जिल्ह्यांत लुधियाना या शहरापासून तेवीस मैलांवर आहे. या ठिकाणीं मुसलमानांच्या दोन अतिशय प्राचीन मशीदी असून हिंदूंचीही कित्येक प्राचीन देवालयें आहेत व याच ठिकाणीं शीखलोकांचें अतिशय पवित्र मानलेलें गुरुद्वार ( Gurudwara ) आहे. शिवाय या ठिकाणीं पुष्कळ साखर तयार होत असल्यानेंही हें गांव विशेष प्रसिद्ध आहे.

असें सांगितलें; वाटल्यास दरबारांत येथेंच रहा, वाटल्यास मक्केस जा, . असें त्यास ह्मणाला. बहिरामानें मक्केस जाण्याचें कबूल केल्यावर त्याची तिकडे जाण्याची व्यवस्था करून देऊन त्यास खर्चाकरितां पन्नास हजारांची नेमणूक बांधून दिली, आणि अशा रीतीनें या डोईजड मनुष्याचा अडथळा नाहींसा झाल्यामुळें अकबराचें झांकलें जाणारें कर्तृत्व पूर्णपणें बाहेर येण्यास मुबलक संधि व वाव मिळाला.

बहिराम हा पुढें मक्केस जाण्याकरितां गुजराथेंत सुरत येथें आल्यावर आपल्या बापास बहिराम यानें पूर्वी लढाईत ठार मारिलें होतें, या गोष्टीचा सूड उगविण्याकरितां मुबारिकखान या नांवाच्या एका पठाणानें त्याच्या भेटीस येऊन त्याचा खून केला. ( जानेवारी इ० सन १५६१ ) त्यानंतर त्याच्या कुटुंबांतील मंडळी आग्रा येथें परत आली; अकबरानें त्या सर्वांचा उत्तम परामर्ष घेऊन त्याचा मुलगा मिर्झाखान यास आपल्या सैन्यांत सरदारकी दिली व भावी काळांत हाच मनुष्य विशेष प्रसिद्धीस येऊन " खानखानान " या नांवानें ओळखला जाऊं लागला. तथापि बहिरामखानाच्या कर्तृत्वामुळेंच हुमायूनाला व खुद्द अकबरालाही आपत्तीच्या प्रसंगांतून यशस्वीपणानें बाहेर येतां आलें, ही गोष्ट आमरण अकबर केव्हांही विसरला नाहीं; आणि पश्चात्तापानें शुद्ध झालेल्या या पतित पुरुषास विशेष सन्मानानें वागविण्यांत इतक्या लहान वयांतही अकबरानें जो आपल्या मनाचा थोरपणा व्यक्त केला, त्याबद्दल यास धन्यवाद देणेंही अस्थानीं होणार नाहीं.

मुसलमान व मोंगली राज्याच्या काळांत राजघराण्यांतील दाया, त्यांचे नवरे व मुलगे यांचें दरबारांत व राजवाड्यांत अतिशय महत्व असे; व या दायांचा विशेष मान असून त्यांच्या नवऱ्यांनां व मुलांनां मोठमोठ्या अधिकाराच्या जागा मिळत असत. तुर्की भाषेंत तान्ह्या मुलांस अंगावर पाजणाऱ्या व त्याचा प्रतिपाळ करणाऱ्या दाईस " अंका, " ( " Anka " ) तिच्या नवऱ्यास " अत्का " ( " Atka " ) आणि तिच्या मुलास अथवा या दूधभावास " कोका " ( " Koka " ) असें ह्मणतात. अकबराच्या अशा तीन दाया प्रसिद्ध आहेत. त्या ह्मणजे झैनखानची आई पिछाजान अनागा, आदमखानाची आई महाम अनागा, आणि आझमखानाची आई जीजी अनागा, या असून त्यांतल्यात्यांत जीजी अनागा हिजवर त्याची अतिशय भक्ति होती. आणि त्याच्या कारकीर्दींत झालेल्या अनेक प्रधानांत महंमदखान ऊर्फ सम्सुद्दीनअत्का, मिर्झाअझमकोका वगैरे दाई घराण्यांतील मंडळी प्रधानपदावर असून आदमखानकोका, अजीजकोका, त्याचा मुलगा अब्दुल्लाकोका, झैनखानकोका वगैरे मंडळी सरदारपदावर होती. त्यांपैकीं झैनखानाचा बाप हा अकबराची माता हमीदाबानू हिच्या तैनातींत असून नेहमीं तिच्या हौद्याजवळ हजर असे. व झैनखानाची आई ही अकबराच्या लहानपणीं त्याची दाई असे; शिवाय अकबराचा दुसरा दूधभाऊ अजीजखानकोका हा असून त्याची एक मुलगी अकबराचा

मुलगा मुराद यास व दुसरी अकबराचा नातू व जहांगीराचा वडील मुलगा खुसरु यास दिली असून, तो अकबराच्या प्रमुख सरदारांपैकीं एक होता. त्याप्रमाणेंच आदमखान-कोका हा महामअनागा या नांवाच्या अकबराच्या दाईचा मुलगा असून ती अकबराची मातां हमीदाबानू हिच्या नात्यांतील होती. ही बाई मोठी हुशार पण महा कारस्थानी व खटपटी होती. प्रत्यक्ष अकबरावरही तिचें अतिशय वजन होतें, आणि याच बाईनें बहिरामविरुद्धच्या खटपटींत प्रमुखत्वानें भाग घेऊन त्याच्याविषयीं अकबराचें मन अतिशय कलुषित केलें होतें; हरएक कामांत ढवळाढवळ व खटपटी कारस्थानें करण्याची तिला संवय असून स्वभावानेंही ती अतिशय दुष्ट व स्वार्थी होती. आपला मुलगा—आदमखान यास कल्पनातीत योग्यतेस चढविण्यासाठीं तिनें नानाप्रकारच्या खटपटी केल्या होत्या; आणि अकबराचा त्याच्यावर विशेष विश्वास बसला असून-त्यानें त्यास योग्यतेसही चढविलें होतें. तरी सुद्धां तेवढ्यानें तिचें समाधान झालें नव्हतें. या आदमखानास अकबरानें माळवा प्रांताचा पठाण सुलतान बाझबहादूर याचा पाडाव करून माळवाप्रांत सर करण्याची कामगिरी सोंपविली होती. हा सुलतान मुसलमान असूनही हिंदुधर्माचा द्वेष करीत नसे; आणि त्याच्या कारकीर्दीत धार्मिक जोरजुलुमाला थारा मिळत नसे. त्याच्या जनानखान्यांत पुष्कळ हिंदू स्त्रिया होत्या. तो स्वतः मोठा उदार व प्रजादक्ष होता; परंतु तो विषयी व विलासी असून त्याची सौंदर्यसंपन्न प्रेमी राणी रूपमती हिच्या स्नेहपाशांत तो इतका बद्ध झाला होता कीं, सतत सात वर्षें त्यानें राज्यकारभाराकडे पूर्ण दुर्लक्ष्य केलें होतें व त्यामुळें राज्यकारभाराची घडी पूर्णपणें विसकटून गेली होती. परशत्रूपासून आपलें व आपल्या राज्याचें संरक्षण करण्याची त्यास शुद्धी राहिली नव्हती, आणि अकबराचें सैन्य आपणावर चाल करून येत आहे ही गोष्ट त्यास कळली तरी सुद्धां त्या सैन्याचा प्रतिकार करण्याची तिळमात्रही फिकीर न करितां तो राणी रूपमतीबरोबर सारंगपूर¹ येथें विलासांत व ऐषारामांत दंग राहिला होता. मोंगल सैन्य आपली राजधानी मांडवगड येथून वीस मैलांइतकें जवळ आल्याचें त्यास कळल्यावर तो खडबडून शुद्धीवर आला, आणि कशीबशी मोडकीतोडकी त्यानें युद्धाची तयारी केली. परंतु पहिल्याच जोराच्या चकमकींत त्याचा पूर्ण पराजय झाला, आणि तो बऱ्हाणपूरकडे पळून जाऊन आदमखानास विजय प्राप्त झाला. त्यानंतर आदमखानानें

---

१ सारंगपूर, हें शहर माळव्यांत देवास संस्थानांत एक तालुक्याचें ठिकाण असून तें काली सिंधनदीच्या पूर्वकिनाऱ्यावर उज्जयनी व देवासच्या ईशान्येस, उज्जयनीपासून पंचावन्न, देवास पासून पन्नास, इंदुरपासून ऐंशीं, व उज्जन—भोपाळरेल्वेलाइनीवरील सुजालपूर स्टेशन पासून सडकेनें पंधरा मैलांवर पार्वतीनदीच्या कांठीं आहे. हें शहर हल्लींही बरेंच रमणीय असून तेथें पूर्ववैभवाचीं अंधुक चिन्हें अद्यापि दृग्गोचर होत आहेत.

अकबराशीं व बाझबहादूर याच्या जनानखान्यांतील स्त्रियांशीं अधमपणाचें वर्तन केलें. त्यानें युद्धांत मिळालेल्या लुटीपैकीं थोडासा भाग आपल्या सैन्यास खैरात करून बाकीचे घबाड व बाझबहादूरचा सर्व खजिना आपण बळकाविला आणि फक्त कांहीं थोडेसे हत्ती-मात्र त्यानें अकबराकडे पाठवून दिले. बाझबहादूर याचा सर्व जनानखाना अडकवून ठेविला, राणी रूपमती शिवाय बाकीच्या स्त्रिया अकबरास चहाड्या सांगतील ह्मणून त्याची आई महामअनागा हिनें व आदमखानानें त्यांना ठार मारविलें. पतिनिष्ठ राणी रूपमती हिला वश करून घेण्याचा अट्टाहास केला; परंतु तिनें प्राणत्याग करून आदमखानापासून आपली सुटका करून घेतली; आणि अशी व्यवस्था केल्यावर माळवाप्रांत बळकावून तेथेंच आपण स्वतंत्रपणें कारभार करावा असें त्यानें ठरविलें. परंतु आदमखानाची ही सर्व भानगड अकबराच्या कानावर गेल्यामुळें तो स्वतः माळवा प्रांतांत येण्यास निघाला. मार्गांतील गंगरारचा किल्ला हस्तगत करून घेऊन मोठ्या झपाट्यानें कूच करीत तो सारंगपूर येथें येऊन थडकला; परंतु इतक्या लवकर बादशहा येथें येऊन दाखल होईल अशी आदमखानास कल्पना नव्हती; त्यामुळें अकबराचा गंगरार येथेंच प्रतिकार करण्याच्या इरायानें तो आपल्या सैन्यासह तिकडे जाण्याच्या तयारींत असतांनाच अकबर स्वतःच सारंगपूर येथें आल्याचें कळल्याबरोबर त्यानें आपला खरा उद्देश लपवून ठेवून तो तावडतोब अकबराच्या भेटीस गेला. त्यास आपल्या तळावर घेऊन आला, आणि "खजीना मी स्वतःच आपणास भेटून नजर करणार होतों; ह्मणून माझ्याजवळ ठेवून घेतला होता; तो आतां हजर करीत आहे." असें ह्मणून त्यानें तो अकबराच्या स्वाधीन केला. आदमखानाचें हें सर्व ढोंगी वर्तन, व त्याची अधिकप्रसंगी व विश्वासघाताची वागणूक अकबराच्या पूर्णपणें लक्षांत आली; परंतु तो दूधभाऊ असल्यानें अकबरानें त्यास इतर कोणतीही शिक्षा न करितां फक्त त्याच्याकडून माळवा प्रांताचा अधिकार काढून घेतला; त्या ठिकाणीं आपला जुना व एकदां बहिरामखानानें काढून टाकिलेला शिक्षक मुल्ला पीरमहंमदखान याची नेमणूक केली—व त्यास आपणाबरोबर घेऊन तो आग्रा येथें परत गेला.

अकबराच्या आवडत्या दायांच्या नवऱ्यांपैकीं माहीमखान अत्का हा नेहमीं अकबराजवळ रहात असून तो अकबराच्या लहानपणापासून त्याच्या विशेष विश्वासांतील व प्रेमांतील मनुष्यांपैकीं एक होता. तसाच दुसरा मनुष्य ह्मणजे महंमदखान अत्का हा असून त्यास अकबरानें पहिल्यानें पंजाब प्रांताचा सुभेदार नेमिलें होतें, व पुढें त्याचीच वजीरीपदावर नेमणूक केली होती. याच वजिरानें, पूर्वी बहिरामखानाचें महत्व नामशेष करण्यांत, व त्यानंतर आदमखानाची आई महामअनागा हिचें प्रस्थ मोडून टाकण्यांत

प्रमुखपणानें भाग घेतला होता, त्यामुळें त्याचें व आदमखानाचें वांकडें होतें; आणि त्यांतच महंमदखान वजीर असून उलट आपण अगदींच निर्माल्यवत् झाल्यामुळें, आपल्या सर्वनाशास तोच कारणीभूत आहे असें समजून तो या वजीराचा नाश करण्याचे निरनिराळे उपाय योजीत होता, अखेरीस एक दिवस संधी साधून महंमदखान हा राजवाड्यांतील एका दिवाणखान्यांत मोठ्यानें कुराण वाचीत बसला असतां आदमखान हा तेथें आला व आपणाजवळील सुऱ्यानें त्यास भोंसकून तात्काळ ठार मारिलें; ( मे इ० सन १५६२ ) आणि तेथून पळून जाण्याचा प्रयत्न करूं लागला. इतक्यांत ही गडबड ऐकून अकबर तावडतोब त्या ठिकाणीं आला; आदमखान त्यास गच्चीवर उभा असलेला आढळला. त्याबरोबर संतापानें त्याचा हात तरवारीकडे गेला; परंतु तो दूधभाऊ असल्यानें आपल्याच हातून त्याचा वध होऊं नये म्हणून त्यानें आत्मसंयमन करून आपला हात मागें घेतला व त्यास गच्चीवरून खालीं फेंकून देण्याचा हुकूम केला, त्याप्रमाणें बावीस फूट उंचीवरून त्यास खालीं फेकण्यांत येऊन तो मृत्यु पावला. महंमदखानाच्या मृत्यूचें वर्तमान ऐकून त्याचा बाप माहीम अत्का हा चाळीसाव्या दिवशीं पुत्रशोकानें मृत्यु पावला. महंमदखानाच्या मृत्यूनंतर त्याचा वडील मुलगा मिर्झा अजीज कोका यास अकबरानें त्याच्या वडिलाची सर्व मिळकत देऊन त्याच्या वडिलाचा किताब-" शमसुद्दीन "-ही त्याच्याकडे चालू ठेविला; तथापि इतकी भानगड होऊन सुद्धां माळव्यांतील बंडाचा बींमोड झाला नाहीं. बाझबहादूर माळव्यांतून बऱ्हाणपूर येथें गेल्यानंतर त्यानें आपलें राज्य पुनः मिळविण्याची धडपड केली, त्यामुळें पुढें कांहीं काळपर्यंत माळवा प्रांतास शांततेचा लाभ मिळाला नाहीं.

बाझबहादूर व राणी रूपमती या उभयतांसंबंधीं " जुन्या ऐतिहासिक गोष्टी " या सदराखालीं, इतिहाससंग्रहामध्यें जी मोठी मनोवेधक व शोकपर्यवसायी हकीकत दिली आहे. ती थोडक्यांत अशी आहे कीं, माळव्याच्या इतिहासामध्यें राणी रूपमती आणि बाझबहादूर हीं दोन नांवें फार प्रसिद्ध आहेत. बाझबहादूर हा माळव्याचा शेवटचा सुलतान असून त्यानें मांडवगड ऊर्फ मंडू येथें इ० सन १५५४ पासून इ० सन १५६४ पर्यंत राज्य केलें. हा सुलतान अतिशय विलासी व संगीतलोलुप असून त्यानें मांडवगडावर एक मोठा प्रेक्षणीय राजवाडा बांधिला, व तेंच ठिकाण त्यानें आपलें विलासभुवन केलें. राणी रूपमती हिचा जन्म सारंगपूर येथें झाला; तिच्या आईबापाची व लहानपणाची हकीकत चांगलीशी उपलब्ध नाहीं. सरजॉन मालकमूच्या म्हणण्याप्रमाणें ती सारंगपूर येथील एक नृत्यांगना होती, दुसऱ्या एका इंग्रज ग्रंथकारानें ती मंडलेश्वर नजीकच्या एका रजपूत ठाकूराची मुलगी होती, असें म्हटलें आहे. ती अतिशय सौंदर्यसंपन्न असून तिला गायनशास्त्राचेंही उत्तम ज्ञान होतें व तिचा आवाज अतिशय मृदु, मधुर, व मंजूळ होता.

सुलतान बाझबहादूर हा एक दिवस नर्मदाकिनारीं शिकारीस गेला असतां ही रम्य, व मुग्ध बालिका आपल्या मंजुळ स्वरानें निःसर्गदेवतेचें स्तवन करीत एका वृक्षाखालीं बसलेली त्यास आढळली. तिचें अलौकिक सौंदर्य व असामान्य गायन ऐकून तो दिङ्मूढ बनून गेला;–लुब्ध झाला. प्रेमानुरक्त झाला, आणि अखेरीस त्यानें या बालिकेशीं आपला प्रेमसंबंध जुळवून आणिला. ( अजमासें इ० सन १५५७ ) त्या वेळेपासून तो विलासांत दंग झाला. त्यानें राज्यकारभाराकडे पूर्ण दुर्लक्ष केलें. अकबराचें सैन्य, आदमखान या सरदाराच्या नेतृत्वाखालीं माळव्यांत आलें. बाझबहादुराचा पराभव होऊन तो पळाला; राणी रूपमतीस वश करून घेण्याकरितां आदमखानानें आपली पराकाष्टा केली; परंतु ती अतिशय पतिनिष्ट असल्यानें तिनें विषप्राशन केलें; आणि " तुमबिन जियरा रहत हत, मांगत है सुखराज ॥ रूपमती दुखिया भई, बिनाबहादूर बाझ " ॥ असें ह्मणुन तिनें प्राण सोडिला ! याच राणीनें प्रसिद्ध " भूपकल्याण " हा राग शोधून काढिला असें ह्मणतात. राणी रूपमती हिच्या कांहीं कवितांचीं इंग्रजींतही भाषांतरें झालीं असून त्यांपैकीं जनरल कनिंगह्याम् याचें भाषांतर विशेष सुंदर झालेलें आहे. त्याप्रमाणेंच राणी रूपमती हिच्या अगीं वसत असलेल्या अनेक उदात्त गुणाबद्दल, मनाच्या थोरपणाबद्दल व तिच्या कविताबद्दल " मॉडर्न रिव्ह्यू " मध्येंही एका युरोपिएन लेखकानें विशेष प्रशंसनीय उद्गार काढिले आहेत.

अकबरानें इ० सन १५६१ पासून इ० सन १५६७ पर्यंत कित्येक रजपूत राज्यें जिंकण्याचा उद्योग केला; व कित्येक रजपूत घराण्याशीं शरीरसंबंध जोडून त्यांना आपलेसें करून घेतलें. त्यानें इ० सन १५६१ मध्यें जयपूरचा राजा बहारमल्ल याच्या मुलीशीं लग्न केलें; व त्याचा मुलगा भगवानदास यास आपल्या पदरीं मोठी सरदारी दिली. या बाईचें नांव जोधबाई हें असून तिलाच सलीम ऊर्फ जहांगीर हा मुलगा इ० सन १५६९ मध्यें झाला. त्यानंतर त्यानें जोधपूरवर स्वारी केली. तेथील राजा मालदेव अकबरास शरण आला. याच काळांत अकबरानें हिंदु यात्रेकरूंवरील यात्रेच्या ठिकाणचे कर व जिझिया कर माफ केला. जयपूर व जोधपूरनंतर त्यानें मेवाड प्रांतावर स्वारी केली. आणि त्या प्रांताच्या राजधानीचें शहर चितोड यास वेढा दिला. या प्रसंगीं रजपूत लोक मोठ्या निकरानें लढले. तथापि अकबराच्या सैन्यानें अखेरीस किल्ला सर केला; परंतु तेथील राणा उदयसिंग यानें अकबराचें सार्वभौमत्व मान्य केलें नाहीं. तो पहिल्यानें राजपिंपळाच्या अरण्यांत नंतर अरवली पहाडांत पळून गेला व पुढें अशाच स्थितीत वनवासांत तो इ० सन १५७२ मध्यें मृत्यू पावला, मृत्यूपूर्वीं त्यानें अरवली पहाडांतील एका खोऱ्यांत " उदयसागर " या नांवाचा एक तलाव बांधिला, व जवळच एक गांव

बसवून त्यास " उदेपूर " हें नांव दिलें. हेंच ठिकाण हल्लीं मेवाडच्या राजाच्या राजधानीचें शहर आहे. उदयसिंहानंतर त्याचा पराक्रमी मुलगा महाराणा प्रतापसिंह हा गादीवर आला. त्यानेंही अकबराचें सार्वभौमत्व मान्य केलें नाहीं; व त्यास शरणही गेला नाहीं; इतकेंच नाहीं तर त्यानें चितोडाशिवाय सर्व मेवाड प्रांत आपल्या हस्तगत करून घेतला, व शेवटीं अकबरास त्याचें स्वातंत्र्य मान्य करणें भाग पडलें. उलटपक्षीं रतनभोर व कालिंजर हीं ठिकाणें अकबराच्या हस्तगत झालीं; बिकानेरचा राजा कल्ल्याणमल्ल त्यास शरण आला. त्याला व त्याचा मुलगा रायसिंग याला अकबरानें आपल्या सैन्यांत मनसबदारी दिली, आणि अशा रीतीनें मेवाडच्या राज्याशिवाय इतर बहुतेक रजपूत राज्यें अकबराच्या वर्चस्वाच्या आधीन झालीं.

रजपूत राज्यांप्रमाणेंच बुंदेलखंडांतील रजपूत राज्यांवरही आपलें वर्चस्व स्थापन करण्याचा व तिकडील प्रदेश हस्तगत करून घेण्याचा अकबरानें प्रयत्न केला व ग्वाल्हेरपासून सीरोंज व गडमंडळपर्यंतच्या बुंदेलखंडांतील प्रदेशांत त्यानें आपला अंमल स्थापन करून त्या प्रांतांवर सय्यद् महमद्बडा यास सुभेदार नेमून तिकडे बंदोबस्तास ठेविलें. गडमंडळ हें त्या काळीं अकबराच्या ताब्यांत जाण्यापूर्वीं एक स्वतंत्र असें लहानसें राज्य होतें व तेथें दुर्गावती या नांवाची एक शूर स्त्री आपला तीन वर्षांचा मुलगा वीरनरेंद्र याच्या नांवानें राज्यकारभार चालवीत होती. हें राज्य हस्तगत करून घेण्याची अकबराची इच्छा नव्हती; परंतु नाइलाजानें आपला सरदार आसफखान याच्या अत्याग्रहावरून अकबरास तें राज्य हस्तगत करून घेण्याविषयीं त्यास परवानगी द्यावी लागली व अखेरीस पुष्कळ कष्टानेंच गडमंडळ त्याच्या हस्तगत झालें. राणी दुर्गावती ही महोब्याचा रजपूत राजा चंदेल याची मुलगी व गडमंडळ येथील राजा दलपतशहा याची बायको होती. दलपतशहास राणी दुर्गावतीपासून वीरनरेंद्र या नांवाचा एक मुलगा झाला होता. हा मुलगा तीन वर्षांचा असतांनाच राणी दुर्गावती हिजवर वैधव्याचा घाला आला. तथापि तिनें पतिनिधनाचें दुःख गिळून जाऊन आपल्या मुलास राज्याभिषेक केला व त्याच्या नांवानें ती स्वतः मोठ्या शहाणपणानें राज्यकारभार पाहूं लागली. राणी दुर्गावती ही आपल्या प्रजाजनांस मातेप्रमाणें प्रिय झाली होती, तिनें आपल्या प्रजेच्या कल्याणाकरितां ठिकठिकाणीं विहिरी खोदविल्या; तळीं बांधविलीं; अनेक धर्मशाळा बांधिल्या; व तिच्या प्रजावात्सल्याची कीर्ति खुद्द अकबर याच्याही कानावर गेली. असें हें सुसंपन्न राज्य आपल्या हस्तगत करून घेण्याविषयीं अकबराचा सरदार आसफखान यानें बादशहाजवळ अनेकवेळां परवानगी मागितली व अखेरीस तशी परवानगी मिळवून त्यानें गडमंडळावर स्वारी केली. आपणावर आसफखान चाल करून येत आहे ही हकीकत राणी दुर्गावती हिला कळल्यावर तिनें न डगमगतां कांहीं झालें तरी आपल्या

आवडत्या राज्याचें संरक्षण करून आपलें स्वातंत्र्य कायम ठेवण्याचा निश्चय केला; आणि तावडतोब आपल्या सैन्याची जमवाजमव करून आसफखानाशीं टक्कर देण्यास आठ हजार घोडेस्वार व दोन हजार हत्ती एवढें सैन्य उभें केलें. आसफखानास राणी एवढें मोठें सैन्य आणि तेंही इतक्या लवकर रणांगणावर आणील असें स्वप्नांतही वाटण्यासारखें नव्हतें. उलट हें चिमुकलें राज्य आपण सहज हस्तगत करून घेऊं अशीच त्यास खात्री होती. शिवाय राणी आपणाशीं युद्धही न करितां शरण येईल असेंही त्यास वाटत होतें, ह्मणून तो बेफिकीरपणानें आपणाबरोबर पांच हजार सैन्य घेऊन गडमंडळ किल्ल्यावर चाल करून आला; परंतु राणीची ही विलक्षण तयारी व स्वतः राणी आपल्या सैन्याचें आधिपत्य स्वीकारून युद्धास आलेली पाहून तो थक्क झाला. आतां काय करावें अशी काळजी त्यास उत्पन्न झाली. मागें परतावें तर भित्रेपणा पदरीं येतो; राणीशीं युद्ध सुरू करावें तर आपणाजवळ सैन्यबळ कमी त्यामुळें पराजय पदरीं घ्यावा लागतो, तेव्हां आतां काय करावें अशी त्याची द्विधा वृत्ति झाली तथापि युद्ध करण्याचें ठरवून त्याप्रमाणें त्यानें राणीच्या सैन्यावर हल्ला करण्याचा आपल्या फौजेस हुकूम दिला. राणीही तयार होतीच. या युद्धांत आसफखानाचा पूर्ण मोड होऊन त्याच्या सैन्याची वाताहत झाली व तो मोठ्या कष्टानें आपला जीव घेऊन समरभूमींतून पळाला ह्मणूनच वांचला; तथापि अकबरास ही बातमी कळल्यावर त्यानें आसफखानाच्या मदतीस दिल्लीहून एक मोठें सैन्य रवाना केलें. या सैन्यासह आसफखान पुन्हां गडमंडळावर चाल करून आला, व त्यानें पुन्हा राणी दुर्गावतीशीं युद्ध केलें; परंतु त्यांतही त्यास माघार घ्यावी लागली; व समोरासमोर युद्ध करून किल्ला हस्तगत करून घेणें अतिशय दुर्घट आहे अशी त्याची खात्री झाली. तेव्हां त्यानें राणीच्या सैन्यांत पुष्कळ पैसे भरून फूट पाडिली. तिचें पुष्कळ सैन्य आपल्या पक्षाकडे फितूर करून घेतलें, व तिच्याशीं पुन्हा युद्ध सुरू केलें; तथापि राणी दुर्गावती डगमगली नाहीं; तिनें आपला कुमार वीरनरेंद्र यासह मोठ्या निकरानें पूर्वीप्रमाणेंच मोंगल सैन्याशीं युद्ध केलें; पण सैन्य फितूर असल्यामुळें या युद्धाची भवितव्यता कळून चुकल्यासारखीच होती. राणी दुर्गावती आपणाबरोबरील तीनशें इमानी लोकांसह युद्ध करीत असतां तिचा मुलगा वीरनरेंद्र हा एक भयंकर जखम लागून समरभूमींतच ठार झाला. तथापि ही दुःख करण्याची वेळ नाहीं, असें पाहून तिनें आपला शोक तसाच आवरून आपणाबरोबरील परिचारकांस "कुमारास तंबूमध्यें घेऊन जा" ह्मणून आज्ञा केली. तेव्हां एका सेवकानें राणीस विनंति केली कीं, "आपण तंबूपर्यंत येऊन कुमाराची शेवटची व्यवस्था लावावी" त्यावर राणीनें तात्काळ उत्तर दिलें कीं, "मला तिकडे येतां येणार नाहीं; कारण मी जर यावेळीं युद्ध सोडून तिकडे आलें तर युद्ध करीत असलेले माझे लोक नाउमेद होतील. माझा पुत्र रणांत शौर्य गाजवून पतन पावला हें पाहून मला आनंद

झाला; आणि हें युद्ध समाप्त झालें ह्मणजे मी त्याला स्वर्गीतच भेटेन." नंतर, पुन्हा आपल्या लोकांस उत्तेजन देत ती शत्रूसैन्याशीं मोठ्या निकरानें युद्ध करूं लागली; परंतु इतक्यांतच तिच्या डोळ्यांत व छातींत तीर लागून ती मूर्च्छा येऊन हौद्यांत पडली. तेव्हां तिच्या सरदारांनीं तिचा हत्ती एकीकडे काढून घेतला; क्षणार्धांत राणी शुद्धीवर आली; आणि मोंगली सैन्याच्या गराड्यांतून आपणास सुरक्षितपणें बाहेर पडतां येणार नाहीं असें पाहून, आपल्या प्रिय गडमंडळ किल्ल्याचें अखेरचें अश्रुपूर्ण नेत्रांनीं दर्शन घेऊन, आपल्याजवळील शस्त्रानें तिनें तात्काल आत्महत्या करून घेतली; व तिच्या एकनिष्ठ सेवकांनीं, तिच्या इच्छेप्रमाणें तिचें कलेवरही शत्रूच्या हातीं न जाऊं देतां, त्याची शेवटची व्यवस्था लाविली. या पराक्रमी राणीबद्दल कर्नेल स्लीमन, यानें असें लिहिलें आहे कीं, " गडमंडळची रणशूर राणी दुर्गावती हिचें स्मारक समाधिरूपानें—त्याच पर्वत प्रदेशामध्यें बांधलें गेलेलें आहे. तेथें दोन पाषाणस्तंभ उभे केलेले असून ते त्या युद्धभूमीचा देखावा प्रेक्षकांच्या मनांत मूर्तिमंत उत्पन्न करीत आहेत. या गिरिशिखरावर रात्रीच्या समयीं अद्यापि भयंकर रणघोष होत असतो असें ह्मणतात. ह्या निर्जन परंतु रमणीय प्रदेशामध्यें जे प्रवासी जातात ते मोठ्या आदरानें या स्थळीं येतात. प्रेमपूर्वक ह्या रणशूर राणीच्या समाधीचें दर्शन घेतात, आणि तिच्या पराक्रमानें थक्क होऊन स्वानंदचित्तानें तिची पूजा करितात. ह्या प्रदेशामध्यें चकचकीत कांचेचे तुकडे पुष्कळ सांपडतात. ते घेऊन प्रवासीलोक तेथें समर्पण करितात. ह्या त्यांच्या प्रघाताप्रमाणें मीं देखील राणी दुर्गावतीच्या दिव्य सद्गुणांच्या अभिनंदनार्थ एक कांचेचा तुकडा तेथें समर्पण केला." राणी दुर्गावतीच्या मृत्यूनंतर गडमंडळचें राज्य मोंगल बादशाहीस जोडलें गेलें, व अकबरानें सादककखान या नांवाच्या एका सरदाराची, त्याठिकाणीं सुभेदार ह्मणून नेमणूक केली.

त्यानंतर इ० सन १५७२-१५७३ या वर्षी अकबरानें गुजराथ प्रांतांत अनेक मोठमोठीं युद्धें करून तो प्रांत सर करून घेतला; व अहमदाबाद येथें त्यानें आपला एक सुभेदार नेमून, तेथून खंबायतेस जाऊन पहिल्यानेंच समुद्रदर्शन घेऊन सुरतेस गेला; व सुरत काबीज करून घेऊन इ० सन १५७३ च्या जून महिन्यांत तो आग्रा येथें परत गेल्यावर त्यानें राजा तोडरमल्ल यास गुजराथेंत पाठवून तेथील जमाबंदी करविली. तथापि त्यानंतर पुन्हां गुजराथेंत बंड झालें. तेव्हां अकबरानें बहिरामखानाचा मुलगा व आपला शूर सरदार मिर्झाखान यास तिकडे पाठविलें. त्याप्रमाणें त्यानें तिकडे जाऊन तें बंड तात्काळ मोडून टाकिलें; आणि पुन्हा शांतता स्थापन केली. या कामगिरीबद्दल अकबरानें त्यास " खानखानान " हा किताब दिला, व याच नांवानें तो पुढें ओळखला जाऊं लागला. गुजराथच्या सुभ्यावर अकबरानें प्रथम आपला दूधभाऊ अजीज कोका

याची व तो परवानगी शिवाय मक्का येथें निघून गेल्यावर शहाजादा मुराद याची नेमणूक केली होती; परंतु पुढें मुराद हा निजामशाही विरुद्ध युद्ध करण्यास अहंमदनगर येथें गेल्यावर तिकडेच मृत्यु पावला, व याच सुमारास अजीज कोका मक्केहून परत आला, तेव्हां अकबरानें त्यासच पुन्हा गुजराथच्या सुभ्यावर कायम केलें.

यावेळीं बंगाल, बिहार व ओढ्या हे तिन्हीही प्रांत सूरवंशी सुलतानांच्या अफगाण सरदारांपैकीं ताजखान व त्यानंतर त्याचा भाऊ सुलेमान याच्या ताब्यांत होते; सुलेमानच्या राजधानीचें शहर पहिल्यानें तांडा[१] हें असून, नंतर त्यानें पाटणा हें आपल्या राजधानीचें शहर केलें होतें, तो इ० सन १५७२ मध्यें मृत्यु पावला. त्यानंतर त्याचा मुलगा दाऊदखान हा गादीवर आला; व त्यानें तिकडे आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें. तेव्हां अकबरानें त्याच्यावर स्वारी करून त्याच्या राजधानींचें पाटणा हें शहर हस्तगत करून घेतलें ( इ० सन १५७४ ) आणि दर्यापूरपर्यंत त्याचा पाठलाग करून, व मुनिमखान व तोडरमल्ल या उभयतां सरदारांना त्याच्यावर रवाना करून तो आग्रा येथें परत आला. नंतर या उभयतां सरदारांनीं दाऊदखानाचा सारखा तीन वेळां पराभव केला. तेव्हां तो पळून जाऊन बाह्यप्रदेशीं बंडाळी करूं लागला; तथापि तो पळाल्यानंतर बंगाल, बिहार, आणि ओढ्या हे तिन्हींही प्रांत अकबराच्या अंमलाखालीं आले. ( इ० सन १५७५ ) परंतु मुनिमखान हा याच वेळीं मृत्यु पावला; तेव्हां अकबरानें बहिरामखानाच्या बहिणीचा मुलगा हुसेन कुलीखान ऊर्फ खानजहान यास त्याच्या जागीं तिकडे पाठविलें. त्यानें तिकडे गेल्यावर ताबडतोब दाऊदखानाचा सारखा पाठलाग केला, व त्यास ठार मारून बंगाल प्रांतांत शांतता केली. तथापि इ० सन १५७८ मध्यें तो मृत्यु पावल्यावर त्याच्या जागीं नेमलेल्या मुजफरखान या नांवाच्या सरदाराचा खून होऊन बंगाल प्रांतांत पुन्हा अस्वस्थता उत्पन्न झाली. ती अकबराच्या कारकीर्दीच्या अखेरपर्यंत कायम राहून जहांगीरच्या कारकीर्दींत तिकडे पुन्हा शांतता प्रस्थापित करण्यांत आली. आणि राजा मानसिंग यानें त्या प्रांताच्या कारभारावर असतां उत्तम प्रकारची राज्यपद्धति सुरू केली. मध्यंतरीं इ० १५७५

---

१ टीपः—तांडा हें शहर गोगरा नदीच्या दक्षिणेस तीन मैलांवर आणि फैजाबाद जिल्ह्यांतील फैजाबाद या शहरापासून छत्तीस मैलांवर असलेल्या औंध-रोहिलखंड रेलवेच्या अकबरपूर या स्टेशनपासून सडकेनें बारा मैलांवर आहे. हें शहर प्राचीन असून तेथें ४४ मशीदी, ३४ इमामवाडे व ९ हिंदूंचीं देवालयें, बांधल्याचा उल्लेख आढळत आहे व त्याचे अवशेष आजतागायत दिसत आहेत. या ठिकाणीं हल्लीं वर्षांतून दोनदां यात्रा भरत असून पूर्वीं या ठिकाणीं डाक्का शहरच्या तोडीची अतिशय तलम व सुंदर " जमदानी " मलमल ( Jamdani Muslin ) तयार होत असल्याबद्दलही तें प्रसिद्ध आहे.

पासून सन १५७९ पर्यंतच्या काळांत अकबरास शांततेचा लाभ झाला. त्या अवधींत अकबरानें राज्यांत अनेक सुधारणा केल्या व आग्रा आणि शिक्री येथें सुंदर इमारती बांधिल्या. इ० सन १५८५ मध्यें त्याचा सावत्र भाऊ हकीम ऊर्फ महंमद हकीम मिर्झा हा मृत्यु पावल्यावर काबूल प्रांत आपल्या ताब्यांत घेऊन व तिकडे राजा मानसिंग यास पाठवून त्या प्रांतांत स्वस्थता केली. नंतर इ० सन १५८७ मध्यें राजा भगवानदास याचा पराभव झाल्यानंतर, महंमद कासीमखान या नांवाच्या सरदारास त्यानें पुन्हा काश्मीर प्रांतावर पाठविलें; व तेथील सुलतान युसुफ यास त्याच्याकडून पकडून आणवून व त्यास बिहार प्रांतांत एक लहानशी जहागीर देऊन, अकबरानें काश्मीर प्रांत आपल्या राज्यास जोडिला. त्यानंतर इ० सन १५९० मध्यें अकबराचा गुजराथेंतील सुभेदार मिर्झा अजीज कोका यानें जुनागड हस्तगत करून घेतलें. सिंधप्रांतामधील अर्घुन घराण्याचा शेवट झाल्यावर त्या प्रांतावर कांहीं इराणी सरदार अंमल करीत होते; परंतु त्यांच्यामध्यें आपसांतच तंटे लागल्याचें कळल्यावर अकबरानें उत्तरेकडून सिंध प्रांतावर फौज पाठवून मिर्झा अजीज कोका यास दक्षिणेकडून तिकडे चाल करून जाण्याविषयीं हुकूम दिला. त्याप्रमाणें हीं सैन्यें सिंध प्रांतांत गेल्यावर तेथील कारभारी मिर्झा जानी बेग याच्या बरोबर त्यांनीं युद्ध केलें. त्यांत जानीबेगचा पराभव होऊन सिंध प्रांत अकबराच्या ताब्यांत आला. व जानी बेग यास अकबरानें सैन्यांत सरदारी देऊन आपल्या आश्रयास ठेवून घेतलें. ( इ० सन १५९२ ) त्यानंतर दोन वर्षांनीं अकबरानें कंदाहार प्रांतावर सैन्य पाठविलें व कांणत्याही प्रतिकाराशिवाय कंदाहार व त्याच्या आसपासचा प्रदेश अकबराच्या ताब्यांत आला ( इ० सन १५९४ ).

अशा रीतीनें उत्तरेकडील प्रदेशांत स्वस्थता केल्यावर अकबरानें दक्षिणेकडील प्रांतांकडे आपली नजर फिरविली. अकबराच्या वेळेस निजामशाहीची सत्ता पुष्कळच वाढली होती; परंतु ही गोष्ट अकबरास पसंत नसूनही, उत्तरेकडील प्रदेशांत शांतता स्थापन करीपर्यंत त्यास स्वस्थ बसावें लागलें होतें. पुढें बुऱ्हाण निजामशहा मृत्यू पावल्यावर अहंमदनगरच्या गादीविषयीं तंटे लागले. ही संधि साधून अकबरानें आपला मुलगा मुराद यास तिकडे रवाना केलें. यावेळीं हुसेन निजामशहाची शूर मुलगी व अलीआदिलशहाची पराक्रमी बायको चांदबीबी हिनें मुरादाचा मोठ्या निकरानें प्रतिकार करून त्याचें कांहींही चालूं दिलें नाहीं. ही बातमी अकबरास कळल्यावर त्यानें अबुलफज्ल यास दक्षिणेंत पाठविलें. त्याप्रमाणें तो दक्षिणेंत आल्यावर त्यानें बऱ्हाणपूरचा राजा बहादूरखान याची मदत मिळविण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यानें अबुलफज्ल यास मदत न देतां उलट लांचाची लालुच दाखविली. तथापि अबुलफज्ल हा अकबराच्या विशेष मर्जीतील असून

स्वतःही इमानी असल्यामुळें बहादूरखानाच्या आमिषास भीक न घालितां तो तसाच आपणाबरोबरील सैन्यासह अहमदनगर येथें गेला. मार्गांत त्यास वऱ्हाडकडे जात असलेला शहाजादा मुराद हा भेटला; अपमानाचें व पराभवाचें दुःख विसरण्याकरितां तो अनिवार मद्यपान करूं लागला, व त्यांतच त्याचा बऱ्हाणपूरच्या दक्षिणेस शहापूर येथें ( ऐने-अकबरी या ग्रंथांत तो जालनापूर येथें मृत्यू पावला असा उल्लेख आहे. ) इ० सन १५९८ मध्यें अंत झाला. अबुलफज्ल यास अहंमदनगरवर चाल करून आल्यावर मोंगली फौजेंत फितूरी असल्याचें कळलें; तेव्हां त्यानें अकबरास ही हकीकत कळवून स्वतः इकडे येण्याविषयीं विनंति केली. त्याप्रमाणें इ० सन १५९९ मध्यें प्रथमच तो नर्मदा नदी उतरून दक्षिणेंत बऱ्हाणपूर येथें आला. त्यापूर्वींच अबुलफज्ल यानें दौलताबादचा किल्ला काबीज केला होता; शिवाय यावेळीं अहंमदनगर येथें बेबंदशाही माजली असून चांदबीबीचा खून झाला होता. त्यामुळें अकबरानें आपला मुलगा दानियल व खानखानान त्याच्याबरोबर पाठविलेल्या सैन्यानें अहंमदनगर आपल्या हस्तगत करून घेतलें. तथापि सर्व निजामशाहीराज्य मात्र यावेळीं अकबराच्या हस्तगत झालें नाहीं. ( इ० सन १६०० ) त्यानंतर त्यानें खानदेश व वऱ्हाड हे प्रांत जिंकून घेतले. याच सुमारास उत्तर-हिंदुस्थानांत सेलीमनें बंड केल्याची, बातमी त्यास मिळाल्यावर अहंमदनगरकडील युद्धाची व्यवस्था अबुलफज्ल याजवर सोंपवून तो ताबडतोब आग्रा येथें परत आला.

अकबराचीं पहिलीं पुष्कळ वर्षें मोठ्या भरभराटींत गेलीं; तथापि त्यास त्या काळांतही त्याच्या सावत्र भावाकडून, मामाकडून व मेहुण्याकडून उपद्रव पोहोंचला. त्याप्रमाणेंच अंतकाळाच्या आधींही त्याच्यावर दुःखपरंपरा कोसळून तो निराशेंतच मृत्यु पावला. हुमायूनाच्या कारकीर्दींत सुलेमान मिर्झा यास त्यानें बदकशान प्रांताचा, व आपला मुलगा व अकबराचा सावत्र भाऊ महंमदहकीम मिर्झा यास काबूल प्रांताचा कारभार सोंपविला होता. पुढें अकबराच्या कारकीर्दींत सुलेमान यानें काबूलवर स्वारी करून त्यास काबूल येथून पळवून लाविलें. तेव्हां तो पंजाबांत आला व तो प्रांत आपल्या हस्तगत करून घेण्याच्या उद्योगास लागला. यावेळीं पूर्वेकडील प्रदेशांत युझबेग लोकांनीं केलेलीं बंडें मोडण्यांत अकबर गुंतला असल्यामुळें त्याला हकीमवर लागलींच स्वारी करून जातां आलें नाहीं. तथापि इ० सन १५६६ च्या नोव्हेंबर महिन्यामध्यें अकबर स्वतः तिकडे गेला. तेव्हां हकीम पळून पुन्हा काबूल येथें परत गेला व यावेळीं सुदैवानें सुलेमान मिर्झा बदकशान प्रांतांत गेलेला असल्यानें काबूल त्याच्या हस्तगत होऊन तो तेथें कारभार पाहूं लागला. तथापि त्यानंतरही तो तिकडे स्वस्थ न बसतां अकबराला परभारें त्रास देण्याचीं मधून मधून अंतस्थरीत्या कारस्थानें करीत राहिला. बंगालमधील सूरवंशीं अफगाण बंडखोर सरदारांना

गुप्तरीतीनें त्यानें काबूल येथून मदत केली होती; परंतु तो मित्रा असून व्यसनी होता. त्याला दारू पिण्याचें व्यसन जडलेलें होतें; आणि अकबराबरोबर समोरासमोर येऊन युद्ध करण्याची त्याच्यांत हिंमत नव्हती, ताकद नव्हती, व तशी त्याची तयारीही नव्हती. ह्मणून तो यावेळीं काबूल सोडून हिंदुस्थानांत आला नव्हता. तथापि हीच गोष्ट अकबरास फायदेशीर झाली; कारण यावेळीं जर तो इकडे आला असता तर आधींच बंगाल प्रांतांत वाढत चाललेला असंतोष व अस्वस्थता यांत भर पडून त्यामुळें अकबरास अधीक त्रास पोहोंचला असता; तथापि त्यानें पुढें इ० सन १५७९ मध्यें राजा मानसिंह हा अकबरातर्फे पंजाब प्रांताचा कारभार पहात असतां त्या प्रांतावर स्वारी केली होती; परंतु राजा मानसिंह यानें त्याचा पूर्णपणें पराजय करून त्यास काबूल येथें परत जाण्याचा विचार करण्यास भाग पाडिलें होतें. इतक्यांत अकबरास ही हकीकत कळल्याबरोबर तो ताबडतोब पंजाबमध्यें हकीमवर चाल करून गेला, तेव्हां हकीम पंजाब सोडून काबूलकडे पळून गेला. त्याच्यावर अकबरानें शहाजादा मुराद यास पाठविलें; परंतु हकीमनें त्याचा पराभव केल्याचें कळल्यावर तो स्वतः त्याच्यावर चाल करून गेला. त्यास शरण येणें भाग पाडिलें. आपल्या नेहमींच्या उदार स्वभावास अनुसरून त्याच्याकडे पुन्हा काबूल येथील कारभार सोंपविला. त्याच्या हालचालीवर नजर व दडपण ठेवण्याकरितां जयपूरकर राजा भगवानदास यास काबूल येथें ठेविलें; व तो आग्रा येथें परत आला. पुढें इ० सन १५८५ मध्यें हा व्यसनी राजपुत्र ऐन तारुण्यांत आपल्या वयाच्या ३१ व्या वर्षी काबूल येथें मृत्यू पावला. त्यामुळें आपल्या या घरांतील एका शत्रूच्या त्रासांतून अकबराची मुक्तता झाली. मिर्झाहकीम याच्या मृत्यूनंतर राजा मानसिंह यास अकबरानें काबूल प्रांताच्या सुभ्यावर नेमिलें, आणि त्या प्रांताचा मानसिंहानें उत्तम बंदोबस्त करून सर्वत्र शांतता स्थापन केली.

अकबराचा मामा ख्वाजा मुअज्जम व बहीण बक्षिबानू हिचा नवरा शराफउद्दीन या उभयतांमुळेंही अकबरास त्रास पोहोंचला. त्याचा मामा मुअज्जम हा मोठा व्रात्य, अविचारी असून, लहर येईल तेव्हां तो बेलाशक वाटेल त्याचा खून सुद्धां करीत असे. हा मनुष्य मोठा दुष्ट असून तो आपली बायको जहाराआगा हिचा अतिशय छळ करीत असे. तिची आई बिबी फातीमा ही हुमायूनच्या काळापासून, त्याच्या आश्रयास असून तिचीच हुमायूनच्या जनानखान्यावर देखरेख असे. त्यामुळें बाळपणापासून अकबर या वृद्धबाईस ओळखीत असून तिच्यावर त्याची विशेष भक्ती असे. या बाईनें आपल्या मुलीची–मुअज्जमकडून होणाऱ्या छळाची–दुःखद कहाणी अकबरास सांगून या दुष्ट मनुष्यापासून तिचें संरक्षण व सोडवणूक करण्याविषयीं त्यास विनंति केली. तेव्हां एक

दिवस तो शिकारीस निघतांना मुअज्जमच्या घरावरून पुढें जाण्याच्यावेळीं त्यानें अगाऊ जासूद पाठवून आपल्या मामास आपणास येऊन भेटण्याविषयीं विनंति केली. तेव्हां अकबरानें आपणाला भेटीस बोलावण्याचें कारण त्याच्या तावडतोब लक्षांत आलें; आणि त्यानें संतापानें तावडतोब घरांत जाऊन आपल्या बायकोचा खून केला, व तिच्या रक्तानें भरलेली कट्यार बाहेर घेऊन येऊन त्यानें ती अकबराच्या जासूदाच्या हवालीं केली. तेव्हां तो परत येऊन त्यानें अकबरास ही सर्व हकीकत निवेदन केली. त्याबरोबर अकबर हा स्वतः त्याच्या घरीं गेला, व त्यास कांहीं विचारणार इतक्यांत तोच अकबरावर तरवार उपसून चाल करण्याच्या बेतांत आला. तेव्हां अकबरानें त्यास जरब भरून " त्या गरीब बायकोचा खून कां केलास ? " ह्मणून विचारिलें, परंतु तो अकबरासही बेफामपणानें शिव्या देऊं लागला; तेव्हां अकबरानें त्यास आपल्या नोकरांकडून पकडवून त्याची ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत प्रतिबंधांत रवानगी केली; आणि तेथेंच तो पुढें मृत्यू पावला; ( इ० सन १५६३ ) परंतु हा मामा कांहींतरी बरा; कारण तो जरी आपल्या तरवारीस हात घालून अकबरावर त्यास ठार मारण्याकरितां चाल करणार होता, तरी तें त्याचें कृत्य दग्याचें नव्हतें. समोरासमोरचें होतें; आणि अकबराचा नाश करण्याकरितां तो त्याचा प्राण घेणार नसून आपल्या घरगुती बाबतींत अकबर ढवळाढवळ करितो ह्मणूनच घेणार होता; पण अकबराचा मेहुणा शराफउद्दीन याची मात्र तशी गोष्ट नसून तो खटपटी, विश्वासघातकी व दगेबाज होता. त्यानें स्वतः अकबराविरुद्ध बंड उभारिलें; आणि त्याबरोबरच आपल्या एका गुलामामार्फत त्याचा खून करण्याचाही प्रयत्न केला; एके दिवशीं सायंकाळीं अकबर हा राजवाड्यांत परत येत असतां या गुलामानें त्यास तीर मारून जखमी केलें. त्याबरोबर त्याच्या लोकांनीं त्यास पकडलें; व या कृत्याच्या मुळाशीं कोणकोण आहेत, याबद्दल तपास सुरू झाला; परंतु तपासांत मोठमोठीं नांवें बाहेर येऊं लागल्यामुळें हें प्रकरण पेट घेऊन भलत्याच थराला जाईल, अशी अकबराची खात्री झाली. तेव्हां अधिक भानगडींत न पडतां त्यानें त्या गुलामास तावडतोब ठार मारून टाकविलें, व शरीफउद्दीन यास पकडून त्याची प्रतिबंधांत रवानगी केली. या स्वकीयांच्या छळांतून अकबर मुक्त होऊन त्यास कांहींकाळ गृहसौख्याचा लाभ होतो न होतो, तोंच कुटुंबांतील प्रिय मंडळींचा मृत्यूशोक, पुत्रशोक, अबुलफज्ल याच्या मृत्यूमुळें स्नेहशोक, स्वतःचा मुलगा सलीम ऊर्फ जहांगीर याच्या दुर्वर्तनामुळें अंतकाळीं निराशेचा दुःखशोक, अशी शोकपरंपरा सुरू होऊन तो पूर्ण हताश झाला—नाइलाजानें दीन बनला, आणि अशाच स्थितींत त्यास आपल्या आयुष्याचे अखेर दिवस कंठीत रहाणें प्राप्त झालें.

अकबराची माता हमीदाबानू हिचें हुमायूनाशीं हिंदालच्या मुक्कामावर लग्न झालें. हुमायून तेथें आल्यावर हिंदाल तेथें नसल्यानें त्याची आई दिलदारबेगम व बहीण गुलबदन यांनीं त्याचें स्वागत केलें व दिलदारबेगमनें पुढाकार घेऊन हें लग्न घडवून आणिलें. हमीदा ही हिंदालच्या गुरूची मुलगी असून ती व गुलबदन या उभयतां एकाच ठिकाणीं असल्यानें प्रारंभापासून त्यांचें परस्परांवर विशेष प्रेम होतें; व पुढें गुलबदनचा सावत्र भाऊ हुमायून याच्याशीं हमीदाचें लग्न झाल्यानंतर या नणंद-भावजयींचें प्रेम वृद्धिंगत होत जाऊन तें अखेरपर्यंत कायम होतें. गुलबदनच्या नवऱ्याचें नांव खिजरख्वाजा हें असून तो अकबराच्या पदरीं एक सरदार होता. गुलबदन ही मोठी हुषार व शिकलेली असून तिनें "हुमायून नामा" या नांवाचें हुमायूनचें चरित्र लिहिलें आहे. आई हमीदा व आत्या गुलबदन ह्या उभयतांबद्दलही अकबरास अतिशय आदर वाटत होता व त्यानें आपल्या सावत्र आयांची आज्ञा सुद्धां जन्मांत कधींही उल्लंघन केली नव्हती; तथापि अकबराच्या "दीने–इलाही" या नवीन धर्मसंस्थापनेच्या काळांत एका बाबतींत त्यास आपल्या सख्ख्या आई हमीदेच्याच आज्ञेचें उल्लंघन करावें लागलें; ती बाबत ह्मणजे ही होय कीं, "खिस्ती लोकांचें बायबल कुत्र्याच्या गळ्यांत बांधून त्याची धिंड काढ" असें हमीदानें अकबरास सांगितलें; परंतु अकबरास आईचें हें ह्मणणें योग्य न वाटून त्यास ही मातेची आज्ञा अमान्य करणें भाग पडलें. माता हमीदा व आत्या गुलबदन ह्या अकबराजवळच रहात असून त्या उभयतांही पुष्कळ वर्षें जगल्या. हुमायून यास गुलबदनप्रमाणेंच गुल्-बर्ग या नांवाची दुसरी सावत्र बहीण होती. तिची सुंदर मुलगी सलीमा हिचें बहिरामखानाबरोबर लग्न करावें असें हुमायून यानें ठरविलें होतें. त्याप्रमाणें हुमायूनच्या मृत्यूनंतर इ० सन १५५७ मध्यें ती अजमासें सात वर्षांची असतां, तिचें अकबरानें जालंदर येथें आपल्या वडिलांच्या इच्छेप्रमाणें बहिरामखानाशीं मोठ्या थाटानें लग्न लाविलें. (इ० सन १५६१). ही बाई मोठी हुशार, विद्वान् व कवयित्री असून, ती हमीदा व गुल्बदन या तिघींचें परस्परांवर अतिशय प्रेम होतें व तिघींही एकदां दोन वर्षें मक्का येथें जाऊन राहिल्या होत्या. यांपैकीं गुलबदन ही आपल्या वयाच्या ८१ व्या वर्षी ता० ७ फेब्रुवारी इ० सन १६०३ रोजीं व हमीदा ही आपल्या वयाच्या ७७ व्या वर्षी ता० २९ आगष्ट इ० सन १६०४ रोजीं मृत्यु पावली. ह्मणजे अकबरास आपल्या मृत्युपूर्वी आई व आत्या वारल्याचें दुःख झालें. अकबराची विद्वान् बायको सलीमा ही अकबराच्या मृत्यूनंतर सहा वर्षांनीं इ० सन १६११ मध्यें मृत्यू पावली. तथापि अकबराची शोकपरंपरा गुलबदनच्या मृत्युपूर्वींच सुरू झाली होती. त्याच्या तिन्हीं दारूबाज मुलांपेक्षां त्याच्या नातवांवर–ह्मणजे मुरादचा मुलगा मिर्झारुस्तम, जहांगीरचे मुलगे खुस्रू व खुर्रम, आणि पुढें खुर्रम अथवा शहाजहान यानें ठार मारिलेले, अकबराचा विशेष लाडका मुलगा दानियल याचे मुलगे तहमूरास, बायसंघर व

हुशंग या सर्व नातवांवर—त्याचें विशेष प्रेम होतें. या नातवांपैकीं मुरादचा मुलगा मिर्झा-रुस्तम हा अकबर काश्मीरमधील तिसऱ्या स्वारींतून इ० सन १५९७ मध्यें परत येत असतां रस्त्यांत मृत्यु पावला. त्यामुळें अकबरास झालेलें दुःख तो विसरतो न विसरतो तोंच मुराद मृत्यु पावल्याची बातमी आली. त्यामुळें तर तो पूर्णपणें दुःखमग्न होऊन गेला. इतक्यांत सलीमनें त्याचा छळ करण्यास सुरवात केली. आपली वृद्ध आजी हमीदा—अकबराची प्रिय माता हमीदा—ज्या वृद्ध व पूर्वकाळांत वनवास भोगिलेल्या पूज्य स्त्रीस घरांतील सर्व मंडळी तिच्या श्रेष्ठ अधिकाराला, अनुभवाला व वयाला मान देऊन जिला "मारियम् मकानी" ह्मणजे "घरची मेरी" असें अत्यंत आदरानें ह्मणत असत, आणि जिच्या शब्दाचा अनादर करण्याची प्रत्यक्ष अकबराचीही प्राज्ञा नव्हती. ती हुमायूनाची प्रिय पत्नी हमीदा—हिचा असुरी धुंदीच्या उन्मादांत सलीमनें भयंकर अपमान केला, आणि अकबरापासून फुटून निघून दिवसाढवळ्या पितृद्रोहाचा खडा नाच घालण्यास त्यानें सुरवात केली व आपला सवतासुभा निर्माण करण्याकरितां तो होडींतून अलाहाबाद येथें जाण्यास निघाला. हुमायूनची प्रेमी राणी, राजकांता हमीदा, अकबराची प्रिय आई राजमाता हमीदा हिचा त्यावेळीं रस्त्यांत मुक्काम होता. तिला सलीम हा अलाहाबाद येथें जात आहे असें कळल्यावर त्याची भेट घेऊन त्याला प्रेमानें उपदेशाच्या दोन गोष्टी सांगून शुद्धीवर आणावें व उभयतां पितापुत्रांची पुनः गोडी करून द्यावी, अशा इच्छेनें तिनें सलीम यास सांगून पाठविलें कीं, "मी तुझ्या भेटीस येत आहे; जरा थांब." पण सलीमला हा निरोप कळूनही तो आजीची भेट घेण्यास थांबला नाहीं. उलट होडीवाल्यांस निकड लावून अधिक त्वरेनें तो पुढें निघून गेला. तेव्हां ती बिचारी फार कष्टी व खिन्न होऊन परत आली. अकबरास छळण्यास सलीम हा पुत्ररूपानें शत्रू उत्पन्न झाला. अकबराचा दुसरा प्राण असलेल्या अबुल्फज्ल यास ठार मारून, आपल्या बापास अत्यंत दुःखी करून त्याचा मृत्यू नजीक ओढून आणणारा तो पुत्ररूपानें काळपुरुष उत्पन्न झाला; आणि त्यांतच इतर दैवी दुःखाची भर पडून या महान् श्रेष्ठ राजपुरुषाच्या इहलोकींच्या कष्ट व शोकमय जीवनयात्रेचा शेवट झाला.

बुंदेलखंडांत ओर्च्छा[1] या नांवाचें एक प्रसिद्ध शहर आहे. हें शहर सूर्यवंशीं पंचम राजाच्या वंशांतील रुद्रप्रताप या नांवाच्या एका शूर पुरुषानें वसविलें. त्यास भारतीचंद्र, मधुकरसा

---

१ ओर्च्छा ( तेहरी अथवा तिकमगड ) हें बुंदेलखंडांतील एक संस्थान असून त्याची पूर्वीची राजधानी ओर्च्छा व हल्लींची तेहरी हें शहर आहे. या संस्थानांतील बराच प्रदेश डोंगरांनीं व अरण्यांनीं व्यापिलेला आहे. ओर्च्छा हें शहर झांशीच्या दक्षिणेस सात मैलांवर असून ओर्च्छापासून तेहरी नैऋत्यदिशेस चाळीस मैलांवर आहे. ओर्च्छा हें शहर

वगैरे मुलगे असून इ० सन १५५१ मध्यें रुद्रप्रताप मृत्यू पावल्यावर भारतीचंद्र गादीवर आला. त्यानें तेवीस वर्षें राज्य केल्यावर तो इ० सन १५७४ मध्यें मृत्यू पावला व त्याचा भाऊ मधुकरसा हा गादीवर आला. यावेळीं दिल्ली येथें अकबर बादशहा राज्य करीत असून ग्वाल्हेरपासून गडमंडळपर्यंतच्या बुंदेलखंडातील प्रदेशांवर त्याचा अंमल बसला होता. तो भारतीचंद्र यास असह्य होऊन त्यानें शिरोंज, ग्वाल्हेर वगैरे बादशाही अंमलाखालील प्रदेशांवर हल्ले करण्यास सुरवात केली. परंतु यावेळीं त्या प्रांताच्या बंदोबस्ताकरितां अकबरानें सय्यद महंमदबडा या नांवाच्या एका सरदारास पुष्कळ सैन्यानिशीं तिकडे ठेविलें असल्यानें अकबराच्या अंमलाखालून सर्व बुंदेलखंड स्वतंत्र करण्याचा त्याचा बेत सिद्धीस गेला नाहीं. तथापि त्यानें बादशाही प्रदेशास अतिशय त्रास देण्यास सुरवात केल्यामुळें अकबरानें इ० सन १५७८ मध्यें गडमंडळचा सुभेदार सादकखान व इतर सरदार यांच्याबरोबर सैन्य देऊन त्यांना ओर्च्छांच्या राज्यावर पाठविलें. त्या सैन्यानें बुंदेलराजांचा प्रदेश जाळून फस्तकरून मधुकरसा याचा पूर्ण पराभव केला. त्याच्या भावास व दोनशें सरदारांस ठार मारिलें, व मधुकरसा यास आपला जीव घेऊन पळून जावयास भाग पाडिलें. शेवटीं तो निरुपाय होऊन अकबरास शरण आला. तेव्हां अकबरानें त्यास क्षमा करून पुन्हा राज्यावर स्थानापन्न केलें. परंतु मधुकरसानें पुन्हां अकबराविरुद्ध बंड केल्यामुळें अकबरानें आपला मुलगा मुराद याची त्याच्यावर रवानगी केली व उभयतांमध्यें झटापटी सुरू झाल्या. इतक्यांत इ० सन १५९३ मध्यें मधुकरसा मृत्यू पावला. त्यास रामचंद्रसा, होदलराय व वीरसिंगदेव असे तीन मुलगे होते. त्यांपैकीं वडील मुलगा रामचंद्रसा हा आपल्या वडिलाच्या मागून गादीवर आला. दुसरा होदलराय हा बेटवा येथील बादशाही सैन्याबरोबरील युद्धांत मृत्यु पावला व तिसरा वीरसिंगदेव हा शूर, पराक्रमी पण क्रूरकर्मा असून तो सलीम यानें उभारिलेल्या बंडांत त्यास सामील होऊन त्याच्याजवळच अलाहाबाद येथें यावेळीं राहिलेला होता. सलीम यानें अलाहाबाद येथें गेल्यानंतर अकबराशीं युद्ध करण्याचा निश्चय करून व त्याप्रमाणें त्यानें अलाहाबाद येथून पुढें येऊन एक प्रयत्न आरंभिला होता; परंतु हा त्याचा हेतु सिद्धीस गेला नाहीं; तथापि अकबराचा कंठमणि असलेला आपला एक दुष्मनाचा कांटा मार्गांतून पार नामशेष करण्याचा त्याचा हेतु मात्र अचाटकर्मा वीरसिंगदेव याच्या मार्फत त्यास सिद्धीस नेतां आला.

---

बेटवानदीच्या दोन्हीं कांठावर वसलेलें असून तेथें एक भव्य किल्ला आहे; व त्यांत जुना राजवाडा, व जहांगीर बादशहाला रहाण्याकरितां बांधिलेला एक राजवाडा आहे; आणि किल्ला व शहर यांमध्यें नदी असून परस्परांमधील दळणवळण बाराही महिने चालू रहाण्याकरितां तिच्यावर एक लांकडी पूल बांधिलेला आहे.

तो सलीमचा शत्रू ह्मणजे अबुलफज्ल हा होय. अबुलफज्ल हा आपल्याविषयीं मनांत वैमनस्य वागवीत असून तो आपल्या वाईटावर आहे. अकबराच्या मनांत तोच खोटेंनाटें भरवून आपल्याविषयीं त्याचें मन अतिशय कलुषित करीत आहे; इतकेंच नव्हे तर अकबराच्या मृत्यूनंतर आपणास राज्यपद मिळूं नये अशाबद्दल सुद्धां तो खटपट केल्याशिवाय राहणार नाहीं, असें सलीमच्या मनानें घेतलें होतें; त्यामुळें हरप्रयत्न करून अबुलफज्ल याचा नाश करण्यास तो उद्युक्त झाला होता; आणि अबुलफज्ल हा ओर्च्छांच्या रस्त्यानें आग्रा येथें परत जात आहे असें त्यास कळल्यावर त्यानें ही कामगिरी आपल्या प्रेमांतील वीरसिंहदेव याजकडे सोंपविली होती व ही कामगिरी यशस्वीपणें सिद्धीस नेल्यास त्यास मोठें इनाम देण्याची लालूच लाविली होती. त्याप्रमाणें पुढें जहांगीर गादीवर आल्यावर तो त्याच्या मर्जीतील एक प्रमुख सरदार बनून जहांगीर त्याच्या अगदीं मुठींत आला. त्यास जहांगीरनें ओर्च्छांचें राज्य दिलें. जहांगीरच्या हिंमतीवर तो अत्यंत बलाढ्य होऊन नर्मदा–सागरचा सर्व डांग प्रदेश त्यानें आपल्या अंमलाखालीं आणिला व जहांगीरचें व त्याचें इतकें सख्य झालें कीं, ओर्च्छा येथील किल्ल्यांत वीरसिंगदेवानें आपल्या वाड्याजवळच जहांगीरकरितां एक सुंदर राजवाडा बांधिला व जहांगीर हा मधून मधून तेथें जाऊन राहूं लागला. असा सलीमचा कंठमणि वीरसिंहदेव हा त्याच्या आज्ञेप्रमाणें अबुलफज्ल याचा घात करण्याकरितां त्याच्या मार्गावर पुढें चाल करून गेला. अबुलफज्ल हा उज्जयनी येथें आल्यावर त्यास ही सर्व हकीकत समजली व ओर्च्छांचा मार्ग सोडून वीरसिंहदेवास टाळून दुसऱ्या मार्गानें आग्रा येथें जावें असेंही त्यास सुचविण्यांत आलें; परंतु कोणाचेंहि न ऐकतां तो तसाच पुढें गेला. तेव्हां ग्वाल्हेरजवळ दक्षिणेस अंत्री या नांवाच्या गांवीं वीरसिंहदेवानें आपल्या सैन्यासह त्याच्यावर छापा घालून त्यास ठार मारिलें. त्याचें शीर जहांगीरकडे

---

टीप १:–अंत्री हें ठिकाण ग्वाल्हेरपासून दक्षिणेस चौदा मैलांवर त्या राज्याच्या हद्दींत असून तें ग्वाल्हेरच्या अलीकडे जी. आय. पी. रेल्वेच्या मुंबई–दिल्ली लाईनवर दुसरें स्टेशन आहे. याठिकाणीं पुष्कळ मीठ तयार होतें. इ० सन १८४३ च्या दिजंबर महिन्यांत इंग्रज सेनापती जनरल ग्रे हा बुंदेलखंडांतून आपल्या सैन्यासह तिकडे चाल करून येत असतां त्याला अडविण्याकरितां याच ठिकाणीं मराठा सैन्य ठेवण्यांत आलें होतें. पुढें पनियार येथें युद्ध होऊन इंग्रजांस जय मिळाला. या ठिकाणीं शिंद्याचें राखीव रान असून तें शिकारीचें एक उत्तम स्थळ आहे. या ठिकाणीं विड्याचीं पानें उत्तम तयार होत असून येथेंच प्रसिद्ध अबुलफज्ल याच्या धडावर बांधिलेली एक सुंदर कबर ( Mausoleum ) असून ती आजतागायत अस्तित्वांत आहे.

अलाहाबाद येथें पाठविलें; आणि अबुलफज्ल याच्या मृत्यूमुळें समाधान झालें नाहीं, ह्मणूनच कीं काय त्यानें त्याचें धड गलिच्छ जागीं फेंकून देवविलें !

अबुलफज्ल याचा वध मीं कां करविला व त्याच्या वधामुळें मला कोणता फायदा झाला याबद्दल जहांगीर यानें आपल्या आत्मचरित्रांत असें लिहिलें आहे कीं, " अकबरानें स्थापन केलेल्या नवीन धर्मतत्वांचा अबुलफज्ल हाच पुरस्कर्ता असल्यामुळें तो प्रत्येक खऱ्या इस्लामधर्मानुयायी मुसलमानांचा शत्रू होता, ह्मणून मीं त्याचा वध करविला; आणि त्याच्या मृत्यूमुळें जरी माझ्या वडिलांस अत्यंत दुःख झालें, तरी त्याच्याच मृत्यूमुळें माझा असा फायदा झाला कीं, मला माझ्या वडिलांनां प्रत्यक्ष भेटून त्यांच्याशीं राजरोस बोलतां येऊं लागलें व त्यामुळेंच माझ्याविषयींचा त्यांच्या मनांतील विकल्प मला हळुहळू नाहींसा करितां येऊन त्यांचें मन माझ्याविषयीं पुन्हा शुद्ध झालें. " कसेंही असो; पण अबुलफजल याच्या मृत्यूनें अकबराच्या मनावर भयंकर परिणाम झाला; आणि इतर अनेक गोष्टींबरोबर हीही गोष्ट या थोर मोंगल बादशहाचा अंत नजीक ओढून आणण्यास कारणीभूत झाली. आपल्या दुःखाचा थोडावेळ तरी विसर पडावा ह्मणून अकबर हा कबुतरें उडविण्याची गंमत पहात बसला होता त्यावेळीं या घोर कृत्याची खबर फरीदबक्षी यानें येऊन त्यास दिली. त्याबरोबर एकदम मोठ्यानें ओरडून तो धाडकन् बेशुद्ध पडला. पुढें कांहीं वेळानें तो शुद्धीवर आला. पण कित्येक दिवस या दुःखानें त्याचे अश्रू खळले नाहींत, मरेपर्यंत हें दुःख तो विसरला नाहीं; अबुलफज्ल याची आठवण विसरला नाहीं, आणि अत्यंत निराशेनें, " सलीमला राज्यच पाहिजे होतें तर त्यानें प्रत्यक्ष मलाच ठार मारावयाचें होतें. गरीब बिचाऱ्या अबूलफज्ल यास ठार मारून त्याला काय मिळालें, ? " असे उद्गार सुद्धां त्याच्या मुखांतून निघाल्याशिवाय राहिले नाहींत. या अघोर कृत्याला मूळ कारणीभूत सलीम व तें करणारा वीरसिंहदेव, या उभयतानांही अकबरास योग्य शासन करितां आलें नाहीं. अकबरास उभयतांचाही अत्यंत राग आला पण सूड घेतां आला नाहीं. सलीमनें वीरसिंहदेवास वांचविलें व अकबराची आई हमीदा, आत्या गुलबदन व बायको सलीमा यांनीं सलीम यास वांचविलें; अकबरानें ओच्छांचा सर्व मुलूख उध्वस्त करून टाकविला; व वीरसिंहदेवास कैद करून आणावें असा हुकूम दिला. त्यामुळें वीरसिंहदेवास अजमासें पांच वर्षें वनवास भोगावा लागला, पण सलीम हा त्यास अनुकूळ असल्यामुळें, अकबराचा छळ सोसूनही त्याला आपला बचाव करून घेतां आला; आणि आई, आत्या व बायको या तिघांनीं रदबदली केल्यामुळें सलीमाचाही बचाव झाला; अकबराची परवानगी घेऊन सलीमा ही सलीम याची समजूत करून त्यास परत आणण्याकरितां अलाहाबादेस गेली, व त्यास बाबा-पुता करून परत

आणून उभयतां पितापुत्रांचा समेट करून दिला. ही बाई जहांगीरची सावत्र आई असूनही तिनें जहांगीराकरितां अकबराजवळ रदबदली केली, व स्वतः इतक्या उतार वयांत अलाहाबादेस जाऊन त्यास परत घेऊन येऊन उभयतांचें सख्य करून दिलें. यावरून सुद्धां या हुषार, कवयित्री व विदुषी स्त्रीची थोरवी सहज लक्षांत येते.

अशा रीतीनें उभयतां पितापुत्राचा समेट झाल्यानंतर अकबरानें त्यास उदेपूरच्या राण्यावर पाठविलें; परंतु " ही कामगिरी आपल्याच्यानें होत नाहीं " असें ह्मणत तो परत आला; तेव्हां अकबरानें त्यास अलाहाबाद येथें पाठविलें; परंतु तेथें गेल्यावर त्याचें दारूचें व्यसन परमावधीस गेलें; व त्या धुंदींत तो अनन्वित प्रकार करूं लागला. त्याच्या एका कारकुनानें नोकरीचा राजीनामा दिला तेव्हां सलीम यानें त्यास जीवंत सोलवून काढिलें; व त्याच्या दोन सोबत्यांचे हातपाय तोडून त्यांना ठार मारविलें. ही हकीकत ऐकून अकबरास सलीमचा अतिशय राग आला, व त्या संतापांत तो अलाहाबादेस जाण्यास निघाला. परंतु रस्त्यांत वादळ होऊन त्याची बोट पाण्यांत रुतली. इतक्यांत आई अतिशय आजारी असल्याचें त्यास कळलें; तेव्हां तो तसाच परत आला. त्यावेळीं ती बेशुद्ध स्थितींत होती, व तशाच स्थितींत ती मृत्यु पावली. आपली आजी वारल्याचें ऐकून सलीम वडिलांस भेटण्यास आला; परंतु सलीमच्या कृतीनें अकबर अतिशय संतापला असल्यानें त्यानें त्यास बारा दिवस घुशालखान्यांत कोंडून ठेविलें; व त्यास अधिकही शिक्षा केली असती; परंतु इतक्यांतच दानियल हा बऱ्हाणपूर येथें आजारी असल्याचें त्यास कळलें, व त्या चिंतेंत तो व्यग्र आहे तोंच दानियल मृत्यु पावल्याची त्यास बातमी आली. थोडक्यांत ह्मणजे मुरादचा मुलगा मिर्झारुस्तम, त्यानंतर मुलगा मुराद याचा मृत्यु, नंतर सलीमचें दुर्वर्तन, व अबुलफजल याचा मृत्यु, त्यानंतर आत्या गुलबदन व आई हमीदा यांचा मृत्यु व शेवटीं विशेष हुषार, कर्तृत्ववान् व सर्वांत लाडका मुलगा दानियल याचा मृत्यु—या शोकपरंपरेमुळें इ० सन १६०५ च्या सप्तेंबर महिन्यांत तो अखेरचा अंथरुणास खिळला; पण त्यावेळींही भावी विवंचनेनें त्यास ग्रासून टाकिलें. आपणामागें गादीवर बसण्यास व राज्य चालविण्यास सलीम हाच योग्य असून तोच खरा हक्कदार वारस असल्यानें त्यानेंच गादीवर बसावें अशी अकबराची इच्छा होती; परंतु सलीमचा मुलगा खुश्रु याचा मानसिंह हा मामा व अजीजखान कोका हा सासरा असल्यानें हे उभयतांही अतिशय प्रबळ सरदार सलीम यास बाजूस सारून खुश्रूस राज्यपद देतील अशी त्यास भीति होती; व त्या उभयतां सरदारांनीं तशी खटपटही चालविली होती; त्यामुळें सलीम जीवाच्या भीतीनें अकबरास त्याच्या भेटीचा ध्यास लागला असूनही, त्यास भेटण्यास राजवाड्यांत येईनासा झाला. अखेरीस सलीम यानेंच आपल्या-

मागें गादीवर बसावें " असें अकबरानें जाहीर केलें. तेव्हां मानसिंह व अजीजखान हे उभयतांही अकबराच्या इच्छेप्रमाणें सलीमच्या पक्षास मिळाले. सलीम राजवाड्यांत येऊन अकबरास भेटला; तेव्हां सर्वांची क्षमा मागून व सलीम यास, योग्य उपदेश करून हा थोर पुरूष इ० सन १६०५ मध्यें ( ता० १५ आक्टोबर ) आपल्या वयाचे त्रेसष्टावें वर्ष संपलें त्याच दिवशीं मृत्यु पावला. मृत्युसमयीं अकबरास आपल्या धर्ममतांतराबद्दल पश्चात्ताप झाला, व त्यानें अखेरच्या वेळीं खऱ्या मुसलमानाप्रमाणें " कल्मा " ह्मणून प्राण सोडिला. एकंदरींत, या थोर, उदार, व शूर बादशहाची कारकीर्द इतकी उज्ज्वल, इतकी वैभवसंपन्न, व इतकी संस्मरणीय होऊन गेली कीं, त्या काळांत मोंगल बादशाहीच्या तोडीचें--इतकें सुखी, सुसंपन्न, सुबद्ध, व सुनियंत्रित, बलाढ्य व बळकट असें—पृथ्वीच्या पाठीवर दुसरें कोणतेंही राज्य नव्हतें, असें ह्मणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

अकबराच्या अंगीं विशेष धार्मिक साहिष्णुत्व ( Toleration ) वसत होतें; इतकेंच नव्हे तर मुसलमानी धर्मविषयीं त्याच्या ठायीं विशेषसा आदरही वसत नव्हता; शिवाय कांहीं बाबतींत हिंदुधर्माकडेही त्याचा विशेष ओढा होता. तो दर वारीं भिन्न भिन्न रंगाचा पोषाख करून सप्तग्रहांची पूजा करीत असे. आपल्या रजपूत राण्यांबरोबर यज्ञयागादि धार्मिक कृत्यें व विधि करीत असे; व त्यांच्या करितां तो स्वतः ब्राह्मणास दानधर्मही करीत असे; सकाळीं, दुपारीं, सायंकाळीं व मध्यरात्रीं तो सूर्याची उपासना करीत असे. तथापि अकबराचा " दिने इलाही " हा धर्म, स्पष्ट ह्मणावयाचें ह्मणजे निव्वळ अगम्य असा एक ब्रह्मघोटाळा होता. आग्रा येथील पाठशाळेचा गुरू शेख मुबारिक याचा मुलगा अबुलफजल याच्या साह्यानें इ० सन १५७५ पासून तो आपल्या या नव्या धर्माची सारखी सिद्धता करीत होता. अकबराच्या या धर्मसभेमध्यें ब्राह्मण, मुसलमान, पारशी, खिस्ती, यहुदी वगैरे धर्मांचे मोठमोठे विद्वान् लोक असून या सर्व धर्मांतील त्यास उत्तम वाटणाऱ्या तत्वांची गोळा बेरीज करून—ह्मणजे मुसलमानांतील सुंता व बहुपत्नित्व, खिस्ती लोकांतील बाप्तिस्मा व येसूची उपासना, फारशी लोकांतील अग्निपूजा व हिंदुधर्मांतील पुनर्जन्म व आत्म्याचें श्रेष्ठत्व या सर्वांची गोळा बेरीज करून—त्यानें आपला नवा धर्म स्थापन केला होता; व जगामध्यें एका परमेश्वरावांचून दुसरा जगन्नियंता नाहीं, आणि त्या परमेश्वराच्या धर्माचें शासन करणारा फक्त एकट्या अकबराशिवाय दुसरा कोणीही नाहीं. " हा त्या धर्मांतील आद्यसिद्धांत होता; पण अकबराचें स्वतःचें धड एकही ठाम मत नव्हतें. आत्म्याचें जन्मांतर व अखेरीस त्याचा मूळ प्रकृतींत लय होणें व सूर्य व अग्नि हे परमेश्वराचेच पार्थिव अंश आहेत असें मानणें या गोष्टीबद्दल त्याला भरंवसा वाटूं लागला होता. उलट गोंवें येथून त्यानें बोलाविल्याप्रमाणें तीन खिस्ती पाद्री अकबराकडे शिक्षीस

आले, तेव्हां त्यानें मोठ्या आदरानें बायबलचें पुस्तक आपल्या डोक्यावर ठेवून नंतर त्या लोकांजवळ तो तें वाचीत बसला होता; स्वतः ख्रिस्तीधर्माची दीक्षा घेतली नाहीं, पण मुराद याला त्या धर्माचा अभ्यास करण्यास या पाद्री मंडळीच्या हवालीं केलें होतें. अबुल-फज्ल यास बायबलचें भाषांतर करण्याची आज्ञा केली होती; एक ख्रिस्ती मंदीर बांधविलें होतें व तो स्वतःही केव्हां केव्हां या पोर्तुगीज गुरुमंडळीबरोबर त्या मंदिरांत जाऊन ख्रिस्ताच्या मूर्तीपुढें नमन करूं लागला होता; पण ख्रिस्तांची देवत्रयी व त्यांचे अवतार, या बाबतींवर त्याचा भरंवसा नव्हता; आणि लोकांना जरी त्यानें ख्रिस्तीधर्म शिकण्याची आणि ते धर्मविधि उघडपणें करण्याची परवानगी दिली होती; तरी त्यानें स्वतः त्या धर्माची दीक्षा घेतली नव्हती. त्याप्रमाणेंच फैजी अबुलफज्ल, बदाऊनि वगैरे विद्वान् लोकांकडून त्यानें महाभारत, रामायण व बीजगणीत, लीलावती वगैरे ग्रंथांचीं भाषांतरें करविलीं होतीं; शिवाय त्यानें फारशी लोकांतील अग्निपूजा आपल्या या नव्या धर्मांत घेतल्यावर वर्षांतून एकदां नवीन अग्नि तयार करवून तो त्याची पूजा करीत असे; आणि इराणांत किर्मान येथें मुद्दाम माणसें पाठवून व पुष्कळ खर्च करून त्यानें तेथील मंदिरांतून हिंदुस्थानांत पवित्र अग्नि आणविला होता. शिवाय फारशी लोकांचा शक आणि त्यांचे सणही त्यानें सुरू केले होते. इराणी वर्षाच्या पहिल्या दिवसाचा "नवरोझ" हा फारशी सण, त्याचा मुसलमानी धर्माशीं संबंध नसतां, पाळून त्या दिवशीं तो मोठा समारंभ करीत असे. लाहोर येथें जाऊन त्यानें आपला हा नवीन धर्म स्थापन करण्यास प्रारंभ केल्यानंतर ( इ० सन १५८२ च्या सुमारास ) इस्लाम धर्माच्या शत्रूस साजण्यासारखें त्यानें वर्तन केलें व अनेक मशीदी मोडून त्यांत घोड्याचे तबेले केले. अकबरानें स्थापिलेल्या या नव्या धर्मामुळें चिडून जाऊन अफगाण लोकांनीं त्याच्याविरुद्ध बंड उभारिलें. तेव्हां तें चिरडून टाकून त्यांच्या धर्माचा पाडाव करण्याकरितां त्यानें राजा मानसिंह याची काबूलच्या सुभेदारीवर नेमणूक करून त्यास तिकडे पाठविलें. आपणास लोकांनीं ईश्वरी अंश समजावें, असें त्यास वाटूं लागलें. लोकांस परमेश्वरी चमत्कार करून दाखवावे अशी त्यास आवड उत्पन्न झाली. लोकांचे रोग बरे करण्याकरितां तो त्यांना आपल्या पायांचें तीर्थ देऊं लागला. लोकांनीं त्याचें वांछित कार्य फलद्रूप होण्यास आपणासच देव समजून नवस करावे असें त्याला वाटूं लागलें. त्याच्या या नवीन धर्मसंस्थापनेंत त्यास अनेक अनुयायी मिळाले. मुलें होण्याकरितां बायका त्यास नवस करूं लागल्या. नवसास "अकबर पावला म्हणून तो फेडण्याकरितां त्याच्या दर्शनास येऊं लागल्या. त्यांनीं "अकबर देवाघरीं" अर्पण केलेल्या वस्तूंचा तो मोठ्या आदरानें स्वीकार करूं लागला. दररोज सकाळीं लोकांना दर्शन देण्याकरितां मुद्दाम खिडकींत एक झरोका करून तो लोकांना दर्शन देऊं लागला. त्यानें हिंदु-

लोकांवरील जिझिया कर माफ केला. ( इ० सन १५६२ ) हिंदु यात्रेकरूंवर यात्रेच्या ठिकाणीं घेण्यांत येत असलेला कर बंद केला. गोवध व गोमांसभक्षण बंद केलें. आग्रा शहराबाहेर " गोपीपुरा " या नांवाचा एक नवा भाग वसवून त्या ठिकाणीं हिंदू साधु-बैरागी व अतिथिअभ्यागतांची भोजनाची व राहण्याची व्यवस्था केली. सार्वजनिक कामांत जातिभेद अथवा धर्मभेद मनांत न आणितां सर्व व्यवहार करावे, सरकारी नौकऱ्या व न्याय सर्वांना सारखा मिळावा असें ठरविलें. दरबारांतील सर्व मुसलमानी सण बंद केले. दाढ्या ठेवणें, चुलत बहिणींशीं लग्न लावणें, नमाज पढणें आणि मक्केची यात्रा करणें या गोष्टींना त्यानें मनाई केली. डुक्कर आणि कुत्रा यांना अपवित्र समजूं नये असें फर्मावून आपल्या मेलेल्या एका आवडत्या कुत्र्यावर त्यानें एक मोठी कबर बांधिली; आणि इ० सन १५८३ पासून तो स्वतः गंध लावूं लागला. मद्यप्राशनाची मनाई काढून टाकून त्याऐवजीं मद्यातिरेकाबद्दल शिक्षा ठरविली. वेश्यांची नोंद करून, त्यांना राहण्याकरितां " सैतानपुरा " या नांवाचा एक स्वतंत्र भाग नेमून देऊन त्यांच्यावर कर बसविला; अल्पवयी मुलींना अशा धंद्यांत न घेण्याचा सक्त मनाई हुकूम फर्मावून व्यभिचार बंद करण्यासाठीं परिश्रम घेतले. मुलीचें लग्न चौदा वर्षांच्या आंत व मुलांचें सोळाच्या आंत करूं नये, हिंदू विधवांना पुनर्विवाहाची बंदी करूं नये; सती जाण्याची सक्ती करूं नये; मुसलमानांनीं अनेक स्त्रिया करूं नयेत, वृद्ध स्त्रियांची तरुण पुरुषाशीं व वधुवरांच्या संमतीशिवाय त्यांचीं परस्परांशीं लग्नें करूं नयेत असें त्यानें ठरविलें; तथापि या सर्वच सुधारणांचा त्याच्या नव्या धर्माशीं संबंध होता, असें मात्र नव्हे; शिवाय विशेष लक्षांत ठेवण्यासारखी ही गोष्ट आहे कीं, धर्माच्या नांवाखालीं त्यानें कधींही कोणावर सुद्धां जुलूम केला नाहीं; तो धार्मिक पक्षपातानें अंध झाला नाहीं व हेकेखोरपणानें आपला धर्म दुसऱ्यांवर लादण्याची त्यानें प्रवृत्ति दाखविली नाहीं. त्याप्रमाणेंच या नवीन धर्मसुधारणा कितीही उपयुक्त व महत्वाच्या असल्या तरी सुद्धां, जर त्या आपला राज्यकारभार सुरळीतपणें चालविण्यास प्रतिरोधक असल्याचें त्यास दिसून आलें तर त्या त्यानें कधींही अमलांत आणिल्या नाहींत. स्थलाभावामुळें अगदीं थोडक्यांत ह्मणावयाचें ह्मणजे अफगाणिस्थानपासून आसामापर्यंत व दक्षिणेस थेट अहंमदनगरपर्यंत आपला अंमल बसवून, राज्यकारभारांत अनेक निरनिराळ्या सुधारणा घडवून व आपलें राज्य चिरस्थायी व सुखी करण्याकरितां अनेक सामाजिक व राजकीय सुधारणा घडवून आणून या थोर बादशहानें जगांतील महान् राज्यकर्त्यांमध्यें आपलें नांव अजरामर करून ठेविलें, यांत कांहींही शंका नाहीं.

अकबराच्या मृत्यूनंतर जहांगीर हा गादीवर आला. पुत्रप्राप्तिकरितां अकबरानें केलेली साधुसेवा लक्षांत घेतां. सलीमचा पुत्रजन्म हा अकबरास त्याच्या जन्माच्या वेळीं

जितका आनंददायक वाटला, त्याहूनही अतिशय अधिक पटीनें हाच पुत्रजन्म त्यास भावी काळांत भयंकर दुःखदायक होऊन त्याचा मृत्यु जवळ ओढून आणण्यास कारणीभूत झाला. नवसानें जन्मास आलेला मुलगा मूळावर आला; आणि तोही दुःख देत देत मारण्याचा मनसुबा करून जन्मास आला. मोठमोठ्या शत्रूंना रसातळास मिळविणारा अकबर, सलीमसारख्या पोरास, जो छळीत असतांही बाबा–पुता करून गोंजारतो, हा संसारांतील कौटुंबिक पेंच किती दुःखजनक व नाजूक परिस्थिती उत्पन्न करणारा असतो, याचें हें एक उदाहरण आहे. जी स्थिती संभाजीच्या बाबतींत छत्रपति शिवाजीमहाराजांची, तीच स्थिति सलीमच्या बाबतींत बादशहा अकबर याची. जवळ ठेविला तर जीवंत जाळितो; बाहेर ठेविला तर बंड करितो; धड मारवत नाहीं; धड मायेनें वागवितां येत नाहीं; धड प्रतिकार करितां येत नाहीं; धड प्रतिबंधांत ठेवितां येत नाहीं; उघड्या डोळ्यांनीं त्याच्या लीला पहावत नाहींत; पण डोळे मिटून तटस्थ राहणें सुरक्षित होत नाहीं; संबंध तोडूं ह्मणून तुटत नाहीं; मन विटलें तरी माया सुटत नाहीं; धरिला तर चावतो; सोडला तर फंदफितुरी करितो; त्याचा जीव घेववत नाहीं. आपला देववत नाहीं; असा हा कौटुंबिक पेंच आहे. अशा स्थितींत कोणताही दुर्दैवी पिता काय करणार ? त्यास आपलें " नशीब " ह्मणून मरेपर्यंत दुःखाग्नीनें जीवंत जळत राहण्याशिवाय दुसरें कोणतेंच गत्यंतर रहात नाहीं.

तथापि आपला पिता अकबर यास आपल्या अशा कठोर करणीमुळें किती भयंकर दुःख होत असेल, याची जरी सलीम यास त्यावेळीं कल्पना आली नाहीं तरी तो जहांगीर या नांवानें गादीवर आल्यानंतर त्याचा मुलगा शहाबुद्दीनमहंमदखुर्रम् ऊर्फ शहाजहान यानें जेव्हां त्याच्या विरुद्ध बंड पुकारून तो दक्षिणेंत आला ( इ० सन १६२५ ) तेव्हां कल्पना नव्हे–या व अशा दुःखाचा प्रत्यक्ष अनुभवच त्यास मिळाला. शहाजहान यास यावेळीं गोपाळदास या नांवाच्या एका विश्वासू रजपूत सरदाराचा अतिशय उपयोग झाला. ठाणें जिल्ह्यांतील कल्याणनजीक कासाराघाटांत शहापूर रेल्वेस्टेशनजवळ माहुली या नांवाचा एक अवघड किल्ला आहे. शहाजहान यानें आपलीं बायकामुलें व संपत्ति गोपाळदासाच्या स्वाधीन करून ह्या किल्ल्यांत ठेविलीं होतीं व पुढें शहाजहान गादीवर आल्यावर त्यानें गोपाळदासाचा मुलगा मनोहरदास यास माहुली येथेंच किल्लेदार नेमिलें होतें. शहाजहानच्या ह्या बंडामुळें जहांगीर यास अतिशय त्रास व दुःख झालें. जहांगीरनें सुरू केलेला हा सांप्रदाय त्याच्या नातवाच्या वंशानेंही चालू ठेविला; आणि प्रत्येकालाही तशाच दुःखाचा अनुभव मिळत गेला. सारांश आपल्या कृतीमुळें दुसऱ्यास किती दुःख होत असतें याची कल्पना स्वतः तंतोतंत त्या परिस्थितींत येऊन दुःखाचा अनुभव मिळाल्याशिवाय होत नाहीं, हेंच सत्य आहे.

अकबरानें इ० सन १५६७ मध्यें चितोडगडावर स्वारी केली; त्यावेळीं रजपूत लोक जोहार करून रणांगणीं पडल्यावर किल्ला हस्तगत झाला. या युद्धांत व त्यानंतरच्या कत्तलींत भयंकर प्राणहानि झाली. त्याबद्दल अकबराच्या मनाला अतिशय हुरहूर लागली. त्यास त्याबद्दल अत्यंत खेद झाला; आणि त्या पापाचें क्षालन व्हावें ह्मणून मैनोद्दिनचिस्ती या नांवाचा एक साधु अजमीर येथें होऊन गेला, ( तो इ० सन १२३५ मध्यें अजमीर येथें येऊन राहिला होता. ) त्याच्या दरग्याच्या दर्शनास तो पायीं चालून गेला.

अकबरास पहिल्यानें हसन व हुसेन या नांवाचे दोन जुळे मुलगे झाले. परंतु ते उभयतांही एक महिन्याच्या आंतच मृत्यू पावले. तेव्हां पुत्र-मुख पाहण्यास अतिशय उत्सुक असलेल्या अकबरास कोणीं असें सांगितलें कीं, आग्रा शहराच्या नैऋत्यदिशेस सव्वीस मैलांवर शिक्री येथें सेखसलीमचिस्ती या नांवाचा एक साधुपुरुष रहात असून तो नवसास पावतो. तेव्हां अकबरानें तेथें जाऊन त्या साधूचें दर्शन घेतलें. त्या साधूनें अकबरास "तुला मुलगा होईल" असा आशीर्वाद दिला. पुढें त्याची राणी अंबरच्या बिहारी मल्लाची कन्या जोधबाई हिला दिवस गेले; नंतर प्रसूतिकाल नजीक आल्यावर अकबरानें तिला शिक्री येथें त्या साधूच्या घरीं नेऊन ठेविलें. त्याच ठिकाणीं ती प्रसूत होऊन तिला मुलगा झाला; व त्या साधूच्या नांवावरून या मुलाचें "सलीम" हें नांव ठेवण्यांत आलें. अशा नवसानें झालेला हा मुलगा आपणास सुख देईल असें अकबरास त्याचा जन्म झाला. त्यावेळीं वाटलें असेल. पण हाच मुलगा अतिशय दुःख देण्यास कारणीभूत व्हावा अशीच विधिघटना होती. त्याला बिचारा अभागी अकबर काय करणार ! नशिबीं आलें तें भोगिल्याशिवाय कसें चालणार ? तस्मात् "प्रारब्धरेषा खरी" असेंच ह्मणणें सयुक्तिक आहे.

बादशहा जहांगीर याच्या ठिकाणीं कित्येक दुर्गुण वसत होते; पण त्याबरोबरच कित्येक महत्वाचे सद्गुणही वसत होते. अंगावर जबाबदारी पडल्यावर तो पुष्कळ निवळला होता; आणि शराब व सखी—दारू आणि नूरजहान यांतच तो सारखा मग्नगुल होऊन जात होता; तथापि शुद्धीवर असेल त्यावेळीं तो अत्यंत न्यायी राजकर्ता होता. तो स्वतः दारू पीत होता. दारूशिवाय त्याला करमत नव्हतें; आणि दारूचा देखावा, नेहमीं दारूंत नसतांनाही, दिसत रहावा ह्मणूनच कीं काय, त्यानें आपल्या कांहीं नाण्यांवर दारूच्या प्याल्याचें चित्र, कित्येकांवर स्वतः हातांत दारूचा प्याला घेऊन मांडी घालून बसला आहे असें चित्र, तर कांहीं वर ओठास दारूचा प्याला लाविला आहे असें चित्र काढविलेलें होतें; तो स्वतःच आपल्या आत्मचरित्रांत ह्मणतो कीं, "माझें दारूचें व्यसन दिवसेंदिवस वाढत गेलें. मी तीव्र मद्यपानाचें सेवन करूं लागलों; आणि नऊ वर्षांच्या

अर्थात मी दररोज वीस प्याले दारू घेऊं लागलों; " त्यांपैकीं चौदा दिवसा व सहा रात्रीं घेत असे. " तथापि आपल्या प्रजेनें मद्यपान करूं नये, असा त्यानें हुकूम फर्माविला होता, व आपल्या राजव्यवस्थेसंबंधींच्या बारा नियमांत हाच पांचवा नियम त्यानें ग्रथित केला होता. शिवाय अकबरानें बांधून दिलेली सुव्यवस्था त्यानें कायम ठेविली होती. तो स्वतः हुषार, विद्वान् व रसिक असून त्याला तुर्की भाषा येत होती. जहांगीर बादशहानें सिंहासनावर आल्याबरोबर " दस्तुरुल अमल " या नांवाचे राज्यकारभारच्या बाबतींत बारा नियम केले होते; त्यांचा सारांश खालीं लिहिल्याप्रमाणें:—

१ प्रत्येक प्रांतांतील जहागिरदार नद्यांच्या उतारावर दस्तुरी घेत असतात, ती घेण्याचें यापुढें बंद करावें.

२ लोकवस्तीच्या गांवांपासून रस्ते दूर असल्यामुळें जागोजाग चोऱ्या व रस्तेलुटी होतात ह्मणून जागोजाग जहागिरदार लोकांनीं सराया, मशीदी व विहिरी बांधून प्रवासी लोकांच्या सोई कराव्या; जे रस्ते बादशाही मुलुखांत असतील तेथें त्यावरील कामदारांनीं सराया वगैरे बांधाव्या.

३ व्यापारी लोकांच्या मालाचे गठ्ठे मालकाच्या परवानगीवांचून व त्यास कळविल्यावांचून मध्येंच रस्त्यावर उघडून पाहूं नयेत.

४ माझ्या राज्यामध्यें कोणीही मुसलमान किंवा दुसरा परधर्मी मनुष्य मेला तर त्याची मिळकत व मालमत्ता त्याच्या वारसास मिळाली पाहिजे. त्यास कोणीही हरकत करूं नये. अशा मालमत्तेस कोणी वारस मिळाला नाहीं तर तिची देखरेख करण्याकरितां निराळे कामगार व संरक्षक नेमून, तिच्या उत्पन्नाचा विनियोग मशीदी बांधणें, सरायांची दुरस्ती करणें, पडलेले पूल नीट करणें, आणि विहिरी व तळीं बांधणें, अशा लोकोपयोगी कामाकडे करीत जावा.

५ मी माझ्या वयाच्या अठराव्या वर्षापासून आजपर्यंत ह्मणजे माझ्या वयाच्या अडतीसाव्या वर्षापर्यंत मद्याचें सेवन करीत आहे. तथापि माझ्या प्रजेपैकीं कोणीही इसमानें मादक पदार्थांपासून किंवा तांदुळाच्या अर्कापासून मद्य तयार करूं नये, व विकूं नये, असा माझा सक्त हुकूम आहे.

६ कोणीही, सरकारी नोकरांनीं अथवा इतरांनीं दुसऱ्यांचीं घरें बळजबरीनें आपल्या उपयोगासाठीं घेऊं नयेत.

७ कोणत्याही मनुष्याचें नाक अथवा कान कापण्यास मी सक्त प्रतिबंध केला आहे; व स्वतः अशी शपथ वाहिली आहे कीं मी कोणासही अशी शिक्षा करणार नाहीं; ह्मणून कोणासही अशा शिक्षा करण्यांत येऊं नयेत.

८ सरकारी जमीनीवरील कामगारांस व जहागिरदारांस मी असा हुकूम देत आहे कीं त्यांनीं रयतेच्या जमिनी बळजबरीनें कधींही घेऊं नयेत, व स्वतः त्यांची लागवड करूं नये.

९ परगण्यावरील मुख्य कामगार किंवा जहागिरदार यानें सरकारी परवानगीवांचून त्या प्रांतांतील लोकांबरोबर कोणताही लग्न संबंध करूं न ।.

१० मोठमोठ्या शहरांत दवाखाने स्थापन करावेत. रोग्यांच्या शुश्रूषेकरितां त्यांवर वैद्यांच्या नेमणुका कराव्यात; आणि या बाबतींत लागणारा सर्व खर्च सरकारी खजीन्यांतून करावा.

११ माझ्या परमपूज्य वडिलांच्या कायद्याप्रमाणें मींही असा नियम केला आहे कीं, प्रतिवर्षी १८ रबिलावल, ह्या माझ्या जन्मदिवसापासून माझ्या वयाचीं जितकीं वर्षें असतील तितके दिवस, माझ्या राज्यामध्यें कोणींही प्राणिवध करूं नये; त्याप्रमाणेंच दर आठवड्यांत गुरुवार व शनिवार या दोन दिवशीं प्राणीहत्या करूं नये, आणि दर रविवारीं सूर्योपासना केल्याशिवाय राहूं नये.

१२ माझ्या वडिलांच्या वेळेस जे अधिकार, जहागिरी व वतनें लोकांना दिलेलीं आहेत तीं त्यांच्याकडे तशींच चालूं ठेवण्यांत येतील. त्याप्रमाणेंच फौजेंतील व खाजगीकडील सर्व नोकरांचे पगारही सवाईपासून दुपटीपर्यंत वाढविण्यांत येतील. वडिलांच्या वेळच्या जनानखान्यांतील पडदानशीन स्त्रियांच्या नेमणुका शेंकडा वीसपासून शंभरपर्यंत त्यांच्या त्यांच्या दर्जा व नात्याप्रमाणें वाढविल्या जातील. धर्मार्थ व देवस्थानाप्रीत्यर्थ दिलेल्या जमिनी ज्याच्या त्याजकडे कायम ठेवण्यांत येतील. मिरान सदरजहान ह्मणून जो सय्यदांपैकीं अस्सल सय्यद व अकबर बादशहाच्या वेळेपासून मुख्य धर्माध्यक्ष आहे, त्यानें प्रत्येक दिवशीं सत्पात्र व खरे गरजू लोक बादशहासमोर हजर करावेत व त्यांस बादशहानें स्वतः धर्म करावा. त्याप्रमाणें किल्ल्यांत व तुरुंगांत जे गुन्हेगार पुष्कळ वर्षें कैदेंत ठेविले गेले आहेत, ते सर्व सोडून देण्यांत यावे

या बादशहाच्या कारकीर्दींत राजकीय उलाढाली फारशा झाल्या नसून त्याची बहुतेक कारकीर्द घरगुती भानगडींनीं भरलेली आहे. उदेपूरकर अमरसिंह याचा पराभव व त्याच्या मुलाची बादशाही फौजेंत सरदारकीवर नेमणूक या गोष्टींत त्याचा इ० सन १६०८ पासून इ० सन १६१४ पर्यंतचा काळ गेला; आणि (इ० सन १६१६ ते इ० सन १६२३) खुर्रम ऊर्फ शहाजहान याची दक्षिण प्रांतावर स्वारी, जहांगीरचा वडील मुलगा-हुषार, होतकरू, व सुशील शहाजादा-खुश्रू याचा वध, नूरजहानची प्राप्ति, तिचें वर्चस्व व कारस्थानें व अखेरच्या वेळेचीं बंडें, वगैरे गोष्टी पुढील काळांत घडून आल्या. जहांगीरच्या कार-

कीर्दीत हिंदुस्थान देशाच्या व मोंगल बादशाहीच्या दृष्टीनें जी एक अत्यंत महत्वाची व भावी काळांतील क्रांतिकारक गोष्ट घडून आली ती ह्मणजे इंग्रजलोकांचा हिंदुस्थान देशाशीं अगदीं प्रथमच एक प्रकारचा राजकीय व व्यापारी संबंध ह्यावेळीं जडला ही होय. जहांगीरच्या वेळेस हिंदुस्थानांत इ० सन १६०८ मध्यें कॅप्टन हॉकिन्स हा इंग्लंडचा राजा पहिला जेम्स याचें जहांगीर बादशहास पत्र घेऊन आला व त्यानें जहांगीरची मर्जी संपादन करून हिंदुस्थानांत व्यापार करण्याच्या बाबतींत कित्येक सवलती मिळविल्या; परंतु त्यानें मुकर्रबखान या नांवाच्या सरदाराशीं शत्रुत्व संपादन केल्यामुळें त्यानें हॉकिन्सचा सूड घेण्याचा निश्चय केला, व गुजराथेंत गेल्यावर "इंग्रजांना व्यापार करण्याची बंदी केल्यास आपण गोंव्याहून हिरेमाणकें आणून देतों असें त्यानें जहांगीर यास कळविलें. दुसरेही सरदार इंग्रजाविरुद्ध ओरड करूं लागले, आणि एकतर असें सुद्धां ह्मणाला कीं, "इंग्रजांनां हिंदुस्थानांत पाऊल ठेवूं दिल्यास ते लवकरच सर्व देश बळकावून बसतील.' हें ऐकून जहांगीर भिऊन गेला. त्यानें हॉकिन्स यास दिलेलीं वचनें परत घेऊन इंग्रजास हिंदुस्थानांत व्यापार करण्याची मनाई केली, त्यामुळें तो इ० सन १६११ मध्यें आग्रा येथून परत फिरला, व पुढें थोडीं वर्षे व्यापार करून परत जात असतां मार्गांतच ऐर्लंडनजीक मृत्यू पावला. त्यानंतर सर टॉमसरो हिंदुस्थानांत इ० सन १६१५ मध्यें या बादशहाच्या दरबारीं आला; व बादशहाकडून जरी त्यास विशेष सवलती मिळाल्या नाहींत तरी सुरतेस वखार घालण्याची व तेथें इंग्रजांचीं जहाजें उतरून इंग्रजांस व्यापार करण्याची परवानगी मिळाली, व त्याप्रमाणें इंग्रजांचा हिंदुस्थानाशीं व्यापार सुरू झाला. पुढें त्यांनीं हिंदुस्थानांतील राजकीय घडामोडींत भाग घेण्यास सुरवात केली. त्यानंतर आपलें वर्चस्व हळूहळू वाढवीत नेऊन तें हिंदुस्थानांतील बलाढ्य सत्ताधाऱ्यापैकीं एक बनलें; आणि अखेरीस कांहीं राज्यकर्त्यांना नामशेष करून व बाकीच्या सर्व राज्यकर्त्यांनां मांडलीक बनवून आतां तेच इंग्रज हिंदुस्थान देशाचे सार्वभौम सरकार बनलेले आहेत.

बादशहा जहांगीर हा अतिशय न्यायी असल्याबद्धल त्याची प्रसिद्धी आहे. अकबर बादशहाच्या वेळीं त्यानें राजवाड्यांत एक घंटा टांगून ठेवून तिची सांखळी बाहेर देवडीपर्यंत आणून भिडविली होती; व ही घंटा वाजविली ह्मणजे त्या इसमास ताबडतोब बादशहापुढें हजर करीत असत. जहांगीरानें या बाबतींत अधिक सुधारणा केली. त्यानें गादीवर आल्यावर सर्वांना न्याय मिळावा ह्मणून एक "न्यायशृंखला तयार करवून तिचें एक टोंक किल्ल्याच्या बाहेर एका खांबांत मजबूत करून ठेविलें होतें. ही सांखळी सोन्याची असून तिची लांबी साठ फूट होती, व तिला दर फुटावर एक एक याप्रमाणें साठ सोन्याच्या घंटा लाविल्या होत्या; व यांपैकीं कोणतीही घंटा वाजविली तरी तात्काळ

त्याची खबर बादशहास मिळून कोणासही बादशहाची सहज भेट घेतां येत होती. एकदां अकल्पितरीत्या या सांखळी अडकाविलेल्या खांबावर एका पखालीच्या बैलानें, त्याच्या पाठीवरील पखाल पाण्यानें भरलेली असतांना आपली मान घांसली; त्याबरोबर जहांगीरच्या दिवाणखान्यांतील घंटेचा आवाज झाला. तेव्हां "कोण आहे ? त्यास माझ्या-समोर आणा" ह्मणून त्यानें हुकूम फर्माविला. तपास करितां तो बैल आहे असें कळल्यावर दरबारी मंडळींनीं बैल आहे; "मुकें जनावर आहे; सोडून यावें" ह्मणून बादशहास विनंति केली. बादशहा ह्मणाला, "नाहीं; त्या बैलावर कांहीं तरी जुलूम झाला आहे; त्यास माझ्या समोर आणा." त्याप्रमाणें त्या बैलास बादशहासमोर आणिल्यावर "पखालींतील पाण्याचें वजन करा" अशी बादशहानें आज्ञा केली. तेव्हां लागलींच पाणी तोलून पाहिलें तों तें पांच मण भरलें. बादशहा ह्मणाला; बैलावर जुलूम झाला हेंच खरें आहे. पखालींत वाजवीहून जास्त पाणी भरलेलें आहे." आणि त्याच वेळीं "साडेतीन मणापेक्षां जास्त पाणी कोणीही बैलावरील पखालींत भरूं नये; भरिल्यास शिक्षा होईल असा त्यानें हुकूम फर्माविला. यावरून त्याचें न्यायचातूर्य व्यक्त होतें.

बादशहा जहांगीर हा न्यायी तर होताच, पण कोणत्याही बाबतींत पक्षपात न करितां, स्वतःचा प्राण धोक्यांत घालूनही तो योग्य न्याय देणारा होता. बादशहा जहांगीर याचें सर्व जगांतील प्रेमस्थान—इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष त्याचा दुसरा प्राण—सौंदर्यलतिका राणी नूरजहान ही होती. राज्याचा कारभार तिच्या हातीं खेळत होता. जहांगीर तिच्या प्रेमपाशांत बद्ध होऊन तिच्या पूर्ण आधीन झालेला होता. राज्यांतील सर्व राजकीय बाबतींत तीच श्रेष्ठ हुकमत चालवीत होती. बादशहाचें शिक्का मोर्तब तिच्या हातांत होतें. तिचें मोर्तब झाल्यावांचून कोणालाही मानमरातब, जहागिरी अथवा सरदारी मिळत नव्हती. सर्व अमीरउमरावांवर तिचा अंमल चालत होता. सर्व नाण्यावर जहांगीरच्या शेजारीं तिचेंही नांव झळकत होतें, तिचा बाप मिर्झाघियासउद्दीन महंमद हा जहांगीरचा मुख्य वजीर होता. प्रसिद्ध व बलाढ्य सरदार आसफखान हा तिचा भाऊ होता. तिनें आपल्या नातेवाईक मंडळींना सर्व राज्यभर मोठमोठ्या अधिकारांवर नेमिलें होतें. सर्व बादशाही फरमानांवर बादशहाच्या शेजारीं ती आपली सही करीत होती. इतकेंच नव्हे तर जहांगीरच्या जुलमी, लहरी, व व्यसनी वागणुकीवरही तिनें विशेष नियंत्रण व दाब ठेविला होता. फक्त मोंगल बादशाहीच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासांतही ती एक विशेष व असामान्य कर्तृत्वाची अलौकिक स्त्री निर्माण झालेली होती, आणि "नूरजहानशीं लग्न झाल्यानंतर मला तिची असामान्य योग्यता कळूं लागली; त्यामुळें सर्व कारभार मीं तिच्या हवालीं केला आहे; आणि मला दररोज फक्त एक शेर दारू व अर्धा शेर मांस

मिळालें ह्मणजे पुरे आहे, " असें खुद्द जहांगीर यानेंच जगद्दीपिका नूरजहान हिच्याविषयीं उद्गार काढिले आहेत. यावरून या असाधारण स्त्रीचें कर्तृत्व, व बुद्धिमत्ता, तिचा दरारा व मानमरातब, तिची अनियंत्रित सत्ता व अप्रतिहत वर्चस्व, तिची इभ्रत व तिची हुकमत याबद्दल कोणासही सहज कल्पना करितां येईल; पण याच स्त्रीच्या बाबतींत त्यास एकदां न्याय करण्याचा प्रसंग आला व त्याचवेळीं त्याची खरी न्यायप्रियता, निःपक्षपातबुद्धी व न्याय करण्याचें श्रेष्ठ चातुर्य हीं निदर्शनास आलीं; राणी नूरजहान, ही शूर होती; " शिकारी " होती; तिला शिकारीचा विशेष शोक होता; नेमबंद गोळी ठोकण्यांत ती पटाईत होती. नेमबंद गोळी मारितां यावी ह्मणून मधून मधून ती आपली संवय दृढ करीत होती. दिल्ली येथील किल्ला यमुनानदीच्या कांठीं असून त्यांतच बादशहाचा जनानखाना, व नूरजहान हिचा महाल यमुनेच्या बाजूलाच होते; एक दिवस नदीच्या पलीकडे चांद ( Target ) लावून राणी नूरजहान राजवाड्यांतून निशाण मारण्याची आपली संवय दृढ करीत होती. त्यावेळीं निशाण चुकून एक गोळी तेथें जवळच असलेल्या एका धोब्यास लागून तो तात्काळ ठार झाला. तेव्हां त्याची बायको आक्रोश करीत किल्ल्याच्या दरवाजापाशीं आली, व तिनें सांखळी ओढून घांट वाजविली. त्याबरोबर पहारेवाल्यांनीं तिला दरबारांत बादशहापुढें नेऊन उभें केलें; तिनें बादशहास अर्ज केला कीं " आपल्या जनानखान्यांतून गोळी येऊन माझ्या नवऱ्याला लागली, व तो ठार झाला. " धोबिणीचें हें ह्मणणें ऐकल्याबरोबर बादशहानें तात्काळ चौकशी केली. तेव्हां नूरजहानच्या हातून गोळी लागून धोबी ठार झाला, असें त्यास समजलें. हें ऐकतांच जहांगीर एकदम फिक्का पडला; दरबारचे लोकही बादशहा आतां काय इनसाफ देतो ह्मणून मोठ्या आतूरतेनें त्याच्याकडे टक लावून पाहूं लागले; इतक्यांत जहांगीरनें मोठ्या शांतपणानें एक बंदुक, व दारुगोळी व शिलगविलेला तोडा मागविला; स्वतः धोबिणीसमोर उभें राहून बंदुकींत दारूगोळी भरून व तोडा चढवून, ती त्यानें धोबिणीपुढें केली. आणि तिला ह्मणाला, " आमच्या मुसलमानी न्यायशास्त्राप्रमाणें तुला खुनाच्या बदला खून मिळाला पाहिजे; ह्मणून नूरजहान हिनें तुझ्या नवऱ्यास ठार मारून जसें तुला वैधव्य आणिलें, त्याप्रमाणेच तूंही तिच्या नवऱ्यास ठार मारून तिला वैधव्य आण; ही बंदुक भरून तयार आहे; ही घे; व हा मी तिचा नवरा तुझ्यापुढें उभा आहे, मला ठार मार; " बादशहाचें हें भाषण ऐकून सर्व दरबार एकदम चकित होऊन गेला. धोबीण तर बिचारी साफ भांबावून गेली; तिनें बादशहास हात जोडून विनंति केली कीं, " मी खून माफ केला. तेव्हां जहांगीरनें नूरजहानच्या नेमणुकींतून त्या धोबिणीस कांहीं गांवें इनाम करून दिलीं, तीं अद्यापि तिच्या वंशजाकडे चालत आहेत. सारांश जहांगीरमध्यें पुष्कळ दुर्गुण असूनही त्याबरोबरच पुष्कळ सद्गुणही त्याच्या ठायीं वसत होते; यांत तिळमात्र संदेह नाहीं.

इंग्रज लोकांचा हिंदुस्थानाशीं संबंध प्रथम या जहांगीर बादशहाच्या कारकीर्दीत घडला; त्याप्रमाणेंच याच काळांत दुसरीही एक अशीच अत्यंत महत्वाची गोष्ट घडून आली. ती ह्मणजे मराठयांच्या उत्कर्षास प्रारंभ ही होय. याच काळांत शहाजी राजे व इतर अनेक मराठे सरदार दक्षिणेंतील राजकीय रंगभूमीवर झळकूं लागून मराठयांच्या उत्कर्षाच्या पूर्वरंगास प्रारंभ झाला. शिवाजी महाराजांचा जन्म ( ता० १० एप्रील इ० सन १६२७ ) व जहांगीर बादशहाचा मृत्यु, ( ता० २८ आक्टोबर इ० सन १६२७ ) या गोष्टी फार थोडया कालावधींत अनुक्रमें घडून आल्या. शहाजहानच्या कारकीर्दींत शिवाजीनें राज्यसंस्थापना केली व अवरंगजेबाच्या कारकीर्दींत त्यास राज्याभिषेक ( ता० ६ जून इ० सन १६७४ ) झाला; ह्मणजे शहाजहानच्या कारकीर्दीपासूनच मराठयांच्या उत्कर्षास खरी व स्वतन्त्ररीत्या सुरवात झाली; व अवरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत मोंगली सत्तेचे आघात सोशीत राहून–व त्या सत्तेसही तसेच प्रत्याघात देत राहून–मराठयांनीं आपला राजकीय उत्कर्ष स्थीर व बळकट केला. त्यांत प्रसरणशक्ति उत्पन्न होत गेली व त्यामुळेंच पुढें मराठयांची सत्ता बलाढ्य बनून गेली. अर्थात् शहाजहान व अवरंगजेब यांची हकीकत पुढें मराठयांच्या इतिहासांत येणार असल्यानें त्यांच्या बाबतींत याठिकाणीं विस्तारानें विवेचन केलें नाहीं; तथापि त्या उभयतांचा स्वभाव, रहाणी, तत्कालिन बादशाही वैभव, राजकीय परिस्थिति वगैरे बाबतींची त्रोटक माहिती याठिकाणीं दिली आहे; व त्यावरून मराठयांच्या पुढील इतिहासांत न येणाऱ्या माहितीचें ज्ञान होऊन तो इतिहास वाचतांनाही या माहितीचा विशेष उपयोग व्हावा या हेतूनें ती याठिकाणीं ग्रथित केली आहे.

नुरुद्दीन महंमद सलीम ऊर्फ जहांगीर हा मृत्यु पावल्यावर त्याचा दुसरा मुलगा शहाबुद्दिन महंमद खुर्रम ऊर्फ शहाजहान हा रक्तमलिन हस्तानें सिंहासनारूढ झाला. ( ता० ५ फेब्रुवारी इ० सन १६२८ ) शहारियार, खुश्रूचे मुलगे दावरबक्ष व गार्साप, दानियलचे मुलगे, तहमुरास व होशांग या पांच दुर्दैवी राजपुत्रांचा वध करून त्यानें राज्यपदावर आरोहण केलें; तथापि त्यानंतरच्या वेळेपासून त्याचा निष्ठुर स्वभाव पार नाहींसा झाला. आणि दया, ममता, मनाचा थोरपणा व न्यायप्रियता वगैरे अनेक सद्गुण त्याच्याठायीं प्रगट झाले. शहाजहान याची पहिली व शेवटची कारकीर्द युद्धाची आहे. पहिलींत बादशाहीपद मिळविण्याकरितां त्यास युद्ध करण्याचा प्रसंग आला; आणि शेवटलींत मुलांमुलांच्या यादवींत त्याचें बादशाहीपद कायमचें नष्ट झालें. तो अनुभवी व कर्तबगार असून तरुणपणांतच शौर्य व मुत्सद्दीपणा या गोष्टींत त्यानें चांगलें नांव मिळविलें होतें; तथापि तो अतिशय विलासी व चैनी होता. त्याचें ऐश्वर्य, व त्याचा थाट सर्व मोंगल बादशहांत श्रेष्ठ होता. राज्यकारभाराच्या दगदगीचा त्याला कंटाळा असून त्यामुळेंच

त्यानें आपला बहुतेक सर्व कारभार आपल्या मुलांवर व इतर सरदार मंडळींवर सोंपविला होता. धार्मिक बाबतींत ह्मणावयाचें ह्मणजे तो आग्रही नव्हता. त्याची आई जगद्गोशा-यिनी ही मारवाडचा राजा मालदेव याची नात व उदयसिंग याची मुलगी होती; आणि हिंदू आई पासून त्याचा जन्म झालेला असल्यामुळें त्याचा कल कित्येक बाबतींत हिंदु-धर्माकडे झुकता होता; तो जहांगीराप्रमाणेंच सूर्योपासना करीत असे. त्यानें प्राचीन हिंदूराजाप्रमाणें "मयूरासन" या नांवाचें सिंहासन तयार करवून तें उपयोगांत आणिलें. त्याप्रमाणेंच–नवीन इमारती बांधितांना मनुष्याचा बळी देऊन मग तिचा पाया घालण्याची हिंदू लोकांची चाल शहाजहानानें स्वीकारिली होती; आणि कित्येक लोकांस ठार मारून त्यांच्या रक्तानें त्यानें दिल्लीशहराचा पाया शुद्ध केला होता; दुष्काळांत अन्नगृहें उघडून तो जातिभेद मनांत न आणितां रयतेस उपाशीं मरूं देत नव्हता. सुप्रसिद्ध मराठा कवि जगन्नाथपंडित हा त्याच्या आश्रयास असून त्यास शहाजहान यानें "कविराय" ही पदवी दिली होती; व अकबराच्या पदरीं असलेल्या तानसेनाचा मुलगा विलास याचा

---

**टीप १**:—इंग्रजांच्या हिंदुस्थानांतील हल्लींच्या राज्याची शहाजहान बादशहाच्या मागील काळांतील "निर्दयपणाच्या" ("harshness") कारकीर्दीशीं तुलना करून इंग्रजांचें राज्य कितीतरी उत्तम व दयावान् आहे, असें प्रतिपादन करितांना,–दिल्ली येथें ता० ८ फेब्रूवारी १९२१ रोजीं "नरेंद्रसभा" (Chamber of Prince) ) उघडण्यांत आली त्यासंबंधींच्या हकीकतींत "टाइम्स ऑफ इंडिया" च्या बातमीदारानें याच गोष्टीचा उल्लेख करून बर्नियरचा व मनूचीचा हवाला दिला आहे; आणि आज शहाजहा-नचा आत्मा ही सभा उघडण्याचा समारंभ पाहण्यास दिल्ली येथील दिवाण–ई–आममध्यें वावरत असेल तर इंग्रजांचें हल्लींचें रामराज्य आणि त्या मानानें आपली पूर्वकाळांतील रावणी कारकीर्द यांतील विरोध त्याच्या लक्षांत येऊन त्यास आपल्या रद्दड कारकीर्दीचें दुःखद मनन करावें लागेल, असे उद्गार काढिले आहेत.

"………It was held in the Diwan-I-Am, where the Moghul Emperors formerly held their Courts, and if Shah Jehan, who built this magnificent group of palaces, was a ghostly witness of to-day's proceedings, as modern psychical experts would tell us he may have been, he must have reflected sadly to his own disadvantage on the contrast between the conditions of our day and those of his."

जांवई लालखान यास त्यानें "गुणसमुद्र" हा किताब दिला होता. शहाजहान हाही जहांगीरप्रमाणेंच-राज्यावर आल्यावर प्रतिवर्षी आपली तुला करीत असे; त्याप्रमाणेंच त्यानें जगन्नाथ पंडिताची ही, त्याचें रुपयांनीं वजन करून, तुला केली होती. हा बादशहा मोठा हौशी, विलासी व वैभवसंपन्न असून "मयूरासन," "ताजमहाल" वगैरे-सारख्या चिरस्मरणीय गोष्टी याच बादशहाच्या काळांत घडून आल्या आहेत. त्याप्रमाणेंच शहाजहानची राज्यव्यवस्थाही प्रशंसनीय असून याच्या कारकीर्दींत मोंगल बादशाहीच्या वैभवाचा व भरभराटीचा कळस झाला होता, असा इतिहासांत उल्लेख आहे. त्याच्या राज्यव्यवस्थेसंबंधीं ओवेन यानें आपल्या ग्रंथांत (India on the Eve of the

---

The celebrated Bernier, in giving an account of the splendour and magnificance of the Maghul Court, also shows the state of abasement in which the Emperors kept those around them. The traveller Manncci affords us a glimpse of the harshness of those times when he relates how Shah Jehen observed tradition by having a number of people beheaded so that their bodies might be placed in the foundations of the new city he was building."

"*Times of India*"

***Thursday 10th February 1921.***

शहाजहान याची अथवा इतर मोंगल बादशहांची व त्यांच्या राज्याची तुलना त्यांच्याच काळांतील राज्यकर्त्यांशीं व राज्यांशीं केली पाहिजे व त्यांत मोंगल बादशहा व त्यांचें राज्य, हीं युरोपांतील राज्यकर्ते व राज्यें यांच्या मानानें श्रेष्ठ ठरतात कीं कमी दर्जाचीं ठरतात हें पाहिलें पाहिजे. शिवाय शहाजहान वगैरे मोंगल बादशाहत व पौर्वात्य लोक यासंबंधीं मि० ओवेन, टॅव्हर्नियर, एलफिन्स्टन, व्हिन्सेंट स्मिथ, रे० टेरी, हॅमिल्टन, बर्नियर, प्रो० रीस डेव्हीस, सर जॉन लॉरेन्स, सर बार्टल फ्रीयर, चिशोम ॲन्से, डिलाव्हेल वगैरेंचे अभिप्राय आणि लार्ड मेकाले यानें आपल्या इंग्लंडच्या इतिहासांत सतराव्या शतकांतील इंग्लंडच्या सामाजिक आयुष्यक्रमाचें व तत्कालीन स्थितीचें केलेलें वर्णन,—हे अभिप्राय व वर्णन पुढें दिलें आहे.—हींही विचारांत घेतलीं पाहिजेत. त्याप्रमाणेंच सतरावें शतक व विसावें शतक यांत तीनशें वर्षांच्या काळाचें अंतर आहे; म्हणून त्या काळाची आजच्या काळाशीं तुलना करणें—नव्हे; तुलना करण्याचा नुसता विचार सुद्धां मनांत आणणें,—हें केव्हांही विसंगत व हास्यास्पदच आहे.

British conquest हें पुस्तक पहा ) असें लिहिलें आहे कीं, " शहाजहानच्या कारकीर्दींत मोंगल बादशाहीच्या उत्कर्षाचा कळस झाला. या बादशाहीच्या ताब्यांतील जुन्या प्रांतांत शहाजहानच्या वेळेस जेवढी शांतता, सुचता व सुव्यवस्था नांदत होती तेवढी त्याठिकाणीं पूर्वी कधींही वास करीत नव्हती. राजपुतान्यांमधील मोंगल बादशाहीचे मांडलीकराजे, बादशहाचे हुकूम मान्य करण्यास ह्यावेळेच्याइतके पूर्वी कधींही तयार नव्हते. बादशाही दरबारचा थाट, बादशाही सत्ता, संपत्ति व सन्मान याजमध्यें शहाजहान बादशहाची बरोबरी करणारा त्याच्या तोडीचा दुसरा मोंगल बादशहा निर्माण झाला नाहीं. त्याप्रमाणेंच शहाजहान बादशहाच्या वेळीं मोंगल बादशाहीचा सर्व पृथ्वीवर जसा लौकिक पसरला होता, तसा त्यापूर्वीच्या काळांत केव्हांही पसरला नाहीं. शहाजहान यानें गादीवर आल्यावर प्रारंभीं सरहद्दीवरील गेलेले प्रांत पुन्हां आपल्या हस्तगत करून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु अशा दूरच्या प्रदेशांचें संरक्षण करण्यांत त्रास व खर्च अतोनात होतो असें पाहून आपल्या हातून योग्य व्यवस्था न रहाण्यासारखे प्रांत त्यानें आपण होऊन सोडून दिले; तथापि दक्षिणेंत त्यानें आपला पूर्ण अंमल बसविला. त्याच्या वडिलानें ( जहांगीर यानें ) अहंमदनगर येथील राज्य जिंकण्याचें सुरू केलेलें कार्य त्यानें तडीस नेलें; आणि विजापूर व गोवळकोंडें येथील राज्यकर्त्यांना त्यानें आपलें सार्वभौमत्व मान्य करणें भाग पाडिलें. तथापि इतकें करूनही तो स्वस्थ बसला नाहीं, अथवा वृद्धपणा व आजारीपणा यामुळें निर्बल होईपर्यंत त्यानें राज्यकारभारांतूनही आपलें लक्ष काढून घेतलें नाहीं. " यावरूनच या बादशहाच्या कर्तृत्वाबद्दल कोणासही योग्य कल्पना सहज करितां येईल; शिवाय या बादशहा संबंधीं मुसलमानी रियासतींत असें म्हटलें आहे कीं, " शहाजहानसारखा वैभवशाली बादशहा हिंदुस्थानांत झाला नाहीं. त्याचा परिवार व त्याच्या घराण्यांतील नेमणुकी लोक, त्याच्या देणग्या व त्याच्या दरबारचा सर्व थाट, ह्या सर्व गोष्टी पूर्वीच्या बादशहाच्या वेळेस जरी पुष्कळ होत्या तथापि ह्या वेळेस त्यांचा अगदीं कळस झाला. या खर्चामुळें लोकांवर त्याची जास्त सक्ति होत नसे, आणि त्याच्या खजिन्यांत पैशाची टंचाई पडत नसे. त्यानें आपलीं सर्व मोठमोठीं कामें इतक्या काटकसरीनें केलीं कीं, सर्व लढायांचे व राज्यकारभारासंबंधीं इतर खर्च भागवून तसेंच बहुमोल मयूरासनाचे व ताजमहाल वगैरेचे अवाढव्य खर्च करून, आणि सर्व फौजेचा पगार वेळच्या वेळेस देऊनही त्याच्या खजिन्यांत मरणसमयीं कमीतकमी चोवीस कोटी रुपये शिल्लक होते. शिवाय सोन्याचांदीचे अपार दागिने व जवाहीर होतें तें वेगळेंच; वर लिहिलेली सर्व भरभराट बादशहाच्या राजधानीच्या शहरांतच होती असें नाहीं तर दूरदूरच्या प्रांतांतील शहरांची शोभाही त्यावेळच्या प्रवासी लोकांनीं वर्णिली आहे. ज्या प्रांतांत तीं

शहरें आहेत ते प्रांत सुपीक व धान्यानें भरलेले असत असें सांगतात. सर्व राज्यांमध्यें अवघड व डोंगराळ रस्त्यांतून दरवडे व खून होत असत. ते शहाजहाननें पुष्कळ कमी केले. या बंदोबस्तामुळें शहाजनाची कीर्ति फार झाली. शहाजहाननें केलेला बंदोबस्त जरी हल्लींप्रमाणें नव्हता, तरी त्यावेळच्या मानानें तो विशेष चांगला होता, यांत संशय नाहीं ? यावरून हा बादशहा जरी विलासी होता, तरी तो राज्यकारभार चालविण्यांत विशेष दक्ष होता, असेंच ह्मणावें लागतें; आणि तो जर महाबुद्धिमान, उद्योगी, राजकारण-कुशल व प्रजादक्ष नसता तर हल्लींच्या विसाव्या शतकांतील अनेक नव्या नव्या साधनांच्या अभावीं एवढ्या मोठ्या अफाट साम्राज्यभर, शांतता, सुबता, संपत्ति व सौख्यहीं नांदलींच नसतीं, व राज्याचा बंदोबस्त पुष्कळ राहून भरभराटीची परमावधीही झाली नसती—ह्मणजे तो तसा बहुविधगुणसंपन्न होता, ह्मणूनच वरील सर्व गोष्टी त्यास साध्य करितां आल्या हें उघड आहे.

शहाजहान यानें गादीवर आल्यावर आपल्या राज्यारोहणाच्या प्रसंगीं एक अदृष्टपूर्व असा उत्सव केला. त्यावेळीं त्यानें मक्का व मदिना येथील मंदिरांस अनेक मौल्यवान् नजराणे पाठविले. त्यांत पैगंबराच्या कबरेसन्निध ठेवण्याकरितां त्यानें एक रत्नजडित दिवा पाठविला होता. तो दिवा "अंबर' या नांवाच्या रत्नांचा केलेला असून त्याचें वजन अठरा शेर होतें व त्यावर बसविलेल्या अनेक हिऱ्यांमध्यें गोवळकोंडें येथून आणिलेला एक दीड लाख रुपये किंमतीचा हिरा लाविलेला होता. त्याप्रमाणेंच शहाजहानच्या पूर्वीच्या बादशहांची तुला निरनिराळ्या धातूंनीं करण्यांत येत होती. शहाजहान यानें ही पद्धत कायम ठेवून शिवाय रत्नांनीं भरलेलीं भांडीं आपल्या मस्तकासभोंवतीं ओंवाळून त्यांतील रत्नें आपणांवर उधळावीं व तीं लोकांनीं वेंचून घ्यावीं, असा नवा परिपाठ सुरू केला. प्रसिद्ध फ्रेंच प्रवासी व जव्हेरीजॉन बॅप्टिस्टा टॅव्हर्नियर यानें शहाजहान बादशहाविषयीं व त्याच्या मयुरसिंहासनाविषयीं आपल्या प्रवासवृत्तांत मोठें सुंदर वर्णन केलेलें आहे. शहाजहानविषयीं तो ह्मणतो कीं, "शहाजहान हा राज्यकर्त्याप्रमाणें आपल्या रयतेवर अंमल गाजवीत नाहीं; तर बाप जसा आपल्या मुलांबाळांशीं व कुटुंबाशीं प्रेमानें वागतो त्याप्रमाणेंच हा बादशहा आपल्या प्रजेशीं प्रेमानें वागतो. त्याच्या दिवाणीखात्याचा बंदोबस्त तारीफ करण्यासारखा आहे. दरबारांतील सर्व लोक बहुतेक सभ्यपणानें वागतात. इतर मुसलमान सुलतानाप्रमाणें शहाजहान बादशहा आपल्या रयतेवर खोटे आरोप आणीत नाहीं, अथवा डामडौलानें वागणाऱ्या श्रीमंत लोकांच्या संपत्तीवर वांकडी नजर ठेवीत नाहीं. त्यामुळें त्याच्या राज्यांत सर्व लोक निर्धास्त आहेत." त्याप्रमाणेंच हा फ्रेंच प्रवासी इ० सन १६६५ मध्यें अवरंगजेब बादशहास भेटण्यासाठीं दिल्लीस गेला होता. त्यावेळीं शहाजहान बादशहानें तयार करविलेलें रत्नजडित मयूरसिंहासन स्वतः आपल्या डोळ्यांनीं पाहून व त्यांतील हिरे, माणकें,

रत्नें वगैरेची पारख करून त्यानें त्यांसंबंधीं पुढें लिहिल्याप्रमाणें महत्वाचें व मनोरंजक वर्णन दिलें आहे. तो ह्मणतो:—"दिल्लीच्या बादशहाचीं बहुमूल्य अशीं रत्नखचित सिंहासनें सात आहेत. त्यांपैकीं एक तर नुसत्या तेजस्वी हिऱ्यांचेंच आहे; आणि बाकीचीं सहा माणकें, पाच व मोत्यें ह्यांनीं जडलेलीं आहेत. त्यांमध्यें जें मुख्य सिंहासन आहे तें—ह्मणजे मयूरसिंहासन; यास मुसलमानी इतिहासांत "तक्त-ई-तौस" हें नांव दिलेलें आहे. तें—पहिल्या दरबारांत ह्मणजे "दिवाण–ई–आम" मध्यें ठेविलेलें असून तें लष्करी पलंगाच्या आकाराचें आहे. ह्मणजे तें दीर्घवर्तुळाकार असून त्याची लांबी सुमारें सहा फूट व रुंदी चार फूट आहे. या सिंहासनास चार भरभक्कम असे सोन्याचे पाय असून त्याची लांबी वीस पासून पंचवीस इंचपर्यंत आहे. या पायांवर चार गजांची चौकट जडविलेली असून तिच्यावर सिंहासनाची बैठक ठेवून ती पक्की केलेली आहे; आणि त्यावर बारा खांब बसविलेले असून त्यांनीं तीन बाजूंनीं सिंहासनाच्या वरील मेघडंबरीस तोलून धरिलेलें आहे. सिंहासनाचे पाय व त्यांवरील गज हे सुवर्णाचे असून त्यांवर नानाप्रकारचे हिरे, माणकें, पाचू वगैरे रत्नांचें जडावाचें काम करून तें विशेष शोभिवंत केलें आहे. प्रत्येक गजाच्या मध्यभागीं एक मोठें तेजस्वी माणीक बसविलेलें असून त्या सभोंवतीं चार चार पाचू बसविलेले आहेत व त्यांचा चतुष्कोनी आकार केला आहे व त्यास ओळीनें चतुष्कोनी रत्नें जोडिलेलीं आहेत. त्यामुळें चार हिरव्या रंगाच्या पाचूंमध्यें एक डाळिंबी रंगाचें माणीक व चार माणकांमध्यें एक हिरवागार पाचू यांचें चारी बाजूंनीं सुंदर तेज चमकत असतें. हे पाचू पैलूदार असून त्यांच्या व माणकांच्या मध्यें हिरे जोडिलेले आहेत. हिऱ्यांचें वजन दहा किंवा बारा रतीपेक्षां अधिक नाहीं; परंतु ते चपटे असून अतिशय शोभायमान आहेत. कांहीं कांहीं जागीं सोन्यामध्यें मोत्यें बसविलेलीं आहेत. सिंहासनाच्या एका बाजूस वर चढण्यासाठीं चार पायऱ्या आहेत. तख्तावर जी बिछाईत ठेविली आहे तिच्यापैकीं पाठीमागें टेंकण्याचा तक्क्या मोठा असून बाजूच्या गिर्द्या लहान आहेत. या सिंहासनास एक तरवार, एक राजदंड, एक ढाल, एक धनुष्य व बाणांचें एक तूणीर अथवा भाता अशीं

---

**टीप १:**—टॅव्हार्नियर यानें दिलेल्या वरील मयूरसिंहासनाच्या सर्व वर्णनांत त्यानें हिरे, रत्नें वगैरेचें वजन इंग्रजी कॅरेटस् "—carats मध्यें दिलेलें आहे. मराठीमध्यें कॅरटस् यांस "रती" हा शब्द योजलेला आहे. तथापि "रती" व "क्यॅरट्" यांच्या वजनामध्यें थोडेंसें अंतर आहे. तें असें कीं, कॅरट्चें वजन ३$\frac{1}{5}$ ट्रॉय ( Troy ) आहे, आणि मराठी रतीचें वजन २$\frac{1}{4}$ ट्रॉय आहे; ह्मणून याठिकाणीं "रती" ह्मणजे "कॅरट्" असें समजून त्याचें वजनही कॅरटप्रमाणें समजावें.

आयुधें लटकाविलेलीं आहेत व त्यांसही निरनिराळ्या रंगांचीं रत्नें जडवून त्यांच्या व सिंहासनाच्या रंगांत सारखेपणा आणिलेला आहे. "

" मी या मयूरसिंहासनाचीं मोठीं माणकें मोजून पाहिलीं, तीं १०८ आहेत. त्यांतील अगदीं लहान आहे, तेंही निदान शंभर रती वजनाचें आहे. ह्यापेक्षांही अधिक ह्मणजे २०० रती किंवा त्याहून अधिक अशा वजनांचीं माणिकें त्यांत आहेत. पाचूविषयीं ह्मणावयाचें ह्मणजे या सिंहासनांत तेजस्वी रंगाचे पाचू पुष्कळ आहेत; परंतु त्यांत कांहीं ना कांहीं तरी दोष आहे; ह्यांतीकीं मोठा पाचू साठ रती भरेल; मीं पाचू मोजिले ते ११६ होते; ह्यावरून सिंहासनास माणकांपेक्षां पाचूच अधिक लाविलेले आहेत, असें दिसून येतें. "

" सिंहासनावरील मेघडंबरीची आंतील बाजूही हिरे व मोतीं यांनीं भरलेली आहे व त्या सभोंवतीं मोत्यांची एक सुंदर झालर सोडलेली आहे. मेघडंबरी चतुष्कोनाकृति असून तिच्या शिरोभागीं रत्नजडित मयूर बसविलेला आहे व त्यांत इतर रत्नांच्या रंगाची जोड करून हुबेहुब मयूरपिच्छांच्या नैसर्गिक रंगाची चमक उत्पन्न केली आहे. मोराचें शरीर सुवर्णाचें केलेलें असून त्याच्यावर नानाप्रकारचीं मौल्यवान् रत्नें जडलेलीं आहेत. त्याच्या वक्षःस्थळीं एक अतिशय मोठें माणीक बसविलेलें असून तेथें एक मोठें पिंवळ्या रंगाचें वर्तुलाकार मोतीं लोलकाप्रमाणें अडकविलेलें आहे. ह्या रत्नजडित कृत्रिम मयूरपक्ष्याच्या दोन्ही बाजूस तितक्याच उंचीचे दोन सुवर्णखचित पुष्पगुच्छ तयार करून बसविले आहेत. त्यामध्यें विविध रंगांचीं रत्नपुष्पें निर्माण केलीं असल्यामुळें त्यांचा प्रभा नेत्रांस आनंददायक झाल्यावांचून रहात नाहीं. या सिंहासनाच्या दर्शनीय बाजूस ८० पासून ९० रती वजनांच्या हिऱ्यांचें व इतर रत्नांचें एक कमळ बसविलेलें असून तें बादशहाची स्वारी सिंहासनावर विराजमान झाली ह्मणजे त्याच्या अगदीं दृष्टीसमोर येतें व त्याच्या तेजोलहरी सारख्या चमकत असतात. ह्या देदिप्यमान् सिंहासनामध्यें अधिक मूल्यवान् व अधिक शोभादायक जर कांहीं असतील तर तीं छत्रीच्या सभोंवतीं लाविलेल्या सुंदर झालरीचीं मोत्यें हीं होत. ह्या मोत्यांचें पाणी फारच नामी असून त्यांचा वर्तुलाकार अत्यंत प्रेक्षणीय आहे. त्यांचें वजन प्रत्येकीं सहा पासून दहा रतींपर्यंत असलें पाहिजे. या मयूरसिंहासनापासून चार फूट अंतरावर दोन्ही बाजूस दोन राजछत्रें ठेविलेलीं आहेत. त्यांचे दंड सात पासून आठ फूटपर्यंत उंचीचे असून त्यांना हिरे, माणकें व मोतीं जडलेलीं आहेत. या राजछत्राचें कापड रक्तवर्णाच्या मखमलीचें असून त्याच्या सभोंवतीं मोत्यांच्या झालरी सोडिलेल्या आहेत. "

" हें मयूरसिंहासन जसें मीं पाहिलें, त्याप्रमाणेंच त्याचें हें वर्णन मी दिलें आहे. हें अलौकिक रत्नसिंहासन तयार करण्यास तैमूरलंग बादशहानें सुरवात केली असून शहाजहान बादशहाच्या कारकीर्दींत तें पुरें झालें असें ह्मणतात. बादशहाच्या रत्नशाळेचे

जे अधिकारी आहेत त्यांच्यापासून मला अशी माहिती समजली आहे कीं या सिंहासनाची एकंदर किंमत १,२०,३७,५०० पौंड ( पंधरा रुपये पौंड प्रमाणें १८,०५,६२,५०० ) रुपये आहे; " हें मयूरासिंहासन, व कोहिनूर—कोह–ई नूर–हिरा इ० सन १७३९ मध्यें नादीरशहा यानें दिल्ली येथून इराणांत नेला.

---

१ टीपः—टॅव्हर्नियर यानें आपल्या पुस्तकांत, मॉडर्न रिव्ह्यूमध्यें कोह-ई-नूर, या हिऱ्यासंबंधीं दिलेल्या माहितीवरून मिरजुम्ला यानें शहाजहान बादशहास नजर केला तो कोहिनूर हिरा नव्हे, असें दिसतें. यासंबंधीं व हिंदुस्थानांतील इतर प्रसिद्ध हिऱ्यासंबंधीं जी माहिती मिळते ती थोडक्यांत अशी आहे कीं;:- कोहिनूर हा हिरा माळव्याच्या राजांजवळ वंशपरंपरेनें होता; तो इ० सन १३०४ मध्यें सुलतान अल्लाउद्दीन यानें त्याच्यापासून हिसकावून घेतला. पुढें इ० सन १५२६ मध्यें तो बाबरचा मुलगा हुमायून यानें आपल्या कबजांत घेतला, व नंतर तो क्रमानें अवरंगझेबाकडे आला. त्यानें आपल्या रत्नखचित सिंहासनामध्यें त्याचा उपयोग केला होता. इ० सन १७३९ मध्यें नादीरशहानें दिल्लीवर स्वारी करून महंमदशहा बादशहास पदभ्रष्ट केलें. तेव्हां कोहिनूर हिरा त्याला दिल्लीच्या बादशाही जवाहिरखान्यांत सांपडला नाहीं. महंमदशहानें तो हिरा आपल्या शिरस्त्राणांत लपविला आहे असें नादीरशहास कळलें तेव्हां त्यानें एक युक्ती योजिली. महंमदशहाला पुन्हा दिल्लीच्या तक्तावर बसवितेवेळीं नादीरशहानें त्याला " एकमेकांचीं शिरस्त्राणें बदलूं " असें ह्मटलें. त्याप्रमाणें महंमदशहा आपल्या डोक्यावरील फेंटा मोडीत असतां प्रथमच नादीरशहास तो जगप्रसिद्ध हिरा दिसला. त्याबरोबर तो आश्चर्यचकित होऊन " कोह-ई-नूर " ( तेजाचा पर्वत ) ह्मणून ओरडला; व तेव्हांपासूनच या हिऱ्यास कोहिनूर हें नांव मिळालें. नादीरशहाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा शहारूख याच्याकडे तो हिरा गेला. त्यानें तो अहंमदशहा अबदाल्ली ऊर्फ दुराणी यास दिला; त्याच्या मृत्यूनंतर तो हिरा त्याचा मुलगा तैमूरशहा याच्याकडे आला; व त्या वंशांतील अफगाणिस्थानचा पदभ्रष्ट अमीर शहासुजा याजकडून तो पंजाबचा राज्यकर्ता महाराज रणजितसिंह याजकडे आला. इ० सन १८४९ मध्यें इंग्रजांनीं पंजाबचें राज्य खालसा केल्यावर तो इंग्लंडमध्यें इ० सन १८५० मध्यें महाराणी व्हिक्टोरिया हीस नजर करण्यांत आला. इ० सन १८५१ च्या जगप्रसिद्ध प्रदर्शनांत तो ठेवण्यांत आला होता. त्यानंतर याचे लंडन येथें पैलू पाडण्यांत आले होते. त्याचें वजन हल्लीं १२५ कॅरटस् असून त्याची किंमत तीस लाख रुपये झाली आहे. परंतु शहाजहान बादशहास मीर जुम्ला यानें नजर केलेला हिरा कोहिनूर हा नसून " ग्रेट मोगल " हा होय. हा हिरा कृष्णा नदीच्या कांठीं कोलार खाणींत इ० सन १६५० मध्यें सांपडला. तो इ० सन १६६५ मध्यें

शहाजहान हा अतिशय प्रेमळ स्वभावाचा होता; त्याच्या चौदा आपत्यांपैकीं दुसरें आपत्य कन्या जहान्-आरा ऊर्फ जहानारा बेगम ही होय; हिचा जन्म इ० सन १६१४

---

अवरंगझेबाजवळ होता. हा हिरा मिरजुम्ला यानें शहाजहान बादशहास नजर केला असून त्याचीच कीर्ति ऐकून नादीरशहा दिल्लीवर चाल करून आला होता, व त्याचें वजन २८० कॅरटस् होतें असें ह्मणतात. हल्लीं हा हिरा कोठें आहे हें समजत नाहीं.

हिंदुस्थानांतील प्रसिद्ध हिऱ्यांमध्यें " ऑरलाफ, " रीजंट " व " होप " हे तीन हिरे वरील " कोहिनूर व " ग्रेट मोगल " यांच्या प्रमाणेंच, विशेष मौल्यवान व महत्वाचे गणले गेलेले आहेत. त्यांपैकीं " ऑरलाफ " हा हिरा म्हैसूरमधील श्रीरंगपट्टण येथील देवळांतील मूर्तीच्या डोळ्यांत होता. तो तेथून एका फ्रेंच शिपायानें चोरून नेला. त्याच्यापासून तो, एका जहाजावरील कप्तानानें बळकाविला. त्याच्यापासून तो राजपुत्र ऑरलाफ यानें इ० सन १७७६ मध्यें नव्वद हजार पौंडांस विकत घेतला. त्याच राजपुत्राच्या नांवानें तो हल्लीं प्रसिद्ध असून त्यानें तो रशियाची राणी कॅथराइन् हिचें पुन्हा आपणांवर प्रेम जडावें ह्मणून तिला नजर केला. तो रंगानें पिवळट असून त्याचें वजन १०५ कॅरटस् आहे; त्याची किंमत साडेतेरा लाख रुपये करण्यांत आलीं असून तो रशियाच्या बादशहाच्या मुगुटावर लावण्यांत येत असे. हल्लीं हा हिरा कोठें आहे हें समजत नाहीं.

" रीजंट " हा हिरा इ० सन १७०१ मध्यें कृष्णानदीच्या कांठीं एका गुलामास मिळाला. त्यानें तो एका इंग्रज नावाड्यास विकला. तो त्यावेळचा मद्रासचा गव्हर्नर पिट्ट यानें विकत घेतला, ह्मणून या हिऱ्यास " पिट्ट " असेंही दुसरें नांव मिळालें आहे. पिट्टनें तो इ० सन १७१७ मध्यें त्यावेळचा फ्रान्सचा रीजंट ( कारभारी ) ड्यूक ऑफ ऑर्लियन्स यास विकला. त्याची किंमत हल्लीं पांच लक्ष पौंड असून त्याचें वजन १३७ कॅरटस् आहे. हा हिरा हल्लीं पॅरीस येथील जवाहीरखान्यांत आहे.

टॅव्हार्नीयर यानें हिंदुस्थानांतून अनेक हिरे विकत घेऊन स्वदेशीं नेले. त्यांतील " होप " ( आशा ) हा हिरा निराशा उत्पन्न करणारा व अपेशी ठरला असून त्याचा इतिहास शोकजनक आहे. हा हिरा प्रथमतः टॅव्हार्नीयर यानें हिंदुस्थानांत विकत घेऊन स्वदेशीं नेल्यावर त्याला आपल्या धंद्यांत बूड आली. ह्मणून तो पुन्हा व्यापाराकरितां हिंदुस्थानांत येत असतां वाटेंत मृत्यु पावला. फ्रान्सचा सोळावा लुई व मेरी ॲन्टोनेट यांच्याजवळ तो हिरा असतांना फ्रान्समध्यें राजक्रांति होऊन त्या उभयतांचाही वध झाला. या राजक्रांतींत हा हिरा दंगेखोरांनीं पळविला. त्याचा इ० सन १८३० पर्यंत पत्ता लागला नाहीं. दरम्यान तो ज्यांच्या ज्यांच्या ह्मणून ताब्यांत गेला त्यांपैकीं कित्येकांचे खून झाले.

मध्यें झाला. स्वतः शहाजहान हा मोठा हुशार असून जहांगीरपेक्षांही त्याचें हस्ताक्षर उत्तम होतें. कित्येक प्रसंगीं तो स्वतःच्या हातानेंही हुकूम लिहून देत होता. मोंगली राजघराण्यांतील बहुतेक स्त्रियाही शिकलेल्या, हुषार, कर्तृत्ववान् व विद्वान् होत्या; त्याप्रमाणेंच शहाजादी

---

कित्येकांनीं आत्महत्त्या करून घेतल्या. कित्येकांना जन्मठेप घडली. नंतर तो होप या नांवाच्या एका मनुष्यानें विकत घेतला; व त्याच्याच नांवानें तो प्रसिद्ध आहे. हा हिरा होपजवळ असतां त्याचें दिवाळें निघालें, व त्याच्या बायकोलाही कोणी पळवून नेलें. अशा परंपरेनें तो टर्की अथवा युरोपांतील तुर्कस्थानचा सुलतान अबदुल हमीद याजकडे गेल्यानंतर तोही पदभ्रष्ट झाला, हल्लीं हा हिरा अमेरिकेंत असून तिकडेंही त्यानें आपली शोकपरंपरा चालू ठेविली आहे.

ब्रिग्सच्या फेरिस्त्याच्या इतिहासांत, ( भाग २ पान ४६–४७ पहा ) हिंदुस्थानांतील प्रसिद्ध हिऱ्यांसंबंधीं अशी माहिती दिली आहे कीं:–

१ " कोहिनूर " हा हिरा माळव्याचा सुलतान अल्लाउद्दीन खिलजी याच्याजवळून एका रजपूत राजानें हिसकावून घेतला होता. रजपूत लोकांचा बाबर यानें पराभव केल्यानंतर इ० सन १५२६ मध्यें त्यांनीं तो बाबर यास दिला; व त्यानें तो आपला मुलगा हुमायून यास दिला. वजन ६७२ कॅरटस्.

२ " अवरंगझेबचा हिरा " मीरजुम्ला यानें ( शहाजहानास ) नजर केलेला. वजन ९०० कॅरटस्.

३ " रशियाचा बादशहा " हा हिरा श्रीरंगपट्टण येथील देवळांतील मूर्तीच्या डोळ्यांत होता. वजन ७७९ कॅरटस्.

४ " ग्रेट मोगल " वजन २७९ कॅरटस्,

५ " पिट्ट " अथवा " रीजंट " वजन १३७ कॅरटस्.

या हिऱ्याचें वजन इतकें कमी आहे तरी जगांतील हिऱ्यांमध्यें तो सर्वांत सुंदर आहे असें समजतात.

६ " नासक " ( " The Nassuck diamond " ) वजन ८९ कॅरटस्.

हा हिरा पेशव्यांच्या खजिन्यांतून मिस्तर ब्रिग्स यानें स्वतःच धुंडाळून काढिला.

**खुलासाः**—हिऱ्यास पैलू पाडून त्यांत जितकी अधिक वक्रीभवनशक्ति ( Refractory power ) उत्पन्न करितां येईल त्या मानानें तो जास्त तेजस्वी होईल; हिऱ्याचे पैलू पाडून त्यांत वक्रीभवनशक्ति आणणें, ही एक विशिष्ट प्रकारची कला असून ती प्राचीन कालापासूनच हिंदुस्थानांतील लोकांना अवगत होती.

जहान्-आरा ( जगाला भूषविणारी ) हीही मोठी विद्वान् विदुषी असून आग्रा येथील किल्ल्यांत तिचा एक मोठा पुस्तकसंग्रहही होता. ही राजकन्या मोठी सुस्वरूप व आनंद-वृत्तीची होती. शहाजहान बादशहाचें तिच्यावर अतिशय प्रेम होतें. त्याचे खाण्याचे सर्व पदार्थ या राजकन्येच्या देखरेखीखालीं तयार होत असत व त्यांवर ती सक्त नजर ठेवीत असे. दरबारांतील अनेक महत्वाच्या बाबतींत शहाजहान तिचेंच मत घेत असे; त्यामुळें तिचें अतिशय महत्व वाढलें होतें. तिला शहाजहान यानें सहा लाख रुपयांची नेमणूक करून दिली होती, आणि दरबारी व सरदार मंडळीकडून तिला वारंवार अनेक देणग्या मिळत असल्यानें तिच्याजवळ पुष्कळ संपत्ति जमलेली होती. शहाजहानची सौंदर्यसंपन्न राणी मूमूताजमहाल हिच्या मृत्यूनंतर सतत पस्तीस वर्षे ती शहाजहानच्या सन्निध राहून त्याची अतिशय काळजी घेत होती. शहाजादा दारा याची सर्व भिस्त तिच्यावर होती.

शहाजादा अवरंगझेब याच्या बाबतींत शहाजहानजवळ तिनें मध्यस्थी करून उभयतां पितापुत्राचें सख्य करून दिलें होतें. अवरंगझेबाची नेमणूक पुन्हा चालू करून दिली होती; आणि प्रसंगीं ती त्याच्याविरुद्ध वागूनही अवरंगझेबावर अखेरपर्यंत तिचें अतिशय वजन होतें. या राजकन्येवर शहाजहान याचें किती प्रेम होतें, हें खालील गोष्टीवरून कळून येतें; ( Sarkar's History of Aurangzib Vol. I Page 72 to 76 पहा. ) राजकन्या जहान्-आरा ही एक दिवस ( ता० २६ मार्च इ० सन १६४४ ) आग्रा येथील किल्ल्यांत आपल्या पित्याच्या-बादशहा शहाजहान याच्या महालांतून स्वतःच्या दिवाणखान्यांत परत येत असतां वाटेंतील मेणबत्तीच्या दिव्यास तिचा झगा लागून तो पेटला व तो अतिशय सफाईदार मलमलीचा असल्यानें व त्यास अत्तर व इतर सुगंधी द्रव्यें लाविलेलीं असल्यामुळें क्षणार्धांत सर्व झगा पेटून तिच्या सगळ्या शरीरभर ती आग भडकली. त्या-वेळीं तिच्याबरोबर चार दासी होत्या; राजकन्येची ही स्थिति पाहतांच आग विझविण्या-करितां त्या तिच्या अंगावर जाऊन पडल्या; पण त्यामुळें उलट त्यांचेही कपडे पेटून त्याही अतिशय भाजल्या. इतक्यांत चोहोंकडून मंडळी धांवत येऊन त्यांनीं सर्वांचे कपडे विझविले.

या अपघातामुळें त्या चार दासी व जहान्-आरा ह्या अतिशय भाजून निघाल्या. जहान्-आराची पाठ दोन्हीं बाजू व हात हे साफ जळून गेल्यासारखे झाले. या अपघातामुळें शहा-जहान यास अत्यंत दुःख झालें; आणि राणी मुमूताजमहाल-ऊर्फ अर्जुमंदबानू ही मृत्यु पावल्या वेळेपासून ( इ० सन १६३१ ) हीच मुलगी त्याची सतत अतिशय काळजी घेऊन त्याच्या सुखाकरितां नेहमीं जपत असल्यामुळें तर तो अगदींच पोळल्यासारखा होऊन हताश बनला. तो दरबारांत पाव अर्धी घटका बसला न बसला तोंच परत येऊन तिच्या बिछा-न्याजवळ नेहमीं बसलेला राही. शहाजहान तिला आपल्या हातानें खाऊ घालीत असे.

तिच्या जखमा स्वतः धुऊन तो त्यांवर आपल्या हातानें मलम वगैरे औषधें लावीत असे. या राजकन्येला बरी करण्याकरितां त्यानें लांबून जवळून अनेक वैद्य आणविले होते; ही मुलगी ईश्वरीरुपेनें बरी व्हावी ह्मणून तो दररोज मोठमोठ्या रकमा धर्म करीत असे. दर-रात्रीं तिच्या उशीखालीं हजार रुपयांची थैली ठेवून ती सकाळीं तो गरीबांना वाटीत असे. सरकारी पैशाची तूट आल्यामुळें ज्यांना प्रतिबंधांत ठेविलें होतें, त्या सर्वांनां बंधमुक्त करून त्यानें सात लाख रुपयांची रक्कम मांडून वाळिला. दररोज संध्याकाळपासून मध्यरात्रींपर्यंत शहाजहान तिच्या बिछान्याजवळ गुडघे टेंकून दुःखाश्रू ढाळीत ती बरी होण्याबद्दल ईश्वराची करुणा भाकीत असे. अशा स्थितींत सतत चार महिने राजकन्या जगेल किंवा नाहीं, हें अनिश्चित होतें; आणि तिच्याबरोबर भाजलेल्या दासींपैकीं दोघी तर अगोदरच मृत्युमुखीं पडल्या असल्यामुळें राजकन्येच्याही जगण्याची आशा बहुतेक सुटत चालली होती. राजकन्या भाजली त्यानंतर कांहीं दिवसांनीं कर्मधर्मसंयोगानें इराणच्या बादशहाचा एक कुशल हकीम धन्याच्या जाचाला कंटाळून आग्रा येथें शहाजहान बादशहाकडे आला होता. त्याच्या औषधोपचारानें राजकन्येस बराच गूण आला व मुख्यत्वेंकरून तिच्या अंगांतील ज्वर व अशक्तपणा नाहींसा झाला. तथापि त्यानें व राजघराण्यांतील हकीम मुमाना यानें राज-कन्येच्या जखमा भरून येण्याकरितां नानाप्रकारचे इलाज केले, तरी त्याचा कांहींही उप-योग होईना व कांहींकेल्या जखमा भरून येईनात. तेव्हां अरीफ या नांवाचा बादशहाचा एक गुलाम व "गांवठी वैद्य" पुढें आला व "जें न साधे हकीमा, तें साधे गुलामा" या गोष्टीचें त्यानें प्रत्यंतर आणून दिलें. या गुलामानें आपलें एक गांवठी मलम तयार केलें, आणि चमत्कार हा कीं, याच मलमानें राजकन्येच्या सर्व जखमा दोन महिन्यांत पूर्ण-पणें भरून येऊन ती बरी झाली. तेव्हां ता० २५ नोव्हेंबर रोजीं शहाजहान यानें एक टोलेजंग आनंदोत्सव केला. आपल्या या मुलीस दहा लाख रुपयांचें जडजवाहीर इनाम दिलें. राजघराण्यांतील राजवाड्यांतील व राज्यांतील अनेक मंडळींना पुष्कळ संपत्ति नजराण्यादाखल दिली. भिकाऱ्यांना दोन लाख रुपये खैरात केली; आणि अशा रीतीनें त्यानें या राजकन्येवरील आपलें अगाध प्रेम व्यक्त केलें. जहान्-आरा ही इ० सन १६८१ मध्यें दिल्ली येथें मृत्यु पावली. हिच्या नांवाची एक धर्मशाळा दिल्ली येथें असून, शहराबाहेर शेख निजामुद्दिन अवलियाच्या दरम्यानजीक दक्षिण बाजूस तिची कबर आहे. आपल्या कबरस्थानांवर डामडौलाची इमारत बांधूं नये, अशी इच्छा या राजकन्येनें शेवटीं प्रगट केली होती. त्याप्रमाणें तिची कबर अगदीं साधी बांधण्यांत आली असून तिच्यावर अच्छा-दनही नाहीं. उलट तिच्या मध्यभागीं गवत लाविण्याकरितां खुली जागा ठेविलेली आहे; या कबरीचा मुख्य दगड सहा फूट लांबीचा असून त्याच्या शिरोभागीं अरबी भाषेमध्यें "परमेश्वर हेंच जीवित आणि परमेश्वर हाच पुनर्जन्म" असें लिहिलेलें आहे व त्याखालीं

" मिम् " हें कुराणांतील सांकेतिक अक्षर लिहून त्याखालीं फारशी भाषेमध्यें " माझ्यासारख्या अल्प पामराच्या कबरीवर श्रीमंती आच्छादन दुसरें कांहींच नको; फक्त निसर्गदेवतेचा तृणानें आच्छादिलेला हिरवा शेलाच पुरे आहे, " असा मजकूर असून त्यांतच ही कबर शहाजहानची मुलगी जहानू-आरा हिची असल्याबद्दलचा उल्लेख केलेला आहे.

बादशहा शहाजहान यानें अकबरापासून चालत आलेली राज्यपद्धति तशीच कायम ठेविली होती; शिवाय जहांगीर प्रमाणेंच तो मोठा न्यायनिपुण असून त्याच्या न्यायमंदिरांत भिंतीवर सर्वांस सारखा निःपक्षपातपणानें न्याय मिळेल, असें न्यायतुलेचें चित्र काढिलें होतें. त्याच्या न्यायाच्या अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत; त्यांपैकीं एक अशी आहे कीं, एकदां एका मनुष्यानें शहाजहान बादशहाकडे येऊन असा अर्ज केला कीं, माझ्या बापाची दोन लक्षांची संपत्ति माझ्या आईजवळ असून ती माझ्या गैरवर्तनाची सबब सांगून, मला कांहींही देत नाहीं; तरी सरकारांनीं मला ती देववावी; " तेव्हां शहाजहान यानें त्या मुलाच्या आईस समक्ष बोलाविलें; व तिला विचारपूस करून, " आपल्या मुलाला तुझ्याजवळ असलेल्या संपत्तीपैकीं पन्नास हजार रुपये दे, आणि एक हजार रुपये सरकारांत दाखल कर, " असा हुकूम फर्माविला. ही बाई मोठी हुषार व सभाधीट होती. तिनें शहाजहान याचा हा हुकूम ऐकून लागलींच त्यास मोठ्या अदबीनें विनंति केली कीं, " सरकार, आपल्या दरबारांत न्यायाची तुला आहे; तेव्हां येथून जो न्याय मिळेल तो रास्तच असणार, हें उघड आहे. आपण सरकार आहांत. माझ्या पुत्रास पन्नास हजार रुपये देण्याविषयीं जो हुकूम झाला आहे, त्याबद्दल माझें कांहींही ह्मणणें नाहीं; कारण तो माझ्या नवऱ्याचा औरस पुत्र आहे; पण खुदावंतांनीं मला सरकारांत एक हजार रुपये देण्याबद्दल हुकूम केला आहे, त्याबद्दल माझी एवढीच विनंति आहे कीं, सरकारचें व माझ्या नवऱ्याचें नातें काय आहे, हें मला समजावें. " हें त्या बाईचें मार्मिक भाषण ऐकून शहाजहाननें एक शब्दही अधिक न बोलतां " तुला ते हजार रुपये माफ केले आहेत, " असें ह्मणून तिला परत जाण्यास आज्ञा केली, यावरून जहांगीर प्रमाणेंच शहाजहानही न्यायी होता, हें सिद्ध होतें.

बादशहा अकबर, व जहांगीर हे दिल्ली येथें फार दिवस न राहतां आग्रा, अजमीर, लाहोर, वगैरे ठिकाणीं व काश्मीरमध्यें रहात असत; परंतु शहाजहान हा दिल्लीस अधिक काळ राहूं लागला, व त्यानें या शहरास अद्वितीय शोभा आणिली. शहाजहान बादशहानें आग्रा येथें " ताजमहाल " या नांवाची जी जगप्रसिद्ध व अप्रतिम सौंदर्यसंपन्न इमारत बांधिली आहे; तिचें तर तंतोतंत वर्णन करणें सुद्धां कठीण आहे. आणि अगदीं थोडक्यांत ह्मणावयाचें ह्मणजे, नाना प्रकारच्या सर्व कुशलतेची परमावधि करून व जगांतील एकंदर सौंदर्य व शोभा एकवटून ती या इमारतींत येऊन राहिली आहे, अशी ही इमारत

पाहिल्याबरोबर कोणाचीही सहज खात्री होणार आहे. सांप्रत ज्यास " नवी दिल्ली " असें ह्मणतात तें " शहाजहानाबाद " या नांवाचें शहर शहाजहान यानें वसविलें. त्याप्रमाणेंच दिल्ली येथील किल्ला, त्यांतील " दिवाण-ई-आम, " व " दिवाण-ई-खास " या इमारती, जुम्मामशीद, यमुनेचा कालवा, हीं सर्व कामें याच बादशहाच्या कारकीर्दींत झालेलीं आहेत. किल्ल्याचा परीघ दीड मैलाचा असून तो फार भव्य व प्रचंड आहे; व तो यमुना नदीच्या तीरावर असून त्याच्या सभोंवती सुमारें चाळीस फूट उंचीचा एक भक्कम कोट आहे. किल्ल्याच्या मुख्य दरवाजास " लाहोर दरवाजा " ( यास आतां " व्हिक्टोरिया गेट " असें ह्मणतात. ) हें नांव असून तेथील खंदकाचें काम विशेष प्रेक्षणीय आहे; व खुद्द दरवाजा अतिशय मजबूत असून त्याच्या पश्चिमेस जुम्मामशीद व पूर्वेस शहर आहे. किल्ल्याचें बांधकाम विशेष सुंदर व ताजमहालप्रमाणेंच लाल दगडाचें आहे. या किल्ल्यांत " दिवाण-ई-आम " ( वरिष्ठ दरबारी लोकांकरितां सभागृह ) व " दिवाण-ई-खास " ( सर्व साधारण लोकांकरितां सभागृह ) या दोन, दिल्लीपतीच्या दरबाराच्या इमारती शहाजहाननें बांधिल्या आहेत; या दोन्हीही इमारती विशेष प्रेक्षणीय व आकर्षक आहेत. लाहोर दरवाज्याच्या पश्चिमेस असलेली जुम्मामशीद ही इमारत ताजमहालाच्या खालोखाल अप्रतिम आहे; ही सर्व इमारत तांबूस दगडाची असून तिच्यामध्यें संगमरवरी दगडांचें कामही केलेलें आहे. इतकेंच नव्हे तर दिल्ली शहरांत हीच अत्युच्च इमारत असल्याबद्दल तिची प्रसिद्धी आहे. ही मशीद एका उंच खडकावर बांधिलेली असून तिच्याकरितां त्या ठिकाणचा खडक फोडून काढून साफ जागा करण्यांत आली होती. या मशीदीच्या चारी बाजूस रस्ते आहेत, आणि उत्तर, दक्षिण व पूर्व या तीन बाजूंनीं तिला प्रवेशद्वारें असून चवथ्या ह्मणजे पश्चिम बाजूस एक नुसत्या उंच दगडाची—प्रवेशद्वार न ठेवितां—सळंग भिंत बांधिलेली आहे. तीन्हीही प्रवेशद्वारांपर्यंत पायऱ्या असून त्या नदीच्या घाटावरील पायऱ्याप्रमाणें मोठ्या प्रशस्त आहेत. मुख्य प्रवेशद्वारें पितळेचीं ओतींव असून तीं फार प्रचंड व भक्कम आहेत. पूर्वेकडील प्रवेशद्वार अतिशय सुंदर व विशेष मोठें असून त्यांतून आंत गेलें ह्मणजे प्रथमतः एक मोठें पटांगण लागतें; हें पटांगण चौदाशें घनयार्ड असून त्याची फरसबंदी तांबूस रंगाच्या दगडांची केलेली आहे व त्याच्या मध्यभागीं संगमरवरी दगडाचा एक भव्य हौद केलेला असून त्यांत खडकांतील झऱ्याचें पाणी आणून सोडिलेलें आहे. हें चतुष्कोणी पटांगण इतकें मोठें आहे कीं, त्यांत पांच हजार मुसलमानांना सहज प्रार्थना करितां येईल. या इमारतीमधील मुख्य मशीद ह्याच मुख्य पटांगणाच्या पश्चिम बाजूस असून, मक्का पश्चिमेस असल्यानें त्या दिशेचा बोध व्हावा, या हेतूनेंच तशी रचना करण्यात आली आहे. खुद्द मशीद ही दीर्घ

चौकोनी असून तिची लांबी २०१ फूट, आणि रुंदी १२० फूट आहे; तिच्या शिरोभागीं शुभ्र संगमरवराच्या तीन सुंदर मेहेरपी असून त्यांवर सुवर्णाचा मुलामा दिलेलें नक्षीकाम आहे. मशीदीच्या दोन्हीं बाजूस दोन मनोरे असून, त्यांची उंची १३० फूट आहे व त्यांवर लहानसे सुबक व सुंदर घुमट आहेत. मशीदीच्या अग्रभागांत दहा दालनें केलीं असून त्यांच्यावरील अर्धवर्तुलाकार कमानी अतिशय सुंदर आहेत. या इमारतींत एका शिरोभागीं काळ्या रंगाच्या दगडांची शुभ्र रंगाच्या संगमरवरी दगडांवर "नस्की भाषेंत या इमारतीस लागलेला खर्च व ती तयार झाल्याचा सन दिला आहे. त्यावरून असें समजतें कीं, या इमारतीचें बांधकाम इ० सन १६४४ मध्यें सुरू होऊन तें इ० सन १६५० मध्यें समाप्त झालें. त्या अवधींत पांच हजार माणसें सतत या कामावर लावण्यांत आलीं व त्यावेळच्या भावाप्रमाणें तिला दहा लाख रुपये खर्च आला. या मशीदींतील फरसबंदीचें काम सर्व संगमरवरी दगडाचें असून त्यावर तीन फूट लांब व दीड फूट रुंद अशा प्रकारच्या रांगोळ्यांच्या पंक्तीप्रमाणें दिसणाऱ्या कमानी एकसारख्या ओळीनें ९०० आहेत; यांतच बादशहा व अमीर-उमराव नमाज पढण्यास बसत असत. किबल्याजवळ ह्मणजे मध्यभागाच्या अर्धगोलाकृति शिरोभागाखालीं सर्वोत्कृष्ट नक्षीकाम केलेलें असून त्याच्या सन्मुखभागीं अखंड संगमरवरी दगडाचें धर्माध्यक्षाचें मुख्य पीठ केलेलें आहे व याच ठिकाणच्या एका भिंतीवर बादशहा शहाजहान व बहादूरशहा यांचीं हस्ताक्षरें दाखविलीं आहेत. त्याप्रमाणेंच या मशीदीच्या एका दालनामध्यें एक खोली असून तिचें जाळीकाम विशेष प्रेक्षणीय आहे व त्यांत पैगंबराच्या वेळच्या कांहीं जुन्या पूज्य वस्तू ठेविलेल्या असून त्या शहाजहान बादशहानें भक्तिपुरस्सर येथें आणून ठेविल्या असा लोकप्रवाद आहे; आणि एका युरोपियन लेखकाच्याच शब्दांत ह्मणावयाचें ह्मणजे "ह्या इमारतीची विशुद्ध शोभा तिच्या रचनेंतील प्रमाणसौंदर्य व तिच्या बांधकामाची उदात्त कल्पकता ह्यांची व आमच्या ख्रिस्ती प्रार्थनामंदिराच्या क्षुद्र व दरिद्री बांधकामाची तुलना केली ह्मणजे दुःखानें खालीं मान घालण्यासारखा विरोध दृष्टीस पडतो" इतकें अलौकिक व आश्चर्यकारक असें तिचें रचनाचातुर्य आहे. ही जुम्मामशीद दिल्लीचा किल्ला व सांप्रतचें दिल्ली शहर मिळून दिल्ली ऊर्फ शहाजहानाबाद हें शहर होतें. या शहरासभोंवतीं एक मोठा कोट असून त्यास दरवाजे आहेत व त्याचा परीघ साडेपांच

---

टीप १:—There is a chaste richness, and elegance of proportion, and a grandeur of design in all its parts, which are painful contrast to the mesquin and paltry architecture of our christian churches. "—*Russell.*

मेलांचा आहे. वरील विवेचनावरून शहाजहान बादशहाच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांत शिल्पकलेची किती परमावधीची भरभराट झाली होती, याची सहज कल्पना होते.

मोंगल बादशाहींत आणि हिंदुस्थानांतील निरनिराळ्या मुसलमानी राज्यांत अनेक निरनिराळ्या प्रकारच्या प्रेक्षणीय इमारती, महाल, मशीदी, घुमट, कबरी व उत्कृष्ठ शिल्पकलेचीं कामें अनेक राज्यकर्त्यांनीं केलेलीं असून त्यांपैकीं आजतागायत पुष्कळ अस्तित्वांत आहेत. जुम्मामशीदीप्रमाणेंच शिकंदरा येथील अकबराची कबर, शहादरा येथील जहांगीरची कबर, शिक्री येथील अकबरानें बांधिलेले राजवाडे वगैरे इमारती अतिशय प्रेक्षणीय आहेत. हिंदुस्थानांतील प्राचीन शिल्पकलेसंबंधीं आणखी कितीतरी माहिती देतां येण्यासारखी आहे, पण स्थलाभावामुळें आणखी एकाच इमारतीची थोडक्यांत याठिकाणीं माहिती दिली आहे; ती इमारत ह्मणजे लखनौ येथील "इमामवाडा" ही होय. ही सुंदर, भव्य व परमावधीच्या शिल्पकलेची इमारत इ० सन १७८६ या वर्षी अयोध्येचा नबाब आसफउद्दौला यानें बांधिली. या इमारतीस कोट्यावधि रुपये खर्च झाला असून ही इमारत कल्पनेबाहेर अप्रतिम व सुंदर आहे व तिच्यामध्यें एक अत्यंत मनोहर, चित्ताकर्षक व भव्य असा १६३ फूट लांब व ५३ फूट रुंद एवढा विशेष विस्तृत दिवाणखाना असून त्याचें नक्षीचें व इतर काम कल्पनातीत सुंदर आहे व त्यांतल्या त्यांत जगांत फारच क्वचित् दिसणारी अतिशय महत्वाची अशी अलौकिक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, हा एवढा भव्य दिवाणखाना एकाही आधाराशिवाय,—पूर्ण निराधार असा—बांधिलेला आहे; ह्मणजे त्यामध्यें एकही खांब नाहीं, आणि दुसरी गोष्ट ही कीं, या इमारतींत कोठेंच लांकूड वापरिलेलें नाहीं; त्यामुळें युरोपखंडांतील सर्व प्रवासीही या इमारतीची अत्यंत प्रशंसा करितात, आणि अशी इमारत सर्व युरोपखंडामध्यें इतकेंच नव्हे तर सर्व जगामध्येंही कोठेंसुद्धां अस्तित्वांत नाहीं, असें स्पष्टपणें कबूल करितात; या इमारतीचें प्रचंड स्वरूप पाहून प्रेक्षकांस एकदम अतिशय आश्चर्य वाटतें व ही इमारत विश्वकर्म्यानेंच निर्माण केली आहे कीं काय असा भास होतो. या प्रचंड इमारतींत मोठ्या कल्पकतेनें वातायनें तयार केलेलीं असून त्यांतून प्रकाशलहरी आंत येऊन त्यामुळें या इमारतीभर अतिशय प्रकाश पडत असतो व भरपूर हवा खेळत राहते. या सौंदर्यमंदिराच्या भिंतींना पूर्वी रजत्-सुवर्णाचें पाणी दिलें होतें व त्यावर सुंदर वेलबुट्टी काढिली होती; परंतु हल्लीं ती नाहींशी झाली असून क्वचित् ठिकाणीं रौप्यतेज मात्र दृष्टीस पडतें. सारांश, मुसलमानी काळांत शिल्पकलेला अतिशय उत्तेजन मिळून तिचा परमावधीचा उत्कर्ष झाला, ही गोष्ट वरील हकीकतीवरून सिद्ध होते, यांत तिळमात्रही शंका नाहीं.

बादशहा शहाजहान यास प्रतिबंधांत ठेवून, आणि आपल्या राज्यप्राप्तीच्या मार्गांतील इतर कांटे पार नामशेष करून अवरंगझेब, हा आलमगीर या नांवानें इ० सन १६६८ मध्यें

( ता० २१ जुलई ) दिल्ली येथील बादशाही तख्तावर आरूढ झाला; जहांगीर बादशहा मलिकंबरचा बंदोबस्त करून आग्रा येथें परत जात असतां मार्गांत दोहद[1] येथें शहाजनची बायको मुम्ताजमहाल् ही प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. ( ता० २४ ऑक्टोबर १६१८ ) तोच अवरंगझेब हा होय; मराठ्यांच्या इतिहासांतील पूर्वकाळांत अवरंगझेबाचा त्याच्या मृत्यूपर्यंत मराठ्यांशीं सारखा संबंध आलेला असल्यानें त्याचा स्वभाव, वागणूक व मतें याविषयीं याठिकाणीं थोडीसी माहिती दिली आहे व त्यावरूनच पुढील काळांतील त्याच्या वर्तनाचें रहस्यही तात्काळ लक्षांत येण्यासारखें आहे. अवरंगझेबाचें चरित्र ह्मणजे त्याचें आग्रही वर्तन, मरेपर्यंतचा संशयी व अविश्वासी स्वभाव, हिंदू प्रजेची छळणूक शिया व सुनी या धार्मिक मतांतरावरील कटाक्ष, मराठ्यांचें व रजपूतांचें निर्मूलन करण्याचा अट्टाहास, कपटी व दगाबाज वागणूक, अंतःपुरांतील कारस्थानांची जाचणूक, आणि शेवटीं अनेक विवंचनेंत दिल्लीपासून दूर अंतरावर मृत्यु वगैरे अनेक गोष्टींचा मिळून बनलेला एक इतिहास आहे; आणि जन्म होतो दोहद येथें, राज्य मिळवितो दिल्ली येथें, युद्धें करितो दक्षिणेमध्यें, मृत्यु होतो नगर येथें, मूठमाती मिळते दौलताबादेजवळील रोझा येथें अशी त्याच्या पंचभूतात्मक शरीराची पंचस्थळी यात्रा झाली आहे. राज्यकर्त्याच्या विध्वंसक राजनीतीचें समर्थन करितां येणार नाहीं, असें मानलें तरी कित्येक बाबतींत त्याचा कित्ता पुढें ठेवून त्याप्रमाणें आचरण करावें, असा तो करारी व कर्तृत्ववान् होता, सर्व मोंगल बादशहामध्यें तो अधिक विद्वान् असून सर्व कुराण, पुष्कळ ग्रंथांतील वेंचे व कवनें त्यास तोंडपाठ येत होतीं; अरबी, फारशी व हिंदुस्थानी त्यास उत्तम येत असून शिवाय हिंदी भाषाही चांगली समजत होती. त्याचा स्वधर्माचा अभ्यास दांडगा होता. त्यास कुराणाचा अर्थ उत्तम समजत होता. मुसलमानी धर्मशास्त्रांतील त्याची विद्वत्ता अलौकिक होती. त्याचें हस्ताक्षर उत्तम होतें; आणि मौलाना शेखनिजाम व इतर अनेक

---

१ टीपः—दोहद हा गुजराथेंतील पंचमहाल जिल्ह्यांतील तालुक्याचा व मुंबई बडोदें रेलवेच्या, गोध्रा-रतलाम लाईनीच्या रेल्वेस्टेशनचा गांव, बडोद्याच्या ईशान्येस ७७ मैलांवर व गोध्र्यापासून ४३ मैलांवर दाधीमती नदीवर असून तेथें एक लहानसा किल्ला आहे. माळवा प्रांताची पूर्व व गुजराथ प्रांताची पश्चिम सरहद्द यांच्या हद्दीवर हा गांव असल्यानें “ दो-हद्द ” यावरून दोहद हें नांव पडलेलें आहे. मध्यहिंदुस्थानांतून समुद्रमार्गाच्या पायरस्त्यानें चालणाऱ्या व्यापारी दळणवळणाच्या मुख्य रस्त्यावरील दोहद हें विशेष महत्वाचें व्यापारी नाकें आहे. येथें गोध्रा रस्त्यावर असलेला “ छाब तलाव ” व दोन मशीदी पाहण्यासारख्या आहेत. अवरंगझेबाची ही जन्मभूमी असल्यानें या शहरावर त्याचें अखेरपर्यंत विशेष प्रेम होतें.

मौलवींच्या मदतीनें त्यानें दोन लाख रुपयांवर खर्च करून "फतवा-ई-आलमगिरी" या नांवाच्या मुसलमानी कायद्याचा एक महत्वाचा व मौल्यवान् ग्रंथ स्वतः तयार केला होता. धार्मिकसंबंधांत तो विशेष आग्रही होता; पण स्वतःच मुळीं फकीरासारखा वागत होता व धर्माच्या सबबीवर त्यानें अनेक जुलूम केले असले तरी क्रूरपणा केला नव्हता. त्याचा पोषाख व वृत्ति अतिशय साधी होती. तो विशेष धर्मनिष्ठ होता व त्यानें इ० सन १६३५ मध्यें आपल्या वयाच्या १७ व्या वर्षींच ईश्वरप्रार्थनेकरितां "शिल्पकलेचें एक अद्वितीय रत्न" अशी "मोतीमशीद" १६,००००० लाख रुपये खर्च करून बांधिली होती. या मशीदीमध्यें तो दर शुक्रवारीं मेळ्यानें शुभ्र व साध्या पोषाखांत येऊन प्रार्थना करीत असे. तो कधींही उच्च आसनावर बसत नसे. सोन्याचांदीचीं भांडीं अथवा मौल्यवान् वस्त्रें वापरीत नसे. रमजान महिन्यांत दररात्रीं सहा वाजेपासून नऊ वाजेपर्यंत स्वतः कुराण वाचीत असे व दररोज पांचवेळां नमाज पढणें तर कांहींही झालें तरी तो टाळीत नसे; व त्यामुळेंच त्याचा वडील भाऊ दारा हा त्याला उपहासानें "निमाझी" असें ह्मणत असे. अवरंगझेबाचा दरारा व न्यायप्रियता विलक्षण होती. त्याचें अगदीं उतारवय झालें तरी डोळ्याला चष्मा न लावितां तो लोकांचे अर्ज स्वतः वाचून त्याच्यावर शेरे करीत होता. खरा प्रकार बाहेर काढून अन्यायी मनुष्यास शिक्षा करीत होता. चौकशी सुरू असतां खरा प्रकार शोधून काढण्यासाठीं तो हकीकत सांगणाराला पाहिजेतसे हातवारे करून हवें तें बडबडण्यास परवानगी देत होता. त्यांना त्यावेळीं "सभ्यपणाची" सबब दाखवून बोलण्यांत कोणींहि अडथळा आणिलेला त्यास खपत नव्हता, आणि अशा रीतीनें स्वतः सारखें काम करीत राहण्याचा त्यास बिलकूल कंटाळा आला नव्हता. सतत सतरा वर्षे तो मराठ्यांना रसातळास पोहोंचविण्याचा अट्टाहास करीत होता, पण अखेरपर्यंत त्याची प्रारंभींचीच तडफ कायम होती. त्याचें वय वृद्ध होतें; तो स्वतः तरुण होता; या वयांतही प्रत्येक गोष्ट तो स्वतः करीत असे. युद्धाची व्यवस्था तो स्वतः पहात असे. मराठ्यांशीं झगडतांना अनेक संकटें सोसूनही त्याचा धैर्यमेरू अढळ असे; आणि युद्धविषयक बाबती करीत असतांनाही इतर एकंदर राज्यव्यवस्था तो स्वतःच इतकी कसोशीनें पहात असे कीं, त्याच्या आज्ञेशिवाय राज्यांत कोणतीही साधारण गोष्ट सुद्धां घडत नसे. "प्रत्येक गोष्ट स्वतः करावयाची" व "स्वतःच्या आज्ञेनेंच घडावयाची" या अवरंगझेबाच्या राज्यपद्धतीमुळें त्याच्या कारकीर्दींत इतर कोणाच्याही कर्तृत्वाला वाव मिळाला नाहीं. त्यामुळें त्याचें राजयंत्र निस्तेज व निर्बळ हुकूम बजावणारें राहिलें, ही गोष्ट खरी; पण त्यामुळें तो अलौकिक बुद्धिमान् पुरुष नव्हता, असें ह्मणणें मात्र केव्हांही खरें ठरणार नाहीं. अवरंगझेब हा न्याय देतांना आपला धार्मिक आग्रह बाजूस ठेवीत होता, अशाबद्दल अवरंगझेबाची एक विशेष महत्वाची सनद उपलब्ध आहे. यासंबंधीं इतिहाससंग्रहांत विशेष खुलाशानें विवेचन केलेलें आहे; परंतु स्थलाभावामुळें त्या सनदेचा

सारांश मात्र याठिकाणीं दिला आहे, तो येणेंप्रमाणेः—" बादशाही कृपेस व दर्शनास पात्र जो अबुलहसन यानें बादशाही औदार्यावर दृष्टि देऊन असें जाणावें कीं, आमच्या हृदयांत जी सहानुभूति व जें औदार्य वसत आहे, तेणेंकरून आमचे अखिल परिश्रम आणि सर्व सद्धेतू प्रजेचें कल्याण करावें, आणि लोकांची स्थिति सुधारावी ह्यांमध्यें गढून गेलेलें आहे. ह्मगून आमच्या पवित्र धर्मास अनुसरून आह्मी असा ठराव केला आहे कीं, ( हिंदूंचीं ) जुनीं देवालयें पाडून टाकावयाचीं नाहींत आणि नवीं बांधूं द्यावयाचीं नाहींत; आमच्या न्यायी राज्यांत आह्मांस असें जाहीर झालें आहे कीं, कांहीं दुष्ट व मत्सरी लोकांनीं बनारस येथील व आसपासच्या दुसऱ्या कांहीं ठिकाणच्या हिंदू लोकांस फार त्रासवून सोडिलें आहे, आणि देवालयांचे संरक्षक जे कित्येक ब्राह्मणलोक आहेत त्यांना देवालयांतून घालवून देण्याचा प्रयत्न चालविला आहे. ह्या जुलमामुळें सर्व हिंदुलोकांमध्यें फार हाहाःकार झाला आहे; ह्मणून आह्मी तुह्मांस अशी आज्ञा फर्मावितों कीं, ह्यापुढें कोणीहि इसमानें ब्राह्मणांस किंवा दुसऱ्या हिंदू रहिवाशांस कोणत्याही प्रकारें त्रास देऊं नये, किंवा त्यांच्या धर्मास हरकत करूं नये; एवढेंच नव्हे तर त्यांनां त्यांच्या वृत्तीचा शांततेनें उपभोग घेऊं द्यावा, आणि आमच्या ईश्वरदत्त आणि चिरकाल टिकणाऱ्या राज्याबद्दल परमेश्वराजवळ अहर्निश अभीष्ट चिंतन करूं द्यावें, हें काम फार महत्वाचें आहे, असें समजावें. चंद्र १५ जमादिसानी सन १०६४ " यावरून धार्मिक बाबतींत तो आग्रही असला तरी न्यायी होता असें उघड होतें.

बादशहा अमलगीर हा प्रोफेसर सरकारच्या शब्दांत ह्मणावयाचें ह्मणजे " हट्टी, दुराग्रही, व संशयी असा असूनही थोरपणा मिळवून देणारे कित्येक सद्गुण त्याच्याठायीं वसत होते शिक्षक, सेनापती, वजीर अथवा धर्मशास्त्रज्ञ अशा प्रकारच्या एखाद्या कामाला तो फार योग्य होता; परंतु मनुष्याच्या अंतःकरणावर अंमल करण्याचें जें राजाचें काम त्यास तो मुळींच लायक नव्हता. त्याचें खाजगी वर्तन साधें व पवित्र होतें; त्यास उद्योगाची आवड होती. चैन व ऐषआराम त्यास नको असत. " पिकलेल्या केसाचा वृद्ध बादशहा दररोज दरबार भरवून काम करितो, लोकांचे अर्ज घेऊन स्वतः वाचितो, आणि स्वहस्तानें त्यावर शेरे करून त्यांचा निकाल करितो. हा प्रकार पाहून युरोपियन प्रवाशांना धन्यता वाटली. " अवरंगझेबाचीं स्वतःचीं सुमारें दोनहजार पत्रें उपलब्ध आहेत. नियमांची व हुकूमांची अंमलबजावणी तो अगदीं कसोशीनें करीत असे, आणि " एक नियम मोडूं दिला कीं, लागलींच लोक सर्वच नियम मोडूं लागतात " असें तो ह्मणत असे. तथापि या नियमांची अंमलबजावणी करितांना त्यानें त्यांच्या खऱ्या हृद्गताकडे लक्ष पुरविलें नाहीं. प्रत्येक गोष्ट स्वतः करण्याच्या त्याच्या हौसेमुळें त्याचे

अंमलदार केवळ यंत्रासारखे बनले. त्यांची स्वतःची हुषारी बाहेर येण्यास अवकाश राहिला नाहीं. त्याचे मुलगे बुद्धिवान् होते, तरी बापाच्या संशयी स्वभावानें त्यांच्या अंगची हुषारी व तरतरी पार नाहींशी झाली. अवरंगजेयाचें अंतःकरण कठोर होतें. त्यास दयेचा पाझर फारसा फुटत नव्हता. शरण आलेल्या शत्रूस उदारपणानें वागविणें, किंवा खाजगी व्यवहारांत मनमिळाऊपणानें लोकांत मिसळणें ह्या अकबराच्या गुणांचा अवरंगजेबास बिलकूल संपर्क नव्हता. त्याच्या कपटी स्वभावामुळें त्याच्यावर कोणाचीही भक्ति बसली नाहीं. कितीही चांगला मनुष्य त्याच्याजवळ आला तरी त्याची चित्तवृत्ति पार गारठून गेल्याशिवाय रहात नसे. ललितकलांस त्यानें हद्दपार केल्यामुळें, आनंदाचा व्यवसाय असा त्यास कांहींही राहिला नाहीं; आणि लोकांच्या सुखदुःखांचीही त्याला कधीं पर्वा वाटली नाहीं. त्यामुळें सगळें जीवन त्यास निरस झालें. सारांश आपल्या राज्याच्या नाशाची संपूर्ण तजवीज त्यानें आपल्या पन्नास वर्षांच्या कारकीर्दींत उत्तमप्रकारें करून ठेविली." अशा प्रकारचा मोंगली साम्राज्यांतील हा शेवटचा बलाढ्य, कर्तृत्ववान्, पण हट्टी व आग्रही बादशहा,—जगांतील एका अत्यंत बलाढ्य राष्ट्राचा शेवटचा महासमर्थ, कर्तबगार व तेजस्वी बादशहा, स्वतःसह चौदा भावंडांपैकीं आतां एकटाच जिवंत राहिलेला आपण आपल्या पित्याची जी दशा केली, तीच आपलीं मुलें आपलीही करतील या संशयांत व भीतींत अखेरच्यावेळीं एकही मुलगा आपणाजवळ न येऊं देतां अत्यंत निराशेंत व क्लेशांत आयुष्याच्या शेवटच्या मजलेस येऊन पोहोंचलेला दुर्दैवी, दुःखी व दुबळा बनलेला बादशहा—अवरंगजेब ऊर्फ आलमगीर हा आपल्या वयाच्या ८९ व्या वर्षी व आपल्या कारकीर्दीच्या ५० व्या वर्षी इ० सन १७०७ मध्यें, फेब्रुआरी महिन्याच्या ता० २० शुक्रवार रोजीं, "महत्वाकांक्षेच्या धुराइतकी रोगकारक व सर्वस्व-नाशकारक अशी जगांत दुसरी कोणतीही विषारी हवा नाहीं" असें ह्मणत, मुलांमुलांतील भावी यादवीच्या भीतींत व इतर अनेक विवंचनेंत प्राण घुटमळत अखेरीस मृत्युपंथास गेला! आणि त्याच्या निधनानंतर पन्नास वर्षांच्या आंतच "मोंगल बादशाही" पूर्वीच्या बड्या नांवाची एक निव्वळ पडछाया बनून ही पुढें लवकरच नामशेष होऊन गेली.

अवरंगझेबाच्या योग्यतेसंबंधीं लेन-पूल यानें जें विवेचन केलें आहे, त्यांत तो ह्मणतो कीं, "शहाजहान यानें अवरंगझेबाच्या प्रतिबंधांत पडल्यावर आपली तरवार त्याच्याकडे पाठवून दिली. तिच्यावर "आलमगीर" हा फारशी शब्द कोरलेला होता. तेंच नांव त्यानंतर अवरंगझेबानें स्वीकारिलें; व त्याच नांवानें मुसलमान लोक त्यास ओळखितात. "कडकडीत धर्माचरण" हेंच अवरंगझेब हा आपलें मुख्य कर्तव्य

समजत असे; व त्यापुढें संसारसुखाची त्यानें यत्किंतही पर्वा केली नाहीं. त्याचीं सर्व कृत्यें धर्मप्रेरित होतीं; गाणेंबजावणें, नाचतमाशे, खाणेंपिणें, कपडालत्ता, अत्तरगुलाब, अशा प्रकारचे विलास त्यानें कधींही भोगिले नाहींत; व मांस–मद्यास तर त्यानें कधींच स्पर्शसुद्धां केला नाहीं. इ० सन १६६५ मध्यें एक महिनाभर एक धूमकेतू उगवला होता, त्या अवधींत दररोज फक्त थोडेंसें पाणी व लहानसा भाकरीचा तुकडा खाऊन तो राहिला. तो नेहमीं जमिनीवर व्याघ्रांबर टाकून त्यावर निजत असे; प्रत्येकानें स्वतः काम करून आपलें पोषण करावें, ही इस्लामधर्माची आज्ञा पाळण्याकरितां, तो स्वतः आपल्या हातानें डोक्याच्या पातळ टोप्या करून विकत असे. त्याला सर्व कुराण तोंडपाठ येत होतें. ह्या सर्व गोष्टी त्यानें राज्य संभाळण्याकरितां केल्या असें नाहीं. त्यानें आपले सर्व प्रतिस्पर्धी अगोदरच नाहींसे करून टाकिले होते. तेव्हां धर्माचरण बाजूस ठेवूनही त्याचें राज्य जहांगीर–शहाजहान यांच्याप्रमाणेंच चैनींत चालण्यास कोणतीच हरकत नव्हती; इतकेंच नव्हे तर धर्मशास्त्र बाजूस ठेवून केवळ व्यवहारनीतीकडे दक्षतेनें लक्ष दिल्यानेंच अकबराची भरभराट झाली होती. अकबराचे सारासार विचार, जहांगीरची विषयवासना किंवा शहाजहानचा ऐषआराम, ह्यांचा स्वीकार करण्यास अवरंगझेबास स्वतःच्या मनाशिवाय दुसरी कांहींएक आडकाठी नव्हती. हिंदुंना तर असला खडतर धर्मनिष्ठ राज्यकर्ता नको होता. अवरंगझेब रजपूतांच्या वाटेस गेला नसता, तर आपण होऊन, त्याच्यावर शस्त्र धरण्याची बुद्धि त्यांनां कधींच झाली नसती. अवरंगझेबाच्या ठिकाणीं दुसरा कोणी असता तर असा भलताच खटाटोप करण्याच्या नादास तो कधींही पडला नसता. बाप व आजा यांच्यासारखी चैन करून दिवस काढणेंच त्यास जास्त पसंत पडलें असतें. परंतु केवळ धर्माच्या बाबतींतील मानसिक समाधानाकरितांच तो सर्वस्वाचाही त्याग करण्यास तयार झाला. ही गोष्ट मोंगलांच्या इतिहासांत अगदींच अपूर्व अशी घडलेली आहे. अवरंगजेब निर्बुद्ध नव्हता; आपण काय करितों, आणि त्याचे परिणाम काय होतील, हें समजण्याची त्यास अक्कल होती. गादीवर आला त्या वेळेस तो पोरवयांत नव्हता. त्यावेळीं त्याचें वय चाळीस वर्षांचें असून, त्यानें राज्याच्या हरएक बाबतींत अनुभव मिळविला होता. असें असून हिंदूंचीं मनें दुखवून त्यांच्या धर्माचा पाडाव करणें ज्यांच्या पराक्रमावर सगळ्या लष्कराची भिस्त अशा शियापंथीं प्रबळ सरदारांना नाराज करणें, दरबारांतील हरएक आनंद व करमणूक नाहींशी करून सर्व दरबारी लोकांचें आयुष्य रुक्ष करणें, ह्या गोष्टी केल्यानें आपल्या राज्याचा नाश होईल, ही गोष्ट अवरंगझेबासारख्या बुद्धिमान् मनुष्याच्या लक्षांत आली नसेल असें नाहीं. परंतु हें सर्व समजूनच त्यानें आपली कर्तव्यमर्यादा ठरविली आणि ती अखेरपर्यंत केव्हांही ढळूं दिली नाहीं. इ० सन १६५६ मध्यें तो दक्षिणेंतून राज्य मिळविण्यासाठीं निघाला, त्यावेळेस जो उद्देश त्याच्या

मनांत होता, तोच उद्देश अखेर अहंमदनगर येथें त्याच्या मृत्युसमयींही कायम होता. त्यास सारासारविचार करण्यास जागाच नव्हती. "माझ्या मनानें घेतलें, मी करणार." या हट्टावर त्याचें सर्व कांहीं चालत असे होतें, आणि हा त्याचा निश्चय अखेरपर्यंत अढळ होता. अवरंगझेबासारखे शूर व धीर पुरुष थोडेच निपजले; कसेंही संकट आलें तरी तो आपल्या अंगीकृत कार्यांतून केव्हांही परावृत्त होत नसे. राज्यप्राप्तीच्या वेळेस त्यानें केलेलीं क्रूर कृत्यें वगळलीं तर न्यायाच्या बाबतींत इस्लामी कायद्याप्रमाणें त्यास दोष लागण्याजोगें यत्किंचितही कृत्य त्याच्या हातून घडलें नाहीं; आणि प्रत्यक्ष शत्रूंनींसुद्धां त्याच्या न्यायप्रियतेची स्तुति केलेली असून राव अथवा रंक या उभयतांनाही समान दृष्टीनें वागविल्याशिवाय तो कधींही राहिला नाहीं." अवरंगझेबाच्या स्वभावाचें वरील विवेचन लक्षांत घेऊन त्या अनुरोधानें त्याच्या एकंदर जीवनक्रमाचें निरीक्षण केलें म्हणजे त्याच्या आयुष्यांत अनेक विध्वंसक गोष्टी कां घडून आल्या व त्या घडवून आणण्यास तो स्वतःच उघड्या डोळ्यांनीं कां प्रवृत्त झाला, याचें मर्म समजून येतें, आणि आपला नाश होणार हें माहीत असूनही शियापंथी प्रबळ अफगाण सरदार, रजपूत व मराठे यांच्याशीं तो शत्रुत्वानें कां वागला व अखेरपर्यंत तेंच धोरण त्यानें कां कायम ठेविलें, याचें रहस्य सहज लक्षांत येतें.

बादशहा अलमगीर हा फ्रान्सचा बलिष्ट व अरेरावी बादशहा चवदावा लुई याचा समकालीन होता. या उभयतांची तुलना करितांना लॉयल यानें आपल्या पुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, ... ...सतराव्या शतकाच्या दुसऱ्या अर्धभागामध्यें ज्या दोन सुलतानी राज्यकर्त्यांनीं म्हणजे अवरंगझेब आणि चवदावा लुई यांनीं हिंदुस्थान आणि फ्रान्स ह्या दोन देशांमध्यें आपला अंमल गाजविला, त्या दोघांच्याही कारकीर्दीचा काळ बहुतेक एकच होता; कारण त्या उभयतांची गादीवर बसून प्रत्यक्ष राज्य चालविण्याची वेळ साधारणतः अगदीं जवळ जवळ होती. अठराव्या शतकांत फार थोडया वर्षांच्या अंतरानेंच ते उभयतां मृत्यु पावलेले आहेत, आणि ज्या पद्धतीनें हे दोन्हीही नामांकित राज्यकर्ते स्वतः राज्य चालवीत, ती पद्धत व तिजमुळें घडून आलेले अनिष्ट परिणाम यांमध्येंही काल्पनिक साम्यापेक्षां पुष्कळच अधिक साम्य आहे. ज्यावेळीं अवरंगझेब व चवदावा लुई हे गादीवर बसले त्यावेळीं त्यांच्या घराण्याचें वैभव व कीर्ति हीं अमर्याद वाढलेलीं होतीं; आणि त्या उभयतांनींही देश जिंकणें, व आसपासच्या निर्बळ राज्यांवर बेधडक हल्ले करणें, असा वर्तनक्रम सुरू केलेला असून पहिल्या पहिल्यानें त्यांत त्यांना यशही आलें. पण अविचाराच्या व बहुतेक निरर्थक लढायांमुळें त्यांनीं आपल्या राज्याचें वैभव आणि आपल्या घराण्याचा चिरस्थायीपणा ह्यांचा हळुहळू नाश करून घेतला. धर्मवेडेपणा-

मुळें आपल्या स्वतःच्या प्रजेची गांजणूक, स्थानिक संस्थांचा नायनाट करून अवजड अधिकारीसत्तेचें एकीकरण, अनीतीचा सुळसुळाट, धर्मवेडे खिजमतगार आणि नीच सल्लामसलतगार यांनीं घेरलेला थाटमाटाचा दरबार, हीं मोंगल आणि बोर्बोन घराण्याच्या राज्यकारभाराचीं ठळक लक्षणें होतीं. प्रत्येकाच्या बाबतींत परदेशांतील लोकांशीं दुर्दैवानें कराव्या लागणाऱ्या लढाया, निरनिराळ्या पंथांतील लोकांचीं बंडें आणि पैसे उकळण्याकरितांच प्रजेवर केलेले जुलूम, यांनीं गुंतागुंत झालेल्या अर्धशतकाच्या झोटिंगपादशाहीनें प्रजा फार विपन्नावस्थेंत आणिली; आणि त्यामुळें राजसत्तेच्या वर्मी घाव बसून तीही कमजोर झाली. सतराव्या शतकाच्या अखेरीच्या सुमारास दग गोळा होण्याला सुरवात झाली, आणि अठराव्या शतकाच्या प्रारंभापासून दोन्हींही राष्ट्रांच्या भाग्याला उघड उघड उतरती कळा लागली. ह्याचा परिणाम असा झाला कीं, ह्या दोन्हीही राष्ट्रांचा ऱ्हास अगर त्यांना हें लागलेलें ग्रहण ब्रिटिश राष्ट्राच्या वाढत्या व्यापारी वर्चस्वाला—अत्यंत फायदेशीर झालें. इ० सन १६९१ मध्यें वुइल्यमराजानें जर्मनींतील संस्थानें, आणि दर्यावर्दी राष्ट्रांपैकीं इंग्लंड, हॉलंड व स्पेन यांच्याशीं गट्टी करून फ्रान्सविरुद्ध एक मोठा कट उभा केला. त्यामुळें फ्रेंचांच्या वाढत्या वजनाला आळा बसला, आणि त्यांचे व्यापार व वसाहती वाढविण्याचे बेत एका बाजूला भिरकाविले गेले; अगर युरोपमध्यें सुरू झालेल्या जंगी लढाईंत पायाखालीं तुडविले गेले; कारण जरी रिस्विकच्या तहामुळें कांहीं वर्षे वैरभाव बंद झाला, तरी असें म्हणतां येईल कीं, इ० सन १६९० पासून इ० सन १७१३ पर्यंत बहुतेक सर्व काळ फ्रेंचांची राजसत्ता युरोपांतील आपल्या आसपासच्या सर्व राष्ट्रांबरोबर अतिशय खर्चाच्या व मोठमोठ्या प्रमाणाच्या लढायांत पूर्णपणें गुंतून गेलेली होती. परंतु मोंगल राष्ट्राची स्थिति तर याहूनही अधिक शोचनीय झालेली होती. सतराव्या शतकामध्यें जोंपर्यंत मोंगली बादशाहींत जोम होता, तोंपर्यंत कोणत्याही परकीय साहसी मनुष्याला हिंदुस्थानांमध्यें निव्वळ मेहेरबानीनेंही अनिश्चित असाच थारा मिळत असे. परंतु अठरावें शतक सुरू झालें तेव्हां बादशाही राज्याच्या अव्यवस्थेचा स्पष्ट रीतीनें जवळ जवळ कळसच झालेला होता. अवरंगझेबाचें उतारवय, त्याच्या जुलूमाविरुद्ध हिंदुलोकांनीं नेटानें केलेलें आणि स्पर्शजन्य रोगासारखें फैलावत गेलेलें बंड, त्याचा मृत्यु हीच इशारत असें समजून त्याच्या मुलांमध्यें आपआपसांत होणाऱ्या भावी यादवींचा निश्चितपणा, लढाईच्या परिणावरच निव्वळ अवलंबून असलेलें बादशाही तख्त, सांपत्तिक अडचणी, आणि चोहोंकडे स्पष्ट दिसून येणारी राज्यकारभाराची झालेली विस्कळित घडी—हीं सर्व पूर्वेकडील हिंदुस्थान देशांतील मोंगली राजघराण्याच्या दौर्बल्याचीं, ऱ्हासांचीं आणि जवळ जवळ नामशेष होण्याचीं साधारणतः चिन्हें होतीं, असें

ह्मणण्यास हरकत नाहीं. वायव्येकडील इराणी आणि घंडखोर अफगाण टोळ्यांनीं अवरंगझेबापासून त्याचे सरहद्दीवरील किल्ले ह्यावेळीं हिसकावून घेतले होते. त्या सर्व महत्वाच्या असलेल्या सरहद्दींवरील त्याचा ताबा असुरक्षित झालेला होता; मध्यआशियांतून स्वाऱ्या करणारांना हे रहदारीचे मार्ग पुन्हां मोकळे झाले होते; आणि नैऋत्येकडे विजापूर व गोवळकोंडें ह्या राज्यांचा अवरंगझेबानें नाश केल्यानंतर त्याच्याच गैरमुत्सद्दीपणाच्या विध्वंसक पद्धतीमुळें मोकळे सुटलेल्या दंगेखोर लोकांना दाबांत ठेवण्याला पूर्ण समर्थ होईल, अशी राज्यव्यवस्थेची घडी पुन्हां बसविण्याला तो अगदींच असमर्थ झालेला होता. पांगलेले सैनिक, नागावलेले शेतकरी, व असंतुष्ट हिंदू जमीनदार, हे सर्व मराठे सरदारांच्या निशाणासभोंवतीं गोळा झाले. मराठा सेनानायकांनीं बादशाही सरदारांना कधीं लांच देऊन तर कधीं दशहत बसवून मुलूख उध्वस्त केले. जमाबंदी वसुलाचा रस्त्यांतच फन्ना उडविला, व बादशाही सैन्याचा पूर्णपणें पराभवही केला. अवरंगझेबाच्या ह्या पुष्कळ वर्षांच्या कारकीर्दींतील चोवीस वर्षें ( इ० सन १६८३ पासून इ० सन १७०७ पर्यंत ) तो आपल्या राज्याच्या नैऋत्य दिशेच्या सरहद्दीवर अहमदनगर येथें आपल्या वयाच्या ८९ व्या वर्षीं मरेपर्यंत स्वतः सेनानायकाचें काम करीत होता. दिल्लीचा बादशहा अवरंगझेब आणि रोमचा बादशहा मार्कस ओरोलियस ह्या दोन राज्यकर्त्यांप्रमाणें वर्तनानें तंतोतंत जुळणारे दोन राज्यकर्ते क्वचितच सांपडतील. त्यामुळें चौदा वर्षें सतत सरहद्दीवर लढाया केल्यानंतर पार्थियन लोक पूर्वेकडील प्रांतांत शिरण्याची भीति घालीत असतां, आणि रानटी लोकांच्या टोळ्या डॅन्यूब नदीवर सैन्याला त्रास देत असतां व्यानोनियामधील आपल्या छावणींत मरत पडलेल्या या रोमन बादशहाची ह्या प्रसंगीं आठवण झाल्यावांचून रहात नाहीं. आणि वर दर्शविलेले हे सर्व अंतस्थ घोटाळे, ह्मणजे मोंगली राष्ट्राच्या होऊं घातलेल्या वाताहतीचीं, आणि राजकीय वातावरणांत मोठें स्थित्यंतर घडून येण्याचीं उघड उघड पूर्व चिन्हेंच होतीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं. " आणि अवरंगझेबानेंच मोंगली साम्राज्याच्या भावी नाशाची जीवंतपणींच तयारी करून ठेविल्यामुळेंच तें साम्राज्य त्याच्या मृत्युनंतर लवकरच नामशेष होऊन गेलें, असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं. तथापि मरेपर्यंत त्याचा साधेपणा कायम होता, व आपल्या मृत्युनंतरही आपल्या देहाचा साधेपणा कायम रहावा, अशी त्याची इच्छा होती. आपला अंत्यविधि डामडौलानें न करितां अत्यंत साधेपणानें करावा अशी त्यानें आज्ञा केली होती, आणि त्याकरितां स्वतःच्या हातानें लिहिलेल्या कुराणाच्या प्रती विकून मिळविलेल्या रकमेंतून पांच रुपये खर्च करण्याविषयीं त्यानें अंतकाळीं इच्छा प्रदर्शित केली होती; त्याप्रमाणें अत्यंत साधेपणानें त्याचा अखेरचा विधि करण्यांत येऊन त्याचे शव दौलताबादनजीक सहा मैलांवर रोझा येथें सेख झेनुद्दिन

या प्रसिद्ध साधूच्या कबरी शेजारीं त्यानें स्वतः अगोदरच बांधून ठेविलेल्या आपल्या कबरींत पुरण्यांत आलें. त्यानें स्वतः श्रम करून मिळविलेले ८०५ रुपये आपल्या मृत्युनंतर गरीब लोकांस वांटण्याकरितां जतन करून ठेविले होते, तेही त्याच्या इच्छेप्रमाणें खैरात करण्यांत आले, व अशा अत्यंत साध्या रीतीनें जगांतील या महान् बादशहाचा, मानवी आयुष्यांतील शेवटचा विधि पूर्णतेस नेण्यांत आला.

बादशहा अलमगीर याच्यासंबंधीं वर लिहिलेल्या हकीकतीवरून कोणाच्याही हें लक्षांत येईल कीं, तो अत्यंत हुषार, कर्तृत्ववान् व सर्व मोंगल बादशहांमध्यें विद्वान् होता; पण त्याप्रमाणेंच तो अत्यंत हट्टी होता. पराकाष्टेचा निश्चयी होता. दगडासारखा घट्ट मनाचा होता; मोडेन पण वांकणार नाहीं, अशा दुंडेल प्रवृत्तीचा होता; आणि अनेक आपत्तींच्या तुफानांतून न डगमगतां मोठ्या शांतपणानें आपला मार्ग काढीत तो पुन्हां आपल्या हट्टाच्या व निश्चयाच्या पायरीवर बेफिकीरपणानें येऊन उभा रहात होता; स्वतःचें बरेंवाईट तो जाणून होता. राज्याचें कल्याण अकल्याण त्याला माहीत होतें. स्वतःच्या विध्वंसक राज्यपद्धतीची कर्दनकाळी मूठ उलट घेऊन ती आपला, आपल्या घराण्याचा आणि आपल्या राज्याचा नाश करील हें त्याला पूर्णपणें समजत होतें; आणि आपल्या मृत्यूनंतर अधिकारप्राप्तिकरितां बादशाही डोलाऱ्यासभोंवतीं नंग्या तरवारीच्या तालावर "हायदोस" चा खडा नाच दिवसाढवळ्या राजरोस सुरू होऊन मोंगली बादशाहीच्या ठिकऱ्या उडतील, हें त्याला पूर्णपणें कळत होतें, पण अकबर, जहांगीर व शहाजहान यांच्याप्रमाणें उदारपणानें वागून, कोणाच्याही सहानुभूतीचा व मदतीचा "भिकेचा जोगवा"—तो इस्लामी धर्माचा कट्टा अभिमानी असल्यानें—घेणें त्याला पसंत नव्हतें. त्यामुळें आपण करितों ती प्रत्येक विध्वंसक गोष्ट राजकीयदृष्ट्या असमर्थनपर व चुकीची आहे, असें त्यास पूर्णपणें माहीत असूनहि त्याबद्दल तो पूर्ण बेफिकीर होता व अभिमानानें व अहंकारानें पुनःपुनः अखेरपर्यंत त्याच मार्गाचें तो अवलंबन करीत राहिला होता. "सुख" हें नेहमींच मानण्यावर व मानून घेण्यावर अवलंबून असतें; व भिन्नरुचि व मतवैचित्र्य यामुळें सुखाची व्याख्याही निरनिराळी ठरते; ह्मणून व्याघ्रचर्मावर निजणें, पांढरे शुभ्र व साधे कपडे वापरणें, चांदीसोन्याचीं भांडीं, दागदागिने, व जडजवाहिर यांचा त्याग करणें, अत्यंत शुद्ध व साधें अन्न खाणें, धार्मिक बाबतींत कर्मठपणानें वागणें, उच्चासनावर न बसणें, सतत काम करीत राहणें स्वतः कष्ट करून, व कुराणाच्या नकला व टोप्या करून पैसे मिळविणें, वगैरे अनेक गोष्टींबद्दल अवरंगझेबास दोष देणें योग्य होणार नाहीं; उलट दिल्लीचें अलौकिक बादशाही वैभव त्याच्या पायाशीं लोळत असतां कोणत्याही मोहास बळी न पडतां त्यानें आपला जीवनक्रम इतका साधा ठेविला होता, इतकेंच नाहीं तर आपल्या मनाचा खंबीरपणा कायम

ठेवून तो अखेरपर्यंत तशाच फकीरी बाण्यानें वागत होता, याबद्दल त्यास धन्यवादच दिला पाहिजे; आणि वैभवाचा त्याग करणें किती कठीण असतें, याचा विचार केला ह्मणजे तर "त्याच्या सारखा तोच" असें ह्मणून त्याची धन्यच होय, असेंच ह्मटलें पाहिजे.

बादशहा आलमगीर व छत्रपति संभाजी यांचें परस्परविरोधी असें चमत्कारिक साम्य आहे. संभाजीनें मुसलमानी धर्माचा स्वीकार न करितां हिंदुधर्माच्या अभिमानानें स्वदेहाचा त्याग केला, आणि अवरंगझेबानें त्यास मुसलमानी धर्माचा स्वीकार न केल्यामुळें ठार मारिलें; ह्मणजे स्वधर्माकरितां मृत्यूच्या यातना संभाजीस एकदांच भोगाव्या लागल्या व त्या अवरंगझेबासही त्याला एकदांच भोगवितां आल्या; पण त्याच अवरंगझेबानें स्वधर्माच्या अभिमानानें जीवंतपणींच आपलें आयुष्य सारखें यातनामय व मृत्युमय करून स्वदेहाचा जीवंतपणींच यज्ञ केला. अर्थात् अशा अवरंगझेबाकडून संभाजीचा वध झाला हें आश्चर्य नाहीं. तो स्वार्थी नव्हता, धर्मार्थी होता. स्वतःचें राज्य, इतकेंच नव्हे तर स्वतःचा जीवही तो धर्माकरितां नष्ट करून घेण्यास तयार होता, "धर्म" हाच सर्वांत श्रेष्ठ आहे असें त्याचें मत होतें. आणि आपल्या अभिजात स्फूर्तीच्या या धार्मिक दिव्यांतून यशस्वीपणें बाहेर येण्याला तो केव्हांही आत्मयज्ञ करण्यास तयार असल्यामुळें, त्यानें आपल्या धार्मिक यज्ञकुंडांत संभाजीचा बळी घेतला, हेंही त्याच्या आचरणाप्रमाणें योग्यच होतें. संभाजी ईस्लामी धर्म स्वीकारिता तर अवरंगझेबानें त्याचा वध केला नसता; पण दोन सारख्या हट्टी व परस्पर विरुद्ध धर्माच्या पूर्ण अभिमानी बलिष्ठांच्या चिकाटीच्या स्पर्धेत कमताकद ठरणारा प्रतिस्पर्धी अखेरच्या वेळीही आपल्या शत्रूपुढें वांकला नाहीं तर मेला तरी पाहिजे, हें ठरलेलेंच आहे; आणि त्याप्रमाणेंच संभाजीचा मृत्यु घडून आला असून अवरंगझेब व संभाजी या उभयतांचीही आपआपल्या उज्वल धार्मिक अभिमानाबद्दल तारीफच केली पाहिजे; अवरंगझेबाचें हट्टी वर्तन राजकीय दृष्ट्या चुकीचें होतें; पण तें सुसंगत व प्रामाणिक होतें. त्यांत विसंगतपणा नव्हता. काळ, वेळ व प्रसंग पाहून आपल्या वर्तनाला वळण देऊन वागण्याचें त्याच्या कधीं स्वप्नांतही आलें नव्हतें, आणि मरेपर्यंत, त्याचा कठोर हट्ट खडतर निश्चय व कडवा धर्माभिमान तंतोतंत कायम राहून त्यांत कायम राहून त्यांत तिळमात्रही फरक झाला नव्हता. या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या ह्मणजे अवरंगझेब हा खरोखरच एक अलौकिक पुरुष निर्माण होऊन गेला, असेंच कोणासही निराभिमानानें कबूल करावें लागेल हें उघड आहे.

अवरंगझेबाच्या कारकीर्दीचा मराठ्यांच्या दृष्टीनें या ठिकाणीं थोडक्यांत विचार करावयाचा ह्मणजे, याच काळांत मराठे जोरांत येण्यास सुरवात झाली. याच काळांत

त्याच्या वर्चस्वास, आणि अवरंगझेबाला त्रासवून व त्याच्याशीं युद्धसंग्राम करून स्वराज्याचें लोण त्यांच्या जवळून हिसकून घेऊन, आणि मराठा साम्राज्यरूपी राष्ट्रपुरुष आपलें बाळसें टाकून सारख्या वाढ्यावाढीनें मोठा होत जाण्यास प्रारंभ झाला; आणि ही गोष्ट अवरंगझेबाच्या कठोर करणीमुळेंच फार लवकर घडून आली, असेंच पुढील काळांत निदर्शनास आलें.

हिंदुस्थानींतील अवरंगझेबाच्या काळापर्यंतचा मोंगल साम्राज्याचा त्रोटक इतिहास वर लिहिल्याप्रमाणें आहे. मोंगल बादशाही जुलमी, स्वेच्छाचारी व अन्यायी होती. प्रजेचें जीवित, मालमत्ता व स्वातंत्र्य हीं तीन्हींही मोंगली साम्राज्यांत अशाश्वत होतीं. मोंगल बादशहा प्रजेच्या कल्याणाविषयीं काळजी बाळगीत नव्हते. राजनीतिनिपुण नव्हते. निव्वळ चैनी, डामडौली व स्वार्थी होते, असें या बादशाहीचें व बादशहाचें कोणाही नसतेंच भेसूर चित्र काढणें, ही गोष्ट केव्हांही पक्षाभिमानाची, अन्यायाची व वस्तुस्थितीच्या विपर्यासाचीच ठरेल, आणि आज मोंगल अथवा मराठे यांचें राजकीय वैभव नष्ट झालें आहे व इंग्रज हिंदुस्थानचे सार्वभौम सरकार आहेत, ह्मणून मोंगल-मराठे, व इंग्रज हा भेदभाव मनांत न आणितां त्या सर्वांच्या गुणदोषांचें प्रसंगानुसार स्पष्ट व निःपक्षपातानें विवेचन केलें तरच वस्तुस्थितीचें खरें चित्र रेखाटिलें असें ह्मणतां येईल,—हें उघड आहे. व ह्मणूनच मोंगल बादशहा, व बादशहत या संबंधीं थोड्याशा अधिक खुलाशानें या ठिकाणीं वर्णन केलें आहे.

मोंगल बादशहा हे राज्यकारभार चालविण्यांत, आपल्या प्रजेस सुख लागून त्यांची उन्नति करण्यांत, व तिजवर प्रांतिक अधिकाऱ्याकडून कोणत्याहीप्रकारें जोर जुलूम होऊं नये, ह्मणून खबरदारी घेण्यांत अत्यंत दक्ष असत; इतकेंच नाहीं तर राजपुत्रानें केलेल्या अन्यायांचीही ते उपेक्षा करीत नसत. या बाबतींत "जर्नल ऑफ इंडियन हिस्ट्री" च्या फेब्रुवारी १९२२ च्या अंकांत खालील महत्वाची माहिती दिली आहे तीः—

---

टीप १:—Governors who appeared from the reports of news-recorders or from any secret reports, to be abusing their power and authority, were promptly recalled, censured, disgraced, or severely punished. There must have been a great deal of oppression which never reached the ear of the Emperor, but neither Akbar nor Jahangir ever countenanced the least oppression of their subjects,

" प्रांतिक अधिकारी, ( सुभेदार ) आपल्या अधिकाराचा आणि सत्तेचा दुरुपयोग करीत आहेत, अशी बातमी मोंगलबादशहांना आपल्या अखबरनविसांकडून, अथवा

---

and always took prompt measures to terminate and punish any rapacious or cruel course of conduct on the part of their officers. Saidkhan, when appointed Governor of the Punjab by Jahangir, immediately after his accession, was plainly warned that if his notorious eunuchs tyrannized over the people, " his justice would not put up with oppression from any one, and that in the scales of equity neither smallness nor greatness was regarded. If after this any cruelty or harshness should be observed on the part of his people, he would receive punishment without favour. " The Emperor's favourite Muqarrab Khan was punished with the reduction of his mansab by half for an individual act of cruelty. Mirza Rustam Governor of Thatta, who embarked on a course of tyranny over the people, was promptly recalled, disgraced and handed over to Anir Raisingh Dalan, the great gaoler of state prisoners, to be punished in an exemplary way, after an investigation in his case. Sometime after, however, the Mirza repented and apologized and was pardoned—after undergoing a through humiliation. Chin Qulich Khan the tyrant of Cawnpore, was likewise recalled, and would have been suitably punished if he had not died on the way. An enquiry was instituted into the case of Raja Kalyan, of whom certain unpleasant stories had been heard, but his innocence was clearly proved and he was acquitted. Abdullah Khan Firoz Jany Governor of Gujerat, one of the valiant soldiers of the

गुप्तपणें इतर कोणाकडून मिळाल्यास ते त्या अधिकाऱ्यांनां ताबडतोब परत बोलावून घेत असत, त्यांची कान उघाडणी, व निर्भत्सना करीत असत; अथवा त्यांस कडक शासन करीत असत. बादशहाच्या कानापर्यंत केव्हांही जाऊन पोहोंचले नाहींत, असे पुष्कळ जोरजुलूम प्रांतिक अधिकाऱ्यांकडून रयतेवर झाले असले पाहिजेत, परंतु अकबर व जहांगीर या उभयतांनांही आपल्या रयतेवर झालेला यत्किंचितही जोरजुलूम बिलकुल सहन होत नसे, आणि ते बंद पाडण्याची, व ज्या अधिकाऱ्यानें निर्दयपणाचें अथवा जोरजुलुमाचें वर्तन केलें असेल त्यास शिक्षा देण्याची ते तात्काळ तजवीज करीत. जहांगीर सिंहासनारूढ झाल्यावर लवकरच त्यानें सय्यद्खान यास पंजाबचा सुभेदार नेमिलें. त्यावेळीं जहांगीर यानें त्यास अशी स्पष्ट शद्बांत ताकीद दिली होती कीं, जर तुझी बदमाष ह्मणून नांवाजलेली खोजे मंडळी लोकांवर जोरजुलूम करितील तर " माझी न्यायदेवता, ते जुलूम कोणाकडूनही झाले असले तरी, त्याची कधींही उपेक्षा करणार नाहीं. आणि निःपक्षपाती न्यायनिवाड्याच्या ताजव्यांत लहानपणा अथवा मोठेपणा हा भेदभाव केव्हांही विचारांत घेतला जाणार नाहीं. आणि या पुढें जर तुझ्या परिवारांतील मंडळींनीं

---

Empire, a favourite of the powerful Shah Jahan, was recalled and had to undergo the uttermost humiliation, and to seek the good offices of his patron, to secure pardon. Shah Jahan himself, when at the height of his influence, received a most severe reprimand, which made the whole court tremble, for allowing his subordinate the Governor of Surat to oppress English traders. Numerous similar instances occurred "If" wrote Hawkins, " complaints of injustice which they ( *The Local Governors* ) do, be made to the King it is well if they escape, with the loss of their lands. Justice indeed was one of strong points of Jahangir. He sentenced an influential man accused of murder to death. " God forbid " he writes " that in such affairs, I should consider princes and far less that I should consider Amirs.

*See; " Journal of Indian History;*
***February 1922.***

लोकांशीं कठोर अथवा निर्दयी वर्तन केल्याचें माझ्या कानीं आलें तर कोणत्याही प्रकारची मेहेरबानी न दाखवितां तुला शिक्षा करण्यांत येईल. " बादशहाच्या ( जहांगीर ) मर्जीतील मकरंबखान यास त्याच्या स्वतःच्या निष्ठूर वर्तनाबद्दल शिक्षा ह्मणून त्याची अर्धी मनसब कमी करण्यांत आली. ठठ्ठा येथील ( सिंधप्रांताचा ) सुभेदार मिर्झारुस्तूम यानें लोकांवर जोरजुलूम करण्याचा क्रम आरंभिला, तेव्हां त्याला ताबडतोब परत बोलावून घेण्यांत आलें, त्याची निर्भर्त्सना करण्यांत आली; आणि त्याच्यावरील आरोपांची चौकशी केल्यानंतर, इतरांना उदाहरण होईल अशी, कडक शिक्षा करण्याकरितां राजकीय कैद्यांवरील मुख्य अधिकारी अनीरायसिंग दलन याच्या हवालीं त्यास करण्यांत आलें. तथापि, कांहीं काळानंतर त्यास आपल्या कृतकर्माचा पश्चात्ताप झाला. त्यानें बादशहाची ( जहांगीर याची ) माफी मागितली,—आणि त्याची पूर्ण बेइज्जत केली गेल्यानंतरच त्यास ती देण्यांत आली. कानपूर येथील जुलमी सुभेदार चिनूकलीचखान यासही अशाच रीतीनें परत बोलाविण्यांत आलें होतें; आणि जर तो बादशहाकडे येतांना मार्गांतच मृत्यु पावला नसता तर त्यालाही आपल्या कृतकर्माचें योग्य प्रायश्चित्त मिळालें असतें; राजा कल्याण याच्याबद्दल कित्येक असमाधानकारक गोष्टी ( जहांगीर ) बादशहाच्या कानीं आल्यामुळें त्यासंबंधीं चौकशी सुरू करण्यांत आली; परंतु तींत तो पूर्ण निर्दोषी आहे असें सिद्ध झाल्यामुळें त्यास सोडून देण्यांत आलें. गुजराथचा सुभेदार अबदुल्लाफिरोजजंग हा बादशहतींतील पराक्रमी योद्ध्यांपैकीं एक असून तो सत्ताधीश शहाजहान याच्या मर्जीतील होता; तथापि त्यालासुद्धां अशाच कारणामुळें परत बोलाविण्यांत आलें होतें. त्याला अत्यंतिक मानहानी सोसावी लागली होती, आणि आपणावर मेहेरनजर होऊन आपणास माफी मिळावी ह्मणून त्यास जहांगीर-बादशहाची करुणा भाकावी लागली होती. इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष शहाजादा शहाजहान,—ज्याचें वर्चस्व या काळांत परमावधीस पोहोंचलें होतें तो प्रत्यक्ष जहांगीर बादशहाचा मुलगा शहाजहान, यानें आपल्या हाताखालील सुरतच्या सुभेदाराकडून इंग्रज व्यापाऱ्यांचा छळ होऊं दिला याबद्दल, त्याची बादशहानें अशी चांगली खरडपट्टी काढिली कीं, त्यामुळें सर्व दरबार हादरून गेला. ( या बादशहाच्या कारकीर्दींत ) अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें घडलीं आहेत. या बाबतींत हॉकिन्स हा असें ह्मणतो कीं, " स्थानिक सुभेदारांनीं लोकांवर केलेल्या अन्यायाबद्दल त्यांनीं बादशहाकडे फिर्यादी नेऊन गुजराविल्यावर, जर त्या स्थानिक सुभेदारांच्या जमिनी जप्त होऊन तेवढ्यावरच ते निभावले, तर तें त्यांचें नशीबच ह्मणावयाचें, बादशहा जहांगीर यानें, एका वजनदार मनुष्यास, खुनाच्या अपराधाबद्दल मृत्यूची शिक्षा फर्मा-

विली या बाबतींत जहांगीर ह्मणतोः—"अशा अपराधाबद्दल जरी प्रत्यक्ष राजपुत्रांना माझ्या पुढें उभें करण्यांत आलें, तरी "हा राजपुत्र आहे;" हा विचारसुद्धां मनांत आणण्याची—मग अमीर उमरावांची गोष्ट तर दूरच आहे—मला कधींही परमेश्वरानें बुद्धि देऊं नये."

वरील विवेचनावरून, मोंगल बादशाहतीच्या काळांतील वस्तुस्थितीचा योग्य बोध होतो; आणि ती बादशाही जुलमी अथवा रानटी नव्हती,—आणि सर्व बाजूनें विचार केल्यास, त्या काळांत "हिंदुस्थानांतील मोंगली साम्राज्य" हें जगांत पहिल्या प्रतीचें वैभवसंपन्न व सुबद्ध होतें, त्यांत शांतता समृद्धि व सुबत्ता नांदत होती, आणि या अफाट साम्राज्याचा कारभार सुनियंत्रितपणें चालत होता असें निदर्शनास येतें.

हिंदुधर्माच्या अंगीं अत्यंत चिवटपणा असल्यामुळें मुसलमानांनीं त्या धर्मावर कित्येक शतकें भयंकर आघात करूनही त्यांचा तो प्रयत्न निष्फळ होऊन त्यांना या बाबतींत पूर्णपणें हार ध्यावी लागली; आणि हिंदुधर्मांतील अभंग चिवटपणा व जिवंतशक्ति यामुळें त्या धर्माचा नाश न होतां उलट त्या धर्मांतील सात्विकता व सहिष्णुत्व याचाच मुसलमान राज्यकर्त्यांवर पुष्कळ प्रमाणांत परिणाम झाला. कित्येक राज्यकर्त्यांनीं हिंदू-धर्मांतील—या सात्विक, उदात्त आणि स्थितिस्थापक धर्मांतील पुष्कळ तत्वें आचरणांत आणिलीं आणि हिंदुधर्माप्रमाणेंच हिंदु लोकांचा निरुपद्रवी, सोशिक, इमानी, शांत व सात्विक स्वभाव यामुळें मुसलमानी राज्यकर्त्यांच्या मनांत त्यांच्याविषयीं पुष्कळ सहानुभूति उत्पन्न झाली, परस्परांमध्यें अधिक अधिक दळणवळण सुरू होऊन प्रेमभाव वाढला; "इजिप्त, सीरीया, आशियामायनर, इराण, तार्तरी इत्यादि देशांमध्यें मुसलमानांनीं आपल्या सर्व प्रजेस धर्मभ्रष्ट करून टाकिलें, आणि त्यांच्याशीं कोणत्याहीप्रकारें सामोपचाराचें वर्तन केलें नाहीं; परंतु हिंदुस्थानांमध्यें अवघ्या १/१० प्रजेस मुसलमान करून ९/१० प्रजा त्यांनीं हिंदु राहूं दिली, सर्वांशीं धार्मिक सहिष्णुत्व दाखविलें, आणि एकेवेळीं तर ते स्वतःच मुसलमानी धर्म सोडून हिंदू होण्याच्या बेतांत आले होते. यावरून त्यांचा अंमल हिंदुस्थानांत फार सौम्य होता, असें दिसून येतें. त्यांनीं हिंदूंच्या चालीरीती कायम ठेवून, त्यांच्या पूर्वींच्या राज्यव्यवस्थेचें स्वरूप बदललें नाहीं, आणि ते जिंकले गेले होते ह्मणून त्यांच्यावर इतर राष्ट्रांप्रमाणें विशेष जुलूम किंवा बलात्कार केलेला दिसत नाहीं." (एलफिन्स्टन) शिवाय बादशहांची सत्ता जरी अनियंत्रित होती, तरी ती अनियमबद्ध नव्हती आणि मुसलमानांच्या धार्मिक जुलमाचे अथवा इतर अत्याचाराचे परिणाम कायमचे टिकणारे अथवा निरंतर भोगीत रहावे लागणारे नव्हते. हिंदुस्थानांत मोंगली राज्याची स्थापना होईपर्यंत हिंदू लोकांना

धार्मिक बाबतींत पुष्कळ वेळां अतिशय त्रास भोगावा लागला, पण त्यानंतर मोंगल बादशाहांच्या काळांत अवरंगझेबाच्या कारकीर्दीपर्यंत हिंदुस्थानांत नवें युग सुरू झालें. पूर्वीच्या काळांतील अंदाधुंदी, अत्याचार, बंडें, व धार्मिक जोरजुलूम यांना पूर्णपणें आळा बसला. धार्मिक बाबतींत परधर्मियांवर जुलूम करण्याचा आपणास अधिकार नाहीं, असें ते मानूं लागले. हिंदू लोकांच्या धार्मिक कल्पनांना मान देऊं लागले. हिंदुधर्मांतील कित्येक गोष्टींचें अवलंबन करूं लागले.--अकबर, व जहांगीर हे दीपावली पूजा करीत, गाईंना शृंगार घालून त्यांच्या मिरवणुकी काढीत, राखीबंधन विधि पाळीत, शिवरात्रीच्या दिवशीं जोगी व साधुमंडळींना राजवाड्यांत बोलावून आणून त्यांच्याबरोबर उपहार करीत; बादशहा जहांगीर याची बाहेर निघतांना दृष्ट काढीत असत, हिंदु राजकर्त्यांप्रमाणें ते आपले वाढदिवस समारंभानें साजरे करीत, व स्वतःच्या तुला करीत,–हिंदुमुलींशीं त्यांनीं लग्नें लाविलीं; आणि तशा दृष्टीनें–स्वराज्याच्या दृष्टीनें नव्हे तर मुसलमान लोकांच्या कित्येक शतकांच्या सहवासामुळें, मुसलमानांची सत्ता, इभ्रत व कर्तृत्व यांच्या श्रेष्ठतेविषयीं व स्वतःच्या अयोग्यतेविषयीं व अकर्तृत्वाविषयीं ज्या घातूक भावना, आणि दृढ झालेल्या अदृश्य कल्पना, व समजुती उत्पन्न होऊन बळावलया होत्या त्या दृष्टीनें–मुसलमानी अमलानें मराठ्यांचें अथवा हिंदुस्थानांतील हिंदूलोकांचें भयंकर हानिकारक नुकसान झालें असें ह्मणतां येत नाहीं; इतकेंच नाहीं तर त्यांच्या राज्यपद्धतींत जरी पुष्कळ दोष असले तरी सामान्यतः तिनें हिंदुलोकांतील सत्व अथवा तेज ( Spirit ) नष्ट केलें नाहीं असें खुद्द एलफिन्स्टनचेंच ह्मणणें आहे. त्याप्रमाणेंच दुसऱ्या एका निःपक्षपाती इंग्रज ग्रंथकारानें मुसलमानी अंमलासंबंधीं असें ह्मटलें आहे कीं, “मुसलमान राज्यकर्ते हे हिंदुस्थानचे रहिवासी होऊन त्यांनीं तेथील प्रजेप्रमाणें आपलें सुखदुःख व हिताहित एकरूप केलें होतें. त्यांनीं एकंदर मानानें तेथील लोकांच्या चालीरीति व धर्म, आणि लोकांचीं वतनें ह्यांचें संरक्षण केलें होतें. त्यांनीं पूर्वीची ग्रामसंस्था, व पंचायतीची न्यायपद्धति व उत्तम पोलीस कायम ठेविले होते; त्याच्यायोगानें, अगदीं थोड्या खर्चांत, लोकांच्या जीविताचें व वित्ताचें चांगलें रक्षण होत असे त्यांनीं हिंदुस्थानावर एखाद्या राष्ट्रीय कर्जाचें ओझें लादलें नव्हतें. ते प्रजेकडून प्राप्त होणाऱ्या करभाराच्या उत्पन्नांतून मोठमोठ्या रकमा सार्वजनिक उपयोगाच्या कामाप्रीत्यर्थ आणि विद्यादानाप्रीत्यर्थ खर्च करीत असत. त्यांनीं हिंदुस्थानचे व्यापारी, कारागीर व मजूर लोक ह्यांचे आश्रयदाते जे उच्चप्रतीचे जहागिरदारलोक त्यांचा नाश करण्याचा कधींही प्रयत्न केला नाहीं. त्यांनीं हिंदुस्थानच्या लोकांस कमीदर्जाचे लोक अशा बुद्धीनें वागविलें नाहीं. त्यांनीं त्यांच्याशीं सामाजिक गोष्टींत मनमोकळेपणानें दळणवळण ठेविलें होतें त्यांनीं स्वतःस ज्या कमीदर्जाच्या व

कमी पगाराच्या जागा भरितां येत नव्हत्या, तेवढ्याच फक्त एतद्देशियांकरितां राखून ठेविल्या नव्हत्या; त्यांनीं मुलकी खात्यांत मोठमोठे अधिकार त्यांच्या हातीं दिले होते. तात्पर्य कनिष्ठ प्रतीच्या लोकांस मोठमोठ्या हुद्यांवर व लष्करी अधिकारावर नेमून, नित्यशः त्यांना स्वतःचा अभ्युदय करून घेण्याची त्यांनीं संधी दिली होती. ह्यायोगानें त्यांचें सत्व किंवा त्यांचा उत्साह कायम राहिला होता, असें मिस्तर एल्फिन्स्टन यानें ह्मटलें आहे. "

" ह्यावरून हें उघड होतें कीं मुसलमानांनीं आपल्या अंमलामध्यें हक्कदार राज्यकर्त्यांच्या जातीचा एक वर्ग व एतद्देशीय लोकांचा एक वर्ग असे प्रजेचे दोन निरनिराळे वर्ग करून सर्व राष्ट्राची क्रमशः अवनती केली नाहीं. मुसलमानांच्या पुष्कळ वर्षांच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांतील लक्षावधि प्रजेमध्यें पुष्कळांवर जुलूम झालें होते, परंतु त्यांनीं सर्वांची उन्नतीची आशा कायम ठेविली होती. त्यांनीं आपल्या सर्व हिंदू प्रजेस योग्य महत्वाकांक्षेचीं फळें उपभोगण्याचा मार्ग खुला ठेविला होता आणि अधिक बुद्धिमान कर्तृत्ववान व साहसी लोकांस मानमरातब राजकीय सत्ता, मोठमोठे लष्करी अधिकार आणि त्याबरोबर जहागिरी व इनामेंही मिळविण्याची लालसा बाळगण्यास प्रोत्साहन दिलें होतें. " शिवाय मुसलमानांच्या पहिल्या पहिल्या स्वाऱ्या निव्वळ लूट मिळविण्याच्याच इच्छेनें असल्यामुळें यालुटींपैकीं प्रारंभीं बरीच संपत्ति देशाबरोबर गेली, परंतु मुसलमान लोक हिंदुस्थानांत राज्यें संपादन करून ते इकडेच स्थाइक झाल्यावर देशांतलि संपत्ति देशांतच राहिली, बाहेर गेली नाहीं. देश भिकारी झाला नाहीं. लोकांची अन्नान दशा झाली नाहीं. इतकेंच नाहीं तर मोंगल बादशहांनीं देशांतलि पैसा बाहेर नेण्याची मनाई केली होती, इंग्रज वकील सर टॉमसरो याच्या बरोबर रेव्हरंड टेरी या नांवाचा एक प्रॉटेस्टंट इंग्रज पाद्री, हिंदुस्थानांत आला होता ( इ. सन १६१५ ते १६१८ ) त्यानें केलेल्या वर्णनावरून असें दिसतें कीं हिंदुस्थानांत हरएक प्रकारचे भोज्य पदार्थ अत्यंत स्वस्त व विपुल आहेत, असें त्यास आढळून आलें, व हें पाहून त्यास अतिशयच आश्चर्य वाटलें आणि हिंदुस्थान देशांतील सांपत्तिक स्थितिविषयीं त्यानें असें ह्मटलें आहे कीं, हिंदुस्थान देशांत, बाह्यदेशांतून पैसा येण्याचीं अनेक द्वारें सतत वाहत आहेत, परंतु देशांतील पैसा बाहेर नेणें हा मोठा गुन्हा समजला जात आहे. त्याप्रमाणेंच हिंदुस्थानांत व ब्रह्मदेशांत त्यावेळीं ह्या गुन्ह्याबद्दल सक्तीचे कायदे केलेले होते. शिवाय त्यावेळीं किती भयंकर स्वस्ताई होती याविषयींही टेरीच्या प्रवासवर्णनांत उल्लेख आहे. टेरी हा सुरतेहून सुमारें चारशें मैलांचा प्रवास करून मांडवगड येथें आला. व्हिन्सेंट स्मिथ यानें आपल्या " अकबर " या पुस्तकांत लिहिल्याप्रमाणें सुरतेहून मध्यहिंदुस्थानापर्यंतचा हा प्रवास त्यानें अवघ्या चार युरोपियन व वीस एतद्देशीय अनुचरांसमवेत अगदीं सुखरूप केला. अर्थात्

वाहतुकीचे रस्ते सुरक्षित असून त्याबरोबरच देशांत शांतता व सुबत्ता नांदत असलीच पाहिजे हें उघड होतें. टेरीबरोबरच जहांगीर बादशहास देण्याचे नजराणे होते. त्याच्याबरोबर सहा गाडे होते, आणि रात्रीं प्रवासांत जेथें मुक्काम होई तेथें सभोंवार गाडे लावून व मध्यें राहुट्या उभारून त्याच्याबरोबरील मंडळी रात्रीं पाळीपाळीनें पहारा करीत असत. एके ठिकाणीं टेरीचा रात्रीं मुक्काम पडला असतां गांवचे लोक नको ह्मणून सांगत असतांही आपण होऊनच पहारा करण्यास आले व रात्रीं पहारा करून दुसऱ्या दिवशीं सकाळीं "जागली" मागूं लागले परंतु टेरी यानें ती देण्याचें नाकारिलें, तेव्हां गांवांतील तीनशें लोकांनीं मिळून त्याचे गाडे आडविले. तेव्हां एका युरोपियनानें आपली बंदुक त्याच्यावर रोंखली; हें पाहून या लोकांनींही आपले धनुष्यबाण सज्ज केले. इतक्यांत असें समजलें कीं, ही जागली, ह्मणजे फक्त दीड रुपया बाक्षिसी असून ती दिल्यास सर्व लोक खुष होऊन परत जातील; त्याप्रमाणें टेरीनें लागलींच दीड रुपया दिल्याबरोबर हे लोक तेथून तात्काळ आनंदानें निघून गेले. मांडवगडपर्यंतच्या प्रवासांत, पहाडी प्रदेशांत दरवडेखोरांची वस्ती असल्यामुळें प्रवाशास क्वचित् प्रसंगीं बलुची पठाण, रजपूत वगैरे लोकांचा पहारा घ्यावा लागे; परंतु हे लोक अतिशय इमानी असून आपल्या ताब्यांतील मालाचें व माणसांचें रक्षण करण्यांत ते स्वतः मरण्यास तयार असत. या बाबतींत खुद्द टेरी यानेंच असें ह्मटलें आहे कीं, असा पहारा असला ह्मणजे सोनें, व जवाहीर घेऊन सुद्धां पाहिजे त्या परकी इंग्रज मनुष्यास सुरतेहून लाहोरासही सहज एकटें जातां आलें असतें; व पहारेकऱ्यांना त्यांची ठरीव मजूरी दिली ह्मणजे त्यांनीं सुतळीच्या तोड्यासही हात लाविला नसता. शिवाय हिंदुस्थानांतील नोकर लोकांचें इमान विलक्षण असून, त्यांचा पगार सुमारें अडीच रुपये दरमहा असतो, व तो त्यांना दर प्रति-पदेस अगाऊ द्यावा लागतो. यावरून त्या काळांत किती शांतता व सुबत्ता नांदत होती, हें स्पष्टपणें निदर्शनास येतें. टेरी प्रमाणेंच डिलाव्हेल हा इतालियन रोमन कॅथलिक पंथाचा प्रवासी इ० सन १६२३ च्या फेब्रुआरी महिन्यांत सुरत येथें आला होता; त्यानेंही आपल्या प्रवासवृत्तांत असें ह्मटलें आहे कीं, दरमहा तीन रुपये दिले ह्मणजे चांगल्या कुटुंबांतील नोकर मिळतात, व भोज्यपदार्थ स्वस्त व विपूल मिळतात. त्याप्रमाणेंच कॅप्टन अलेक्झांडर हॅमिल्टन या नांवाचा स्कॉटलंडमधील एक व्यापारी इ० सन १६८८ पासून इ० सन १७२३ पर्यंत हिंदुस्थानांत व्यापार करीत होता. तो ह्मणतो कीं, "हिंदू राजाच्या अंमलापेक्षांही मोंगलांच्या अंमलांत राहणें हिंदू लोकांस अधिक आवडत असे. कारण मोंगलांनीं लोकांवर कराचें ओझें विशेष लादलें नव्हतें, आणि जो कर द्यावयाचा तोही अधिकाऱ्यांच्या मर्जीवर नसून ठरीव व प्रत्येकास आगाऊ

माहीत होता. हिंदू राज्यकर्ते आपल्या मर्जीप्रमाणें लोकांवर कर बसवीत, आणि द्रव्यलोभ हेंच लोकांपासून पैसा वसूल करण्याचें प्रमाण असे. ते क्षुल्लक कारणावरूनही आपल्या शेजारच्या राजांशीं युद्धें उपस्थित करीत, आणि त्यांच्या अशा महत्वाकांक्षेचा व मूर्खपणाचा परिणाम सर्व रयतेस भोगावा लागून देह व वित्त या दोन्हींही बाबतींत त्यांना अतोनात नुकसान सोसावें लागत होतें. " यावरून मोंगल बादशाही नियमबद्ध होती. मोंगली दरबार ह्मणजे रानटी लोकांचा दरबार नव्हता. मोंगल बादशहा ह्मणजे रयतेची संपत्ति पिळून काढणारा चरक नव्हता; आणि तेलाच्या घाण्यांतील दाण्याप्रमाणें, आपल्या राजकीय अंमलाखालीं जिंकिलेल्या प्रजेला त्यांच्या शरीरांतील सत्व व स्वत्व पिळून काढून त्यांना नालायक, नामर्द, नादान, नेभळे, निःसत्व व निरुपयोगी बनविणाऱ्या स्वार्थी राज्यपद्धतीचेंही त्यांनीं कधीं अवलंबन केलें नव्हतें हें सिद्ध होतें. ह्मणून वस्तुस्थितीचा विपर्यास करून, आणि फक्त आपल्या एकट्याच्याच राजपद्धतींचे गोडवे गाऊन आपल्याच तोंडाभोंवतीं दिवे ओंवाळून घेणाऱ्या एखाद्या इंग्रज लेखकानें जाणूनबुजून पक्षपातानें चांगलें तें मागें ठेवून, व फक्त वाईट तेवढेंच पुढें मांडून मोंगल बादशाहीला, तिची आजच्या काळाशीं तुलना करून रानटी ठरविलें, अथवा मराठ्यांना लुटारू अथवा जंगली ह्मणून त्यांची संभावना केली तरी, त्यामुळें त्यांच्या उज्वल कीर्तीस व कर्तबगारीस यत्किंचितूही कमीपणा येत नाहीं, उलट अनेक युरोपियन व एलफिन्स्टन वगैरे कित्येक इंग्रज ग्रंथकारांनीं निःपक्षपातानें मोंगल व मराठे यांच्या संबंधानें जी वस्तुस्थिती वर्णन केली आहे, व त्यांच्या राज्यव्यवस्थेचा, समभाव मनांत ठेवून, प्रसंगानुसार जो गौरव केला आहे, व दोष दिला आहे;—इतकेंच न हें तर स्वतः इंग्रज असून, इंग्रज व इंग्लिश राज्यपद्धती, अथवा राजकारण यासंबंधीं लिहितांना स्वाभिमानानें अंध न होतां त्यांचाही तसाच गौरव, व त्यांनांही तसाच दोष दिला आहे-तो विचारांत घेतला ह्मणजे, पक्षांध झालेल्या कोणाही लेखकाच्या लेखाला कितपत महत्व द्यावयाचें, याचा आपोआपच उलगडा होतो.

हिंदुस्थानांत मुसलमानी राज्यकर्ते व मोंगल बादशहा राज्य करीत असतां देशाची सांपत्तिक स्थिति सर्वसाधारणतः कशी होती, याचें थोडक्यांत आणखी दिग्दर्शन करण्यापूर्वीं, इतर कित्येक बाबतींचा पहिल्यानें उल्लेख करणें आवश्यक आहे. हिंदुस्थान-देशांत अस्वस्थता, बंडें अथवा लढाया सुरू झाल्यास त्यामुळें त्या त्या प्रदेशाची पुष्कळवेळां नासाडी होत असे. परंतु त्याचे परिणाम शेतकरी कारागीर व व्यापारी यांना कदाचित् भोगावे लागले तरी ते तात्पुरते असत. त्याप्रमाणेंच स्वाऱ्या करणारे लुटारू लोक, केव्हां केव्हां प्रदेशच्याप्रदेश उध्वस्त करून टाकीत; आणि पुष्कळ संपत्तिही लुटून नेत परंतु संपत्ति उत्पन्न करण्याचीं साधनें ते हिरावून नेत नसत. त्यामुळें ही हानी फार लवकर

मरून निघत असे. व पुन्हां लवकरच सर्व देश सुसंपन्न व समृद्ध झालेला दृष्टोत्पत्तीस येत असे; आणि पुढें मुसलमान लोक राज्यकर्ते या नात्यानें हिंदुस्थानांत स्थायिक झाल्यावर परदेशांत संपत्ति जाणें तर बंदच झालें पण उलट प्रजेच्या भरभराटीवर आपली भरभराट व आपल्या राज्याचें चिरस्थायित्व अवलंबून आहे, हें तत्व त्यांनीं ध्यानांत ठेऊन, प्रजेपासून किती मर्यादेपर्यंत पैसा काढणें इष्ट होईल, याचा योग्य विचार करूनच ते वागूं लागले; आणि देशांतील पैसा बाहेर न जातां, हिंदुस्थानदेशाचा परदेशाशीं चालणारा प्रचंड व्यापार सदैव चालू असल्यामुळें देशांत संपत्तीची सारखी भर पडत होती. फ्रान्सिस बर्नियर या नांवाचा एक फ्रेंच प्रवासी इ० सन १६५५ पासून १६६७ पर्यंत बारा वर्षें हिंदुस्थानांत असून अवरंगझेबाच्या पुष्कळ वर्षांच्या कारकीर्दीच्या प्रारंभाला तो मोंगल बादशहांच्या दरबारांमध्यें राजवैद्य ह्मणून राहिलेला होता. त्यानें त्यावेळेचा फ्रान्सचा प्रधान कोलबर्ट यास पाठविलेल्या पत्रांत असें लिहिलें आहे कीं, "हिंदुस्थान देश हा एक मोठा जबर खड्डा असून सर्व जगांतील सोनें रुपें त्यांत येऊन पडण्याचीं अनेक द्वारें उघडीं आहेत, पण त्यांतून ही संपत्ति बाहेर पडण्याचें द्वार मात्र माझ्या क्वचितच नजरेस येतें." त्याप्रमाणें मोंगल बादशहाच्या सैन्य-बलाचें वर्णन करून त्याच्या भांडारांतील अगण्य संपत्ति सोनें, रूपें, हिरे, माणकें वगैरे विषयीं तो ह्मणतो, "या भांडारांत मोत्यें व जडजवाहिरांच्या राशीच्या राशी आहेत. आणि बादशहाचें एक तख्त (मयूरासिंहासन) तर नुसतें जडजवाहिरांनींच मढविलेलें आहे. त्याप्रमाणेंच नथा, बुगड्या, गोटपाटल्या, चंद्रहार, वेढीं, मासोळ्या वगैरे अनेक सोन्यामोत्यांचे दागिने त्यावेळीं स्त्रियांच्या अंगावर हरहमेष दिसत असत. कशीदयाचीं, रेशमीवस्त्रांवरील वेलबुट्टींचीं, जरीचीं, कलाबतूचीं, व खडीचीं कामें...असलेल्या वस्त्रप्राव-र्णांना त्याकाळीं स्त्रीपुरुषांची जी विलक्षण मागणी असे ती पाहून तर बर्नियर थक्क होऊन गेला. तो बादशहाच्या भेटीस गेला असतां तेथील एकंदर वैभव पाहून तर त्याची अक्कल साफ गुंगच होऊन गेली. आणि बादशहाच्या डोक्यावरील हिरे रत्नजडित सुवर्ण युक्त मुकुट, त्याच्या वक्षस्थळावर रुळणारी मौल्यवान हिऱ्यांची माळा, त्यांतच सूर्याप्रमाणें झळकणारें "टोपाझ" यानांवाचें रत्न, गळ्यापासून कमरेपर्यंत लोळणारा बिनमोल मोत्यांचा कंठा—आणि आणखी कितीही अलंकारांची यादी दिली तरीही न संपण्यासारखे त्यांच्या अंगावरील अतिशय मौल्यवान अलंकार—अवलोकन करून तर त्यांचें यथार्थ वर्णन करण्याची शक्तिही त्याच्या वाणींत राहिली नाहीं, इतका तो दिङ्मूढ बनून गेला !! त्याप्रमाणेंच जॉन बॅप्टिस्टा टॅव्हर्नियर यानें शहाजहान बादशहाच्या सात प्रसिद्ध सिंहासनापैकीं मयूरासिंहासन पाहून तें विलक्षण सुंदर असल्याचें कबूल केलें आहे, आणि या सिंहासनांत मयूरपक्षाच्या पुच्छाच्या स्वाभाविक

रंगानुसार निरनिराळया रंगांचीं हिरे माणकें जडविलेलीं असल्यामुळें प्रत्यक्ष मोरांचा पिसाराच आपण पहात आहोंत कीं काय, असा भास होत असून त्याची किंमत त्यानें निदान पावणेदहा कोटी रुपये तरी असावी असें ह्मटलें आहे. या सिंहासनासंबंधीं टॅव्हर्नीयरनें केलेलें वर्णन मागें शहाजहानच्या हकीकतींत केलेलें असल्यानें या ठिकाणीं द्विरुक्ती न करितां, त्या काळांतील कलाकुसरीच्या कामाबद्दल त्यानें जें विस्तृत वर्णन केलें आहे, त्यांतील एकच उतारा या ठिकाणीं दिला आहे. तो ह्मणतो "बंगालप्रांतांतील कासिम-बझार या गांवांतून दरसाल बावीसहजार रेशमी कापडाचे गठ्ठे बाहेर प्रांतीं रवाना होत असत; आणि त्यांचें वजन सोळा औंसांचा एक पौंड या हिशोबानें बावीस लक्ष पौंड भरत असे, त्याप्रमाणेंच रेशमी व जरीच्या सत्रंज्या, गालीचे, सोनेरी व रुपेरी काम केलेल्या जरी-कांठाच्या साटिनी, नक्षीच्या अनेक जिनसा, आणि इतरही अपूर्व हस्तकौशल्याच्या वस्तू बाहेरदेशीं जात असत;" यावरून हिंदुस्थानांतील तत्कालीन शांतता व सुबत्ता याविषयीं कोणासही सहज योग्य अनुमान करितां येईल.

शिवाय हिंदुस्थानांत मुसलमानी राज्यांतही, पूर्वीप्रमाणेंच ग्रामसंस्था, व ग्राम-पंचायत यारूपानें, खेडोखेडीं व गांवोगांवीं, लोकसत्तात्मक राज्यपद्धति चालू होती; आणि ह्या दोन्हीही संस्था अतिशय जुन्या असून, मेन वगैरे इतिहासकारांनीं, लोकसत्तात्मक राज्यपद्धति, मूळची आर्यलोकांचीच होती, व ज्यावेळीं आर्यलोक युरोपांत गेले त्यावेळीं त्यांनीं ती बरोबर नेली असें कबूल केलेलें आहे, पूर्वीचीं गांवें, शेतजमीन व माळ जमीन यांच्या आसपास वसलेली असत, रयतेच्या ताब्यांत जमिनी असत, व तेथील प्रत्येक कुटुंबाला घर आणि अंगणाकरितां फुकट जागा दिलेली असे. प्रत्येक गांवांत शेतकरी व त्यांच्या गरजा भागविण्याकरितां गांवकामदार, पुजारी, ग्रामजोशी व सुतार, लोहार, सोनार, कुंभार, न्हावी, महार, चांभार वगैरे "बारा बलुतीं" असत, अशा कामगारांना व कारागिरांना इनामजमिनी दिलेल्या असत, व शेतांची कापणी झाल्यावर बलुत्यांच्या रूपानें गांवांतील लोकांकडून त्यांच्या कामगिरीबद्दल ज्याच्या त्याच्या उपयोगाप्रमाणें त्यांना त्या उत्पन्नांतील अंश देण्यांत येत असे. या सर्वांची व्यवस्था पाहाण्याकरितां "मुखी" अथवा "पाटील," व त्याच्या मदतीस कुळकर्णी यानांवाचे अधिकारी असत, आणि त्यांनाही इनाम जमिनीं व बलुतीं मिळत असून सर्व लोकांचे अधिकार व कामें वंशपरंपरेनें चालत असत. गांवशिवेंतील सर्व जमीन त्या गांवच्या मालकीची असे, आणि खरेदी व विक्रीही गांवांतल्या गांवांतच होत असे. प्रत्येक गांवांत एक अथवा अधिकही ग्रामपंचायती असत, तींत प्रत्येकाला मत असे, आणि पंचांची निवड त्यांच्या लायकीबद्दल ज्या अटी ठरलेल्या असत त्या बरहुकूम होत असे. हें पंचमंडळ

लोकांस जमिनी विभागून देणें, त्यांच्या तक्रारींचा निकाल करणें, सरकारी वसूल जमा करण्यास सरकारी अधिकाऱ्यांस मदत करणें, किंवा जमा झाल्यावर तो सरकारी तिजोरींत पाठविणें वगैरे सर्व स्थानिक कामें करीत असे, आणि सरकारसारा व जिझिया कर एवढ्या पुरताच या संस्थांशीं सरकारचा संबंध असे; व ही संस्था सरकारावर केव्हांही अवलंबून नसून आपआपल्या कामाची व्यवस्था आपली आपणच पहात असे. या ग्रामसंस्थांचें काम सुव्यवस्थित पद्धतीनें चालत असे; आणि राज्यक्रांती सारख्या गोष्टीमुळेंही या संस्थांना कोणत्याही प्रकारें तिळमात्रही उपसर्ग होत नसे; यासंबंधीं, सी. पी. रामस्वामी आय्यरच्या पुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, "कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्यें तिसऱ्या पुस्तकाच्या दहाव्या भागांत असें लिहिलेलें आहे कीं, सार्वजनिक उपयोगाचीं सर्व इमारत-कामें गांवांतील लोकांनीं करावीं, व त्यांची व्यवस्थाही त्यांनींच ठेवावी; त्याप्रमाणेंच प्रो० रीसडेव्हीसचें असें ह्मणणें आहे कीं, बुद्धग्रंथांतून गांवांतील लोकांनीं मोहल्ले, धर्मशाळा व गांवागांवांत रस्ते व बागा तयार केल्याचा उल्लेख आढळतो. ( Banarji's Public Administration in ancient India पान २९३ नोट २ पहा ) म्हैसूर संस्थानांत हल्लींसुद्धां प्रत्येक आठवड्यांत अर्धा दिवस गांवांतील लोक फुकट काम करून सार्वजनिक उपयोगाच्या इमारती बांधितात, आणि या इमारतींची किंमत पाहिली असतां, आश्चर्य वाटतें. ख्रिस्तीशकाच्या पूर्वी चवथ्या शतकांत अर्थशास्त्र लिहिलें गेलें त्यावेळीं प्रत्येक गांव हा राज्यशकटाचा एक घटकावयव समजला जात असे, आणि गांव हेंच राजयंत्राचा मुख्य भाग समजला जात असे, वसूलीच्या वगैरे कामाशिवाय न्याय देण्याचें कामही प्रत्येक ग्रामसंस्था करीत असे. सिलोन येथील ताम्रपटांवरून असें दिसतें कीं फौजदारी गुन्ह्यांचा निकालही जातींच्या पंचायतींत होत असे. मद्रास सरकारासंबंधीं याठिकाणीं एक गोष्ट सांगितली पाहिजे ती ही कीं गेल्या शतकाच्या प्रारंभींच त्या सरकारानें ग्रामसंस्था जीवंत ठेवण्याची शिफारस केली होती; परंतु त्यांचें सर टॉमस् मनरोपुढें कांहीं चाललें नाहीं, आणि ग्रामसंस्था मृतप्राय झाल्या."

हिंदुस्थानांतील "ग्रामसंस्था" यासंबंधीं इ० सन १८६४ साली सर जॉन लॉरेन्स यानें असें ह्मटलें आहे कीं, "सार्वजनिक हितबुद्धि हिंदूलोकांच्या स्वभावांत मुरली असल्याकारणानें हिंदी लोक स्वतःचा राज्यकारभार करण्यास पूर्ण लायक आहेत. ग्रामसंस्था हीं लोकसत्ताक अशीं लहान राज्येंच आहेत व ह्या सर्व संस्था अत्यंत टिकाऊ आहेत. स्वहिताच्या व कर्तव्याच्या दृष्टीनें आजि ज्या परिस्थितींत आपण हिंदुस्थानांत रहात आहोंत ती परिस्थिति लक्षांत घेतां हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचें काम हिंदी लोकांवरच सोंपविणें आपणांस श्रेयस्कर आहे;" त्याप्रमाणेंच इ. सन

१८७१ मध्यें मुंबईचा माजी गव्हर्नर सर बार्टलफ्रियर यानें असें लिहून ठेविलें आहे कीं, "हिंदीसमाजाच्या व्यवस्थेकडे पाहिलें असतां आपणाला असें स्पष्ट दिसतें कीं, हिंदीलोकांना निवडणुकीचें तत्व तर अवगत आहेच पण सर्वांचे प्रतिनिधि पंचायतींत असावे अशी व्यवस्था ते निरनिराळ्या मार्गानें करीत असत; आणि सॅक्सन लोकांप्रमाणेंच स्वजातियांस बक्षिस देणें अगर शिक्षा करणें हीं दोन्ही कामें त्या त्या लोकांच्या जातसभांतून होत असत. यावरूनच हिंदीपरंपरा आपणांस स्पष्ट दिसून येत आहे." त्याप्रमाणेंच मि. चिशोम अॅन्स्टे हा असें ह्मणतो कीं; "आपण पौर्वात्य लोकांना प्रतिनिधिक संस्था चालविण्याचें शिक्षण दिलें पाहिजें असें ह्मणतों त्यावेळीं पौर्वात्य लोकांमधूनच स्थानिक स्वराज्याची कल्पना प्रथम निघाली ही गोष्ट आपण साफ विसरलेलों असतों. स्थानिक स्वराज्य हें पौर्वात्यांच्या इतकेंच प्राचीन आहे. लोकांचा धर्म कोणताही असो पौर्वात्य देशांत सर्वत्र स्थानिक स्वराज्य संस्था दृष्टोत्पतीस येतात; व त्यांचें असें एक जाळें तयार झालें आहे कीं प्रातिनिधिक तत्वावरच उभारिलेल्या स्वराज्याची थोडीबहुत घडलेली मूर्ति आपल्या हातीं आहे." वरील उताऱ्यावरून व विवेचनावरून हिंदुस्थानांतील ग्रामसंस्थांचें महत्व किती होतें, आणि लोकसत्तात्मक राज्यपद्धतीची त्यांना किती पूर्णपणें ओळख झालेली होती. याविषयीं कोणासही योग्य अनुमान करितां येईल.

हिंदुस्थानांतील मोंगल बादशहांच्या राज्यकारभारासंबंधी याठिकाणीं आणखी थोडासा अधिक उल्लेख करणें अवश्यक आहे, मोंगल राज्यकर्त्यांनीं आपल्या कृतीनें प्रजेमध्यें असंतोष उत्पन्न होऊन तो वाढत जाईल, अशा गोष्टी कधींही केल्या नाहींत अथवा अवरंगझेबापर्यंतच्या कोणत्याही बादशहानें आपण केलेल्या चुका तशाच कायम ठेवून हट्टानें उद्धामपणाचें वर्तन केलें नाहीं. ह्मणजे देशांत शांतता, व सुबत्ता नांदत असून मोंगलांचा अंमल न्यायाचा व सुखाचा आहे, असा सार्वत्रिक समज झाला होता, इतकेंच नव्हे तर हिंदू लोकांनाही, मोंगल बादशाही व बादशहा यांच्याबद्दल एक प्रकारचा विलक्षण अभिमान व आवड उत्पन्न झाली होती. आणि त्यांची हुषारी, कर्तृत्व, आत्मसंयमन, उदारवर्तन, दिलदार स्वभाव, वगैरे गुणामुळें त्यांच्याबद्दल लोकांत पूज्यबुद्धि उत्पन्न होऊन ती दृढ झाली होती. शिवाय मोंगलांच्या राज्यकारभाराचा अंदाज करितांना ही गोष्टही ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, ( Owen's India on the Eve of British Couquest हें पुस्तक पान ४९ पहा. ) "अवरंगझेब बादशहा मृत्यु पावला त्यावेळीं प्रत्यक्ष इंग्लंडांत पूर्वीच्या जुलमी स्टुअर्ट राजांची कारकीर्द फिरून सुरू होण्याची भीति गेली नव्हती. अवरंगझेबाच्या वेळेस इंग्लंडांत सुरू असलेले कायदे

विशेषबुद्धि सर्च करून लोकांचा छळ करण्याकरितांच उत्पन्न केले आहेत कीं काय; असें वाटणारे असून, ते त्या कडक स्वभावाच्या अवरंगझेबबादशहास सुद्धां दुष्ट व अमानुष वाटले असते, आणि अवरंगझेबाच्या मृत्युनंतर शें सव्वाशें वर्षेपर्यंत तसल्या कायद्यांचा डाग इंग्लंडच्या कायदे संग्रहालयांतून धुवून गेला नसता; "ह्मणजे अवरंगझेब व त्याचे कायदे इंग्लंड देशांतील तत्कालीन स्थिति पाहतां त्यामानानें पुष्कळच सौम्य व माणुसकीस साजेसे होते, असें ओवेनच्या ह्मणण्यावरून सिद्ध होतें; शिवाय मेकॉले यानें आपल्या इंग्लंडच्या इतिहासांत सतराव्या शतकांतील इंग्लंडच्या सामाजिक आयुष्यक्रमाचें चित्र रेखाटलें आहे, त्यावरून त्या देशांतील तत्कालिन स्थितीचा सहज बोध होतो. तो ह्मणतो:--" सतराव्या शतकाच्या अखेरीसही इंग्लंडांत व खुद्द लंडनमध्यें लुटारूपणास फार ऊत आला होता; कित्येक देशांत मृत्युपत्र करून ठेविल्या शिवाय कोणी प्रवासासच जात नसत. राजा आपल्या मालमतेचें संरक्षण करील ही लोकांस आशाच नसे; व प्रत्येक गांवांत दरवडेखोर व लुटारू लोकांपासून बचाव व्हावा ह्मणून कांहीं हत्यारबंद लोक व उत्तम शिकारी कुत्रे बाळगावे लागत. लुटारू लोकांवर लोटण्यासाठीं प्रचंड शिळा, व आधणाचें पाणी शहराच्या तटावर नेहमीं तयार ठेवण्यांत येत असे. एकूणीसाव्या शतकांत सुद्धां इंग्लंडांतील कांहीं भागांत, कॅलिफोर्नियांतील इंडियन लोकांप्रमाणें रानटी लोकांची वस्ती असून त्यांच्या अर्धनग्न बायका व पुरूष वेडींवांकडीं गाणीं गात, नाचत, व बागडत असत. खुद्द लंडन शहरांत रस्त्यांतून रात्रीच्या वेळीं हिंडणें धोक्याचें होतें. राजरस्त्यावर मात्र क्वचित दिवे असत. रात्रीं हिंडतांना उशीर झालेल्या लोकांस, दिवे दाखवून रस्त्यांतील धोक्याच्या जागांतून बचावून, नीटपणें घरीं पोहोंचविण्याचा कांहीं छोकऱ्यांचा धंदा खूप उत्तम चालत असे. कायद्यांस धाब्यावर बसवून रस्त्यांत लूटमार चालत असे. कॉव्हेंट गार्डन येथें बड्या लोकांच्या घरांशेजारीं बाजार भरत असे. तो अतिशय घाणेरडा असून तेथें सारखा आरडाओरडा चालत असे. फळेंविक्या बाया ओरडत, गाडीवान भांडत व कुजलेल्या फळांचे ढीगच्याढीग कौंटेसांच्या उंबऱ्यावर येऊन पडत. भिकाऱ्यांचा अतिशय सुळसुळाट असे. वेस्ट मिनिस्टर ॲबेंत जेवढीं कुत्रीं मांजरें मरत तीं सगळीं सेंट जेम्स चौकांत येऊन पडत. शहरांतील फरसबंदी अत्यंत घाणेरडी असे; आणि शहरांतील घाणेरडें पाणी बाहेर वाहवून नेण्याचें साधन ( Drainage ) इतकें गचाळ होतें कीं जरा पाऊस पडतांच गटारें तुडुंब भरून वाहत असत. सायंकाळ झाली ह्मणजे लंडन शहरांतून फिरणें फार धोक्याचें होई; खिडक्यांतून, रस्त्यांतून जाणाऱ्यांच्या अंगावर घाणेरडें पाणी झटकून पडे. रस्त्यांत दिवे नसत. रात्रीच्या तीन प्रहरांपैकीं सुमारें प्रहरभर

दहावीस घरांपुढें एखादा दिवा असे, व रस्त्यांत दिवे लावण्याविरुद्ध सर्व लंडनचे लोक होते. भाड्यांच्या गाड्यावर नंबर नसे. कारण तो कोणासच वाचतां येत नव्हता.

" राज्यकारभारांतही पुष्कळ दोष होते. मंत्रिमंडळ भ्रष्ट झालेलें असे; प्रधानाच्या मर्जीतल्या लोकांस मोठमोठ्या जागा मिळत, त्यामुळें सामान्य जनतेचा तिकडे प्रवेश होत नसे. वसुलाचा वाटेल तसा दुरुपयोग होई, व प्रधानमंडळी तर इतकी लांच खात, व अन्यायानें पैसे मिळवीत कीं, मोठमोठ्या जहागिरी त्यांना विकत घेतां येत असत."

" त्या वेळचा जमीनदार अगर सभ्य गृहस्थ, एखादा (दारूचा) गुत्तेवाला किंवा चक्कीचा मालक, याच्याहून जास्त योग्यतेचा नसे. कारण त्याचें ज्ञानच त्या किमतीचें असे; आणि तो इतक्या घाणेरड्या रीतीनें राही कीं, त्याच्या ओटीवर उकिरडे माजले तरी त्याला त्याबद्दल कांहींच खंत वाटत नसे."

" इंग्रजलोक अत्यंत गतानुगतिक असल्यामुळें एखाद्या सुधारणेची आवश्यकता असतांही ते तिला विरोध करीत, " इंग्लंडांतील सामाजिक जीवनाचा इतिहास " ( History of Social life in England ) या पुस्तकाचा कर्ता सिंज हा ह्मणतो कीं, " इंग्लंडच्या अर्थीक उन्नतीचा अभ्यास करितांना एक गोष्ट प्रामुख्यानें लक्षांत येते ती ही कीं, प्रगती होणें अत्यावश्यक असतांही इंग्रजांनीं प्रत्येकवेळीं त्यास विरोधच केला आहे. इ. सन १५७१ मध्यें, नवीन पद्धतीच्या धुरांड्यांबद्दल होलिनशेड या ग्रंथकारानें अतिशय ओरड केली. तो ह्मणे, छपरांतून मार्ग सांपडेल तेथून धूर जावा; तो एकाच विवक्षित द्वारानें सोडून देणें याचा अर्थ काय ! "

" वाफेच्या सुरवातीला इंग्रजांनीं अत्यंत विरोध केला; ते आगगाडीला शिव्या देत, ग्यासच्या दिव्याविरुद्ध त्यांनीं त्रागा केला, व त्याप्रमाणेंच मोटार गाड्यांनाही विरोध केला."

वरील विवेचनांत सतराव्या शतकाची व त्या शतकाच्या अखेरची--ह्मणजे अठराव्या शतकाच्या प्रारंभींची हकीकत आली आहे. आतां एकूणीसाव्या शतकांतील इंग्लंडच्या व इतर कित्येक देशांच्या राजकीयस्थितिसंबंधानें काय दिसतें तें पाहूं. इ. सन १८८३ च्या दिजंबर महिन्यांत ह्मणजे अगदीं अलीकडे पन्नास वर्षांच्या आंतील काळांत–लंडन येथील लिबरल असोशियनच्या परिषदेंत लॉर्ड ग्रेनव्हिल हा असें ह्मणाला कीं, " कॉमन्स सभेंत समासद निवडतांना तो चांगल्या मार्गानें निवडला जावा, अशी कांहींजणांची अपेक्षा होती; परंतु इ० सन १८८० सालीं झालेल्या निवडणुकीनें ती समजूत पार नष्ट झाली; आजपर्यंत कधींही घेतला नाहीं, इतक्या लोकांनीं लांच खाल्ला, व कांहीं संस्था तर इतक्या वाममार्गी बनल्या होत्या कीं, त्यांच्यापैकीं एकजण सुद्धां या संबंधांत अर्ज करण्यास धजत नसे; व याचा

परिणाम अनन्वित अनीति, भयंकर लांचलुचपत व पातित्य असा दिसून आला. मॅक्लिसफील्ड येथें बसलेल्या पार्लमेंटच्या कमिशननें असा अभिप्राय दिला आहे कीं सहा हजार मतदारांपैकीं पांच हजारांवर लांचाचा प्रयोग करण्यांत आला होता." "म्याजिस्ट्रेट वगैरे लोकही अपराधी लोकांत होते." त्याप्रमाणेंच फ्रेंच ग्रंथकार मॉन्शियर बेनॉइस्ट हा आपल्या पुस्तकांत ह्मणतो कीं, निवडणारा व उमेद्वार, व उमेद्वार व निवडणारा, हे दोघेही लांच घेत असत; व फ्रान्स देशांत नेहमींचीच ही स्थिति आहे. मि० लॉवेल हा, परिस्थितीचें विशेष सूक्ष्मपणें निरीक्षण करणारा अमेरिकन गृहस्थ ह्मणतो कीं, "प्रतिनिधींनीं आपल्या मताचा मोबदला मागण्याचा सर्रास नियम असून त्याबद्दल त्यांना जें काय पाहिजे तें, फाजील विनय बाजूस ठेवून स्पष्टपणें मागत. ( युरोपखंडांतील सरकार व पक्ष) त्याप्रमाणेंच मि० लिली हाही इतक्याच जोरानें असें स्पष्ट सांगतो कीं, 'लोकसत्तेच्या खोट्या नांवाखालीं, स्पेन, पोर्तुगाल व इतालींत फारच भ्रष्टाकार आहे; आणि त्यांतल्यात्यांत इतालींत तर फारच आहे.' त्याप्रमाणेंच अमेरिकेंत, विशेषतः संयुक्त संस्थानांतही या बाबतींत समाधानकारक स्थिति नसून ब्राइसच्या 'अमेरिकन कॉमन वेल्थ' या पुस्तकांत अनीति व भ्रष्टाकार यांचीं कितीतरी उदाहरणें दिलीं आहेत. "पक्षांच्या व्यवस्थापकांच्या हातीं पूर्णपणें निवडणुकी असून लोकांचीही त्या बाबतींत कांहीं तक्रार नसते." लिलीच्या ह्मणण्याप्रमाणें अमेरिकेंतील राजकारण ह्मणजे खरोखरच लहान मोठ्या नोकऱ्यांसाठीं धडपडच होय"—वरील सर्व विवेचनावरून व तुलनांवरून हिंदुस्थानांतील मोंगली राष्ट्र जुलमी होतें, मराठ्यांचें राष्ट्र लुटारू होतें, मोंगल अधिकारी लांचखाऊ होते, मराठ्यांच्या दरबारांत लांचाची लालूच बोकाळली होती, नानाफडणवीस लांच घेत होता, ह्या ह्मणण्यांत कितपत राम आहे, कितपत किंमत आहे, व असें ह्मणणारे स्वतःच कितपत "धुवट सोवळे" आहेत याचा आणि 'Every man has his price' "प्रत्येक मनुष्याला त्याची किंमत असते या वॉलपोलच्या उद्गारांच्या गूढ अर्थाचा ज्याचा त्यानेंच आपल्या मनाशीं विचार करावा, ह्मणजे "कोणाला वंदावें व कोणाला निंदावें" हें सहज लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं. ओवेनच्या शद्बांत ह्मणावयाचें ह्मणजे, "मोंगलांच्या राज्यकारभाराचें सामान्य स्वरूप पूर्वीच्या प्राच्य रियासतींप्रमाणें जुलुमी नव्हतें; एवढेंच नव्हे तर अर्वाचीन अगर प्राचीनकाळीं पाश्चात्य देशांत निपजलेले मोठमोठे बादशहा आपणांस समाजरक्षक ह्मणवून घेणारे मोठमोठे धर्माचार्य, प्रचंड सेनांचे पराक्रमी नायक, अगर जातिविशेषाचे वीर पुरुष, ह्यांच्याशीं मोंगल बादशहांची तुलना शोभण्यासारखी आहे." वरील एकंदर विवेचनावरून "मोंगल बादशहा," मोंगल बादशाही" व एकंदर मुसलमान समाज यांच्याबद्दल कोणाच्याही मनांत आदरबुद्धि व प्रेमभाव उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं. आणि अशाच प्रकारें हिंदु व

मुसलमान या दोन्ही समाजांमध्यें परस्पर स्नेहबुद्धि व ऐक्यभाव वाढत जाऊन त्यामुळें या उभयतांही समाजाचें अत्यंत कल्याण झाल्यावांचून, व उभयतांनाही तें अतिशय भूषणास्पद झाल्यावांचून कधींही राहणार नाहीं अशी खात्री आहे.

वरील विवेचनावरून, मराठ्यांच्या सत्तेचा उदय होण्यापूर्वी हिंदुस्थानची राजकीय परिस्थिति कशी होती, मोंगल बादशहांवर हिंदुधर्माचा कसा परमावधीचा परिणाम झाला होता—आणि तो परिणाम इतका झाला होता कीं, "एकेवेळींतर ते स्वतःच मुसलमानी धर्म सोडून हिंदू होण्याच्या बेतांत आले होते"—व दिल्लीच्या बादशाही तख्ता-समोंवतीं हिंदुधर्माचें वातावरण कसें सारखें वावरत व वाढत गेलें होतें, व हिंदूंच्या राजकीय उत्कर्षाला त्याचा किती महत्वाचा उपयोग झाला, हें कोणाच्याही सहज ध्यानीं येईल. उत्तर हिंदुस्थानांतील हिंदूंच्या, व विशेषतःदक्षिणेंतील मराठ्यांच्या दृष्टीनें हा काळ अत्यंत महत्वाचा आहे. कारण दक्षिणेंत बहामनि राज्याच्या स्थापनेबरोबरच, हें बाह्य प्रदेशांतून दक्षिणेंत आलेलें धार्मिक वातावरण व महाराष्ट्रांत साधुसंतांच्या धार्मिक चळवळीमुळें उत्पन्न झालेलें वातावरण, यांचा एकजीव होऊन मराठ्यांच्या दुय्यम दरजाच्या राजकीय उत्कर्षाला त्याचा प्रारंभीं अतिशय उपयोग झाला; व नंतर धार्मिक व राजकीय चळवळ एकजीव करून छत्रपति शिवाजीमहाराज यांनीं भावी काळांतील बलाढ्य अशा मराठी साम्राज्याची स्थापना केली.

# व्यक्तिविषयक सूची.


अ

अकबर; १८, १११, ११३, ११४, १५६, १५८, १६०, २०८, २११, २२०, २२४

अजराईल; १९, २०

अजाजील; २०

अजोज कोका; १७४, १७६, १८५, १८६

अदिलखान सूर; १४१; १४६,१४८

अनसारी; ५२

अनिर रायसिंह दलन २२५;

अनंगपाळ; ५२

अब्दुर्रहिमान ३०, ३१

अब्दुल आब्बास. ३१

अब्दुल मिर्झा; ११५

अब्दुल मलिक; २९, ३०, ५०

अब्दुल मुतालेब; ४

अबदुल लतीफ तैमूर ११५

अबदुल्ला; ४

अबदुल्ला-अल्-मानून; ३१

अबू बकर; ५, ६, २१, २२

अबू तालीब; ४, ५

अबू सईद मिर्झा; ११५

अबुल फज्ल; १७६, १७७, १७९, १८१-१८५

अमरसिंह; १९२

अमरू; २२–२४

अमीना; ४

अमीर खुश्रू; ६९, ७९

अमीर सय्यद बेरेका; ९८

अरबेला स्टुअर्ट; १३

अर्जमंद बानू; २०६

अरीफ हुसेन; १२८

अलप्तगीन; ४०, ५०, ५१

अलेक्झांडर ह्यामिल्टन २२९

अल्तमश; ४१, ६१

अल्बेरूनी; ५२

अर्कलीखान; ७२, ७४, ७५

अलबुकर्क; ४१

अल्तूनिया; ५९

अवरंगझेब; १, ११२, ११३,१३०, १३१, १३५, १४३, १४८, २००, २०३, २०४, २०६, २११--२१६--२१७, २२२, २३१, २३४, २३५

अशोक; ८५

अस्यूडी; ५२

अल्लाउद्दीन खिलजी; ७१–७६, ८७, ११२ ११३, १४३, २०३, २०५

अल्लाउद्दीन घोरी; ५५

अल्लाउद्दीन लोदी; १११

अल्ली; ५, १८, २१

अल्ली अकबरजामी; १५१

अल्ली अदीलशहा; ४१

अल्ली बेरीदशहा; ४१

अहंमदशहा अबदाली; ५०, २०३

अहंमद मसाऊद ५४

अहंमद मिर्झा; ११५

अहंमद सामानी; ३५

अँजियर; ४४

आ

आक्टोव्हियस; ६१
आद्मखान; १६७–१७०
आव्यास; ३७
आयर्न्हन धी ग्रेट; ४८
आयेषा; ६, ८
आर्तोघल; ३७
आस्लॉन; ३६
आलकखान; ७५, ७६
आल्फंसो; ३१
आसदखान सामानी; ३५
आसफखान; १९४
आसफ् उद्दौला; २११
ओकाईखान; ४७, ४८
ओखान; ३८
औट्राम जनरल; ७६

इ

इसाक; २०
इब्राहीम; २०
इब्राहीम कुत्बुशहा; ४१
इब्राहीम मसाऊद; ५५
इब्राहीम लोदी; ११९–१२४, १२६
इब्राहिम शिकंदर; १११
इब्राहीमखान सूर; १२३, १३९
इब्नबभूता; ७९
इस्माईल; २०
इस्माईल सबक्तगीन; ५२
इस्माईल सामानी; ३६
इस्माईलसारासान; ३७
इस्माईल शहा इराणचा; ११९
इस्माईलखान सुभेदार; १११
इंग्रज; ३७, ४३

ई

ईसा; २०
ईसानदौलत बेगम; ११५, ११८
इष्ट इंडिया कंपनी (इंग्रज) १०
ईस्ट इंडिया कंपनी; (फ्रेंच) १५

उ

उक्तायखान; ७२
उत्बी इतिहासकार; ५२
उदयसिंग; १५९, १७१, १९७,
उमर; २१, २२, २४, ३५,
उमरशेख मिर्झा; ११५
उलुघबेग उमर; ११५
उलुघबेग तैमूर; १०५, ११५,
उलुघबेग महंमद; ७८-८१
उस्मान; २१, २४, २५,
उस्मान आटोमन; ३७, ३८,

ए.

एलफीन्स्टन, माउंट स्टुअर्ट; २२६-२३०
एल्डोज ४५,
एलिझाबेथ; १२, १३
ऐन उल्मुल्क; ७७

क.

कर्णराय; ७९
कर्णावती; १५९
कर्माणी; ९८
करशास्प; ८०
कॉडिंगटन, सरएडवर्ड; ३९
कामरान; १२५, १३२, १३३, १३८, १५०, १५२, १५३, १५६, १६२, १६३,
कॉलबर्ट; १५, २३१;
क्लाव्हिगो ९६, ९७, १०३
क्लिओपाट्रा ६०
कुतुकल निगारखानम्; ११५
कुतुबुद्दीन ऐबक; ५७, ५८,

कुतुबद्दीन घोरी; ४५, ५५
कुबाचा ४५,
कुब्लाई खान; ४८
केकूबाद; ७०, ७१
केकोबाद; ७९
कोन; ४२

**ख.**

खदीजा; ४, ५
खवासखान १४०, १४७, १४८
खानखानान १६७, १७४, १७७;
खानोजेदाबेगम; १६३
खालेद; २२
ख्वाजाजहान शर्की ८८
ख्वाजा मुअज्जम; १७८-१७९
खिजरखान खिलजी; ७६
खिजरख्वाजा; १६३, १८०
खुश्रू, इराणचा बादशहा; ७
खुश्रू, गज्नी; ५६;
खुश्रू जहांगीर; १६८, १८५, १९२

**ग**

गाब्रिएल; ५
ग्यासुद्दीन घोरी; ५६, ५७
ग्यासुद्दीन तुघ्लक; ७७, ७८
ग्यासुद्दीन बल्बन; ६३, ६७
गिबन; ११३
ग्रीक; ४२
गुलबदन; १५१, १६३,१८०,१८४,१८५
गुलबर्गा; १८०
ग्रेनिव्हिल लार्ड; २३६
गेफॉक्स; १३
गोपाळदास; १८९

**घ**

घ्यासउद्दीन, महंमद मिर्झा; १९४

**च**

चागरबेग; ३६
चार्लस दुसरा; ४३
चिशोम ॲन्से; २३४
चंगीझखान; २३, २४, ३७, ४०, ४६, ४९, ६३, ७०, ७२, ८८, ९६, १०५, ११५, १३१
चांदबिबी; १७६, १७७

**ज**

जगन्नाथ पंडित; १९७;
जमालखान; ११८, १२३;
जयपाळ; ५१;
जलालखान शिकंदर; १११;
जलालखान सूर; १३४, १४१;
जलालुद्दीन फिरोज; ७१, ७३;
जवान; ३२
जहान् आरा बेगम; २०४, २०६, २०८
जहांगीर; ११४, ११६, १४८, १७१, १७७, १७९, १८२, १८६, १८८, १९६, २०८, २११, २१२ २२०, २२४, २२५, २२६, २२९
जहांगीर मिर्झा; ११७
जाफर; १८;
जिजाबाई; ११८;
जुजीरखान; ४७
ज्युलियन् काऊंट;३०
जेम्स पहिला; १३, १४, १९३;
जोधाबाई; १७१, १९०,
जौहर; १५८

**झ**

झगताईखान; ४७, ८८, ११५
झैनखान; १६७

डैनाब; २६

ड

डच; ४२, ४३

डलहौसी लार्ड; ७६

डार्न्बी, अर्ल ऑफ १६

डिलाव्हेल; २२९

त

तक्कमानीपखान; १०३

तारीक; २९

ताजखान, सुभेदार; १४८

तातारखान; १५७

तार्दीबेग; १५८, १६४

तानसेन; १९७

तुर्कान; ८८

तुघ्रलबेग; ३२, ३६, ५४

तुघ्रलखान; ६४, ६५

तुलूईखान; ४७, ४८

तेमूजीन; ४६

तैमूरलंग; २३, ३८, ४०, ४४, ८८–९९

१०३–१०६; ११५, ११९–१२२;

१२९, १३१

तैमूरशहा; ७०

तोडरमल्ल; १७४, १७५

द

दानियल; १७७, १८०, १८५, १९६

दारा; १४८, २०६, २१३

दिओनिसियस टॉलेमी; ६०

दिळदार बेगम; १५१, १८०

दिलावरखान; ८८

दिलावरखान घोरी; ९३

दुर्गावती; १७२–१७४

देवलदेवी; ७७, ७९

दौलतखान लोदी; १०६, ११९–१२१;

१२४

ध

धनाजी जाधव; ३,

न.

नसरतशहा; १२३

नादीरशहा; २३, ५०, २०३, २०४,

नानाफडणीस; २३७,

नारायणराव पेशवा; ५६,

नासीरुद्दीन महंमद; ६१, ६२

निसिफोरस; ३१,

नूरजहान; १९०, १९२, १९४-१९५,

नोमन; २४

प.

पद्मिणी; ७५

प्रतापसिंह, छत्रपति; ७०

प्रतापसिंह, राणा; १७२,

पारनेल, सर एच्; १४

प्राणमल्ल; १४०, १४२, १४३,

पृथ्वीराज चव्हाण; ५०

पिटर; ३७

पीछाजान अनागा; १६७,

पीर महंमद जहांगीर ९०, ९१, १०६,

पुरतन; ४६

पोर्तुगीज; ३७, ४२, ४३,

फ.

फराबी; ५२,

फरीदखान; १२३, १२४,

फरुंखा; ५२

फातीमा; २२, ३२

फिरूकशाद; २४
फिरोजशहा अल्तमश; ५९
फिरोजशहा तुघ्लक; ८१, ८७, ९४, १०७
१३३,
फिरोजशहा सूर; १४९;
फिर्दोसी; ५२, ५३,
फ्रीअर; सर बार्टल; २३४,

ब,

बकिंगहाम, ड्यूक ऑफ; १४,
बखत्यार खिलजी; ४५, ५७,
बयाजीद; ३८, ९५, ९६,
बार्नियर १९७, २३१.
बल्बन; ६४,
बहादूरशहा; १३४, १३५, १५६, १५९,
बहादूरखान, १७६, १७७,
बहरामखान; १५३, १५६, १५८, १६२-
१६९, १७५, १८०,
बहरामखान गज्नी; ५५, ५६,
बहारमल्ल, १६१, १७१, १९०
बहिलोल लोदी; १०७, १०८,
बाजबहादूर; ९३, १६८, १७१,
बातू; ४७, ४८,
बाबर; जहिरुद्दीन महंमद, २७, ४०, ९९,
१११, ११४, ११५--१३३, १३७,
१५०, १५८, १६१, २०३,
बायरन; लार्ड; ३९,
बिऱ्हराज एच; १३०
ब्रिसबेन; १६
बुद्ध; ९
बुध्दन; १०९
बुऱ्हाण निजामशहा; १७६
बेकन; १४
बैंकाबहादुर; ४६
बैहाकी; ५२
बोगराखान; ७०, ७१

भ.

भगवानदास; १७१, १७६

म.

मनरो, सर टॉमस; २३३
मनसूर; ३१
मनसूर सामानी; ५०,
मनूची; १९७, १९८
मलभट्टी ८१
मलिक काफुर; ७६
मलिक खिलजी; ७१
मलिक खुश्रू; ७६, ७७;
मलिक मुकद्दम; ६४, ६५;
मलिकशहा; ३६, ४५;
मलिक राजी फरूकी; ८८;
मलिकंबर; २१२;
मलिकीजहान; ७३, ७६;
मल्लु इकबलखान; ९२, १०५;
मसाऊद इब्राहीम; ५५;
मसाऊद महंमूद; ५४;
महबल; ३५;
महंमद आटोमन, दुसरा; ३८
महंमद काशीम; ३४, ५७;
महंमद गज्नी; ३६, ४०, ११२;
महंमद घोरी; ४५, ५६, ५७;
महंमद पैगंबर; ३-८, १७-२२; ४०,
५१, १०१;
महंमद फिरोजशहा ८६, ८८, ९२, १०५;
१०६, ११३;
महंमद महंमूद ५४, ५५;

महंमद मिर्झा; ११५, ११६;
महंमदखान आत्का; १६९, १७०;
महंमदशहा अदीली; १४९, १५०, १६४, १६५;
महंमदशहा लोहानी; १२३, १२४;
महंमद सेल्जूक; ४७
महंमद बल्बन; ६५
महंमूदखान; ११५;
महंमूद लोदी; १२३, १३३
महंमूद सबक्तगीन; ५१, ५३;
महाम बेगम; १२५;
महाम अनागा; १६७, १६८;
माधवराव पेशवा; ५६
माधवाचार्य, ९
मानसिंग; १३६, १६१, १७५, १७८, १८५–१८७;
मार्क अँटनी; ६१, ६२;
मार्कस ओरोलियस; २१९;
मार्को पोलो ४९
मालदेव; १३६, १४१, १५२, १५३, १७१, १९७;
मिकाईल; १९, २०,
मिर्झा अस्करी; १२५, १३२, १३३, १३५ १३९, १५३–१५६;
मिर्झाखान; १६७, १७४;
मिर्झा मुराद; १५३;
मिर्झा रुस्तुम; २२५;
मीर जुम्ला; २०३–२०५
मुआविया; २५,२८, ३०, ३५;
मुकबुलखान; ८२
मुकरबखान; १९३, २२५;
मुज्फरशहा; ८८, ९३;
मुबारिक खिलजी; ७६, ७७
मुबारिक लोदी; १०६;
मुमताजमहल; २०६, २१२;
मुराद; १०९, १४८, १६८, १७५, १७७, १८१, १८२, १८७;
मुराद आटोमन; ३८
मुर्तुजा निजामशहा; ४१;
मूसा; २०;
मेकाले, लार्ड; २३५;
मेदिनीराय; १२३;
मोइनुद्दीन चिस्ती; ८५
मोसिलामा; २२,
मौदूद; ५५;

## य

यजीद; २५, २९;
याकूब; २०, ३२,
युस्तगाई; ४६;
यूसफ बिन फजल हुसेनी; ८७;
यूनसखान; ११५, ११८
येस्रदिजिर्द; २४

## र

रझिया हिंदाल; १५६;
रणजीतसिंह; २०३,
रत्नसिंह; १५९;
रत्नावली; १४०;
रॅलि, सर वाल्टर; १२, १४,
राघोबादादा पेशवा; ५६
राजाराम छत्रपति; १३२,
राणा प्रसाद; १५२, १५३;
रामचंद्रपंत अमात्य; ३,
रामदासस्वामी; ३, ९
रामदेवराव जाधव; देवगिरीकर; ७१, ७६;
रॉड्रिक; ३०

रुकुनुद्दीन खिलजी; ७२, ७४;
रूपमती; १६८, १७१;
रोझिया, सुलताना; ४१, ५९, ६८;
रो, सर टॉमस; १९३, २२८
रोहिदास; १३५;

ल

लायल, सर ऑलफ्रेड; १४
लालखान; १९८;
लिओ इसोरिएन; २९
लुई, चवदावा; १५, २१७,
लेनपूल; ११३;

व

वलीद; ३४, ३५,
वाजीद अल्लीशहा; ७६
विक्रमाजीत १५९,
विद्यारण्यस्वामी; ९
विलास तानसेन; १९७
वीर नरेंद्र; १७३, १७४
वीरसिंग देव; १८२-१८४
वुइल्यम; २१८
व्हिक्टोरिया महाराणी; २०३
व्हिन्सेंट स्मिथ; ७७, २२८

श.

शमसुद्दीन अल्तमश, ५८
शयबानीखान, ११७, ११९
शराफ उद्दीन, १७८, १७९
शहाजहान; २, १०९, ११४, १२६, १४८, १८९, १९२, १९६-२०० २०३-२१२, २२०, २२५,
शहाजी राजे, २, १९६,
शहाबुद्दीन घोरी; ५६, ५७, ९१, १५५;
शहारुख मिर्झा ९९, १०६, ११५;
शादीखान खिलजी; ७६;
शाहू छत्रपति; १३२,
शिकंदर लोदी १०८, ११०
शिकंदरशहा सूर; १२३-१२५; १३३-१४८; १५१, १५६ १५७, १५९;
शिवाजी छत्रपति; १-३, ९, ११८, १३२, १८९, १९६, २३८;
शीरखान सुभेदार; ६३;
शीरशहा सूर; १२३-१२५; १३३-१४८ १५१, १५६, १५७, १५९
शेख झेनुद्दीन २१९,
शेख निजामुद्दीन; ७९, ८५
शेख सलीम चिस्ती; १९०
शेखसादी ६९

स.

सयक्तगीन; ४०, ५१,
सय्यदखान; २२४
सलादिन; ३२, ३३,
सलीमशहा सूर १४४, १४७-१४९, १५५,
सलीमा; १८०, १८४,
साद एब्नवाकास; २४,
सामान; ३५,
सायणाचार्य; ९
सारंगखान; ८८, ९१, १०६,
सुमा; १८;
सुलेमान धी ग्रेट; २६, ३८,
सुलेमान मिर्झा; १७७,
सुलेमान सूर; १२४, १७५,
सेलिम; २६
सेलिम अकबर; १७७, १७९, १८१-१८६; १८८-१९०,

सैफउद्दीन घोर; ५५;
संगराणा; १२२, १२३, १२५, १५८;
संजर; ३६
संताजी; ३
संभाजी छत्रपति; ३, १३२, १८९, २२१;

ह

हमीदाबानू; १५१, १५२, १६०, १६१, १६७, १८०, १८१, १८४;
हरदत्त; ५२;
हरपाळदेव; ७६, ७७;
हरीकृष्ण; १३५–१३७;
हरीश्चंद्र; १३५;
हरीहर; ९;
हसन; १८, २२, २५;
हॉकिन्स; १९३, २२५;
हाजीबेगम; १६०;
हाफीज कवी; ९८;
हारून–अल्–रशीद; ३१;
हिंदाल १२५, १३२, १३३, १३७, १३९, १५१, १५२, १५४–१५६, १८०;
हिमू; १४९, १५०, १६४, १६५;
हिराक्लियस; २२;
हुमायून; ८५, ११४, ११६, ११९, १२१, १२३, १२५–१२९, १३२–१३९, १४२, १४३, १४८, १५०, १५३, १६२, १७७, १८०, २०३
हुलाकू; ६३;
हुसेन; १८, २२, २५;
हुसेन अर्घुन; १५२;
हुसेन निजामशहा; १७६;
हुसेन मिर्झा; १२५
हुसेन सोफी; ८९;
ह्यूंफ्रे, सर गिलबर्ट; १२;

# भूगोलविषयक सूची.


अ

अक्शी; ११७;
अजमीर; ५१, ८५, १९०, २०८;
अटक; १, ९१,
अटलांटिक महासागर; ४३
अफगाणिस्थान; १७, ३७, ४५, ४७, ९०, १८८
अमुदार्या नदी; ८९
अमेरिका; १२;
अमेरिका उत्तर; १२,
अमेरिका; दक्षिण; १४,
अयोध्या; ६४, ७६, २११,
अरबस्थान; ३, ४, ७, ८, ३४, ३५, ३९, ४७
अर्जरूम; ९६
अलाहाबाद; १८१, १८२, १८४, १८५
अलीगड; १०९
अलेक्झॉंड्रिया; २२, २३, ५८, १०५
अवरंगाबाद; ८०;
अहंमदनगर; २, १७५–१७७, १८८ १९९, २१७, २१९
अहंमदपूर; ९१
अहमदाबाद; १३४, १७४
अंगोरा; ३८, ९५
अंत्रा; १८३
अंदीजान; ११५–११७, १२६, १२७
अंबाला; १६३
अंबोयना; ४३;

आ

आक्ससनदी; ३५
आक्टिम; ६१
आग्रा; ११०, १२१, १२२, १२४ १२५, १३०, १३३–१३५, १३७–१३९, १४७, १५६, १६३, १७४, १७७, १८३, १८८, २०६, २०८
आफ्रिका; १७, २३, ३९, ४०, ४२, ७९
अरल समुद्र ३६
आर्मस्रवेट; ३७
आर्मीनिया; ८९, ९०
आल्जियर्स; ३९
आलेप्पो; ९५
आशिया; ७, १४, ३४, ३७, ४०, ४२, ४५,–४७, ४९, ७९
आशियामायनर; १७, २८, ३१, ३४, ३७, ९५, १०४, २२६
आसाम; १८८
आस्राबाद; ९५
आस्वान ३९
आसुअन; ३९

इ.

इजिप्त; २२, २४, २६, ३२, ३३, ३९, ४५, ९५, २२६,
इताली; ३९
इराण; ७, १७, २२, २४–२६, ३४, ३७, ४७, ६३, ८०, ९०, ९५, ९६, ११९, १५३, १८७, २०३, २२६, २३५.

इराणी आखात; ३४, ३६, ३७, ३९,
इस्तंबूल ३८
इस्पहान ९०, ९५,
इंग्लंड; ११-१६, ३९, ४२, ४३, १९३, २१८
इंदूर,...९३,

ई.

ईराक्श; २४,

उ,

उच; ९१
उत्रार; ३८, ९५
उदेपूर; १७२, १८५, १९२
उमर कोट; १५२

ओ

ओर्च्छा; १८१–१८४
ओढया; २७९

क

कनोज; ५१, ५२, १०६
करबेला; २७
कराची; ८०
कलकत्ता; १
कार्लिंजर; ५१, १३३, १३६, १४१, १४२
कर्नाळ; ७८, ८३
कर्नाटक; ८०
कानपूर; २२५
कान्स्टांटिनोपल; ३, ७, २२, २६, २८, २९, ३४, ३८, ९६
काबूल; १, २५, ४७, ९५, ११५, ११७, ११९–१२२, १२६, १३३, १४८, १५३–१५५, १६१, १६२, १६४, १७६–१७८
कायरो; ३०, ३२, ३३, ५८
कार्थेज; २५, २९, ३०
कार्सीका; २९
कालिफोरानिया; २३५
काल्पी; १६६
काश प्रांत; ८८
काशी; १२३
काश्मीर; ११३, ११६, १७६
कासाराघाट; १८९
कास्पियन समुद्र; ४७
काळा समुद्र; ४७
किमशान; ९०
कुगर नदी; ८३
कुरा; ७३, १११
कोर्डोव्हा; ३१, १०५
कोयल नदी; १३५
कोल प्रांत; ६४
कोलार; २०३
कोव्ह; ४७
क्रोश्ह; ११
क्रिमियाचें द्वीपकल्प; ३९
कृष्णा नदी; ११२, २०३, २०४
कंदाहार; ४७, १५३, १७६

ख

खानदेश; ८८, ११३
खारीजमप्रांत; ४७
खुत्ता; १२६, १२७
खोकंद; ११५, ११७
खोरासानप्रांत; ३२, ४७, ५०, ८९
खोवारिसमप्रांत; ८९
खंबायत; १७४

ग

गज्नी; ५०, ५२–५५ ६३, ११८, १५३ १६२

गढ मंडळ; १७२–१७४; १८२

ग्वाल्हेर; १०८, १४०, १७२, १७९, १८२

ग्रीस; २५, ३९

गुजराथ; ७७, ८८, ९३, ११३, १३४, १३५, १५६, १५९, १६७, १७४, १७५, १९३

गोमती नदी; १३३,

गोवळकोंडें; ४१, १९९, २००, २१९

गोवें; १९३

गंगा नदी; १२७, १३७, १३९, १६०

घ

घगर नदी; १६३

घोघरा नदी; ८३, १७५

च

चितोडगड; ७५, ७६, १४१, १५९, १७१, १७२, १९०

चीनदेश; ४३, ४६–४८, ७९, ९५, ९६, १०४

चुनारगड; १२४, १३३–१३७, १४९

चंदेरी; १०८, १२३, १६६

ज

जम्मू; ९४

जयपूर; ७५, १६१, १७१

जरूसलेम; १७, २२, ३७

जर्मनी; ३९, ४७, २१८

जार्जिया; ९०

जाफराबाद; १३३, १३४

जालनापूर; १७७

जालंदर; १६४, १८०

जिब्राल्टर; २९, ३०, ३९

जोधपूर; १५२

जोनपूर; ८८, १०७, १११, १२३, १३३, १३४

झ

झगझार्तीस नदी; ९५

झाब नदी; ३१

ट

टारस पर्वत; ९५

टुर्स; ३०

ट्यूनिस; ३०, ३२, ३९

ठ

ठठ्ठा; ८०, २२५

ठाणें; ३५, १८९

ड

डेनमार्क; १०५

डेव्हन शायर; १२

त

तघलखाबाद; ७८

तार्तरी; १७, २५, २२६

ताशकंद; ११७

त्रिबिझोंद; ९६

त्रिपोली; ६९

तुर्कस्थान; १७, २२, २५, ३३, ३७, ४७ ८०, ८८

तुलंबा; ९१

तैग्रीस नदी; ३१, ९०

तेहरान; ९६
तैलंगण प्रांत; ७८, ८२
तांजर्स; ७९, १०५
तांडा; १७५

द

दमास्कस; ४, २२, २५, २८, ३०, ३२, ९५
दिपालपूर; ७०, ८१,९४
दिल्ली; २७, ४२, ४५, ५१, ५७, ५८, ६३,६५, ६८, ७१-७४ ७७-८१, ८५-८८, ९२-९४, १०५-१०७ ११०, १११,१२०-१२३, १३०,१३३, १५६-१५८,१६०; १६१, १६३-१६५, १९७ २०३, २०४, २०७-२१०, २१२, २१९, २२०
देवगिरी; ७१
दोहद; २१२
दौलताबाद; ७१, ८०, ८१, १७७, २१२, २१९

ध

धार; ९३
धोलपूर; १०८

न.

नगरकोट; ९४
नर्मदानदी; ९३, ११२, १७७
नरवार; ६३
नवसरी; १७
नहरगड; १४८
नॅव्हारिनोचें आखात; ३९
न्याईल नदी; ३९
नाऽहाईद; २४
निको पोलिस; ३८
निपर नदी; ४७
नीलाब; ५२
न्यूफाउंडलंड; १२
न्यूयार्क; ५८

प.

पाटणा; १४८, १७५
पानीपत; ८३, ९२, १११, १२१, १२३,
पारीस; ५८, १४८,
पालेस्टाईन; ३४, ३५
पासिफिक महासागर; ४३, ४७
प्यानोनिया; २१९
पिरर्नाज; ३०
पिवळा समुद्र; ४७
पुर्व समुद्र; ४७
पेकीन; ४८
पेट्रोग्रॉड ५८
पोर्तुगाल; ४२
पंजाब; ५१, ५४, ६३, ७२, ७७, ८३, ८८, ९१, १०७, १२०, १३३, १४८, १५०, १५१, १५५, १५७, १५८, १६१, १६३, १७७, १७८, २०३, २२४

फ.

फतियाबाद; ९२
फरगाणा प्रांत; ३५, ११५, ११७, १२६
फ्रान्स; १५, ३७, ३९, ३१७, ३१८, ३३१
फिरोजकोह; ५५
फिरोजाबाद; ८५
फैजाबाद; १७५

ब.

बक्सार; १३८, १५९
बगदाद; ३१, ३२, ३४-३७, ६८, ९०, १०५
बदकशान; १२५, १२७, १५३, १५४, १७७,
बदाऊन; १०७
बनारस; १३३
बल्क; ८८
बलगेरिया; ३८
बसरा ६८,
बऱ्हाणपूर; १७६, १७७, १८५
ब्रह्मदेश; २२८
ब्रह्मपुत्रानद; १४२
बाल्कन द्वीपकल्प; ३८
बास्फरसची सामुद्रधुनी; २८, २९
बिकानेर; ८३
बियाना नदी १३३
बियाना शहर १४७, १५०
बियास नदी; ९१
बिहार प्रांत; ५७, १२३, १२४, १३५, १७५
बुखारा; ३२, ३३, ३५, ३६, ४७
बुखापस्ते; ३९, ४७
बुलंद शहर; ५२
बूर्स; ९५
बेराक प्रांत; ६१
बंगाल; ४५, ५७, ६१, ६४, ६५, ७०, ८०, १०७, ११३, १२३, १४०, १४२, १७५, १७७
बांदा; १४१
बुलंद शहर; ६३, १०८, १२३, १३३, १७२, १८१

भ

भक्कर; १५१
भागीरथी नदी; ५८
भाटनीर; ९१
भावलपूर; ९१
भूमध्य समुद्र २५, २९, ३१, ३७, ३९
भोपाळ; १२८;

म

मक्का; ३, ७, ६९, १५६, १६६, १६७, १७५, १८०, २००
मच्छिवाडा; १६६
मथुरा; ५२
मदीना; ५, ८, २१, २२, २५, २८, ३०, २००
मनसूरपूर; ८३
मसूरी; ९४
महदिया; ३२
महाराजपूर; ९२
मह्रू; ९३
मार्न्हे; ९६
मानकोट; १६३
मारवाड; १३६, १४१, १५२, १९७
माल्टा; २५, २९
मास्को; ४७, ९०, १०४
माहुली; १८९
माळवा; ६३, ८८, ९३, १०५, ११३, १२३, १३४, १३५, १४०, १५९, १६८, २०३
मिर्झापूर; १२४

मिरत; ९४

मिसर; १७, २५, ३४, ६०

मुरादाबाद; १०९

मुलतान; ३५; ६५, ७०, ७२, ९१, ९४

मेवाड; १२२, १२३, १७२

मेसापोटेमिया; ३९

मोरोक्को; २६

मंगोलिया; ३३, ४०

मांटगामरी; ९१

मांडवगड; ९३, १५९, १६८, २२८, २२९

म्हैसूर; २०४

## य

यमुना नदी; ६३, ७१, ८३, १४८, १६३

युफ्रेतीस नदी; ३९

यूरोप; १७, ३७, ३८, ४०, ४७, ५०, ९५, २१८

## र

रतनभोर; ७५, १४०

राशिया; ३९, ४७–४९

राठगड; १३३

रायसीन; १३६, १४०–१४२

रावी नदी; ९१

रितविक् २१८

रोझा; २१२, २१९

रोटसगड; १३५, १३७, १४०, १४१;

रोम; ३, २१९

रोहटक; १५७

रोहिताश्वगड; १३५

ऱ्होडस बेटें; २५, ३९

## ल

लखनौ; १०९, २११

लखनौती; ७८

लाहोर; ५२, ५५, ९४, ११६, १५७, २०८, २२९

लंडन; १४८, २०३, २३५

## व

विजयानगर; १, ९

विजापूर; १८, ४१, १९९, २१९

व्हर्जीनिया; १२

व्हेनीस; ४९

व्होल्गानदी; ४७

## श

शहादग; २११

शहानवाझ; ९१

शहापूर; १७७, १८९

शिकंदरा; १११, १६०, २११

शिक्री; १२२, १२३, १७६, १८६, १९०, २११

शिराज; ६९

शिवालिक पहाड; ९४, १६३

शीवास; ९५

शोणभद्रनद; १३५

श्रीरंगपट्टण; २०४

## स.

सतलज नदी; ८३, ९१, १६३,

समर्कंद; ३५, ३८, ८८-९१, ९५, ९६, ९८, १०५, १०६, ११५-११७ ११९, १२५, १२७, १५३

समारा प्रांत; ७१

सरस्वती नदी; ८३

सरहिंद; ८३, १५०

सलीमगड; १४८

सहाराणपूर; ७८
सार्डीनिया; २९
सारंगपूर; १६८, १६९
सासीराम; १३५, १४०
स्कॉटलंड; २२९
सिरदार्या नदी; ११५
सिसीली; २९
सीरिया; ४, १७, २२, २४, २५, ३२, ३४, ३६, ३७, ३९, ९५, २२६
सीरोंज; १७२, १८२,
सुरत; ४४, १६७, १७४, १९३, २२५, २२८, २२९
सेब्सीवार; ८९
सेव्हिल; १०५
स्पेन; १२, ३०, ३१, ३२, ४२, ४८, ९६, ९८, १०४, २१८
सोत नदी; १०९
सोनारगांव; १४२
संजन; १७
संभळ; १०९, १२५, १३३, १४८
सांटा डामिंगो; १२
सिंध प्रांत; ३४, ३५, ४५, ८०, ११३, १५२, १५३, १५६, १७६, २२५,
सिंधूनद; ३१; ३६, ४७, ५१, ५२; ५७, ५८, ८०, ९१, ११९, १४२ १५५

ह

हारिद्वार; ९४
हालंड; १५, २१८
हिंगत; ८९
हिस्सार; ७५, ८३
हुशंगाबाद ९३
हेलेना बेट; ४४
हेलेस्पांटची सामुद्रधुनी; ३८
हैद्राबाद दाक्षिण; ८०
हंगेरी ३९, ४७
हंसी ७५, ८३
हिंदी महासागर; ३१

# शुद्धिपत्र.

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २६ | २१ | मूत व किल | मूतवकिल |
| ५१ | २१ | महंमुदास | महंमुदास |
| ५४ | १७ | भरण्याचें | उभारण्याचें |
| ७३ | ५ | ह्या | ... |
| ७३ | १६ | अल्लादीनच्या | अल्लाउद्दीनच्या |
| ७९ | १ | लेखक वक्ता | लेखक व वक्ता |
| ७९ | २६ | तेथूत | तेथून |
| ८६ | १५ | अनुभवी | अननुभवी |
| ९० | २५ | त्यास | त्यास |
| ९४ | १९ | त्यानें | ...... |
| ९६ | १४ | बादह्याचें | बादशह्याचें |
| ९६ | २४ | प्रवासा सारख्या | प्रवासाच्या सारख्या |
| ९८ | १ | तो | .... |
| ९८ | ७ | त्याच्या | ज्या ज्या |
| १११ | २९ | नेऊन | येऊन |
| ११२ | २ | बादशह्याचा | बादशाहतीचा |
| १४१ | ८ | कुंच | कुंभ |
| २०३ | ५ | पुस्तकांत मॉर्डर्न रिव्ह्यूमध्यें | पुस्तकांत व मॉडर्न रिव्ह्यूमध्यें |
| २२१ | २६ | कायम राहून | ...... |

टीपः—उपरिनिर्दिष्ट अशुद्ध पत्राशिवाय आणखीही कांहीं ठिकाणीं काना, मात्रा, अनुस्वार, वेलांटी वगैरेंचीं अशुद्धें राहिलेलीं आहेत; परंतु तीं सहज लक्षांत येण्यासारखीं असल्यानें त्यांचा वरील यादींत समावेश केला नाहीं.

